वीर ज्ञानोदय ग्रन्थमाला का पुष्प नं. 268

# जैन भारती

## (मराठी)

—रचयित्री—

परमपूज्य गणिनीप्रमुख आर्यिकाशिरोमणि

**श्री ज्ञानमती माताजी**

—मराठी अनुवाद—

**सौ. समीक्षा नांदगाँवकर**

**ध.प. डॉ. आर.आर. नांदगाँवकर-नागपुर (रिटायर्ड कुलपति)**

*परमपूज्य गणिनीप्रमुख श्री ज्ञानमती माताजी के आर्यिका दीक्षा स्वर्ण जयंती वर्ष (अप्रैल 2006-अप्रैल 2007) के अन्तर्गत शरदपूर्णिमा महोत्सव के अवसर पर प्रकाशित*

—प्रकाशक—

**दिगम्बर जैन त्रिलोक शोध संस्थान**

जम्बूद्वीप-हस्तिनापुर (मेरठ) उ.प्र.-250 404, फोन नं.- (01233) 280184, 280236

| प्रथम संस्करण | आश्विन शुक्ला 15, वीर नि. सं.2532 | मूल्य |
|---|---|---|
| 1100 प्रतियाँ | 7 अक्टूबर 2006, शरदपूर्णिमा | 64/- |

**दिगम्बर जैन त्रिलोक शोध संस्थान द्वारा संचालित**

## वीर ज्ञानोदय ग्रन्थमाला

**इस ग्रन्थमाला में दिगम्बर जैन आर्षमार्ग का पोषण करने वाले हिन्दी, संस्कृत, प्राकृत, कन्नड़, अंग्रेजी, गुजराती, मराठी आदि भाषाओं के न्याय, सिद्धान्त, अध्यात्म, भूगोल-खगोल, व्याकरण आदि विषयों पर लघु एवं वृहद् ग्रंथों का मूल एवं अनुवाद सहित प्रकाशन होता है। समय-समय पर धार्मिक लोकोपयोगी लघु पुस्तिकाएं भी प्रकाशित होती रहती हैं।**

*-: संस्थापिका एवं प्रेरणास्रोत :-*

**परमपूज्य गणिनीप्रमुख आर्यिकाशिरोमणि श्री ज्ञानमती माताजी**

*-: मार्गदर्शन :-*

**प्रज्ञाश्रमणी आर्यिका श्री चन्दनामती माताजी**

*-: निर्देशन :-*

**धर्मदिवाकर पीठाधीश क्षुल्लकरत्न श्री मोतीसागर जी महाराज**

*-: सम्पादक :-*

**कर्मयोगी ब्र. रवीन्द्र कुमार जैन**

सर्वाधिकार प्रकाशकाधीन

कम्पोजिंग–**ज्ञानमती नेटवर्क, जम्बूद्वीप-हस्तिनापुर**

( ३ )

# अनुवादिकेचे मनोगत

१५ ऑगस्ट १९९८ हा दिवस माझ्या आयुष्यात चिर-स्मरणीय राहील. मी पू. आर्यिकारत्न ज्ञानमती माताजींना कधी पाहिले नव्हते. त्यांचे नांव फक्त ऐकले होते. पू० माताजी अहमदाबादला असतांना कुलपती सम्मेलन करण्याच्या विचारासाठी डॉ. राजकुमार नांदगांवकर यांच्या नांवाने पत्र आले. हे अहमदाबादला गेले व अशाप्रकारे यांचा व माताजींचा परिचय झाला. पुढे माताजी अहमदाबादवरून हस्तिनापूरला चातुर्मास करण्यासाठी गेल्या. माताजींनी कुलपति सम्मेलन करण्याचे ठरविल्यामुळे ह्यांना अनेक वेळा हस्तिनापूरला जावे लागत असे.

मी पण ह्यांच्याबरोबर माताजींच्या दर्शनासाठी म्हणून १५ ऑगस्टला हस्तिनापूर येथे गेली. हस्तिनापूरला दरवाज्यात पोहोचताच प्रथम दृष्टीस जम्बूद्वीपच पडतो. येथील संपूर्ण वातावरण मनास आनंद व शांती देणारे आहे. येथे मला पू० ज्ञानमती माताजी व त्यांचा सर्व संघ यांना आहार देण्याचे सुद्धा सौभाग्य लाभले. मी स्वतःच आपल्याला धन्य समजते. पू. माताजींनी मला **'जैनभारती'** ह्या पुस्तकाचे मराठीत अनुवाद करण्याचे कार्य दिले. मी हे कार्य सहर्ष स्विकारले – परंतु जेव्हा ग्रंथ उघडून पाहिला तेव्हा असे वाटले हे काम माझ्याकडून कसे होईल ? एक तर आम्ही उज्जैन येथे हिंदी भाषी प्रदेशात राहत होतो. घरी सुद्धा मराठी बोलत नव्हतो. परंतु मोठ्या उत्साहाने उज्जैन येथेच अनुवादाच्या कार्यास सुरवात केली. परंतु पुढे-पुढे कठीण वाटू लागले. कारण धर्माचे सुद्धा मला व माझ्या पतींना एवढे ज्ञान नव्हते. उज्जैनवरून आम्ही नागपूर येथे स्थायिक झालो. येथे हिंदी सुटली व चारी बाजूंनी मराठी भाषा कानांवर पडू लागली. मग मात्र असे वाटले आता मराठी अनुवाद करण्याचे कार्य पूर्ण करावे. परंतु विधिलिखित काही वेगळेच होते. माझ्या पतींची प्रकृती खराब झाली. ह्यात २-३ महिने असेच निघून गेलेत. परंतु अनुवाद करण्याचे कार्य पूर्ण करण्याचे मी ठरविलेच होते. पू. ज्ञानमती माताजींचा आर्शिवाद मला सहाय्य करण्यास भरपूर होता. व शेवटी मी हे कार्य पूर्ण केले. मराठीच्या चुका होणे स्वाभाविक आहे तरी पाठकगण मला क्षमा करतील अशी आशा आहे.


अनुवादिका
**सौ. समीक्षा नांदगांवकर**

महावीर जयंती २००१
चंद्रदीप अपार्टमेंट
निकालस मंदीर रोड,
नागपूर (महाराष्ट्र) ४४०००२
दूरभाष (०७१२) ७६३१८६

# ग्रंथाचा प्रतिपाद्य विषय

शब्द ब्रह्म अनादिनिधन आहे. हे "स्यात्कार" पदाने चिन्हित आहे म्हणून द्वादशांग रूप आहे. यद्यपि हे अनादिकाळांपासून प्रवाह रूपाने येत आहे आणि अनंकाळापर्यंत विद्यमान राहील. न याचा आदि आहे न अन्त. परंतु तीर्थंकरांच्या दिव्य देशनाच्या अपेक्षेने हा सादि सान्त आहे. तीर्थंकर देवांची दिव्यध्वनि प्रतिदिन पूर्वान्हे, मध्यान्हे, अपरान्हे आणि अर्धरात्री अशा चार वेळेस सहा-सहा घडी पर्यंत खिरते. हा दिव्यध्वनि सातशे लघुभाषा आणि अठरा महाभाषांमध्ये खिरते. हा दिव्यध्वनि सर्व भाषारूप आहे. कारण समवशरणांमध्ये उपस्थित सर्व देव, मनुष्य आणि तिर्यंच आपआपल्या भाषांमध्ये ह्याला समजून घेतात.

तीन लोकामध्ये चर-अचर वस्तु आहेत. ह्या सर्व वस्तुंच्या भूतकाळास, वर्तमानकाळास आणि भविष्यामध्ये होणाऱ्या अनंतकाळास केवली भगवान एका समयामध्ये एकत्र पाहतात आणि समजून घेतात. म्हणून त्यांचे ते ज्ञान दिव्यज्ञान किंवा केवलज्ञान म्हटले जाते. केवली भगवान सर्व काही समजून घेतात. परंतु त्यांच्या दिव्यध्वनीमध्ये जे त्यांनी समजले ते सर्व प्रतिपादित होत नाही. गणधर देव आपल्या क्षयोपशम ज्ञानाने सर्व ग्रहण करू शकत नाही. ते जितके समजू शकतात - तितके सांगू शकत नाही. जितके ते सांगु शकतात तितके ते श्रुतरूपाने बांधू शकत नाही. जितके श्रुतरूपाने लिहलेले आहे ते सर्व द्वादशांगरूपाने जैनवाङ्मयामध्ये प्रसिद्ध आहे.

भगवान महावीराच्या शासनामध्ये द्वादशांगाचे पूर्णवेत्ता अंतीम श्रुतकेवली श्री भद्रबाहु आचार्य झाले. त्यांच्या नंतर अंगपूर्वाचे ज्ञान कमी होत गेले. श्री धरसेनाचार्यास बाराव्या दृष्टीवाद अंगाच्या अंतर्गत पूर्वगत अग्रायणीय नांवाच्या द्वितीय पूर्वाचे काही ज्ञान होते. त्यांनी श्रुतविच्छेदच्या भीतीने आपले ते ज्ञान पुष्पदन्त-भूतबली नावाच्या दोन मुनींना दिले होते. ह्या दोन्ही महामुनिनी 'षटखण्डागम' ग्रंथाची रचना केली. अशाचप्रकारे श्री गुणधर आचार्यांना पाचव्या ज्ञानप्रवाद पूर्वाच्या दहाव्या वस्तुचे ज्ञान प्राप्त होते. त्यांनी सुद्धा "कषायपाहुडसूत्र" नावाच्या ग्रंथाची रचना केली. ह्या सिद्धान्तावरच धवला जय धवला नावाची टीका झाली आहे. ज्याचा हिन्दी अनुवाद छापल्या गेला आहे.

ह्या परंपरेतच श्रीकुन्दकुन्दाचार्य झाले ज्यांनी समयसार इत्यादि ग्रंथाची रचना करून अध्यात्मगंगा प्रवाहित केली आहे. हे इतके महान व प्रसिद्ध झाले की कुन्दकुन्दाम्नाय, सरस्वतीगच्छ आणि बालात्कारगण इत्यादि मध्ये त्यांची झलक पहावयांस मिळते. श्री उमास्वामी, समन्तभद्र, पूज्यपाद, अकलंकदेव इत्यादि आचार्य झालेत. यांनी भगवान महावीराच्या दिव्यध्वनीस परंपरागत आचार्यापासून प्राप्त करून तत्वार्थसूत्र-रत्नकरंडश्रावकाचार, आप्तमीमांसा, सर्वार्थसिद्धि, राजवार्तिक इत्यादि ग्रंथांची रचना केली. ह्यासर्व आचार्यांची वाणी प्रमाणभूत आहे. श्री. अनन्तवीर्य आचार्यने प्रमेयरत्नमाला च्या प्रारंभी ही गोष्ट सांगितली आहे. – जसे गंगानदीचे पाणी छोट्या घड्यात भरले तरी सुद्धा ते 'गंगाजल' च राहील. त्याचप्रमाणे प्रामाणिक आचार्यांची वाणी भगवानच्या वाणीचा अंश आहे.

भगवान जिनेन्द्र देवांची वाणी बारा अंगामध्ये विभाजित आहे. ह्या वाणीसच पूर्वाचार्यांनी चार अनुयोगामध्ये अनुबद्ध केले आहे. आणि ह्या अनुयोगास 'वेद' अशी संज्ञा दिली आहे.

जे न्युन आणि अधिक यांनी रहित आहे. विपरित सुद्धा नाही. मात्र जसेचे तसेच आहे. संदेह रहित आहे. अशा वचनांना जैन आचार्यांनी 'वेद' म्हटले आहे. ह्या वेदाचे प्रथमानुयोग, करणानुयोग, चरणानुयोग आणि द्रव्यानुयोग असे चार भेद मानले आहेत.

वर्तमानकाळी उपलब्ध असलेले जैन वाङमय ह्या चार अनुयोगामध्ये विभाजित आहे. ह्या 'जैनभारती' ग्रंथामध्ये ह्या चार अनुयोगाचे अति संक्षेपाने वर्णन केले आहे.

ह्या ग्रंथामध्ये सर्वप्रथम सृष्टीचा क्रम सांगितला आहे. उत्सर्पिणी, अवसर्पिणीच्या षट्काळाचे परिवर्तन दाखविले आहे. अवसर्पिणीचे सुखमासुखमा, सुखमा इत्यादि सहा भेद होतात. ह्यापैकी तीन काळामध्ये उत्तम, मध्यम आणि जघन्य भोगभूमिची व्यवस्था राहते. तृतीय काळाच्या शेवटी चौदा कुळकर उत्पन्न होतात. आणि चतुर्थकाळाच्या प्रारंभी अंतिम कुळकर प्रथम तीर्थंकर जन्म घेतात. ह्यावेळेस ह्या भरतक्षेत्राच्या आर्यखंडामध्ये हुण्डावसर्पिणी काळ सुरू आहे. जो असंख्य उत्सर्पिणी-अवसर्पिणी संपल्यानंतर एक वेळा येतो. ह्या काळामध्ये काही अघटित घटना घटित होतात. जसे प्रथम तीर्थंकराच्या तृतीय काळामध्ये मोक्षगमन, प्रथम चक्रवर्तीचा पराजय, अनेक प्रकारच्या पाखंडी मताची उत्पत्ती इत्यादि.

ह्या ग्रंथात षट्कालाच्या परिवर्तनामध्ये भोगभूमिच्या व्यवस्थेस सांगितले आहे. चौदा कुळकरांची उत्पत्ति व त्यांच्या क्रिया-कार्याचे वर्णन आहे. अंतिम कुळकर महाराजा नाभिराज आणि मरुदेवी युगलिया नव्हते. इंद्राने नाभीराज कुळकराचा विवाह मरुदेवी नांवाच्या कन्येबरोबर संपन्न केला होता. त्यांचे पुत्र ऋषभदेव झाले. त्यांचा विवाह यशस्वती आणि सुनंदा नावाच्या दोन कन्यांबरोबर झाला होता. ऋषभदेवाने प्रजेला असि, मसि, कृषि, विद्या, वाणिज्य आणि शिल्प ह्या क्रियांचा उपदेश दिला होता. ऋषभदेवाने तीन वर्णाची स्थापना करून वर्णव्यवस्था आणि विवाह व्यवस्था केली होती.

अजितनाथापासून महावीरपर्यंत गृहस्थधर्म आणि मुनिधर्म चालत राहले. हुण्डावसर्पिणी काळाच्या दोषाने मधातील तीर्थंकराच्या तीर्थकाळामध्ये धर्मामध्ये अव्यवस्था आली. प्रथम अनुयोगामध्ये ह्या सर्व गोष्टीचा उल्लेख आहे. प्रथम तीर्थंकराचे जीवनचरित्र देऊन अंतीम तीर्थंकर-महावीरस्वामीचे जीवनचरित्र दिले आहे. कारण सर्व तीर्थंकराचे जीवनचरित्र घेतले असते तर ग्रंथ खूपच मोठा झाला असता. भरतचक्रवर्तीचा जीवनपरिचय दिला आहे. राम-लक्ष्मण आणि रावण यांच्यासारखे प्रसिद्ध बलभद्र, नारायण, प्रतिनारायण यांचा संक्षिप्त इतिहास वर्णन केला आहे.

अशाप्रकारे ह्या प्रथम अनुयोगामध्ये चतुर्थकाळानंतर पंचमकाळ व सहाव्या काळाचे वर्णन आहे. उत्सर्पिणीच्या दुखमादुखमा, दुखमा इत्यादि सहा काळांचा उल्लेख आहे. जैनसिद्धांतानुसार हाच सृष्टिचा क्रम आहे. हा क्रम अनादिकाळापासून चालू आहे. याचा कोणी कर्ता ईश्वर विशेष नाही. व याचा हर्ता-संहारक विशेष नाही. स्वयंही सहाव्या काळाच्या शेवटी महाप्रलय होऊन ह्या सृष्टीचा संहार होऊन जातो. ह्या संहारातून काही युगल जोडी वाचतात व त्यांच्यापासून पुन्हा पुढची सृष्टी तयार होते. हे काळ परिवर्तन मध्यलोकातील अडीच (ढाई) द्वीपसंबंधी पांच भरत आणि पांच ऐरावत क्षेत्रातील आर्यखंडामध्येच होते. अन्यत्र होत नाही. विदेहक्षेत्रातील एकशे आठ गांवामध्ये, म्लेच्छ खंडामध्ये, विजयार्ध पर्वताच्या श्रेणीतील विद्याधरांच्या नगरीमध्ये, अडीच द्वीपाच्या पुढे असंख्यात द्वीप समुहांमध्ये, स्वर्गामध्ये आणि नरकामध्ये हे षट्काळ परिवर्तन होत नाही. तेथे महाप्रलयसुद्धा होत नाही. विदेहक्षेत्रामध्ये चतुर्थकाळाच्या प्रारंभी जशी कर्मभूमिची व्यवस्था होती तशीच राहते. म्लेच्छ खंडामध्ये आणि विजयार्ध पर्वताच्या श्रेणीमधील विद्याधरांच्या चतुर्थ काळामध्ये प्रारंभापासून-शेवटपर्यंत परिवर्तन होत राहते. जी भोगभूमि आहे तेथे शाश्वत तीच व्यवस्था राहते. स्वर्गातील व नरकांतील व्यवस्थेमध्ये सुद्धा परिवर्तन होत नाही. प्रथमानुयोगामध्ये महापुरुषांच्या जीवनचरित्रामध्ये धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष ह्या चार पुरुषार्थांचे वर्णन येते. श्रीसमन्त भद्रस्वामीच्या वचनानुसार चार पुरुषार्थाचा, महापुरुषांचे चरित्र आणि पुराण यांचे ज्यामध्ये वर्णन असते त्याला 'प्रथमानुयोग' म्हणतात.

करणानुयोगाच्या प्रकरणांमध्ये या ग्रंथात सर्वप्रथम तीन लोकाचे वर्णन केले आहे. ह्या तीन लोकाच्या

वर्णनामध्येच अधोलोकांत असणाऱ्या सात नरकाचा उल्लेख आहे. पृथ्वीच्या वर दोन भागांत राहणाऱ्या भवनवासी व व्यंतरवासी देवांचे वर्णन आहे. मध्यलोकांतील असंख्यात द्वीप-समुद्राचे वर्णन करतांना जम्बूद्वीपाचे प्रथम वर्णन केले आहे. मध्यलोकांतच ज्योतिर्वासी देवाचे वर्णन केले आहे. उर्ध्वलोकातील वर्णनामध्ये स्वर्गलोकाचे व त्यातील देवांचे वर्णन आहे. अशाप्रकारे तीन लोकातील चार गतिचे आणि चार प्रकारच्या देवांचे वर्णन केले आहे. जीवाच्या द्रव्य, क्षेत्र, काल, भव आणि भाव ह्या पाच परिवर्तनाचे स्वरूप सांगितले आहे. अशाप्रकारे श्री स्वामी समन्तभद्राचार्याच्या वचनानुसार ह्या अनुयोगामध्ये लोक-अलोक आणि चार गतींचे स्वरूप सांगितले आहे.

चरणानुयोगामध्ये सर्वप्रथम सम्यकत्वाचे वर्णन केले आहे. धर्माचे सागारधर्म आणि अनगारधर्म असे दोन भेद करून सागारधर्माचे वर्णन केले आहे. ह्या धर्माच्या वर्णनामध्ये श्रावकाचे पाक्षिक-नैष्ठिक आणि साधक असे भेद केले आहेत. चार प्रकारच्या आश्रमाचे कथन आहे. श्रावकांच्या सहा आवश्यक क्रियांचे विवरण आहे. अकरा प्रतिमांचा दिशा निर्देश आहे. सल्लेखना विधि सांगून सूतक-पातक विधिसुद्धा वर्णन करून सांगितली आहे.

पुढे वैराग्यजननी बारा भावनांचे वर्णन आहे. मुनिधर्माच्या अंतर्गत अठ्ठावीस गुणांचे व त्यांच्या उत्तर गुणांचे विवेचन केले आहे. दहाधर्म, सोळाकारण भावना यांचे वर्णन याच अनुयोगात आहे. ह्या चरणानुयोगात वर्णन केलेला धर्म मोक्षमहल चढण्यासाठी जिन्याप्रमाणे आहे. ह्या अनुयोगात ध्यानाचे वर्णन केले आहे. तपश्चरण हा ध्यान चारित्रामध्ये अंतीम भेद आहे. श्री समंतभद्रस्वामींच्या अनुसार ह्या चरणानुयोगामध्ये गृहस्थ आणि मुनींच्या चारित्र्याची उत्पत्ति, त्याची वृद्धि आणि चारित्र्याची रक्षा यांच्या उपायांचे वर्णन केले आहे.

द्रव्यानुयोगामध्ये सर्वप्रथम सहा द्रव्यांची नावे आहेत. जीवद्रव्याच्या वर्णनामध्ये जीवद्रव्यास नऊ प्रकारेचे सांगितले आहे. गुणस्थान, समास, पर्याप्ति, प्राण, संज्ञा, मार्गणा आणि उपयोग ह्या सर्वांद्वारा जीवाचे संक्षिप्त वर्णन केले आहे. पुद्गल, धर्म, अधर्म, आकाश, काल यांचे अतिसंक्षिप्त वर्णन केले आहे. प्रमाणाच्या भेद-अभेदाचे वर्णन केले आहे. नयाचे वर्णन करतांनी द्रव्यार्थिक, पर्यायार्थिक, नैगम, संग्रह, व्यवहार, ऋजुसूत्र, शब्द, समभिरूढ आणि एवंभूत अशा नऊ प्रकारच्या नयाचे त्यांच्या अनेक भेदाचे व उपनयाचे वर्णन आहे. पुनः अध्यात्म्याच्या अपेक्षेने निश्चय व्यवहार-सद्भूत-असद्भूत नयाचे विवेचन आहे. स्याद्वाद आणि सप्तभंगीचे सुंदर व सरल विवेचन आहे.

अनेकांताचे वर्णन व निक्षेपाचा निर्देश आहे. जीवाचे स्वतत्व पाच आहेत. औपशमिक, क्षायिक इत्यादि अनेक भेदांचे वर्णन केले आहे. चार्वाक, बौद्ध, सांख्य, नैयायिक, मीमांसक आणि वेदांत यांच्या दर्शनाचा उल्लेख आहे. ह्या एकांत मताचे निरसन करून जैन दर्शनाचे संक्षिप्त कथन व सर्वज्ञ सिद्धि सांगितली आहे.

आत्म्याचे बहिरात्मा, अन्तरात्मा आणि परमात्मा असे तीन भेद करून विवेचन केले आहे. मोक्षमार्गाच्या विवेचनामध्ये व्यवहार रत्नत्रय आणि निश्चयरत्नत्रयाचे सरल वर्णन आहे. निर्जरा व नवकेवललब्धि यांचे अधिक वर्णन आहे. कर्मसिद्धांत प्रकरणामध्ये कर्माचे भेद-प्रभेद, लक्षण कर्माचे कारण यांचे कथन आहे. बंध, उदय आणि सत्ता-प्रकृति यांचे संक्षिप्त विवेचन आहे. कर्माचा आश्रव, कर्मबंध मिथ्यात्व, अविरति इत्यादिंचे वर्णन आहे. मोक्षाच्या कारणामध्ये सम्यक्त्वाच्या प्राप्तीसाठी पाच लब्धिचे वर्णन आहे. सम्यक्त्वाचे लक्षण सांगून चारित्राच्या प्राप्तिचे कारण सांगितले आहे. सराग चारित्र्याचा निर्देश करून उपशम व क्षायिक चारित्र सांगितले आहे. कर्माच्या नाशाचा क्रम सांगितला व केवली भगवान्‌चा कवलाहार याचा निषेध केला आहे. मुक्त जीवांचे स्थान, त्यांची अवगाहना, संख्या आणि सिद्ध भगवान्‌च्या गुणांचे वर्णन केले आहे.

ह्या अनुयोगाच्या वर्ण्य विषयामध्ये ही शंका येऊ शकते की यामध्ये गुणस्थान, मार्गणा, कर्म प्रकृतिचा बंध

उदय इत्यादिंचे विवेचन का आहे ? हा तर करणानुयोगाचा विषय आहे. याचे समाधान असे आहे की समंतभद्र स्वामीने द्रव्यानुयोगाचे जे लक्षण सांगितले आहे त्याच्या आधारे ह्या विषयांना या अनुयोगांत घेतले आहे.

**जीवाजीवसुतत्वे पुण्यापुण्ये च बंध मोक्षौ च ।**
**द्रव्यानुयोगदीपः श्रुतविद्यालोकमातनुते ॥**

अर्थात ज्यामध्ये जीव-अजीव तत्वांचे, पुण्य-पापप्रकृतिचे, बंध मोक्षाचे वर्णन आहे तो द्रव्यानुयोग आहे.

या कथनानुसार जीव तत्वाच्या वर्णनामध्ये गुणस्थान, समास, पर्याप्ति, प्राण, संज्ञा, मार्गणा यांचे वर्णन घ्यावेच लागेल. पुण्य-पाप प्रकरणांमध्ये कर्माच्या आश्रवबंधाचे वर्णन होऊन जाईल. बंधाच्या कथनामध्ये कर्मबंधाचे कारण, कर्मप्रकृतिंचा बंध, उदय, सत्ता अशा योग्य प्रकृतिंचे वर्णन करावेच लागेल.

श्री समन्तभद्राचार्य यांच्या विचाराने करणानुयोगाचे बंधमोक्ष विषय नाही. लोक-अलोक, उर्ध्व, मध्य, अधोलोक यांचा विस्तार अपेक्षित आहे. करणानुयोगामध्ये गुणस्थान, मार्गणा, कर्मबंध, उदय, सत्व यांचा संकेत सुद्धा नाही. म्हणून –

**लोकालोकविभक्तेर्युगपरिवृत्तेश्चर्तुगतीनां च ।**
**आदर्शमिव तथामतिरवैति करणानुयोगं च ॥**

अर्थात ज्यामध्ये लोकाकाश, अलोकाकाश यांचे वर्णन आहे. युगपरिवर्तनाचे वर्णन आहे. चारही गतिंचे विवेचन आहे तो करणानुयोग आहे.

द्रव्यानुयोगामध्ये गुणस्थान इत्यादिचे विवेचन उपयुक्त आहे. अशाप्रकारे चारी अनुयोगांचा सार घेऊन तयार केलेला हा ग्रंथ स्वाध्यायास अति उपयोगी आहे. हा ग्रंथ प्रत्येक जनास कल्याणकारी हो हीच मनोकामना आहे.

**—क्षुल्लक मोतीसागर**

( ८ )

# संस्थानाचा परिचय

– **ब्र. रवींद्र कुमार जैन**

ज्या संस्थाद्वारा ह्या ग्रंथाचे प्रकाशन झाले आहे त्याची संक्षिप्त माहिती पाठकांना देणे आवश्यक आहे.

### संस्थानाचा जन्म

पू. गणिनी आर्यिकारत्न श्री ज्ञानमती माताजींच्या प्रेरणेने दिगंबर जैन त्रिलोक शोध संस्थानाचा जन्म १९७२ मध्ये झाला. ह्या संस्थानचे रजिस्ट्रेशन दिल्ली सोसायटी ॲक्टच्या अंतर्गत सन १९७२ करून घेतले आहे.

### संस्थानाची कार्यकारिणी

संस्थानाच्या नियमानुसार प्रत्येक तीन वर्षाने संस्थानाच्या कार्यकारिणीचे गठन पू. माताजींच्या आज्ञेनुसार होत राहते. डॉ. कैलाशचंद जैन (राजाटॉयज) दिल्ली यांना ह्या संस्थानाचे सर्वप्रथम अध्यक्ष १९७२ मध्ये मनोनीत केले होते.

महामंत्री - श्री. वैद्य शांतिप्रसाद जैन (दिल्ली), कोषाध्यक्ष ब्र. श्री. मोतीचंद जैन, मंत्री श्री. कैलाशचंद जैन (करोलबाग) नई दिल्ली तसेच उपमंत्री ब्र. रवीन्द्रकुमार जैन इत्यादि पदाधिकारी मनोनीत केले होते. संस्थानाच्या अध्यक्ष पदावर श्री. मदनलालजी चांदवाड, रामगंजमंडी (राजस्थान) ६ वर्ष पर्यंत राहिले. त्यांच्यानंतर ६ वर्षापर्यंत श्री. अमरचंदजी पहाड़िया (कलकत्ता) संस्थानाच्या अध्यक्षपदावर राहिले. महामंत्री स्व. श्री. कैलाशचंद जैन, सरधना (उ.प्र.) यांच्यानंतर श्री. गणेशीलालजी रानीवाला (कोटा) राज. यांच्या नंतर श्री. जिनेंद्रप्रसाद जैन ठेकेदार नई दिल्ली महामंत्री पदावर राहिले. वर्तमान पासून कार्यकारिणीमध्ये जवळपास ८१ सदस्य साऱ्या भारतवर्षातून मनोनीत केले आहे. यात श्री गणेशी लालजी रानीवाला कोटा, श्री. देवकुमारसिंह कासलीवाल इंदोर संरक्षक पदावर आहेत. ब्र. रवीन्द्रकुमार जैन-अध्यक्ष, श्री. जिनेन्द्रप्रसाद जैन, ठेकेदार-दिल्ली-कार्याध्यक्ष, श्री. कैलाशचंद जैन करोलबाग, नई दिल्ली-महामंत्री, श्री. अनिलकुमार जैन कमल मंदिर, दिल्ली-कोषाध्यक्ष, श्री. मनोजकुमार जैन, मेरठ-मंत्री पदावर मनोनीत आहेत. अनेक गणमान्य महानुभाव संस्थानाच्या उपाध्यक्ष व अन्य पदावर पदासीन आहेत.

### हिशोब व पैश्याची व्यवस्था

संस्थानाचा जमाखर्च प्रतिवर्ष ऑडीटरकडून ऑडिट केल्या जातो. हिशोब कार्यकारिणीच्या बैठकीमध्ये पास केल्या जातो. संस्थानाची संपूर्ण जमाराशी रसीद किंवा कूपनाद्वारे प्राप्त होते. स्टेट बँक ऑफ इंडिया, हस्तिनापूर व पंजाब नॅशनल बँक, हस्तिनापूर अशी संस्थानाच्या नावाने खाती आहेत. या बँकेचे काम संस्थानाचे अध्यक्ष, कार्याध्यक्ष, कोषाध्यक्ष किंवा मंत्री या चारपैकी कोणत्याही दोघांच्या हस्ताक्षराने होते.

### निर्माण

सन १९७४ पासून हस्तिनापूर येथे निर्माण कार्य प्रारंभ केले होते. आतापर्यंत जम्बूद्वीप स्थलावर जम्बूद्वीपाची रचना, यात्रीगणांसाठी, पर्यटकांसाठी, शोधार्थिसाठी जवळजवळ २०० खोल्या व काही फ्लॅट बनले

आहेत. तीन मूर्ति मंदीर ज्यामध्ये तीन वेदी आहेत, निर्माण केले गेले. मुख्य वेदीवर भगवान आदीनाथ, भरत व बाहुबलीच्या मूर्ती विराजमान आहेत. आजुबाजूच्या वेदीवर पार्श्वनाथ, भगवान नेमीनाथाची प्रतिमा विराजमान आहे. भगवान महावीर स्वामीचे नवीन कमल मंदीर तयार झाले आहे. या मंदीराचा कलशारोहण व मंदीरवेदी प्रतिष्ठा महोत्सव मे १९८० मध्ये संपन्न झाला. याशिवाय साधुंच्या राहण्यासाठी रत्नत्रय निलय, कार्यालय आणि पाण्याचा हौद बनविल्या गेले आहे. अन्य निर्माण कार्यसुद्धा चालू आहेत. या व्यतिरिक्त वासुपूज्य मंदिर, शांति कुंथु अरनाथ मंदिर, ध्यान मंदिर यांचेसुद्धा कार्य पूर्ण झाले आहे.

## शैक्षणिक गतिविधी

निर्माण कार्याच्या शिवाय संस्थानाने शिक्षा व धर्मप्रचार कार्य सुद्धा केले आहे. शिक्षण-प्रशिक्षण शिविर सेमीनार, अंर्तराष्ट्रीय सेमीनार, कुलपति संमेलन वगैरे आयोजन अनेकवेळा केले आहे.

## सम्यग्ज्ञान मासिक पत्रिकेचे प्रकाशन

पू. गणिनी आर्यिकारत्न श्री ज्ञानमती माताजींद्वारा लिखित चार अनुयोगाने युक्त, धर्मप्रभावनाच्या समाचार सहित सम्यक्ज्ञान पत्रिकेचे प्रकाशन जुलै १९७४ मध्ये ह्या संस्थानाने चालू केले होते. या पत्रिकेचे विमोचन प. पू. आचार्य धर्मसागरजी महाराजांच्या करकमलाद्वारा ऐतिहासिक दिगंबर जैन लाल मंदिर दिल्ली येथे १ जुलै १९७४ ला केले गेले होते. भारतवर्षातील प्रत्येक प्रांतामध्ये जवळजवळ सर्व गावांत ह्या पत्रिकेचे सदस्य आहेत. २३ वर्षापासून ह्या मासिक पत्रिकेचे प्रकाशन सुरू आहे.

## वीर ज्ञानोदय ग्रंथमाला

संस्थानाच्या अंतर्गत वीर ज्ञानोदय ग्रंथमालेची स्थापना सन् १९७४ मध्ये झाली. सर्वात प्रथम अष्टसहस्त्रीच्या एका भागाचे प्रकाशन १९७४ मध्ये झाले. त्यानंतर पू. ज्ञानमती माताजींनी लिहिलेल्या १५० ग्रंथाचे प्रकाशन आतापर्यंत झाले. लहान मुलांसाठी बालविकास ४ भाग, इंद्रध्वज मंडळविधान, कल्पद्रुम मंडल विधान, तीनलोक मंडल विधान, सर्वतोभद्र विधान इत्यादि अनेक प्रकारचे प्रकाशन लोकप्रिय झाले आहेत.

## जम्बूद्वीप औषधालय

नोव्हेंबर १९८५ मध्ये जम्बूद्वीप स्थलावर निःशुल्क आयुर्वेदिक औषधालयाचा प्रारंभ झाला. राजवैद्य शीतलप्रसाद अँड सन्स, दिल्ली आणि त्रिमूर्ति फार्मसी, बीकानेर यांच्याकडून आयुर्वेदिक औषधी प्राप्त होत असते.

## जम्बूद्वीप पुस्तकालय

संस्थानामध्ये १५००० ग्रंथाचा एक विशाल जम्बूद्वीप पुस्तकालय आहे.

## पंचकल्याणक प्रतिष्ठा

प्रथम पंचकल्याणक प्रतिष्ठा सन १९७५ मध्ये भगवान् महावीर स्वामीच्या सव्वा नऊ फूट उंचीच्या प्रतिमेची झाली होती. त्यावेळेस छोट्या खोलीतच प्रतिमा बसविली होती. आता तेथे भव्य कमलमंदिर तयार झाले आहे. ह्या पंचकल्याणकमध्ये चारित्र चक्रवर्ती १०८ आचार्य श्री. शांतिसागरजी महाराजांचे तृतीय पट्टाचार्य श्री. धर्मसागरजी महाराज विशाल संघसहित तसेच एलाचार्य श्री. विद्यानंदजी व गणिनी आर्यिकारत्न ज्ञानमती

माताजी यांचे सान्निध्य प्राप्त झाले. प्रतिष्ठाचार्य पं. श्री. वर्धमान पार्श्वनाथ शास्त्री, सोलापूर निवासी होते.

द्वितीय पंचकल्याणक ८४ फूट उंच असलेल्या सुमेरू पर्वताच्या १६ जिनप्रतिमांचे २८ एप्रिल पासून ३ मे १९७९ पर्यंत आयोजित केले. ह्या पंचकल्याणकमध्ये आचार्य श्री. शांतिसागर महाराजांचे पंचमपट्टाचार्य आचार्य कल्प श्री. श्रेयांस सागरजी महाराजांचे सान्निध्य आणि श्री ज्ञानमती माताजी यांचे सान्निध्य प्राप्त झाले होते. ह्या आयोजनाचे प्रतिष्ठाचार्य ब्र. सूरजमलजी निवाई होते.

तृतीय पंचकल्याणक प्रतिष्ठा महोत्सव १८ एप्रिल १९८५ ते २ मे १९८५ पर्यंत संपन्न झाला. ह्या आयोजनामध्ये जम्बूद्वीपाच्या सर्व जिनबिंबाचे पंचकल्याणक झाले. हा समारोह राष्ट्रीय स्तरावर संपन्न झाला. ह्या समारोहाच्या वेळेस आचार्य श्री. धर्मसागर महाराज जी संघस्थ मुनि श्री. निर्मलसागर वर्धमानसागर आदि ससंघ विराजमान होते. तसेच आचार्य श्री सुबाहुसागरजी तसेच गणिनी आर्यिकारत्न श्री ज्ञानमती माताजी ससंघ विराजमान होत्या. प्रतिष्ठाचार्य ब्र. सूरजमलजी होते. समारोहामध्ये भारतवर्षांतील अनेक धर्मानुरागीबंधुंनी भाग घेतला. उत्तरप्रदेश सरकारने सुद्धा सहयोग दिला. उत्तरप्रदेशाचे तत्कालीन मुख्यमंत्री श्री. नारायणदत्त तिवारीने जंबूद्वीपाचे उद्घाटन केले होते. समारोहामध्ये अनेक केन्द्रीय मंत्री व उत्तरप्रदेशाचे मंत्रीगण व सांसद उपस्थित होते. भारत सरकारचे रक्षामंत्री श्री. पी. वी. नरसिंहराव (पूर्वप्रधानमंत्री) सुद्धा उपस्थित होते. पुढे यांच्या करकमलाद्वारे अखंड ज्ञान ज्योतीची स्थापना झाली.

चतुर्थ पंचकल्याणक ६ मार्च ते ११ मार्च १९८७ पर्यंत संपन्न झाले. ह्या कल्याणकामध्ये भगवान् पार्श्वनाथ व भगवान नेमीनाथ प्रमुख होते. ह्या कार्यक्रमास आचार्य विमलसागरजी महाराज ससंघ व गणिनी आर्यिकारत्न ज्ञानमती माताजी ससंघ विराजमान होत्या. ह्या पंचकल्याणकाचे प्रतिष्ठाचार्य पं. श्री. शिखरचंदजी भिण्ड होते. ह्या शुभवेळी सुमेरू पर्वतावर स्वर्ण कलशारोहण सुद्धा केले गेले. मुख्य अतिथि माधवराव सिंधिया, केन्द्रीय रेल्वेमंत्री व श्री. जे. के. जैन पूर्व सांसद सुद्धा उपस्थित होते.

## ज्ञान ज्योति प्रवर्तन

४ जून १९८२ ला लालकिल्ला मैदान, दिल्लीवरून जम्बूद्वीप ज्ञानज्योतिचे पर्वतन तत्कालीन प्रधानमंत्री स्व. श्रीमती इंदिरा गांधींच्या हस्ते झाले. निरंतर १०४५ दिवस ज्ञानज्योतिचे प्रवर्तन संपूर्ण भारतवर्षामध्ये गावोगावी झाले. अहिंसा, चरित्रनिर्माण तसेच विश्वबंधुत्वाचा व्यापक प्रचार-प्रसार झाला. ह्या अखंड ज्ञानज्योती प्रवर्तनाच्या वेळी अनेक प्रांताचे राज्यपाल, मुख्यमंत्री, सांसद, कमिश्नर, आर्यिका आणि भट्टारक यांनी स्वागत व आर्शिवाद दिला. प्रवर्तनामध्ये तत्कालीन सांसद जे. के. जैन यांचा सहयोग प्राप्त झाला.

## ज्ञानज्योतिची हस्तिनापुरला अखंड स्थापना

१०४५ दिवसानंतर साऱ्या भारतवर्षामध्ये प्रवर्तन केल्यानंतर ज्ञानज्योतिची अखंड स्थापना २८ एप्रिल १९८५ मध्ये जम्बूद्वीपाच्या मुख्य दरवाजावर स्थाई रूपाने हस्तिनापुरला केली. ही स्थापना जे. के. जैन सांसद अध्यक्ष व तत्कालीन रक्षामंत्री श्री. पी. वी. नरसिंहराव यांच्या करकमलाद्वारे झाली.

## जम्बूद्वीप स्थलावर भव्य दीक्षा समारंभ

पू. गणिनी आर्यिकारत्न श्री. ज्ञानमती माताजींचे शिष्य व शिष्या यांचा दीक्षा समारोह सुद्धा जम्बूद्वीप स्थलावर वेळोवेळी आयोजित केल्या गेलेत. सर्वप्रथम ब्र. श्री. मोतीचंद जैन, सनावद (म.प्र.) यांना क्षुल्लक दीक्षा ८ मार्च १९८७ मध्ये भव्य समारोहांत आचार्य श्री विमलसागरजी महाराजांनी दिली. दीक्षानंतर त्यांचे नाव क्षुल्लक श्री मोतीसागर ठेवले.

द्वितीय दीक्षा समारोहामध्ये कु. माधुरी शास्त्री पू. ज्ञानमती माताजींची लहान बहिण यांची दीक्षा १३ ऑगस्ट १९८९ मध्ये झाली. यांची दीक्षा पू. ज्ञानमती माताजींच्या करकमलाद्वारा झाली. दीक्षेनंतर त्यांचे नाव आर्यीका चंदनामती ठेवले.

## पंचम पंचकल्याणक आणि जम्बूद्वीप महामहोत्सव

३ मे पासून ७ मे १९९० पर्यंत जम्बूद्वीप येथे अखिल भारतीय स्तरावर पंचकल्याणक प्रतिष्ठा महामहोत्सव साजरा झाला. ह्या महोत्सवामध्ये इंद्रध्वजाच्या ४५८ जिनबिंबाची पंच कल्याणक प्रतिष्ठा संपन्न झाली.

ह्या शुभ अवसरावर पंचवर्षीय जम्बूद्वीप महामहोत्सवाचे आयोजन केल्या गेले. ह्या महोत्सवामध्ये ४ मे १९९० ला केन्द्रीय उद्योगमंत्री श्री. अजीतसिंह मुख्य अतिथी होते. व ६ मे १९९० ला उत्तरप्रदेशाचे महामहिम राज्यपाल श्री. बी. सत्यनारायण रेड्डी मुख्य अतिथी रूपाने उपस्थित होते. राज्यपाल महोदयांनी कमलमंदिराचे उद्घाटन केले होते.

## जंबूद्वीप महामहोत्सव १९९५ चे आयोजन

पू. ज्ञानमती माताजींच्या प्रेरणेनुसार प्रति ५ वर्षांनंतर जंबूद्वीप महामहोत्सव करण्याचे ठरविले होते. त्यानुसार द्वितीय महामहोत्सव १९९५ मध्ये आयोजित केल्या गेला. हा कार्यक्रम ४ ऑक्टोबर ते ८ ऑक्टोबर १९९५ पर्यंत संपन्न झाला. मुख्य अतिथींच्या रूपाने केन्द्रीय खाद्यमंत्री श्री. अजीतसिंह यांनी येऊन माताजींचा आशिर्वाद प्राप्त केला. तसे अजीतसिंहाच्या करकमलांनी ध्यान मंदिराचे उद्घाटन झाले. ह्याबरोबरच भगवान वासुपूज्य मंदिर व शांतीनाथ मंदीराची वेदीप्रतिष्ठा व मंदीरावर कळस चढविणे झाले.

अशाप्रकारे दिगंबर जैन त्रिलोक शोध संस्थानद्वारा अनेक योजना चालू आहेत. ॐ मंदीर आणि ४५८ प्रतिमा, मध्यलोकांतील शाश्वत अकृत्रिम चैत्यालय निर्माण केल्या जातील व इंद्रध्वज मंदीरसुद्धा तयार होईल.

## णमोकार महामंत्र बँकेची स्थापना

ह्या संस्थानातर्फे पू. माताजींच्या प्रेरणेने णमोकार महामंत्र बँकेची स्थापना झाली. पू. माताजींच्या मांगीतुंगी विहाराच्या वेळेस दिल्ली, राजस्थान, हरियाणा, म.प्र., महाराष्ट्र, उ.प्र. इत्यादि प्रांतामध्ये याच्या शाखासुद्धा उघडल्या गेल्यात. ह्या बँकेच्या प्रति लोकांचा अतिउत्साह दिसून येतो. या बँकेचे अनेक सदस्य आहेत व करोडो मंत्र बँकेची जमापूंजी आहे.

# एक अद्वितीय जैन केन्द्र
# *दिगम्बर जैन त्रिलोक शोध संस्थान*

**-कर्मयोगी ब्र. रवीन्द्र कुमार जैन (अध्यक्ष)**

**संक्षिप्त परिचय :**

पिछले तीन दशकों में राजधानी दिल्ली की उत्तर दिशा में उत्तरप्रदेश के जिला मेरठ स्थित पौराणिक तीर्थ **हस्तिनापुर** में एक राष्ट्रीय और अंतर्राष्ट्रीय आकर्षण का केन्द्र उभर कर आया है। 200 फुट के व्यास में सफेद और रंगीन पत्थरों से निर्मित जैन भूगोल की अद्वितीय वृत्ताकार रचना **'जम्बूद्वीप'** द्वारा अपने आधार पर वेष्टित हल्के गुलाबी संगमरमर से निर्मित 101 फुट ऊँचे **सुमेरु पर्वत** की शोभा आज किसके मन को आकर्षित नहीं करती है?

प्राचीन जैन साहित्य एवं भूगोल के परिचायक, वैज्ञानिकों के लिए शोध केन्द्र, आध्यात्मिक उन्नयन के लिए पवित्र स्थान, मानसिक शांति एवं जिनेन्द्र भगवान की पूजन-भक्ति के सम्पूर्ण साधनों तथा समस्त आधुनिक सुविधाओं की उपलब्धता सहित इस अनुपम तीर्थ की जनक संस्था का नाम है-**दिगम्बर जैन त्रिलोक शोध संस्थान (रजि.)**। जैन समाज की सर्वोच्च साध्वी पूज्य गणिनीप्रमुख आर्यिकाशिरोमणि श्री ज्ञानमती माताजी की पावन प्रेरणा से 1972 में इस संस्थान का सूत्रपात किया गया। दिगम्बर जैन इंस्टीट्यूट ऑफ कास्मोग्राफिक रिसर्च (**Digambar Jain Institute of Cosmographic Research**) के नाम से प्रसिद्ध इस संस्थान का आधारभूत लक्ष्य था-जम्बूद्वीप का निर्माण और यह जम्बूद्वीप ही अंततः संस्थान का मुख्य कार्यालय बन गया।

जंबूद्वीप की 30 एकड़ पवित्र भूमि पर संस्थान के द्वारा संचालित विभिन्न योजनाओं/रचनाओं का संक्षिप्त विवरण निम्नांकित है-

**1. जंबूद्वीप रचना**-जिनेन्द्र भगवान की 207 प्रतिमाओं से पावन भारतीय शिल्प और जैन भूगोल का अद्वितीय उदाहरण, आधुनिक आकर्षणों-बिजली के फौव्वारे, नौका-विहार इत्यादि सहित।

**2. कमल मंदिर**-भगवान महावीर की अतिशयकारी खड्गासन प्रतिमा इस मंदिर में विराजमान हैं।

**3. ध्यान मंदिर**-24 तीर्थंकर भगवन्तों की प्रतिमाओं सहित **'ह्रीं'** रचना इस मंदिर में विराजमान हैं, जो कि 'ध्यान' (Meditation) करने हेतु उत्तमोत्तम माध्यम हैं।

**4. त्रिमूर्ति मंदिर**-भगवान आदिनाथ, भरत एवं बाहुबली की खड्गासन प्रतिमाओं से इस मंदिर का नाम सार्थक है। कमल पर विराजमान भगवान नेमिनाथ एवं पार्श्वनाथ से इस मंदिर की शोभा द्विगुणित हो गयी है।

**5. वासुपूज्य मंदिर**-इस मंदिर में 12वें तीर्थंकर-वासुपूज्य स्वामी की खड्गासन प्रतिमा विराजमान हैं।

**6. शांति-कुंथु-अरहनाथ मंदिर**-जिन भगवन्तों के गर्भ, जन्म, तप और ज्ञान कल्याणकों से हस्तिनापुर की भूमि परम-पावन हुई है, उन शांति-कुंथु और अरहनाथ भगवंतों की खड्गासन प्रतिमाएं इस मंदिर में विराजमान हैं।

**7. ॐ मंदिर**-अरिहंत, सिद्ध, आचार्य, उपाध्याय और साधु परमेष्ठियों की प्रतिमाओं सहित ॐ (ओम) रचना इस मंदिर में विराजित है।

**8. विद्यमान बीस तीर्थंकर मंदिर**-इस मंदिर में विदेह क्षेत्र के विद्यमान 20 तीर्थंकरों की प्रतिमाएँ बीस कमलों पर विराजमान हैं।

**9. सहस्रकूट मंदिर**-जिनेन्द्र भगवान की 1008 प्रतिमाओं सहित।

**10. भगवान ऋषभदेव मंदिर**-धातु निर्मित भगवान ऋषभदेव की मूलनायक प्रतिमा एवं अन्य जिन प्रतिमाओं सहित।

**11. भगवान ऋषभदेव कीर्तिस्तंभ**-'भगवान ऋषभदेव अन्तर्राष्ट्रीय निर्वाण महामहोत्सव वर्ष' में निर्मित, भगवान के जीवन चरित्र को प्रदर्शित करने वाला, 8 प्रतिमाओं से समन्वित 31 फुट ऊँचा कीर्तिस्तंभ।

**12. तेरहद्वीप मंदिर**-निर्माणाधीन।

**13. कैलाशपर्वत भवन**-प्रथम जैन तीर्थंकर भगवान ऋषभदेव की निर्वाणभूमि कैलाशपर्वत की आकर्षक प्रतिकृति इस भवन में विराजमान है। 4 फरवरी 2000 को लाल किला मैदान, दिल्ली में तत्कालीन प्रधानमंत्री श्री अटल बिहारी वाजपेयी द्वारा इस प्रतिकृति के समक्ष निर्वाणलाडू चढ़ाकर इसका उद्घाटन किया गया।

**14. जम्बूद्वीप पुस्तकालय**-प्राचीन हस्तलिखित एवं प्रकाशित लगभग 15000 ग्रंथों एवं पुस्तकों के संग्रह सहित।

**15. जम्बूद्वीप औषधालय**

**16. ज्ञानमती कला मंदिरम्**-हस्तिनापुर के पौराणिक इतिहास को प्रदर्शित करने वाली झांकियों सहित।

**17. वीर ज्ञानोदय ग्रंथमाला**-1972 में संस्थापित इस ग्रंथमाला द्वारा अब तक लाखों की संख्या में 200 से अधिक ग्रंथों एवं पुस्तकों के संस्करणों का प्रकाशन हो चुका है।

**18. सम्यग्ज्ञान मासिक पत्रिका**-यह पत्रिका सन् 1974 से लगातार प्रकाशित हो रही है, जिसमें जैन शास्त्रों के साररूप लेखों एवं अन्य महत्वपूर्ण कार्यक्रमों का संकलन एक स्थान पर प्राप्त होता है।

**19. जम्बूद्वीप भोजनालय**-आने वाले दर्शनार्थियों को प्रतिदिन निःशुल्क शुद्ध (जैनचर्या के अनुरूप) भोजन उपलब्ध कराता है।

**20. धर्मशालाएं**-200 से अधिक फ्लैट, बंगले इत्यादि, जिनमें ठहरने संबंधी सभी आधुनिक सुविधाएं उपलब्ध हैं।

**21. मनोरंजन के साधन**-तरह-तरह के झूले, बच्चों की रेल, नौका विहार, फौव्वारे, हरे-भरे लॉन, पूरे कैम्पस में घूमने के लिए ऐरावत हाथी (मोटर से संचालित), बिजली की आकर्षक व्यवस्था, सुन्दर प्राकृतिक दृश्य इत्यादि बरबस ही दर्शनार्थियों को इस भव्य रचना की तुलना 'स्वर्ग' से करने के लिए प्रेरित करते हैं।

## दिगम्बर जैन त्रिलोक शोध संस्थान द्वारा आयोजित सामाजिक एवं शैक्षणिक कार्यक्रम

**अक्टूबर 1981**-जम्बूद्वीप (हस्तिनापुर) स्थल पर **'जम्बूद्वीप ज्ञानज्योति सेमिनार'**।

**31 अक्टूबर 1982**-फिक्की ऑडिटोरियम-दिल्ली में **'जम्बूद्वीप सेमिनार'** जिसका उद्‌घाटन श्री राजीव गांधी, तत्कालीन संसद सदस्य द्वारा किया गया।

**अप्रैल 1985**-जम्बूद्वीप (हस्तिनापुर) स्थल पर **'जैन गणित और त्रिलोक विज्ञान'** विषय पर अंतर्राष्ट्रीय सेमिनार, जिसका उद्‌घाटन उ.प्र. के तत्कालीन मंत्री प्रोफेसर वासुदेव सिंह द्वारा किया गया।

**जून 1982 से अप्रैल 1985**-लालकिला मैदान, दिल्ली से तत्कालीन प्रधानमंत्री श्रीमती इंदिरागांधी द्वारा 4 जून, 1982 को पूरे देश में भ्रमण करने हेतु **'जम्बूद्वीप ज्ञानज्योति'** रथ का उद्‌घाटन किया गया। जनसाधारण में अहिंसा, चारित्र-निर्माण तथा विश्व बन्धुत्व के संदेश का प्रचार-प्रसार करते हुए 1045 दिन तक देश भर में भ्रमण करने के पश्चात् यह ज्ञान ज्योति तत्कालीन रक्षामंत्री श्री पी.वी. नरसिम्हा राव (भूतपूर्व प्रधानमंत्री) द्वारा जम्बूद्वीप के मुख्य द्वार के समक्ष सदैव के लिए स्थापित कर दी गई।

**1992-'अंतर्राज्यीय चारित्र निर्माण संगोष्ठी'** का जंबूद्वीप स्थल पर श्री नेमीचंद जैन, विधायक (मध्यप्रदेश) की अध्यक्षता में आयोजन किया गया।

**'जैन गणित'** एवं **'चारित्र निर्माण'** आदि विषयों पर हुई संगोष्ठियाँ **मेरठ विश्वविद्यालय एवं दिगम्बर जैन त्रिलोक शोध संस्थान के संयुक्त तत्वावधान में** आयोजित की गईं।

**1993**-अयोध्या में अवध विश्वविद्यालय-फैजाबाद के संयुक्त तत्वावधान में **'भारतीय संस्कृति के आद्य प्रणेता भगवान ऋषभदेव'** विषय पर संगोष्ठी।

**अक्टूबर 1995**-मेरठ विश्वविद्यालय के संयुक्त तत्वावधान में पंचदिवसीय **'गणिनी आर्यिका श्री ज्ञानमती साहित्य संगोष्ठी-95'**।

**मार्च-अप्रैल 1998**-तत्कालीन प्रधानमंत्री श्री अटल बिहारी वाजपेयी द्वारा 9 अप्रैल 1998 को तालकटोरा स्टेडियम, दिल्ली से देश भर में भ्रमण करने हेतु **'भगवान ऋषभदेव समवसरण श्रीविहार रथ'** का उद्‌घाटन। 3 वर्ष तक देशभर में तीर्थंकर भगवन्तों के सर्वोदयी सिद्धांतों एवं जैनधर्म की प्राचीनता का प्रचार-प्रसार करने के पश्चात् यह समवसरण इलाहाबाद उच्च न्यायालय के तत्कालीन मुख्य न्यायाधीश द्वारा तीर्थंकर ऋषभदेव दीक्षास्थली-प्रयाग तीर्थ (इलाहाबाद) में स्थापित कर दिया गया।

**अक्टूबर 1998**-जम्बूद्वीप स्थल पर **'राष्ट्रीय कुलपति सम्मेलन'**, जिसका उद्‌घाटन किया गया-स्वर्गीय श्री राजेश पायलट (तत्कालीन संसद सदस्य द्वारा)।

**फरवरी 2000**-तत्कालीन प्रधानमंत्री श्री अटल बिहारी वाजपेयी द्वारा 4 फरवरी 2000 को लाल किला मैदान, दिल्ली में एक वर्ष तक चलने वाले **'भगवान ऋषभदेव अंतर्राष्ट्रीय निर्वाण महामहोत्सव वर्ष'** का उद्‌घाटन किया गया।

इस युग में जैनधर्म के प्रथम तीर्थंकर भगवान ऋषभदेव पर 1008 संगोष्ठियों की श्रृंखला, भगवान ऋषभदेव कीर्तिस्तंभों का निर्माण तथा अन्य अनेक सामाजिक एवं शैक्षणिक कार्यक्रम राष्ट्रीय एवं अंतर्राष्ट्रीय

स्तर पर इस वर्ष के अंतर्गत आयोजित किये गये ।

टोरण्टो, कनाडा, न्यूजर्सी आदि विदेश की भूमियों पर भी इन्हीं प्रेरणाओं के माध्यम से 4 फरवरी 2000 को निर्वाण महामहोत्सव मनाया गया।

**जून 2000**-जम्बूद्वीप स्थल पर 11 जून 2000 को **'जैनधर्म की प्राचीनता'** विषय पर राष्ट्रीय सेमिनार आयोजित किया गया।

**फरवरी 2001**-भगवान ऋषभदेव की दीक्षाभूमि-प्रयाग (इलाहाबाद) में **'श्री ऋषभदेव दीक्षा तीर्थ'** का नवनिर्माण। इस तीर्थ पर भगवान के दीक्षा कल्याणक के प्रतीकस्वरूप धातु के वटवृक्ष के नीचे ध्यान में लीन महायोगी ऋषभदेव की सवा पांच फुट उत्तुंग पिच्छी-कमण्डलु सहित खड्गासन प्रतिमा, केवलज्ञान कल्याणक के प्रतीक स्वरूप भगवान की चतुर्मुखी प्रतिमा सहित दिव्य समवसरण रचना तथा निर्वाण कल्याणक के प्रतीक स्वरूप 51 फुट उत्तुंग 'कैलाशपर्वत' की भव्य रचना पर भगवान ऋषभदेव की 14 फुट उत्तुंग अत्यंत मनोहारी लालवर्णी पद्मासन प्रतिमा तथा तीन चौबीसी के प्रतीक स्वरूप 72 जिन प्रतिमाएँ विराजमान हैं। 'ऋषभदेव कीर्तिस्तंभ' भी स्थापित है। 4 से 8 फरवरी 2001 तक 'भगवान ऋषभदेव पंचकल्याणक प्रतिष्ठा' एवं 1008 महाकुंभों से कैलाशपर्वत पर प्रतिष्ठित भगवान ऋषभदेव का 'महाकुंभमस्तकाभिषेक' कार्यक्रम।

**सन् 2003-2004**-भगवान महावीर की जन्मभूमि कुण्डलपुर (नालंदा) में **'नंद्यावर्त महल तीर्थ'** का निर्माण। भगवान महावीर मंदिर, भगवान ऋषभदेव मंदिर, नवग्रहशांति जिनमंदिर, त्रिकाल चौबीसी मंदिर और नंद्यावर्त महल (भगवान महावीर का जन्म महल) एवं उसमें स्थापित भगवान शांतिनाथ जिनालय इस तीर्थ के मुख्य आकर्षण हैं। महावीर की जन्मभूमि के प्रचार-प्रसार हेतु **भगवान महावीर ज्योति रथ** सम्पूर्ण भारतवर्ष में प्रवर्तन कर चुका है।

**सन् 2005-2006-भगवान पार्श्वनाथ जन्मकल्याणक तृतीय सहस्राब्दि महोत्सव।** 6 जनवरी 2005 को जन्मभूमि वाराणसी से इसका भव्य उद्घाटन होकर पूरे एक वर्ष तक इसे विभिन्न आयोजनों के साथ मनाया गया।

इस संस्थान के द्वारा समय-समय पर विविध पंचकल्याणक प्रतिष्ठाएं एवं धार्मिक कार्यक्रम सम्पन्न होते रहते हैं। संस्थान के अद्भुत कार्यकलाप की श्रेणी में है-**णमोकार महामंत्र बैंक,** जहाँ प्रतिवर्ष श्रद्धालु भक्तों द्वारा लाखों की संख्या में णमोकार मंत्र लिखकर जमा कराए जाते हैं, जो कि विश्वशांति की किरणें प्रसारित करने में अतिशय धरोहर स्वरूप हैं।

## संस्थान द्वारा दिये जाने वाले पुरस्कार

**गणिनी ज्ञानमती पुरस्कार**-सन् 1995 से प्रत्येक पाँच वर्ष में यह पुरस्कार जैन धर्म पर उच्चस्तरीय शोध तथा संस्थान की शैक्षणिक गतिविधियों में सहयोग हेतु किसी भी जैन विद्वान या समर्पित कार्यकर्ता को 1,00,000/- रुपये की नगद राशि, प्रशस्ति-पत्र इत्यादि के साथ प्रदान किया जाता है। अप्रैल 2006 में ''गणिनीप्रमुख श्री ज्ञानमती माताजी आर्यिका दीक्षा स्वर्ण जयंती महोत्सव'' के अवसर पर संस्थान द्वारा प्रतिवर्ष इस पुरस्कार को देने का निर्णय लिया गया है।

**जम्बूद्वीप पुरस्कार**-सन् 2000 में स्थापित 25,000/- रुपये की नगद राशि सहित प्रतिवर्ष प्रदान किया जाने वाला पुरस्कार।

**आर्यिका रत्नमती पुरस्कार**-सन् 1999 में स्थापित 11,000/- रुपये की नगद राशि सहित प्रतिवर्ष प्रदान किया जाने वाला पुरस्कार।

**कुण्डलपुर पुरस्कार**-सन् 2004 में स्थापित 25,000/-रुपये की नगद राशि सहित प्रतिवर्ष प्रदान किया जाने वाला पुरस्कार।

**श्री छोटेलाल जैन पुरस्कार**-सन् 2003 में स्थापित 11,000/-रुपये की नगद राशि सहित प्रतिवर्ष प्रदान किया जाने वाला पुरस्कार।

**नंद्यावर्त पुरस्कार**-सन् 2004 से प्रारंभ 25000/-रुपये की नगद राशि सहित प्रतिवर्ष प्रदान किया जाने वाला पुरस्कार।

उपरोक्त पुरस्कारों के अतिरिक्त 'भगवान ऋषभदेव अंतर्राष्ट्रीय निर्वाण महोत्सव वर्ष' के अवसर पर घोषित 2,50,000/- रुपये की नगद राशि का **'भगवान ऋषभदेव नेशनल अवार्ड'** एवं 11,000/-रुपये की नगद राशि का **'ब्राह्मी पुरस्कार'** भी संस्थान द्वारा प्रदान किया गया। भगवान ऋषभदेव नेशनल अवार्ड सन् 2003 में 'कुण्डलपुर महोत्सव' के अवसर पर तत्कालीन सांसद एवं पूर्व वित्त राज्य मंत्री श्री वी.धनंजय कुमार जैन को भगवान महावीर जन्मभूमि कुण्डलपुर (नालंदा) में प्रदान किया गया।

## इलाहाबाद-उ.प्र. में
## श्री ऋषभदेव दीक्षा तीर्थ प्रयाग का निर्माण

सन् 2001 में संस्थान के अन्तर्गत इस तीर्थ का निर्माण इलाहाबाद-बनारस हाइवे पर किया गया है। जिसका संचालन संस्थान के अंतर्गत गठित उपसमिति के द्वारा किया जा रहा है।

## कुण्डलपुर तीर्थ का विकास

भगवान महावीर जन्मभूमि कुण्डलपुर (नालंदा-बिहार) का विकास करने हेतु संस्थान के अन्तर्गत भगवान महावीर जन्मभूमि कुण्डलपुर दिगम्बर जैन समिति नाम से एक उपसमिति बनाई गई, जिसके माध्यम से वहाँ 'नंद्यावर्त महल' तीर्थ परिसर का निर्माण किया गया।

उपरोक्त सभी निर्माण योजनाएं, सामाजिक, धार्मिक तथा शैक्षणिक कार्यक्रम **पूज्य गणिनीप्रमुख श्री ज्ञानमती माताजी** की पावन प्रेरणा से उनके ससंघ सानिध्य में इस संस्थान द्वारा आयोजित किये गये हैं। संघस्थ **प्रज्ञाश्रमणी आर्यिका श्री चंदनामती माताजी** का मार्गदर्शन एवं **पीठाधीश क्षुल्लकरत्न श्री मोतीसागर जी महाराज** का निर्देशन इन समस्त कार्यों में अत्यन्त महत्वपूर्ण रहा है।

इस प्रकार यह संस्थान अपनी विभिन्न समर्पित कार्य योजनाओं द्वारा समाज की सेवा में प्रतिक्षण संलग्न है।

मानसिक शांति, आध्यात्मिक विकास, प्राकृतिक सौन्दर्य एवं अन्य अनेक अवसरों को एक साथ प्राप्त करने हेतु यह संस्थान जंबूद्वीप दर्शन के लिए आपको सादर आमंत्रित करता है।

( १७ )

# दानतीर्थ हस्तिनापूर

**– क्षुल्लक मोतीसागर**

### भगवान आदिनाथाचा प्रथम आहार

हस्तिनापूर तीर्थ तीर्थांचा राजा आहे. धर्मप्रसाराचे आद्य केन्द्र आहे. येथूनच धर्मपरंपरांची सुरवात झाली आहे. ह्या केंद्रापासून सर्वांनी दान प्रेरणा प्राप्त केली.

भगवान आदिनाथाने जेव्हा दीक्षा धारण केली तेव्हा त्यांच्याबरोबर चार हजार राजांनी सुद्धा दीक्षा घेतली होती. भगवंतानी केशलोच केला. त्यांनी सुद्धा केशलोच केला. भगवानांनी वस्त्रांचा त्याग केला. त्या सर्व राजांनी सुद्धा नग्न दिगंबर अवस्था धारण केली. भगवान हात खाली सरळ करून ध्यान मुद्रेमध्ये उभे झाले. सर्व राजे सुद्धा त्यांच्याप्रमाणेच ध्यान करू लागले. तीन दिवसानंतर त्या सर्वांना भूक व तहान लागली. ते सर्व वारंवार भगवान आदीनाथाकडे पहात होते. परंतु भगवान तर मौनव्रत स्विकारून नासाग्र दृष्टीने अचल उभे होते. केवळ एक दोन दिवस नाही तर पूर्ण सहा महिने पर्यंत. त्या राजांनी बैचेन होऊन जंगलातील फळे खाणे सुरू केले व तहान भागविण्यासाठी ओढ्याचे पाणी पिण्यास सुरूवात केली.

याच वेळेस वनदेवतांनी प्रगट होऊन त्यांना अडविले. "मुनि वेशामध्ये अशाप्रकारे अनर्गल प्रवृत्ति करू नका. जर भूक, तहान सहन होत नसेल तर पूज्य अशा मुनिपदाला सोडून द्या. सर्वांनी मुनिपद सोडून अन्य वेष धारण केले. कोणी जटा वाढविल्या, कोणी वल्कल धारण केलीत, कोणी सर्व अंगाला भस्म लाविले तर कोणी झोपडी तयार करून त्यात राहू लागले.

भगवान ऋषभदेवाचे सहा महिन्यानंतर ध्यान संपूर्ण झाले. त्यांचे विना आहाराने सुद्धा काम चालू शकत होते. परंतु भविष्यामध्ये मुनि तयार होण्यासाठी, मोक्षमार्ग चालू राहील या उद्देशाने ते आहारास निघाले. परंतु त्यांना कोठेही विधिपूर्वक व प्रासुक आहार मिळाला नाही. याचे कारण असे होते की – यांच्यापूर्वी भोगभूमिची व्यवस्था होती. लोकांना जीवन निर्वाह करण्याची सामुग्री – भोजन, घर, वस्त्र, आभूषण इत्यादि सर्व कल्पवृक्षांपासून प्राप्त होत होते. जेव्हा भोगभूमीची व्यवस्था समाप्त झाली तेव्हा कर्मभूमिमध्ये कर्म करण्याची क्रिया भगवान ऋषभदेवाने व त्यांचे वडील नाभिरायाने सांगितली होती.

असि, मसि, कृषि, सेवा, शिल्प आणि वाणिज्य ह्या सहा क्रियांनी जगण्याचा मार्ग सांगितला. दिगंबर मुनिंना आहार कसा द्यावा याची विधि सांगितल्या गेली नाही. ज्या इंद्राने भगवान गर्भात येण्यापूर्वी सहा महिने अगोदरपासून रत्नवृष्टि प्रारंभ केली होती, त्यांच्या पाचही कल्याणकाच्या वेळेस स्वयं इंद्र उपस्थित होता. परंतु जेव्हा भगवान आहारास निघाले तेव्हा मात्र इंद्र सुद्धा आले नाही.

संपूर्ण प्रदेशामध्ये भ्रमण करून हस्तिनापूर येण्याच्या पूर्व रात्री तेथील राजा श्रेयांस याला सात स्वप्न दिसले. प्रथम स्वप्नांत सुदर्शन मेरु पर्वत दिसला. प्रातः काळी त्यांनी ज्योतिष्यास बोलावून स्वप्नाचे फळ विचारले. तेव्हा ज्योतिषाने सांगितले की ज्याचा मेरु पर्वतावर अभिषेक झाला आहे, जो सुमेरूप्रमाणे महान आहे अश्या तीर्थंकर भगवानाच्या दर्शनाचा लाभ होईल.

थोड्या काळाने भगवान ऋषभदेवाचे हस्तिनापूर नगरामध्ये मंगल आगमन झाले. भगवंताचे दर्शन करतांना राजा श्रेयांस यास जातिस्मरण झाले. त्यांना आठ भव पूर्वचे स्मरण झाले. जेव्हा ऋषभदेव भगवान

राजा वज्रजंघाच्या अवस्थेत होता, तेव्हा स्वयं राजा श्रेयांस वज्रजंघाची पत्नी राणी श्रीमतीच्या अवस्थेत होती. या दोघांनी चारण ऋद्धिधारी मुनींना नवधाभक्तिपूर्वक आहार दिला होता. राजा श्रेयांस यांना ज्ञान झाले की आदीनाथ भगवान आहारास निघाले आहेत –

हे ज्ञान होताच ते राजमहालाच्या दरवाजावर हातांत मंगलवस्तु घेऊन पड़गाहनासाठी उभे राहिले.

हे स्वामी ! नमोस्तु नमोस्तु नमोस्तु, अत्र तिष्ठ तिष्ठ ............ ही विधि मिळतांच भगवान राजा श्रेयांसच्या समोर उभे राहिले. राजा श्रेयांसने पुन्हा निवेदन केले की – मनशुद्धि, वचनशुद्धि, कायशुद्धि आहार, जल शुद्ध आहे. भोजनशालेमध्ये प्रवेश करावा. भोजनगृहात नेल्यानंतर पादप्रक्षाल करून पूजन केले. इक्षुरसाचा आहार दिला. आहार झाल्याबरोबर देवांनी पंचाश्चर्यची वृष्टि केली. चार प्रकारच्या दानामध्ये फक्त आहारदानाच्या वेळेस पंचाश्चर्य वृष्टि होते. राजा श्रेयांसच्या भोजनशाळेमध्ये त्यादिवशी भोजन अक्षय झाले. शहरांतील सर्व लोक प्रसाद म्हणून भोजन करून गेले. परंतु भोजन किंचित् सुद्धा कमी पडले नाही.

एका वर्षाच्या उपवासानंतर हस्तिनापूर येथे आदीनाथ स्वामीचा प्रथम आहार झाला तर सर्व पृथ्वीवर हस्तिनापूर प्रसिद्ध झाले व राजा श्रेयांसची प्रशंसा झाली. अयोध्येवरून भरत चक्रवर्तींनी येऊन राजा श्रेयांसचा सन्मान केला. त्यांना दानतीर्थ पदवीने अलंकृत केले. प्रथम आहाराच्या स्मृतिसाठी म्हणून एक विशाल स्तूप निर्माण केला.

दानाच्या महत्त्वानेच भगवान् आदीनाथ स्वामीबरोबर राजा श्रेयांसचे नाव जोडल्या गेले. प्रथम आहारदानाचा दिवस 'वैशाख शुद्ध तृतीया' होता. यालाच आखातीज किंवा अक्षय तृतीया म्हणतात.

अशाप्रकारे दानाची परंपरा हस्तिनापूर पासून प्रारंभ झाली. दानाच्या कारणानेच धर्माची परंपरा सुद्धा आजपर्यंत चालत आहे. दानानेच मंदीरांचे निर्माण, मूर्त्याचे निर्माण, शास्त्राचे प्रकाशन, मुनीसंघाचा विहार इत्यादि कार्य संभव आहेत. हे दान श्रावकच करतात. श्रवणबेळगोळ येथे एक हजार वर्षापासून उभी असलेली भगवान बाहुबलीची प्रतिमा चामुण्डरायाच्याच दानाचे फळ आहे. ही प्रतिमा असंख्य भव्य जीवांना न बोलता दिगम्बरत्वाचा व आत्मशांतीचा पावन संदेश देत आहे.

लाखों नर नारी यांच्या दानाच्या उदार भावनेनेच भारतवर्षानेच जम्बूद्वीपाची रचना दहा वर्षांत तयार झाली. आमच्या जीवनकाळामध्ये अशी भव्य रचना तयार झाली आणि त्याच्या दर्शनाचा लाभ सर्वांना प्राप्त होत आहे.

भगवान आदिनाथाची प्रथम आहारतिथी पर्वाच्या रूपाने साजरी केली जाते. हा दिवस इतका महान आहे की कोणतेही शुभकार्य ज्योतिष्याला विचारल्याशिवाय करता येते. जितके विवाह अक्षयतृतीयेच्या दिवशी होतात तितके अन्य कोणत्याच दिवशी होत नाही. भगवानाचा प्रथम आहार इक्षुरसाने झाला तेव्हापासून या क्षेत्रात ऊस अक्षय झाला. जिकडेतिकडे ऊसच ऊस दिसतो. गुळ-साखर तयार होताना दिसते. प्रत्येक यात्रेकरूस भगवानाच्या आहाराच्या प्रसाद रूपाने बाराही महिने इक्षुरस पिण्यास मिळतो.

## भगवान् शांतिनाथ, कुंथुनाथ, अरहनाथ यांचे चार-चार कल्याणक

भगवान् आदिनाथानंतर अनेक महापुरुषांचे ह्या पुण्य धरावर आगमन झाले. भगवान शांतिनाथ, कुंथुनाथ आणि अरहनाथ यांचे चार-चार कल्याणक येथे झाले. तीघंही तीर्थंकर चक्रवर्ती व कामदेव पदाचे धारी होते. तीनही तीर्थंकरांनी हस्तिनापूरवरून सहा खण्ड पृथ्वीवर राज्य केले. परंतु त्यांना शांती प्राप्त झाली नाही. शहाण्णव हजार राणी सुद्धा त्यांना सुख प्रदान करू शकल्या नाहीत. शेवटी त्यांनी आरंभ परिग्रहाचा त्याग करून नग्न दिगंबर अवस्था धारण केली – मुनि बनले. बारा भावनामध्ये सांगितले आहे –

**कोटी अठाहर घोडे छोडे, चौरासी लाख हाथी,**
**इत्यादिक संपत्ती बहुतेरी जीर्ण तृण सम त्यागी ।**

भगवान शांतीनाथ, कुंथुनाथ, अरहनाथ यांनी महान तपश्चर्या करून येथे दिव्य केवलज्ञानाची प्राप्ती केली. यांच्या ज्ञान ज्योतीनेच अनेक भव्य जीवांना मोक्षमार्ग दाखविला व शेवटी त्यांनी सम्मेदशिखरवरून निर्वाण प्राप्त केले. आज हजारो लोक ह्या तीर्थंकराच्या चरण रजाने पवित्र झालेल्या ह्या पुण्यभूमिचे वंदन करण्यासाठी येतात.

## कौरव पांडवाची राजधानी

महाभारताची विश्वविख्यात घटना भगवान नेमीनाथाच्या वेळेस येथेच घडली. जेथे कौरव-पांडवांनी राज्य केले ते हेच हस्तिनापूर आहे. शंभर कौरव सुद्धा पाच पांडवांना हरवू शकले नाही याचे कारण काय होते ? कौरव अनीतिवान होते, अन्यायी होते, अत्याचारी, ईर्षालू, द्वेषी होते. पांडव मुळचेच धीर-वीर-गंभीर होते. सत्य आचरण करणारे होते. न्याय-नीतीवान होते. सहिष्णु होते. म्हणून पांडवांना विजय प्राप्त झाला. पांडवसुद्धा सती सीतेप्रमाणे अग्निपरिक्षेमध्ये सफल झाले. कौरवांद्वारा बनविलेल्या जळत्या लाक्षागृहांतून णमोकार महामंत्राचा जप करतां करता एका सुरूंगाच्या रस्त्याने बाहेर निघाले. जेव्हा शत्रुं जय ठिकाणी नग्न दिगम्बर मुनि अवस्थामध्ये ध्यानामध्ये लीन होते तेव्हा त्यांना दुर्योधनाचे भाचे कुर्युधरने लोखंडाचे आभूषण गरम करून घातले होते. त्यांच्या शरिराबरोबरच आतील कर्मसुद्धा जळू लागले होते. संपूर्ण कर्म जळून भस्म झाले. व अन्तकृत केवली बनून तीन पांडवांनी निर्वाण प्राप्त केले. नकुल, सहदेव उपशमश्रेणी चढून अकराव्या गुणस्थानामध्ये मरणांस प्राप्त करून सर्वार्थसिद्धि गेले. जर विजय मिळवावायाचा असेल तर पांडवांचा मार्ग अनुसरण केला पाहिजे. सदैव न्याय-नीतिने चालले तरच यशाची प्राप्ती होईल. धर्माचा सदा विजय होतो.

## रक्षाबंधनपर्व

एका समयी हस्तिनापूरला अकंपनाचार्य आणि सातशे मुनींचा संघ आला होता. त्यावेळेस हस्तिनापूरला महापद्म चक्रवर्तीचे पुत्र राजा पद्म राज्य करीत होते. बलीमंत्रीने वरदानाच्या रूपाने त्यांना सात दिवसाचे राज्य मागितले. राज्य घेऊन बलीने आपल्या पूर्व अपमानाचा बदला घेण्यासाठी जेथे सातशे मुनी विराजमान होते तेथे यज्ञाच्या निमित्त्याने अग्नि प्रज्वलित केला. उपसर्ग समजून सर्व मुनिराज शांत परिणामाने ध्यानामध्ये लीन झाले.

दुसरे उज्जैन येथे विराजमान विष्णुकुमार मुनींना क्षुल्लक पुष्पदंत यांच्याद्वारा समाचार मिळाला की हस्तिनापूर येथे मुनींवर घोर उपसर्ग होत आहे त्याला तुम्हीच दूर करू शकता. हा समाचार ऐकून परम करुणामूर्ति विष्णुकुमार मुनींच्या मनामध्ये साधर्मी मुनीविषयी तीव्र वात्सल्य भावना जागृत झाली. तपस्याने त्यांना विक्रिया ऋद्धि प्राप्त झाली. ते उज्जैनवरून चार्तुमास काळामध्ये हस्तिनापूरला आले. ते ्आपल्या पूर्व अवस्थेचे भाऊ राजा पद्म यांना रागवतात. राजा त्यांना सांगतात की तुम्हीच हा उपसर्ग दूर करू शकतात तेव्हा मुनि विष्णुकुमार वामनाचा वेष धारण करून बलीस तीन पाय ठेवण्यासाठी जागा मागतात. बलीने त्यांना देतो म्हणून सांगितल्यावर मुनिराज विक्रिया ऋद्धिने विशाल शरीर बनवितात. दोन पावलातच संपूर्ण विश्व व्यापून घेतले. तीसरे पाऊल ठेवण्याची जागा शिल्लक नव्हती. रक्षा करा, क्षमा करा असा ध्वनि गुंजू लागला. बलीने सुद्धा क्षमा मागितली, मुनिराज तर क्षमेचे भंडार होते. त्यांनी बलीस क्षमाप्रदान केली. उपसर्ग दूर झाल्यावर विष्णुकुमार मुनिंनी पुन्हा दिगंबर अवस्था धारण केली.

दुसऱ्या दिवशी श्रावकांनी भक्तीभावाने मुनींना शेवयांच्या खिरीचा आहार दिला. आपसांत एक-दुसऱ्यांना

रक्षासूत्र बांधले. असा निश्चय केला की विष्णुकुमार मुनीप्रमाणेच वात्सल्य भावना पूर्वक धर्म व धर्मबांधवांची रक्षा करू. तेव्हापासून हा दिवस प्रतिवर्ष रक्षाबंधनाच्या रूपाने श्रावण शुद्ध पौर्णिमेस साजरा केल्या जातो. यादिवशी बहिणी आपल्या भावास राखी बांधतात.

रक्षाबंधनाच्या दिवशी हस्तिनापूरचे स्मरण करा. देव-गुरू शास्त्र यांच्या प्रति तन-मन-धनाने त्याग करा. साधर्मी बांधवाविषयी वात्सल्यभावना ठेवा. तेव्हाच हा रक्षाबंधन पर्व साजरा करणे सार्थक होईल.

## दर्शन प्रतिज्ञामध्ये प्रसिद्ध मनोवती

गजमोती चढवून भगवानाचे दर्शन करून भोजन करण्याचा अटल नियम घेणारी इतिहास प्रसिद्ध महिला मनोवती सुद्धा हस्तिनापूरचीच होती. हा नियम तिने विवाहपूर्व घेतला होता. विवाहानंतर जेव्हा सासरी गेली तर संकोचाने तिने सांगितले नाही. तीन दिवस उपवास केले. जेव्हा तिचा भाऊ आला. त्याला तिने नियमाची गोष्ट सांगितली. त्याने तिच्या सासऱ्यास तिचा नियम सांगितला. सासऱ्याने सांगितले गजमोतीने कोठार भरले आहे. मनोवतीने गजमोती चढवून, भगवानाचे दर्शन केले व नंतर उपवास सोडले.

मनोवतीचा भाऊ तिला आपल्या घरी घेऊन गेला. इकडे तिच्या सासरी गजमोती चढविल्याने राजकीय आपत्ति आली. मनोवती व तिचे बुधसेन यांना सहा भाऊ मिळून घरातून काढून दिले. मनोवतीने भोजन केले नव्हते व तशीच झोपली असतांना तिला स्वप्न पडले की 'तुझ्या जवळच मंदीर आहे. शिला हटवून दर्शन कर.' तिने उठून शिला हलविली - भगवानाचे दर्शन झाले. तेथेच चढविण्यासाठी गजमोती मिळाले. पुढे पुण्ययोगाने बुधसेन राजाचे जावई झाले.

इकडे त्याचे सहाही भाऊ अत्यंत दरिद्री झाले. गाव सोडून भटकत-भटकत अशा जागी पोहचले की जेथे बुधसेन जिनमंदीराचे निर्माण करीत होता. तेथे बुधसेन व मनोवतीने त्यांना ओळखिले. सर्वांनी बुधसेन व मनोवतीची क्षमा मागितली. धर्माचा विजय झाला. सर्वांनी मिळून-मिसळून राहिले पाहिजे. कोणत्या पुण्ययोगाने घरामध्ये सुख, शांती व समृद्धि येईल.

## सुलोचना जयकुमार -

महाराजा सोमचे पुत्र जयकुमार भरत चक्रवर्तीचे प्रधान सेनापती झाले. त्यांची धर्मपरायण शीलशिरोमणी धर्मपत्नी सुलोचनाच्या भक्तीने गंगा नदीमध्ये आलेला उपसर्ग दूर झाला.

## रोहिणी व्रत

रोहिणीव्रताच्या कथेचे घटनास्थल हस्तिनापूर तीर्थ आहे.

## जम्बूद्वीपाची रचना

अनेक घटनांच्या श्रृंखलेत एक मजबूत कडीच्या रूपाने जम्बूद्वीपाची रचना आहे. ह्या रचनेने विस्मृत हस्तिनापूर जनमानसच्या स्मृति पटलावर अंकित झाले. केवळ भारतातच नाही तर संपूर्ण विश्वामध्ये जम्बूद्वीप रचनाच्या दर्शनाची चर्चा होते. जैन तीर्थामध्येच नाही तर वर्तमान जगामध्ये प्रथम जम्बूद्वीपाची रचना विशाल अश्या मोकळ्या मैदानावर झाली आहे. जम्बूद्वीपाची रचना ज्ञानमतीचे ज्ञान व प्रेरणाचे प्रतिफल आहे.

सन १९६५ मध्ये श्रवणबेळगोळ येथे भगवान बाहुबलीच्या चरणाजवळ ध्यान करतांना पूज्य श्री ज्ञानमती माताजीस ज्या दिव्य रचनेचे दर्शन झाले होते त्यानंतर वीस वर्षानंतर ती रचना हस्तिनापूर येथे साकार झाली. वर्तमानकाळांत जम्बूद्वीप रचनेचे दर्शन करण्यासाठी लाखो जैन-जैनेत्तर लोक येतात.

सर्व दर्शनार्थि एका स्वराने जम्बूद्वीप रचनेची स्तूती करतात. त्यांना जम्बूद्वीप रचनाची प्रेरीका पू. गणिनी आर्यीकारत्न श्री ज्ञानमती माताजींचा आर्शिवाद व दर्शनाचा लाभ होतो.

पूज्य माताजीने साहित्य निर्माण क्षेत्रात अद्भूत कीर्तिमान स्थापित केला. अडीच हजार वर्षात दिगंबर जैन समाजात ज्ञानमती माताजी प्रथम महिला आहे ज्यांनी अनेक ग्रंथांची रचना केली. आतापर्यंतचे सर्व ग्रंथ आचार्यांनी लिहिले - मुनींनी लिहिले - पंडीतांनी लिहिले परंतु श्राविका किंवा आर्यिका द्वारा लिहिलेला एकही ग्रंथ नव्हता.

पू. ज्ञानमती माताजींनी त्याग व संयम धारण करून एक-दोन नाहीतर २५० लहान मोठे ग्रंथ लिहिले. न्याय, व्याकरण, सिद्धांत, अध्यात्म इत्यादी विविध विषयांच्या ग्रंथाची टीका केली. भक्तिपूर्वक पूजाविधानांचे निर्माण केले. इंद्रध्वज विधान, कलपद्रुम विधान, सर्वतोभद्र विधान, जम्बूद्वीप विधान अशा अनेक अनुपम कृती लिहिल्या. प्राचीन धार्मिक कथा, कादंबरीच्या शैलीने लिहिल्यात. आतापर्यंत माताजींच्या दो शे पन्नास कृतींचे प्रकाशन अनेक भाषांमध्ये झाले आहे.

पूज्य माताजींची लेखणी अविरत गतीने चालू असते. ग्रंथाचे प्रकाशन कार्यसुद्धा सत सुरू आहे.

महान दानतीर्थ हस्तिनापूर क्षेत्राचे दर्शन महान पुण्य फल देणारे आहे. हे तीर्थक्षेत्र अनेक युगापर्यंत पृथ्वीवर धर्माची वर्षा करो - हीच मंगल भावना आहे.

(२२)

# टीकाकर्त्री पूज्य गणिनीप्रमुख आर्यिकारत्न ज्ञानमती माताजींचा परिचय

**- आर्यिका चंदनामती**

उत्तरप्रदेशातील बाराबंकी जिल्ह्यामध्ये (अवध प्रांत) टिकैतनगर गावात सन १९३४ मध्ये शरद-पौर्णिमेच्या रात्री पृथ्वीवर एक चंद्र उगवला. श्रेष्ठी धनकुमारजी यांचे सुपुत्र श्री. छोटेलालजी व श्रीमती मोहीनीदेवी यांचे प्रथम मातृत्व धन्य झाले. कन्येच्या रूपाने कोणी देवीच अवतरली होती. कन्येचे नाव ठेवले 'मैना'.

साधारणपणे कन्यारत्न घरात थोड्याकाळपर्यंत नाखुशीचे वातावरण उत्पन्न करते. परंतु विश्वामध्ये अनादिकाळापासून पुरुषांच्या बरोबरीने स्त्रीयांनी सुद्धा महान कार्य केले आहे. सतीच्या सतीत्वाच्या बळावरच धर्माची परंपरा टिकून आहे.

संस्काराचे जीवनात महत्त्वाचे स्थान आहे. ११ वर्षाच्या मैनावर - अकलंक - निकलंक नाटकाच्या एका दृश्याने अमिट छाप पडली. विवाहाची चर्चा जेव्हा चालू असते तेव्हा अकलंक आपल्या माता-पित्यास म्हणतो की, – "चिखलात पाय देऊन धुण्यापेक्षा न देणेच श्रेयस्कर आहे." अशाप्रकारे मैनेने सुद्धा आजीवन ब्रह्मचर्य व्रत घेण्याचा संकल्प केला.

सन १९५२ च्या शरद पौर्णिमेच्या दिवशी बाराबंकी येथे मैनेने आचार्य श्री देशभूषणजी महाराज यांच्याकडून सातवी प्रतिमा ब्रह्मचर्यव्रत धारण केले. मैनेस अनेकांनी अडविण्याचा प्रयत्न केला, समजाविण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यांना सफलता प्राप्त झाली नाही. वि. सं. २००९ चैत्र कृ. १ या दिवशी आचार्य श्री देशभूषणजी महाराज यांच्याकडून महावीरजी अतिशय क्षेत्रावर क्षुल्लिका दीक्षा प्राप्त केली. गुरुने त्यांचे नाव 'वीरमती' ठेवले.

क्षुल्लिका वीरमतीने क्षुल्लिका विशालमती माताजींच्या बरोबर कुंथलगिरी येथे आली असताना चारित्र्य चक्रवर्ती आचार्य श्री शांतीसागर महाराजांची सल्लेखना साक्षात् पाहिली. आचार्यश्रीने आपले प्रथम शिष्य मुनि श्री वीरसागरजी यांना आचार्य पट्ट प्रदान केला होता. श्री. शांतीसागर महाराजांच्या आज्ञेनुसार "वीरमती" ने आचार्य श्री. वीरसागरजी महाराजांच्या संघात प्रवेश करून वि. सं. २०१३ वैशाख कृष्ण द्वितीया माधोराजपूरा (राज.) येथे आर्यीका दीक्षा ग्रहण केली. आचार्य श्री. वीरसागर महाराजांनी दीक्षेनंतर त्यांचे नाव श्री ज्ञानमती माताजी ठेवले.

आर्यिका ज्ञानमती माताजींनी आपल्या लहान अवस्थेतच गुरुंच्या आर्शिवादाने महान ज्ञानार्जन केले. आचार्य श्री त्यांना 'ज्ञानमती' ह्या नावावर लक्ष ठेवण्यास सांगावयचे. २ वर्षानंतर वीरसागर महाराज सुद्धा समाधिस्थ झाले. त्यांच्या समाधिनंतर ६ वर्षापर्यंत आचार्य शिवसागर महाराज यांच्या संघात राहून ध्यानाध्ययन केले. आचार्यांच्या आज्ञेने आपल्या आर्यिका संघासहित सम्मेदशिखर, कलकत्ता व संपूर्ण दक्षिण भारत यात्रा हेतु विहार केला.

दीपक ज्याप्रमाणे स्वतःला जळतो परंतु दुसऱ्यास प्रकाश देतो. चंदनाचा वृक्ष सापांनी घेरलेला राहतो परंतु स्वतः सुगंध देतो. अशाप्रकारे पू. ज्ञानमती माताजीने सदैव परोपकारामध्येच आपल्या जीवनाची सार्थकता मानली.

पू. ज्ञानमती माताजीने कुमारी कन्या, सौभाग्यवती महिला आणि अनेक विधवांना संसाररूपी समुद्रामधून बाहेर काढून मोक्षमार्गामध्ये लावले. अनेक नवयुवक व प्रौढ पुरुषांना शिक्षा देवून त्यागाचा मार्ग सांगितला. शांतीसागरजी महाराजांचे चतुर्थ पट्टाधिश आचार्य श्री अजीतसागर यांचे जीते-जागते उदाहरण आहे. बाल ब्र. श्री. राजमल ह्यांना सन १९५८ ते ५९ मध्ये राजवार्तिक, गोम्मटसार कर्मकांड, पंचाध्यायी इत्यादि ग्रंथाचे अध्ययन करविले. व दीक्षाची प्रेरणा दिली व शेवटी ते 'अजितसागर' मुनि झाले.

त्यागाची विशेषता व मातृहृदयाची उदारता, आर्यिका ज्ञानमती माताजीने त्याच क्षणापासून त्यांना 'नमोस्तु' म्हणणे प्रारंभ केले. कारण जैनधर्मामध्ये जिनलिंग-मुनिवेष सर्वाधिक पूज्य मानला आहे.

परमपूज्य आचार्यकल्प श्री श्रुतसागरजी महाराज नेहमी म्हणायचे की - पारसमणी तर लोखंडास सोनं करते परंतु ज्ञानमती माताजी लोखंडास सोनं नाही तर पारस बनविते. पू. ज्ञानमती माताजी आपल्या शिष्यांची उन्नती पाहून, ऐकून अत्याधिक प्रसन्न होते. उदा. उदयपूर येथे अजितसागर महाराजाना आचार्य पट्ट प्रदान केला तेव्हा ज्ञानमती माताजी हस्तिनापूरला अतिशय प्रसन्न होऊन त्यांच्या दीर्घ जीवनाची व उज्वल परंपरेच्या अखंडतेसाठी मंगल कामना करू लागल्या होत्या.

अशाप्रकारे ज्ञानमती माताजींच्या शिष्यांपैकी आर्यिका श्री जिनमती माताजी, आदिमती माताजी यांनी आपल्या प्रेरणेनेच धर्माध्ययन करून प्रमेयकमलमार्तण्ड आणि गोम्मटसार कर्मकांड अशा ग्रंथाचा हिंदी अनुवाद करून आदर्श उपस्थित केला. काही आर्यिका व शिष्या आपल्या-आपल्या योग्यतेनुसार यत्र-तत्र धर्मप्रचारामध्ये संलग्न आहेत.

## साहित्यिक क्षेत्र

दृढ संकल्पी आत्म्याचे प्रत्येक कार्य अवश्य सफल होते. ज्याप्रमाणे ज्ञानमती माताजीने शिष्य निर्माण करण्यामध्ये सफलता प्राप्त केली त्याचप्रमाणे साहित्य निर्माण क्षेत्रामध्ये सुद्धा एक नवीन कीर्तीमान स्थापित केला.

वर्तमान शताब्दी मध्य जैन समाजाच्या कोणत्याही स्त्रीने साहित्य लिखाणाचे कार्य केले नव्हते. परंतु ज्ञानमती माताजीने जेव्हापासून आपली लेखणी प्रारंभ केली. तेव्हापासून आजपर्यंत त्यांनी जवळ जवळ २५० ग्रंथाची रचना केली व शेकडो संस्कृत स्तुती तयार केल्यात. अष्टसहस्त्री सारख्या क्लिष्टतम ग्रंथाचा हिंदीमध्ये अनुवाद केला. अध्यात्मग्रंथ नियमसारावर स्याद्वादचंद्रिका नावाची संस्कृत टीका लिहिली. बालोपयोगी बालविकासाचे चार भाग व कादंबरीच्या शैलीमध्ये अनेक पुस्तके लिहिली. यापैकी जवळ जवळ २०० ग्रंथाचे लाखोंच्या संख्येने प्रकाशन झाले आहे.

निवृत्ति मार्गामध्ये राहतांना भक्तिमार्ग सुद्धा सोडला नाही. साऱ्या हिंदुस्थानामध्ये इंद्रध्वज आणि कल्पद्रूम विधानांची संख्या वाढली आहे. तसेच सर्वतोभद्र महाविधान, तीनलोक विधान, त्रैलोक्यविधान, तीस चौवीसी व पंचमेरु इत्यादि माताजींच्या लेखणीद्वारे लिहिले गेलेत. यांचे सुद्धा हस्तिनापूरवरून प्रकाशन झाले आहे. भक्तीमध्ये श्रद्धा न ठेवणाऱ्या कितीतरी व्यक्ती ह्या विधानांना ऐकून भक्त बनल्या आहेत. आणि भक्तिरसाचा आस्वाद घेणारा प्रत्येक प्राणी काही क्षणासाठी परमात्म्यामध्ये निमग्न होऊन जातो. धर्माचे गूढ रहस्य ह्या विधानातील जयमालांमध्ये भरलेले आहे. आत्मरसिक श्रावकासाठी कोणत्याही एका विधानाचे पुस्तक पर्याप्त आहे. ज्याच्या द्वारे चार अनुयोगांचे ज्ञान प्राप्त होते.

अशाप्रकारे ज्ञानमती माताजींनी आपल्या जीवनामध्ये ग्रंथ रचनांचे नवीन कार्य केले. त्यांच्या मार्गाचे अनुसरण करून आज अनेक आर्यीका ग्रंथ निर्माणासाठी प्रयत्नशील आहेत. हा नारीजातीचा गौरव आहे.

जो बतलाते नारी जीवन लगता मधु रस की लाली है ।
वह त्याग तपस्या क्या जाने कोमल फूलोंकी डाली है ।
जो कहते योगोंमे नारी नरके समान कब होती है ।
ऐसे लोगों को ज्ञानमती का जीवन एक चुनौती है ।

## जम्बूद्वीप निर्माण एवं ज्ञानज्योति प्रवर्तन

सन १९६५ मध्ये आर्यीका श्री. ज्ञानमती माताजींनी ५ आर्यिकासहित चातुर्मास कर्नाटक प्रांताच्या श्रवणबेळगोळ येथे केला. भगवान बाहुबलीच्या अमरकृतिसाठी तेथील इतिहास प्रसिद्ध आहे. त्या वीतराग छवीला आपल्या हृदयांत उतरविण्यासाठी १५ दिवसांपर्यंत विंध्यगिरी पर्वतावर मौनपूर्वक ध्यान करण्याचा संकल्प केला. ह्या ध्यानाच्या कडीमध्ये एक दिवस संपूर्ण अकृत्रिम चैत्यालयांची वंदना झाली. ध्यानाच्या यात्रेत जम्बूद्वीपास प्रधानता मिळाली. ध्यानाची क्रिया संपल्यानंतर जैनागमाचे अवलोकन केले. मनात असा प्रश्न आला की असे अतिशय स्थान कोठे आहे का ? शोध घेता घेता करणानुयोगाच्या तिलोयपण्णति व त्रिलोकसारामध्ये जम्बूद्वीपाचे वर्णन सापडले. माताजी अतिशय प्रसन्न झाल्या व त्यांचे ध्यान सार्थक साकाररूपाने उपस्थित आहे.

जम्बूद्वीप निर्माणास बाहुबलीचे देण, ध्यानाची एकाग्रता आणि पूर्व भवाचे संस्कारच मानावे लागतील कारण याच्या पूर्वी माताजींच्या मनात कधीच आले नाही. पू. माताजींच्या मुखाने या रचनांचे विवरण ऐकून सर्वप्रथम श्रवणबेळगोळ येथील पीठाधीश भट्टारक श्री. चारुकीर्ति यांनी प्रसन्नता व्यक्त केली. पुन्हा काही ठिकाणी ह्या निर्माणाची चर्चा झाली. परंतु होनहारवस्तुस कोणी टाळू शकत नाही. माताजींनी उत्तरप्रांतातील पावन तीर्थक्षेत्र हस्तिनापूर जम्बूद्वीप रचनेसाठी निवडले.

सन १९७५ मध्ये जैन त्रिलोक शोध संस्थानाने हस्तिनापूर येथे एक जमीन खरेदी करून निर्माण कार्य प्रारंभ केले. मध्यभागी १०१ फूट उंच असा सुमेरु पर्वत सन १९७९ मध्ये तयार झाला. त्याच्या १६ जिनमंदिरांची पंचकल्याणक प्रतिष्ठा २९ एप्रिल पासून ३ मे १९७९ पर्यंत संपन्न झाली. अजैन बंधुसुद्धा ह्या पर्वतावर मनोरंजन करण्याच्या भावनेने चढतात परंतु भगवानाच्या समोर स्वाभाविकरित्या त्यांचे त्यांचे मस्तक झुकते व हात जोडल्या जातात.

सुमेरु पर्वताच्या व ज्ञानमती माताजींच्या प्रभावाने ६ वर्षाच्या अल्प अवधिमध्ये पूर्ण जम्बूद्वीप तयार झाला.

४ जून १९८२ मध्ये पू. माताजींच्या प्रेरणेने प्रधानमंत्री श्रीमती इंदिरा गांधींनी दिल्लीच्या लाल किल्ल्यापासून जम्बूद्वीप ज्ञानज्योतिचे प्रवर्तन केले. ह्या ज्ञानज्योतीद्वारे १०४५ दिवसापर्यंत संपूर्ण भारतामध्ये जम्बूद्वीप व भगवान महावीरांच्या सिद्धांताचा खूप प्रचार, प्रसार झाला. शेवटी २८ एप्रिल १९८५ मध्ये हस्तिनापूरला समापन समारोहाबरोबर रक्षामंत्री श्री. पी. व्ही. नरसिंहराव व सांसद जे. के. जैन यांनी त्या अखंड ज्योतीची स्थापना केली. आणि ती ज्ञानज्योती हस्तिनापूरला येणाऱ्या प्रत्येकास अहर्निश ज्ञानाचा संदेश देते. २८ एप्रिलपासून २ मे १९८५ पर्यंत जम्बूद्वीपाचा पंचकल्याणक प्रतिष्ठा समारोह झाला.

आता तर हस्तिनापूर नगरी साक्षात् शांतीनाथ भगवानाचा काळ दाखवित आहे. मध्यकाळामध्ये याचे महत्त्व फक्त पुराणातच राहिले होते. वर्तमानयुगात याची उन्नती पाहून कवी द्यानतराय यांच्या ओळी सहज आठवतात –

गुरु की महिमा वरणी न जाय, गुरु नाम जपो मनवचनकाय ॥

पू. ज्ञानमती माताजींचे चरण पडल्याबरोबर येथील माती चंदन झाली आणि वीणेचे मूक तार पुनः झंकारीत होऊन इतिहासाची गाथा गाऊ लागले -

अरे ! ही तर तीच भूमि आहे जेथे राजा श्रेयांसने स्वप्नामध्ये सुमेरु पर्वत पाहिला होता. आणि तीर्थंकर वृषभदेवाने प्रथम आहार इक्षुरसाचा येथेच घेतला होता. कदाचित म्हणूनच उंच अशा सुमेरु पर्वताचे निर्माण या पवित्र स्थळी झाले. हा एकच नाही तर अनेक इतिहास हस्तिनापूर नगरीशी जुळले आहेत. उदा. रक्षाबंधन पर्व, महाभारताची कथा, मनोवतीचा दर्शन प्रतिज्ञाचा इतिहास, द्रौपदीच्या शीलाचे महत्त्व, राजा अशोक व रोहीणीचा संबंध, अभिनंदन आणि पाचशे मुनींचा उपसर्ग, गजकुमार मुनिंचा उपसर्ग तसेच भगवान शांतिनाथ, कुंथुनाथ, अरहनाथ यांच्या चार-चार कल्याणकाचे सौभाग्य याच नगरीला प्राप्त झाले. व या सर्वांचा पुनरुद्धार केला परम तपस्विनी आर्यिकारत्न ज्ञानमती माताजींनी.

आपली निंदा व प्रशंसा यांच्यापासून दूर, आत्महित व जनहित ह्या भावनेने ओतप्रोत, रत्नत्रय साधिका यांच्या जवळ येऊन कितीतरी लोक येऊन आपले कष्ट सांगून शांती प्राप्त करतात. त्यांचा उपदेश ऐकतात. व आपले जीवन सफल करण्याचा प्रयत्न करतात.

### पू. माताजींचा अयोध्या प्रवास -

भगवान ऋषभदेवाचा अयोध्येमध्ये जन्म आणि हस्तिनापूरला प्रथम आहार. अयोध्या आणि हस्तिनापूर यांच्यामध्ये झालेल्या ऐतिहासिक संबंधास जनमानसाच्या हृदयपटलावर अंकित करण्यासाठी भगवान ऋषभदेवाचा मस्ताभिषेक आणि आदि शाश्वत तीर्थ अयोध्याच्या विकासासाठी पू. माताजींनी ११ फेब्रूवारी १९९३ ला हस्तिनापूरवरून विहार करून अयोध्या येथे चातुर्मास केला आणि थोड्याच काळात तेथे समवशरण मंदिर, तीन चौवीसी मंदीर यांचे निर्माण व पंचकल्याणक महोत्सव झालेत. तत्कालीन मुख्यमंत्री मुलायमसिंह यादव यांनी अनेक जनकल्याणाची घोषणा केली. राजकीय उद्यानाचे नांव ऋषभदेव उद्यान करून त्यामध्ये २१ फूट उत्तुंग ऋषभदेवाची मूर्ति स्थापित करण्याची स्वीकृती दिली. प्राचीन मंदिरांचा विकास झाला. प्रतिष्ठा समिती आणि डॉ. राम मनोहर लोहिया विश्वविद्यालयाच्या संयुक्त तत्वावधानामध्ये संगोष्ठीचे आयोजन - सर्वधर्म संमेलन झाले. यांत सर्व प्रसिद्ध हस्तींनी भाग घेतला. माताजींच्या ज्ञानाची प्रशंसा सर्वांनी केली. तत्कालीन कुलपतींनी माताजींना एका समारोहात डी.लीट् च्या मानद उपाधिने अलंकृत केले व स्वतः त्यांचा आर्शिवाद प्राप्त केला.

### दक्षिण भारताची पर्वतीय यात्रा

मांगीतुंगी सिद्धक्षेत्र येथील ट्रस्टी काही वर्षापासून माताजींना ६-६ फूट खड्गासन चौवीसी प्रतिमा, खड्गासन सहस्त्रकूट प्रतिमांची पंचकल्याण प्रतिष्ठा करण्यासाठी आमंत्रण देत होते. २५ नोव्हेंबर १९९५ ला अकस्मात माताजींनी सांगितले की २७ नोव्हेंबरला मांगीतुंगीकडे विहार करावयाचा आहे. त्यांच्या शिष्यांनी माताजीस त्यांचे स्वास्थ्य इतक्या दूर जाण्यासारखे नाही असे सांगितले. तेव्हा त्या म्हणाल्या की – जर माझ्याकडून कोण्या तीर्थाचा उद्धार होत आहे. तर मग ह्या नश्वर शरीराचा विचार कशाला करू. जे होईल ते पाहू – त्यांच्या दृढ प्रतिज्ञेनुसार २७ नोव्हेंबर १९९५ ला पूर्णसंघाचा हस्तिनापूरवरून मांगीतुंगीकडे मंगल विहार झाला. पूर्ण पाच महिन्यामध्ये १६२० कि. मी. पदयात्रा करून २७ एप्रिल १९९६ ला मांगीतुंगी येथे प्रवेश केला.

या यात्रेच्या मध्ये उत्तरप्रदेश, दिल्ली, हरियाणा, राजस्थान, मध्यप्रदेश, महाराष्टं ह्या सहा प्रदेशामध्ये जवळजवळ २० स्थानांवर अनेक नवीन निर्माण करण्यासाठी प्रेरणा दिली. शिलान्यास करविले. यांच्यासाठी जैन समाजाची करोडो रुपयाची धनराशी धर्मकार्यात खर्च होत आहे. लवकरच ते निर्माण कार्य पूर्ण होईल. त्यांची काही नावे – दिल्ली प्रीतविहारमध्ये कमल मंदिर, तिजारा येथे सम्मेदशिखजीची रचना, केशवरायपाटन येथे पंचपहाडी, चमत्कारजी येथे कैलाशपर्वत. कोटा येथे तीनलोक रचना, इंदौर येथे ॐ गिरि, सनावद येथे णमोकार धाम इत्यादि.

पुन्हा मांगीतुंगी येथे दिनांक १९ मे पासून २३ मे १९९६ पर्यंत विशाल पंचकल्याणक आणि २१ फूट उत्तुंग

भगवान मुनिसुव्रतांचा महामस्तकाभिषेक समारोह सफलतापूर्वक पार पडला. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री. मनोहर जोशी अनेक मंत्र्यांबरोबर आले होते. ह्या सिद्धक्षेत्राच्या प्रगतीसाठी सरकारी सहयोग प्रदान करण्याची घोषणा त्यांनी केली होती.

या समारोहानंतर पूज्य माताजींच्या पावन प्रेरणेने सहस्त्रकूटाच्या १००८ प्रतिमा विराजमान करण्यासाठी १०८ पाकळ्या असलेल्या जिनालयाचे निर्माण झाले. याची वेदी प्रतिष्ठा होऊन दिनांक २४ ऑक्टोबर १९९६, आश्विन शु. त्रयोदशीला संपूर्ण भगवान विराजमान केल्या गेलेत. महाराष्ट्र प्रांतामध्ये हे मंदीर एक निराळेच झाले आहे.

### णमोकार महामंत्र बँक -

आपल्या प्रेरणेने जम्बूद्वीप स्थलावर हस्तिनापूर येथे ८ ऑक्टोबर १९९५ ला एक णमोकार महामंत्र बँकेची स्थापना झाली. हजारोंच्या संख्यांनी अपराजित महामंत्र णमोकार लिहून येथे जमा करतात. करोडो महामंत्र त्या बँकेमध्ये जमा होऊन चारी दिशांना आपला प्रभाव पसरवित आहेत. मंत्र लिहणाऱ्या महानुभावांना बँकेच्या योजनेनुसार हीरक, स्वर्ण आणि रजतपदक प्रतिवर्ष शरदपौर्णिमेच्या दिवशी दिल्या जाते. ह्या बँकेमुळे लेखक, भक्तगणांना पुण्य, यश आणि पुरस्कार तिन्हींचा लाभ होतो.

### सिद्धान्त ग्रंथ षट्खंडागमची टीका

पूज्य माताजींनी आपल्या दीक्षित जीवनामध्ये २०० ग्रंथांचे लेखन, अनुवाद, टीका केल्या आहेत. वर्तमानकाळी माताजी जैन सिद्धांताचा सर्वप्रथम व सर्वोच्च ग्रंथ षट्खंडागमची 'सिद्धान्त चिंतामणी' संस्कृत टीकेचे लेखन आपल्या लेखणीद्वारे करीत आहेत. ८ ऑक्टोबर १९९५ शरदपौर्णिमेच्या दिवशी ह्या कार्यास प्रारंभ झाला आहे. पांच खंडामध्ये चौदह पुस्तकांचे लेखन पूर्ण झाले. ह्या टीकेच्या हिंदी अनुवादाचे कार्यसुद्धा सुरू आहे.

### श्री ऋषभदेव जयंती महामहोत्सवाचे विश्वस्तरीय आयोजन

पू. माताजींनी जैनधर्माचे प्रथम तीर्थंकर भगवान ऋषभदेवांचा जयंती महामहोत्सव अंर्तराष्ट्रीय स्तरावर करण्याचे ठरविले आहे. १९९७ मध्ये राजधानी दिल्लीपासून याची सुरवात झाली आहे. या माध्यमातून देशातील सर्व विद्यालय, महाविद्यालय आणि विश्वविद्यालयामध्ये शिकविल्या जाणाऱ्या पुस्तकांमध्ये जैनधर्म प्राकृतिक व अनादिनिधन आहे असे सांगितल्या जाईल. भगवान महावीर यांचे संस्थापक नाही व ऋषभदेव सुद्धा याचे संस्थापक नाही. फक्त २४ तीर्थंकरांनी या धर्माचा प्रचार-प्रसार केला. असेच आपल्या करकमलाद्वारा प्रभावनापूर्ण कार्य होत राहो हीच मंगलकामना आहे.

अशाप्रकारे पू. गणिनी आर्यिकारत्न श्री. ज्ञानमती माताजींचा संक्षिप्त जीवन वृत्तांत प्रस्तुत केला आहे. आशा आहे की वाचकगण त्यांच्या जीवनवृत्तापासून लाभ घेतील. हस्तिनापूरला येऊन साक्षात् पूज्य माताजींचे व त्यांच्याद्वारा निर्मित अमरकृतीचे दर्शन करतील.

**श्री वीर के समवसृति में चंदना थी । गणिनी बनी जिनचरण जगवंदना थीं ।**
**गणिनी वही पदविभूषित को नमूं मैं । श्री मात ज्ञानमती को नित ही नमूं मैं ।**

# राष्ट्रगौरव परम पूज्य गणिनीप्रमुख श्री ज्ञानमती माताजी का परिचय

**-प्रज्ञाश्रमणी आर्यिका श्री चंदनामती माताजी**

**कुन्दकुन्दान्वयो जीयात्, जीयात् श्री शांतिसागरः।**
**जीयात् पट्टाधिपस्तस्य, सूरिः श्री वीरसागरः।।**
**श्री ब्राह्मी गणिनी जीयात्, जीयादन्तिमचन्दना।**
**जीयात् ज्ञानमती माता, गणिन्यां प्रमुखा कलौ।।**

जैनशासन के वर्तमान व्योम पर छिटके नक्षत्रों में दैदीप्यमान सूर्य की भाँति अपनी प्रकाश-रश्मियों को प्रकीर्णित कर रहीं पूज्य गणिनीप्रमुख श्री ज्ञानमती माताजी के व्यक्तित्व एवं कृतित्व पर उठी लेखनी की अपूर्णता यद्यपि अवश्यंभावी है, तथापि आत्मकल्याण की भावना से पूज्य माताजी के श्रीचरणों में उनके दीर्घकालीन त्यागमयी जीवन के प्रति विनम्र विनयांजलि रूप मेरा यह विनीत प्रयास है।

### 1. जन्म, वैराग्य और दीक्षा–

22 अक्टूबर सन् 1934, शरदपूर्णिमा के दिन टिकैतनगर ग्राम (जि. बाराबंकी, उ.प्र.) के श्रेष्ठी श्री छोटेलाल जैन की धर्मपत्नी श्रीमती मोहिनी देवी के दांपत्य जीवन के प्रथम पुष्प के रूप में ''मैना'' का जन्म परिवार में नवीन खुशियाँ लेकर आया था। माँ को दहेज में प्राप्त 'पद्मनंदिपंचविंशतिका' ग्रन्थ के नियमित स्वाध्याय एवं पूर्वजन्म से प्राप्त दृढ़ वैराग्य संस्कारों के बल पर मात्र 18 वर्ष की अल्प आयु में ही शरद पूर्णिमा के दिन मैना ने आचार्यरत्न श्री देशभूषण जी महाराज से सन् 1952 में आजन्म ब्रह्मचर्यव्रतरूप सप्तम प्रतिमा एवं गृह त्याग के नियमों को धारण कर लिया।

जैनेश्वरी दीक्षा की कामना को अपनी हर साँस में संजोये ब्र. मैना सन् 1953 में आचार्य श्री देशभूषण जी से ही चैत्र कृष्णा एकम् को श्री महावीरजी अतिशय क्षेत्र में 'क्षुल्लिका वीरमती' के रूप में दीक्षित हो गईं। सन् 1955 में चारित्र चक्रवर्ती आचार्य श्री शांतिसागर जी महाराज की समाधि के समय कुंथलगिरी पर एक माह तक प्राप्त उनके सान्निध्य एवं आज्ञा द्वारा 'क्षुल्लिका वीरमती' ने आचार्य श्री के प्रथम पट्टाचार्य शिष्य-वीरसागर जी महाराज से सन् 1956 में 'वैशाख कृष्णा दूज' को माधोराजपुरा (जयपुर-राज.) में आर्यिका दीक्षा धारण करके **''आर्यिका ज्ञानमती''** नाम प्राप्त किया।

### 2. अध्ययन और अध्यापन–

ज्ञानप्राप्ति की पिपासा माता ज्ञानमती जी के रोम-रोम में प्रारंभ से ही कूट-कूट कर भरी थी। दीक्षा लेते ही स्वाध्याय-मनन-चिंतन की धारा में ही उन्होंने स्वयं को निबद्ध कर लिया। ज्ञान प्राप्ति का सर्वश्रेष्ठ स्रोत बना-संघस्थ मुनियों, आर्यिकाओं एवं संघस्थ शिष्य-शिष्याओं को जैनागम का तलस्पर्शी अध्यापन। 'कातंत्र रूपमाला' रूपी बीज से पूज्य माताजी की ज्ञानसाधना रूप वृक्ष प्रस्फुटित

हुआ, जिस पर जो पत्ते, फूल-फल इत्यादि लगे, उन्होंने समस्त संसार को सुवासित कर दिया। गोम्मटसार, परीक्षामुख, न्यायदीपिका, प्रमेयकमलमार्तण्ड, अष्टसहस्री, तत्त्वार्थराजवार्तिक, सर्वार्थसिद्धि, अनगारधर्मामृत, मूलाचार, त्रिलोकसार आदि अनेक ग्रंथों को अपनी शिष्याओं और संघस्थ साधुओं को पढ़ा-पढ़ाकर आपने अल्प समय में ही विस्तृत ज्ञानार्जन कर लिया। हिन्दी, संस्कृत, प्राकृत, कन्नड़, मराठी इत्यादि भाषाओं पर आपका पूर्ण अधिकार हो गया।

**3. लेखनी का प्रारंभीकरण संस्कृत भाषा से–**

भगवान महावीर के पश्चात् 2500 वर्ष के जिस इतिहास में जैन साध्वियों के द्वारा शास्त्र लेखन की कोई मिसाल दृष्टिगोचर नहीं होती थी, वह इतिहास जागृत हो उठा जब क्षुल्लिका वीरमती जी ने सन् 1954 में सहस्रनाम के 1008 मंत्रों से अपनी लेखनी का प्रारंभ किया। यही मंत्र सरस्वती माता का वरदहस्त बनकर पूज्य माताजी की लेखनी को ऊँचाइयों की सीमा तक ले गये। सन् 1969-70 में न्याय के सर्वोच्च ग्रंथ 'अष्टसहस्री' के हिन्दी अनुवाद ने उनकी अद्वितीय विद्वत्ता को संसार के सामने उजागर कर दिया। कितने ही ग्रंथों की संस्कृत टीका, कितनी ही टीकाओं के हिंदी अनुवाद, संस्कृत एवं हिन्दी में अनेक मौलिक ग्रंथों की रचना मिलकर आज 200 की संख्या को पार कर चुके हैं। पूज्य माताजी द्वारा लिखित समयसार, नियमसार इत्यादि की हिन्दी-संस्कृत टीकाएँ, जैनभारती, ज्ञानामृत, कातंत्र व्याकरण, त्रिलोक भास्कर, प्रवचन निर्देशिका इत्यादि स्वाध्याय ग्रंथ, प्रतिज्ञा, संस्कार, भक्ति, आदिब्रह्मा, आटे का मुर्गा, जीवनदान इत्यादि जैन उपन्यास, द्रव्यसंग्रह-रत्नकरण्डश्रावकाचार इत्यादि के हिन्दी पद्यानुवाद व अर्थ, बाल विकास, बालभारती, नारी आलोक आदि का अध्ययन किसी को भी वर्तमान में उपलब्ध जैन वाङ्मय की विविध विधाओं का विस्तृत ज्ञान कराने में सक्षम है।

अध्यात्म, व्याकरण, न्याय, सिद्धांत, बाल साहित्य, उपन्यास चारों अनुयोगों रूप विविध विधाओं के अतिरिक्त पूज्य माताजी की लेखनी से विपुल भक्ति साहित्य उद्भूत हुआ है। इन्द्रध्वज, कल्पद्रुम, सर्वतोभद्र, तीन लोक, सिद्धचक्र, विश्वशांति महावीर विधान इत्यादि भक्ति विधानों ने देश के कोने-कोने में जिनेन्द्र भक्ति की जो धारा प्रवाहित की है, वह अतुलनीय है। पूज्य माताजी का चिंतन एवं लेखन पूर्णतया जैन आगम से संबद्ध है, यह उनकी महान विशेषता है।

धन्य हैं ऐसी महान प्रतिभावान् सरस्वती माता!

**4. सिद्धांत चक्रेश्वरी–**

वर्तमान में पू. माताजी जैनशासन के सर्वप्रथम सिद्धांत ग्रंथ 'षट्खण्डागम' के सूत्रों की संस्कृत टीका 'सिद्धांत चिंतामणि' के लेखन में संलग्न हैं। 13 पुस्तकों की टीका लिख चुकी हैं, जिसमें से प्रथम एवं द्वितीय पुस्तक हिन्दी टीका सहित प्रकाशित भी हो चुकी हैं। अगली पुस्तकों की टीका का लेखन जारी है। आज से लगभग 1000 वर्ष पूर्व आचार्य श्री नेमिचंद्र सिद्धांतचक्रवर्ती ने जिस प्रकार छह खण्ड रूप द्वादशांग रूप जिनवाणी को परिपूर्ण आत्मसात करके सार रूप में द्रव्य संग्रह,

गोम्मटसार, लब्धिसार इत्यादि ग्रंथ अपनी लेखनी से प्रसवित किये थे, उसी प्रकार इस बीसवीं सदी की माता ज्ञानमती जी ने समस्त उपलब्ध जैनागम का गहन अध्ययन-मनन-चिंतन करके इस सिद्धांतचिंतामणि रूप संस्कृत टीका लेखन के महत्तम कार्य से 'सिद्धांत चक्रेश्वरी' के पद को साकार कर दिया है। 1000 वर्ष पूर्व आचार्य श्री वीरसेन स्वामी द्वारा लिखित 'धवलाटीका' के पश्चात् इस महान ग्रंथ की सरल टीका लेखन का कार्य प्रथम बार हो रहा है।

**5. शिक्षण-प्रशिक्षण शिविर—**

जैन सिद्धांतों का मर्म विद्वत् वर्ग समझ सके, इस भावना से कितने ही शिक्षण-प्रशिक्षण शिविरों का आयोजन पूज्य माताजी की प्रेरणास्वरूप किया गया। सन् 1969 में जयपुर चातुर्मास के मध्य 'जैन ज्योतिर्लोक' पर प्रशिक्षण शिविर आयोजित किया गया, जिसमें पूज्य माताजी द्वारा 'जैन भूगोल एवं खगोल' का विशेष ज्ञान विद्वत्वर्ग को कराया गया। अक्टूबर सन् 1978 में हस्तिनापुर में पं. मक्खनलाल जी शास्त्री, पं. मोतीचंद जी कोठारी, डा. लाल बहादुर शास्त्री सहित जैन समाज के उच्चकोटि के लगभग 100 विद्वानों का विद्वत् प्रशिक्षण शिविर आयोजित किया गया, जिसमें पूज्य माताजी ने विद्वत्समुदाय को यथेष्ट मार्गदर्शन प्रदान किया। समय-समय पर आज तक यह श्रृंखला चल रही है।

**6. राष्ट्रीय-अंतर्राष्ट्रीय सेमिनार—**

सन् 1985 में 'जैन गणित एवं त्रिलोक विज्ञान' पर अंतर्राष्ट्रीय सेमिनार जम्बूद्वीप-हस्तिनापुर में सम्पन्न हुआ पुनः अनेक संगोष्ठियां सम्पन्न होती रहीं और सन् 1998 में 'भगवान ऋषभदेव राष्ट्रीय कुलपति सम्मेलन' के भव्य आयोजन द्वारा देशभर के विश्वविद्यालयों से पधारे कुलपतियों को भगवान ऋषभदेव को भारतीय संस्कृति एवं जैनधर्म के वर्तमानयुगीन प्रणेता पुरुष के रूप में जानने का अवसर प्राप्त हुआ। 11 जून 2000 को 'जैनधर्म की प्राचीनता' विषय पर आयोजित इतिहासकारों के सम्मेलन द्वारा पाठ्य पुस्तकों में जैनधर्म संबंधी भ्रांतियों के सुधार के लिए विशेष दिशा-निर्देश 'राष्ट्रीय शैक्षणिक अनुसंधान एवं प्रशिक्षण परिषद' (□□□□□□) तक पहुंचाये गये। इनके अतिरिक्त अनेक अन्य सेमिनार भी समय-समय पर सम्पन्न हुए हैं, जिनके प्रतिफल में देश के समक्ष समय-समय पर साहित्यिक कृतियाँ प्रस्तुत हो चुकी हैं।

**7. दिगम्बर समाज की साध्वी को प्रथम बार डी.लिट्. की उपाधि प्रदान कर विश्वविद्यालय भी गौरवान्वित हुआ—**

किसी महाविद्यालय, विश्वविद्यालय आदि में पारम्परिक डिग्रियों को प्राप्त किये बिना मात्र स्वयं के धार्मिक अध्ययन के बल पर विदुषी माताजी ने अध्ययन, अध्यापन, साहित्य निर्माण की जिन ऊँचाइयों को स्पर्श किया, उस अगाध विद्वत्ता के सम्मान हेतु अवध विश्वविद्यालय, फैजाबाद द्वारा 5 फरवरी 1995 को डी.लिट्. की मानद् उपाधि से पूज्य माताजी को सम्मानित करके स्वयं को गौरवान्वित अनुभव किया गया तथा दिगम्बर साधु-साध्वी परम्परा में पूज्य माताजी यह उपाधि प्राप्त करने वाली प्रथम व्यक्तित्व बन गईं।

इसी प्रकार से समय-समय पर विभिन्न आचार्यों एवं सामाजिक संस्थाओं द्वारा पूज्य माताजी को न्याय प्रभाकर, आर्यिकारत्न, आर्यिकाशिरोमणि, गणिनीप्रमुख, वात्सल्यमूर्ति, तीर्थोद्धारिका, युगप्रवर्तिका, चारित्रचन्द्रिका, राष्ट्रगौरव, वाग्देवी इत्यादि अनेक उपाधियों से अलंकृत किया गया है, किन्तु पूज्य माताजी

इन सभी उपाधियों से निस्पृह होकर अपनी आत्म साधना को प्रमुखता देते हुए निर्दोष आर्यिका चर्या में निमग्न रहने का ही अपना मुख्य लक्ष्य रखती हैं।

**8. इतिहास भी परिवर्तन के लिए बाध्य हुआ–**

सन् 1992 से पूज्य माताजी की दृष्टि आधुनिक शिक्षाजगत में पढ़ायी जाने वाली पाठ्य पुस्तकों में जैनधर्म संबंधी भ्रान्त विषय वस्तु पर गयी तो 'भगवान महावीर जैनधर्म के संस्थापक हैं' इत्यादि भ्रांतियों को वहाँ देखकर उनका हृदय अत्यंत उद्वेलित हो उठा। फलस्वरूप प्रधानमंत्री, मानव संसाधन विकास मंत्री, निदेशक-□□□□□ इत्यादि से उनकी प्रत्यक्ष वार्ता द्वारा शिक्षाजगत तक यह संदेश पहुँचा और दस वर्षों के अथक प्रयास द्वारा पाठ्य पुस्तकों में संशोधन का क्रम प्रारंभ हो सका।

**9. तीर्थ विकास की भावना–**

तीर्थंकर भगवन्तों की कल्याणक भूमियों एवं विशेष रूप से जन्मभूमियों के विकास की ओर पूज्य माताजी की विशेष आंतरिक रुचि सदा से रही है। पूज्य माताजी का कहना है कि हमारी संस्कृति का परिचय प्रदान करने वाली ये कल्याणक भूमियाँ हमारी महान संस्कृति की धरोहर हैं अतः इनका संरक्षण-संवर्धन-विकास अत्यंत आवश्यक है।

सर्वप्रथम भगवान शांतिनाथ, कुन्थुनाथ, अरहनाथ की जन्मभूमि 'हस्तिनापुर' में पूज्य माताजी की प्रेरणा से निर्मित जैन भूगोल की अद्वितीय रचना 'जम्बूद्वीप' आज विश्व के मानस पटल पर अंकित हो गयी है, उ.प्र. सरकार के पर्यटन विभाग ने जम्बूद्वीप से हस्तिनापुर की पहचान बताते हुए उसे एक अतुलनीय 'मानव निर्मित स्वर्ग' (□ □□□ □□□□ □□□□□□ □□ □□□□□□□□□□ □□□□□□□□□□□ □□□ □□□□□□□ □□□□□□□) की संज्ञा प्रदान की है। सन् 1993 से 1995 तक शाश्वत जन्मभूमि 'अयोध्या' में 'समवसरण मंदिर' और 'त्रिकाल चौबीसी मंदिर' का निर्माण करवाकर उसका विश्वव्यापी प्रचार, अकलूज (महाराष्ट्र) में नवदेवता मंदिर निर्माण की प्रेरणा, सनावद (म.प्र.) में णमोकार धाम, प्रीत विहार-दिल्ली में कमलमंदिर, मांगीतुंगी (महाराष्ट्र) में सहस्रकूट कमल मंदिर, अहिच्छत्र में ग्यारह शिखर वाला तीस चौबीसी मंदिर और भगवान ऋषभदेव की दीक्षा एवं केवलज्ञान कल्याणक भूमि-प्रयाग में 'श्री ऋषभदेव दीक्षा तीर्थ' का भव्य निर्माण पूज्य माताजी की ही प्रेरणा के सुफल हैं।

कितने ही अन्य स्थानों पर भी अनेकानेक निर्माण पूज्य माताजी के निर्देशन द्वारा सम्पन्न हुए और हो रहे हैं। भगवान महावीर स्वामी की जन्मभूमि कुण्डलपुर (नालंदा-बिहार) के विकास हेतु भगवान महावीर स्वामी कीर्तिस्तंभ, भगवान महावीर की विशाल खड्गासन प्रतिमा सहित विश्वशांति महावीर मंदिर, नवग्रह शांति जिनमंदिर, त्रिकाल चौबीसी मंदिर एवं नंद्यावर्त महल आदि अनेक निर्माण आपकी प्रेरणा से इस क्षेत्र पर हुए हैं तथा कुण्डलपुर तीर्थ विश्वभर के लिए आकर्षण का केन्द्र बन गया है।

भगवान मुनिसुव्रतनाथ की जन्मभूमि 'राजगृही' में 'मुनिसुव्रतनाथजिनमंदिर' एवं विपुलाचल पर्वत की तलहटी में मानस्तंभ रचना, भगवान महावीर की निर्वाणस्थली पावापुरी में जलमंदिर के समक्ष पाण्डुकशिला परिसर में भगवान की खड्गासन प्रतिमा सहित 'भगवान महावीर जिनमंदिर', गौतम गणधर स्वामी की

निर्वाणस्थली गुणावां जी में गौतम स्वामी की खड्गासन प्रतिमा सहित जिनमंदिर, श्री सम्मेदशिखर जी में भगवान ऋषभदेव मंदिर इत्यादि समस्त निर्माण भी पूज्य माताजी की संप्रेरणा से ही सम्पन्न हुए हैं।

वर्तमान में तीर्थंकर जन्मभूमि विकास की शृँखला में भगवान पुष्पदंतनाथ की जन्मभूमि काकंदी में 'पुष्पदंतनाथ जिनमदिंर' के निर्माण हेतु शिलान्यास सम्पन्न किया जा चुका है तथा शीघ्र ही निर्माणकार्य पूर्ण करके इस विस्मृत जन्मभूमि का परिचय भी विश्व को प्रदान किया जा सकेगा।

**10. विश्व में अनोखी 108 फुट मूर्ति निर्माण की प्रेरणा–**

विश्व के अप्रतिम आश्चर्य के रूप में 108 फुट उत्तुंग भगवान ऋषभदेव की खड्गासन प्रतिमा के निर्माण का कार्य मांगीतुंगी (महा.) के पर्वत पर पूज्य माताजी की प्रेरणा से प्रारंभ हो चुका है। युगों-युगों तक जिनशासन की महिमा को विकसित करने वाली यह प्रतिमा जैन संस्कृति के विशाल व्यक्तित्व का परिचय भी जनमानस को प्रदान करेगी।

**11. शिरडी (महाराष्ट्र) में ज्ञानतीर्थ–**

शिरडी (महाराष्ट्र) को जैन संस्कृति केन्द्र के रूप में स्थापित करने हेतु महाराष्ट्र के कार्यकर्ताओं द्वारा वहाँ पर 'ज्ञानतीर्थ' के निर्माण की योजना मूर्त रूप ले रही है, जिसमें पूज्य माताजी के निर्देशानुसार भगवान पार्श्वनाथ की विशाल प्रतिमा विराजमान करके विशेष निर्माण सम्पन्न किया जायेगा।

**12. धर्मप्रभावना के विविध आयाम–**

जम्बूद्वीप रचना के निर्माण का प्रमुख लक्ष्य लेकर 'दिगम्बर जैन त्रिलोक शोध संस्थान' नामक संस्था का राजधानी दिल्ली में पूज्य माताजी की प्रेरणा से सन् 1972 में गठन किया गया। इसी संस्थान ने विविध धर्मप्रभावना के कार्यों का निष्पादन किया है। संस्थान स्थित 'वीर ज्ञानोदय ग्रन्थमाला' द्वारा लाखों की संख्या में ग्रंथ प्रकाशन, चारों अनुयोगों के ज्ञान से समन्वित 'सम्यग्ज्ञान' मासिक पत्रिका का प्रकाशन, णमोकार महामंत्र बैंक इत्यादि कितनी ही कार्ययोजनाएँ जिनशासन की कीर्ति को निरंतर प्रसारित कर रही हैं।

पूज्य माताजी की प्रेरणा से सन् 1982 में तत्कालीन प्रधानमंत्री श्रीमती इंदिरा गांधी द्वारा राजधानी दिल्ली में उद्घाटित 'जम्बूद्वीप ज्ञान ज्योति' ने तीन वर्ष तक सम्पूर्ण भारतवर्ष में जैनधर्म के सिद्धांतों का प्रचार-प्रसार किया और अंत में यह ज्योति अखण्ड रूप से तत्कालीन केन्द्रीय रक्षामंत्री-श्री पी.वी. नरसिंहाराव द्वारा जम्बूद्वीप स्थल पर स्थापित कर दी गयी। इसी प्रकार अप्रैल सन् 1998 में तत्कालीन प्रधानमंत्री श्री अटल बिहारी वाजपेयी ने 'भगवान ऋषभदेव समवसरण श्रीविहार' का राजधानी दिल्ली से प्रवर्तन किया, जो समस्त प्रांतों में प्रवर्तन के पश्चात् दीक्षास्थली-प्रयाग तीर्थ पर निर्मित 'केवलज्ञान कल्याणक मंदिर' में स्थापित होकर युगों-युगों तक भगवान ऋषभदेव के वास्तविक समवसरण की याद दिलाता रहेगा। भगवान महावीर जन्मभूमि-कुण्डलपुर (नालंदा) से सन् 2003 में 'भगवान महावीर ज्योति' का विविध प्रांतों में सफल प्रवर्तन भी इसी शृँखला की विशिष्ट कड़ी है।

जैनधर्म की प्राचीनता तथा भगवान ऋषभदेव के नाम एवं सिद्धांतों को जन-जन तक पहुँचाने के लिए पूज्य माताजी ने राजधानी दिल्ली में विशाल 'चौबीस कल्पद्रुम महामण्डल विधान' आयोजित कराया, साथ ही 'भगवान ऋषभदेव जन्मजयंती वर्ष' तथा 'भगवान ऋषभदेव अंतर्राष्ट्रीय निर्वाण महामहोत्सव वर्ष' (तत्कालीन प्रधानमंत्री श्री अटल जी द्वारा उद्घाटित) भी उनकी प्रेरणा द्वारा विविध धर्मप्रभावना के कार्यक्रमों सहित सम्पन्न हुए। आस्था टी.वी. चैनल द्वारा पूज्य माताजी के 'तीर्थंकर जीवन दर्शन (सचित्र)' एवं अन्य विषयों पर प्रभावक प्रवचन लम्बे समय तक प्रसारित किये गये एवं किये जा रहे हैं। पूज्य माताजी की प्रेरणा से स्थापित 'अखिल भारतवर्षीय दिगम्बर जैन महिला संगठन' अपनी सैकड़ों ईकाइयों द्वारा दिगम्बर जैन समाज की नारी शक्ति को सृजनात्मक कार्यों हेतु संगठित किये हुए है।

इसके अतिरिक्त कितने ही अन्य धर्मप्रभावना के कार्य इन 50 वर्षों में पूज्य माताजी ने सम्पन्न किये हैं जिनका यहाँ लेखन तो संभव नहीं है, किन्तु आज पूरा समाज उनके कार्यकलापों से परिचित होकर उन्हें कर्मठता की मूर्ति के रूप में पहचानता है।

**13. संघर्ष विजेत्री—**

पूज्य माताजी ने प्रारंभ से अपना प्रमुख लक्ष्य बनाया- प्रत्येक कार्य आगमानुकूल ही करना। पुनः उन कार्यों के निष्पादन में जो भी विघ्न आते हैं, उन्हें बहुत ही शांतिपूर्वक झेलकर पूरी तन्मयता के साथ उस कार्य को परिपूर्ण करना उनकी विशेषता रही है। उनका पूरा जीवन आर्ष परम्परा का संरक्षण करते हुए अपने मूलगुणों में बाधा न आने देकर जिनधर्म की अधिकाधिक प्रभावना के साथ व्यतीत हुआ है। किसी भी संस्था, तीर्थ, चंदे आदि की दानराशि को अपनी संघ व्यवस्था में समाहित न करने का उनका नियम है। 50 वर्षों से इस नियम का पालन करते हुए अपने कर्तव्य पथ पर वे अडिग हैं। यही कारण है कि उन्हें लम्बी-लम्बी यात्राएं कराने में अपना कर्तव्यपालन करने वाले संघपति श्रावक भी अपना सौभाग्य समझते हैं।

**14. भगवान पार्श्वनाथ जन्मकल्याणक तृतीय सहस्राब्दि महोत्सव का आयोजन—**

23वें तीर्थंकर भगवान पार्श्वनाथ की जन्मभूमि वाराणसी में 6 जनवरी 2005 को पूज्य माताजी की प्रेरणा एवं ससंघ सानिध्य में 'भगवान पार्श्वनाथ जन्मकल्याणक तृतीय सहस्राब्दि महोत्सव' का उद्घाटन किया गया। भगवान की केवलज्ञान कल्याणक भूमि 'अहिच्छत्र', निर्वाणभूमि 'श्री सम्मेदशिखर जी' इत्यादि अनेकानेक तीर्थों पर विविध आयोजनों के साथ यह वर्ष मनाया गया। पुनः वर्ष 2006 को ''सम्मेदशिखर वर्ष'' के रूप में मनाने की प्रेरणा पूज्य माताजी ने प्रदान की है, ताकि तन-मन-धन से दिगम्बर जैन समाज अपने महान तीर्थराज 'श्री सम्मेदशिखर जी' के प्रति समर्पित हो सके।

भगवान नेमिनाथ की निर्वाणभूमि 'श्री गिरनार जी सिद्धक्षेत्र' की सुरक्षा हेतु भी पूज्य माताजी ने जनजागरण का शंखनाद किया है।

**15. शताब्दी का अभूतपूर्व अवसर : दीक्षा स्वर्ण जयंती –**

वैशाख कृष्णा दूज, वी.नि.सं. 2532 अर्थात् 15 अप्रैल 2006 को अपनी आर्यिका दीक्षा के 50 वर्ष पूर्ण करने वाली पूज्य माताजी वर्तमान दिगम्बर जैन साधु परम्परा में सर्वाधिक प्राचीन दीक्षित होने के गौरव से युक्त होकर हम सभी के लिए अतिशयकारी प्राचीन प्रतिमा के सदृश बन गई हैं। 14 से 16 अप्रैल 2006 तक **'गणिनीप्रमुख श्री ज्ञानमती माताजी आर्यिका दीक्षा स्वर्ण जयंती महोत्सव'** का आयोजन करके समस्त समाज ने पूज्य माताजी के श्रीचरणों में अपनी विनम्र विनयांजलि अर्पित की है।

इस महोत्सव के साथ ही दीक्षा स्वर्ण जयंती वर्ष भी धूमधाम से पूरे देश के विभिन्न दिगम्बर जैन संगठनों द्वारा मनाया जा रहा है।

**16. अमृतमय हों वर्ष तुम्हारे–**

जिनकी दीर्घकालिक तपस्या के वर्षों की गिनती जानकर अनेक आचार्य, मुनि, आर्यिकाएँ इत्यादि भी इस बात को कहते हुए गौरव का अनुभव करते हैं कि आज जितनी मेरी उम्र भी नहीं है उससे अधिक तो पूज्य माताजी की दीक्षा आयु है, अर्थात् 18 वर्ष की उम्र से त्याग मार्ग पर जिन्होंने कदम रखा, उन्होंने अपनी जन्मतिथि-शरदपूर्णिमा को भी त्याग से सार्थक कर लिया तथा उस त्यागमयी जीवन के 54 वर्ष भी उन्होंने निर्विघ्नतापूर्वक पूर्ण किये हैं।

महान चतुर्मुखी प्रतिभा की धनी पूज्य माताजी के चरणों में भावभीना कोटिशः नमन है तथा भगवान जिनेन्द्र से यही प्रार्थना है कि उनके इस पवित्र त्यागमयी जीवन का हमें अमृत महोत्सव भी मनाने का लाभ प्राप्त हो तथा आपके द्वारा नया-नया साहित्य जनता को प्राप्त होता रहे, यही मंगलकामना है।

# विषय क्रम

## खंड : १ : प्रथमानुयोग

| | | |
|---|---|---|
| १. | **मंगलाचरण** | २ |
| २. | **सृष्टिचा क्रम** | ४ |
| | १) षट् कालपरिवर्तन | ४ |
| | २) कुळकरांची उत्पत्ति | ६ |
| | ३) प्रथम तीर्थंकर तृतीय काळामध्ये | ११ |
| | ४) धर्मतीर्थ परंपरा | १३ |
| | ५) षट्काल परिवर्तन कोठे कोठे होते ? | १८ |
| | ६) नव-नारद | १९ |
| ३. | **तीर्थंकर** | २१ |
| | १) प्रथम तीर्थंकर | २१ |
| | २) अंतीम तीर्थंकर | ४३ |
| ४. | **बारा चक्रवर्ती** | ४८ |
| | १) भरत चक्रवर्ती | ५० |
| ५. | **बलभद्र, नारायण-प्रति नारायण** | ५४ |
| | १) मर्यादा पुरुषोत्तम श्री रामचंद्र | ५४ |

## खण्ड : २ : करणानुयोग

| | | |
|---|---|---|
| ६. | **सामान्य लोक** | ६१ |
| | १) अधोलोक | ६२ |
| | २) मध्यलोक | ६४ |
| | ३) जम्बूद्वीप | ६५ |
| | ४) सुमेरु पर्वत | ६७ |
| | ५) लवण समुद्र | ६९ |
| | ६) जम्बूद्वीप मधील अकृत्रिम चैत्यालय | ७० |
| | ७) मध्यलोक मधील अकृत्रिम चैत्यालय | ७१ |
| ७. | **देवांचे भेद** | ७१ |
| | १) भवनवासी देव | ७१ |
| | २) व्यंतर देव | ७२ |
| | ३) ज्योर्तिवासी देव | ७४ |
| | ४) कल्पवासी देव | ७६ |
| ८. | **जीवाचे पाच परिवर्तन** | ८० |
| ९. | **व्यवहार काळाच्या अंतर्गत काही विशेष संख्या** | ८३ |

१०. पल्य सागराचे स्वरूप ८५
११. तीन लोकामध्ये सिद्ध जीव कोठे आहेत ? ८७

## खण्ड : ३ : चरणानुयोग

१२. धर्माचे लक्षण ९०
१) सम्यग्दर्शन ९०
२) खऱ्या गुरुचे लक्षण ९०
३) सम्यग्ज्ञान ९३
४) सम्यक्‌चारित्र ९३
५) पाच अणुव्रत ९४
६) तीन गुणव्रत ९४
७) चार शिक्षाव्रत ९५
८) सल्लेखनेचे स्वरूप ९५
९) अतिचार किती आहेत ? ९६
१३. श्रावकाच्या अकरा प्रतिमा ९६
१४. श्रावकाचे तीन भेद ९७
१) पाक्षिक श्रावकाचे अष्टमूलगुण ९८
२) नैष्ठिक श्रावक ९८
३) साधक श्रावक ९८
१५. श्रावकाच्या त्रेपन क्रिया ९८
१६. चार आश्रम ९९
१) ब्रह्मचर्य आश्रम ९९
२) गृहस्थ आश्रम ९९
३) वानप्रस्थ आश्रम १०१
४) भिक्षुक आश्रम १०१
१७. श्रावकाचे चार धर्म १०१
१८. श्रावकाच्या सहा आवश्यक क्रिया १०२
१) देवपूजा १०२
२) गुरुची उपासना १०३
३) स्वाध्याय १०३
४) संयम १०३
५) तप १०४
६) दान १०४
१९. सूतक-पातक वर्णन १०७
१) जन्म सूतक १०७
२) मरण सूतक १०७
३) रजस्वला स्त्रीचे अशौच १०८

| | | |
|---|---|---|
| २०. | **क्रिया** | १०८ |
| | १) त्रेपन गर्भान्वय क्रिया | १०९ |
| | २) अठ्ठेचाळीस दीक्षान्वय क्रिया | १११ |
| | ३) कर्त्रन्वय क्रियांचे वर्णन | ११२ |
| २१. | **बारा अनुप्रेक्षा** | ११३ |
| २२. | **मुनि-धर्म** | ११५ |
| | १) अठ्ठावीस मूलगुण | ११५ |
| २३. | **पिंडशुद्धि प्रकरण** | ११७ |
| | १) छेचाळीस भेद | ११७ |
| | २) उद्‌गमाचे सोळा भेद | ११७ |
| | ३) उत्पादनाचे सोळा भेद | ११८ |
| | ४) एषणा दोषाचे दहा भेद | ११८ |
| | ५) संयोजनादि चार भेद | ११९ |
| | ६) अंतरायाचे ३२ भेद | ११९ |
| २४. | **समाचाराचे वर्णन** | १२१ |
| | १) औघिकचे दहा भेद | १२१ |
| | २) पदविभागिक समाचार | १२१ |
| | ३) आर्यिकांचा समाचार | १२१ |
| | ४) संघाचे पाच आधार | १२२ |
| | ५) मुनींचे ३६ उत्तर गुण | १२३ |
| | ६) प्रतिक्रमण | १२५ |
| | ७) कायोत्सर्ग | १२५ |
| | ८) देववंदना | १२५ |
| २५. | **साधुंची दिनचर्या** | १२६ |
| | १) नैमित्तिक क्रिया | १२८ |
| | २) मुनिंचे दहा धर्म | १२८ |
| | ३) सोळा कारण भावना | १२९ |
| २६. | **ऋद्धिंचे वर्णन** | १२९ |
| | १) बुद्धि ऋद्धिचे अठरा भेद | १२९ |
| | २) विक्रिया ऋद्धिचे अकरा भेद | १३१ |
| | ३) क्रिया ऋद्धिचे दोन भेद | १३१ |
| | ४) तप ऋद्धिचे सात भेद | १३१ |
| | ५) बल ऋद्धिचे तीन भेद | १३२ |
| | ६) औषधि ऋद्धिचे आठ भेद | १३२ |
| | ७) रस ऋद्धिचे सहा भेद | १३२ |
| | ८) क्षेत्र ऋद्धिचे दोन भेद | १३३ |

२७. सल्लेखना १३३
१) मरणाचे भेद १३३
२) पण्डित मरण १३३
२८. पाच प्रकारचे मुनि १३५
२९. ध्यान १३५
१) आर्तध्यान १३६
२) रौद्र ध्यान १३६
३) धर्म ध्यान १३६
४) संस्थान विचय धर्मध्यान १३७
५) शुक्ल ध्यान १३९

## खण्ड : ४ : द्रव्यानुयोग

३०. सहा द्रव्यांचे वर्णन १४२
१) जीवाचे लक्षण १४२
२) गुणस्थान १४३
३) जीवसमास १४५
४) पर्याप्ति १४५
५) प्राण १४५
६) संज्ञा १४६
७) मार्गणा १४६
८) उपयोग १५१
३१. प्रमाणाचे वर्णन १५३
१) परोक्ष प्रमाण १५३
२) प्रत्यक्ष प्रमाण १५८
३) प्रकार अंतराने प्रमाणाचे भेद प्रभेद १५९
३२. नयाचे वर्णन १६०
१) अध्यात्म्याच्या अपेक्षेने नयाचे वर्णन १६२
३३. स्याद्वादसिद्धि १६३
१) सप्तभंगी १६३
३४. निक्षेप १६५
३५. जीवाचे स्वतत्व १६६
३६. दर्शन-समीक्षा १६७
१) चार्वाकादि दर्शन १६७
२) सर्वज्ञसिद्धि १७०
३७. आत्म्याचे तीन भेद १७१
३८. मोक्षमार्ग १७२

| | | |
|---|---|---|
| | १) व्यवहार रत्नत्रय | १७२ |
| | २) निश्चय रत्नत्रय | १७२ |
| ३९. | **निर्जराचे स्थान** | १७७ |
| | १) केवलज्ञानोत्पत्ति | १७८ |
| | २) नवकेवललब्धि | १७८ |
| | ३) मोक्षप्राप्ति | १७९ |
| ४०. | **कर्मसिद्धान्त** | १७९ |
| | १) आठ कर्मांचा स्वभाव | १८० |
| | २) कर्मांचे एकशे अठ्ठेचाळीस भेद-लक्षण | १८० |
| | ३) कर्माचे दहा करण | १८६ |
| ४१. | **आठ कर्मांचे आश्रव** | १८७ |
| | १) तीर्थंकर प्रकृतिचे आश्रव | १८९ |
| ४२. | **कर्मबंधाचे कारण** | १९० |
| | १) तीनशे त्रेसष्ट पाखंडी मत | १९० |
| ४३. | **मुक्तिचे कारण** | १९२ |
| | १) सम्यक्त्व | १९२ |
| | २) पाच लब्धि | १९२ |
| | ३) तीन करणांचे स्वरूप | १९३ |
| | ४) चारित्र लब्धि | ९१४ |
| | ५) कर्मांच्या नाशाचा क्रम | १९४ |
| | ६) केवलीच्या कवलाहाराचे निराकरण | १९५ |
| | ७) मुक्त जीव अलोकाकाशाच्या बाहेर का जात नाही ? | १९६ |
| ४४. | **सिद्ध परमेष्ठीचे आठ गुण** | १९६ |
| ४५. | **प्रशस्ति** | १९७ |
| ४६. | **चार्ट नं. १ चौदा कुळकर** | १९८ |
| ४७. | **चार्ट नं. २ चौवीस तीर्थंकर** | २०० |
| ४८. | **चार्ट नं. ३ बारा चक्रवर्ती** | २१० |
| ४९. | **चार्ट नं. ४ नऊ बलदेव** | २११ |
| ५०. | **चार्ट नं. ५ नऊ नारायण** | २११ |
| ५१. | **चार्ट नं. ६ नऊ प्रतिशत्रु** | २१२ |
| ५२. | **चार्ट नं. ७ एकादश रुद्र** | २१२ |
| ५३. | **चार्ट नं. ८ नारक जीव** | २१३ |
| ५४. | **चार्ट नं. ९ क्षेत्र व कुलाचल** | २१३ |
| ५५. | **चार्ट नं. १० पद्मादि सरोवर** | २१४ |
| ५६. | **चार्ट नं. ११ भवनवासी देव** | २१४ |
| ५७. | **चार्ट नं. १२ ज्योतिर्वासी देव** | २१५ |
| ५८. | **चार्ट नं. १३ बारा कल्प** | २१६ |

# स्वाध्याय प्रारंभ व समापन विधि

अथ पौर्वाण्हिक[१] स्वाध्यायप्रतिष्ठानक्रियायां श्रुतभक्तिकायोत्सर्गं करोम्यहं ।

**णमो अरिहंताणं णमो सिद्धाणं णमो आइरियाणं ।**
**णमो उवज्झायाणं णमो लोए सव्व साहूणं ॥**

चत्तारि मंगलं – अरिहंत मंगलं सिद्ध मंगलं साहू मंगलं केवलीपण्णतो-धम्मा मंगलं । चत्तारि लोगुत्तमा- अरिहंत लोगुत्तमा सिद्ध लोगुत्तमा साहू लागुत्तमा केवलिपण्णत्तो धम्मो लोगुत्ता । चत्तारि सरणं पव्वज्जामि–अरिहंत सरणं पव्वज्जामि सिद्ध सरणं पव्वज्जामि साहू सरणं पव्वज्जामि केवलि पण्णत्तो धम्मो सरणं पव्वज्जामि ।

जाव अरहंताणं भयवंताणं पज्जुवासं करेमि तावकायं पावकम्मं दुच्चरियं वोस्सरामि ।

(९ वेळा णमोकार मंत्र जपावा – २७ श्वासोच्छवासामध्ये)

थोस्सामि हं जिणवरे तित्थवरे केवलिअणंतजिणे । णरपवर लोयमहिए विहुयरमले महप्पणे ॥१॥

लोयस्सुज्जोययरे धम्मं तित्थंकरे जिणे वन्दे । अरहंते कित्तिस्से चौबीसं चेव केवलिणो ॥२॥

**श्रुतभक्ति** -

**श्रुतमपि निवरविहितं गणधररचितंद्वयनेकभेदस्थम ।**
**अंगांगबाह्यभावितमनन्तविषयं नमस्यामि ॥ १ ॥**

इच्छामि भंते ! सुदभक्तिकाउस्सग्गो कओ तस्सालोचेउं अंगोवंगपइण्णए पाहुडयपरियम्मसुत्तपढमाणिओगपुव्वगयचूलिया चेव सुत्तत्थयथुइ-धम्मकहाइयं णिच्चकालं अंचेमि, पूजेमि, वंदामि णमंसामि दुक्खक्ओ कम्मक्खओ बोहिलाहो सुगइगमणं समाहिमरणं जिनगुणसम्पत्ति होउ सज्झं ।

अथ पौर्वाण्हिकस्वाध्याय प्रतिष्ठापन क्रियायां आचार्यभक्तिकायोत्सर्गं करोम्यहं ।

(णमो अरिहंताणं पासून पूर्ण पाठ वाचून ९ वेळा णमोकार मंत्र म्हणून 'थोस्सामि' स्तवन वाचून भक्ति म्हणावी.)

**आचार्य भक्ति** -

**गुरुभक्त्या वयं सार्धद्वीपद्वितयवर्तिनः ।**
**वंदामहे त्रिसंख्योननवकोटिमुनीश्वरान् ॥ १ ॥**

इच्छामि भंते ! आयरियभत्तिकाऊस्सग्गो कओ तस्सालोचेउं सम्मणाण-सम्मदंसणसम्म-चारित्त-जुत्ताणं पंचविहाचाराणं आयरियाणं आयारादिसुदणाणोवदेसयाणं उवज्झायाणं तिरयणगुण-पालणरयाणं सव्वसाहूणं णिच्चकालं अंचेमि, पूजेमि, वंदामि, णमंसामि दुक्खक्ओ कम्मक्खओ, बोहिलाओ सुगइगमणं समाहिमरणं जिनगुणसम्पत्ति होउ मज्झं ।

पुन्हा स्वाध्याय समापन करतांना –

नमोऽस्तु पौर्वाण्हिक स्वाध्याय निष्ठानक्रियायां श्रुतभक्तिकायोत्सर्गं करोम्यहं ।

(पूर्ववत् णमो अरिहंतांणं इत्यादि म्हणून ९ वेळा णमोकार ग्रंथ जपावा. 'थोस्सामि' वाचून श्रुतभक्ति वाचावी.

---

१. मध्यान्हवेळी स्वाध्याय करतांना 'अपराण्हिक' म्हणावे. रात्री स्वाध्याय करतांना 'पूर्वरात्रिक' म्हणावे.

# शास्त्र स्वाध्यायाचे प्रारंभिक मंगलाचरण

ॐ नमः सिद्धेभ्यः, ॐ नमः सिद्धेभ्यः, ॐ नमः सिद्धेभ्यः
ओंकारं विन्दुसंयुक्तं, नित्यं ध्यायन्ति योगिनः ।
कामदं मोक्षदं चैव, ओंकाराय नमो नमः ॥ १ ॥

अविरलशब्दघनौघप्रक्षालितसकलभूतलमलकलंका ।
मुनिभिरुपासिततीर्था सरस्वती हरतु नो दुरितान् ॥ २ ॥

अज्ञानतिमिरान्धानां, ज्ञानांजनशलाकया ।
चक्षुरुन्मीलितं येन तस्मै श्रीगुरवे नमः ॥ ३ ॥

श्री परमगुरवे नमः, परम्पराचार्यगुरवे नमः । सकलकलुषविध्वंसकं, श्रेयसां परिवर्धकं, धर्मसम्बन्धकं, पापप्रणाशणं पुण्यप्रकाशकं भव्यजीवमनः-प्रतिबोधकारकं इदं शास्त्रं श्री जैन भारती[1], नामधेयं, अस्य मूलग्रन्थकर्तारः श्री सर्वज्ञ देवाः, तदुत्तरग्रन्थकर्तारः श्री गणधरदेवाः प्रतिगणधरदेवाः तेषां वचोनुसारमासाद्य आर्यिकाश्री ज्ञानमतीमातुः विरचितं[2] । श्रोतारः सावधानतया श्रृण्वन्तु ।

मंगलं भगवान्वीरो, मंगलं गौतमो गणी ।
मंगलं कुन्दकुन्दाद्यो, जैनधर्मोऽस्तु मंगलम् ॥ ४ ॥

---

१. ज्या ग्रंथाचा स्वाध्याय करावयाचा असेल त्याचे नाव घ्यावे.
२. ग्रंथाच्या रचनाकाराचे नाव घ्यावे.

# जैन भारती

## प्रथम खण्ड

# प्र थ मा नु यो ग

**प्रथमानुयोगमर्थाख्यानं चरितं पुराणमपि पुण्यम् ।**
**बोधिसमाधिनिधानं बोधति बोधः समीचीनः ॥ १ ॥**

अर्थ - ज्या शास्त्रांत धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष अशा सत्य आत्मज्ञानी विषयाला अनुसरून पुरुषार्थ स्वरूपाचे वर्णन आहे; एका उत्तम पुरुषाच्या कर्तृत्वावर आधारित कथा, त्रेसष्ट शलाका पुरुषांची चरित्रे, पुण्यबंध करणाऱ्या कथा आहेत; ज्यात मोक्षमार्गी रत्नत्रय स्वरूपांचे संपूर्ण ज्ञान, समाधि-ध्यान साधनेच्या वर्णनांचे भंडार आहे, अशा शास्त्रांना, सम्यग्ज्ञानी प्रथमानुयोग समजतात. म्हणजेच चार पुरुषार्थ आणि महापुरुषांचे चरित्र वर्णन ज्यात आहे ते प्रथमानुयोग आहे. ह्यांच्या वाचनाने पुण्यकर्माचा बंध होतो, रत्नत्रयाची प्राप्ती व समाधीची सिद्धी होते.

# मंगलाचरण

**णमो अरिहंताणं, णमो सिद्धाणं, णमो आइरियाणं ।**
**णमो उवज्झायाणं, णमो लोए सव्वसाहूणं ॥१॥**

चत्तारी मंगलं - अरिहंत मंगलं, सिद्ध मंगलं, साहू मंगलं, केवलीपण्णत्तो धम्मो मंगलं. चत्तारि लोगुत्तमा- अरिहंत लोगुत्तमा, सिद्ध लोगुत्तमा, साहू लोगुत्तमा, केवलिपण्णत्तो धम्मो लोगुत्तमा... चत्तारि सरणं पवज्ञामि- अरिहंत सरणं पवज्ञामि, सिद्ध सरणं पवज्ञामि, साहू सरणं पवज्ञामि, केवलि पण्णत्तो धम्मो सरणं पवज्ञामि.

अर्थ :- अरिहंतांना नमस्कार, सिद्धांना नमस्कार, आचार्यांना नमस्कार, उपाध्यायांना नमस्कार आणि लोकातील सर्व साधुंना नमस्कार.

**मंगल चार आहेत** - अरिहंत मंगल आहे. सिद्ध मंगल आहे. साधु मंगल आहे. केवली द्वारा प्रतिपादित धर्म मंगल आहे.

**लोकामध्ये चार उत्तम आहेत** - लोकांमध्ये अरिहंत उत्तम आहे, लोकामध्ये सिद्ध उत्तम आहे, लोकामध्ये साधु उत्तम आहे, लोकामध्ये केवली प्रतिपादित धर्म उत्तम आहे.

मी या चार मंगलांना शरण जातो - अरिहंतांना मी शरण जातो, सिद्धांना मी शरण जातो, साधूंना मी शरण जातो तथा केवली द्वारा प्रतिपादित धर्माला मी शरण जातो.

जैन वाङ्मय अनादिनिधन आहे, युगपरिवर्तनाच्या अपेक्षेने सादि व सनिधन हे चिरंजिवी-अपरिवर्तनीय मानले जाते. **"कर्मारातीन् जयतीति जिनः"** या व्युत्पत्तिनुसार जो कर्म शत्रूंना जिंकतो त्याला **"जिन"** म्हटले आहे. यांनाच **जिनदेव, जिनेंद्र भगवान, जिनराज** इत्यादी सहस्त्रों नावांनी संबोधिले जाते. यांच्या द्वारा सांगितलेला मार्ग **जिनधर्म, जैनधर्म, अर्हतधर्म** इत्यादि नांवानी प्रसिद्ध आहे. या जिनदेवांच्या दिव्यध्वनिलाच **आगम, जिनागम, जिनवाणी, सरस्वती, शारदा, जैन वाङ्मय, जैन भारती** इत्यादि नावांनी संबोधिले जाते.

जिनेंद्र देवाच्या मुखातून निघालेली वाणी द्वादशांग रूप आहे. पूर्व आचार्यांनी त्याला चार अनुयोगात विभाजित केले आहे. - **प्रथमानुयोग, करणानुयोग, चरणानुयोग आणि द्रव्यानुयोग**. ह्यांनाच चार वेद सुद्धा म्हणतात. या चार अनुयोगांमध्ये द्वादशांगी संपूर्ण जैन वाङ्मय समाविष्ट झालेले आहे. ह्या **जैन भारती ग्रंथात** सुद्धा वर्तमान काळात उपलब्ध असलेले जैन वाङ्मय अति संक्षेपाने प्रस्तुत करण्याची इच्छा आहे. म्हणून याला सुद्धा चार अनुयोगात विभक्त केले आहे.

ज्याप्रकारे जैनधर्म अनादिनिधन आहे, त्याचप्रकारे हे संपूर्ण गतिशील विश्वसुद्धा अनादिनिधन आहे. काही

लोक या विश्वाला परमपुरुष परमात्म्याने निर्माण केलेले मानतात. परंतु जैन आचार्य ह्या सृष्टीला **"स्वयंसिद्ध"** मानतात. ह्या विषयी स्पष्टीकरण यथास्थानी द्रव्यानुयोगात सर्व दर्शन सिद्धांताचे विवेचन करताना केले जाईल. येथे जैन सिद्धांताला अनुसरून केवळ **"सृष्टिचा क्रम"** दाखविला आहे.

हे तीनलोकस्वरूपी संपूर्ण विश्व शाश्वत आहे. मध्यलोकामध्ये सर्वप्रथम जम्बूद्वीप आहे. या द्वीपात भरत क्षेत्राच्या आर्य खंडात निरंतर षट् काळांचे परिवर्तन होत राहते. ह्याला "युगपरिवर्तन" सुद्धा म्हणतात. हे काळ परिवर्तन चांगल्याप्रकारे समजून घेतले तरच सृष्टिचा क्रम समजू शकतो. ब्रह्माने ह्या सृष्टिची उत्पत्ती केली असून विष्णु त्याचे पालन करतो आणि महादेवाकडून त्याचा संहार होतो असे काही लोक मानतात. काळ परिवर्तनाचा जैन सिद्धांत व्यवस्थित समजून घेतला तर अन्य सर्व मान्यतांचे आपोआपच खंडन होऊन जाते.

या अनुयोगात वृषभदेव इत्यादि महापुरुषांचा इतिहास प्रस्तुत केला जाईल.

❋❋❋

# सृष्टिचा क्रम

भरतक्षेत्राच्या आर्यखंडामध्ये काळाचे अवसर्पिणी-उत्सर्पिणी असे दोन भाग केले आहेत. ज्या काळात मनुष्य तथा तिर्यंचाची आयु, शरीराची उंची, वैभव इत्यादि कमी-कमी होत जाते त्यास अवसर्पिणी काळ व ज्या काळात हे अनुक्रमाने वाढत-वाढत जाते त्यास उत्सर्पिणी काळ म्हणतात. अर्ध्यापल्याच्या प्रमाणात दहा कोडा-कोडी सागर[१] एक अवसर्पिणी तथा तितक्याच समयाचा उत्सर्पिणी काळ असतो. ह्या दोन्हीचा मिळून वीस कोडा-कोडी सागराचा एक कल्पकाळ बनतो. प्रत्येक अवसर्पिणी व उत्सर्पिणी काळाचे सहा भेद आहेत.

## अवसर्पिणी काळाचे सहा भेद

सुषमासुषमा, सुषमा, सुषमा-दुःषमा, दुःषमा-सुषमा, दुःषमा आणि अति दुःषमा असे आणि उत्सर्पिणी काळाचे सहा भेद ह्याच्या विपरीत होतात... दुःषमा-दुःषमा, दुःषमा, दुःषमा-सुषमा, सुषमा-दुःषमा, सुषमा आणि सुषमा-सुषमा. "समा" काळाच्या विभागाला म्हणतात तथा "सु" आणि "दुर" उपसर्ग क्रमशः चांगल्या आणि वाईट अर्थाने घेतला गेल्याने हे "सुषमा" व "दुःषमा" शब्द चांगल्या आणि वाईट काळाचे द्योतक आहेत. हे दोन्हीही भाग काळचक्राच्या परिभ्रमणाने नेहमी कृष्णपक्ष आणि शुक्लपक्षाप्रमाणे फिरत असतात. अवसर्पिणी काळानंतर उत्सर्पिणी आणि उत्सर्पिणी काळानंतर अवसर्पिणी अशाप्रकारे हे काळचक्र बदलत राहते.

यातला प्रथम सुषमा-सुषमा काळ चार कोडा-कोडीसागर, द्वितीय सुषमा काळ तीन कोडा-कोडीसागर, तृतीय दोन कोडा-कोडीसागर, चतुर्थ काळ एक कोडा-कोडी-सागरास बेचाळीस हजार वर्ष कमी, पंचम काळ एकवीस हजार वर्ष आणि षष्टम काळ सुद्धा एकवीस हजार वर्ष प्रमाण आहे.

## सहा काळाचे परिवर्तन

प्रथम काळ :- सुषमा-सुषमा काळात जमीन धूळ, धूर, अग्नी, बर्फ, काटे इत्यादिंनी मुक्त तथा शंख, विंचू, मुंग्या, माशा इत्यादि विकलत्रय जीवांपासून सुद्धा मुक्त असते. दिव्यवाळू, सुवासिक माती आणि पांच रंगाचे चार बोटांच्या उंची इतके गवत राहते. तेथे अनेक प्रकारचे वृक्ष, स्वच्छ पाण्यानी भरलेली कमळ पुष्पांनी युक्त सरोवरे, उंच-उंच पर्वत, उत्तम-उत्तम भव्य प्रासाद, इंद्रनील मण्यासारखी सुशोभित पृथ्वी, काचेसारख्या चमकणाऱ्या स्वच्छ वाळूने शोभायमान केलेल्या मोठ्या-मोठ्या नद्या असतात. ह्या काळात असंज्ञी जीव, जाती विरोधी जीव सुद्धा नसतात. गर्मी, थंडी, अंधार आणि दिवस-रात्रीचा भेद सुद्धा नसतो. तसेच परस्त्रीगमन, परधनहरण इत्यादि व्यसने सुद्धा नसतात. ह्या काळांत युगला रुपाने जन्म घेणारे मनुष्य तिळ, मस आदिनी सुशोभित व शंख, चक्र इत्यादि चिन्हांनी युक्त, उत्तम शरीरधारी तथा मालक-सेवक ह्या भेदाने रहित असतात. त्यांच्या शरीराची उंची सहा हजार धनुष्य अर्थात तीन कोस आणि तीन पल्य प्रमाण आयुष्य राहते. प्रत्येक स्त्री-पुरुषांच्या पाठीला (२५६) दोनशे छप्पन हाडे असतात. त्यांचे शरीर मलमूत्र-घामविरहित, सुगंधित

---

१. पल्य आणि सागर चे स्वरूप करणानुयोगांत दाखविले जाईल.

उच्छवास, तापलेल्या सोन्यासारखा रंग, समचतुरस्त्र संस्थान, संहननाने तथा वज्रवृषभनाराच संहननाने युक्त असते. प्रत्येक मनुष्याची शक्ती नऊहजार हत्तीच्या बळासमान असते. ह्या काळात स्त्री-पुरुषाशिवाय अन्य कोणीही कुटुंबात नसतो. ह्या काळात तेथे गाव, नगर इत्यादि नसतात. फक्त दहा प्रकारचे कल्पवृक्ष असतात. ते युगलांना आपल्या इच्छेनुसार मनोवांछित वस्तू देतात.

कल्पवृक्षांची नांवे - पानांग, तूर्यांग, भूषणांग, वस्त्रांग, भोजनांग, आलयांग, दीपांग, भाजनांग, मालांग आणि ज्योतीरंग ह्या प्रकारचे दहा कल्पवृक्ष असतात. पानांग जातीचे कल्पवृक्ष भोगभूमि निवासी मनुष्यांना मधुर, सुस्वादू षट् रस युक्त शक्तिवर्धक बत्तीस प्रकारचे पेयपदार्थ उपलब्ध करतात. तूर्यांग कल्पवृक्ष उत्तम वीणा, नगारे, मृदंग इत्यादि वाद्ये देतात. भूषणांग कल्पवृक्ष शरीरावर धारण करण्यासाठी वस्त्र देतात. भोजनांग कल्पवृक्ष सोळा प्रकारचे मिष्ठान्न, चवदा प्रकारच्या डाळी, एकशे आठ प्रकारचे खाद्यपदार्थ, तीनशे त्रेसष्ट प्रकारचे स्वादिष्ट पदार्थ तथा त्रेसष्ट प्रकारचे रस देतात. आलयांग कल्पवृक्ष स्वस्तिक, नंद्यावर्त इत्यादि सोळा प्रकारचे दिव्य भवन देतात. दीपांग कल्पवृक्षांच्या शाखा फळ, फूल, बुरादा, अंकुर इत्यादींच्या साह्याने दिव्यासारखा प्रकारश उत्पन्न करतात. भाजनांग कल्पवृक्ष सोन्याची झारी, कळस, घागर, चामर, आसन इत्यादि देतात. मालांग कल्पवृक्ष वेली, वृक्ष, लता इत्यादि द्वारा निर्मित सोळाहजार विभिन्न प्रकारच्या फुलांच्या माळा देतात आणि ज्योतिरंग कल्पवृक्ष मध्यान्हाला तळपणाऱ्या करोडों सूर्यांच्या प्रकाशाप्रमाणे असल्यामुळे नक्षत्र, सूर्य आणि चंद्र ह्यांच्या तेजाला मागे टाकतात. हे सर्व कल्पवृक्ष ना वनस्पती आहेत ना कोणी व्यंतरदेव आहेत. परंतु ह्यांची विशेषता अशी आहे की हे सर्व पृथ्वीचे विभिन्न स्वरूप असून जीवांना त्यांच्या पुण्य कर्माचे फळ देतात.

भोगभूमिवासियांचे भोग इत्यादि : हे मनुष्य कल्पवृक्षांच्या द्वारा दिलेल्या वस्तूंना ग्रहण करून आणि विक्रियाशक्तीने अनेक प्रकारचे शरीर धारण करून विभिन्न प्रकारचे भोग भोगतात आणि चवथ्या दिवशी बोरा एवढा आहार ग्रहण करतात. हे युगल अपघाती अथवा असमयी मृत्यु रहित असतात व आपले आयुष्य संपेपर्यंत चक्रवर्तीच्या भोगापेक्षाही अनंत मात्राने अधिक भोग भोगतात. तेथील पुरूष इंद्रापेक्षासुद्धा सुंदर आणि स्त्रिया स्वर्गातील अप्सरांप्रमाणे सुंदर असतात.

भोगभूमीतील आभूषण : भोगभुमीमध्ये कर्णफूल, हार, कमरपट्टा, मुकुट, भुजबंध, भालपट्ट, कडे, मोठी माळा, जानवं (ब्रह्मसूत्र - यज्ञोपवित), पैंजण, पादत्राण (अंगद), तलवार (शस्त्र), सूरी इत्यादि सोळा आभूषण पुरुषांचे आणि शस्त्र व सूरी सोडून बाकी आभूषण स्त्रियांचे राहत असे.

भोगभूमीमध्ये उत्पत्तिचे कारण : भोगभूमीमध्ये मनुष्य आणि तिर्यंच प्राणी उत्पन्न होतात. मनुष्य मिथ्यात्वी असून सुद्धा मंद कषायी, मधु-मांस त्यागी, गुणवान पुरुषांच्या आचरणाचे अनुकरण करणारे उपवासाने शरीर क्षीण करणाऱ्या निर्ग्रंथ साधूंना आहारदान देणारे आणि अन्य प्राण्यांवर अनुकंपा करणारे असतात. पशु इत्यादि सुद्धा या ठिकाणी उत्पन्न होतात.

कोणी अज्ञानी जिनशासनाला ग्रहण करून जेव्हा प्राण सोडतात व दुष्ट प्रवृत्तीला धारण करून कुलिंगीयांना अनेक प्रकारचे दान-दक्षिणा देतात ते सर्व भोगभूमिमध्ये तिर्यंचगतिला प्राप्त करतात.

भोगभूमिमध्ये मनुष्य आणि तिर्यंचाची आयु जेव्हा नऊ महिने शिल्लक राहते त्यावेळेस स्त्रियांना गर्भ राहतो आणि दोन्ही युगलांचा मृत्यूसमय जवळ आल्यावर युगल बालक-बालिकांचा जन्म होतो. पुरुषांना शिक व स्त्रीला जांभई आल्यावर लगेच मृत्यू येतो आणि त्यांचे शरीर शरद ऋतूतील मेघाप्रमाणे त्याच क्षणाला संपूर्ण विलीन होऊन जाते.

भोगभूमितील युगलांची वाढ : येथील बाळ युगल जन्मापासून शय्येवर झोपून आंगठा चोखत तीन दिवस

काढतात, त्यानंतर बसणे, रांगणे, चालणे व सर्व विद्या प्राप्त करणे, तरुणावस्था प्राप्ती, सम्यग्दर्शन प्राप्ती, यातील प्रत्येक अवस्थांमध्ये त्या बालकांचे प्रत्येकी तीन-तीन दिवस व्यतित होतात. अर्थात, एकवीस दिवसांनंतर हे युगल सात प्रकारची योग्यता प्राप्त करून तारुण्यावस्था सहित सर्वगुणसंपन्न होतात.

**सम्यकत्वाचे कारण :** तेथे कोणी जीव पूर्व भवांचे स्मरण करून, कोणी देवांनी उपदेश दिल्यानंतर, कोणी ऋद्धीधारी मुनींचा उपदेश ऐकल्यावर सम्यक्त्वाला ग्रहण करू शकतात. परंतु त्यांच्याकडून श्रावकांचे व्रत व संयम होऊ शकत नाही.

**भोगभूमीतील तिर्यंच :** भोगभूमीमध्ये गाय, सिंह, हत्ती, मगर, डुक्कर, हरीण, म्हैस, वानर, तेंदुआ, अस्वल, पोपट, कोंबडा, कबूतर, राजहंस इत्यादि तिर्यंच युगल सुद्धा जन्म घेतात. हे सर्व आपसातील वैरभावरहित, क्रुरतारहित, मंदकषायी असतात. तेथील वाघ आदि भूचर आणि कबूतर आदि नभचर तिर्यंच प्राणी मांसाहार न करता दिव्य गवतांचे भक्षण करतात. चार कोडा-कोडी सागर प्रमाण समय असलेल्या ह्या प्रथम काळात शरीराची उंची, आयुष्य, ताकत, बुद्धी, सामर्थ्य इत्यादि कमी-कमी होत जाते.

**द्वितीय काळ :** अशाप्रकारे शरीर सौष्ठव कमी-कमी होत होत सुषमा नावाचा द्वितीय काळ प्रारंभ होतो. ह्या काळाच्या प्रारंभ समयी मनुष्याच्या शरीराची उंची ४००० (चार हजार) धनुष्य - दोन कोस, आयु दोन पल्य प्रमाण आणि शरीराचा रंग चंद्रासारखा शुभ्र पांढरा असतो. ह्यांच्या पाठीला १२८ (एकशे अठ्ठावीस) हाडे असतात. अति सुंदर समचतुरस्त्र संस्थानाने युक्त हे भोगभूमीचे मनुष्य तिसऱ्या दिवशी बाळ हिरड्या एवढा आहार ग्रहण करतात. ह्या काळात उत्पन्न झालेले युगल बालक शय्येवर झोपून आंगठा चोखण्यात (५) पांच दिवस घालवितात, त्यानंतर बसणे, रांगणे, चालणे, ज्ञानप्राप्ती करणे, तारुण्य व सम्यक्त्व ग्रहण करण्याची योग्यता ह्या प्रत्येक अवस्थेत ह्या युगल बालकांचे पाच-पाच दिवस व्यतित होतात. केवळ ह्या विशेषांना सोडून बाकी सर्व वर्णन जे सुषमासुषमा काळाबद्दल सांगितले आहे ते ह्या काळात सुद्धा असते. तीन कोडा-कोडी सागर प्रमाण असलेल्या सुषमा नावाच्या काळात सुरवातीपासूनच उंची, आयुष्य, शक्ति, बुद्धी आणि सामर्थ्य इत्यादि क्रमशः कमी-कमी होत जाते.

**तृतीय काळ :** तीन कोडा-कोडी सागर काळ पूर्ण झाल्यावर क्रमाने सुषमा-दुषमा नावाचा तृतीय काळ प्रारंभ होतो. हा काळ दोन कोडा-कोडी सागर वर्षापर्यंत राहतो. या काळाच्या सुरुवातीला मनुष्यांची उंची दोन हजार धनुष्य-एक कोस, आयुष्य एक पल्य प्रमाण आणि वर्ण प्रियंगुफळाप्रमाणे शामवर्णी असतो. या काळातील स्त्री-पुरुषांच्या पाठीच्या हाडांची संख्या चौसष्ट राहते. सर्व मनुष्य समचतुरस्त्र संस्थानाचे आणि एक दिवसाआड आवळ्या एवढा भोजन करणारे असतात. ह्या काळात उत्पन्न झालेल्या बालकांचे आपल्या आसनावर झोपताना आंगठा चोखत सात दिवस व्यतित होतात. नंतर बसणे, रांगणे, चालणे, विद्याध्ययन, तारुण्य आणि सम्यक्त्व प्राप्तीची पात्रता, यांतील प्रत्येक अवस्थेला क्रमशः सात-सात दिवस लागतात. वर दिलेले विशेष वर्णन सोडून बाकी सर्व वर्णन जे सुषमा-सुषमा नावाच्या काळात सांगितले आहे त्याचप्रमाणे येथेही समजावे.

ह्या तीनही भोगभूमिमध्ये चोर, शत्रु इत्यादिंची भीती, शस्त्र (असि), मसि इत्यादि सहा कर्म, थंडी, गरमी, वारा-वादळ आणि वर्षा इत्यादि होत नसते. ह्यांनाच क्रमाने उत्तम, मध्यम आणि जघन्य भोगभमिसुद्धा म्हणतात.

**कुळकरांची उत्पत्ती :** ह्या भरतक्षेत्राच्या मध्यभागांत आर्यखंडामध्ये अवसर्पिणी काळाचा तृतीय काळ चालला होता. ह्यामध्ये आयुष्य, शरीरसौष्ठव, बुद्धी, शक्ति आणि सामर्थ्य कमी-कमी होत असताना जेव्हा ह्या तृतीय काळामध्ये पल्य प्रमाणाच्या आठव्या भागाइतका काळ शिल्लक राहतो तेव्हा कुळकरांची उत्पत्ती प्रारंभ होते.

प्रथम कुळकरांचे नांव "प्रतिश्रुति" आणि त्याच्या पत्नीचे नाव 'स्वयंप्रभा' होते. त्यांच्या शरीराची उंची एकहजार आठशे धनुष्य आणि आयुष्य पल्ल्याच्या दहाव्या भागाइतके होते. त्यावेळेस आषाढ शुक्ल पौर्णिमेच्या दिवशी संध्याकाळी भोगभूमित राहणाऱ्या लोकांना पूर्व दिशेला उगवणारा चंद्र आणि पश्चिम दिशेला अस्त होणारा सूर्य दिसला. हे काही आकस्मिक संकट आले आहे असे समजून लोक भीतीने व्याकूळ झाले. त्यावेळी तेथे 'प्रतिश्रुति' कुळकर अत्यंत शक्तिशाली व प्रजाजनांचे हितेषी होते. पूर्व जन्माच्या संस्कारामुळे अवधिज्ञानी होते. त्यामुळे ते सर्वात बुद्धिमान मानल्या जात असत. त्यांनी सांगितले की हे भव्य जीवांनो ! तुम्हाला हे जे दिसत आहे ते सूर्य-चंद्र नावाचे ग्रह आहेत. काळानुसार आता ज्योतिरंग कल्पवृक्षांच्या प्रकाश किरणांचा प्रभाव मंद होऊ लागला आहे म्हणून ह्यावेळी हे दिसावयास लागले आहेत. हे नेहमीच आकाशात फिरत राहतात. आतापर्यंत कल्पवृक्षांच्या प्रकाशाच्या तेजापुढे ह्यांचा प्रकाश कमी असल्यामुळे ह्यांचे दर्शन होत नव्हते. अतः तुम्ही भिऊ नका. प्रतिश्रुतिच्या शब्दांनी ते सर्व आश्वस्त झाले आणि त्या लोकांनी त्यांची पूजा, वंदना व स्तुती केली.

प्रतिश्रुति कुळकरांच्या स्वर्गवासानंतर पल्य समयाचा अैशीवा (८०) भाग समय गेल्यानंतर सोन्यासारख्या चमकदार रंगाचे 'सन्मती' नावाचे दुसरे कुळकर जन्मास आले. यांच्या शरीराची उंची एकहजार तीनशे धनुष्य आणि आयुष्य 'अमम'च्या अंका इतक्या वर्षाचे होते. त्यावेळी ज्योतीरंग नावाचे कल्पवृक्ष जवळजवळ नष्ट झाले होते. सूर्य अस्त झाल्यावर अंधार आणि आकाशातील ताऱ्यांना पाहून हे अत्यंत भयानक अदृश्य रूपाने काही संकट येत आहे असे समजून सर्व मनुष्य भयभीत होऊन कुळकराजवळ येतात. त्यावेळी सन्मती कुळकराने सांगितले की समयानुसार ज्योतीरंग कल्पवृक्षांची प्रकाश-किरणे पूर्णतः नष्ट झाली आहेत. त्यामुळे आकाशात सायंकाळच्या वेळेस अंधार आणि ताऱ्यांचा समूह दिसतो. तुम्हाला ह्यापासून भिण्याचे काहीच कारण नाही. हे तर आकाशात नेहमीच राहतात, परंतु कल्पवृक्षांच्या तेजोमयी किरणांमुळे स्पष्ट दिसत नव्हते. हे ग्रह, तारे, नक्षत्र आणि सूर्य-चंद्र, जंबूद्वीपामध्ये नियमित मेरुची प्रदक्षिणा करीत असतात. कुळकराच्या शब्दाने ते सर्वजण भयमुक्त होऊन त्यांची पूजा व स्तुती करू लागले.

ह्या कुळकरांच्या स्वर्गवासानंतर असंख्य करोडो वर्षांचा काळ गेल्यावर भरत क्षेत्रात तिसरे कुळकर उत्पन्न झाले. त्यांचे नाव 'क्षेमंकर' होते. त्यांच्या शरीराची उंची आठशे (८००) धनुष्य, आयुष्य 'अटट' वर्ष्र इतके, वर्ण सोन्यासारखा आणि सुनंदा नावाची पत्नी होती. त्यावेळी वाघ इत्यादि तिर्यंच जीव क्रूर स्वभावी होऊ लागले होते. भोगभूमीतील मनुष्य त्यांना भिऊन क्षेमंकर कुळकरापाशी पोहचले आणि सांगितले की, हे देव ! सिंह, वाघ इत्यादि पशु अत्यंत शांत होते. आम्ही आपल्या मांडीवर बसवून आपल्या हातान भोजन करवित होतो, ते पशु आज आम्हालाच विनाकारण शिंगांनी मारतात आणि तोंड फाडून आम्हास भीती दाखवितात. आता आम्ही काय करावे ? तेव्हा कुळकरांनी सांगितले की हे भव्य जीवांनो ! आता तुम्ही त्यांच्यावर विश्वास करू नका. ह्यांची संगती सोडा. समयानुसार यांच्यामध्ये विकृति उत्पन्न झाली आहे. ह्या प्रमाणे क्षेमंकर कुळकराच्या सांगण्यावरून त्या लोकांनी शिंग आणि जबडा असणाऱ्या पशुंची संगती सोडली. केवळ निरुपद्रवी गाय, म्हैस इत्यादिची साथ ठेवली.

ह्यांचे आयुष्य पूर्ण झाल्यानंतर, असंख्य करोड वर्षाचा समय व्यतित झाल्यावर, सज्ञनामध्ये श्रेष्ठ असे 'क्षेमंधर' नावाचे कुळकर उत्पन्न झाले. ह्यांचे आयुष्य 'तुतीक' इतक्या वर्षांचे होते, आणि शरीराची उंची सातशे पंच्याहत्तर (७७५) धनुष्य, रंग सोन्यासारखा होता. ह्यांच्या पत्नीचे नाव 'विमला' होते. त्यावेळी क्रूर स्वभावी सिंह वगैरे मनुष्यांचे मांस भक्षण करावयास लागले होते. त्यावेळी सिंह इत्यादिंच्या भीतीने घाबरून गेलेल्या लोकांना क्षेमंधर मनुने स्वतःचे संरक्षण करण्यासाठी दंड इत्यादि ठेवण्याचा उपदेश दिला होता.

ह्यानंतर असंख्य करोड वर्ष व्यतित झाल्यानंतर प्रजेच्या पुण्य उदयाने 'सीमंकर' नावाचे पांचवे कुळकर झाले. यांची आयु 'कमळ' प्रमाण वर्षाइतकी तथा शरीराची उंची सातशे पन्नास (७५०) धनुष्य होती. वर्ण-रग सोन्यासारखा आणि 'मनोहरी' नावाची प्रसिद्ध पत्नी होती. यांचे वेळी कल्पवृक्ष कमी झाल्यामुळे फळेसुद्धा कमी प्राप्त होऊ लागले होते व त्यामुळे मनुष्यांना अत्यंत कष्ट होऊ लागले होते. भोगभूमीवासीयांचे आपसातील भांडणे पाहून सीमंकर मनूने कल्पवृक्षांची सीमा बांधून दिली व ह्या प्रकारे आपसातील व्यर्थ संघर्ष टळला.

**भोगभूमीतील शासन व्यवस्था :** वर वर्णन केलेल्या प्रतिश्रुति सहित पांच कुळकरांनी ह्या भोगभूमी वासीयांच्या अपराधांना 'हा'-हाय ! वाईट कार्य केले आहे अशी दंडशासनाची व्यवस्था केली होती. बस एवढे म्हटल्यावर प्रजा पुढे अपराध किंवा दंडनीय कार्य करीत नव्हती.

पाचव्या कुळकरांच्या मृत्यूनंतर असंख्यात करोडो वर्षाचा काळ व्यतित झाल्यानंतर 'सीमंधर' नावाचे सहावे कुळकर उत्पन्न झाले. त्यांचे आयुष्य 'नलीन' प्रमाण वर्ष इतके होते. त्याची उंची सातशे पंचवीस (७२५) धनुष्य होती व त्यांच्या पत्नीचे नाव यशोधरा होते. ह्यांच्या वेळेस कल्पवृक्षांची संख्या अतिशय कमी झाली होती व त्यामुळे फळ सुद्धा कमी प्राप्त होत असे म्हणून प्रजाजनात नेहमीच भांडण-तंटे होत असत. तेव्हा ह्या कुळकराने कल्पवृक्षांची सीमा अनेक वृक्ष तथा छोट्या-छोट्या झुंडपांनी चिन्हित करून दिली.

ह्यांच्यानंतर पुन्हा असंख्य करोड वर्षांचा समय व्यतित झाल्यावर 'विमलावाहन' नावाचे सातवे कुळकर उत्पन्न झाले. यांचे आयुष्य 'पदम' प्रमाणे वर्षांइतके तथा शरीराची उंची सातशे (७००) धनुष्य होती. त्यांचा रंग सोन्यासारखा होता. त्यांच्या पत्नीचे नाव 'सुमती' होते. भोगभूमीतील मनुष्यांना एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाण्या-येण्याचा त्रास होत होता. हा त्रास टाळण्यासाठी ह्या कुळकराने हत्ती, घोडे इत्यादिंचा सवारीसाठी उपयोग करण्याचा आदेश दिला व भाला-अंकुश इत्यादि द्वारा त्यांच्यावर नियंत्रण ठेवावयास सांगितले.

सातव्या कुळकरांच्या मृत्युनंतर असंख्य करोडो वर्षाचा समय व्यतित झाल्यानंतर 'चक्षुमान' नावाचे आठवे कुळकर उत्पन्न झाले. त्यांचे आयुष्य 'पद्मांग' प्रमाण व उंची सहाशे पंच्याहत्तर (६७५) धनुष्य एवढी होती. ह्यांच्या पत्नीचे नाव 'धारिणी' होते. ह्यांच्या वेळेपूर्वी मनुष्य आपले संतान पाहू शकत नव्हते कारण संतान उत्पन्न होताच माता-पित्यांचा मृत्यू होत असे. परंतु आता ह्यासमयी ते थोडावेळ संतानाचे मुख पाहू लागले. त्यांना ही नवीन आणि अकल्पित घटना होती त्यामुळे ते भयभीत होऊन 'चक्षुमान' कुळकरांकडे गेले. त्यावेळेला त्यांनी शंका समाधान करून सांगितले की हे तुमचे पुत्र-पुत्री आहेत. ह्यांच्या पूर्ण चंद्रासारख्या सुंदर चेहऱ्याकडे पहा. ह्याप्रमाणे मनुच्या उपदेशाने स्पष्ट रूपाने आपल्या बालकांचे चेहरे पाहून त्याच क्षणी त्यांचे आयुष्य संपूर्ण होऊन ते विलीन होऊन जात होते.

आठव्या कुळकरांच्या स्वर्गवासानंतर करोडो वर्षांचा समय व्यतित झाल्यावर 'यशस्वान नावाचे नववे कुळकर उत्पन्न झाले. ह्यांचे आयुष्य 'कुमुद' प्रमाण वर्षांइतके आणि शरीराची उंची सहाशे पन्नास (६५०) धनुष्य होती. त्यांच्या पत्नीचे नाव 'कांतीमाला' होते. ह्या समयी कुळकर आपल्या प्रजेला संतानाच्या नामकरण उत्सवाचा उपदेश देत असत, तेव्हा भोगभूमीवासी आपल्या संतानाचे नाव ठेवून व आशीर्वाद देऊन अल्प समय त्यांच्याबरोबर राहून आयुष्य क्षीण झाल्यानंतर विलीन होत होते.

नवव्या कुळकराच्या स्वर्गवासानंतर करोडो वर्षाचा समय व्यतित झाल्यावर 'अभिचंद्र' नावाचे दहावे कुळकर झाले. त्यांचे आयुष्य 'कुमुदांग' प्रमाण होते. शरीराची उंची सहाशे पंचवीस (६२५) धनुष्य आणि पत्नीचे नांव 'श्रीमती' होते. हे बालकांचे रडणे थांबविण्यासाठी उपदेश देत असत की तुम्ही लोक यांना रात्रीचा चंद्रमा दाखवून आनंदित करा, बोलणे शिकवा व प्रयत्नपूर्वक यांचे रक्षण करा. ह्यांच्या उपदेशाने भोगभूमी

निवासी आपल्या संतानाशी तसाच व्यवहार करत असत व आयुष्य संपल्यावर विलीन होत असत.

**ह्या कुळकरांची शासन व्यवस्था :** सीमंकर इत्यादि पाच कुळकर लोभाने प्रभावित झालेल्या ह्या युगलांना शिक्षित करण्याच्या प्रयोजनानी दंड देण्यासाठी 'हा हाय !' वाईट केले. 'मा' आता असे करू नका, असे नकरार्थी व निषेधसूचक ह्या दोन शब्दांचा उपयोग करीत असे. एवढ्या शब्दांनीच प्रजा अपराध करण्यापासून परावृत्त होत असे.

अभिचंद्र कुळकराच्या स्वर्गवासानंतर तितकाच समय व्यतित झाल्यावर 'चंद्राभ' नावाचे अकरावे कुळकर उत्पन्न झाले. त्यांचे आयुष्य 'नयुत' प्रमाण आणि शरीराची उंची सहाशे (६००) धनुष्य व पत्नीचे नाव 'प्रभावती' होते. ह्यांच्यासमयी अति थंडी, अति वर्षा, वादळ-वारा हे प्रकार सुरू झाले होते. भोगभूमीतील मनुष्य अति थंडीमुळे दुःखी होत होते. आकाशातील ढगांनी झाकलेल्या चंद्र, तारे इत्यादि नक्षत्र समूहांना पाहू शकत नव्हते. ह्यामुळे भयग्रस्त झालेल्या लोकांना चंद्राभ कुळकराने सांगितले की, 'भोगभूमीचा समय संपत आला आहे व कर्मभूमी जवळ आली आहे. आता ही थंडी सूर्यकिरणांच्या प्रभावाने नष्ट होईल.' हे ऐकल्यावर प्रजाजन सूर्यकिरणांद्वारा थंडी कमी करत आपल्या संतानासोबत काही दिवस जिवीत राहू लागले.

चंद्राभ कुळकराच्या मृत्यूनंतर योग्य समय व्यतित झाल्यावर 'मरुदेव' नावाचे बारावे कुळकर उत्पन्न झाले. ह्यांचे आयुष्य 'नयुतांग' वर्ष प्रमाण इतके आणि शरीराची उंची पाचशे पंच्याहत्तर (५७५) धनुष्य इतकी होती व पत्नीचे नाव 'सत्या' होते. ह्यांच्या वेळेला वीजयुक्त मेघ गर्जन करून वर्षा करू लागले होते. पूर्वी कुधीही न पाहिलेल्या गाळयुक्त, प्रचंड प्रवाही नद्या पाहून अत्यंत भयभीत झालेल्या भोगभूमीच्या लोकांना कुळकर काळांचे स्वरूप सांगतात, म्हणजेच काळाच्या प्रभावाने आता कर्मभूमी तुमच्या निकट आहे. आता तुम्ही लोक, नदीमध्ये नाव टाकून नावेच्या सहाय्याने नदी पार करा. पहाडावर पायऱ्या बनवून चढा आणि वर्षाऋतुमध्ये छत्री आदिचा उपयोग करा. ह्या कुळकराच्या उपदेशानुसार सर्वजण नदी ओलांडणे, पहाडावर चढणे, वर्षा इत्यादींपासून आपले संरक्षण करण्याच्या क्रिया शिकून पुत्र-पौत्रादिकांच्याबरोबर जीवन-यापन करू लागले.

ह्या समयाच्या पूर्वी[२] युगल संतान उत्पन्न होत असे परंतु ह्यानंतर युगला संतती उत्पन्न होऊ नये अशी इच्छा करून मरुदेवाने प्रसेनजित नावाच्या पुत्राला जन्म दिला. ह्याच्यापूर्वी भोगभूमीच्या मनुष्यांच्या शरीराला घाम येत नव्हता. परंतु प्रसेनजिताचे शरीर घामाच्या बिंदूंनी सुशोभित होते. वीर मरुदेव कुळकराने आपला पुत्र प्रसेनजिचा विवाह विधीनुसार उच्च कुळातिल कन्येबरोबर केला होता. शेवटी पल्याच्या करोडव्या वर्षा इतके आयुष्य व्यतित करून मरुदेव स्वर्गवासी झाले. त्यानंतर हे प्रसेनजित तेरावे कुळकर समजल्या गेले. ह्यांनी एक करोड पूर्व आयुष्य असलेले, संतानाच्या जन्मानंतर नाभी विच्छेदन करण्याची व्यवस्था करणाऱ्या 'नाभिराज' नावाच्या चौदाव्या कुळकराला जन्म दिला व स्वतः पल्याच्या दहालक्षकरोडव्या भागाइतके वर्ष जीवन जगून स्वर्गारोहण केले होते.

ह्या बाराव्या कुळकराच्या स्वर्गवासानंतर बराच काळ व्यतित झाल्यानंतर कर्मभूमीची स्थिती हळू-हळू जवळ येत होती, तेव्हा प्रसेनजित नावाचे तेरावे कुळकर उत्पन्न झाले. त्यांचे आयुष्य एक पूर्व वर्षाइतके आणि शरीराची उंची पाचशे पन्नास (५५०) धनुष्याइतकी होती. ह्यांच्या पत्नीचे नाव 'अभिमती' होते. ह्यांच्या वेळेस बालकांचा जन्म नाभीवेष्टन सहित होऊ लागला होता. हे काय आहे ह्या भीतीने व्याप्त सर्व मनुष्यांना ह्या कुळकराने नाभीवेष्टन दूर करण्याचा उपदेश दिला होता. त्यांच्या उपदेशाने भोगभूमीचे सर्व मनुष्य प्रयत्नपर्वूक ह्या शिशुंची रक्षा करू लागले होते.

ह्यांच्यानंतर 'नाभिराज' नावाचे चौदावे कुळकर उत्पन्न झाले होते. यांचे आयुष्य एक करोड वर्ष पूर्व

---

२. हरिवंश पुराण पृष्ठ १४४

इतके होते आणि शरीराची उंची पाचशे पंचवीस (५२५) धनुष्याइतकी होती आणि पत्नीचे नाव 'मरुदेवी' होते. ह्याच्या वेळेला बालकांची नाभी - नाळ अत्यंत लांब राहत असे, त्यामुळे नाभीराय कुळकराने त्याला कापण्याचा उपदेश दिला. भोगभूमीतील मनुष्य तसेच करू लागले. त्यावेळी कल्पवृक्ष नष्ट झाले होते, मेघ गरजू लागले होते, वर्षा होऊ लागली होती, पृथ्वीवर स्वभावताच उत्पन्न होणारे अनेक वनस्पती - कायिक औषधी, धान्य इत्यादि दिसू लागले होते. हळुहळू पेरणी न करताही सगळीकडे धान्य उत्पन्न होऊ लागले होते. त्यांचा उपयोग न समजल्यामुळे, कलल्पवृक्षांच्या नष्ट झाल्यामुळे भूकेने व्याकुळ झालेले सर्व प्रजाजन नाभीराय कुळकराला शरण गेले आणि सांगू लागले की हे देव ! मनोवांछित फळ देणाऱ्या कल्पवृक्षांच्या अभावाने अनाथ झालेले आम्ही लोक कशाप्रकारे जीवन यापन करावे ? हे जे वृक्ष शाखा, अंकुर - फळ इत्यादि उत्पन्न झालेले आहेत त्यातले कोणते खाण्याला योग्य आहे - आणि कोणते नाही ? याचा काय उपयोग आहे ? हे सर्व आम्हास सांगा. अशाप्रकारे दुःखाने पिडित शब्द ऐकून नाभीराज सांगतात की, "हे सज्जनो ! हे वृक्ष तुम्हाला योग्य आहे आणि हे विषवृक्ष त्याज्य करण्यायोग्य आहेत. तुम्ही लोक हे धान्य खा, गाईचे दूध काढून प्या ! हे ऊसाचे वृक्ष आहेत ते दातांनी सोलून वा यंत्राने पिळून त्याचा रस प्या !" ह्या प्रकारे नाभीराज महाराजांनी मनुष्यांना आजिविकेबद्दल अनेक उपाय सांगून सुखी केले आणि हत्तीच्या गंडस्थळावर मातीचा लेप लावून ताट इत्यादि अनेक प्रकारची भांडी बनवून त्या पुरुषांना दिली. त्यावेळी तेथील कल्पवृक्ष नष्ट झाले होते, प्रजाजनांचे हित करण्यासाठी केवळ नाभीरायच उत्पन्न झाले होते म्हणून ते कल्पवृक्षांसारखेच प्रजेचे हित करत होते.[३]

(कुळकरांचे वर्णन परिशिष्ट चार्ट क्रमांक - १ मध्ये पहा)

**चवदा कुळकर कुठून आले होते ?** प्रतिश्रुति पासून नाभीराय हे सर्व चवदा कुळकर आपल्या पूर्व भवांत विदेह क्षेत्रांमध्ये श्रेष्ठ कुळांत राजकुमार होते. त्यांनी त्या भवांत पुण्य वाढविणारे पात्रदान आणि व्रतांचे योग्य आचरण करून सम्यकदर्शन प्राप्त होण्याच्या पूर्वीच भोगभूमीमध्ये मनुष्य आयुचा बंध बांधून घेतला होता. त्यानंतर श्रीजिनेंद्र देवांच्या सान्निध्यात राहिल्याने क्षायिक सम्यकदर्शन आणि श्रुतज्ञान त्यांना प्राप्त झाले होते. ह्या परिणामामुळे आयुष्य संपून मरण पावल्यावर ते या भरतक्षेत्रात उत्पन्न झाले होते. ह्या चवदा कुळकरांपैकी कित्येक कुळकरांना पूर्व भवांचे जातीस्मरण आणि कित्येकांना अवधिज्ञान सुद्धा होते. म्हणून त्यांनी विचार करून प्रजेसाठी वर सांगितलेल्या काही कार्याबद्दल उपदेश दिला होता. हे प्रजेच्या जीवनाबद्दल आस्था बाळगत असल्यामुळे मनु, आर्यपुरुषांना कुटुंबाप्रमाणे एकत्र राहावयास सांगत असल्यामुळे 'कुळकर', अनेक वंश स्थापित केल्यामुळे, 'कुलधर' आणि युगाच्या प्रारंभी उत्पन्न झाल्यामुळे त्यांना 'युगादी पुरुष' अथवा 'युग पुरुष' सुद्धा म्हटले जात असे.

**शलाका पुरुष :** आता ह्यानंतर पुढे नाभीराज कुळकराच्या नंतर पुण्य उदयाने ह्या भरत क्षेत्रांमध्ये मनुष्यांत श्रेष्ठ आणि संपूर्ण लोकात प्रसिद्ध त्रेसष्ट शलाका पुरुष उत्पन्न होतात. हे शलाका पुरुष २४ तीर्थंकर, १२ चक्रवर्ती, ९ बलभद्र, ९ नारायण, ९ प्रतिनारायण ह्या नावाने प्रसिद्ध आहेत.

**चोवीस तीर्थंकर :** वृषभ, अजित, संभव, अभिनंदन, सुमति, पद्मप्रभ, सुपार्श्व, चंद्रप्रभ, पुष्पदंत, शीतल, श्रेयांस, वासूपूज्य, विमल, अनंत, धर्म, शांती, कुंथु, अरहनाथ, मल्लीनाथ, मुनिसुव्रत, नमिनाथ, नेमीनाथ,

---

३. तिलोयपण्यत्ति ग्रंथात कुळकरांचे आयुष्य पल्याचा दहावा भाग, पल्याचा शंभरावा भाग इ. सांगितला आहे आणि त्यांच्यातील अंतर सुद्धा पल्याचा ऐंशिवा भाग, पल्याचा आठशेवा भाग इत्यादि सांगितला आहे. महापुराणांत कुलकरांचे आयुष्यांत प्रथम कुळकराचे आयुष्य पल्याचा दहावा भाग आहे. त्यानंतरच्या कुळकरांचे आयुष्य 'अमम "अटट' इत्यादि प्रमाणांत दाखविलेली आहे आणि अंतर असंख्य करोड वर्षांनी, संख्यात वर्षांनी इत्यादिंनी दाखविले आहे. ह्या दोन्ही मतांना पुढे चार्ट मध्ये स्पष्ट केले आहे आणि अमम, अटट इत्यादिचे स्वरूप करणानुयोगांत दाखविले आहे.

पार्श्वनाथ आणि वर्धमान ह्या भरत क्षेत्रात उत्पन्न झालेल्या चोवीस तीर्थंकरानां नमस्कार असो. हे ज्ञानरूपी शस्त्राने भव्य जीवांच्या संसाररूपी वृक्षांचा छेद करतात.

**१२ चक्रवर्ती :** भरत, सगर, मधवा, सनत्कुमार, शांती, कुंथु, अरहनाथ, सुभौम, पद्म, हरीषेण, जयसेन आणि ब्रह्मदत्त हे सर्व सहा पृथ्वीवर विजयश्री प्राप्त करून सर्वत्र कीर्ती पताका लावणारे १२ चक्रवर्ती भरत क्षेत्रांत उत्पन्न झाले आहेत.

**९ बलभद्र :** विजय, अचल, सुधर्म, सुप्रभ, सुदर्शन, नंदी, नंदिमित्र, रामचंद्र आणि बलदेव हे सर्व भरतक्षेत्रातील नऊ बलभद्र आहेत.

**९ नारायण :** त्रिपुष्ट, द्विपुष्ट, स्वयंभू, पुरुषोत्तम, पुंडरिक, पुरुषसिंह, दत्त, लक्ष्मण, नारायण श्रीकृष्ण हे नऊ विष्णु पद धारक नारायण आहेत.

**९ प्रतिनारायण :** अश्वग्रीव, तारक, मेरक, मधुकेटभ, निशुंभ, बली, प्रहरण, रावण आणि जरासंध हे नऊ प्रतिनारायण झाले आहेत.

ह्या सर्वांना त्रेसष्ट शलाका पुरुष म्हणतात.

शेवटचे कुळकर महाराज नाभीराज यांची महाराणी मरुदेवी पासून भगवान् ऋषभदेवाचा जन्म झाला होता. हे ऋषभदेव पहिले तीर्थंकर व कुळकर सुद्धा मानले गेले होते. ह्याच प्रकारे ऋषभदेवांची राणी यशस्वितेने भरताला जन्म दिला होता. हे भरत महाराज चक्रवर्ति आणि कुळकर सुद्धा समजले जात. अशाप्रकारे हे १६ कुळकर सुद्धा समजल्या जात असे.

**ह्या कुळकरांची दंड व्यवस्था :** अकराव्या कुळकरापासून बाकी कुळकरांनी 'हा' 'मा' 'धिक' ह्या तीन दंडांची व्यवस्था केली होती. म्हणजेच 'खेद आहे' 'आता' 'असे करू नका' आणि 'तुमचा धिक्कार आहे, रोकल्यावर सुद्धा अपराध करताच.'

**भरतचक्रीचा दंड :** भरत चक्रवर्तीच्या वेळेस लोक अधिक अपराध करू लागले म्हणून त्यांनी वध, बांधणे, बेड्या लावणे, तुरूंगात टाकणे इत्यादि शारीरिक दंड देण्याची पद्धती चालू केली होती.

## प्रथम तीर्थंकर तृतीय काळात

जेव्हा तृतीय काळाचा चौऱ्यांशी लाख वर्ष पूर्व, तीन वर्ष साढे आठ महिने प्रमाण काळ बाकी राहिला होता तेव्हा अंतिम कुळकर महाराजा नाभीरायची महाराणी मरुदेवीने प्रथम तीर्थंकर भगवान् ऋषभदेवाला जन्म दिला. ऋषभदेवाने तारुण्यावस्थेत प्रवेश केला तेव्हा त्यांच्या वडिलांनी इंद्राच्या अनुमतीने ऋषभदेवाचा विवाह यशस्वती आणि सुनंदा नावाच्या दोन कन्यांबरोबर करून दिला. भगवान ऋषभदेवांना भरत, बाहुबली इत्यादि एकशे एक पुत्र आणि ब्राह्मी व सुंदरी नावाच्या दोन कन्या झाल्या. भगवंतांनी सर्वप्रथम ब्राह्मीला 'अ आ' इत्यादि लिपी आणि सुंदरीला 'एकं दहं' इत्यादि गणित विद्या शिकविली. यानंतर सर्व पुत्रांना सर्व विद्या, शास्त्रे आणि सर्व शस्त्र कलांमध्ये निष्णात केले.

प्रजाजनांना असि, मसि, कृषि इत्यादि आजिविकेचे सहा उपाय सांगितले म्हणून भगवानांना प्रजापती नाव मिळाले. त्यावेळेस विदेह क्षेत्रात जशी व्यवस्था होती तशीच व्यवस्था इथे सुद्धा स्थापन केली. क्षत्रिय, वैश्य, शूद्र नावाच्या तीन वर्णांची स्थापना केली. 'विवाह विधी' इत्यादिंचे प्रचलन चालू केले. अकम्पन 'इत्यादि चार महापुरुषांना राज्यव्यवस्था समजावून' महाराज या पदांवर नियुक्त केले. ह्या कारणाने ऋषभदेवाला आदिब्रह्मा, युगादिपुरुष, विधाता इत्यादि नावांनी संबोधिले जाऊ लागले. यानंतर ते मोक्षमार्गाची स्थिती सांगण्यासाठी मुनि झाले, त्यांचे अनुकरण करून त्यांच्या बरोबर चार हजार (४०००) राजे सुद्धा मुनि झाले. परंतु भूक-तहानेची

बाधा सहन न झाल्यामुळे व्याकूळ होऊन ते सर्वचे सर्व भ्रष्ट झाले. तेव्हा त्या सर्वांनी मिळून अनेक पाखंड मतांची स्थापना केली. काही दिवसानंतर सम्राट भरताने ब्राह्मण नावाचा आणखी एक वर्ण स्थापन केला.

भगवान् ऋषभदेवानंतर अजितनाथ इत्यादि महावीरापर्यंत चोवीस तीर्थंकर झाले आहेत.

या हुण्डावसर्पिणी काळाच्या दोषाने भगवान वृषभदेव तृतीय काळात झाले व बाकी तीर्थंकर चतुर्थ काळात झाले आहेत.

**चतुर्थकाळ प्रारंभ :** भगवान ऋषभदेव मोक्षाला जाऊन तीन वर्ष साडेआठ महिने व्यतित झाल्यावर दुःषमासुषमा नावाचा चतुर्थ काळ प्रारंभ झाला. या काळाच्या सुरुवातीला उत्कृष्ट आयु एक पूर्व कोटी, पृष्ठभागाची हाडे अठ्ठेचाळीस (४८) आणि शरीराची उंची पाचशे पंचवीस धनुष्य प्रमाण होती. हा चतुर्थ काळ एक कोडा-कोडी सागर प्रमाणात बेचाळीस हजार वर्ष कमी समयाचा आहे.

भगवान् ऋषभदेवांच्या मोक्षानंतर पन्नास लाख करोड सागर प्रमाण काळ व्यतित झाल्यानंतर अजितनाथ तीर्थंकरांनी मोक्षपद प्राप्त केले.

अजितनाथ तीर्थंकर मोक्षास गेल्यानंतर तीस लाख करोड सागर प्रमाण काळ व्यतित झाल्यानंतर संभवनाथ तीर्थंकर सिद्ध झाले.

यानंतर दहा लाख करोड सागर प्रमाण काळ व्यतित झाल्यानंतर अभिनंदननाथ तीर्थंकर सिद्ध झाले.

यानंतर नऊलाख करोड सागर प्रमाण काळानंतर सुमतिनाथ भगवान् सिद्ध झाले.

यानंतर नव्वद हजार करोड सागर प्रमाण काळ संपल्यानंतर पद्मप्रभ जिन सिद्धीला प्राप्त झाले.

यानंतर नऊ हजार करोड सागर प्रमाण काळ संपल्यावर सुपार्श्वनाथ भगवान मोक्षास गेले.

यानंतर नऊशे करोड सागर प्रमाण काळ संपल्यावर चंद्रप्रभ देव मोक्षास गेले.

यानंतर नव्वद करोड सागर प्रमाण काळ व्यतित झाल्यानंतर पुष्पदंतनाथ जिनसिद्ध झाले.

यानंतर नऊ करोड सागर प्रमाण काळ व्यतित झाल्यानंतर शीतलनाथ भगवान सिद्ध झाले.

यानंतर एक करोड सागराला सहासष्ट लाख सव्वीस हजार शंभर सागर कमी म्हणजेच, तेहतीस लाख त्रेहत्तर हजार नऊशे सागर प्रमाण काळ व्यतित झाल्यावर श्रेयांसनाथ भगवान मोक्षाला गेले.

यानंतर चौपन सागर प्रमाण काळ संपल्यावर वासुपूज्य भगवान मोक्षास गेले.

यानंतर तीस सागर प्रमाण काळ व्यतित झाल्यानंतर विमलनाथ मुक्त झाले.

यानंतर नऊ सागर प्रमाण काळ व्यतित झाल्यानंतर अनंतनाथ सिद्ध झाले.

यानंतर चार सागर काळ संपल्यानंतर धर्मनाथ तीर्थंकर झाले.

यानंतर तीन सागर काळांत पाऊण पल्य कमी काळ संपल्यावर शांतिनाथ भगवान सिद्ध झाले.

यानंतर अर्ध पल्य काळ संपल्यावर कुंथुनाथ तीर्थंकर सिद्ध झाले.

यानंतर पाव पल्य काळास एक करोड वर्ष कमी काळ संपल्यानंतर अरहनाथ भगवान सिद्ध झाले.

यानंतर एक हजार करोड वर्षानंतर मल्लीनाथ जिनसिद्ध झाले.

यानंतर चौपन लाख वर्षाचा काळ गेल्यानंतर मुनीसुव्रतनाथ सिद्ध झाले.

यानंतर सहा लाख वर्ष काळ संपल्यावर नमिनाथ तीर्थंकर झाले.

यानंतर पांच लाख वर्षाचा काळ संपल्यावर नेमीनाथ सिद्ध झाले.

यानंतर त्रेयांशी हजार सातशे पन्नास (८३७५०) वर्षानंतर पार्श्वनाथ तीर्थंकर सिद्ध झाले.

यानंतर दोनशे पन्नास (२५०) वर्षाचा काळ संपल्यानंतर महावीर भगवान सिद्ध झाले. त्यावेळी पंचम काळांस तीन वर्ष साडेआठ महिने बाकी होते.

**धर्मतीर्थाच्या ऱ्हासाचा काळ :** पुष्पदंताला प्रारंभ समजून धर्मनाथापर्यंतच्या सात तीर्थंकरांच्या काळांत धर्मप्रभावाचा ऱ्हास (अभाव) होऊ लागला होता. तथा शेष सोळा तीर्थंकरच्या काळांत धर्मतीर्थाची परंपरा निरंतर प्रभावाने चालली होती.

पुष्पदंताच्या काळात पाव (१÷४) पल्य समयांत धर्माचा अभाव राहिला होता, म्हणजेच त्या समयी धार्मिक दीक्षा घेणाऱ्यांचा अभाव झाल्याने धर्मरुपी सूर्याचा अस्त झाला होता. ह्याचप्रकारे शीतलनाथाच्या वेळेला अर्ध पल्यापर्यंत, श्रेयासंनाथाच्या वेळेला पाऊण पल्यापर्यंत, वासुपूज्य देवाच्या वेळी एक पल्यापर्यंत, विमलनाथ देवाच्या वेळेस पाऊण पल्यापर्यंत आणि धर्मनाथाच्या वेळेस पाव पल्यापर्यंत धर्मतीर्थाचा अभाव राहिला होता.

हुंडावसर्पीणीच्या काळ दोष्यामुळे ह्याठिकाणी सात धर्मतीर्थाचे विभाजन झाले होते.

**पंचम काळ :** महावीर भगवान मोक्षाला गेल्यानंतर तीन वर्ष आठ महिने आणि एक पक्ष काळ व्यतित झाल्यानंतर दुःषमा नावाचा पंचम काळ प्रारंभ झाला. ह्या पंचम काळाच्या प्रारंभिक समयात मनुष्यांची उत्कृष्ट आयु १२० वर्ष, उंची सात (७) हाथ आणि पाठीमध्ये २४ हाडे असतात.

## धर्मतीर्थ परंपरा

**केवली :** ज्यादिवशी महावीर भगवान सिद्ध झाले त्याच दिवशी गौतम गणधराला केवलज्ञानाची प्राप्ती झाली आणि गौतम गणधर सिद्ध झाल्यानंतर लगेच त्याच दिवशी श्रीसुधर्मस्वामी केवली झाले. सुधर्मस्वामीच्या मुक्तिनंतर जंबूस्वामी केवली झाले व जंबूस्वामी सिद्ध झाल्यानंतर पुन्हा कोन्ही अनुबद्ध केवली राहले नाही.

गौतमस्वामीच्या केवलज्ञानापासून जंबूस्वामीच्या मोक्षप्रयाणा पर्यंतचा काळ ६२ वर्ष प्रमाण समजला आहे.

केवलज्ञानीयांच्या मध्ये अंतिम 'श्रीधर' केवली कुंडलगिरीवरून सिद्ध झाले. चारण ऋषीमध्ये अंतिम 'सुपार्श्वचंद्र' नावाचे ऋषी झाले. प्रज्ञाश्रमणांमध्ये शेवटचे 'वज्रयश' आणि अवधीज्ञानीयांच्या मध्ये 'श्री' नावाचे ऋषी झाले आहे. मुकुटधर राजांमध्ये शेवटी चंद्रगुप्ताने जिनदीक्षा धारण केली. ह्यानंतर मुकुटधारी राजांमध्ये कोणीही दीक्षा घेतली नाही.

**श्रुतकेवली :** जंबूस्वामीनंतर नंदी, नंदीमित्र, अपराजित, गोवर्धन आणि भद्रबाहुमुनि हे पांचही चवदापूर्व ह्या नावाने प्रख्यात बारा अंगाचे धारक पूर्ण श्रुतज्ञानी क्रुतकेवली महावीर स्वामींच्या तीर्थात झाले आहेत. ह्या पांचही जणांना मिळून शंभर वर्षांचा काळ प्रमाण मानला आहे.

**दहापूर्व धारी :** विशाखाचार्य, प्रोष्ठील, क्षत्रिय, जय, नागसेन, सिद्धार्थ, धृतिषेण, विजय, बुद्धील, गंगदेव आणि धर्मसेन हे अकरामुनि अनुक्रमाने अकरा अंग आणि दशपूर्वाला धारण करणारे 'दशपूर्वी' म्हटल्या गेले आहे. परंपरेनुसार या सर्वांचा मिळून एकशे त्रेयांशी (१८३) वर्षाचा काळ मानला आहे. ह्यानंतर काळदोषाला अनुसरून पुन्हा दहापूर्वधारी मुनिरूपी सूर्य झाले नाहीत.

**अकरा अंगधारी :** नक्षत्रमुनि, जयपाल, पांडु, ध्रुवसेन आणि कंसार्य हे पांच मुनि अकरा अंगाचे धारक झाले आहेत. ह्या सर्वांचा काळ दोनशे वीस (२२०) वर्ष इतका आहे. ह्यानंतर पुन्हा कोणीही अकरा अंगधारी मुनि झाले नाहीत.

**आचारांगधारी मुनि :** सुभद्र, यशोभद्र, यशोबाहु आणि लोहार्य हे चार आचार्य आचारांगाला धारण करणारे झाले आहेत. ह्यांचा काळ एकशे अठरा (११८) वर्ष इतका आहे. ह्यांच्या स्वर्गवासानंतर भरत क्षेत्रांत पुन्हा कोणीही अंग आणि पूर्वश्रुताला धारण करणारे झाले नाहीत. गौतमस्वामी पासून इथपर्यंतचा काळ सहाशे त्रेयांशी (६८३) वर्ष होतो.

६२+१००+१८३+२२०+११८=६८३

वर वर्णित आचार्यांनंतर बाकी आचार्य अकरा अंग आणि चवदा पूर्वापैकी फक्त एका अंगाला धारण करणारे झाले आहेत.

**पंचम काळाच्या शेवट पर्यंत धर्मतीर्थाचे स्वरूप :** जे श्रुतज्ञान धर्मतीर्थाच्या प्रवर्तनाला कारणीभूत आहे ते वीसहजार तीनशे वर्ष चालत राहील, त्यानंतर काळ दोषाला अनुरूप ऱ्हासाला प्राप्त होईल. जर पंचम काळ एकवीस हजार (२१,०००) वर्ष प्रमाण इतका आहे व त्यातून वर वर्णन केलेली ६८३ वर्ष कमी केले तर राहिलेल्या काळांपर्यंत जैनधर्म चालत राहील.

२१,००० - ६८३ = २०,३१७

ह्या बाकी राहिलेल्या वेळेत चारवर्णयुक्त समाज जन्म घेत राहील. ह्या काळात लोक सामान्यतः अविनयी, दुर्बुद्धी, मत्सरी, सात भय आणि आठ मदांनी युक्त दुःखी आणि गर्विष्ठ, कलहप्रिय, रागिष्ट, क्रुर आणि क्रोधी राहतील.

**राज्यपरंपरा** ज्यावेळी महावीर भगवानाला मोक्ष प्राप्त झाला. त्याचवेळेला 'पालक' नावाच्या अवंतिपुत्राचा राज्याभिषेक झाला. पालकाने ६० वर्ष पर्यंत राज्य केले. त्यानंतर ५५ वर्षापर्यंत विजय वंशाने, ४० वर्षापर्यंत मरुंड वंशाने, ३० वर्षापर्यंत पुष्पमित्राने, ह्यानंतर ६० वर्षापर्यंत वसुमित्र अग्निमित्राने, १०० वर्षापर्यंत नरवाहनाने, २४२ वर्षापर्यंत भृत्य-आंध्राने व पुन्हा २२१ वर्ष गुप्तवंश राजांचे राज्य राहिले आहे.

**कल्कीचा जन्म व कार्य :** यानंतर इंद्र नावाच्या राजाचा पुत्र कल्की उत्पन्न झाला. त्याचे नाव चतुर्मुख, आयुष्य सत्तर वर्ष आणि राज्यकाळ बेचाळीस वर्ष प्रमाण राहिला आहे. महावीर निर्वाण काळापासून कल्की पर्यंतचा काळ एक हजार वर्षाचा होतो.

६०+१५५+४०+३०+६०+१००+४०+२४२+२३१+४२=१०००

आचारांगधर आचार्यानंतर दोनशे पंच्याहत्तर वर्ष काळ व्यतित झाल्यानंतर कल्की राजाला सिंहासनारूढ केले होते.

६८३+२७५+४२ = १००० वर्ष

श्री महावीर निर्वाणानंतर सहाशे पांच वर्ष आणि पांच महिने काळ संपल्यावर 'विक्रम' नावाचा शक राजा झाला. त्याच्यानंतर तीनशे चौऱ्याण्णव वर्ष सात महिने काळ व्यतित झाल्यानंतर प्रथम कल्की उत्पन्न झाला होता.

यानंतर तो कल्की प्रयत्नपूर्वक आपल्या उद्देशासाठी जनपदाचा उपयोग करून लोभ व अन्यायपूर्वक मुनिंच्या आहारातील प्रथम ग्रास शुल्क रूपाने मागू लागला. तेव्हा श्रमण मुनि अग्र ग्रास देवून 'हा अंतरायाचा काळ आहे' असे समजून निराहार जात होते. त्यावेळी त्यांच्यामध्ये कोण्या एका मुनीस अवधिज्ञान प्राप्त होते. यानंतर कोणी असुरदेव अवधिज्ञानाने मुनिगणांवर उपसर्ग आलेला आहे असे समजून आणि धर्मद्रोही समजून कल्कीचा वध करतो. त्यावेळी अजितंजय नावाचा त्या कल्कीचा पुत्र 'रक्षण करा' असे म्हणत त्या देवांना नमस्कार करतो. तेव्हा तो असुरदेव 'धर्मपूर्वक राज्य करा !' असे म्हणून त्यांची रक्षा करतो. ह्यानंतर दोन वर्ष पर्यंत खरा धर्म प्रभाव राहतो व पुन्हा काळाच्या अनुरूप धर्मप्रवृत्ती क्षीण-क्षीण होत जाते.

ह्याप्रकारे एक हजार वर्षांच्या पश्चात अलग-अलग एक-एक कल्की व पाचशे वर्षानंतर एक-एक उपकल्की होतो. प्रत्येक कल्कीच्या काळात दुःषमा काळातील एक-एक साधूला अवधिज्ञान प्राप्त होते व त्यावेळेस चारवर्णसंघ सुद्धा लहान-लहान होत जातात. त्यावेळी पूर्व जन्मी केलेल्या पापाच्या उदयाने चांडाळ, शबर, श्वपच, किराट इत्यादि आणि दीन, अनाथ, क्रुर आणि विभिन्न प्रकारच्या व्याधि-वेदनांनी युक्त, हातांत नरवाटी आणि भिक्षापात्र घेतलेले आणि देश सोडून जाण्याच्या भीतीने युक्त पुष्कळ मनुष्य दिसावयांस लागले

असतात.

**शेवटच्या कल्कीचा जन्म आणि कार्य :** ह्याप्रकारे दुःषमा काळात धर्म, आयुष्य आणि उंची कमी-कमी होत जात असते. त्यानंतर शेवटी विरोधी स्वभावाचा एकवीसावा कल्की जन्म घेतो. त्यांच्या वेळेस 'विरागंज' नावाचे मुनि, 'सर्वश्री' नावाची आर्यिका आणि 'अग्निमित्र आणि पंगुश्री' नावाचे श्रावक-श्राविका होतील. तो कल्की आपल्या आज्ञेने सर्व जनपदांना आपल्या प्रभावांत करून मंत्र्यांना विचारतो की असा कोणी पुरुष तर नाही की जो माझ्या म्हणण्याप्रमाणे कार्य करत नाही. तेव्हा मंत्री निवेदन करतो की हे स्वामी ! एक मुनि आपल्या म्हणण्याप्रमाणे कार्य करीत नाही ? तेव्हा कल्की म्हणतो की सांगा ! तो अविनयी मुनि कोण आहे ? ह्या प्रश्नाला तो मंत्री उत्तर देतो की हे स्वामी ! संपूर्ण अहिंसा व्रताला धारण करणारा तो मुनि परिग्रह रहित आहे आणि शरीराच्या आवश्यकतेनुसार श्रावकांच्या घरी मध्यान्ह काळात आपल्या हातात अंतराय विरहित प्रासुक आहार फक्त ग्रहण करत असतो. ह्या प्रकारच्या वचनाला ऐकून तो कल्की म्हणतो की - तो अहिंसा व्रतधारी पापी कोठे जातो याचा तुम्ही स्वतः शोध करा आणि त्याच्या प्रथम ग्रासाला कर रूपाने प्राप्त करा.

त्यानंतर पहिलाच ग्रास मागितला गेल्यामुळे ते मुनिराज तत्काल त्याला तो देवून अंतराय समजून वापस जातात. त्याच क्षणाला त्यांना अवधिज्ञान प्राप्त होते. त्यावेळी ते मुनि सर्वश्री आर्यीका, अग्निदत्त श्रावक व पंगुश्री श्राविकेला बोलावून प्रसन्नचित्त होऊन सांगतो की आता दुःषमा काळाचा अंत जवळ आला आहे आणि आपले आयुष्य केवळ तीन दिवसाचे शिल्लक राहिले आहे. आणि हा कल्की सुद्धा शेवटचा आहे. तेव्हा ते चारही जण चार प्रकारचे आहार आणि परिग्रह इत्यादिचा आजन्म त्याग करून संन्यास ग्रहण करतात.

ते सर्व कार्तिक महिन्याच्या अमावस्येच्या दिवशी सूर्याचा स्वामी नक्षत्रांत उदय झाल्यानंतर संन्यास ग्रहण करून समाधीमरणाला प्राप्त करतात.

समाधीमरणाच्या नंतर वीरागंज मुनी एक सागर वर्षाचे आयुष्य घेऊन सौधर्म स्वर्गात जन्म घेतात तथा ते तीघेही सुद्धा एक पल्यापेक्षा थोडी अधिक आयु घेऊन त्याच स्वर्गात जन्म घेतात.

त्याच दिवशी दुपारी क्रोधवश होऊन कोणी असुरकुमार जातीचा उत्कृष्ट देव कल्की राजाचा वध करतो आणि सूर्यास्ताच्या वेळेस अग्नि नष्ट होतो.

ह्या प्रकारे एकवीस कल्की आणि तितकेच उपकल्की धर्म विरोधाने युक्त होऊन एक सागर वर्ष पर्यंत ह्या धर्मा पृथ्वीवर जन्म घेतात.

**अतिदुःषमा नावाचा सहावा काळ :** वरील घटनेनंतर तीन वर्ष आठ महिने आणि एक पक्ष काळ संपल्यावर महा विषम दुःषमादुःषमा नावाचा सहावा काळ प्रारंभ होतो. त्याच्या प्रारंभीक काळात शरीराची उंची तीन अथवा साडेतीन हाथ, पाठीचे हाड बारा आणि उत्कृष्ट आयुष्य वीस वर्ष प्रमाण असेल. त्या काळात सर्व मनुष्यांचा आहार मूळ, फळ आणि मांसळी इत्यादि असेल. त्यावेळी मनुष्यांना वस्त्र, वृक्ष आणि घर इत्यादि उपलब्ध राहणार नसल्यामुळे सर्व मनुष्य नग्न आणि भवनरहित असल्यामुळे वनांत फिरणारे व काळसर रंगाचे, पशुप्रमाणे आचरण करणारे, क्रुर, गुंगे-बहिरे, आंधळे-काने, मूके, दरिद्री, क्रोधी, गरीब, कुरूप, अति नीच जातीच्या शरीर संपदा सहित कुबडे, ठेंगु, अनेक प्रकारच्या रोगांनी व वेदनांनी जर्जर, अतिशय कषायी, मोही, रागीष्ट स्वभावामुळे पापी, स्वपरिवार रहित, बिना मित्रांचे, पुत्र व स्त्रीया रहित, दुर्गंध युक्तशरीर सहित आणि उवा-लिखां इत्यादि युक्त केसांना धारण करणारे महामूर्ख होतील.

ह्या काळात नरक आणि तिर्यंच गतितून येणारे जीवच जन्म घेतात आणि येथे मरण पावून ते अत्यंत घोर नरकांत व तिर्यंच गतिमध्येच जन्म घेतात. दिवसें-दिवस त्यांची उंची, आयुष्य आणि शक्ती इत्यादि कमी-कमी होत जाते. ह्यांच्या दुःखांना शब्दाने वर्णन करण्याचे सामर्थ्य कोण करू शकेल !

**प्रलय काळ :** ह्या सहाव्या काळांत एकवीस हजार (२१०००) वर्षाचा काळ पूर्ण होण्यामध्ये जेव्हा एकोणपन्नास (४९) दिवस कमी राहिले असतात तेव्हा जीवांचा भयप्रद घोर प्रलयकाळ प्रारंभ होतो ह्यावेळेस भीषण वादळ येते जे सात दिवस पर्यंत वृक्ष, पर्वत आणि शिला-पाषाण इत्यादि सर्वांना चूर-चूर करून टाकते. वृक्ष आणि पर्वतांच्या नष्ट झाल्यामुळे मनुष्य आणि तिर्यंचांना अतोनात दुःख होते आणि वस्त्र आणि आश्रयस्थानाची इच्छा करीत अत्यंत करूण क्रंदन करतात.

ह्यावेळेला वेगळ्या-वेगळ्या संख्येने एकंदर ७२ युगल गंगा-सिंधुच्या पठारांत आणि विजयार्ध पर्वताच्या वनक्षेत्रात प्रवेश करतात. ह्या शिवाय देव आणि विद्याधर दयावान होऊन मनुष्य आणि तिर्यंचामध्ये अनेक जीवांना नेऊन त्या प्रदेशात सुरक्षा प्रदान करतात.

**सात प्रकारची वर्षा :** सहाव्या काळाच्या शेवटी मेघांचे समूह सात प्रकारच्या निकृष्ट वस्तूंची वर्षा सात-सात दिवसपर्यंत करतात ज्यांचे नाव (१) अत्यंत थंड पाणी (हिमवर्षा), (२) खारे पाणी, (३) विष, (४) धूर (५) धूळ, (६) कठोर पाषाण (७) अति असहनिय ज्वलनशील पदार्थ. ह्याप्रकारे सात रूपांत परिणत झालेल्या सात पुद्गलांची वर्षा प्रत्येकी सात-सात दिवसाप्रमाणे एकूण एकोणपन्नास दिवस पर्यंत चालते.

ह्या वर्षाच्या प्रभावाने शिल्लक राहिलेले मनुष्य इत्यादि सुद्धा नष्ट होऊन जातात. विष आणि अग्निच्या वृष्टीमुळे जळलेली पृथ्वी एक योजन खोल पर्यंत नष्ट होऊन जाते.[४]

ह्याप्रकारे भरतक्षेत्रामध्ये आर्यखंडात चित्रा पृथ्वीच्या पृष्ठभागावरील एकयोजन उपजाऊं जमीन जळून नष्ट होऊन जाते. पाषाण आणि महाअग्निच्या दबावाने आर्यखंडाची उन्नत जमीन आपल्या पूर्ववर्ती स्वभावाला सोडून लोकांतापर्यंत धसून जाते त्यावेळी आर्य खंडाची भूमी बाकी भूमींच्या समान कांतीपूर्ण, धूळ आणि चिखल रहित आरश्यासारखी स्वच्छ होऊन जाते. त्याठिकाणी उपस्थित (विजयार्धाच्या गुफा इत्यादिमध्ये सुरक्षित राहिलेले व शिल्लक राहिलेले) मनुष्याची उंची एक हाथ, आयुष्य १६ अथवा १५ वर्ष प्रमाण आणि शक्ती इत्यादि सुद्धा त्याचप्रमाणे असते.

इथपर्यंत अवसर्पिणी काळाच्या ६ भागांचे वर्णन केले आहे.

**वर्तमान काळ :** येथे भरतक्षेत्राच्या आर्यखंडात ह्यावेळी पंचम काळ चालू आहे. शेवटचे तीर्थंकर महावीर स्वामींना मोक्षाला जाऊन २५०० वर्ष पूर्ण झाले आहे. अजून साडे अठरा हजार वर्ष व्यतित होतील. त्यानंतर सहावा काळ येईल असे समजावे.

**उत्सर्पीणी काळातील सहा काळांचे परिवर्तन :** ह्यानंतर उत्सर्पिणी नावाचा सुखकारक काळ प्रारंभ होतो. यांच्या सहा भेदामध्ये प्रथम अतिदुःषमा, द्वितीय दुःषमा, तृतीय दुःषमा सुषमा, चतुर्थ सुषमा दुःषमा, पंचम सुषमा आणि सहावा सर्वजनप्रिय अतिसुषमा असे सहा काळ होतात. हा काळ सुद्धा अवसर्पिणी काळाप्रमाणे १० कोडा-कोडी सागर इतका राहील. ह्या काळात जीवांची उंची, आयुष्य, शक्ति इत्यादि दिवसेंदिवस वाढत जाईल.

**दुःषमा दुःषमा काळ :** उत्सर्पिणी काळाच्या प्रारंभात पुष्कर मेघ सात दिवस पर्यंत सुख उत्पन्नकारी जलाची वर्षा करतात. ज्यांच्यामुळे अग्नि आणि पाषाणामुळे जळून गेलेली संपूर्ण पृथ्वी शांत होऊन जाते. क्षीर मेघ सात दिवस पर्यंत दुधासारख्या पाण्याची वर्षा करतात. ज्यामुळे ही पृथ्वी क्षीर जलाने व्याप्त होऊन दुधासारखीच उत्तम कांतीयुक्त होते. ह्यानंतर सात दिवस पर्यंत अमृत मेघ अमृताची वर्षा करतात ज्यामुळे ओल्या झालेल्या जमिनीवर वेली, वृक्ष इत्यादि उगवण्यास प्रारंभ होतो. ह्यानंतर रस मेघ सात दिवस पर्यंत दिव्य रसांची वर्षा करतात ज्यांच्या प्रभावाने सर्व वृक्ष आणि वेली दिव्य रसाने परिपूर्ण होतात. त्यावेळी विभिन्न रसाने

४. तेलोयपण्णति अ. ४, गाथा १५५१

परिपूर्ण तथा औषधी रसाने पूर्ण समृद्ध भूमी आपल्या मूळ स्वभावात येते.

यानंतर मनमोहक शांत सुवासाला प्राप्त करून ते मनुष्य आणि तिर्यंच गुफांमधून बाहेर येतात. त्यावेळी ते मनुष्य आणि तिर्यंच नग्न राहून पशु सारखेच आचरण करीत, भुकेने व्याकुळ होऊन वनप्रदशांतील झाडांचे फळ, मूळ, पानं इत्यादि खात असतात. त्या काळातील पहिल्या भागांमध्ये आयुष्य १५ अथवा १६ वर्ष, उंची एक हाथ प्रमाण राहते. यापुढे आयुष्य वाढत जाते. आयुष्य, तेज, बुद्धी, शक्ती-बाहुबल, देहाची उंची, क्षमा तथा धैर्य इत्यादि काळाच्या स्वभावानुसार उत्तरोत्तर वाढत जाते. याप्रकारे एकवीस हजार वर्ष गेल्यानंतर भरत क्षेत्रांत अतिदुःक्षमा नावाचा काळ पूर्ण होतो.

**दुःषमा काळ :** जेव्हा दुःषमा नावाचा द्वितीय काळ प्रारंभ होतो त्या काळात मनुष्य, तिर्यंच्याचा आहार वीस हजार वर्ष पर्यंत पूर्वीसारखाच राहतो. या काळात प्रारंभिक दिवसांत उत्कृष्ट आयुष्य २० वर्ष व उंची तीन हाथ या साडे तीन हाथ प्रमाण राहते.

**कुळकरांची उत्पत्ती :** या काळांत एक हजार वर्ष शिल्लक राहिल्यानंतर भरतक्षेत्रांमध्ये चवदा कुळकरांची उत्पत्ती होऊ लागेल. त्या कुळकरांची नावे क्रमाने -

कनक, कनकप्रभ, कनकराज, कनकध्वज, कनकपुंगव, नलिन, नलिनप्रभ, नलिनराज, नलिनपुंगव, पद्मप्रभ, पद्मराज, पद्मध्वज आणि पद्मपुंगव हे होतील. प्रथम कुळकराची उंची सात हात राहील.

ह्यावेळेस अनेक प्रकारच्या औषधी राहून सुद्धा श्रेष्ठ अग्नी राहणार नाही. तेव्हा हे कुळकर विनयवान मनुष्यांना उपदेश देतात की, घर्षण करून अग्नि उत्पन्न करा व त्या अग्निवर अन्न शिजवा. तसेच विवाह करून बंधू-बांधवा बरोबर इच्छानुसार सुखाचा उपभोग घ्या. ज्यांना हे कुळकर असा उपदेश देतात ते अत्यंत म्लेच्छासारखे असतात. इथे विशेष म्हणजे शेवटचे कुळकर पद्मपुंगवाच्या वेळेपासूनच विवाहविधि प्रचलित झाली होती.

**दुःषमासुषमा काळ :** ह्यानंतर दुःषमासुषमा नावाचा तृतीय काळ प्रवेश करतो. या काळाच्या प्रारंभी मनुष्याची उंची सात हात आणि आयुष्य एकशे वीस वर्ष प्रमाण राहते. ह्यावेळी पाठीची हाडं चोवीस राहतात तथा मनुष्यांच्या शरीराचा वर्ण पांच रंगाचा असून ते मर्यादा, विनय, लज्जाशील, संतुष्ट व संपन्न राहतात.

या काळात चौवीस तीर्थंकर होतात. प्रथम तीर्थकर अंतीम कुलकराचा पुत्र राहतो. यावेळेपासून येथे विदेह क्षेत्रासारखी स्थिती अथवा अवसर्पिणीच्या चतुर्थ काळासारखी वृत्ती व्हावयास लागते.

## भविष्य काळाचे चोवीस तीर्थंकर

महापद्म, सुरदेव, सुपार्श्व, स्वयंप्रभ, सर्वप्रभ, देवसुत, कुलसुत, उदंक, प्रोष्ठिल, जयकीर्ती, मुनिसुव्रत, अपार, अपाप, निष्कषाय, विपुल, निर्मल, चित्रगुप्त, समाधिगुप्त, स्वयंभु, अनिवृत्ति, जय, विमल, देवपाल आणि अनंतवीर्य हे चोवीस तीर्थंकर होतील. यातील पहिल्या तीर्थंकराची उंची सात हात, आयुष्य एकशे सोळा वर्ष, तथा शेवटच्या तीर्थंकराची उंची पाचशे धनुष्य आणि आयुष्य एक पूर्व कोटी वर्ष प्रमाण होईल.

**भविष्यत् तीर्थंकरांच्या पूर्व तीसऱ्या भवांतील नांवे :** हे तीर्थंकर ज्या तिनही लोकांना शोभीत करणाऱ्या तीर्थंकर नामकर्माचा बंध करतात त्यांचे त्यावेळी असलेले नांव ह्याप्रकारे आहेत :-

श्रेणीक, सुपार्श्व, उदंक, प्रोष्ठिल, कृतसुय, क्षत्रीय, पाविल, शंख, नंद, सुनंद, शशांक, सेवक, प्रेमक, अतोरज, रैवत, कृष्ण, बलराम, भगलि, विगली, द्विपायन, माणवक, नारद, सुरुपदंत आणि अंतिम सात्यकिपुत्र (रुद्र). हे सर्व राजघराण्यांत जन्मलेले होते.

**भविष्य काळाचे बारा चक्रवर्ती :** भविष्य काळांमध्ये तीर्थंकरांच्या वेळेस जे बारा चक्रवर्ती होतील त्यांची

नांवे - भरत, दीर्घदंत, मुक्तदंत, श्रीषेण, श्रीभूति, श्रीकांत, पद्म, महापद्म, चित्रवाहन, विमलवाहन आणि अरिष्टसेन.

**भविष्य काळाचे नऊ बलभद्र :** चंद्र, महाचंद्र, चंद्रधर, वरचंद्र, सिंहचंद्र, हरिचंद्र, श्रीचंद्र, पूर्णचंद्र आणि सुचंद्र. हे पूर्व भवांत पापाचा बंध न झाल्यामुळे पुण्याच्या उदयाने नऊ बलभद्र होतात.

**भविष्य काळाचे नऊ नारायण :** नंदी, नंदीमित्र, नंदिभूति, नंदीषेण, बल, महाबल, अतिबल, त्रिपृष्ठ आणि द्विपृष्ठ हे नऊ नारायण बलभद्रांचे अनुज होतील.

**भविष्य काळाचे नऊ प्रतिनारायण :** श्रीकंठ, हरिकंठ, नीलकंठ, अश्वकंठ, सुकंठ, शिखिकंठ, अश्वग्रीव, हयग्रीव आणि मयुरग्रीव हे नऊ प्रतिनारायण नारायणांचे प्रतिशत्रु होतील.

हे त्रेसष्ट शलाका पुरुष कोडा-कोडी सागर प्रमाणांत बेचाळीस हजार वर्ष कमी अशा तिसऱ्या काळात क्रमाने उत्पन्न होतील. ह्या काळाच्या शेवटी मनुष्याचे आयुष्य एक कोटी प्रमाण, उंची पाचशे पंचवीस धनुष्य आणि पाठीची हाडे चौसष्ट राहतील. या काळातील पुरुष व स्त्रियां देव तथा अप्सरा सारख्या होतील.

**सुषमा दु:षमा काळ :** या नंतर सुषमा दु:षमा नावाचा चतुर्थ काल प्रारंभ होतो. या काळाच्या सुरवातीला मनुष्याचे आयुष्य एक पूर्व कोटी वर्ष प्रमाण व मनुष्याची उंची पांचशे धनुष्य प्रमाण राहते. पुन्हा क्रमाने आयुष्य व उंची आणि शक्ति वाढत जाते. या काळांत कल्पवृक्षांची उत्पत्ती होऊन जाते.

यावेळी पृथ्वीला जघन्य भोगभूमी म्हटल्या जाते. या काळाच्या शेवटी मनुष्याचे आयुष्य एक पल्य प्रमाण होते, उंची एक कोस, आणि मनुष्याचा रंग प्रियंगु फळा सारखा (शाम) राहतो. कल्पवृक्षांपासून भोग सामग्री प्राप्त होते. या भोगभूमीचे वर्णन अवसर्पिणी काळाच्या वर्णनामध्ये केल्या गेले आहे. हा काळ दोन कोडा-कोडी सागर प्रमाण असतो.

**सुषमा काळ :** या नंतर सुषमा नावाचा पांचवा काळ प्रारंभ होतो. या काळाच्या प्रारंभी मनुष्य आणि तिर्यंचाचे आयुष्य इत्यादि मध्यम भोगभूमी सारखेच राहते. अर्थात एक पल्य पासून दोन पल्यापर्यंत आयुष्य आणि एक कोसापासून क्रमाने दोन कोसापर्यंत शरीराची उंची वाढत जाते. येथील मनुष्य व स्त्रीयां पूर्ण चंद्राच्याप्रमाणे सुंदर चेहऱ्याच्या, विनयी, शीलव्रती, एकशे अठ्ठावीस पाठीचे हाडं असलेले होतात. हा काळ तीन कोडा-कोडी सागर प्रमाण असतो.

**सुषमा सुषमा काळ :** त्या नंतर सुषमा-सुषमा नावाचा सहावा काळ प्रवेश करतो. या काळाच्या सुरुवातीला आयुष्य वगैरे पहिल्यासारेख राहते. काळाच्या स्वभावानुसार मनुष्य व तिर्यंच्याची आयुष्याची मर्यादा वाढत-वाढत शेवटी तीन पल्य, आयुष्य व उंची तीन कोस प्रमाण होते. मनुष्यांचे वर्ण उगवलेल्या सूर्याच्या रंगासारखा पाठीच्या हाडांची संख्या दोनशे छप्पन होते. ह्या वेळेस पृथ्वी उत्तम भोगभूमी नावाने प्रसिद्ध होऊन जाते. भोगभूमी परिवार विक्रिया करण्याच्या शक्तीने युक्त होतात. हा काळ चार कोडा-कोडी सागर प्रमाण वर्षाचा असतो.

अशाप्रकारे उत्सर्पिणीच्या सहा काळांचे परिवर्तन पूर्ण झाल्यानंतर नियमाने अवसर्पिणी काळाचा प्रारंभ होतो.

## सहा काळांचे परिवर्तन कोठे कोठे आहे ?

भरत आणि ऐरावत क्षेत्राच्या आर्यखंडामध्ये घटीका पात्राच्या न्यायाप्रमाणे अनंतानंत अवसर्पिणी आणि उत्सर्पिणी काळ होतात.

**हुंडावसर्पिणी :** असंख्यात अवसर्पिणी-उत्सर्पिणी काळाची श्रृंखला संपल्यानंतर एक प्रसिद्ध हुंडावसर्पिणी

काळ येतो. ज्याची ओळख खालील प्रमाणे आहे :

ह्या काळात सुषमा दुःषमा नावाच्या काळाच्या स्थितीमध्ये काही समय शिल्लक राहिल्यावर पाऊस वगैरे पडण्यास प्रारंभ होतो व विकलेंद्रिय जीवांची उत्पत्ती होऊ लागते. ह्या काळात कल्पवृक्षांचा विनाश आणि कर्मभूमीचाव्यवहार प्रारंभ होतो. त्याच काळात प्रथम तीर्थंकर व प्रथम चक्रवर्ती सुद्धा जन्म घेतो. ह्या हुंडावसर्पिणी काळाच्या दोषांने चक्रवर्तीचा विजय भंग व त्याच्याच द्वारा निर्मित ब्राह्मण वर्णाची उत्पत्ती सुद्धा होते. ह्या काळात केवळ अठ्ठावन शलाका पुरुष होतात आणि नवव्या पासून सोळाव्या तीर्थंकरामधील सात समयामध्ये धर्माचा ऱ्हास सुद्धा होत असतो. अकरा रुद्र आणि कलहप्रिय नऊ नारद जन्म घेतात. ह्या अतिरिक्त सातव्या, तेवीसव्या आणि अंतिम तीर्थंकरांवर उपसर्ग सुद्धा होत असतो. तृतीय, चतुर्थ आणि पंचम काळात उत्तम धर्माला नष्ट करणारे अनेक प्रकारचे दुष्ट, पापी, कुदेव, कुलिंगी सुद्धा दिसावयास लागतात. चांडाळ, शबर, श्वपच तथा कोळी इत्यादि निकृष्ट जातीचे लोक आणि बेचाळीस कल्की आणि उपकल्की सुद्धा होतात. अतिवृष्टी, अनावृष्टी, भूकंप, उल्कापात इत्यादिंच्या विचित्र भेदांनी आणि नानाप्रकारच्या दोषांनी युक्त विचित्र प्रकार ह्या हुंडावसर्पिणी काळात होत असतात.

**अकरा रुद्र :** भीमावली, जीतशत्रु, रुद्र, वैश्वावर, सुप्रतिष्ठ, अचल, पुण्डरीक, अजितंधर, अजितनाभि, पीठ, सात्यकिपुत्र, हे अकरा रुद्र अंगधारी असून तीर्थंकरांच्या वेळेस झाले आहेत. यापैकी पहिला रुद्र ऋषभनाथाच्या काळात व जितशत्रु अजितनाथाच्या काळात झाला. ह्यापुढे सात रुद्र क्रमाने सुविधिनाथापासून सात तीर्थंकराच्या वेळेस आणि दहावा रुद्र शांतीनाथाच्या वेळेस सात्यकिपुत्र महावीर भगवानच्या तीर्थामध्ये झाला आहे. सर्व रुद्र दहा पूर्वांचा अभ्यास करताना काम व्यथेच्या विकाराने तप भ्रष्ट झाले व सम्यक्त्वरूपी रत्नापासून दूर झाल्यामुळे घोर नरकामध्ये गेले.[५]

**नऊ नारद :** भीम, महाभीम, रुद्र, महारुद्र, काल, महाकाल, दुर्मुख, नरकमुख आणि अधोमुख हे नऊ नारद झाले आहेत, हे सर्व नारद अतिरुद्र होऊन दुसऱ्यांना त्रास देतात व पापाचे भागी होतात, सर्व नारद कलहप्रिय तसेच महायुद्ध प्रिय असल्यामुळे वासुदेवांप्रमाणे नरकाला प्राप्त झाले आहे.

**चोवीस कामदेव :** भगवानबाहुबली, अमिततेज, श्रीधर, यशोभद्र, प्रसेनजित, चंद्रवर्ण, अग्निमुक्ति, सनतकुमार (चक्रवर्ती), वत्सराज, कनकप्रभ, सिद्धवर्ण, शांतीनाथ (चक्रवर्ती), कुंथुनाथ (चक्रवर्ती), अरहनाथ (चक्रवर्ती), विजयराज, श्रीचंद्र, राजा नळ, हनुमान, बलगज, वसुदेव, प्रद्युम्न, नागकुमार, श्रीपाल आणि जंबूस्वामी. चोवीस तीर्थंकरांच्या काळात अनुपम शरीराचे धारक असे बाहुबली इत्यादि चोवीस कामदेव होतात. तीर्थंकर, त्यांचे आई-वडील, चक्रवर्ती, बलदेव, नारायण, रुद्र, नारद, कामदेव आणि कुळकर पुरुष हे सर्व भव्य जीव असून नियमाने सिद्ध होतात. तीर्थंकर तर त्याच भवांत नियमाने सिद्ध होतात. बाकीसाठी त्याच भवांचा नियम नाही इथपर्यंत सृष्टीचा क्रम सांगितल्या गेला आहे. हा युग परिवर्तनाच्या संदर्भात करणानुयोगाचा विषय आहे परंतु सृष्टीचा क्रम समजण्यासाठी याला प्रथमानुयोगांत सुद्धा घेतल्या जात असते.

## तीर्थंकर

तीर्थंकर भगवान गर्भामध्ये येण्याच्या सहा महिने अगोदर इंद्राच्या आज्ञेनुसार कुबेर मातेच्या आंगणामध्ये प्रतिदिन त्रिकाळ साडे तीन करोड रत्नांची वर्षा करतो. अशाप्रकारे एकूण पंधरा महिने रत्न आणि सुवर्णाची वर्षा होत असते. गर्भ धारण केल्यानंतर रात्रीच्या शेवटच्या प्रहरी मातेला सोळा स्वप्न दिसतात. माता सकाळी राज्यसभेमध्ये जाऊन पतीस त्यांचे फळ विचारते व राजा त्या स्वप्नांचे फळ आपल्या अवधिज्ञानाने सांगतो.

५. यांचे आयुष्य, अवगाहना, तपकाळ, भ्रष्टकाळ इत्यादि चार्ट नं. ७ मध्ये पहा.

**सोळा स्वप्न :** राजा सांगतो की हे देवी ! सर्व प्रथम ऐरावत हत्ती पाहिल्याने तुम्ही उत्तम पुत्राला जन्म द्याल. उत्तम बैल दिसला म्हणजे तो सर्व जगांत श्रेष्ठ होईल. सिंह पाहिल्याने तो अति बलशाली होईल. पुष्पहारांना पाहिले याचा अर्थ धर्म प्रसार करणारा धर्म प्रवर्तक होईल. लक्ष्मी पाहिल्याने, सुमेरु पर्वत शिखरावरून देवांच्या द्वारे त्यांचा अभिषेक होईल. चंद्रमा पाहिल्याने सर्व लोकांना आनंद देणारा होईल. सूर्य पाहिल्याने तो अनेक निधींचा स्वामी होईल. मासळी युगल पाहिल्याने तो सुखी होईल. सरोवर पाहिल्याने तो अनेक उत्तम लक्षणांनी युक्त होईल. देव विमान पाहिल्याने तो स्वर्गातून अवतीर्ण होईल. नागेंद्र भवन पाहिल्याने तो अवधिज्ञानी होईल. रत्नांचा समूह पाहिल्याने अनेक गुणांनी युक्त होईल. समुद्र पाहिल्याने केवली होईल. सिंहासन पाहिल्याने विश्व सम्राट होईल. निर्धूम अग्नी पाहिल्याने तो कर्मरूपी अग्निला जाळणारा होईल. बैल तोंडात जातांनी पाहिला याचा अर्थ गर्भात तीर्थंकर भगवान आपले शरीर धारण करणार आहे.

अशाप्रकारे पतिदेवांची वाणी ऐकून राणी हर्षाने रोमांचित होऊन जाते. या वेळी ज्या प्रमाणे मोती सर्व बाधांना मुक्त करून सीपेच्या खोळीमध्ये बंद होतो त्याचप्रमाणे भगवान स्वर्गातून अवतीर्ण होऊन मातेच्या गर्भात प्रवेश करतात.

त्यावेळी सर्व इंद्र आपल्या-आपल्या ठिकाणी होणाऱ्या सूचक चिन्हांनी भगवानच्या गर्भावतारची वेळ समजून तेथे जातात व त्या नगराची प्रदक्षिणा करतात. भगवानच्या आई-वडिलांना नमस्कार करून संगीत, नृत्य इत्यादि अनेक प्रकारचे उत्सव संपन्न करून आपल्या-आपल्या स्थानी वापस जातात. या वेळेपासून इंद्राच्या आज्ञेने श्री, ऱ्ही, धृति, कीर्ती, बुद्धी आणि लक्ष्मी ह्या सहा देव कुमारी आणि दिक्कुमारी मातेच्या जवळ राहून मातेची सेवा, स्तुति आणि तत्व गोष्टींनी मातेचे मनोरंजन करावयास लागतात.

तीर्थंकराचा जन्म होताच इंद्राचे आसन कंपायमान होते. देवांचे मुकुट झुकून जातात. कल्पवृक्ष पुष्पवृष्टी करू लागतात. यावेळी कल्पवासी, ज्योतिषी, व्यंतर आणि भवनवासी देवांच्या आवासामध्ये क्रमाने स्वतः घंटा, सिंहनाद, भेरी आणि शंखनाद होऊ लागतो. ह्या विशेष चिन्हांवरून देवगण भगवानचा जन्म झाला असे समजून जातात. तीन लोकांच्या नाथाचा जन्म होताच सर्वत्र सुखाची लहर दौडावयास लागते.

इंद्राच्या आज्ञेनुसार सर्व चतुर्निकायचे देवगण आणि देवांचे सैन्य भगवानच्या जन्मस्थळी येण्यास निघतात. सौधर्म इंद्र इंद्राणी सहित आपल्या एक लाख योजन विस्ताराच्या ऐरावत हत्तीवर बसून नगराची तीन प्रदक्षिणा करून अयोध्या नगरीमध्ये प्रवेश करतो. इंद्राणी प्रसुतिगृहांमधून बालकांस घेऊन येते. इंद्र बालकाचे दर्शन करून इंद्राणीसहित हत्तीवर त्या बालकास मांडीवर घेऊन सुमेरु पर्वताकडे प्रयाण करतो. यावेळी करोडो वाद्यांच्या आवाजाने, नृत्यसंगीत महोत्सवाने सर्वत्र आनंदित मंगलमय वातावरण तयार होते. सुमेरु पर्वतावर ईशान्य दिशेच्या पांडुकशिलेवर सिंहासनावर भगवानला विराजमान करून इंद्र आपल्या हजारो हातांच्या सहाय्याने हजारो कळसांना एकत्र घेऊन जिनबालकाचा अभिषेक करतात. सर्व इंद्र, देवगण अभिषेक पूजा, स्तुति आदिंनी महान सातिशय पुण्याचा बंध करून घेतात.

नंतर इंद्राणी भगवानाचा अभिषेक करून भगवानला उत्तम-उत्तम वस्त्रांनी अलंकृत करतात. इंद्र तेथेच तीर्थंकराचे नामकरण करतात व पुन्हा वापस आणून आई-वडिलांना सोपवितात. ह्याप्रसंगी तांडव नृत्य वगैरे करून भगवानच्या माता-पित्याची पूजा करतात. देवाच्या सेवेसाठी समान अवस्था आणि समान वेषभूषा वाले देवकुमारांची निश्चित व्यवस्था करून इंद्र आपल्या आपल्या स्वर्गास परत जातात. भगवान मातेचे दूध पीत नाही परंतु इंद्राद्वारा आंगठ्यामध्ये स्थापित केलेल्या अमृताला पीतात. आंगठा चोखत-चोखत ते वाढतात.

भगवान आपल्या बालक अवस्थेत मंद-मंद हासत देव बालकांच्या बरोबर रत्न धूळीमध्ये क्रिडा करत-करत, माता-पित्याच्या आनंदाला वृद्धि करतात. मति, श्रुति आणि अवधि हे तीन ज्ञान धारण केलेले

असल्यामुळे सर्व वाङ्मय कंठस्थ करणाऱ्या सरस्वतीचे एकमात्र स्वामी, समस्त लोकांचे स्वयं गुरू म्हणून ते कोणालाही गुरूस्थानी बसवत नाही. भगवानच्या जन्माच्या वेळेपासूनच दहा अतिशय विशेष होतात. त्यांच्यासाठी स्वर्गातून रत्न करंडकांत जी भोगोपभोगाची सामग्री आली होती तीचाच गृहस्थाश्रमात उपभोग करतात.

काही निमित्याने या स्वभावानेच तीर्थंकरांना जेव्हा वैराग्य उत्पन्न होते तेव्हा लौकांतिक देव येऊन भगवानच्या वैराग्याची स्तुति करून आपली भक्ती प्रकट करतात. देवांच्या द्वारा आणलेल्या पालखीमध्ये भगवान विराजमान होतात. सर्व प्रथम राजा गण नंतर विद्याधर व मनुष्य त्या पालखीला उचलून काही अंतर चालून जातात. तत्पश्चात् देवगण पालखीला दीक्षावनांपर्यंत घेऊन जातात. तेथे सिद्धशिलेवर भगवान विराजमान होतात. दोन्ही हातांनी केशलोच करून सर्व परिग्रहाचा त्याग करून **"ॐ नमः सिद्धेभ्यः"** असे म्हणत दीक्षा ग्रहण करतात. इंद्रगण भगवानचे केस रत्न करंडकात ठेऊन आदराने क्षीर समुद्रामध्ये त्याचे विसर्जन करतात. भगवान केवलज्ञान प्राप्त होईपर्यंत छद्म अवस्थेमध्ये मौन व्रत धारण करतात.

जेव्हा भगवानच्या ध्यान तपाच्या प्रभावाने घातिया कर्मांचा नाश होतो तेव्हा त्यांना तीन लोक आणि अलोक यांना एक समयात प्रत्यक्ष दाखविणारे केवलज्ञान-पूर्ण ज्ञान प्राप्त होते. यावेळेस भगवानचे आकाशांमध्ये पाच हजार धनुष्य वर गमन होते. इंद्राच्या आज्ञेने कुबेर समवशरणाची रचना करतो. या भूमीच्या एक हात उंचीपासून समवशरणाच्या पायऱ्या प्रारंभ होतात. प्रत्येक पायरी एक-एक हात प्रमाणाची असून वीस हजार पायऱ्या राहतात. ह्या पायऱ्यांनी आंधळे, लंगडे, बालक, वृद्ध, रोगी, एक अंतर्मुहूर्तामध्ये चढून जातात. संक्षेपाने समवशरणाची रचना अशाप्रकारे आहे :-

सर्वप्रथम धूलीसाल कोट आहे. त्यानंतर चारही दिशामध्ये चार मानस्तंभ आहे. मानस्तंभाच्या सभोवती चार सरोवर आहे, नंतर शुद्ध जलाने भरलेल्या टाक्या आहेत. नंतर पुष्पवाटीका-लतावन आहे. त्याच्यापुढे प्रथम परकोट आहे. त्याच्यापुढे दोन्ही बाजूला दोन-दोन नाट्यशाळा आहेत. त्याच्यापुढे अशोक इत्यादीचे दुसरे वन आहे. त्यापुढे वेदी आहेत. त्यानंतर ध्वजांच्या ओळी आहे व नंतर दुसरा परकोट आहे. त्याच्यापुढे वेदी सहित कल्पवृक्षांचे वन आहे. त्यानंतर स्तुप आणि स्तुपांच्या नंतर भवनांच्या रांगा आहेत, त्यानंतर स्फटीक मण्यांचा बनलेला तीसरा परकोट आहे ज्यामध्ये देव, मनुष्य आणि मुनींच्या बारा सभा आहेत. त्यानंतर उंच आसन आहे. उंच आसनावर अग्र भागांवर स्वयंभू अरहंत देव विराजमान राहतात. अरहंतदेव स्वभावानुसार पूर्व किंवा उत्तरेच्या दिशेकडे तोंड करून समवसरण भूमीमध्ये विराजमान होतात. त्यांच्या चारी दिशांना प्रदक्षिणा रूपाने क्रमपूर्वक बारा गणांना बसण्यासाठी योग्य असे बारा सभा मंडप असतात.

केवलज्ञान प्रकट झाल्यानंतर तीर्थंकर भगवानला दहा अतिशय प्रकट होत असतात तथा देवनिर्मित चौदा अतिशय सुद्धा प्रकट होऊन जातात. तीर्थंकर भगवानाचे आठ प्रातिहार्य सुद्धा असतात आणि चार अनंतचतुष्टय सुद्धा प्रकट होते. अशाप्रकारे भगवान अनेक वर्षापर्यंत धर्माचा उपदेश करत विहार करत असतात.

त्यानंतर योगाला वश करून शिल्लक राहिलेल्या अघातीया कर्मांचा नाश करून मुक्तीला प्राप्त होतात. त्याठिकाणी अनंतानंत काळापर्यंत अनंतानंत आत्मसुखाचा अनुभव करत राहतात.

**(नोट : चोवीस तीर्थंकरांची संपूर्ण माहिती परिशिष्ट टेबल क्रमांक २ मध्ये पहा.)**

## प्रथम तीर्थंकर

### भगवान ऋषभदेव कसे झाले ?

ह्या जंबूद्वीपात मेरू पर्वताच्या पश्चिम दिशेला विदेह क्षेत्रांमध्ये 'गंधिल' नावाचा एक देश आहे जो

स्वर्गासारखा सुंदर आहे. त्या देशात नेहमी जिनेंद्र रूपी सूर्याचा उदय झालेला असतोच. त्यामुळे तेथे मिथ्यादृष्टी लोक कधीच उत्पन्न होत नाही. ह्या देशाच्या मध्य भागांत चांदीसारखा विजयार्ध नावाचा एक पर्वत आहे. त्या विजयार्थ पर्वताच्या उत्तर दिशेच्या श्रेणी मध्ये अलका नावाची सर्वोत्तम नगरी आहे. त्या अलकापुरीचा अतिबल नावाचा विद्याधर राजा होता. त्याची मनोहरा नावाची पतिव्रता राणी होती. त्या दोघांना अति भाग्यशाली महाबल नावाचा पुत्र उत्पन्न झाला. ज्यावेळी भोगविलासातून विरक्तता आल्यावर महाराज अतिबलला वैराग्य उत्पन्न झाले त्यावेळी त्यांनी आपला पुत्र महाबल याचा राज्याभिषेक करून अनेक विद्याधरासोबत वनात जाऊन दीक्षा ग्रहण केली. महाबल राजाचे चार मंत्री होते ते अतिबुद्धीमान, मित्र आणि दूरदृष्टी होते. त्यांचे नांव - महामती, संभिन्नमती, शतमती आणि स्वयंबुद्ध होते, ह्यामध्ये स्वयंबुद्ध सत्प्रवृत्तीचा आणि बाकी तीन दुष्ट प्रवृत्तीचे होते. एकवेळी, आपल्या जन्मदिन महोत्सवाच्यावेळी महाराज महाबल राजदरबारांत सिंहासनावर विराजमान होते. त्यावेळी अनेक प्रकारचे उत्सव, नाच, गाणे विद्वानांचे उद्‌बोधन सुरू होते. त्यावेळी योग्य वेळ पाहून स्वयंबुद्ध मंत्र्याने स्वामीच्या हिताला लक्षात घेऊन जैन धर्माचा मार्मिक उपदेश दिला. त्याच्या उपदेशाला सहन न होऊन पाखंडी महामती मंत्र्याने ह्या चराचर सृष्टीमध्ये जीव तत्त्वाचा अभाव आहे असे सिद्ध करणारे भूतवादी[१] मत सिद्ध केले. कुमतवादी[२] संभिन्नमती मंत्र्याने विज्ञानाचा आश्रय घेऊन जीवाचा अभाव सिद्ध करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी म्हटले की वर्तमान ज्ञान हेच सत्य आहे बाकी सर्व भ्रम आहे. त्यानंतर शतमती मंत्र्याने शुन्यवादाचा आधार घेऊन सर्व पृथ्वीला क्षणभंगुर सिद्ध केले.

ह्या तिघांचे असे संभाषण ऐकून स्वयंबुद्ध मंत्र्याने तीघांच्याही एक तरफा दुराग्रही वक्तव्यांचे न्याय आणि आगम ह्यांच्या सहाय्याने खंडण केले आणि स्याद्वादमय धर्माचा विजय करून त्या तिघांनाही निरूत्तर केले आणि महाराजांना प्रसन्न केले. त्यानंतर कोण्या एका दिवशी सुमेरु पर्वतावरील अकृत्रिम चैत्यालयांची वंदना करण्यासाठी स्वयंबुद्ध मंत्री सुमेरु पर्वतावर गेला. तेथे पोहचल्यानंतर त्याने प्रथम प्रदक्षिणा केली नंतर भक्तिभावाने त्रिवार वंदना करून पूजा केली. क्रमाक्रमाने भद्रसालवन इत्यादिंच्या संपूर्ण अकृत्रिम प्रतिमाची वंदना करून सौमनसवनांच्या चैत्यालयांत त्याचवेळी विदेह क्षेत्रांतून आलेले आकाशगामी आदित्यगति व अरिंजय नावाचे चारणमुनि प्रकट झाले. ते दोघेही मुनी युगंधर भगवानाच्या समवशरणातील मुख्य गण होते. मंत्र्याने उठून भक्तिभावाने त्यांची प्रदक्षिणा करून नमस्कार करून पूजा आणि स्तुति वंदना केली. त्यानंतर त्याने मुनिराजांना प्रश्न केला की हे स्वामिन ! विद्याधरांचा राजा महाबल आमचा स्वामी आहे, तो भव्य आहे की अभव्य ? माझ्याद्वारा सन्मार्ग प्रदर्शक जैनधर्माच्या उपदेशाला जसे प्रमाण मानतो तसाच त्यावर श्रद्धा ठेवेल की नाही ? याप्रश्नानंतर आदित्यगती नावाचे अवधिज्ञानी मुनि म्हणाले, हे भव्य ! तुझा स्वामी भव्यच आहे. तो तुम्ही सांगितलेल्या शब्दावर विश्वास करेल. आजपासून दहाव्या भवांत जंबूद्वीपाच्या भरतक्षेत्रात तो प्रथम तीर्थंकर होईल. त्यांचे पूर्वभवाचे वर्णन तुम्ही ऐका.

जंबूद्वीपाच्या मेरु पर्वताच्या पश्चिम दिशेला विदेह क्षेत्रात गंधीला देशांत सिंहपूर नावाचे एक नगर आहे. तेथे श्रीषेण राजा आणि सुंदरी राणी यांना जयवर्मा आणि श्रीवर्मा असे दोन पुत्र झाले होते. पित्याने योग्यता व स्नेहाला वश होऊन आपल्या लहान पुत्राला - श्रीवर्माला राज्य दिले. तेव्हा जयवर्मा विरक्त होऊन स्वयंप्रभ गुरूपासून दीक्षा घेऊन तपस्या करू लागला. एके दिवशी महीधर विद्याधराला आकाशमार्गाने जाताना पाहाताच तो विद्याधर आहे याचे अनुमान करित असतांनाच त्याला सर्प चावतो व मृत्युनंतर तोच तुझा स्वामी महाबल

१. मूळ पुस्तकात येथे चार्वाक मत लिहिले आहे.

२. मूळ पुस्तकात येथे बौद्ध मतावलंबी लिहिलेले आहे. परंतु चार्वाक वाद आणि बौद्ध पश्चिम विदेह क्षेत्रांत होते काय असा भ्रम उत्पन्न होईल म्हणून मराठी अनुवादांत त्यांना वगळले आहे.

झाला आहे. आज रात्री त्याने दोन स्वप्न पाहिली आहेत तेव्हा तुम्ही जाऊन त्या स्वप्नांचे फळ सांगून त्याला त्याचे पूर्व भवाचे वर्णन सुद्धा सांगा त्याने त्याचे कल्याण होणार आहे.

गुरूच्या सल्ल्यावरून मंत्री ताबडतोब परत येऊन म्हणतो, हे राजन ! तुम्ही जे स्वप्नांत पाहिले आहे की - तिन्ही मंत्र्यांनी आपणास चिखलात टाकले आणि मी आपणांस उचलून सिंहासनावर बसविले - याचा अर्थ असा आहे की - मिथ्यादृष्टीच्या अंधकारांतून निघून आपण जिनधर्माच्या सम्यक मार्गाकडे प्रवृत्त झाले आहात. दुसऱ्या स्वप्नांत आपण अग्नीज्वाला क्षीण होतांनी पाहिले आहे तर आतां आपले आयुष्य केवळ एक महिना शिल्लक राहिले आहे असे त्याचे फळ समजावे. आपण ह्या भवांपासून दहाव्या भवांत तीर्थंकर होणार आहेत इत्यादि सर्व वृत्तांत मंत्र्याने राजाला सांगितला. राजा महाबलाने सुद्धा आपला पुत्र अतिबल ह्याला राज्य कारभार सोपवून सिद्धकुट चैत्यालयांत जाऊन सिद्ध प्रतिमांची पूजा करून गुरूंच्या साक्षेने जीवनपर्यंत चार प्रकारच्या आहाराचा त्याग करून सल्लेखना धारण केली आणि धर्मध्यानांत लीन असताना प्राणत्याग करून स्वर्गात श्रीप्रभ विमानात ललितांग नावाचे उत्कृष्ट देव झाले. जेव्हा त्यांचे आयुष्य एक पल्ल्याच्या बरोबर शिल्लक राहिले तेव्हा त्यांना स्वयंप्रभा नावांची देवी प्राप्त झाली. अन्य देवींच्या अपेक्षेने ललीतांग देवाला ह्या देवीबद्दल विशेष प्रेम होते. जेव्हा ह्या देवाच्या गळ्यामधील माळा सुकावयास लागल्या तेव्हा आपला मृत्यु काळ निकट आला आहे असे समजून शोकाकुल झाले, परंतु त्यांना अनेक देवांनी समजाविले. ज्याच्या परिणामाने ह्या देवाने पंधरा दिवस पर्यंत जिनमंदिरात पूजा केली आणि अच्युत स्वर्गातील जिनमंदिराची पूजा करून तेथेच एका झाडाखाली महामंत्र जपाच्या उच्च स्वरांच्या तल्लीनतेत शांत चित्ताने सल्लेखना मरण प्राप्त केले.

जंबूद्वीपांतील महामेरु पर्वताच्या पूर्वेस असलेल्या विदेहक्षेत्रांत पुष्कलावती नावाचा देश आहे त्यामध्ये उत्पलखेटक नगराचा राजा वज्राबाहू आणि राणी वसुंधरा ह्यांना तो ललीतांग देव वज्रजंघ नावाच्या पुत्र रूपाने जन्म झाला. तिकडे आपल्या पतीच्या वियोगाने शोकाकुल पतिव्रता स्वयंप्रभा सहा महिन्यापर्यंत जिनपूजेमध्ये निमग्न राहिली व सौमनसवनांच्या पूर्व दिशेमध्ये स्थित जिनमंदिरात चैत्यवृक्षाखाली पंचपरमेष्ठीचे स्मरण करत समाधीपूर्वक प्राणत्याग केला आणि विदेह क्षेत्रातील पुण्डरीकिणी नगराचा राजा वज्रदंतच्या महाराणी लक्ष्मीमती राणीला श्रीमती नावाच्या कन्येच्या रूपाने जन्मास आली. कालांतराने योगायोगाने वज्रजंघ व श्रीमतीचा विवाह झाला. यांना एकोणपन्नास युगल पुत्र म्हणजेच अठ्याणव पुत्र उत्पन्न झालेत. योग्य वेळी ते सर्व आपल्या आजोबांबरोबर दीक्षित झाले होते.

योग्य वेळी श्रीमतीचे वडील चक्रवर्ती वज्रदंताने आपला लहान नातू पुंडरिकाचा राज्याभिषेक केला आणि विरक्त होऊन आपल्या पुत्रासोबत दिक्षा ग्रहण केली. त्यावेळी लक्ष्मीमती मातेने आपली मुलगी व जावई यांना आमंत्रित केले. ते दोघेही आपल्या राजसी थाटाने सैन्य बळांसहित पुण्डरिका नगराकडे प्रवास करीत होते. रस्त्यांत कोण्या वनांमध्ये विश्रामांसाठी थांबले. त्याठिकाणी आकाशांतून गमन करणारे श्री दमघर आणि सागरसेन मुनि वज्रजंघाच्या विश्रामस्थळी आले. त्या दोन्ही मुनींनी वनांमध्येच आहार घेण्याची प्रतिज्ञा केली होती. त्याठिकाणी वज्रजंघ महाराजांनी आणि महाराणी श्रीमतीने नवधा भक्तिसह विधिवत आहारदान दिला आणि पंचाश्चर्याला प्राप्त केले. त्यानंतर त्यांना आपल्या अंगरक्षकाकडून समजले की हे दोन्ही मुनि त्यांचेच सर्वात लहान पुत्रयुगल आहेत. राजा वज्रजंघ आणि श्रीमतीने त्याच्या मुखाने आपला पूर्वभव वृत्तांत ऐकला आणि धर्माचे मर्म कशात आहे हे समजून घेतले. त्यांच्याजवळ बसलेले नकुल, सिंह, वानर आणि डुक्कर यांचा सुद्धा पूर्वभव वृत्तांत ऐकला. त्या मुनींनी सांगितले की तुम्ही आठव्या भवांत ऋषभ तीर्थंकर व्हाल आणि श्रीमतीचा जीव राजा श्रेयांसकुमार होईल.

एक दिवशी वज्रजंघ महाराज राणी सोबत आपल्या शयनगृहांत झोपले होते. त्या शयनगृहांत नौकरांनी

अगुरुगुगुळ इत्यादिपासून निर्मित सुवासिक धूप पेटविला होता. ते नौकर त्या रात्री खिडक्या उघडावयाचे विसरून गेले होते ज्याच्या परिणाम स्वरूप ते दोघेही धूरांनी गुदमरून मृत्यू पावले. आश्चर्य असे की भोग सामग्रीच प्राणघातक ठरली होती. ते दोघेही दानाच्या प्रभावाने मृत्यु पावल्यामुळे उत्तरकुरु नावाच्या उत्तम भोगभूमीमध्ये उत्पन्न झाले. ते नकुल इत्यादि प्राणीसुद्धा दानाच्या अनुमोदनेने भोगभूमीतच उत्पन्न झाले.

एक दिवशी दोन चारणमुनि आकाशमार्गाने भोगभूमीवर उतरले आणि आर्य वज्रजंघ आणि आर्या श्रीमतीच्या जीवाला सम्यकदर्शनाचा उपदेश देऊ लागतात. ज्येष्ठ मुनि सांगतात की हे आर्य ! तू मला स्वयंबुद्ध मंत्रीचा जीव समझ, मी तुला महाबल पर्यायांमध्ये जैन धर्माला ग्रहण करविले होते. त्या दोघांनी मुनींच्या प्रसादाने सम्यकदर्शन ग्रहण केले आणि आयुष्याच्या शेवटी समाधी मरण प्राप्त करून ऐशान स्वर्गांत 'श्रीधर' देव आणि 'स्वयंप्रभ' नावाचे देव झाले. स्वयंप्रभ देव अर्थात श्रीमतीचा जीव सम्यक्त्वाच्या प्रभावाने स्त्रीपर्याय सोडून देव पदाला प्राप्त करतो. एक दिवस श्रीधर देव आपले गुरू (स्वयंबुद्ध मंत्रीचा जीव) प्रीतिंकर मुनीराजांच्या समवशरणांत जाऊन विचारतो की - भगवन् ! माझ्या महाबलच्या भवांत जे तीन मंत्री होते ते यावेळेस कोठे आहेत ? भगवान सांगतात की - त्या तिघांपैकी महामती आणि संभिन्नमती हे दोघेही निगोद पर्यायामध्ये आहेत आणि शतमती नरकांत गेला आहे. नंतर श्रीधर देवाने नरकांत जाऊन शतमतीच्या जीवाला उपदेश दिला. निगोद अवस्थेतील जीवांना उपदेश देण्याचा प्रश्नच नव्हता.

जंबूद्वीपाच्या पूर्वविदेह क्षेत्रांत महावत्स नावाचा देश आहे त्यातील सुसीमा नगरीचा सुद्दष्टी राजा व सुंदरनंदा राणीला श्रीधर देव स्वर्गांतून येऊन 'सुविधि' नावाचा पुत्र उत्पन्न होतो. काही काळानंतर सुविधि राजा व त्याची राणी मनोरमास स्वयंप्रभ देव (श्रीमतीचा जीव) केशव नावाच्या पुत्राच्या रूपाने जन्म घेतो. अर्थात, वज्रजंघाचा जीव सुविधि राजा व श्रीमतीचा जीव त्याचा पुत्र केशव होतो.

योग्यवेळी सुविधि महाराज दिगंबर दीक्षा घेऊन शेवटी समाधी मरण प्राप्त करून अच्युतेंद्र देव होतात. केशवने सुद्धा निर्ग्रंथ दीक्षा घेऊन अच्युत स्वर्गांत प्रतिइंद्र पद प्राप्त केले.

हा अच्युतेंद्र, जंबूद्वीपाच्या पूर्व विदेहामध्ये पुष्कलावती देशांत पुंडरीकिणी नगरामध्ये वज्रसेन राजा आणि श्रीकांता राणी यांना वज्रनाभी नावाचा चक्रवर्ती पुत्र उत्पन्न झाला. श्रीमतीचा जीव केशव, जो अच्युत स्वर्गांत प्रतींद्र झाला होता, तो तेथून येवून त्याच नगरात कुबेरदत्त वनिकाच्या अनंतमती पत्नीला धनदेव नावाचा पुत्र होतो. वज्रनाभीचे वडील तीर्थंकर होते. तो स्वतः चक्रवर्ती होता. चक्ररत्नाने षटखंड व संपदा यांना जिंकून चिरकाल पर्यंत साम्राज्य सुख भोगले. एक दिवस पित्याने सांगितलेल्या दुर्लभ अशा रत्नत्रयाचे स्वरूप समजून वज्रनाभीने आपला पुत्र वज्रदंतास राज्य सोपवून, सोळा हजार मुकुटबद्ध राजे, एक हजार पुत्र, आठ भाऊ आणि धनदेव इत्यादि लोकांना बरोबर घेऊन आपले पिता वज्रसेन तीर्थंकराच्या समवशरणांत दीक्षा धारण केली आणि काही दिवसातच तीर्थंकराच्या सान्निध्यात सोळाकारण भावनांचे चिंतवन करीत तीर्थंकर प्रकृतीचा बंध करून घेतला. ध्यानाच्या विशुद्धीने अकराव्या गुणस्थानाला प्राप्त केले. तेथील अंतर्मुहूर्त काळ पूर्ण करून खाली उतरले. पुन्हा उपशम श्रेणीमध्ये वर गेले व तेथे आयुष्य संपल्यावर मरून सर्वार्थसिद्धीमध्ये अहमिंद्र झाले. हेच अहमिंद्र आपले आयुष्य पूर्ण करून भगवान **वृषभदेव** नावाचे प्रथम तीर्थंकर होतील.

## भगवान् वृषभदेव

श्री नाभीराज महाराजाची मरुदेवी नावाची राणी होती. ती रूप, सौंदर्य, कांती, शोभा, तेज आणि विभूती इत्यादि गुणांत इंद्राणीच्या समान होती. त्या मरुदेवीच्या विवाहाच्या समयी इंद्राच्या प्रेरणेने उत्तम देवांनी मोठ्या प्रमाणात त्यांचा विवाहोत्सव साजरा केला होता. त्या वेळी नाभीराज महाराजच सर्व जगांत सर्वात अधिक

पुण्यवान होते आणि मरुदेवी सर्वांत अधिक पुण्यवान होती. ज्यांचे स्वयंभू भगवान पुत्र होणार आहेत त्यांच्यापेक्षा श्रेष्ठ कोण होऊ शकतो ? त्यावेळी उत्तम-उत्तम भोगोपभोगांचा अनुभव घेणारे ते दोन्ही दम्पती असे भासत असे की भोगभूमीतील विलुप्त झालेल्या लक्ष्मीचेच प्रत्यक्ष दर्शन होत आहे.

**अयोध्येची रचना : जेव्हा कल्पवृक्षांचा** सर्वत्र अभाव झाला तेव्हा नाभीराज आणि मरुदेवी यांच्यासाठी योग्य स्थानांवर त्यांच्या पुण्य उदयाने बोलाविलेल्या इंद्राने अयोध्येची रचना केली. त्यावेळी जे मनुष्य इकडे तिकडे विखुरलेले राहत होते त्या सर्वांना अयोध्या नगरीमध्ये एकत्र करून स्थापित केले आणि त्यांच्या सर्व सुविधांसाठी अनेक प्रकारच्या उपयोगी स्थानांची रचना केली. अयोध्या नगरीच्या मध्यभागी देवांनी राजमहल बनविला होता. तो राजमहल इंद्रपुरीतील महालांची स्पर्धा करणारा व सर्व सुखसुविधांनी तथा अनेक नोकर चाकरांनी युक्त होता.

या भवनाविषयी अन्य स्थानी सुद्धा उल्लेख आला आहे की :-

त्या वेळेस [१]दक्षिण भरतक्षेत्रांमध्ये कल्पवृक्षरूपांचा प्रासाद जसा होता तसाच हा पृथ्वी निर्मित प्रासाद तयार झाला होता. राजा नाभीराजाच्या प्रासादाचे नांव 'सर्वतोभद्र' होते. त्याचे खांब सुवर्णाचे होते. भिंती नाना प्रकारच्या मण्यांनी निर्मित होत्या. तो पुष्कराज, मूंगा आणि मोत्यांनी निर्मित माळांनी सुशोभित, एक्यांशी खंडांनी युक्त असून परकोट, सरोवर तथा बाग-बगिच्यांनी अलंकृत होता. तो महल अधिष्ठाता महाराज नाभीराजाच्या पुण्य प्रभावाने एकटाच अनेक प्रकारच्या कल्पवृक्षांनी समृद्ध व सुशोभित होता. पृथ्वीच्या पृष्ठभागावर आपल्या योग्य स्थानांवर अधिष्ठित होता.

राजा नाभीराजाची मरुदेवी नावाची पट्टराणी होती. ती सुद्धा श्रेष्ठ शुद्ध कुळांत उत्पन्न झाली होती आणि इंद्रास ज्याप्रमाणे इंद्राणी प्रिय असते त्याचप्रमाणे राजा नाभीराजास मरुदेवी प्रिय होती.

ही अयोध्या नगरी सुकौशल देशात होती म्हणून अयोध्य सुकौशला ह्या नावाने सुद्धा प्रसिद्ध झाली होती. या नगरीमध्ये अनेक विनयशील, सुशिक्षित, सभ्य मनुष्य निवास करीत होते म्हणून ही 'विनिता नगरी' नावाने सुद्धा ओळखल्या जात असे. ही अयोध्या नावाची राजधानी अत्यंत प्रसिद्ध होती आणि सर्व संपन्न होऊ घातलेल्या देशांच्या केंद्रबिंदु मध्यभागाची शोभा धारण केल्यामुळे सुशोभित झाली होती. राजभवन, बाग-बगिचे, परकोट, आणि खाई-खंदक यांनी युक्त नगरी अशी दिसत होती की जणूं काही भविष्यांतील कर्मभूमीच्या वेळेस नगरांची रचना प्रारंभ करण्यासाठी बनविलेले प्रतिबिंब अथवा प्रतिरूपाचा नकाशा बनविला गेला आहे.

त्यानंतर अयोध्या नगरीमध्ये सर्व देवांनी मिळून शुभ दिवशी, शुभ मुहूर्त, शुभ योग व शुभ मुहूर्तांत आनंदित होऊन पुण्याहवाचन केले. महाराज नाभीराज ज्यांना पुण्योदयाने अनेक संपदांची प्राप्ती झाली होती त्यांनी मरुदेवी सह पुण्याहवाचनाच्या वेळेपासूनच त्या अतिशय ऋद्धि-सिद्धी युक्त अयोध्या नगरीमध्ये राहण्यास प्रारंभ केला. त्यावेळी दोघांचे सर्वज्ञ वृषभदेव पुत्र जन्म घेतील हे जाणून इंद्राने अभिषेकपूर्वक त्या दोघांची पूजा केली होती.

**भगवान वृषभदेवाचे गर्भावतरण :** सहा महिन्यानंतर भगवान वृषभदेव अयोध्या नगरीत अवतीर्ण होणार असे समजून देवांनी आदरसहित आकाशांतून रत्नांची वर्षा प्रारंभ केली. इंद्राच्या आज्ञेन कुबेराने हरिमणि, इंद्रनिलमणि, पद्मरागमणि इत्यादि उत्तम-उत्तम रत्नांची वर्षा राजाच्या अंगणात केली होती. ह्या प्रकारे सहा महिनेपूर्वीपासूनच व त्यानतर नऊ महिन्यापर्यंत रत्न तथा सुवर्णांची वर्षा होत राहिली होती.

**मातेचे सोळा स्वप्न :** कोण्याएका दिवशी राजमहालांत झोपेत रात्रीच्या अंतिम प्रहरी मरुदेवीने जिनेंद्रदेवाचे जन्मसूचक सोळा स्वप्न पाहिले. (१) ऐरावत हत्ती, (२) शुभ्र बैल, (३) सिंह, (४) हत्तीद्वारा स्वर्ण कळशांनी

१. हरिवंशपुराण पृ. १४६

अभिषिक्त होत असलेली कमळासनांवर आरूढ लक्ष्मी, (५) दोन पुष्पमाळा, (६) पूर्ण चंद्रबिंब, (७) उगवणारा सूर्य, (८) कमळपत्राने आवृत्त दोन स्वर्ण कळश, (९) सरोवरांत जल क्रिडा करीत असलेले मासळी युगल, (१०) कमळयुक्त सुंदर सरोवर, (११) उत्तुंग लहरींनी युक्त गंभीर समुद्र, (१२) रत्नमय उत्कृष्ट सिंहासन, (१३) रत्न जडित स्वर्ग विमान, (१४) नागेंद्र भवन, (१५) दैदिप्यमान रत्नांची राशी आणि (१६) बिनाधूराचा अग्नि. ह्या प्रकारच्या सोळा स्वप्नांना पाहिल्यानंतर मरूदेवीने पाहिले की - सोन्यासारख्या पिवळ्या रंगाचा उत्कृष्ट शरीर सौष्ठवाचा बैल त्यांच्या मुखांत प्रवेश करीत आहे.

थोड्यावेळानंतर मंगल वाद्यांच्या ध्वनीने व सुप्रभाती गाईल्या जाणाऱ्या मंगल स्त्रोत्रांच्या आवाजाने जागृत झालेली राणी उठून बसली. स्वप्न पाहिल्यामुळे मंगल वाद्यांच्या आवाजापूर्वीच जागृत झाली होती तरी सुद्धा त्या बंदीजनांच्या स्तुतींच्या आवाजाने मातेला अनेक रूपाने आनंदित केले होते. आनंदीत होऊन मरूदेवीने मंगल स्नान करून व वस्त्राभूषणाने अलंकृत होऊन आपल्या पतिजवळ पोहचली आणि आदराने महाराज नाभीरायाचे दर्शन घेऊन अर्ध्यासनांवर शांतिपूर्वक बसली. राज्यसिंहासनावर विराजमान महाराज नाभीरायांस निवेदन केले की हे देव ! आज रात्रीच्या अंतिम प्रहरी मी सोळा स्वप्न पाहिले आणि त्या स्वप्नांचे क्रमानुसार वर्णन करून विचारले की हे देव ! आपण ह्या स्वप्नांचे फळ सांगा. महाराज नाभीराय अवधिज्ञानाने त्या स्वप्नांचे फळ समजून सांगायला लागले - “हे देवी, ऐक ! ऐरावत हत्तीला पाहिल्यामुळे तुला उत्तम पुत्र होईल, उत्तम बैल पाहिल्यामुळे तो सर्व लोकांत श्रेष्ठ होईल, सिंह पाहिल्यामुळे तो अत्यंत शक्तिशाली होईल, पुष्पमाळा पाहिल्यामुळे तो उत्कृष्ट धर्मप्रचारक होईल, लक्ष्मीला पाहिल्यामुळे त्या बालकाचे सुमेरू पर्वत शिखरांवर देवांकडून अभिषेक होईल, पूर्ण मासी चंद्र पाहिल्यामुळे तो संपूर्ण जगाला आनंद देणारा होईल, सूर्यास पाहिल्यामुळे त्याची किर्ती दाही दिशांत पसरेल, कळस युगलांना पाहिल्यामुळे तो अनेक अमूल्य संपदांना प्राप्त करेल. क्रिडा करणाऱ्या मत्स्य युगलांना पाहिल्यामुळे तो अत्यंत सुखशांति प्राप्त करेल, सरोवरास पाहिल्यामुळे तो अनेक गुणांनी सुशोभित होईल, समुद्रास पाहिल्याने तो सर्व जगताचा गुरू होऊन साम्राज्यास प्राप्त करेल, देवाचे विमान पाहिल्यामुळे तो स्वर्गातून अवतीर्ण होईल, नागेंद्र भवन पाहिल्यामुळे तो अवधिज्ञानरूपी दृष्टी सहित होईल, तेजपुंज रत्नांची राशी पाहिल्यामुळे तो अनेक उत्कृष्ट गुणधारी होईल, बिना धुरांचा अग्नि पाहिल्यामुळे तो सर्वकर्मांचा क्षय करणारा होईल आणि तुझ्या मुखांत जो बैलाने प्रवेश केला आहे त्याचे फळ असे आहे की तुझ्या गर्भांत तीर्थंकर वृषभदेव भगवान गर्भ धारण करतील. ह्या प्रकारे राजा नाभीरायाकडून स्वप्न फळांची वार्ता ऐकून राणी मरूदेवीला अतोनात हर्ष, उल्हास प्राप्त झाला.

जेव्हा अवसर्पिणीच्या तिसऱ्या सुषमादुखमा नावाच्या काळात चौऱ्यांशी लाख पूर्व तीन वर्ष आठ महिने आणि एक पक्ष काळ शिल्लक राहिला होता तेव्हा आषाढ कृष्ण द्वितीयेच्या दिवशी उत्तराषाढ नक्षत्रामध्ये वज्रनाभी नावाचे अहमिंद्रदेव आपले आयुष्य पूर्ण झाल्यामुळे सर्वार्थसिद्ध स्वर्गांतून मरूदेवीच्या गर्भांमध्ये अवतीर्ण झाले. ज्याप्रमाणे सर्व बाधांना रहित करून मोती शिंपल्यामध्ये स्थापित होतो त्याप्रमाणेच ते स्थापित झाले होते. त्यावेळी सर्व इंद्र आपल्या-आपल्या स्थानांवर होणाऱ्या संकेतानुसार तीर्थंकराच्या गर्भावतरणाची वेळ समजून तेथे आले. सर्वांनी अयोध्यानगरीच्या तीन प्रदक्षिणा करून देवाच्या माता-पित्याला नमस्कार केला. महाराज नाभीरायाचे आंगण देवांनी खचाखच भरले. सौधर्म इंद्राने देवांच्या साहाय्याने नृत्य-संगितानीयुक्त अनेक प्रकारे गर्भकल्याणक महोत्सव साजरा करून माता-पित्याची पूजा केली व त्यानंतर स्वस्थानी परत गेले. त्यावेळेपासूनच इंद्राच्या आज्ञेनुसार दिक्कुमारी देवी वेळेनुसार आवश्यक कार्य करण्यासाठी सेविका बनून माता मरूदेवीची सेवा करावयास लागल्या. सेवा करताना सर्व प्रथम देवींनी स्वर्गातील आणलेल्या पदार्थाने मातेच्या गर्भाला शुद्ध केले. ती माता जरी स्वभावाने निर्मळ होती, रजस्वला आणि मल-मूत्र इत्यादि विकारांनी रहित

होती तरी पण देवींनी तिला स्वच्छ केले. त्यांच्या मधील कोणी मातेच्या समक्ष मंगल अष्टद्रव्य देत असे तर कोणी तांबूल देत होती, कोणी स्नान करवित तर कोणी आभूषणांनी सुशोभित करत असे. कोणी उत्कृष्ट भोजन बनवित, तर कोणी चंदनाचा सडा टाकून रांगोळी काढीत असे. कोणी आरती करीत असे तर कोणी मंत्राक्षरांनी मरूदेवीचे रक्षण करीत होत्या. ह्या देवी मन प्रफुल्ल ठेवणाऱ्या काव्य गोष्टी, तत्त्वगोष्टी सांगून गर्भवती मरूदेवीला सन्मानपूर्वक प्रसन्न ठेवण्याचा प्रयत्न करीत असे. कधी-कधी अनेक गूढ प्रश्न-शंका समाधान सुद्धा विचारित असे. माता मरूदेवी सुद्धा तीर्थंकर देवाच्या प्रभावाने कठीणातल्या कठीण पद आणि प्रश्नांचा अर्थ तत्काल सांगून त्या देवींना आश्चर्यचकित करीत असे. भगवान वृषभदेव सुद्धा मातेच्या गर्भात त्यांना कोणत्याही प्रकारचे कष्ट उत्पन्न होऊ देत नसे. माता मरूदेवीचे कृश उदर पूर्विसारखेच तीन वळांनी सुशोभित - तन्वंगी, राहूनच गर्भाची वाढ होत होती. हा भगवान वृषभदेवाच्या तेजाचाच परिणाम होता. मातेच्या उदरांमध्ये कोणताही विकार उत्पन्न झाला नव्हता, ना त्यांच्या स्तनांचे अग्रभाग काळे झाले होते, ना त्यांचा चेहरा पांढरा झाला होता. ह्या आश्चर्याच्याच गोष्टी होत्या.

मरूदेवीच्या गर्भात असलेले, मति, श्रुत आणि अवधि अशा तीन ज्ञानाने विशुद्ध अंतःकरण धारण केलेले भगवान वृषभदेव, ज्याप्रमाणे स्फटिकमण्यांनी बनविलेल्या घरात मध्यभागी निश्चल दीपक जसा सुशोभित होतो, त्याचप्रमाणे शोभायमान होते. आपल्या सर्व पापांचा क्षय करण्याच्या उद्देशाने इंद्राने पाठविलेली इंद्राणी सुद्धा अन्य देवींच्या बरोबर मरूदेवीची सेवा करीत होती. ज्याप्रमाणे अतिशय सुशोभित चंद्रमाची कला आणि सरस्वतीदेवी कोणालाही नमस्कार करीत नाही परंतु सर्वजण त्यांनाच नमस्कार करतात, त्याचप्रमाणे मरूदेवी माता सुद्धा कोणास नमस्कार करीत नव्हती. जगांतील सर्व लोक तिलाच नमस्कार करीत असे. या विषयी अधिक सांगण्याचे काही आवश्यक आहे काय ? एवढेच पूर्ण आहे की, मरूदेवी, विश्वनिर्माता अर्थात भोगभूमिनंतर कर्मभूमीची व्यवस्था करणाऱ्या श्री वृषभदेवाची जननी होती. म्हणून सांगायला पाहिजे की ती सर्व लोकाची जननी (जगन्माता) होती.

**भगवान् वृषभदेवाचा जन्म :** नऊ महिने पूर्ण झाल्यानंतर श्री, ऱ्ही, आदि देवींच्या सेवेत असलेल्या माता मरूदेवीने चैत्रकृष्ण नवमीच्या दिवशी सूर्योदयाच्या वेळेस उत्तराषाढ नक्षत्रांत आणि ब्रह्म नावाच्या महायोगांत मति, श्रुति आणि अवधि या तीन ज्ञानांनी सुशोभित अशा बालकांस जन्म दिला. वृषभदेव बालक असून गुणांनी परिपक्व आणि तीन लोकांचा एकमात्र स्वामी असा दैदिप्यमान पुत्र होता. त्या वेळी सर्व दिशा निर्मळ-स्वच्छ झाल्या होत्या. सर्व प्रजा अतिशय हर्षित झाली होती आणि कल्पवृक्ष स्वयं फुलांची वृष्टी करू लागले होते. देवांच्या महालांत स्वयं सूचक दुंदुभि इत्यादि वाजू लागली. शीतल व सुगंधित मंद-मंद वारा वाहू लागला. अकस्मात सर्व देवांचे आसन कंपायमान झाले. देवांच्या मस्तकांवर लागलेले मुकूट स्वतःच खाली उतरले. कल्पवासी देवांच्या घरी घंटानाद, ज्योतिषीवासी देवांच्या घरी सिंहनाद, व्यंतरदेवांच्या घरी भेरीनाद तथा भवनवासी देवांच्या घरी शंखध्वनी होऊ लागला. इंद्राचे आसन सुद्धा कंपायमान झाले. इंद्राने आपल्या अवधिज्ञानाने तीर्थंकर सूर्याच्या उदयास जाणले. इंद्राने आपल्या आसनावरून उतरून भगवानास परोक्ष नमस्कार केला.

**इंद्राचे आगमन :** सौधर्म स्वर्गाचे सौधर्म इंद्र व इंद्राणीने एक लाख योजन अशा विस्तृत हत्तीवर अनेक देवांना बरोबर घेऊन त्यानंतर अयोध्या नगरीकडे प्रस्थान केले. इंद्राच्या आज्ञेने स्वर्गातील हत्ती, घोडे इत्यादि सात प्रकारची सेना, सामानिक, त्रायस्त्रिंश, पारिषद इत्यादि सर्व प्रकारचे देव इंद्राच्या चारही बाजूंनी चालू लागले. सर्व देव-देवेंद्र आपल्या-आपल्या विमानात आणि वेगळ्या-वेगळ्या वाहनांवर बसून जय-जय शब्दोच्चारण करीत समस्त आकाशरूपी अंगणाला व्याप्त करून येऊ लागले होते. देवांच्या समुहाने घेरलेल्या सौधर्म इंद्राने

अयोध्या नगरीची प्रदक्षिणा करून अयोध्यापुरी मध्ये प्रवेश केला.

**प्रसुतिगृहातून जिन बालकाला घेऊन येणे :** इंद्राणीने मोठ्या उत्साहाने प्रसुतिगृहात प्रवेश केला आणि तेथेच जिन बालकाबरोबर मरूदेवीचे दर्शन केले. सर्वप्रथम अनेक वेळा प्रदक्षिणा देऊन जगद्‌गुरू जिनेंद्र देवाला नमस्कार केला. स्वतःस अदृश्य ठेवून अनेक प्रकारांनी जिनमातेची स्तुती केली. तिला मोहीत करून झोपविले आणि तिच्या जवळ मायावी दुसरा बालक झोपवून तेजःपूंज जगद्‌गुरू भगवानाला दोन्ही हातांनी उचलून परम आनंदित झाली. भगवानाच्या शरीराला पुन्हा-पुन्हा स्पर्श करून महान पुण्याचा बंध केला. या पुण्यबंधाने तिचा स्त्री पर्याय नष्ट झाला. जिन बालक रूपी सूर्याला घेऊन इंद्राणी व तिच्या पुढे-पुढे अष्टमंगलद्रव्य घेऊन दिक्कुमारीकां देवी चालत होत्या. त्या अशा दिसत होत्या की जणू काही भगवानाच्या सेवकाच आहेत. आपणास कृतकृत्य मानून इंद्राणीने आदर सहित जिनसूर्यरूपी बालकाला इंद्राजवळ दिले.

**इंद्राचे भगवानाला मांडीत घेऊन मेरू पर्वतावर जाणे :** सौधर्म इंद्र अतिहर्षित होऊन भगवानाला मांडीत घेऊन त्यांचे सुंदर स्वरूप अपलक नेत्रांने पाहत होते. अनेक प्रकारची स्तुती करून सुद्धा मन संतुष्ट झाले नाही म्हणून त्याने आपले एक हजार नेत्र उघडले. अति शिघ्र मेरू पर्वतांवर चालण्यासाठी इंद्राने आपला हाथ उंच करून इशारा केला. त्यावेळी हे देव ! आपली जय हो ! आपण समृद्धीमान हो ! इत्यादि मंगल शब्द उच्चस्वरात म्हणत देवांनी इतका अधिक हर्षोल्हास केला की सर्व दिशा निनादून गेल्या. आकाश मार्गाने जात असताना देवगण स्तुती, नृत्य, संगीत इत्यादिंनी रस्त्यांत करोडो उत्सव साजरे करीत होते. भगवान सौधर्म इंद्राच्या मांडीत बसले होते. ईशानइंद्र पांढरे छत्र लावून त्यांची सेवा करीत होता तर सानत्कुमार आणि महेंद्र स्वर्गांतील इंद्र प्रभुच्या दोन्ही बाजूंनी क्षीर सागराच्या लहरी प्रमाणे शुभ्र चंवर ढाळू लागले होते. मेरू पर्वतापर्यंत नील मण्यांनी सुशोभित पायऱ्या अशा दिसत होत्या की जणू काही आकाश भक्तीरूपी सीडी द्वारा पर्यायाला प्राप्त झाले आहे. क्रमाक्रमाने ते इंद्र देव ज्योतिष पटलाचे उल्लंघन करून नव्यांणवे हजार योजन ऊंच अशा सुमेरू पर्वतावर पोहचले.

**पांडूक शिलेवर जिन बालकाचा जन्म महोत्सव :** इंद्राने मोठ्या उत्साहाने अनेक देवांबरोबर त्या गिरिराज सुमेरू पर्वताची प्रदक्षिणा केली. पांडूक वनांत ईशान्य दिशेमध्ये असलेल्या पांडूक शिलेवर भगवान रूपी सूर्यास विराजमान केले. ती शिला अत्यंत पवित्र आहे व १०० योजन लांब, ५० योजन रूंद, ८ योजन उंच आणि अर्ध चंद्राकार आकाराची आहे या शिळेच्या मध्यभागी जिनेंद्र भगवानाला विराजमान करण्यासाठी श्रेष्ठ सिंहासन आहे. आजू-बाजूला सौधर्म व ईशान इंद्रासाठी दोन भव्य आसन आहे. जिनेंद्र भगवानच्या जन्म कल्याणकाचे महादृष्य पाहण्यासाठी देवगण त्या पांडूक शिळेच्या चारही बाजूंनी क्रमाक्रमाने यथायोग्य स्थानी बसले. देवांची सेना सुद्धा त्या पांडूक वनांत आकाशरूपी आंगणात स्थिर होऊन मेरू पर्वताच्या वरच्या भागात व्याप्त होऊन थांबली.

सौधर्म इंद्र भगवानाचे मुख पूर्व दिशेला करून पांडूकशिळेवर ठेवलेल्या सिंहासनावर भगवंतांना विराजमान करून त्यांचा अभिषेक करण्यासाठी तयार झाले. त्यावेळी सर्व आकाशात दुंदूभि वाद्य वाजू लागले, अप्सरा नृत्य करू लागल्या होत्या. त्यावेळी इंद्राने अशा भव्य मंडपाची रचना केली होती की त्या मंडपात तिन्ही लोकातील सर्व प्राणी काही एक अडचण न जाणवता बसू शकत होते. त्या मंडपात कल्पवृक्षांच्या पुष्पांच्या अनेक माळा टांगल्या होत्या.

सौधर्म इंद्राने, भगवानाच्या जन्मोत्सवाच्या त्या अवसराला अनुकूल संपूर्ण विधिविधान करण्यासाठी चंदन अर्पित केलेला प्रथम कळस उचलला व कळस उचलण्याच्या इशाऱ्याला समजून ईशान इंद्राने दुसरा कळस उचलला. हे कळस ८ योजन खोल, तोंडावर १ योजन रूंद, आणि मध्यभागी ४ योजन रूंद स्वर्णमय असतात.

देवांनी हातोहात क्षीर समुद्रावरून भरून आणलेले हे कळस मोत्यांच्या माळांनी वेष्टित आणि चंदनाचा टीका केलेले व अशोक वृक्षांच्या पानांनी सुशोभित केलेले असतात. त्या सर्व कळसांना एकसाथ उचलण्यासाठी इंद्राने आपल्या विक्रिया शक्तीने एक हजार हाताचे स्वरूप धारण केले व सर्व कळस एक साथ घेऊन अभिषेक प्रारंभ केला. जेव्हा सौधर्म इंद्राने जयजयकार करून प्रथम जलधारा भगवानाच्या मस्तकांवर सोडली त्याच वेळी अन्य देवांनी सुद्धा जय-जयकार करून हर्षोल्हासित होऊन जलांनी भरलेल्या स्वर्ण कळसांनी नूतन बालकाचा अभिषेक केला. अभिषेकाच्या वेळी असे वाटत होते की जणूं काही एकाच वेळी गंगा-सिंधू इत्यादि नद्या भगवानाच्या मस्तकांवर प्रवाहित होत आहेत. जरी भगवान नुकतेच जन्म घेतलेले बालक होते तरीपण मेरू प्रमाणे सुदृढ व स्थिर होते. भगवानाच्या अभिषेकातून निर्मित झालेला जलप्रवाह मेरू पर्वतांवरून जेव्हा वाहू लागला त्यावेळी असे वाटावयास लागले की, क्षीर समुद्राचा जलप्रवाह मेरू पर्वताची उंची मोजत आहे. वर पासून पृथ्वी तळापर्यंत सर्व बाजूंनी जल प्रवाहाने वेष्टित झालेला हा मेरू पर्वत स्फटिक मण्यांचा पर्वत आहे की अमृताची राशी आहे ? अशा कल्पनांना उत्पन्न करत होता.

जेव्हा शुद्ध जलाने अभिषेक पूर्ण झाला तेव्हा इंद्राने सुगंधित द्रव्याने युक्त जलाद्वारा भगवानाचा अभिषेक प्रारंभ केला. सुगंधित जलाने भगवानाचा अभिषेक करून इंद्राने संपूर्ण विश्वाच्या शांतिसाठी गंभीर स्वराने शांतिमंत्र म्हणण्यास सुरुवात केली. देवांनी त्या गंधोदकाला सर्वप्रथम आपल्या मस्तकांवर लावले व नंतर सर्व शरीरास लावले. शिल्लक राहिलेल्या गंधोदकास स्वर्गात घेऊन जाण्यासाठी भरून घेतले. अभिषेक समाप्त झाल्यानंतर देवांनी तीन लोकांतील वंदनीय उत्कृष्ट भव्य, दिव्य आत्मारूपी भगवानाची प्रदक्षिणा करून मंत्रोच्चाराद्वारे पवित्र केलेल्या जल, गंध, अक्षत, पुष्प, नैवेद्य, दीप, धूप, फळ आणि अर्घ द्वारा पूजा केली. ज्यांचा अभिषेक स्वयं इंद्राने केला, मेरू पर्वतांवर स्नान करण्यासाठी सिंहासन होते, देवी ज्यांच्यासाठी नृत्य करत होत्या, देव ज्यांच्या सेवेत हजर होते, क्षीर समुद्र ज्यांच्या स्नानाचे पात्र होते आणि अशाप्रकारे अत्यंत पवित्र अशा मेरू पर्वतांवर ज्यांचा जन्माभिषेक महोत्सव संपन्न झाला होता ते पवित्र आत्मा असलेले भगवान संपूर्ण जगाचे कल्याण करो.

त्यानंतर इंद्राणीने अत्यंत भक्तिभावाने भगवानास अलंकार घालण्यास सुरुवात केली. भगवानाच्या शरीरावरील जल कणांना स्वच्छ वस्त्राने पुसून मस्तकावर तिलक लावला व माळा, मुकूट, मुद्रिका, बाजूबंद, कंगन, करधनी इत्यादि अलंकारांनी आणि दिव्य वस्त्रांनी त्यांना विभूषित केले. त्यावेळेचे भगवानाचे दिव्य स्वरूप पाहून इंद्राची तृप्ती झाली नाही म्हणून त्याने आपले एक हजार नेत्र उघडले होते. सर्व देवांनी आणि असुरांनी सुद्धा भगवानाच्या अप्रतिम दिव्य स्वरूपाला अपलक नेत्रांनी पाहून आपल्या पर्यायाला धन्य मानले. इंद्र आणि सर्व देवांनी मिळून भगवानाची अनेक प्रकाराने स्तुती केली.

त्यानंतर इंद्राने अन्य देवांसहित बालक वृषभदेवाला घेऊन नाभीराजाच्या अत्यंत वैभवपूर्ण सुशोभित भवनांत प्रवेश केला. देवनिर्मित श्रीगृहाच्या आंगणात बालरूपधारी भगवानाला सिंहासनावर विराजमान केले. माता-पित्याला प्रसन्न करण्यासाठी इंद्राने त्यांना अनेक प्रकारचे आभूषण, माळा आणि मूल्यवान वस्त्र भेट देऊन त्या जगतपूज्य माता-पित्याची पूजा केली. पुन्हा नाना प्रकारच्या स्त्रोत्रांनी त्यांची स्तुती करावयास लागले. हे पूज्य ! आज आपले हे घर आमच्यासाठी जिनमंदिरासारखे पूजनिय आहे. त्रिलोकीनाथ प्रथम तीर्थंकराचे आपण आई-वडील आहेत म्हणून आपण तिनही जगताचे माता-पिता आहात. अशाप्रकारे अनेक प्रकारांनी स्तुती करत त्यांच्या हातात भगवानाला सोपविले. माता-पित्याने सुद्धा नगरवासी आणि उपस्थित अन्य भव्य लोकांच्या सोबत पुन्हा जन्मोत्सव साजरा केला. ज्याप्रमाणे मेरू पर्वतांवर जन्म महोत्सव झाला होता त्याचप्रमाणे सर्व जगाला आनंदित करणारा महोत्सव राजमहालाच्या अंतःपुरामध्ये व संपूर्ण अयोध्या नगरीत

साजरा झाला.

त्या नगरवासीयांचा आनंद पाहून आपला आनंद प्रगट करण्यासाठी इंद्राने **"आनंद"** नावाचे नाटक प्रारंभ केले. तिनही जगात पर्वतांसहित पसरलेली पृथ्वी त्याची रंगभूमी होती. स्वयं इंद्र मुख्य नृत्य करणारा पात्र होता. नाभीराजासहित उपस्थित श्रेष्ठतम पुरूष त्या नृत्याचे दर्शक होते. आणि जगत वंदनीय भगवान वृषभदेव आराध्य देव होते. धर्म, अर्थ, काम स्वरूपावर विजय करून परम आनंद रूपी मोक्षाला प्राप्त करणे हे त्याचे फळ होते. त्यावेळी इंद्राने सर्व प्रथम "धर्म, अर्थ, काम स्वरूपांवर विजय प्राप्त" **करण्यास उपयुक्त गर्भावतार संबंधी नाटक प्रस्तुत केले. त्यानंतर जन्माभिषेकासंबंधी नाटक प्रस्तुत केले. त्यानंतर भगवानाच्या महाबल आदि पूर्व दहा अवतारांच्या संबंधाला दाखविणारे त्यांचे अनेक प्रसंग प्रस्तुत केले. सर्वप्रथम मंगलाचरण करून पुष्पांजली अर्पित केली आणि तांडव नृत्य करण्यास सुरुवात केली. त्यावेळी त्यांच्या भक्तीने प्रसन्न होऊन देवांनी आकाशांतून पुष्पवृष्टी केली, करोडो वाद्य एक साथ वाजावयास सुरुवात झाली. किन्नर देवी मंगल गीत गाऊ लागल्या. महाराज नाभीराज मरूदेवी सह ते आश्चर्यकारी नृत्य पाहून अत्यंत हर्षित झाले आणि इंद्राद्वारा केलेल्या प्रशंसेला प्राप्त झाले.**

**नामकरण :** हे भगवान् सर्व जगांत श्रेष्ठ आहेत आणि जगाचे हित करणारे, धर्मरूपी अमृताची वर्षा करतील म्हणून इंद्राने त्यांचे "वृषभदेव" हे सार्थक नांव ठेवले. **"पुरूदेव", "आदीनाथ", "ऋषभदेव"** इत्यादि नांवे सुद्धा प्रसिद्ध आहेत.

त्यानंतर त्यांच्या सेवेसाठी समान अवस्था, समानरूप आणि समान वेष धारण करणाऱ्या देव कुमारांना भगवानाच्या बरोबर बाल सुलभ क्रिडा करण्यासाठी नियुक्त केले. स्नान करण्यास, वस्त्राभूषण घालण्यास व शरीर संस्कार करण्यास अनेक देवींना सेविका म्हणून नियुक्त करून इंद्र आणि सर्व देव आपल्या-आपल्या स्थानी परत गेले.

**भगवान् वृषभदेवाची बाल्यावस्था :** भगवान् वृषभदेव आपल्या बाल्यावस्थामध्ये केव्हा केव्हा मंद स्मित हास्य करीत असे तर कधी कधी काचेसारख्या स्वच्छ पृथ्वीवर हळूहळू पावलाने पडत-उठत चालत देव बालकांच्या बरोबर रत्नाच्या धूळीमध्ये बालसुलभ क्रिडा करत माता-पित्यांना अत्यंत सुख देत असे. जन्मतः ते मति, श्रुत आणि अवधी ह्या तीन ज्ञानाचे धारक असल्यामुळे ह्या संसाराच्या समस्त परिस्थितीला समजणारे आणि समग्र विद्यांचे ज्ञानधारी सरस्वतीचे एकमात्र अधिकारी होते. त्यामुळे ते समस्त जगताचे गुरू झाले होते. त्यांचे शरीर असाधारण मल, मूत्र, घाम रहित तापवलेल्या सुवर्णासारखे होते. त्यांच्या शरीरात दूधासारखे शुभ्र रक्त, समचतुरस्त्र प्रकारची उत्तम देहयष्टि आणि वज्रवृषभनारांच शक्तिरूपी संहनन होते, सुंदरता आणि सुगंधाच्या अत्युच्च सीमेपर्यंत १००८ शुभ लक्षणांनी अलंकृत अतिशय शक्ती सामर्थ्यवान होते. ते भगवान् हितमित वचन बोलणारे होते. ते मातेचे दूध पीत नसत परंतु इंद्राद्वारा हाताच्या अंगुठ्यात स्थापीत केलेल्या अमृताचे रसपान करीत असे. अंगुठा चोखत त्यांची वाढ होत होती.

चरम शरीराला धारण करणारे भगवानाचे आयुष्य चौऱ्यांशी लाख पूर्व वर्षांचे होते. श्रीवृक्ष, शंख, कमळ, स्वस्तिक इत्यादि १०८ लक्षण आणि तीळ, मस इत्यादि ९०० व्यंजन त्यांच्या शरीरांवर उपस्थित होते. म्हणजेच, १०८ लक्षण व ९०० व्यंजन मिळून १००८ शुभलक्षण त्यांच्या शरीराला शोभायमान करीत होते. ह्याप्रमाणे देवांनी आणलेल्या उत्तम-उत्तम भोगोपयोगी पदार्थांचा उपभोग करीत आनंदपूर्वक त्यांचा बाल्यकाळ व्यतित झाला होता.

**भगवानाच्यासाठी दैवी भोजन, वस्त्र इत्यादि :** भगवानाच्या उपयोगासाठी कोमल शय्या, कोमल आसन, वस्त्र, आभूषण, उबटन, भोजन, वाहन तथा विमान इत्यादि सर्व वस्तु देवनिर्मित होत्या. सौधर्म **"स्वर्गांत इंद्र**

भवनाच्या ईशान्य दिशेमध्ये "सुधर्मा" नावाचे सभामंडप आहे. त्यामध्ये इंद्राचे सिंहासन आहे. ह्या मंडपाच्या समोर एक मानस्तंभ आहे. हा मानस्तंभ एक योजन रूंद, छत्तीस योजन उंच, वज्र पाषाणांनी बनलेला एक कोस विस्तार असलेला व त्याचा आकार बारा कोनीय गोल आहे. ह्या मानसस्तंभासारखे रत्नांच्या साखळीने लटकलेले करंडे आहे. ह्यामध्ये तीर्थंकरांना उपयोगांत येणारे वस्त्र, आभूषण इत्यादि असतात. भगवानाच्या भोगोपभोगाला योग्य वस्तूंना इंद्र इत्यादि देवगण करंडकातून आणतात.

**भगवान् वृषभदेवाचा विवाह महोत्सव :** भगवानाच्या युवा अवस्थेचा प्रारंभ पाहून महाराज नाभीराज मनात विचार करतात की ह्यांची धर्म ध्यानाच्या प्रवृत्तीमध्ये विशेष रूची आहे आणि विधिच्या विधानाला अनुसरून सर्व परिग्रह त्याग करून वनांमध्ये जाऊन दीक्षा ग्रहण करतील. परंतु तपश्चर्या करण्यासाठी जोपर्यंत वेळ येत नाही तोपर्यंत ह्यांच्याकरिता लोक व्यवहाराला अनुसरून सुयोग्य पत्नीचा विचार करावयास पाहिजे. असा निर्णय घेऊन महाराज नाभीराज मोठ्या आदराने भगवानाजवळ गेले आणि म्हणाले की हे देव ! मी आपणांस काही सांगत आहे ते आपण शांतपणे ऐका. आपण जगाचे अधिपति आहात. आपणांस जगांवर उपकार करावयाचा आहे. आपण जगांची निर्मिती करणारे ब्रह्मा आहात - स्वयंभू आहात - स्वनिर्मित आहात. आपल्या जन्मासाठी आम्ही माता-पिता केवळ निमित्य मात्र आहोत. प्रजा महापुरुषांचे अनुकरण करत असते, म्हणून ज्ञानीमध्ये श्रेष्ठ असलेले तुम्ही कोणत्याही उत्तम कन्येशी विवाह करण्यासाठी आपल्या मनांस तयार करा. असे केल्याने प्रजांची संतती नष्ट होणार नाही व यानेच धर्माची संतती वाढेल. तेव्हा हे देव ! मनुष्याच्या ह्या अविनाशिक विवाहरूपी धर्माचा आपण अवश्य स्वीकार करा. आपण जर मला गुरू मानता तर आपणास माझा हा प्रस्ताव अवश्य मान्य करावा लागेल. महाराज नाभीराजाचे वचन ऐकून हसत वृषभदेवाने **"ओम"** म्हणून त्यांचा प्रस्ताव स्वीकार केला. **इंद्रीयांना वश करणाऱ्या भगवानाने विवाहास स्वीकृती दिली यात काय पित्याच्या प्रस्तावाची चतुराई होती, या प्रजांवर उपकार करण्याची इच्छा होती, या तशाच प्रकारच्या कर्माचा उदय होता ?**

भगवानाची अनुमति घेऊन राजा नाभीराजाने इंद्राच्या सहमतीने सुशील, सुंदर आणि शुभ लक्षणांनी युक्त अशा, **"यशस्वती"** आणि **"सुनंदा"** नावाच्या **दोन कन्यांशी व वृषभदेवाचे पाणीग्रहण केले होते. ह्या दोनही, राजा कच्छ आणि महाकच्छ राजांच्या बहिणी होत्या. भगवानाच्या विवाहाच्या वेळेस इंद्राने देवासहित अनेक उत्सव साजरे केले होते.**

भगवान वृषभदेवास पुत्र-पुत्री यांची प्राप्ती : **एक वेळी यशस्वती महादेवी आपल्या राजमहालांत झोपली होती, तेव्हा रात्रीच्या अंतीम प्रहरी तिने स्वप्नात ग्रहण लागलेली पृथ्वी, सुमेरू पर्वत, चंद्रमा सहित सूर्य, हंस सहित सरोवर आणि उत्तुंग लहरींनी युक्त असा समुद्र पाहिला. त्यानंतर, मंगल वाद्य व गीतांनी जागृत झालेल्या राणीने वृषभदेवास त्या स्वप्नांचे फळ विचारले. वृषभदेव म्हणाले हे देवी ! तुला चक्रवर्ती पुत्र होईल. हे एकून राणी अत्यंत हर्षित झाली. क्रमशः नऊ महिन्याचा काळ संपल्यावर यशस्वती महादेवीने महापुण्यशाली पुत्रास जन्म दिला. त्यावेळेस उत्तम शुभ नक्षत्र आणि चैत्र कृष्ण नवमीचा दिवस होता. हाच पुत्र प्रथम चक्रवर्ती भरत महाराज झाला.**

**भरताच्यानंतर यशस्वतीला वृषभसेन, अनंतवीर्य इत्यादि नव्याण्णव पुत्र झाले. ते सर्व चरम शरीरी, महाप्रतापी होते व ब्राह्मी नावाची कन्या जन्मास आली. भगवान वृषभदेवाची दुसरी पत्नी सुनंदा हिने भगवान बाहुबली व सुंदरी नावाच्या पुत्रीस जन्म दिला. हे बाहुबली स्वामी चोवीस कामदेवांमध्ये प्रथम कामदेव झाले. एकशेएक पुत्र व दोन कन्या यांना प्राप्त केल्याने भगवान वृषभदेव प्रसन्न होते तसेच महाराज नाभीराज आणि महाराणी मरूदेवी सुद्धा अतिशय प्रसन्न होते. जेव्हा पुत्र-पुत्र्या योग्य अवस्थेत आले तेव्हा भगवान वृषभदेवाने**

त्यांना सर्वगुणसंपन्न व सुसंस्कारित केले. कर्मयुगाच्या प्रारंभी भगवान वृषभदेवांनी आपल्या पुत्रांना कंठ, वक्षस्थळ इत्यादिंना सुशोभित करणारे हार, कंकण, मुद्रिका इत्यादि अनेक आभूषण बनवून त्यांना अलंकृत केले होते.

**ब्राह्मी आणि सुंदरीचे विद्याध्ययन :** कोण्या एकावेळी भगवान् वृषभदेव सिंहासनावर बसले असता त्यांनी आपले मन कला आणि विद्या यांच्या उपदेशांत लावले होते. त्याच वेळी ब्राह्मी आणि सुंदरी ह्या दोन्ही मुली मंगल वेशभूषा धारण करून वृषभदेवाचा आशीर्वाद घेण्यास आल्या. त्या दोघींनी वृषभदेवास नमस्कार केला. भगवान् वृषभदेवांनी त्यांना आशीर्वाद देऊन मोठ्या प्रेमाने आपल्या मांडीवर बसविले. त्यांच्या मस्तकावरून वात्सल्यपूर्वक हात फिरविला व विनोदपूर्ण वार्ता करू लागले, व नंतर म्हणाले की हे पुत्री ! तुम्ही दोघी विद्या ग्रहण करण्याचा प्रयत्न करा कारण विद्या अध्ययन करण्याचा हाच काळ आहे. भगवान् वृषभदेवांनी त्यांना आशीर्वाद देऊन आपल्या अंतःकरणांत स्थिर असलेल्या श्रुतदेवाला स्मरण करून सुवर्णाच्या विस्तृत पटांवर आदरपूर्वक स्थापित केले. नंतर भगवानाने **"सिद्धं नमः"** मंगलाचरणपूर्वक उच्चारून आपल्या उजव्या हाताने, -"अ, आ, इ, ई" इत्यादि वर्णमाला लिहून ब्राह्मीस शुद्ध अक्षरावली लिहिण्याचा उपदेश दिला, ज्याचे नाव सिद्धमातृका आहे. याचे स्वर आणि व्यंजन असे दोन भेद आहे व सर्व विद्यांमध्ये याचा समावेश आहे. भगवानाने आपल्या डाव्या हाताने "एकं, दहं (ईकाई, दहाई)" इत्यादि संख्या लिहून सुंदरीस अंकगणित लिहिण्याचा उपदेश दिला. वाङमयाशिवाय कोणतेही शास्त्र नाही वा कोणतीही कला नाही म्हणून वृषभदेवांनी आपल्या कन्यांना वाङ्मयाचा उपदेश दिला. व्याकरणशास्त्र, छंदशास्त्र आणि अलंकारशास्त्र या तिघांना मिळून वाङ्मय होते. भगवानांनी जे व्याकरण शास्त्र तयार केले होते ते अतिशय विस्तृत होते. त्यात १०० च्या वर अध्याय होते. भगवानांनी सर्व प्रथम ब्राह्मी कन्येला वर्णमालेचे ज्ञान दिले म्हणूनच आजसुद्धा त्याला ब्राह्मीलिपी म्हटल्या जात आहे. वडीलांच्या आग्रहाने ह्या दोन्ही मुली सवे विद्यांत निपुण होऊन सरस्वती देवीचा अवतार म्हणविण्यास योग्य झाल्या होत्या.

**भरत इत्यादि पुत्रांचे विद्याध्ययन :** जगत्गुरू भगवान् वृषभदेवाने आपले पुत्र भरत, बाहुबली इत्यादि सर्वांना विनयशील बनवून क्रमाने आम्नायास अनुसरून त्यांना शास्त्र शिकविले. विस्तृत अध्यायांनीयुक्त अर्थशास्त्र, नृत्यशास्त्र, चित्रकलाशास्त्र, वास्तुशास्त्र, शिल्पीशास्त्र, कामशास्त्र, आयुर्वेद, तंत्रपरीक्षा, रत्नपरीक्षा इत्यादि अनेक विषयांना शिकविले. ह्याबद्दल अधिक सांगावयाचे ते काय ? लोकांवर उपकार होईल असे जे जे शास्त्र होते ते सर्व शास्त्र वृषभदेवाने आपल्या पुत्रांना शिकविले होते. अशाप्रकारे आपल्या इष्ट स्त्री, पुत्र, पुत्रीसह सुखाचा अनुभव घेत गृहस्थाश्रमांत वृषभदेवाचा अनेक वर्षांचा काळ व्यतित झाला होता, अर्थात, वीस लाख पूर्व वर्षांचा कुमार काळ पूर्ण झाला होता.

ह्या मधल्या काळांत, काळाच्या प्रभावाने महौषधि, दीप्तौषधि, कल्पवृक्ष तथा सर्व प्रकारच्या औषधी शक्तिहीन झाल्या होत्या. मनुष्यांच्या उदरनिर्वाहासाठी पेरल्याशिवाय जे धान्य निर्मित होत होते ते सुद्धा काळाच्या प्रभावाने दुर्लभ झाले होते. कल्पवृक्षांचे रस, विर्य आदि नष्ट झाल्याने व्याकुळ झालेली प्रजा जीवित राहण्याच्या इच्छेने महाराज नाभीराजाजवळ गेली व पुन्हा त्यांच्या आज्ञेने प्रजा भगवान् वृषभदेवाजवळ गेली. भगवान् वृषभदेवाला नमस्कार करून निवेदन करू लागली की हे तीन लोकांचे स्वामी ! आम्ही उदर निर्वाह प्राप्तीच्या इच्छेने आपणास शरण आलो आहे. अतः उपाय सांगून आमची रक्षा करा.

अशाप्रकारे प्रजाजनांचे करूण, आर्द्र वचन ऐकून सहृदय आदीनाथ भगवान आपल्या मनात विचार करू लागले -

"पूर्व[1] आणि पश्चिम विदेह क्षेत्रांत जी स्थिती सध्या वर्तमान काळात आहे तशीच स्थिती येथे उत्पन्न

१. पूर्वापरविदेहेषु या स्थितः समवस्थिताः । साथ प्रवर्तनीयात्र यतोन्त्यमूः प्रजा ॥१४३॥
षट् कर्माणि यथा तत्र यथा वर्णाश्रयस्थितिः । यथा ग्रामगृहादीनां संस्त्याश्च पृथग्विधाः ॥ १४४॥ - आदिपुराण पर्व १६, पृ. ३५०

करावी लागेल, तरच प्रजा जीवंत राहू शकेल. तेथे ज्या प्रमाणे असि, मसि इत्यादि सहा कर्म आहे, ज्याप्रमाणे क्षत्रिय वगैरे वर्ण व्यवस्था आहे आणि ग्राम, नगर, घर इत्यादिंची अलग-अलग रचना आहे त्याचप्रमाणे येथे सुद्धा झाली पाहिजे." याच उपायांनी प्राण्यांची आजिविका चालू शकते. कल्पवृक्ष नष्ट झाल्यामुळे कर्मभूमि प्रकट झाली आहे तेव्हा सर्व प्रजाजनांना असि, मषि आदि सहा कर्मांनीच आजीविका करणे उपयुक्त होईल.

त्यानंतर वृषभदेवांनी इंद्राचे स्मरण केल्याबरोबर अन्य देवांच्या सोबत इंद्र आले व त्याने खाली लिहिल्याप्रमाणे विभाजन करून प्रजेच्या उदरनिर्वाहांचे उपाय केले. इंद्राने शुभ दिन, शुभ नक्षत्र, शुभ मुहूर्त तथा शुभ लग्न समयी सूर्य, चंद्र इत्यादि ग्रह आपल्या उच्च स्थानी असताना जगत्गुरू भगवानाची प्रत्येक प्रकारची अनुकूलता पाहून सर्व प्रथम मांगलिक कार्य केले आणि त्याने अयोध्यानगरीच्या मध्यभागी जिनमंदिराची रचना केली. त्यानंतर पूर्व, पश्चिम, उत्तर, दक्षिण ह्या चारही दिशांना एक-एक जिनमंदिर बांधले. त्यानंतर कौशल इत्यादि महादेश, अयोध्या इत्यादि नगर, वन आदि सीमा सहित ग्राम तथा खेड्यांची रचना केली. देशाच्या मध्यभागी चार भिंतींसहित दुर्ग, खाई, नगराचे मुख्य प्रवेश द्वार, बहुमंजिली भवन इत्यादिंनी सुशोभित राजधानी तयार केली. इंद्राने नगर आणि गावांचा अलग-अलग विभाग केलेल्या कार्यावरून इंद्रास "पुरंदर" हे सार्थक नाव पडले. त्यानंतर भगवानाच्या आज्ञेने नगर, गांव, खेड्यामध्ये प्रजेला सुव्यवस्थित स्थापित करून इंद्र कृतकृत्य झाला व नंतर प्रभुच्या आज्ञेने स्वर्गास परत गेला.

**भगवान द्वारा प्रजेला षटकर्मांचा उपदेश :** असि[२], मसि, कृषि, विद्या, वाणिज्य आणि शिल्प हे सहा कार्य प्रजेच्या आजीविकेचे साधन आहेत. भगवान वृषभदेवाने आपल्या बुद्धि कौशल्याने प्रजेला ह्या सहा कार्याने आजीविका करण्याचा उपदेश दिला होता. ते ठीकच होते कारण त्यावेळी जगत्गुरू भगवान सरागी होते, वीतरागी नव्हते, सरागी अवस्थेतच सांसारिक कार्याचा उपदेश देऊ शकतात. ह्या सहा कार्यात तलवार, कट्यार इत्यादि शस्त्र धारण करून सेवा करण्यास असि कर्म म्हणतात. लिहून आजीविका करण्यास मसि कर्म, जमीन नांगरणे व त्यात धान्य पेरणे याला कृषि कर्म, शास्त्र शिकविणे तथा नृत्य, गायन कले द्वारा आजीविका करणे विद्या कर्म, व्यापार करणे हे वाणिज्य कर्म आणि हस्तकला, चित्रकला, शिल्प निर्माण हे शिल्पकर्म आहे.

ह्यावेळी आदि ब्रह्मा वृषभदेवाने तीन वर्णांची स्थापना केली होती. विपत्तीपासून रक्षण करण्याच्या सामर्थ्य गुणांच्या क्रमाने क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र संबोधिल्या जात असे. ह्या तीन वर्णात विवाह जाती संबंध तथा व्यवहार वगैरे भगवानच्या आज्ञेनुसारच होत असे. ह्यावेळेस संसारामध्ये पापरहित जितके काही आजिविकेचे उपाय होते ते सर्व भगवानच्या संमतीने प्रस्तुत झाले होते. अशाप्रकारे भगवान वृषभदेवाने कृतयुगाचा प्रारंभ केल्याने त्यास "कृतयुग" म्हटल्या गेले. अशाप्रकारे आषाढ कृष्ण प्रतिपदेच्या दिवशी कृतयुगाची सुरुवात झाली. त्यामुळे सर्व प्रजा त्यांना **प्रजापती** म्हणू लागली होती. भगवानाने मनुष्यास इक्षुरसाचा संग्रह करण्याचा उपदेश दिला, म्हणून लोक त्यांना **इक्ष्वाकु** म्हणू लागले होते. काश्य - तेजाचे रक्षक असल्याने **काश्यप** म्हटल्या जावू लागले. प्रजेच्या आजिविकेच्या उपायांचे निरंतर मनन करीत होते म्हणून मनु आणि कुळांची व्यवस्था केली म्हणून **कुळकर** या **कुळधर** सुद्धा म्हटल्या जाऊ लागले होते. ह्यावेळेस प्रजा तिन्ही लोकांचे स्वामी भगवान् वृषभदेवास **विधाता, विश्वकर्मा** आणि **सृष्टा** इत्यादि नावांनी संबोधू लागली होती.

**भगवान्चा सम्राट पट्टाभिषेक महोत्सव :** सुखपूर्वक प्रजेचे पालन करत कितीतरी काळ लोटल्यानंतर देवांनी येऊन भगवान्चा सम्राट पदांवर अभिषेक करून मोठा उत्सव साजरा केला. अभिषेकासाठी गंगा-सिंधु इत्यादि पवित्र नद्यांचे, नंदा-नंदोत्तरा इत्यादी विहिरींचे आणि क्षीरसमुद्र, नंदीश्वर समुद्र, स्वयंभूरमण समुद्र

२. 'असिर्मशिः कृषिर्विद्या वाणिज्यं शिल्पमेव'च ।
कर्माणीमानि षोढा स्युः प्रजाजीवन हेतवः ॥१७९॥ आदिपुराण पर्व १६, पृ. ३६२

इत्यादींचे जल सुवर्ण कळसांत आणले होते, आणि गीत, नृत्य, वाद्य, ताल युक्त महोत्सवांत सुवर्ण घड्यांनी अभिषेक प्रारंभ केला होता. नाभीराज सहित जे जे श्रेष्ठ राजे त्यास्थानी उपस्थित होते त्या सर्व राजांनी "सर्व राजांमध्ये श्रेष्ठ असे वृषभदेवच वास्तविक राजा होण्यास उपयुक्त व योग्य आहे" असे म्हणून सर्वांनी सोबतच अभिषेक प्रारंभ केला. नगरवासियांनी सुद्धा, कोन्ही कमळ पत्रांच्या द्रोणाने, कोन्ही मातीच्या घड्यांनी शरयु नदीचे पाणी घेऊन भगवानच्या चरणांचा अभिषेक केला.

त्यानंतर भगवान्ची आरती उतारून स्वर्गांतून आणलेल्या वस्त्राभूषणांनी त्यांना अलंकृत केले. महामुकुटबद्ध राजांचे अधिपति होण्यास भगवान् वृषभदेवच पात्र आहे असे म्हणून महाराज नाभीराजने आपल्या हाताने आपल्या मस्तकावरील मुकूट काढून भगवान् वृषभदेवाच्या मस्तकांवर धारण केला. त्यानंतर इंद्र गणांनी पूर्ववत "आनंद" नावाचे नाटक केले व नंतर देवांसोबत आपआपल्या ठिकाणी परत गेले. भगवान्चा हा राज्यकाळ त्रेसष्ठ लाख पूर्व वर्षांचा होता व तो पुत्र, पौत्रांच्या सोबत सुखपूर्वक व्यतित होत होता.

**भगवान् वृषभदेवाचे वैराग्य :** एक वेळी भगवान् वृषभदेव विशाल सभामंडपाच्या मध्यभागी सिंहासनावर विराजमान होते, त्यावेळी, इंद्र देवगण आणि अप्सरांसहित भगवान्ची सेवा करण्याच्या उद्देशाने पूजन सामग्री घेऊन सभामंडपात आले. भगवान्ची आराधना करण्याच्या निमित्ताने अप्सरा आणि गंधर्व यांनी नृत्य करण्यास प्रारंभ केला. भगवान् राज्य आणि इतर सांसारिक भोगापासून कसे विरक्त होतील ह्याचा विचार करून इंद्राने, जिचे आयुष्य संपत आले आहे अशा **निलांजना** नर्तकीस नृत्य करण्यास आदेश दिला. देवनर्तकी निलांजना लय, भाव आणि रस सहित नाचत असतांनाच तिचा आयुरूपी दीपक विझला. ती विजेच्या वेगाने क्षणभरातच अदृश्य झाली. नृत्यात खंड व रस भंग होऊ नये म्हणून निलांजना नष्ट झाल्याबरोबर, इंद्राने, हुबेहूब तिच्याप्रमाणेच दुसरी नर्तकी तयार करून, नृत्य पूर्ववत चालूच ठेवले. परंतु भगवान्च्या तीक्ष्ण दृष्टिमधून हा फेरबदल सुद्धा लपू शकला नाही. त्याच क्षणी भगवान सांसारिक भोग उपभोगाच्या मोहातून विरक्त होऊन त्यांच्या मनात तीव्र वैराग्य भावना उत्पन्न झाली. ते विचार करू लागले की हे सत्य आहे की हे जगत विनाशी आहे. लक्ष्मी विजेसारखी चंचल आहे, यौवन, शरीर, आरोग्य आणि संपदा इत्यादि सर्व चलाचल आहे, त्यावेळी भगवान्चे हृदय वैराग्य भावनांनी व्याप्त झाले होते. मुक्तीमार्गाची लक्ष्मीरूपी संपदा व तिच्या मैत्रिणी - द्वादश अनुप्रेक्षा जणू काही साक्षात समोर उपस्थित आहेत. आपल्या अवधिज्ञानाने इंद्राने भगवानाच्या अंतःकरणांत जे काही द्वंद्व चालले होते, ते सर्व जाणून घेतले होते.

त्याचवेळी भगवान्च्या वैराग्य भावनांची प्रशंसा करण्यासाठी आणि त्यांच्या तप कल्याणकाची पूजा करण्यासाठी "लोकांतिकदेव" ब्रह्मलोकांतून उतरले. हे लोकांतिक देव सारस्वत आदित्य, वन्हि, अरूण, गर्दतोय, तुषित, अव्याबाध आणि अरिष्ट अशा आठ प्रकारचे आहे. हे सर्व देवांत उत्तम देवर्षि म्हटल्या जातात. हे पूर्वभवांत संपूर्ण श्रुतज्ञानाच्या अभ्यासाने अकरा अंग, चौदा पूर्वंचे पारंगत, विरक्त आणि बालब्रह्मचारी राहतात, पांचव्या स्वर्गात वरच्या भागात निवास करतात व नियमाने एक भवावतारी असतात. त्या देवांनी प्रथम कल्पवृक्षांच्या फुलांनी भगवान्च्या चरणांची पूजा केली आणि अर्थपूर्ण स्त्रोत्रांनी भगवंताची स्तुती करू लागले. हे देव आपले कार्य पूर्ण करून व आपणास कृतार्थ समजून स्वर्गास परत गेले.

त्याचवेळी सर्व इंद्रांचे आसन कंपायमान झाल्यामुळे, सर्व इंद्र आपले - आपले वाहन आणि आपल्या श्रेणीच्या देव समुहाबरोबर आले, आणि चारही बाजूंनी अयोध्येस घेरून थांबले. त्यानंतर इंद्राने क्षीरसमुद्राच्या जलाने त्यांचा महाअभिषेक केला आणि दिव्य आभूषण, वस्त्रांनी त्यांना अलंकृत केले. भगवान वृषभदेवाने साम्राज्यपदांवर आपला ज्येष्ठ पुत्र भरत यांचा अभिषेक करून या भारतवर्षाला सनाथ केले व बाहुबलीस युवराज पद प्रदान केले. त्यावेळी, भगवानवृषभदेवाचे तप कल्याणक महोत्सव आणि भरताचा राज्याभिषेक

होऊ लागला होता, या दोन्ही महोत्सवाच्या वेळी, स्वर्ग लोक आणि पृथ्वीलोक, दोन्ही हर्षविभोर झाले होते. भगवान्ने दोन्ही पुत्र-भरत आणि बाहुबली यांना आपले राज्य देऊन बाकी पुत्रांना ही पृथ्वी विभक्त करून वाटली होती.

**भगवान्चे दीक्षेसाठी वनगमन :** भगवान् वृषभदेव, महाराज नाभीराज आणि परिवारातील इतर लोकांची संमती घेऊन, इंद्रांने बनविलेल्या **सुदर्शना** नावाच्या पालखीत विराजमान झाले. सर्व प्रथम राजेलोक त्या पालखीस घेऊन सात पाऊल गेले, आणि नंतर विद्याधर लोक आकाशात सात पाऊल घेऊन गेले. त्यानंतर वैमानिक आणि भवनत्रिक देवांनी अत्यंत हर्षित होऊन ती पालखी आपल्या खांद्यावर घेतली आणि त्वरित आकाशात घेऊन गेले. भगवान् वृषभदेवाच्या त्यावेळच्या महात्म्याची प्रशंसा करण्यास इतकेच पुरेसे आहे की, देवांचे अधिपति स्वयं-इंद्र त्यांची पालखी आपल्या खांद्यावर घेऊन चालू लागले होते. यक्ष जातीचे देव सुगंधित पुष्पांची वर्षा करीत होते. मंद शीतल वायु वाहत होता आणि करोडो मंगल वाद्य वाजत होते. भगवान्च्या प्रस्थानानंतर, त्यांच्या मागोमाग यशस्वती इत्यादि अनेक राणी आणि मंत्रीगण चालू लागले होते. त्यावेळी शोकाने त्यांच्या नेत्रांतून अश्रुधारा वाहू लागल्या होत्या. यशस्वती, सुनंदा आणि इतर महादेवी अंतःपुरातील अन्य स्त्रीयां सोबत पूजेची मंगल सामग्री घेऊन भगवान्च्या मागे जावू लागल्या होत्या. महाराज नाभीराज सुद्धा महाराणी मरूदेवी आणि अनेक राजासह, भगवान्चा तप कल्याणक महोत्सव पाहण्यासाठी त्यांच्या मागोमाग जाऊ लागले होते, सम्राट भरत सुद्धा नगरनिवासी, मंत्रीगण, श्रेष्ठ राजे आणि आपल्या लहान भावांसहित, विपुल संपत्तीसह, भगवानच्या मागे - मागे जावू लागले होते. अशा प्रकारे जगत्गुरू भगवान् वृषभदेव अत्यंत विशाल **"सिद्धार्थक" नावाच्या वनांत जाऊन पोहोचले.** ते वन अयोध्यापुरी पासून जास्त दूर अथवा फार जवळ सुद्धा नव्हते. इंद्रांची सेना सुद्धा आकाश आणि पृथ्वीला व्यापून सिद्धार्थक वनात येऊन पोहोचली होती. हे वन अशोक, चंपा, सप्तपर्ण आम्र आणि वट वृक्षांनी तथा विविध पक्षांच्या कल कल आवाजाने सुशोभित मनोहारी होते. या वनांत देवांनी चंद्रकांत मण्यांनी निर्मित एक विस्तृत शिळा आधीच स्थापित करून ठेवली होती.

प्रभुने आपल्या कुटुंबियांना तसेच बरोबर आलेल्या दुःखी राजांना विचारून अंतरंग आणि बहिरंग परिग्रहाचा त्याग केला. भगवंतांनी पूर्व दिशेला तोंड करून पद्मासन धारण केले. आणि "ॐ नमः सिद्धेभ्यः" या मंत्राद्वारा सिद्ध परमेष्ठीला नमस्कार करून आपल्या दोन्ही हातांनी केशलोच केला. चैत्र कृष्ण नवमीच्या दिवशी शुभ मुहूर्त, शुभ लग्न आणि उत्तराषाढ नक्षत्राच्या संध्याकाळच्या वेळी भगवंतांनी दीक्षा धारण केली होती. भगवानांच्या केशलोच केलेल्या केसांना पवित्र समजून, कारण ते भगवानाच्या मस्तकांवर विराजमान होते, त्या केसांना इंद्राने रत्न करंडकात ठेवून आदरपूर्वक क्षीरसमुद्रांत विसर्जन केले.

याचवेळेस इक्ष्वाकु, कुरू, उग्र तथा भोज इत्यादि वंशाच्या चार हजार राजांनी स्वामी भक्तिवश नग्न दीक्षा धारण केली. जे आमच्या स्वामीला योग्य वाटत आहे ते आम्हास सुद्धा योग्य वाटावयास पाहिजे बस ह्याच विचाराने ते राजे द्रव्यलिंगी साधु झाले होते त्यांच्या मनाचे भाव तसे नव्हते. या दीक्षित राजांमध्ये कितीतरी मोहवश, कितीतरी भयवश, स्वामीला दीक्षित झालेले पाहून दीक्षित झाले होते. इंद्र दीक्षा घेतलेल्या भगवानच्या स्वरूपाला एक हजार नेत्रांनी पाहून सुद्धा तृप्त झाला नाही. इंद्र बऱ्याच वेळपर्यंत अनेक स्तोत्रांनी स्तुती करीत राहिला. त्यानंतर महाराज भरताने आपल्या वैभवानुसार सुगंधित जल, चंदन, अक्षत, पुष्प, नैवेद्य, दीप, धूप, फळ यांनी अर्घ्य देवून जिनेंद्र भगवानच्या चरणांची पूजा केली आंबे, जांभूळ, डाळींब सुपारी आणि नारळ इत्यादि फळांनी भगवानच्या चरणाची पूजा केली व पुन्हा पुन्हा नमस्कार करू लागला.

**मिथ्यात्वाची प्रवृत्ति** - भगवानांनी दीक्षा घेतल्यानंतर त्यांना मनःपर्ययज्ञान उत्पन्न झाले होते. सर्व लोकांचे अधिपति वृषभदेव शरीरावरील ममत्व सोडून, सहा महिन्याच्या उपवासाची प्रतिज्ञा करून, मौन व्रत घेऊन

अविचल ध्यानामध्ये लीन झाले होते. भगवान वृषभदेव जेव्हा परम निस्पृह होऊन ध्यानमग्न होते तेव्हा विचार न करता दीक्षित झालेल्या कच्छ, महाकच्छ इत्यादि राजांचे धैर्य सुटावयास लागले होते. दीक्षा धारण करून दोन तीन महिने सुद्धा झाले नव्हते की आपणांस मुनि समजणाऱ्या द्रव्यलिंगी साधुंनी तपाचे कष्ट, भूक, तहान ह्या विघ्नांना घाबरून धैर्य सोडले आणि भगवानांची प्रार्थना करू लागले की हे भगवान ! आम्ही काय केले पाहिजे ? भगवान तर नित्य जीवनापासून विरक्त होऊन ह्या शरीराला सोडण्याची चेष्टा करीत आहे. परंतु आमचे प्राण हरण करणाऱ्या ह्या तपामुळेच आम्ही दुःखी झालो आहो. जोपर्यंत भगवानाचे ध्यान समाप्त होत नाही तोपर्यंत आम्ही वनांत उत्पन्न झालेले कंदमूळ, फूल इत्यादि द्वारा आपला जीवन निर्वाह करू. अशाप्रकारे कितीतरी भ्याड पुरूष तपांमधून उदासीन होऊन अत्यंत दीन वचन म्हणत दीन प्रवृत्ति धारण करण्यास प्रवृत्त झाले. फळं खाण्याच्या इच्छेने वनविभागात भटकावयास लागले व तहानेने व्याकूळ होवून तलावावर जाऊ लागले. त्या लोकांना आपल्या हातांनी फळ तोडताना व पाणी पिताना पाहून वनदेवतांनी त्यांना मना केले आणि म्हटले की असे करू नका अरे मुर्खांनो ! हे दिगंबर रूप सर्वश्रेष्ठ अरिहंत आणि चक्रवर्ती इत्यादिंच्या धारण करण्यास योग्य आहे, ह्यास तुम्ही भेकडदीनांचे स्थान बनवू नका. म्हणजेच, ह्या उत्कृष्ट वेषाला धारण करून भिक्षुकांसारखे आपल्या हातांनी फळ तोडू नका आणि तलाव इत्यादिंचे अप्रासुक जल पिऊ नका वनदेवतांचे अशाप्रकारचे वचन ऐकून ते लोक दिगंबर अवस्थेमध्ये तसे करण्यास भीत होते. म्हणून त्या दीन चेष्टा करणाऱ्या भ्रष्ट तपस्व्यांनी अनेक प्रकारचे वेष धारण केलेत.

त्यांच्यातले कितीतरी लोक वृक्षांचे वल्कल धारण करून फळ खाऊ लागले व पाणी पिऊ लागले. कितीतरी जीर्ण-शीर्ण लंगोट लावून आपल्या इच्छेनुसार कार्य करावयास लागले, कितीतरी शरीराला भस्म भासून जटाधारी बनले; कितीतरी एक दंडधारी व कितीतरी त्रिदंडधारी साधू बनले. ते लोक महाराज भरताच्या भीतीने आपआपल्या नगरांना सुद्धा परत गेले नाहीत. झोपड्या बांधून त्याच वनात राहू लागले होते. ते लोक जल आणि फुलांच्या उपहाराने भगवान वृषभदेवांच्या चरणांची पूजा करीत असत. स्वयंभू भगवान वृषभदेवाशिवाय त्यांचे अन्य कोणी आराध्य देव नव्हते. भगवान वृषभदेवाचा नातू, भरताचा पुत्र मरीचिकुमार सुद्धा दीक्षा घेवून त्या भटकणाऱ्या यतिमध्ये प्रमुख झाला होता. योगशास्त्र व सांख्यशास्त्र सर्वप्रथम त्यांनेच उद्‌धृत केले होते.

**भगवानाची तपश्चर्या** - भगवान वृषभदेव मेरू पर्वताप्रमाणे ध्यानांत अविचल मग्न होते. त्यावेळी भगवानाचे केस व्यवस्थित लक्ष आणि उपचार न केल्यामुळे जटांच्या स्वरूपांस प्राप्त झाले होते. त्या जटा हवेने उडून महामुनि भगवान् वृषभदेवाच्या मस्तकांवर सर्वदूर पसरल्या होत्या. त्या अशा भासत होत्या की जणूकाही - सुवर्णाला तापविल्यामुळे त्यातून निघालेली कालीमाच आहे. भगवानाच्या तपाच्या प्रभावाने त्या ठिकाणी वनांत दिवसरात्रीच्या विभाजनरहित तेज व्याप्त झाले आहे. सर्व ऋतुंचे फळ, फूल इत्यादि वनाची शोभा वाढवित आहे. जन्मजात वैरभाव सोडून सिंह, हरीण इत्यादि प्राणी एकत्र भगवानच्या चरणांची उपासना करीत होते.

ह्यासमयी, महाराज कच्छ, महाकच्छचे पुत्र भगवानाच्या जवळ आले, त्यांचे नाव नमि आणि विनमि होते. ते दोघेही भक्तीने विभोर होऊन भगवानांच्या चरणी नमस्कार करून म्हणतात, हे भगवन ! तुम्ही आमच्यावर प्रसन्न व्हा. आपण आपले साम्राज्य पुत्र-नातू-पंतुपर्यंत वाटून दिले आहे. हे वाटत असताना आम्हा दोघांना विसरले. म्हणून आता आम्हा दोघांना सुद्धा काही भोग सामुग्री द्या. इथे हे लक्षात असावे की नमि आणि विनमि भगवान वृषभ देवांचे नातेवाईक होते. कारण कच्छ-महाकच्छ यांच्या बहिणी यशस्वती आणि सुनंदा त्यांच्या पत्नी होत्या. हे दोघेही कच्छ, महाकच्छ राजांचे पुत्र होते.

ह्या दोघांच्या द्वारा भगवानांच्या ध्यानात विघ्न उत्पन्न झाल्याने धरणेंद्र देवाचे आसन कंपायमान झाले व ते येवून त्या दोघांना भरताजवळ जा असे समजावून सांगू लागले. हे भगवान तर सर्व भोगापासून निस्पृह झाले

आहेत. म्हणून भोगाची इच्छा करणाऱ्यास अर्थात तुम्हास भोग सामुग्री कसे देऊ शकणार ? भगवान केवळ मोक्ष लक्ष्मीची प्राप्ती करण्यासाठी एकाग्र झाले आहेत. तुमचे यांच्याजवळ हट्ट करणे व्यर्थ आहे. धरणेंद्राचे असे वचन ऐकून ते दोघेही भाऊ म्हणाले की तुमची ही चेष्टा अनाधिकारी व चुकीची आहे. आम्ही त्रिलोकीनाथ भगवान वृषभदेवाला सोडून भरतापाशी जाणार नाही.

धरणेंद्र त्यांचा हटवाद, स्वाभिमान आणि भगवानांवर त्यांची श्रद्धाभक्ति पाहून प्रसन्न झाले. तेव्हा त्याने म्हटले की मी पाताळ लोकांचा इंद्र धरणराज आहे. भगवान तुमच्या भक्तीने प्रसन्न झाले आहेत. त्यांनी तुम्हाला भोगोपभोग सामुग्री देण्यासाठीच मला इथे पाठविले आहे. तुम्ही त्वरित माझ्याबरोबर चला. असे ऐकून ते दोघेही भगवानाची प्रसन्नता आणि आज्ञा समजून त्वरित धरणेंद्राबरोबर जाण्यास तयार झालेत. धरणेंद्र देव त्या दोन्ही कुमारांना विमानात बसवून आकाश मार्गाने शीघ्र विजयार्थ पर्वतावर पोहोचला. हा विजयार्ध पर्वत पन्नास योजन रुंद, पंचवीस योजन उंच, पूर्व दिशेमध्ये लवण समुद्राला स्पर्श करणाऱ्या लांबीचा आहे. हा भरत क्षेत्राच्या मध्यभागी आहे. ह्याच्या प्रथम श्रेणीच्या दक्षिणेस पन्नास व उत्तर दिशेस साठ नगर आहेत. ह्यामध्ये विद्याधर मनुष्य निवास करतात. इथे आर्यखंडामध्ये सहा काळांचे परिवर्तन होत नाही. परंतु चतुर्थ काळाच्या प्रथम व शेवटप्रमाणे परिवर्तन होत राहते. इथे दुःख, भीती, अतिवृष्टी आणि अनावृष्टी होत नाही.

उंच-उंच ध्वजांनी सुशोभित 'रथ नुपूर चक्रवाल' नावाच्या नगरात धरणेंद्राने त्या दोनही भावांना घेऊन प्रवेश केला. आणि तेथे त्यांना सिंहासनावर बसवून विद्याधरांना सांगितले की हे तुमचे स्वामी आहेत. त्यानंतर त्या धरणेंद्राने विद्याधरांच्या हाताने उचललेल्या मोठ्या-मोठ्या सुवर्ण कळसांनी त्या दोघांचा राज्याभिषेक केला नंतर धरणेंद्राने विद्याधरांना सांगितले की ज्याप्रमाणे इंद्र स्वर्गाचे अधिपति आहे, त्याप्रमाणे हे नमि महाराज दक्षिण श्रेणीचे अधिपति आहे व हे विनमि महाराज उत्तरश्रेणीचे अधिपति आहे. कर्मभूमिरूपी जगाला उत्पन्न करणाऱ्या जगद्‌गुरू भगवान वृषभदेवांनी आपल्या सम्मतीने ह्या दोघांना इथे पाठविले आहे म्हणून सर्व विद्याधर राजे प्रेमाने मस्तक झुकवून यांची आज्ञा पालन करा. धरणेंद्राच्या उपदेशाने सर्व विद्याधरांनी त्यांना आपले राजे म्हणून स्वीकृत केले.

**भगवान वृषभदेवांचा आहार** - जगद्‌गुरू भगवान वृषभदेवाला तपयोग धारण करून जेव्हा सहा महिने पूर्ण झाले त्यावेळी साधुंची चर्या - आहार घेण्याची विधी दाखविण्याच्या उद्देशाने, शरीराच्या स्थितीसाठी निर्दोष आहार प्राप्त करण्यासाठी असा विचार करू लागले की - अत्यंत लज्जापूर्ण गोष्ट आहे की श्रेष्ठवंशात उत्पन्न झालेले हे नवदिक्षित साधू निर्दोष आचार संहितेचे समग्र ज्ञान नसल्यामुळे भूक, तहान इत्यादि विघ्नांमुळे लवकरच भ्रष्ट झाले. अतः आता मोक्षमार्ग दाखविण्याकरिता आणि सुखपूर्वक मोक्षाची प्राप्ती होण्यासाठी आहार घेण्याची विधी सांगतो. मोक्षप्राप्तीच्या अभिलाषी साधूंना हे शरीर ना तर केवळ कृश केले पाहिजे व ना तर रसदार, मनोवांछित मधूर भोजनाने हृष्टपुष्ट करावयास पाहिजे.

ज्याप्रकारे, हे इंद्रिय आपल्या ताब्यामध्ये राहतील व कुमार्गाकडे आकृष्ट होणार नाहीत. अशाप्रकारे मध्यमवृत्तीचा आश्रय घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

अशा प्रकारे निश्चय करून धीर-वीर भगवानाने आपले ध्यान समाप्त करून आपल्या पावलांनी ह्या पृथ्वी तळांवर विहार करू लागले. सांसारिक मोह पाशांतून मुक्त अवस्थेत चालत असताना भगवान ज्या ज्या बाजूला जात होते त्या-त्या भागाचे लोक प्रसन्न होऊन त्यांना प्रणाम करीत असे. त्यावेळी सर्व लोक आहारदानाच्या विधीला अज्ञानी होते. भगवान कां विहार करीत आहे हे सुद्धा समजत नव्हते. कितीतरी लोक भगवानाच्या मागे-मागे चालत असे, तर कितीतरी लोक महान अमूल्य रत्नांची भेट देऊन प्रार्थना करीत असे - आपण प्रसन्न व्हा व आमची ही तुच्छ भेट स्वीकार करा. कितीतरी लोक करोडोपदार्थ, करोडो वाहन घेऊन येत असे परंतु

भगवानाला त्याचे काहीच प्रयोजन नसल्यामुळे ते त्याच्याकडे न पाहता गुपचूप पुढे निघून जात असे. कितीतरी गंध, आभूषण, वस्त्र इत्यादींना घेऊन येत असे आणि कितीतरी अज्ञानी लोक नवयौवना कन्यांना घेऊन जात आणि त्यांच्याबरोबर विवाह करण्याची प्रार्थना करीत असे. कितीतरी लोक भोजन सामुग्री घेऊन येत असे.

अशाप्रकारे जगाला आश्चर्यचकित करणाऱ्या 'गुढ चर्याने साधुमार्गाची उत्कृष्टचर्या धारण करणाऱ्या भगवंतांचे सहा महिने अजून निघून गेलेत. अशाप्रकारे एक वर्ष पूर्ण झाल्यावर भगवान वृषभदेव कुरुजांगल देशांतील आभूषणाने सुशोभित अशा हस्तिनापूर नगरात पोहोचले. तेथील राजा सोमप्रभ कुरुवंशाचा प्रमुख होता. त्याचा लहान भाऊ 'श्रेयांसकुमार' रात्रीच्या अंतीम प्रहरी उत्तम-उत्तम स्वप्न दिसले. त्याचे फळ ते दोघे भाऊ पुरोहिताकडून ऐकत असतानाच भगवान वृषभदेव विहार करीत हस्तिनापूरला आले अशी बातमी आली. सिद्धार्थ नावाच्या द्वारपालाकडून प्रभुच्या आगमनाचा शुभ समाचार ऐकून दोघेही भाऊ राजमहालाच्या अंगणापर्यंत बाहेर आले आणि दुरूनच सन्मानपूर्वक भगवानांच्या चरणांना भक्तिपूर्वक नमस्कार केला. पुढे जवळ जाऊन प्रदक्षिणा घालून, प्रासुक जलाने चरण प्रक्षालन करून, पूजा करून अर्घ्य समर्पण केले.

भगवानाच्या रूपाला पाहून राजा 'श्रेयांस कुमार'ला जातिस्मरण झाले. त्यांना आपल्या पूर्व भवांतील श्रीमती आणि वज्रजंघाचा संपूर्ण वृत्तांत आठविला. आठव्या भवांत भगवान् आदिनाथाचा जीव राजा वज्रजंघ होता व राजा श्रेयांसकुमारचा जीव राणी श्रीमती होता. ह्या युगल दंपतीने मोठ्या भक्तिभावाने चारण ऋद्धिधारी युगल मुनींना आहारदान दिले होते त्याचे राजा श्रेयांसकुमारला ह्यावेळी स्मरण झाले होते. ह्यामुळे मुनींच्या आहारदानाच्या संपूर्ण विधीला समजून राजा श्रेयांस तत्काळ भगवान वृषभदेवांना आहार देण्यास तत्पर झाला होता. मुनींचे पडगाहन करणे, त्यांना उच्चासनांवर विराजमान करणे. त्यांच्या चरणांचे प्रासुक जलाने, प्रक्षालन करणे त्यांना नमस्कार करून आपल्या मन, वचन, कायेची शुद्धी व आहाराच्या शुद्धिबद्दल निवेदन करणे ह्या दान देणाऱ्याची नवधा भक्ती म्हटल्या जावे. अशाप्रकारे नवधा भक्तिपूर्वक राजा सोमप्रभ, त्याची राणी लक्ष्मीमती आणि श्रेयांसकुमारने आदरपूर्वकक भगवानांच्या हाताच्या ओंजळीमध्ये इक्षुरसाचा आहार दिला ह्यावेळेस ह्या महादानाच्या प्रभावाने आकाशांतून देवांकडून पंचाश्चर्याची वृष्टी झाली. हा दिवस वैशाख शुक्ल तृतीयेचा होता. म्हणूनच याला 'अक्षय तृतीया' हे नाव पडले.

त्यानंतर देवांकडून उचित व योग्यदान त्याच्या फळाची घोषणा ऐकून महाराज भरत सुद्धा तेथे येऊन श्रेयांसाला दीनतीर्थ प्रवर्तक मानून त्याची खूप प्रशंसा करतात. चार ज्ञानांचे धारक भगवान् अशाप्रकारे एक हजार वर्षपर्यंत तपश्चर्या करीत राहिले.

**भगवान वृषभदेवाला केवलज्ञानाची प्राप्ती** - विहार करीत असताना एका वेळी भगवान् 'परिमतालपुर' नावाच्या नगरात 'शकटास्य' नावाच्या उद्यानात वटवृक्षाखाली, पर्यकासन (एक विशेष प्रकारचे आसन - वीरासन) घालून एका शिळेवर विराजमान झाले. ह्या नगराचा राजा भगवान वृषभदेवाचा पुत्र राजा वृषभसेन झाले. ह्या नगराचा राजा भगवान वृषभदेवाचा पुत्र राजा वृषभसेन व भरताचा भाऊ होता. भगवान वृषभदेवाने ध्यानाच्या अग्निने घातिया कर्मरूपी शक्तीला भस्म केले आणि त्यांना परलोक प्रकाशी केवलज्ञान उत्पन्न झाले. फाल्गुन महिन्याच्या कृष्ण पक्षातील एकादशीच्या दिवशी उत्तराषाढ नक्षत्रांत भगवानला केवलज्ञान प्राप्त झाल्याबरोबर तिनही लोकांमध्ये एक प्रकारची आनंदमयी हलचल निर्माण झाली होती. त्यावेळी आपणहूनच कल्पवासी देवांच्या येथे घंटानाद होऊ लागला. ज्योतिषी देवांच्या येथे फार मोठा सिंहनाद प्रारंभ झाला होता. व्यंतर देवांच्याकडे नगाऱ्यांची ध्वनि होऊ लागली, तर भवनवासीयांच्या भवनांत शंखनाद प्रारंभ झाला होता. सर्व इंद्राचे आसन एकसाथ कंपायमान झाले व कल्पवृक्षापासून पुष्पवृष्टि होऊ लागली. अवधिज्ञानी इंद्राने ह्या

सर्व संकेतावरून भगवानच्या केवलज्ञानरूपी संपत्तीला समजून घेतले व भक्तीने आपले मस्तक झुकवून नमस्कार केला.

त्याच क्षणी इंद्राच्या आज्ञेने कुबेराने देव कारीगरांच्या सहाय्याने सुंदर समवशरण बनविले. इंद्रनील मण्यांनी निर्मित हे गोल समवशरण बारा योजन विस्तृत कमळाच्या आकाराचे असते. ह्याच्या मध्यभागी कळसासमान आकाराची उंच असलेली गंधकुटी असते. समवशरणाची दिव्य भूमि स्वाभाविक जमीनीपासून एक हात उंच राहते व त्यापेक्षा एक हात वर कल्पभूमि असते. केवलज्ञान प्राप्त झाल्यानंतर भगवान ह्या पृथ्वीतलापासून पाच हजार धनुष्यप्रमाण वर उचलल्या जातात. एक धनुष्य चार हातांचा होतो. समवशरणांत वीस हजार पायऱ्या असतात, ज्या एक हात प्रमाण उंचीच्या राहतात. समवशरणांत चार परकोट, पांच वेदी त्यांच्यामध्ये आठ भूमि आणि सर्व ठिकाणी प्रत्येक अंतर भागात तीन पीठ असतात. समवशरणामध्ये चार मानस्तंभ असतात. ह्यांच्या दर्शनानेच मिथ्यादृष्टि भव्यांचा अहंकार नष्ट होतो.

समवशरणाच्या बाहेरच्या भागात सर्वप्रथम रत्नचूर्णांनी निर्मित धुलीसाल नावाचा परकोट आहे. त्यानंतर मानस्तंभ, परिक्रमाभूमि आणि लताभूमि आहे. त्यानंतर सुवर्णमय परकोट आहे. याच्या चारही प्रमुख प्रवेशद्वारावर व्यंतरदेव गदा वगैरे हातात घेऊन द्वार रक्षक बनले आहेत त्यानंतर अशोक, चंपा इत्यादि वनभूमि, वनचबुतरे, ध्वजभूमि आहे. ह्यानंतर चांदीचा दुसरा कोट आहे त्यावर भवनवासी देव प्रहरी बनले आहे. ह्यानंतर कल्पवृक्षभूमि, वनदेवतांचे स्तूप इत्यादि आहेत. त्यानंतर स्फटिकमण्यांनी निर्मित तिसरा कोट आहे. त्याच्या मुख्य द्वारांवर कल्पवासी देव हातात गदा घेऊन प्रहरी बनले आहेत. ह्या स्फटिक मण्याच्या कोटापासून पीठापर्यंत लांब आणि गॅलरीच्या आधाराने सोळा भिंती आहेत. ह्या भिंती स्फटिक मण्याच्या कोटापासून पीठापर्यंत लांब आहेत. ह्या बारा सभांचे विभाजन करतात. त्या भिंतींवर रत्नांच्या खांबावर उभा स्फटिक मण्यांचा बनलेला भव्य अति सुभोशित 'श्रीमंडप' बनला आहे. त्या श्रीमंडपाचे असे वैशिष्ट्य आहे की तो एकाच वेळेस तीनही लोकांतील सर्व जीवांना स्थान देऊ शकतो. तो अतिशय उंच व स्वच्छ आहे व असा भास होतो की जणूंकाही दुसरे आकाशच आहे. त्या श्रीमंडपाने आच्छादिलेल्या क्षेत्राच्या मध्यभागी प्रथम पीठ स्थापन केले आहे जे वैडूर्य मण्यांनी निर्मित आहे. ह्याच पीठावर स्वर्ण निर्मित दुसरे पीठ असून त्यावर सर्व रत्नांनी निर्मित तिसरे पीठ आहे. हे पीठ तीन भागाचे असून धर्मचक्रांनी सुशोभित आहे. तिसऱ्या पीठाच्या सिंहासनावर चार अंगुल अधर भगवान् वृषभदेव विराजमान झाले आहे. समवशरणांत बारा सभा असतात. त्यामध्ये भगवान्च्या उजव्या बाजूने क्रमशः (१) मुनि, (२) कल्पवासिनी देवी, (३) आर्यिका, (४) ज्योतिषी देवांच्या देवी, (५) व्यंतर देवांच्या देवी, (६) भवन वासी देवांच्या देवी, (७) भवनवासी देव, (८) व्यंतर देव, (९) ज्योतिषी देव, (१०) कल्पवासी देव, (११) मनुष्य आणि (१२) तिर्यंच हे बारा भवधारी गण अलग-अलग आपल्या-आपल्या निश्चित विस्तृत स्थानांवर बसत असतात.

**समवशरणाची रचना, संक्षिप्त :** सर्वप्रथम धुलीसालच्या नंतर चार दिशेला चार मानस्तंभ आहेत. मानस्तंभांच्या चारही बाजूंना सरोवर आहे, मग निर्मल जलांनी भरलेले नहर आहे, त्यानंतर, दोन्ही बाजूंना दोन-दोन नाट्यशाळा आहे. त्यानंतर, दुसरे अशोक, आम्र इत्यादींचे वन आहे, त्यापुढे, वेदी आहे, त्यानंतर ध्वजांच्या रांगा आहे, नंतर दुसरा कोट आहे. त्याच्या पुढे वेदी सहित कल्पवृक्षांचे वन आहे, त्यानंतर स्तूप व स्तूपानंतर भवनांच्या रांगा आहेत. नंतर स्फटिक मण्यांचा तिसरा कोट आहे. त्यामध्ये मनुष्य, तिर्यंच, देव आणि मुनींच्या बारा सभा आहेत. त्यानंतर, पीठ आहे आणि पीठाच्या अग्रभागांवर स्वयंभू भगवान् अरिहंत देव विराजमान आहे.

**भगवान्चे आठ प्रातिहार्य :** अशोक वृक्ष, रत्नमय सिंहासन, तीन छत्र, भामंडल, दिव्यध्वनि (वाणी),

पुष्पवृष्टि, ढाळणारे चौसष्ट चवर आणि देव दुंदूभि वाजने, हे महाप्रातिहार्य असतात.

तीर्थंकर अरिहंताचे आठ प्रातिहार्य, चौतीस अतिशय आणि चार अनंत चतुष्टय हे ४६ गुण मानले आहे.

**जन्माचे दहा अतिशय :** घाम (स्वेद) रहितता, निर्मळ शरीर, दुधासारखे शुभ्र पांढरे रक्त इत्यादीचे होणे, वज्र वृषभनारांचं संहनन, समचतुरस्त्र संस्थान (समान आकाराची रूंद छाती), अनुपम रूप, उत्तम चंपा फुलाच्या सुगंधासारखे सुगंधित, अनंत शक्ति आणि ताकत, हितकर संक्षिप्त आणि मधुर संभाषण तथा १००८ लक्षणांनी युक्त असणे, हे दहा अतिशय तीर्थंकरांच्या जन्मकाळांपासूनच असतात.

**केवलज्ञानाचे दहा अतिशय :** आपल्या आसपासच्या चारहि बाजूंना शंभर शंभर योजनपर्यंत सुभिक्षता, आकाशगमन, हिंसेचा अभाव, भोजनाची सुलभता, उपसर्गाचा अभाव, चारहि बाजूंनी तोंड दिसणे, छाया रहितता, अचल दृढदृष्टि, सर्व विद्यांचे ज्ञाता, नख आणि केसांची वाढ न होणे, हे दहा अतिशय घातिकर्मांच्या क्षयाने उत्पन्न होतात.

**विशेष चौदा अतिशय अथवा देवकृत चौदा अतिशय :** (१) अठरा महाभाषा, सातशे लघू भाषा, तथा संज्ञी जीवांच्या ज्या काही अक्षरात्मक अनाक्षरात्मक भाषा आहेत त्यामध्ये टाळू, दात, ओठ आणि कंठ ह्यांचा उपयोग न करता भव्य जनांना एकाच वेळी दिव्य उपदेश देणे. भगवानाची स्वाभाविक अस्खलित आणि अनुपम दिव्यध्वनि तीनही संध्याकाळात (सकाळ, दुपार आणि सायंकाळ) नऊ मुहूर्तापर्यंत निघत असते व एक योजनपर्यंत पोहचते. या शिवाय गणधर देव, इंद्र अथवा चक्रवर्तीच्या प्रश्नानुसार ही दिव्यध्वनि अन्य समयाला सुद्धा खिरत असते. ही दिव्यध्वनि[१] सहा द्रव्य, नऊ पदार्थ, पाच अस्तिकाय आणि सात तत्त्वांच्या अनेक प्रकारच्या स्वभावांचे निरूपण करणारी असते. (२) तीर्थंकरांच्या प्रभावाने संख्यात योजनपर्यंत असमयी सहाही ऋतुंचे फळ आणि फुलांची उत्पत्ति, (३) काटे आणि धूळ इत्यादिंना दूर करून मंद सुगंधित वायु वाहणे, (४) सर्व जीवांचा परस्परामध्ये मैत्रीभाव, (५) आरशासारख्या भूमीचे स्वच्छ रत्नमय होणे, (६) इंद्राच्या आज्ञेनुसार मेघकुमारा द्वारा सुगंधित जलांची वर्षा, (७) फळांच्या भाराने झुकलेल्या तांदूळ आदिची शेती होणे, (८) सर्व जीवांना सर्वकाळ आनंद प्राप्त होणे, (९) वायुकुमारांचे मंद शीतल हवा देणे, (१०) विहिरी तथा तलावांचे शीतल तथा स्वच्छ जलांनी पूर्ण भरणे, (११) आकाश निरभ्र स्वच्छ होणे, (१२) सर्व जीवांना रोग इत्यादिंच्या बाधा उत्पन्न न होणे, (१३) धर्मचक्राचे पुढे-पुढे चालणे, (१४) तीर्थंकराच्या विहार समयी त्यांच्या पावलांखाली दिव्य स्वर्ण कमळांची रचना करणे, हे चौदा अतिशय देवकृत मानले गेले आहे. असे चौतीस अतिशय भगवानचे असतात.

**अनंत चतुष्टय :** अनंत ज्ञान, अनंत दर्शन, अनंत सुख आणि अनंत वीर्य हे चार अनंत चतुष्टय म्हटल्या गेले आहे.

**प्रथम गणधरदेव :** त्याच वेळी अनेक राजांनी घेरलेले राजा वृषभसेन भगवान जवळ आले आणि संयम धारण करताच मनःपर्यायज्ञान तथा सप्तऋद्धियां सहित भगवानचे प्रथम गणधर झाले. राजा श्रेयांसकुमार आणि राजा सोमप्रभ ह्यांनी सुद्धा दीक्षा धारण केली व गणधर झाले. ब्राह्मी आणि सुंदरी नावाच्या दोनहि कन्या सुद्धा अनक स्त्रियांबरोबर दीक्षा घेऊन आर्यिकांच्या प्रमुख बनल्या.

**भरताचे आगमन :** त्याचवेळी महाराज भरताला सन्तानोत्पत्ति, चक्ररत्न प्राप्ति आणि भगवानाला केवलज्ञान प्राप्त झाल्याचे तीनहि शुभ समाचार एकाच वेळी मिळाले. महाराज भरताने तेव्हा धर्म कार्याचे महत्व समजून सर्वप्रथम समवशरणांत जिनेंद्र देवाची पूजा केली आणि शेवटी पुत्र जन्मोत्सव साजरा केला.

**भगवानाचे पुत्र अनंतवीर्याचे प्रथम मोक्ष गमन :** भरताचे बंधु अनंतवीर्याने सुद्धा उपदेश ग्रहण करून

१. अतिशयाला तिलोयपण्णत्तिकाराने तीर्थंकरांच्या केवलज्ञानाच्या अतिशयांत घेऊन त्यांचे ११ भेद केले आहे.

भगवान पासून दीक्षा ग्रहण केली होती. देवांनी त्यांची सुद्धा पूजा केली. ते या अवसर्पिणी काळात मोक्ष प्राप्त करणारे सर्वप्रथम अग्रेसर झाले, म्हणजेच ह्या काळात अनंतवीर्याने सर्वप्रथम मोक्ष प्राप्ती केली. जे तपस्वी पूर्वी भ्रष्ट झाले होते त्यापैकी मरीचिकुमाराला सोडून बाकी सर्व तपस्वी लोक भगवानाचा उपदेश ऐकून तत्त्वांचे यथार्थ स्वरूप समजून पुन्हा दीक्षा घेऊन तपस्या करू लागले आणि आपआपल्या परिणामांप्रमाणे उत्तम गतीला प्राप्त झाले.

भगवानाने एक हजार वर्षानंतर मौनव्रत सोडले होते. म्हणजेच दीक्षा घेतल्यानंतर भगवानाने मौनव्रत धारण केले होते व एक हजार वर्षानंतर केवलज्ञान प्राप्त झाल्यावर त्यांची दिव्यध्वनि खिरली होती म्हणून असे म्हटले आहे.

**चतुर्विध संघ : भगवान वृषभदेवाच्या समवशरणामध्ये ८४ गणधर, ८४००० ऋषिगण, ३५०००० आर्यिका, ३००००० श्रावक आणि ५००००० श्राविका होत्या. प्रत्येक तीर्थंकराच्या समवशरणांत असंख्य देव-देवी, असंख्य मनुष्य तसेच संख्यात तिर्यंच जीव उपदेशाचा लाभ घेतात.**

**समवशरणाचा प्रवर्तन काळ :** भगवान वृषभदेवाच्या (तीर्थ) समवशरणाच्या प्रवर्तनाचा काळ एक पूर्वांगापेक्षा पन्नास लाख करोड सागर वर्ष अधिक सांगितला आहे.

**भगवानचा उपदेश :** सौधर्म इंद्राने चारहि श्रेणींच्या देवांसह समवशरणांत येऊन तीन प्रदक्षिणा दिल्या, हजारों स्तोत्रांनी स्तुति केली आणि उपदेश ऐकण्याच्या उद्देशाने इच्छुक होऊन आपल्या सभेत बसले, त्याचप्रमाणे महाराज भरत सुद्धा भगवानची दिव्य वस्तूंनी पूजा करून मनुष्यांच्या कोठ्यात बसले. भगवानाची अनक्षरी दिव्यध्वनि प्रकट झाली. ह्या दिव्यध्वनींतून आचारांग इत्यादि बारा अंगाचा उपदेश झाला आणि प्रथमानुयोग, करणानुयोग, चरणानुयोग आणि द्रव्यानुयोग अशा चार अनुयोगांचा सुद्धा उपदेश झाला आहे.

**ब्राह्मण वर्णाची उत्पत्ति :** हे पूर्वीच दाखविल्या गेले आहे की भगवान वृषभदेव जेव्हा गृहस्थाश्रमात होते, तेव्हा आपल्या अवधिज्ञानाने विदेह क्षेत्रातील स्थिती जाणून क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र वर्ण स्थापित केले होते.

केव्हातरी भरत चक्रवर्ती अनेक राजांच्या सोबत भारत वर्षाला जिंकून साठ हजार वर्षांनी दिग्विजय करून वापस आले. तेव्हा त्यांच्या मनात एक विचार उत्पन्न झाला की आम्ही भगवानाची पूजा पाहिजे तितक्या चांगल्या प्रकारे करू शकतो, परंतु दान घेण्यास निस्पृह असलेले दिगंबर मुनिजन आमच्यापासून धन घेत नाहीत. परंतु असा गृहस्थ कोण आहे तो धन-धान्य इत्यादि संपत्तीच्या द्वारे पूजा करण्यास योग्य आहे ? चक्रवर्तीने अशा अणुव्रतधारी श्रावकांची परीक्षा करून त्यांना दान-मान इत्यादि सत्कारांनी सन्मानित केले. पद्म नावाच्या निधीतून ब्रह्मसुत्र घेऊन ह्या व्रतधारींना यज्ञोपवित प्रदान केले. उपासकाध्ययन अंगाद्वारा त्यांना देवपूजा, गुरूउपासना, दान, स्वाध्याय, संयम, तथा तप यांचा उपदेश दिला.

व्रतांच्या संस्कारामुळे ब्राह्मण, शस्त्र धारण करण्यामुळे क्षत्रिय, न्यायपूर्वक धन अर्जित करण्यामुळे वैश्य तथा सेवा चाकरी केल्यामुळे शूद्र म्हटल्या गेले आहेत.

जे एक वेळ गर्भातून, दुसऱ्यांदा क्रियेने, असे दोन वेळा जन्म घेतात ते द्विजन्मा अथवा द्विज म्हटले आहे. महाराज भरताने त्यांना गर्भान्वय क्रिया, दीक्षान्वय क्रिया आणि कर्मन्वय क्रियेचा सुद्धा उपदेश दिला होता.

केव्हातरी महाराज भरताने विचारले की हे भगवान ! मी ह्या ब्राह्मण वर्णाची उत्पत्ति केली आहे तर यामध्ये गुण आहे की दोष ? कृपा करून सांगा. भगवानाने सांगितले की हे भरत ! जी तुम्ही धर्मात्मा द्विजांची पूजा केली आहे ते चांगले केले आहे परंतु ह्यामध्ये काही दोष आहे, ते तुम्ही ऐका ! जोपर्यंत चतुर्थ काळाची स्थिती राहील तोपर्यंत तर हे निश्चित योग्य आचारांचे पालन करतील. परंतु जेव्हा कलियुग जवळ येईल तेव्हा हे जातिवादाच्या अभिमानाने सदाचारापासून भ्रष्ट होऊन योग्य मोक्षमार्गाचे विरोधी बनतील. जरी ही ब्राह्मणांची

सृष्टि कालांतरांना दोषांचे बीजरूप आहे तरी पण धर्म सृष्टिचे उल्लंघन होऊ नये म्हणून ह्या वेळी ह्यांचा तिरस्कार करणे सुद्धा उचित नाही. वर्णाश्रमाची रक्षा करणाऱ्या भरताने गुरूदेवाच्या वचनाला समजून आपला संदेह दूर केला व मन शांत केले.

**भगवान वृषभदेवाचे निर्वाण गमन :** अशा प्रकारे भव्य जनांना मोक्षरूपी उत्तम फळांची प्राप्ती करण्यासाठी भगवानने गणधरांबरोबर एक हजार वर्ष आणि एक लाख पूर्व वर्षास चौदा दिवस कमी पर्यंत विहार केला, आणि चौदा दिवस शिल्लक राहिले तेव्हा तपस्या योगांमध्ये निरोध करून पोष महिन्याच्या पौर्णिमेच्या दिवशी श्रीशिखर आणि सिद्धशिखरांच्या मध्ये कैलाश पर्वतावर जाऊन विराजमान झाले. त्याच रात्री महाराज भरताने स्वप्नांत पाहिले की मेरू पर्वत उंच-उंच वाढत सिद्धक्षेत्राला जावून पोहचला आहे. अर्ककीर्ती, गृहपति, प्रधानमंत्री इत्यादींनी सुद्धा असेच काही काही स्वप्न पाहिले. सर्वांनी सकाळी अनुमान लावले की भगवान वृषभदेवाचे निर्वाण होणार आहे. महाराज भरत त्याच दिवशी कैलाश पर्वतांवर आले व चौदा दिवस अखंड पूजा करीत राहिले.

माघ कृष्ण चतुर्दशीच्या दिवशी सूर्योदयाच्या शुभ मुहूर्तावर व अभिजित नक्षत्र वेळांत भगवान वृषभदेव पूर्व दिशेला तोंड करून अनेक मुनींच्या बरोबर पर्यकासन मुद्रेत विराजमान होते. त्यांनी तिसऱ्या सूक्ष्मक्रियाप्रतिपाति नावाच्या शुक्ल ध्यानाने तीन योगांचा निरोध केला आणि शेवटच्या गुणस्थानात थांबून पाच लहान अक्षरांना उच्चारण करण्यास जितका वेळ लागतो तितक्या समयात चौथ्या व्युपरतक्रियानिवृत्ति नावाच्या शुक्ल ध्यानाने अघातिया कर्मांचा नाश केला. औदारिक, तैजस आणि कार्माण ह्या तिनहि शरीराच्या नाशाने सिद्धत्व पर्याय प्राप्त होऊन ते सम्यक्त्व इत्यादि आपल्या आठ गुणांनी युक्त होऊन क्षणभरातच तनुवात वलयांमध्ये जाऊन पोहोचले व तेथे नित्य, निरंजन व आपल्या अंतिम शरीरापेक्षा काही कमी, अमूर्त, आत्मसुखात तल्लीन व या संसाराला निरंतर पाहत विराजमान होऊन गेले.

त्याचवेळी मोक्षकल्याणकाची पूजा करण्याच्या इच्छेने सर्व देवगणांनी "हे भगवानचे शरीर पवित्र, उत्कृष्ट, मोक्षाचे साधन, स्वच्छ व निर्मल आहे" असा विचार करून त्यास बहुमूल्य पालखीत विराजमान केले. त्यानंतर अग्निकुमार देवांच्या इंद्राच्या रत्न प्रकाशाने दैदिप्यमान शोभिवंत मुकुटांतून जी ज्योती उत्पन्न झाली आहे व जिला चंदन, अगुरु, कापूर, केशर इत्यादि सुगंधित पदार्थांनी व तूप, दूध इत्यादिंनी प्रखर केले आहे, अशा अग्निने, संपूर्ण जगात ज्याने अभूतपूर्व सुगंध पसरविला आहे, त्याचा वर्तमान आकार नष्ट केला. अशाप्रकारे त्यांना दुसरा पर्याय प्राप्त करून दिला. त्यानंतर त्याच इंद्रांनी, पंच कल्याणक ज्यांचे झाले आहे अशा वृषभदेवाच्या शरीराचे भस्म उचलले आणि "आम्ही लोक सुद्धा असेच होवो !" म्हणून भक्तिभावाने आपल्या मस्तकांवर, गळ्यावर आणि वक्षस्थळांवर लावले.

'तिकडे महाराज भरत पित्याच्या वियोगाने व्याकुळ व शोकाने विव्हळ झाले, तेव्हा वृषभसेन गणधराने त्यांना खूब समजाविले आणि शोक संतप्त मनाला धर्मामृत वचनाने शांत केले.

जेव्हा चतुर्थ काळ प्रारंभ होण्यासाठी तीन वर्ष, आठ महिने आणि पंधरा दिवस शिल्लक राहिले होते तेव्हा भगवान वृषभदेवाने मोक्षपद प्राप्त केले होते. त्यानंतर चतुर्थ काळांमध्ये अजितनाथापासून पार्श्वनाथ पर्यंत २२ तीर्थंकर अजून झाले आहे. त्यानंतर भगवान महावीर झाले आहे.

# अंतीम तीर्थंकर

**भगवान महावीर कसे झाले ?** सर्व द्वीपांच्या मध्यभागी असलेल्या जंबूद्वीपाच्या पूर्व विदेह क्षेत्रात सीता नदीच्या उत्तर किनाऱ्यावर पुष्कलावती नावाचा देश आहे, त्याच्या पुण्डरीकिणी नगरांमध्ये एक मधु नावाचे वन आहे. त्या वनात पुरुरवा नावाचा एक भिल्ल राजा राहत होता. त्याची कालीका नावाची पत्नी होती. एक दिवस सागरसेन नावाचे मुनिराज दिशाभ्रम झाल्यामुळे वनात इकडे-तिकडे फिरत होते. त्यांना हरीण समजून पुरुरवा मारण्याच्या तयारीत होता, परंतु त्याच्या पत्नीने, "ही वनांतील देवता फिरत आहे, त्यांना तुम्ही मारू नका." असे म्हणून परावृत्त केले. त्याचवेळी पुरुरवा भिल्ल प्रसन्नचित्त होऊन मुनिराजांच्या जवळ गेला व नमस्कार केला. गुरूंच्या उपदेशाने मद्य, मांस, मधु ह्या तीनहि वस्तूंचा त्याग केला. मृत्युपर्यंत व्रताचे पालन केल्याने आयुष्य संपल्यावर सौधर्म स्वर्गात एक सागर आयु असणारा देव झाला.

ह्याच भरतक्षेत्रांत अयोध्याचे प्रथम चक्रवर्ती राजा भरताच्या अनंतमती राणीपासून, पुरुरवा भिल्लाचा जीव, मरीचि नावाच्या ज्येष्ठ पुत्राच्या रूपाने जन्म घेतो. आपले आजोबा भ. वृषभदेवाच्या दीक्षेच्या वेळेस स्वतः गुरुभक्तिने प्रेरित होऊन मरीचिकुमारने कच्छ इत्यादि चार हजार राजांच्या बरोबर दीक्षा धारण केली. भगवानाच्या सहा महिन्याच्या ध्यान साधनेच्या वेळी आहाराच्या विधीने अनभिज्ञ हे सर्व साधू भूक, तहान इत्यादि व्याधींनी भ्रष्ट होऊन स्वतः तलावाचे जल, वनांतील फळ - फूल ग्रहण करून खाऊ लागले. हे पाहून वन देवतांनी म्हटले की निर्ग्रंथ वेश धारण करणाऱ्या मुनींची ही चर्या नाही आहे. ह्या वेशात तुम्ही असे आचरण करू शकत नाही. तेव्हा मिथ्यात्वाने प्रेरित मरीचिने, अशा वचनांना ऐकून, सर्वप्रथम परिव्राजक दीक्षा धारण केली.

जेव्हा वृषभदेवाला केवलज्ञान प्राप्त झाले तेव्हा समवशरणांत भ्रष्ट झालेल्या सर्व साधुंनी दीक्षा धारण करून आत्मकल्याण केले. परंतु केवळ मरीचिने तीर्थंकराच्या दिव्यध्वनीला ऐकून सुद्धा सत्यधर्म ग्रहण केला नाही. तो असा विचार करीत होता की ज्याप्रमाणे भ. वृषभदेवाने सर्व परिग्रहांचा त्याग करून तीनहि लोकात हलचल उत्पन्न करणारे सामर्थ्य प्राप्त केले आहे त्याचप्रमाणे मी सुद्धा आपल्याद्वारे चालविलेल्या दुसऱ्या मताच्या व्यवस्थेने इंद्राद्वारा केलेल्या पूजेला प्राप्त करीन. ह्याप्रकारे मान कषायाने कल्पित तत्त्वांचे उपदेश करत आयुष्याच्या शेवटी मरून ब्रह्मस्वर्गांत देव झाला. तेथून च्युत होऊन अयोध्या नगरीच्या कपिल ब्राह्मणाच्या घरी काली स्त्री पासून जटिल नावाचा पुत्र उत्पन्न झाला. इथे सुद्धा संस्काराने परिव्राजक बनून, प्रकृति पुरुष इत्यादि पंचवीस तत्त्वांचा उपदेश देऊन आयुष्याच्या शेवटी मरून सौधर्म स्वर्गात एक सागर आयु असलेला देव झाला. तेथून येऊन ह्याच भरत क्षेत्राच्या सूतिका नावाच्या गावात अग्निभूत ब्राह्मणाला गौतमी स्त्री पासून अग्निसह नावांचा पुत्र झाला. तिथे सुद्धा मिथ्या - पाखंडी साधु होऊन मृत्युनंतर स्वर्ग प्राप्त केला. तेथून येऊन ह्याच भरत क्षेत्रात मंदिर नावाच्या गावात गौतम ब्राह्मणाच्या कौशिकी ब्राह्मणीपासून अग्निमित्र नावाचा पुत्र झाला. ह्यावेळी सुद्धा तिच परिव्राजक दीक्षा धारण करून माहेंद्र स्वर्गाला प्राप्त केले. तेथून च्युत होऊन मंदिर नावाच्या नगरात शालंकायन ब्राह्मणाच्या मंदिरा स्त्री पासून भारद्वाज नावाचा पुत्र झाला. त्या ठिकाणी तो त्रिदण्डाने सुशोभित त्रिदंडी साधू बनला व त्यानंतर माहेंद्र स्वर्गाला प्राप्त केले.

पुन्हा तेथून च्युत होऊन कुमार्गाला प्रकट केल्याच्या प्रभावाने व मिथ्यात्वाच्या निमित्याने सर्व अधोगति मध्ये जन्म घेऊन त्याने अतोनात दुःख भोगले. ह्याप्रमाणे त्रस, स्थावर योनिमध्ये असंख्यात वर्ष पर्यंत भ्रमण करत-करत अत्यंत थकून गेला.

अन्यत्र लिहिले आहे की, भारद्वाज ब्राह्मण त्रिदंडी साधू बनून माहेंद्र स्वर्गाला प्राप्त झाला व त्यानंतर तेथून च्युत होऊन मिथ्यात्वाच्या प्रभावाने इतर निगोदात गेला. तेथे सागरोपम काळ व्यतित झाला. त्यानंतर

अनेकानेक भव धारण केले त्यांची गणना ह्या प्रकारे आहे :-

एक हजार आक वृक्षाचे भव,
ऐंशी हजार शिंपल्याचे भव,
वीस हजार नींब वृक्षाचे भव,
नव्वद हजार केळी वृक्षांचे भव,
तीन हजार चंदन वृक्षांचे भव,
पाच करोड शिकाऱ्यांचे भव,
साठ हजार वेश्या भव,
पाच करोड कन्हेर वृक्षाचे भव,
वीस करोड हत्तीचे भव,
साठ हजार गाढवाचे भव,
तीन करोड कुत्र्याचे भव,
साठ हजार नपुंसकाचे भव,
वीस करोड स्त्री भव,
नव्वद लाख धोबी भव,
आठ करोड घोड्यांचे भव, वीस करोड मांजर भव,
साठ लाख वेळा मातेच्या गर्भात असमय मृत्यु अर्थात गर्भपात,
पन्नास हजार वेळा राजाचा भव

ह्याप्रकारे अनेकानेक भव धारण करताना कधी सुपात्र दानाच्या प्रभावाने हा जीव मोगभूमि मध्ये गेला. ऐंशी लाख वेळा देव पदाला प्राप्त केले. म्हणूनच आचार्य म्हणतात की हे मिथ्यात्व फारच वाईट आहे, तीन काळात व तीन लोकात ह्यापेक्षा प्रबळ असा अन्य कोणीही ह्या जीवाचा शत्रु नाही आहे. विद्वान पुरुषांचे म्हणणे आहे की मिथ्यात्व आणि हिंसा इत्यादि पापांची तुलना केल्यास त्यांच्यामध्ये मेरू आणि राई समान अंतर माहीत होईल.

त्यानंतर कदाचित काही पापांचा प्रभाव मंद पडल्यामुळे हाच जीव राजगृह नगरात "स्थावर" नावाचा ब्राह्मण झाला. त्यानंतर मगध देशाच्या ह्याच राजगृह नगरामध्ये वेद पारंगत शांडिल्य नावाच्या ब्राह्मणाची पारशरी ब्राह्मणीपासून "स्थावर" नावाचा पुत्र झाला. तो सुद्धा वेद पारंगत, सम्यक्त्वापासून शुन्य, पुन्हा परिव्राजकच्या मतांना धारण करून शेवटी मरून माहेंद्र स्वर्गात सात सागर आयु वाला देव झाला. तेथून च्युत होऊन ह्याच राजगृह नगरामध्ये विश्वभूति राजाच्या जैनी नावाच्या राणीपासून विश्वनंदी नावाचा पुत्र झाला. ह्या विश्वभूति राजाचा विशाखभूति नावाचा लहान भाऊ होता. त्याला विशाखनंदी नावाचा पुत्र होता. एक दिवशी विश्वभूति राजा विरक्त होऊन आपल्या लहान भावाला राज्यपद व पुत्राला युवराज पद देऊन जैनेश्वरी दीक्षा घेऊन कठोर तप करावयास लागले.

एक दिवशी विश्वनंदी युवराजाच्या मनोहर उद्यानाला पाहून काकाचा पुत्र विशाखनंदीने आपल्या पित्याजवळ त्याची याचना केली. विशाखभूति राजाने सुद्धा मायाचाराने विश्वनंदीला शत्रुवर आक्रमण करण्यासाठी पाठवून ते उद्यान आपल्या पुत्रास दिले. विश्वनंदीला ह्या घटनेची सूचना मिळताच वापस येऊन त्याने विशाखनंदीला पराजित केले व त्याला भयभित झालेला पाहून विरक्त होऊन त्याला उद्यान सोपवून स्वतः दिगंबरी दीक्षा धारण करून तप करावयास लागले.

घोर तपश्चर्या करून अत्यंत कृश शरीरी ते विश्वनंदी मुनिराज एक दिवस मथुरा नगरामध्ये आहारासाठी

आले होते. व्यसनांनी भ्रष्ट झालेला तो विशाखनंदी त्यावेळी कोण्या राजाचा दूत बनून तेथे आला होता आणि एका वेश्येच्या घरच्या माडीवर मुनींना पाहत होता. दैवयोगाने त्याचवेळी एका गाईने मुनिराजांना धक्का देवून पाडले. त्यांना पडताना पाहून क्रोधित झालेला विशाखनंदी म्हणतो की, "तुमचा पराक्रम आम्हाला मारण्यासाठी दगडाचा खंबा तोडतांना पाहिला होता तो आज कुठे गेला ?" ह्या प्रकारच्या कुटिल असत्य वचनांना ऐकून मुनिराजाच्या मनात सुद्धा क्रोध उत्पन्न झाला व म्हणाले की, ह्या उपहासाचे फळ तुला अवश्य मिळेल. आणि कषाय सहित संन्यासाने मरून महाशुक्र स्वर्गांत देव झाले. विशाखभूति (काकाचा जीव) सुद्धा तप करून तेथेच देव झाला. चिरकाळ पर्यंत स्वर्ग सुख भोगून ते दोघेहि तेथून च्युत होऊन सुरम्य देशाच्या पोदनपुर नगरामध्ये प्रजापति महाराजांच्या जयावती राणीपासून विश्वनंदीचा जीव नारायण पद धारक "त्रिपुषठ" नावाचा पुत्र झाला. विशाखनंदीचा जीव चिरकालपर्यंत संसारात परिभ्रमण करून विजयार्ध पर्वताच्या उत्तर श्रेणीतील अलकापूर नगरात मयुरग्रीव विद्याधराच्या नीलांजना राणीपासून अश्वग्रीव नावाचा प्रतिनारायण पद धारक पुत्र झाला. पूर्व जन्मीच्या संस्काराने त्रिपुष्ठ नारायणाने अश्वग्रीव प्रतिनारायणास मारून चक्ररत्न प्राप्त केले. चिरकाळपर्यंत राज्यसुख भोगून शेवटी भोगासक्तिमध्ये मरून सातव्या नरकांत गेला. तेथील दुःखांना सागरो वर्ष भोगून ह्याच भरत क्षेत्रांत गंगा नदीच्या तटाजवळील वनांत सिंहगिरी पर्वतांवर सिंह झाला. तेथेही तीव्र पाप बंधामुळे पुन्हा नरक गतीला प्राप्त केले. तेथे एक सागर पर्यंत दुःख भोगून जंबूद्वीपात सिंहकुटाच्या पूर्व दिशेत हिमवन पर्वत शिखरांवर सिंह झाला.

**सिंहाचे उत्थान :** एक वेळी हा सिंह एका हरीणाला पकडून खात होता. त्याचवेळी अतिशय दयाळु, 'अजितंजय' नावाचे चारण मुनि, अमितगुण नावाच्या मुनिराज बरोबर आकाश मार्गाने जात होते. त्यांनी त्या सिंहाला पाहिले, पाहताक्षणीच ते तीर्थंकरांच्या वचनांचे स्मरण करून सहानुभूतिने आकाश मार्गातून उतरून त्या सिंहाला उद्देश्यून उंच स्वरात धर्ममय उपदेश देऊ लागले. त्यांनी म्हटले की हे मृगराज ! तुम्ही मागच्या त्रिपुष्ठ नारायणाच्या भवात इंद्रियांनी आसक्त होऊन मृत्युनंतर नरक पर्याय प्राप्त करून क्रुरकर्मी झाल्यामुळे नरकात गेले. आता तेथून निघून पुन्हा सिंहाच्या पर्यायाला प्राप्त केले आहे. हे मृगराज ! आता [1]ह्या भवांपासून दहाव्या भवांत तू अंतिम तीर्थंकर होशील. हे सर्व मी श्रीधर तीर्थंकराच्या वाणीतून ऐकले आहे. आता तू आजपासून संसाररूपी चक्रामध्ये पाडणाऱ्या मिथ्यामार्गापासून विरक्त हो आणि आत्महित साधण्याच्या मार्गाचे अवलंबन कर. अशाप्रकारे त्या सिंहाने मुनिराजांच्या वचनांना हृदयांमध्ये धारण केले आणि त्या दोनहि मुनींच्या भक्तीने अभिभूत होवून त्यांना अनेक वेळा प्रदक्षिणा केल्या, वारंवार प्रणाम केला. समय आणि प्रारब्धाच्या योग्य संयोगाने त्याने ताबडतोब तत्त्व श्रद्धा धारण केली आणि मन स्थिर करून श्रावकांच्या व्रताला ग्रहण केले.

ह्या प्रकारे[2] संयमासंयम व्रताचे कठोर पालन करून शेवटी संन्यास वृत्ति धारण करून एकाग्रचित्ताने मरण

---

१. इतोऽस्मिन् दशमे भावी भवेऽन्त्यस्तीर्थकृदभवान् ।
सर्वमश्रावि तीर्थेशान् मयेदं श्रीधराह्वयान् ॥२१४॥
अथप्रवृत्तिसंसारघोराण्य प्रपातनात् ।
धीमन्विरमदुर्मार्गादार मात्महिते मते ॥२१५॥
विधाये हृदि योगीन्द्रयुग्मं भक्तिभराहितः ।
मुहुःप्रदक्षिणी कृत्य प्रप्रणम्य मृगाधिपः ॥२१६॥
तत्वश्रद्धानभासाद्य सद्यः कालादिलब्धितः ।
प्रणिधाय मनः श्रावकव्रतानि समाददे ॥२१८॥ उत्तर पुराण, पर्व, ७४.

२. एवं व्रतेन संन्यस्य समाहित मतिर्व्यसुः
सद्यःसौधर्मकल्पेऽसौ सिंहकेतु सुरोऽजनि ॥२१९॥ उत्तर पुराण, पर्व, ७४.

पावला, आणि त्याच क्षणी सोधर्म स्वर्गात सिंहकेतु नावाचा देव झाला. तेथे दोन सागर वर्षापर्यंत दिव्य सुख भोगून, तेथून च्युत होवून धातकीखंडाच्या पूर्व विदेहच्या मंगलावती देशाच्या विजयार्ध पर्वताच्या उत्तम श्रेणीमध्ये अत्यंत श्रेष्ठ कनकप्रभ नगराच्या राजा नकपुंख विद्याधर आणि राणी कनकमालाच्या गर्भातून कनकोज्वल नावाचा पुत्र झाला. एक दिवस मंदार पर्वतावर प्रियमित्र मुनिराज जवळ दीक्षा घेऊन शेवटी समाधीपूर्वक मरून सातव्या स्वर्गात देव झाला. तेथून च्युत होऊन ह्याच अयोध्या नगरीचे राजा वज्रसेनच्या शीलावती राणीपासून हरिषेण नावाचा पुत्र झाला. त्यावेळी सुद्धा राज्यपदाचा त्याग करून श्री श्रुतसागर मुनिराज जवळून दीक्षा घेऊन आयुष्याच्या शेवटी महाशुक्र स्वर्गात देव झाला. तेथून निघून धातकीखंडाच्या पूर्व विदेह क्षेत्रात पुष्कलावती देशाच्या पुण्डरीकिणी नगराच्या राजा सुमित्र व राणी मनोरमा पासून प्रियमित्र नावाचा पुत्र झाला. ह्या प्रियमित्रांनी चक्रवर्ती पदाचे वैभव प्राप्त केले होते. त्यानंतर क्षेमंकर तीर्थंकरापासून दीक्षा घेऊन आयुष्याच्या शेवटी सहस्त्रार स्वर्गांत देवांचे सुख उपभोगून, जंबूद्वीपाच्या छत्रपुर नगरात नंदिवर्धन महाराजाच्या वीरवती महाराणीपासून नंद नावाचा पुत्र झाला. इथे सुद्धा अपेक्षेनुसार राज्य सुखाचा उपभोग घेऊन प्रोष्टिल नावाच्या गुरुपाशी दीक्षा घेऊन कठीण उग्र तप करून अकरा अंगाचे ज्ञान प्राप्त केले आणि दर्शनविशुद्धि इत्यादि सोळाकारण भावनांचे चिंतन करून तीर्थंकर नामकर्माचे बंध करून घेतला. आयुष्याच्या शेवटी सर्व प्रकारच्या आराधनांना प्राप्त करून अच्युत स्वर्गांत पुष्पोत्तर विमानात श्रेष्ठ इंद्र झाला.

**भगवानचे गर्भावतरण :** जेव्हा ह्या इंद्राचे आयुष्य सहा महिने शिल्लक राहिले होते तेव्हा ह्याच भरत क्षेत्रात विदेह देशातील कुंडलपूर नगरीचा राजा "सिद्धार्थ" यांच्या भवनाच्या अंगणात कुबेराद्वारा प्रतिदिन साडे तीन करोड रत्नांची वृष्टि होवू लागली होती.

आषाढ शुक्ल षष्ठिच्या रात्रीच्या उत्तरार्ध प्रहरी, सिद्धार्थ महाराजाच्या राणी प्रियकारिणीने सोळा स्वप्न पाहिजे. सकाळी आपल्या पतिदेवांकडून त्या स्वप्नांचे फळ जाणून हर्षित झाली व समाधानास प्राप्त केले. त्यानंतर देवांनी येवून भगवानाचा गर्भकल्याणक उत्सव साजरा करून माता-पित्याची विधिवत पूजा केली. अर्थात, माता त्रिशलेच्या गर्भात अच्युतेंद्राचा जीव आला होता.

**भगवान महावीरचा जन्मोत्सव :** नऊ महिने व्यतित झाल्यानंतर चैत्र शुक्ल त्रयोदशीच्या दिवशी माता त्रिशलाने पुत्रास जन्म दिला. त्यावेळी सर्व जगात आनंदी - आनंद झाला. देवांच्या स्वर्गात सुद्धा न वाजविताचा वाद्य-ध्वनि होऊ लागला होता. सौधर्म इंद्राचे आसन कंपायमान झाले होते. अवधिज्ञानाने इंद्राने तीर्थंकर महापुरुषाचा जन्म झाला आहे असे जाणून इंद्र आपल्या सर्व लवाजम्यासहित, ऐरावत हत्तीवर बसून कुंडलपूर नगराकडे निघाले. नगराच्या तीन प्रदक्षिणा करून, मातेच्या कुशीत झोपलेल्या जिन बालकांस घेऊन सुमेरू पर्वतावर घेऊन गेले. तेथे क्षीरसागरातील जलांनी भरलेल्या १००८ सुवर्ण कळसांनी पांडूक शिळेवर भगवानाचा जन्माभिषेक उत्सव संपन्न केला. भगवानांना उत्तमोत्तम वस्त्र, आभूषणांनी विभूषित करून इंद्राने त्यांचे "वीर आणि वर्धमान" असे दोन नाव ठेवले. त्यानंतर भगवानांना वापस आणून मातापित्या जवळ सोपविले.

**भगवानच्या बाल्यकाळातील वैशिष्ट्य :** एक दिवस संजय आणि विजय नावाच्या चारण मुनींना काहीतरी शंका उत्पन्न झाली होती. यद्यपी ते भगवानाच्या जन्मानंतर लगेच आले होते तरी पण केवळ त्यांच्या दर्शनानेच त्यांचा संदेह दूर झाला होता, म्हणून त्यांनी मोठ्या भक्तिभावाने म्हटले की हा बालक "सन्मति" तीर्थंकर होणार आहे. अर्थात त्यांनी त्याचे नाव सन्मति ठेवले.

एक वेळी भगवान देव बालकांच्या सोबत वनांत खेळत होते. संगम नावाचा देव त्यांच्या धैर्याची परीक्षा घेण्याच्या उद्देशाने शंभर फण्यांनी युक्त असा महा भयंकर सर्प होवून झाडाच्या मागून त्यांच्या शरीराला खांद्यापर्यंत लपेटू लागला. सर्व सोबती भयभीत झाले परंतु भगवान वीर निर्भय होवून त्यांच्या फणांवर पाय

देवून उतरून आले व त्यांच्याशी क्रिडा करू लागले. तेव्हा संगम देवाने आपले खरे रूप प्रकट करून भक्तिभावांने त्यांची स्तुति केली व त्यांचे "महावीर" हे नाव ठेवले.

**भगवान महावीराचा दीक्षा महोत्सव :** अशाप्रकारे तीस वर्षाचा कुमारकाळ व्यतीत झाल्यानंतर एक दिवस भगवानांना स्वतः जातीस्मरण झाल्याने वैराग्य उत्पन्न झाले. त्यावेळी लोकांतिक देवांनी येवून स्तुति करत त्याची पूजा केली. देवांनी आणलेल्या चंद्रप्रभा पालखीत भगवानांना विराजमान करून त्या पालखीला सर्वप्रथम भूमिगोचरी राजांनी, नंतर विद्याधर राजांनी आणि नंतर इंद्राने उचलले. त्या पालखीस षण्ड नावाच्या वनात घेवून गेले. तेथे रत्नमयी विस्तृत शिळेवर उत्तर दिशेला तोंड करून, दोन दिवसाच्या उपवासाचा नियम घेवून भगवान विराजमान झाले. वस्त्र, आभूषणांचा त्याग करून, पंच मुष्ठी केशलोच करून, "ॐ नमः सिद्धं" म्हणून जिन दीक्षा घेतली. तो दिवस मार्गशीर्ष वद्य दशमीचा होता. त्या दिवशी देवांनी दीक्षा कल्याणक महोत्सव साजरा केला. त्याच वेळी संयमाच्या प्रभावाने भगवानांना केवलज्ञानाच्या अगोदरचे मनःपर्ययज्ञान सुद्धा प्राप्त झाले होते.

त्यानंतर पारण्याच्या दिवशी भगवान आहारासाठी कूल ग्राम मध्ये पोहचले. राजा कूलने तीन प्रदक्षिणा करून नवधा भक्तिने खीरीचा आहार देवून पंचाश्चर्याला प्राप्त केले होते.

**भगवानाचा उपसर्ग विजय :** एक दिवशी अतिशय धीर - वीर भगवान वर्धमान उज्जयीनीच्या अतिमुक्तक नावाच्या स्मशानात प्रतिमा योग धारण करून विराजमान होते. त्यांना पाहून महादेव नावाच्या रुद्राने आपल्या दुष्ट प्रवृत्तीने त्यांच्या धैर्याची परीक्षा घेण्याचे ठरविले. त्याने रात्रीच्या वेळी अनेक भयानक वेताळांचे रूप धारण करून भयंकर उपसर्ग केला. परंतु भगवानला आपल्या ध्यानांपासून किंचितहि चलायमान करू शकला नाही. तेव्हा त्याने भगवानांना "महति महावीर" नाव देवून अनेक प्रकारे स्तुति केली. पार्वती बरोबर नृत्य केले आणि सर्व मत्सर भाव सोडून तेथून निघून गेला.

**चंदनाद्वारा भगवानचा आहार :** कोण्या एका दिवशी राजा चेटकची कन्या चंदना उद्यान क्रिडेमध्ये लीन असताना एक विद्याधर राजा तिचे अपहरण करून घेवून गेला. परंतु नंतर आपल्या पत्नीच्या भीतीने तिला एका जंगलात सोडून दिले. तेथे एका भिल्लाने तिला पाहून बरोबर नेले व पैश्याच्या लोभाने वृषभदत्त शेठजीस विकले. त्या शेठजीची पत्नी सुभद्रा, "हिचा शेठजीशी काही संबंध होऊ नये" अशा संशयाने, तिला मातीच्या भांड्यात कांजी मिश्रीत कोदोचा भात भोजनात देत असे व क्रोधाने तिला साखळदंडांनी बांधून ठेवीत असे.

एके दिवशी [1]वत्स देशाच्या कौशांबी नगरांत महावीर स्वामी आहारासाठी आले. त्यांना नगरांत प्रवेश करताना पाहून चंदना त्यांच्या दर्शनासाठी समोर जाऊ लागली. त्याच वेळी तिचे साखळदंडांचे सर्व बंधन तुटले, तिच्या मुंडण केलेल्या डोक्यावर सुंदर केस पुन्हा आले व वस्त्र आभूषणांनी युक्त सुंदर झाली. भक्तिभावाने नम्रिभूत होवून नवधा भक्तिसह आहारदान देण्यासाठी तत्पर झाली. शीलव्रताच्या महात्म्याने तिचे मातीचे भांडे सुवर्णाचे झाले व कोदोचा भात तांदूळाचा झाला. त्या बुद्धिमती चंदनाने विधिपूर्वक पडगाहन करून भगवानांना

---

१. परेद्युर्वत्सदेशस्य कोशाम्बीनगरान्तरम् ।
कायस्थित्यै विशंतं तं महावीरं विलोषय सा ॥३४३॥
प्रत्युद्द्वरजन्ती विच्छिन्नशृंखलाकृतबंधनां
लोलालिकुलल्लीरुकेशभाराद्यलाचलात ॥३४४॥
शीलमहात्मसंभूतपृथुहेमशराविका ।
शाल्यन्न भाववत्कोद्रवौदनंविधिवत्सुधीः ॥३४६॥
अन्नमाश्रयणातस्मै तेनाप्याश्चर्यपश्चकम् ।
बंधुभिश्चसमायोगःकृतशचंदनया तदा ॥३४७॥ उत्तर पुराण पर्व, ७४, पृ. ४६६.

आहार दिला. त्यामुळे त्या घरी पंचाश्चर्यांची वृष्टि झाली व भाऊ-बहिणी बरोबर तिचे पुनर्मिलन झाले.

**भगवानांचे केवलज्ञान :** जगत्‌बंधु भगवानाचे निर्ग्रंथ अवस्थेमध्ये बारा वर्ष व्यतित झाले होते. एक दिवस जृंभिक गावाच्या जवळ ऋजुकूला नदीच्या काठावर मनोहर नावाच्या वनांमध्ये रत्नमयी शीळेवर सालवृक्षाच्या खाली दोन दिवसाच्या उपवासाचा नियम घेऊन प्रतिमायोग धारण करून विराजमान झाले होते. वैशाखा शुक्ल दशमीच्या दिवशी दुपारी हस्त आणि उत्तराफाल्गुनी नक्षत्रामध्ये जेव्हा चंद्रमा उदय झाल्यावर परिणामांची तीव्रता वाढवत ते क्षपक श्रेणीवर आरूढ झाले. त्याच वेळी त्यांनी शुक्ल ध्यानाने चारहि घातीया कर्मांचा नाश करून अनंत चतुष्टय प्राप्त केले आणि चौतीस अतिशयांनी सुशोभित होवून परमात्मा झाले.

त्याच वेळी सौधर्म इंद्राने चारहि प्रकारच्या देवांना बरोबर घेऊन समवशरणाची रचना करून केवलज्ञान कल्याणकाची विधिवत पूजा केली, भगवान महावीराच्या समवशरणाचा विस्तार एक योजन होता. वृषभदेवाच्या समवशरणाप्रमाणेच अगणित महिमांशाली वैभवांनी युक्त अशा समवशरणांत बारा सभेत मनुष्य, देव, तिर्यंच इत्यादि बसले होते परंतु भगवानची दिव्यध्वनि उद् घृत झाली नाही.

**गौतम स्वामीचे आगमन :** त्यानंतर इंद्राने अवधिज्ञानाने दिव्यध्वनि न खिरण्याच्या कारणांस जाणून युक्तिने गौतम गौत्रीय इंद्रभूती ब्राह्मणाला तेथे आणले. इंद्रभूतीने प्रश्नाच्या उत्तराच्या काललब्धी निमित्याने ५०० शिष्यांबरोबर भगवानाच्या चरणांजवळ दीक्षा घेतली व त्यांचे प्रथम गणधर झाले. त्याच क्षणाला त्यांना सात ऋद्धीयां प्राप्त झाल्या. त्या दिवशी श्रावण कृष्ण प्रतिपदेला पूर्वान्ह काळांत भगवानाची दिव्यध्वनि प्रकट झाली आणि रात्रीच्या प्रथम प्रहरात गौतम गणधराने अकरा अंग आणि रात्रीच्या उत्तरार्ध भागात चौदा पूर्व ह्यांची रचना केली.

यानंतर वायुभूति, अग्निभूत, सुधर्म, मौर्य, मौन्द्रय, पुत्र, मैत्रेय, अकम्पन, अंधवेला आणि प्रभास हे दहा गणधर झाले. याप्रकारे महावीर स्वामीच्या समवशरणांमध्ये गणधर-११, अकरा अंग आणि चौदा पूर्व धारक मुनि - ३११, शिक्षक मुनि - ९९००, अवधिज्ञान धारी मुनि - १३००, केवलज्ञानी - ७००, विक्रियाऋद्धी धारी मुनी - ९००, मनःपर्यायज्ञान धारी - ५००, अनुत्तरवादी मुनि - ४००, अशाप्रकारे सर्व मिळून १४००० मुनि आणि चंदनासह ३६०० आर्यिका, श्रावक - १०००००, श्राविका - ३०००००, असंख्यांत देव, देवी आणि संख्यांत तिर्यंच जीव होते.

**भगवान महावीरांचे निर्वाण** - भगवान महावीरांनी तीस वर्ष पर्यंत भव्य जीवांना धर्माचा उपदेश दिला आणि पावापूरी येथे, कार्तिक कृष्ण अमावस्याच्या प्रातः वेळेस सिद्ध पदाला प्राप्त झाले.


## बारा चक्रवर्ती

भरत, सगर, मधवा, सनत्‌कुमार, शांति, कुंथु, अर, सुभौम, पद्म, हरिषेण, जयसेन आणि ब्रह्मदत्त हे क्रमाने बारा चक्रवर्ती सर्व तीर्थंकरांची प्रत्यक्ष आणि परोक्ष वंदना करण्यामध्ये आसक्त आणि भक्तिभावांनी ओतप्रोत परिपूर्ण होते. भरत चक्रवर्ती ऋषभदेवाच्या काळात, सगर चक्री अजितनाथ देवाच्या काळांत, मधवा आणि सनत्‌कुमार हे दोन चक्रवर्ती धर्मनाथ आणि शांतिनाथ यांच्या मधल्या काळात झाले आहे. शांतिनाथ, कुंथुनाथ आणि अरहनाथ हे तीन चक्रवर्ती असून सुद्धा तीर्थंकर झाले आहे. सुभौम चक्रवर्ती अरहनाथ आणि मल्लीनाथ यांच्या काळात, पद्म चक्रवर्ती मल्लीनाथ आणि मनिसुव्रत यांच्या मध्यकाळांत, हरिषेण चक्रवर्ती मुनिसुव्रत आणि नमीनाथ यांच्या काळात, जयसेन चक्रवर्ती नमि आणि नेमीनाथ यांच्या काळात, आणि ब्रह्मदत्त चक्रवर्ती नेमी आणि पार्श्वनाथ, यांच्या काळांमध्ये झाले आहे.

पूर्व जन्मात केलेल्या तपाच्या बळांमुळे भरत आदि चक्रवर्तींच्या आयुधशाळेत जेव्हा आश्चर्यचकित करणारे चक्ररत्न उत्पन्न होतात, तेव्हा ते चक्रवर्ती अतिशय आनंदीत होऊन, सर्व प्रथम जिनेंद्र देवाची पूजा करून, दिग्विजय प्राप्त करण्यासाठी पूर्व दिशेला प्रयाण करतात. क्रमाने, दक्षिण भरत क्षेत्रांतील दोनहि खंडांना विजयी करून पुन्हा उत्तर भारताचा संपूर्ण प्रदेश व विद्याधरांवर विजयश्री प्राप्त करून, जेव्हा हे चक्रवर्ती ऋषभगिरी पर्वतावर आपले नाव लिहिण्यासाठी पोहचतात, तेव्हा आपले नाव लिहिण्यासाठी तिळमात्र सुद्धा जागा न दिसल्यामुळे, चिंतामग्न अवस्थेत उभे असतात. त्याचवेळी त्यांचा विजयश्रीचा अहंकार गळून जातो. मंत्री आणि देवांच्या अनुरोधाने एका स्थानांवरील कोण्या एका चक्रवर्तीचे नाव आपल्या दंडरत्नाने मिटवून आपले नाव अंकित करतात. अशाप्रकारे, हे सर्व चक्रवर्ती संपूर्ण सहा खंड जिंकून आपल्या नगरांत प्रवेश करतात.

**चक्रवर्तीचे वैभव :** प्रत्येक चक्रवर्ती उत्तम संहनन, उत्तम संस्थान युक्त सुवर्ण रंगाचे असतात. त्यांच्या शह्याण्णव हजार राण्या असतात. त्यापैकी ३२००० आर्यकन्या, ३२००० विद्याधर कन्या, आणि ३२००० म्लेच्छ कन्या असतात. प्रत्येक चक्रवर्तीचे संख्यांत हजार पुत्र-पुत्रीं, ३२००० मांडलिक राजे, ३६० अंगरक्षक, ३६० स्वयंपाकी, ३५०००००० बुधवर्ग, ३०००००००० गाई, १०००००००० भोजन ताट, ८४०००००० उत्तम हत्ती, ८४०००००० रथ, १८००००००० घोडे, ८४०००००० उत्तम वीर योद्धा, ८८००० म्लेच्छ राजे, अनेक करोड विद्याधर, ३२००० मुकुटबद्ध राजे, ३२००० नाट्यशाळा, ३२००० संगीत, नृत्यशाळा आणि ४८००००००० पदादी सैनिक असतात.

सर्व चक्रवर्तींच्या अधीन प्रत्येकी ९६०००००० गांव, ७५००० नगर, १६०००, खेट, २४००० कर्वट,



४००० मटंब, ४८००० पत्तन, ९९००० द्रोणमुख, १४००० संवाहन, ५६ अंतर्द्वीप, ७०० कुक्षिनिवास, २८००० दुर्ग इत्यादि असतात. या अतिरिक्त, चौदा रत्न, नऊ निधि आणि दशांश भोग सुद्धा असतात.

**चौदा रत्न :** हत्ती, घोडे, गृहपति, स्थपति (सारथी / अंगरक्षक), सेनापति, पट्टराणी आणि पुरोहित हे सात जीवरत्न आहे. छत्र, तलवार, दंड, चक्र, कांकीणी, चिंतामणी आणि चर्म हे सात रत्न निर्जीव असतात. चक्रवर्तींच्या चमरांना बत्तीस यक्ष हालवितात.

**नऊ निधि :** काळ, महाकाळ, पांडू, मानव, शंख, पद्म, नैसर्प, पिंगळ, आणि अनेक प्रकारचे रत्न हे नऊ निधि श्रीआवासांत उत्पन्न होतात. ह्या नऊ निधि क्रमाने प्रत्येक ऋतुप्रमाणे योग्य द्रव्य, भाजन (भांडे), धान्य, शस्त्र, वाद्य, वस्त्रहर्म्य, आभरण आणि रत्न समुहांना प्रदान करतात. प्रत्येक चक्रवर्तींचे २४ दक्षिणावर्ती उत्तम पांढरे शंख, एक कोडा कोडी नांगर(हल), व बारा (१२) मोठ्या मधुर आवाजाचे नगारे / मृदुंग असतात ज्यांचा आवाज १२ योजन पर्यंत देशात ऐकू जातो.

**दशांग भोग :** दिव्यआवास, रत्न, निधि, सैन्य, भांडे, भोजन, शय्या, आसन, वाहन आणि नाट्य हे ह्या चक्रवर्तींचे दहा भोग म्हटले आहे.

**(ह्या चक्रवर्तींचे अवगाहना, आयुष्य, राज्यकाळ इत्यादि चे वर्णन चार्ट मध्ये पहा.)**

भरत चक्रवर्ती प्रथम चक्रवर्ती होते आणि भगवान वृषभदेवांचे ज्येष्ठ पुत्र होते. त्यांच्याच नावाने ह्या भरतभूमिला "भारत" म्हणतात. त्यांनी दीक्षा घेतल्यानंतर अंतमुहूर्तावरच केवलज्ञान प्राप्त केले होते. यांचे जीवन चरित्र महापुराण आणि भरतेश वैभव ह्या ग्रंथामध्ये पहावे. ह्यांचा, कामदेव पदाचे धारक बंधु बाहुबलीकडून मानभंग, विजय भंग झाला होता. यालाच हुंडावसर्पिणी काळाचा दोष म्हटल्या गेला आहे.

## भरत चक्रवर्ती

भगवान वृषभदेवाच्या यशस्वती राणीपासून भरत महाराजांचा जन्म झाला होता. भगवान वृषभदेवांनी दीक्षेला जाण्यापूर्वि भरतास राज्य देऊन सम्राट पदांवर आरूढ केले होते. एक दिवशी सम्राट भरतास एकाच वेळी तीन शुभ समाचार मिळाले. पूज्य पिताजींना केवलज्ञान प्राप्त झाले आहे, अंतःपुरांत पुत्र जन्म झाला आहे, आणि आयुधशाळेत चक्ररत्न प्रकट झाले आहे. क्षणभर राजा भरताने विचार केला की केवलज्ञान उत्पन्न होणे हे धर्माचे फळ आहे, चक्ररत्न प्रकट होणे हे अर्थाचे फळ आहे, पुत्र प्राप्ती होणे हे काम फळ आहे, म्हणून महाराज भरताने सर्व प्रथम समवशरणांत जाऊन वृषभदेवाची पूजा केली व उपदेश ऐकला. नंतर चक्ररत्नाची पूजा केली. शेवटी, पुत्र जन्माचा उत्सव साजरा केला. त्यानंतर महाराज भरताने दिग्विजय मिळविण्यासाठी प्रस्थान केले. चक्ररत्न सैन्याच्या पुढे पुढे चालत होते. संपूर्ण सहा खंड पृथ्वी जिंकल्यानंतर वापस परत येताना कैलास पर्वताजवळ आहे असे पाहून सैन्याला तेथेच थांबवून स्वतः समवशरणांत जाऊन भगवानाची विधिवत पूजा केली व त्यानंतर सैन्यासह अयोध्येला वापस आले. त्यावेळी महाराज भरताचे चक्ररत्न नगराचे मुख्य प्रवेशद्वार उल्लंघून पुढे जाऊ शकले नाही. चक्ररत्नाची रक्षा करणाऱ्या कितीतरी देवांना चक्ररत्न एका जागी स्थिर झालेले पाहून आश्चर्य वाटू लागले होते. महाराज भरत सुद्धा विचार करू लागले की सर्व दिशांना विजय मिळवितांना हे चक्र कोठेहि थांबले नाही तर माझ्या घरच्या आंगणातच का थांबले ?

महाराज भरताने हाच प्रश्न राजपुरोहितांना विचारला. पुरोहिताने त्यांना उत्तर दिले की हे देव ! तुम्ही जरी बाहेरच्या लोकांना जिंकले आहे तरी तुमच्या घरचेच लोक तुमच्या विजयाला अनुकूल नाहीत. त्यांनी तुम्हाला नमस्कार न करता ते तुमच्या विरुद्ध उभे आहेत. हे कारण समजल्यावर भरताने आपल्या मनात

विचार केला आणि आपल्या मंत्र्यांशी विचार विनिमय करून हुशार दूताला सर्व प्रथम आपल्या नव्याण्णव भावांकडे पाठविले. ह्या सर्व भावांनी दूताकडून समाचार ऐकून विरक्त होऊन भगवान वृषभदेवांच्या समवशरणांत जाऊन दीक्षा ग्रहण केली. त्यानंतर सुद्धा चक्ररत्नाच्या अंतपुरांत प्रवेश न केल्यामुळे, दुःखित मनाने एका दूतास भाऊ बाहुबलीकडे पाठविले. बाहुबलीने म्हटले की, "भाऊ म्हणून मी नमस्कार करू शकतो परंतु चक्रवर्ती राजाधिराज म्हणून मी नमस्कार करू शकत नाही", पूज्य पिताजींनी दिलेल्या राज्यावर मी राज्य करीत आहे त्यामुळे तुझ्या राज्याशी मला काहीच कर्तव्य नाही. बाहुबलीने स्पष्ट सांगितले की मला जर जबरदस्तीने नमस्कार करावयास सांगितले तर आपआपल्या शक्तीचा युद्ध भूमीमध्येच परिचय द्यावा लागेल. ह्या बिकट परिस्थितीमुळे महाराज भरत विचार करू लागले की, ज्यांना मी लहानपणापासून स्वतंत्र वृत्तीने पालनपोषण करून मोठे केले असे अन्य कुमार जर माझ्या विरुद्ध झाले तर खुशीने होवो, परंतु हा बाहुबली तरूण, बुद्धिमान, विनयी, चतुर, सज्जन, सर्व काही नियमाला जाणणारा असताना सुद्धा माझ्या विरुद्ध उभा राहण्यास - माझ्याशी युद्ध करण्यास कसा तयार झाला ? अशा प्रकारे, भरताने आपल्या लहान भावाला जिंकण्याच्या इच्छेने, अनेक राजे व सहा प्रकारच्या सैन्य दलासहित पुढे प्रस्थान केले.

दोन्हीकडच्या सैन्य शक्तीला पाहून काही प्रमुख मंत्री विचार करू लागले की क्रुर ग्रहांप्रमाणे असणाऱ्या ह्या दोघांचे युद्ध शांती स्थापण्यासाठी तर नाहीच, हे दोघेहि चरम शरीरी आहे, त्यामुळे ह्या दोघांना काहीच होणार नाही, परंतु दोन्ही कडील सैन्याचाच भयंकर विनाश होईल. अशाप्रकारे महासंहाराला भिऊन मंत्र्यांनी दोघांशी विचार विनिमय करून व दोघांचीही आज्ञा घेऊन धर्मयुद्ध करण्याची घोषणा केली. अर्थात, या युद्धात या दोघांमध्येच दृष्टियुद्ध, जलयुद्ध आणि बाहुयुद्ध होऊन त्यामध्ये ज्याला विजय मिळेल, तोच विजयश्रीला वरण करेल.

मनुष्य आणि देवांनी पृथ्वी आणि आकाश व्याप्त केले. त्यानंतर दोघांमध्ये दृष्टियुद्ध सुरू झाले. परंतु बाहुबलीने आपल्या एकाग्र दृष्टीने भरतास जिंकले. जल युद्धामध्ये बाहुबलीने भरताच्या तोंडावर अत्यधिक पाणी फेकून त्यास कासाविस करून जिंकून घेतले, कारण भरताची उंची ५०० धनुष्य आणि बाहुबलीची उंची ५२५ धनुष्य प्रमाण होती. मल्लयुद्धांत सुद्धा बाहुबलीने भरताला जिंकून आपल्या खांद्यावर उचलले. दोन्ही पक्षांतील राजांसमोर आपला अपमान झालेला पाहून भरताने क्रोधाने चक्ररत्नाचे स्मरण करून बाहुबलीवर सोडले. परंतु बाहुबली अवध्य असल्यामुळे चक्राने बाहुबलीला प्रदक्षिणा केल्या व तेज रहित होऊन स्वतः बाहुबली जवळ थांबले. त्यावेळी मोठ-मोठ्या राजांनी भरताचा धिक्कार केला व म्हटले की, बस करा ! असे साहस करू नका, हे युद्ध बंद करा ! असे ऐकल्यावर चक्रवर्ती तर अधिक क्रोधित झाले, परंतु बाहुबलीने, तुम्ही खूप पराक्रम दाखविला आहे असे म्हणून, भरताला उच्चासनांवर बसविले. ह्या संपूर्ण घटनाक्रमाने बाहुबली त्याच क्षणी विरक्त झाला. संसार, शरीर, वैभव इत्यादींच्या क्षणभंगुरतेचा विचार करून, आपल्या मोठ्या भावाला आपल्या अपराधांची क्षमा मागून तपोवनांत जाऊ लागले. तेव्हा भरत सुद्धा अत्यंत दुःखी होऊन बाहुबलीस समजावून थांबण्यास विनवू लागले. बाहुबली आपल्या वैराग्य भावनेवर दृढ राहून वनांत निघून गेला व दीक्षा घेऊन एक वर्षाचा योग धारण केला. एक वर्षाच्या ध्यानावस्थेत सर्पांनी त्यांच्या चरणांच्या आश्रयाने बांबी बनविल्या, पक्षांनी घरटे-घोसलें बनविले, लता वेलींनी शरीरापर्यंत वाढून त्याच्या शरीराला आच्छादित करण्याचा प्रयत्न केला, परंतु चक्रवर्ती भगवान बाहुबली आपल्या उग्र तपांमध्ये लीन होते.

इकडे भरत महाराजांचा चक्रवर्ती पदांवर महासाम्राज्य अभिषेक झाला. दीक्षा घेताना बाहुबलीने एक

वर्षाचा उपवासाचा नियम घेतला होता. ज्या दिवशी त्यांचा हा उपवास पूर्ण झाला त्यादिवशी, भरताने येऊन त्यांची पूजा केली. त्याचक्षणी त्यांना केवलज्ञान प्राप्त झाले. ह्या भरताला[१] माझ्या निमित्याने अतोनात दुःख व त्रास दिला आहे असा विचार बाहुबलीच्या मनांत निरंतर राहत होता, परंतु भरताने पूजा करताच बाहुबलीचे हृदय विकल्प रहित झाले व त्याचवेळी त्यांना केवलज्ञान प्राप्त झाले. महाराज भरताने मनोभावाने पूजा केली. केवलज्ञान प्रकट होण्यापूर्वीची पूजा, महाराज भरताने आपला अपराध क्षमा होण्याच्या उद्देशाने केली होती आणि केवलज्ञान प्रकट झाल्यानंतरची पूजा केवलज्ञान महोत्सवाची होती. त्यावेळी देव कारागिरांनी भगवान बाहुबलीसाठी गंधकुटी निर्माण केली होती. सर्व पदार्थांना समजणारे केवली बाहुबली आपल्या वचनरूपी अमृतमय उपदेशाने सर्व संसाराला संतुष्ट करत करत भगवान वृषभदेवांच्या सान्निध्यात कैलाश पर्वतावर पोहोचले.

**ब्राह्मण वर्णाची उत्पत्ती :** कोण्या एकावेळी महाराज भरत विचार करतात की मी जिनेंद्र देवाची विशेष महापूजा करावी, आणि धन, धान्य, दान करून सर्वांना संतुष्ट करावे. परंतु सर्वदा निस्पृह असणारे मुनि लोक तर माझ्याकडून काहीच धन संपत्ति घेत नाहीत, तथा असे गृहस्थी सुद्धा कोण आहे की जे धन, धान्य इत्यादि संपत्ती घेऊन पूजा करण्यास योग्य आहे ? जे अणूव्रतधारी श्रेष्ठ पुरूष आहे व श्रावकांमध्ये सुद्धा श्रेष्ठ आहे अशांना दान देणे योग्य होईल. अशा विचाराने भरताने योग्य व्यक्तींची निवड करण्याच्या उद्देशाने सर्व राजांना आमंत्रण दिले. घरच्या अंगणात आणि रस्त्यावर खूब हिरवे अंकुर, फळ आणि फुले टाकून दिले. त्या लोकात जे अव्रती होते ते बिना विचार करता राजदरबारांत आले. राजा भरताने त्या सर्वांना अलग करून उरलेल्या लोकांना बोलाविले. पापाच्या भीतीने कितीतरी लोक वापस गेले व कितीतरी लोक वापस जाण्याच्या तयारीत होते, परंतु चक्रवर्तीच्या विशेष आग्रहावरून काही लोक अन्य स्वच्छ मार्गाने आले, तेव्हा महाराजांनी विचारलेल्या प्रश्नाच्या उत्तरात सांगितले की, आज पर्वाच्या दिवशी अंकुर, हिरवे पान, फुले इत्यादींचा नाश करणे योग्य नाही. हे देव ! हिरवे अंकुर इत्यादी मध्ये अनंत निगोदिया जीव असतात, असे सर्वज्ञ देवांनी सांगितले आहे. अशा उत्तराने, महाराज भरत अत्यंत प्रभावित झाले आणि वृत्तांत दृढ असणाऱ्या त्या सर्वांची खूब प्रशंसा केली व त्यांना दान, मान इत्यादींनी सन्मानित करून पद्म नावाच्या निधितून प्राप्त झालेल्या एक पासून अकरा संख्या असलेल्या ब्रह्मसुत्राच्या व्रतसुत्राने श्रेणीबद्ध केले. भरताने त्यांना उपासकाध्ययनांगातून देवपूजा, व्यवसाय, दान, स्वाध्याय, संयम आणि तप यांचा उपदेश दिला. त्रेपन गर्भान्वय क्रियां, अट्ठेचाळीस दीक्षान्वय क्रिया, सात कर्त्रन्वय क्रियां सुद्धा शिकविल्या. व्रतांच्या संस्कारामुळे ब्राह्मण, शस्त्र धारण करण्यामुळे क्षत्रिय, न्यायपूर्वक धन कमाविण्यामुळे वैश्य आणि नीच वृत्तींचा आश्रय घेतल्यामुळे शूद्र म्हटल्या गेले आहे.

**भरताचे सोळा स्वप्न :** काही वर्ष व्यतित झाल्यानंतर एक रात्री भरताने अद्भूत फळ दाखविणारे काही स्वप्न पाहिजे. त्यांना पाहून काही उद्विग्न झालेल्या भरताला हे सुद्धा समजले होते की ह्या स्वप्नांचे फळ अशुभ आहेत व हे पंचम काळात फळ देणारे आहेत. अशा प्रकारे विचार करत भरताने भगवानाच्या समावशरणांत जाऊन पूजा-भक्ति इत्यादि करून भगवानांना प्रार्थना केली, हे भगवान ! मी सिंह, सिंहाचे शावक इत्यादि सोळा स्वप्न पाहिले आहे, त्यांचे फळ काय आहे ? मी ब्राह्मण वर्णाची स्थापना केली आहे ही सुद्धा योग्य आहे की अयोग्य ? कृपाकरून आमचा संशय दूर करा. जरी, अवधिज्ञानाने भरताने त्या स्वप्नांचे फळ जाणून घेतले होते, तरी पण सर्वांना विशेष माहिती होण्यासाठी भगवानापासून ऐकण्याची इच्छा आहे. भरताचा प्रश्न

---

१. संक्लिष्टो बरताधीशः सोऽस्मत्त इति यत्किल ।
हृदस्य हार्द तेनासीत्तत्पूजापेक्षि केवलम् ॥१८६॥ आदिपुराण पर्व, ३६, पृ. २१७.

संपल्यावर जगद् गुरू भगवान आपल्या दिव्यध्वनीने सभेला संतुष्ट करू लागले. हे भरत ऐक ! (१) तू जे 'पृथ्वीवर एकटे विहार करून पर्वत शिखरांवर चढतांना तेवीस सिंह पाहिले आहे' त्याचे फळ असे की, महावीर स्वामी सोडून बाकी तीर्थंकरांच्या समयांत दुष्ट नयाची उत्पत्ति होणार नाही. (२) 'एकट्या सिंहाच्या पाठीमागे हरीण पाडसांना पाहिल्यामुळे' महावीर स्वामीच्या समयी परिग्रही कुलिंगी अधिक होतील. (३) 'मोठ्या हत्तीच्या ओझ्याला घोड्यावर लादलेले पाहून' पंचम काळातील साधु तपाच्या सर्व गुणांना धारण करण्यास असमर्थ होतील. (४) 'बकरे वाळलेली पानं खातांना पाहिले' म्हणजे पुढे येणाऱ्या काळात मनुष्य दुराचारी होतील. (५) 'हत्तीवर चढलेल्या वानरांना पाहिले' म्हणजे, पुढे क्षत्रिय वंश नष्ट होईल. नीच कुळांतील लोक पृथ्वीवर शासन करतील. (६) 'कावळे उल्लूला त्रास देत आहे' म्हणजे, मनुष्य धर्माच्या इच्छेने जैन साधू सोडून दुसऱ्या साधूकडे जातील. (७) 'नाचत असलेल्या अनेक भूतांना पाहिले' म्हणजे, लोक व्यंतरांना रेव समजून त्यांची पूजा करावयास लागतील. (८) 'मध्यभागी कोरडा आणि चारही बाजूंनी पाणी भरलेला तलाव पाहिला' म्हणजे, धर्माचा आर्य खंडात ऱ्हास होईल परंतु म्लेच्छ खंडात राहील. (९) 'धुळीने माखलेल्या रत्नांच्या राशीला पाहिले' म्हणजे, पंचम काळात ऋद्धिधारी श्रेष्ठ साधू होणार नाही. (१०) 'कुत्र्यांना नैवेद्य खाताना पाहिले' म्हणजे, व्रताने रहित ब्राह्मणांचा विद्वान म्हणून आदरसत्कार होईल. (११) 'मोठ्या आवाजाने हंबरणाऱ्या जवान बैलास विहार करताना पाहिले' म्हणजे, पंचम काळात तरुणपणीच मुनिचर्या पालन करू शकतील, अन्य अवस्थेमध्ये शक्य होणार नाही. (१२) 'नक्षत्र ताऱ्यांनी वेढलेला चंद्रमा पाहिला' म्हणजे, पंचम काळात मुनींना अवधिज्ञान आणि मनःपर्ययज्ञान होणार नाही. (१३) 'सोबत जाणाऱ्या बैलाची जोडी पाहिली' म्हणजे, पंचम काळांत मुनि संघ करूनच राहतील. एकटे विहार करणारे होणार नाही. (१४) 'ढगांच्या आच्छादनांत झाकलेला स्थिर सूर्य पाहिला' म्हणजे, पंचम काळांत केवलज्ञान प्राप्त झालेले मुनि होणार नाही. (१५) 'वाळलेला वृक्ष पाहिला' म्हणजे भविष्यात स्त्री-पुरुषांचे चारित्र भ्रष्ट होईल. (१६) 'वाळलेला जिर्ण पाचोळा पाहिला' म्हणजे भविष्यात महा औषधीचा रसगुण नष्ट होऊन जाईल. हे भरत ! ह्या स्वप्नांचे फळ अनेक वर्षांनंतर मिळेल असे समजावे, तथा तुम्ही जो ब्राह्मण वर्ण उत्पन्न केला आहे, तो वर्तमान समयी तर ठीक आहे परंतु पुढे, पंचम काळात तो वर्ग जातीच्या मदाने गर्वित होऊन प्रायः धर्माच्या विरुद्ध होऊन जाईल. तरी पण आता जो निर्मित केला आहे त्या सृष्टीला नष्ट करणे योग्य होणार नाही. भगवानांचे अशाप्रकारे वचन ऐकून, महाराज भरत आपला संशय दूर करून, भगवानांना वारंवार प्रणाम करून तेथून परत आले. अशुभ स्वप्नांच्या निवारणार्थ जिनेंद्र भगवानाची पूजा अभिषेक इत्यादि करून उत्तम पात्री दानाचे पुण्य कार्य केले.

अनेक वर्षापर्यंत साम्राज्याचा उपभोग घेत असताना एक दिवस, भरताने आरश्यात आपला चेहरा पाहिला, तेव्हा त्यांना एक पांढरा केस दिसला. त्याच क्षणी ते भोग उपभोगापासून विरक्त झाले. आपल्या अर्ककीर्ती पुत्रास राज्यपद दिले आणि जैनेश्वरी दीक्षा धारण केली. त्यांना त्याचवेळी, मनःपर्ययज्ञान प्राप्त झाले व त्यानंतर लगेच, केवलज्ञान सुद्धा प्रकट झाले. हे भरत केवली आता, देवाधिदेव भगवान झाले आणि इंद्राच्याकडून वंदनीय गंधकुटीमध्ये विराजमान झाले, अनेक वर्षापर्यंत भव्य जीवांना धर्मोपदेश देत, शेवटी शिल्लक राहिलेल्या कर्मांचा नाश करून मोक्षपदास प्राप्त केले.

**(परिशिष्ट चार्ट नं. ३ मध्ये चक्रवर्तीचे वर्णन पहा.)**

❋❋❋

## बलभद्र, नारायण आणि प्रतिनारायण

विजय, अचल, धर्म, सुप्रभ, सुदर्शन, नंदी, नंदिमित्र, राम आणि पद्म हे नऊ बलदेव झाले आहे.

त्रिपृष्ठ, द्विपृष्ठ, स्वयंभू, पुरुषोत्तम, पुरुषसिंह, पुरुषपुंडरीक, पुरुषदत्त, नारायण आणि कृष्ण हे नऊ नारायण झाले आहे.

अश्वग्रीव, तारक, मेरक, मधुकैटभ, निशुंभ, बालि, प्रहरण, रावण आणि जरासंध हे नऊ प्रतिनारायण झाले आहे.

त्रिपृष्ठ इत्यादि पाच नारायणांपैकी प्रत्येक क्रमाने श्रेयांसनाथ इत्यादि पाच तीर्थंकरांची वंदना करीत होते. अरहनाथ आणि मल्लीनाथ तीर्थंकरांच्या काळांमध्ये दत्त नावाचे नारायण झाले आहे. सुव्रत आणि नमीनाथ तीर्थंकरांच्या काळांमध्ये लक्ष्मण, आणि भगवान नेमीनाथ यांच्या काळांमध्ये कृष्ण नारायण झाले होते. नारायणांचे मोठे भाऊ बलदेव असतात, आणि नारायणांचे शत्रु प्रतिनारायण असतात.

**नारायणांचे सात महारत्न :** शक्ति, धनुष्य, गदा, चक्र, कृपाण, शंख आणि दंड, हे सात महारत्न अर्ध चक्रवर्ती राजांजवळ शोभायमान असतात.

**बलभद्राचे चार रत्न :** मूसळ, हल, रथ आणि रत्नावळी हे चार रत्न प्रत्येक बलदेवांच्या जवळ शोभित राहतात. नऊ प्रतिनारायण युद्धांत नऊ नारायणांच्या हस्ते, त्यांच्याच चक्राने मृत्यु पावून नरकात जातात. सर्व नारायण पूर्व भवांमध्ये तप करून निदान रहित मृत्युमुळे, स्वर्गात देव होऊन पुन्हा नारायण पदावर जन्म घेतात. ह्या पदावर असताना, भोगाच्या आसक्तितच, राज्यपदाचा उपभोग घेत, मरून नरक गतीला प्राप्त करतात. आठ बलदेव मोक्षाला आणि अंतिम बलदेव ब्रह्मस्वर्गाला जातात. हेच अंतिम बलदेव स्वर्गातून च्युत होऊन कृष्णाच्या काळात सिद्ध पदाला प्राप्त होतात.[१]

## मर्यादा पुरुषोत्तम श्री रामचंद्र

अयोध्याचे राजा दशरथाच्या चार राण्या होत्या, त्यांची नावे अनुक्रमाने अपराजिता, सुमित्रा, कैकयी आणि सुप्रभा होते, अपराजिताने (कौशल्या) पद्म (रामचंद्र) नावाच्या पुत्रास जन्म दिला. सुमित्रापासून लक्ष्मण, कैकयी पासून भरत आणि सुप्रभा पासून शत्रुघ्न असे दशरथाचे चार पुत्र झाले. राजा दशरथाने चौघांनाहि विद्याध्ययनांमध्ये योग्य कुशल करून दिले.

**लंका नगरी :** कोण्यावेळी अजितनाथ भगवानाच्या समवशरणांत राक्षसांचे इंद्र भीम आणि सुभीम यांनी प्रसन्न होऊन पूर्व जन्मीच्या स्नेह भावाने विद्याधर मेघवाहन यांना म्हटले की, हे वत्स ! या लवण समुद्रांत अतिशय सुंदर असे हजारो महाद्विप आहेत. त्या द्विपांत एक 'राक्षस द्वीप' आहे. हे द्वीप सातशे योजन लांब आणि तितकेच रूंद आहे. त्याच्या मध्यभागी नऊ योजन उंच, पन्नास योजन रूंद, 'त्रिकुटाचल' नावाचा पर्वत आहे. त्या पर्वताच्या पायथ्याशी तीस योजन विस्ताराची लंका नगरी आहे. हे विद्याधर ! तू आपल्या सर्व विद्याधर बांधवांबरोबर त्या नगरांमध्ये सुखाने रहा. असे म्हणून त्या भीम इंद्राने, त्या विद्याधराला एक उत्तम देवाधिष्ठित हार सुद्धा दिला होता. ह्याच्याच परंपरेत राजा रत्नश्रवाच्या राणी कैकयी पासून एका दैदिप्यमान

१. परिशिष्ट चार्ट नं. ४, ५, ६ मध्ये पहा.

प्रतापी पुत्राने जन्म घेतला. मेघवाहनाला, राक्षसाचा राजा इंद्र भीम याने, जो हार दिला होता, त्या हाराची रक्षा एक हजार नागकुमार करीत होते. त्या हाराचे तेज, प्रकाश किरणांनी सर्वदूर फैलले होते व राक्षसांच्या भीतीने अजून पर्यंत कोणीहि घातला नव्हता. रत्नत्रयांच्या त्या प्रतापी पुत्राने, एक दिवस, त्या हाराला आपल्या मुठ्ठीत ओढून घेतले. त्यामुळे कैकयीने, त्याच्या आईने, त्याला मोठ्या प्रमाने, तो हार त्याला घालून दिला. त्या हारांमध्ये, त्याचे एक मुख्य मुख सोडून, नऊ अधिक मुख मिळून दहा मुख दिसू लागले होते, म्हणून त्याचे नाव 'दशानन' असे ठेवले. त्यानंतर, कैकेयी राणीने, भानुकर्ण, चंद्रनखा, आणि विभीषण ह्यांना सुद्धा जन्म दिला होता. राक्षसांनी दिलेल्या लंका नगरीत राहत असल्यामुळे हे लोक राक्षसवंशी म्हणविल्या जाऊ लागले होते.

**सीतेचा विवाह :** मिथिला नगरीचे राजा जनकाची राणी विदेहाची सुपुत्री, सीता होती. एक दिवस, राजा जनकाने पुत्रीच्या विवाहासाठी, स्वयंवर मंडपाची निर्मिती केली व घोषणा केली की, जो कोणी वज्रावर्त धनुष्यास प्रत्यंच्या (दोरी) लावेल, तोच सीतेचा पति होईल. श्री. रामचंद्राने, त्या वज्रावर्त धनुष्याला प्रत्यंच्या लावली. रामचंद्राच्या गळ्यांत सीतेने वरमाळा टाकली. चंद्रवर्धन विद्याधराने आपल्या अठरा कन्यांचे लग्न लक्ष्मणाशी करून दिले. त्यावेळी भरताला विरक्त पाहून, राणी कैकयीच्या प्रभावाने, राजा कनकाने आपली कन्या, कनकसुंदरीचा विवाह, स्वयंवर पद्धतीने, भरताबरोबर करून दिला.

**रामचंद्राचा वनवास :** एक वेळी राजा दशरथाला वैराग्य उत्पन्न झाले आणि रामचंद्रास राज्यभार देऊन दीक्षा घेण्याचा निश्चय केला. त्याच वेळी भरत सुद्धा विरक्त होऊन दीक्षा घेण्यासाठी उत्सुक झाला. परंतु आई कैकयी, मनात काही विचार करून, राजा दशरथांजवळ गेली. समयोचित वार्तालाप करून, तिने, विवाहाच्या पूर्वी सारथ्याचे जे कुशल कार्य केले होते त्यामुळे जे वर राजा दशरथाने दिले होते व जे अजूनहि धरोवर म्हणून बाकी होते, ते वर मागितले. पतीच्या आज्ञेनुसार म्हटले की, "माझ्या मुलांस - भरतास राज्य प्रदान करा." हा वर दिल्यानंतर, राजा दशरथ रामचंद्राला बोलावून अत्यंत शोकाकूल अवस्थेत हे सर्व वर्णन करतो. मर्यादा पुरुषोत्तम रामचंद्राने आपल्या पित्यास अनेक प्रकारे सांत्वन देऊन शोकमुक्त केले, आणि बंधु लक्ष्मण आणि सति सीता ह्यांच्याबरोबर वन गमन केले. राजा दशरथाने सुद्धा मुनि दीक्षा घेतली. त्यावेळी भरताने सुद्धा मोठ्या जबरदस्तीनेच राज्यभार सांभाळला.

**रावणाचा मृत्यू :** वनवासाच्या प्रवासांमध्ये, कधीतरी एक वेळ, रावणाने धोक्याने सीतेचे अपहरण केले. तेव्हा हनुमान आणि सुग्रीव इत्यादि विद्याधरांच्या सहाय्याने रामचंद्राने रावणाशी युद्ध प्रारंभ केले. रावण प्रतिनारायण होता. त्याच्याच चक्ररत्नाने, लक्ष्णाच्या हाताने त्याचा युद्धभूमीमध्ये अंत झाला व त्याच चक्ररत्नामुळे लक्ष्मणाला नारायण हे पद प्राप्त झाले.

**सीतेचे निष्कासन :** बलभद्र पदधारी रामचंद्र आणि लक्ष्मण नारायण, अनेक वर्षांपर्यंत अयोध्येचे राज्य करीत समय व्यतीत करीत होते, की, एक दिवस सीतेच्या अपवादाची चर्चा, रामचंद्रापर्यंत पोहोचली. रामाने तेव्हा गर्भवती निर्दोष सीतेला धोक्यानेच वनांत पाठवून दिले. जेव्हा वनांत दुःखी मनाने विलाप करीत होती, तेव्हा पुंडरीकपूरचा राजा वज्रजंघ, तेथे आपल्या सेनेसह, हत्ती पकडण्यासाठी आला होता. त्याने मोठ्या धर्म प्रेमाने, सीतेला आपल्या बरोबर नेले. तेथेच सीतेला जुळे पुत्र उत्पन्न झाले, ज्यांचे, अनंगलवण आणि मदनांकुश असे नाव ठेवले. बालक्रिडांनी आपल्या मातेला प्रसन्न करत, त्यांनी किशोर अवस्थेमध्ये प्रवेश केला. त्यांच्या पुण्य प्रभावाने 'सिद्धार्थ' नावाच्या क्षुल्लक गुरू जवळ त्यांनी विद्याध्ययन प्राप्त केले. हे क्षुल्लकजी प्रतिदिन तीनहि काळ मेरू पर्वतांच्या चैत्यालयांची क्षणभरांतच वंदना करून वापस येत असे. थोड्याच दिवसात क्षुलकजींनी

त्यांना संपूर्ण शस्त्र आणि शास्त्रविद्यांत पारंगत करून दिले होते.

**रामचंद्राचे पुत्रांबरोबर युद्ध :** एक वेळी फिरत फिरत, नारद क्षुल्लक वेशांत तेथे आले आणि दोनही कुमारांना आशीर्वाद देऊन म्हणाले की, 'राजा रामचंद्र आणि लक्ष्मणासारख्या दोन विभूती तुम्हाला आता लवकरच प्राप्त होणार आहेत.' त्यांनी असे सांगितल्यावर त्या बालकांनी विचारले की, 'हे भगवान ! हे राम आणि लक्ष्मण कोण आहेत ?' नारदाने सीतेला वनांत सोडण्यापर्यंतचा सर्व वृत्तांत सांगितला. त्या बालकांनी पुन्हा विचारले की, येथून अयोध्या किती दूर आहे ? नारदाने सांगितले की, येथून अयोध्या साठ योजन दूर आहे. दोन्ही कुमार अयोध्येवर आक्रमण करण्यासाठी तयार झाले. आईने त्यांना अनेक प्रकारे समजाविण्याचा प्रयत्न केला व सांगितले की हे पुत्रांनो ! तुम्ही अयोध्येस जाऊन विनयपूर्वक आपल्या पित्यास आणि काकास नमस्कार करा. हेच न्याय संगत आहे." ह्यावर, त्या बालकांनी म्हटले की, "ह्यावेळी रामचंद्र आमच्या शत्रुस्थानी आहे." अशा प्रकारे बोलून, हट्टाने मातेची आज्ञा घेऊन आणि सिद्ध भगवानाला नमस्कार करून, युद्ध करण्यास निघाले. युद्धाच्या रणांगणावर महाभयंकर युद्ध करू लागले.

लक्ष्मणाने रागाच्या भरात त्यावेळी, चक्ररत्नाचे स्मरण करून मदनांकुशाला मारण्यासाठी चालविले. परंतु ते चक्ररत्न, लक्ष्मणापाशीच परत आले. त्यावेळी, सिद्धार्थ क्षुल्लकाने, रामचंद्र आणि लक्ष्मणाला वस्तुस्थितीने परिचित करविले. तेव्हा त्या दोघांनीहि शस्त्र टाकून दिले व पूर्वीचा शोक आणि वर्तमान समयाच्या हर्षाने उत्साहित होऊन आपल्या दोन्ही पुत्रांना भेटले. पुत्रांनी सुद्धा विनयाने मस्तक झुकवून पित्यास नमस्कार केला.

**सीतेची अग्निपरीक्षा :** त्यानंतर रामचंद्राच्या आज्ञेने, भामंडळ, विभीषण, हनुमान, सुग्रीव इत्यादि श्रेष्ठ राजे, पुंडरीकपुराला जाऊन सीतेला घेऊन आले. सभेमध्ये रामचंद्राच्या चेहऱ्यावरील भाव पाहून, किंकर्तव्यविमूढ सीता, तेथेच उभी राहिली. तेव्हा राम म्हणाले की, 'सीते ! समोर कां उभी आहेस ? समोरून दूर हो ! मी तुला पाहण्यासाठी समर्थ नाही आहे.' तेव्हा सीतेने म्हटले की, 'तुमच्या सारखा निष्ठुर अन्य दुसरा कोणी नाही आहे, मनोरंजनाच्या निमित्ताने, मला गर्भिणीला वनात पाठविणे काय उचित होते ?' तुम्हाला जर माझ्याबद्दल थोडी सुद्धा सहानुभूति असती तर, मला आर्यिकांच्या संघात सोडले असते. असो, हे देव ! तुम्ही माझ्यावर प्रसन्न व्हा. मला जी आज्ञा द्याल तिचे मी पालन करण्यास तयार आहे. तेव्हा, रामाने विचार करून अग्नि परीक्षेचा निर्णय दिला. तेव्हा, सहर्षाने "असेच हो !" म्हणून त्याचा स्वीकार केला. यावेळी, हनुमान, नारद इत्यादि सर्व घाबरून गेले होते.

महाविकराल अग्निकुंड पेटला होता. सीतेने पंचपरमेष्ठीची पूजा-स्तुति करून, मुनि सुव्रतनाथ तीर्थंकरांना नमस्कार केला आणि म्हणाली की, "जर मी स्वप्नांत सुद्धा रामाशिवाय कोणी अन्य पुरुषाची मन, वचन, कायेने इच्छा केली असेल तर, हे अग्नि देवता, मला भस्मवत् कर, अन्यथा अग्निचा स्पर्श होऊ देवू नको." असे म्हणून तिने अग्निकुंडात प्रवेश केला. त्याच वेळी, तिच्या शीलाच्या प्रभावाने, अग्नि ज्वाळा शांत झाल्या आणि त्याचे रूपांतर शीतल जलांमध्ये झाले, अग्निकुंडाचे स्थानी, कलकल आवाज करणारी विहीर तयार झाली व त्यामधले जल, चोहोबाजूंनी बाहेर वाहू लागले. फैलणाऱ्या पाण्याच्या राशीला पाहून, लोक घाबरू लागले होते, परंतु, रामचंद्राच्या चरणाला स्पर्श करून ते जल जेव्हा शांत झाले, तेव्हा त्यांना आश्चर्य मिश्रित आनंद झाला. त्या विहीरीच्या मध्यभागी कमळ सिंहानावर देवी सीता विराजमान होती. आकाशांतून देव पुष्पवृष्टी करत होते, देव दुंदूभी वाजत होती. लवण आणि अंकुश सीतेच्या आजूबाजूला उभे होते.

अशा सीतेला पाहून, रामचंद्र तीच्या जवळ गेले व म्हणाले, "हे देवी ! प्रसन्न हो ! आणि माझा अपराध

क्षमा कर." अशा वचनांना ऐकून सीता म्हणाली, "हे राजन् ! मला कोणाचाही राग आला नाही. ह्यामध्ये आपला अथवा कोणाचाही दोष नाही, सर्व माझ्या पूर्वी केलेल्या पाप कर्मांचेच फळ आहे, आता मी स्त्री पर्याय पुन्हा प्राप्त न हो, असे कार्य करण्याची इच्छा करते." असे म्हणून, सीतेने निस्पृह होऊन आपले केश उखाडून रामास दिले. हे पाहून रामचंद्र मुर्च्छित झाले. इकडे, जोपर्यंत चंदन आदी उपचाराने रामाला शुद्धिवर आणले, तोपर्यंत सीतेने पृथ्वीमति आर्यिका जवळ दीक्षा घेतली होती. ज्यावेळी रामचंद्र शुद्धिवर आले तेव्हा, सीतेला जवळपास न पाहून, शोकातिरेकाने क्रोधित होऊन, सीतेला परत आणण्यास, देवांनी व्यापून गेलेल्या, उद्यानात गेले. तेथे मुनि मध्ये श्रेष्ठ सर्वभऊषण केवली यांना पाहिले. शांत होऊन, त्यांना नमस्कार करून, मनुष्यांच्या कोठ्यात जाऊन बसले. तेथेच वस्त्रमात्र परिग्रहाला धारण करणारी सीता आर्यिकांच्या कोठ्यात बसली होती. केवली भगवानांचा विशेष उपदेश ऐकून राम शांत झाले.

**श्री रामचंद्राचा शोक :** केव्हा तरी सौधर्म इंद्र देवांच्या सभेत विराजमान होते. अनेक धर्म चर्चांमध्ये राम आणि लक्ष्मण यांच्या परस्पर स्नेहाची चर्चा झाली. ही चर्चा ऐकून उत्सुकतेने, रत्नचूल आणि मृगचूल नावाचे दोन देव, परीक्षा घेण्यासाठी, अयोध्येला गेले. कृत्रिमपणे अयोध्येच्या अंतःपुरात रडण्याचा आवाज निर्मित करून, कोणी जाऊन लक्ष्मणास सांगितले की, रामाचा मृत्यु झाला आहे. हे शब्द ऐकल्याबरोबर, "हाय ! हे काय झाले !" असे म्हणताच लक्ष्मणाचे प्राण निघून गेले. हे दृश्य पून दोन्ही देव दुःख आणि आश्चर्य होऊन स्वर्गास निघून गेले व सदैव पश्चात्तापाच्या अग्नीने होरपळत राहिले. त्यावेळी लक्ष्मणाच्या सतरा हजार राण्या शोक विव्हळ झाल्या होत्या.

रामचंद्र जेव्हा तेथे आले व सर्व मृत चिन्ह दिसत असताना सुद्धा, केवळ मोहाने त्याला जीवित समजू लागले होते. सहा महिने पर्यंत, लक्ष्मणाचे मृत शरीर घेऊन भ्रमिष्ठासारखे इकडे तिकडे फिरत होते. ह्यामध्येच, सीतेच्या दोन्ही पुत्रांनी, 'पुन्हा गर्भवासात जाऊ लागू नये,' ह्या भीतीने भयभीत होऊन, पित्याला नमस्कार करून, वनात जाऊन दीक्षा घेतली होती. अनेक इष्टमित्र आणि राजांनी रामचंद्रास समजावून सांगितले, परंतु काहीही उपयोग झाला नाही. त्याच वेळी कृतांतवक्र सारथी आणि जटायू चे जीव, जे स्वर्गांत देव होते, ते येऊन विक्रियासिद्धीने अनेक विपरीत-विपरीत क्रिया करू लागले होते. एक देव वाळलेल्या झाडांना पाणी देऊ लागला, तर दुसरा देव, दगडांवर बी पेरू लागला. अशा विपरीत क्रिया पाहून, रामचंद्र त्यांना समजाऊ लागले. परंतु स्वतःलाच समजावू शकले नाही. एक दिवस, एक देव मृतक शरीरालाच खांद्यावर घेऊन, त्यांच्या समोर उभा राहिला. ते त्याला सुद्धा समजावू लागले. तेव्हा, तो देव म्हणतो की हे देव ! तुम्ही सुद्धा मृतकालाच घेऊन फिरत आहात. एकसारखे असणाऱ्यांतच मित्रता होत असते. आमच्यासारख्या मूर्खांचे आपण राजा आहात. अशा प्रकारच्या देवांच्या वचनांने रामाचा मोह कमी झाला, आणि आपल्या स्वयंच्या चेष्टांवर लज्जित होऊन, शोक सोडून, लक्ष्मणाचा दाह संस्कार केला.

**रामचंद्राची दीक्षा आणि निर्वाण गमन :** त्यानंतर अनंगलवणाचा पुत्र अनंगलवण ह्यास राज्य देऊन आकाशगामी सुव्रत मुनि जवळ निर्ग्रंथ दीक्षा धारण केली. त्यावेळी शत्रुघ्न, विभीषण, सुग्रीव इत्यादि आणि सोळा हजार राजे साधू झाले. सत्तावीस हजार प्रमुख प्रमुख स्त्रीयां सुद्धा श्रीमती नावाच्या साध्वी पासून आर्यिका झाल्या. रामचंद्र उत्तम चर्याने युक्त असल्यामुळे गुरूंच्या आज्ञेने एकटेच विहार करू लागले.

पाच दिवसाचा उपवास करून धीर, वीर, योगी रामचंद्र पारण्यासाठी नंदस्थळी नगरामध्ये गेले होते. त्यांचे तेज व सुंदरता पाहून नगरांमध्ये चर्चेचा विषय झाला. पडगाहनच्या वेळेस, हे स्वामी ! येथे या ! येथे

थांबा ! इत्यादि अनेक शब्दांनी आकाश व्याप्त झाले. हत्तींनी साखळदंड तोडले, घोडे हिनहिनू लागले आणि त्यांनी आपले सर्व बंधन तोडले. त्यांचे रक्षक धावू लागले. राजा प्रतिनंदी सुद्धा क्रोधित होऊन आपल्या सैनिकांना आज्ञा करतो की, त्या मुनीराजांना माझ्याजवळ घेऊन या. अशा प्रकारच्या कोलाहलाला, महामुनि रामचंद्र अंतराय समजून वापस प्रस्थान करतात. त्यामुळे तेथे अजूनच खळबळ झाली.

त्यानंतर रामचंद्राने, पाच दिवसाचा दुसरा नियम घेऊन अशी प्रतिज्ञा घेतली की, जर मला वनातच आहार मिळाला तरच मी आहार घेईल, अन्यथा घेणार नाही. काही कारणाने वनांत गेल्यामुळे, ह्याच राजा प्रतिनंदिने राणीसह, त्यांना वनात आहार दिला व पंचाश्चर्य प्राप्त केले. रामचंद्राला अक्षीणमहानस ऋद्धी प्राप्त होती. अर्थात, त्या दिवशी त्या भांड्यातील अन्न संपत नव्हते. कठीणतम तपश्चरण करून रामचंद्राला माघ शुक्ल द्वादशीला केवलज्ञान प्राप्त झाले. तेव्हा देवांनी येऊन समवशरणाची रचना केली. रामचंद्राची आयु सत्तर हजार वर्ष होते आणि शरीराची उंची सोळा धनुष्य प्रमाण होती. रामचंद्र सर्व कर्म रहित होऊन तुंगी वरून निर्वाणास गेले.

आज सुद्धा राम, लक्ष्मण आणि सीता ह्यांचा आदर्श सर्वत्र स्तुतिपूर्वक गायन केल्या जातो.

ह्या प्रथमानुयोगांमध्ये : सृष्टीचा क्रम 'सांगून भगवान वृषभदेवांचे जीवनवृत्त सांगितल्या गेले आहे. काही मुख्य शलाका पुरुषांचा इतिहास सुद्धा सांगितला आहे. विशेष जिज्ञासूंनी आदिपुराण, उत्तर पुराण, हरिवंश पुराण इत्यादींचा स्वाध्याय केला पाहिजे.

❋❋❋


## द्वितीय खण्ड

# क र णा नु यो ग

**लोकालोकविभक्तेर्युगपरिवृत्तेश्चतुर्गतीनां च ।**
**आदर्शमिव तथामतिरवैति करणानुयोगं च ॥ ४४ ॥**

अर्थ - अशाप्रकारचे सम्यग्ज्ञानच लोक-अलोकाचे भेद, युग परिवर्तन आणि चारी गतींना, आरशाप्रमाणे स्वच्छ पाहू शकणाऱ्या करणानुयोगाला समजू शकते. अर्थात करणानुयोगामध्ये लोक-अलोक, युगपरिवर्तन आणि चर्तुगति परिवर्तन यांचे वर्णन आहे. या अनुयोगाने संपूर्ण विश्वाचे स्वरूप समजल्या जाते.

## तीन लोक


१ राजू
ऊर्ध्व लोक
पंच अनुत्तर विमान
नव अनुदिश
नव ग्रैवेयक
आरण
अच्युत
आनत
५ राजू
सानत्कुमार
माहेन्द्र
सौधर्म
ईशान
मध्य लोक १ राजू
रत्नप्रभा
शर्करा प्रभा
त्रस नाली
बालुका प्रभा
पंक प्रभा
धूम प्रभा
अधो लोक
तम प्रभा
महातम प्रभा
निगोद
७ राजू

# सामान्य लोक

सर्वज्ञ देवांनी पाहिलेल्या अनंतानंत अलोकाकाशाच्या मोठ्या मध्यभागी ३४३ राजु प्रमाण पुरुषाच्या आकाराचे लोकाकाश आहे. हे लोकाकाश जीव, पुद्गल, धर्म, अधर्म आणि काळ ह्या पांच द्रव्यांनी व्याप्त आहे. हे पांचही द्रव्य अनादि अनंत आहेत. या लोकाचे तीन भेद आहेत – अधोलोक, मध्यलोक आणि उर्ध्वलोक. संपूर्ण लोकाची उंची १४ राजुप्रमाण आहे. आणि रुंदी सर्वत्र ७ राजु आहे.

**लोकाची उंची** - असंख्यात योजनांचा १ राजु होतो. १४ राजु उंच लोकामध्ये, ७ राजुमध्ये अधोलोक आणि ७ राजुमध्ये स्वर्गादि आहेत. या दोघांच्या मध्ये ९९ हजार ४० योजन उंचीचा मध्यलोक आहे.

**लोकाचा विस्तार** - लोकाच्या खालच्या भागाची रुंदी ७ राजु आहे. ही रुंदी कमी होता होता मध्यलोकांमध्ये फक्त १ राजु राहते. पुनः मध्यलोकाच्या वर वाढता वाढता पाचव्या स्वर्गापर्यंत रुंदी ५ राजु होते. पुढे कमी कमी होता होता लोकाच्या अग्रभागी १ राजु राहते.

**त्रसनाली** - तिन्ही लोकांच्या अगदी मध्यभागी १ राजु रुंदी असलेली आणि १ राजु जाडी आणि १३ राजुस काही कमी उंची असलेली त्रसनाली आहे. या त्रसनालीमध्ये त्रस जीव राहतात.

**लोकाचे घनफळ** - या लोकाच्या तळभागी ७ राजु, मध्यभाग १ राजु, पाचव्या स्वर्गामध्ये ५ राजु आणि सर्वात शेवटी १ राजु आहे. चारही स्थानांच्या रुंदीस जोडल्यास ७+१+५+१=१४ राजु होतात. ह्या १४ राजुला ४ ने भाग दिल्यास १४÷४ = ३□ राजु येतात. या ३□ राजुमध्ये दक्षिण-उत्तरची गुणा केली तर ३□ □ ७ = २४□ होतात. नंतर रुंदी आणि जाडी यांच्या गुणाकाराच्या फळात १४ राजुने गुणा केल्यास २४□ □ १४ = ३४३ राजु होतात. अशाप्रकारे लोकाकाशाचे घनफळ ३४३ राजु प्रमाण आहे.

**वातवलय** - ह्या लोकाकाशाच्या चारही भागांनी वेष्ठित असे तीन वातवलय आहेत. हे तीनही वातवलय वायुकायिक जीवांच्या शरिर-स्वरूप स्थिर स्वभावाचे वायुमंडळ आहे. सर्वप्रथम लोकाच्या चारही भागांनी वेष्ठित असे घनोदधि वातवलय आहे. याला वेढा देऊन घनवातवलय आहे. आणि घनवातवलयाला वेढा देऊन तनुवातवलय आहे. तनुवातवलयाच्या चारही बाजूंनी अनंत अलोकाकाश आहे.

**वातवलयाचा वर्ण** - घनोदधिवातवलय गोमूत्र – वर्ण समान आहे. घनवातवलय मूंगाच्या रंगाप्रमाणे आणि तनुवातवलय अनेक रंगाचा आहे.

**वातवलयाची जाडी** - खालच्या तळभागापासून १ राजु उंचीपर्यंत तिघांचीही जाडी वीस-वीस हजार योजन आहे. सातव्या नरकाजवळ ७, ५, आणि ४ योजन आहे. मध्यलोकाच्या पार्श्वभागामध्ये ५, ४, ३ योजन आहे. पुढे पुढे ब्रह्मस्वर्गाच्या पार्श्वभागी ७, ५, ४ योजन आणि उर्ध्वलोकाच्या शेवटच्या पार्श्वभागांमध्ये ५, ४, ३ योजन आहे. लोकाकाशाच्या शिखरांवर क्रमशः २ कोस, १ कोस आणि १ कोसास काही कमी प्रमाण आहे.

# अधोलोक

अधोलोकामध्ये सर्वात प्रथम मध्यलोकांस लागुन 'रत्नप्रभा' पृथ्वी आहे. याच्या काही कमी १ राजु खाली 'शर्कराप्रभा' आहे. अशाप्रकारे एका खाली एक वालुकाप्रभा, पंकप्रभा, धूमप्रभा, तमः प्रभा आणि महातमः प्रभा अशा सात भूमि आहेत. ह्या सात पृथ्वी सहा राजुमध्ये आणि शेवटच्या सातव्या राजुमध्ये निगोद स्थान आहे.

**नरकांची दुसरी नावे** - घम्मा, वंशा, मेघा, अंजना, अरिष्टा, मधवी आणि माधवी ही नावे पृथ्वींची अनादि निधन आहेत.

**रत्नप्रभा पृथ्वीचे ३ भाग आहेत** - खरभाग, पंकभाग आणि अब्बहुल भाग. खरभागामध्ये आणि पंकभागामध्ये भवनवासी आणि व्यंतरवासी देव निवास करतात. अब्बहुल भागामध्ये प्रथम नरकाचे बीळ आहे. ह्या बिळामध्ये नारकीय जीवांचे आवास आहेत.

**नरकांच्या बिळांची संख्या** - सातव्या नरकांच्या बिळांची संख्या चौऱ्यांशी लाख प्रमाण आहे. प्रथम पृथ्वीचे ३० लाख, द्वितीय पृथ्वीचे २५ लाख, तृतीयचे १५ लाख, चवथ्या पृथ्वीचे १० लाख, पाचव्याचे ३ लाख, सहाव्या पृथ्वीचे १ लाखास ५ कमी आणि सातव्या पृथ्वीचे ५ बीळ आहेत.

**उष्ण आणि शीतबिळ** - पहिल्या, दुसऱ्या, तिसऱ्या आणि चौथ्या पृथ्वीचे सर्व बिळ आणि पाचव्या पृथ्वीच्या ३/४ भाग प्रमाण बिळ अत्यंत उष्ण असल्याने नारकीयांना तीव्र उष्णता सहन करावी लागते. पाचव्या पृथ्वीच्या शिल्लक राहिलेल्या १/४ प्रमाण बिळ आणि सहावी व सातव्या पृथ्वीचे सर्व बिळ अत्यंत थंड असल्यामुळे नारकी जीवांना भयंकर थंडीचा सामना करावा लागतो. जर उष्ण बिळामध्ये मेरु पर्वताप्रमाणे जर लोखंडाचा गोळा टाकला तर तो सुद्धा उष्णतेने वितळून त्याचे पाणी होईल. अशाच प्रकारे शीत बिळामध्ये मेरु पर्वताप्रमाणे लोखंडाचा गोळासुद्धा बर्फ होऊन जाईल.

**नरकात उत्पन्न झाल्याचे दुःख** - नारकी जीव महापाप केल्याने नरकांत उत्पन्न होतो. एका मुहुर्त काळांमध्ये सहा पर्याप्ति पूर्ण करून छत्तीस शस्त्रांच्या मध्यभागी उपडे झोपून तेथून चेंडूप्रमाणे वर उसळतो. पहिल्या पृथ्वीमध्ये नारकी सात योजन, सहा हजार पाचशे धनुष्य प्रमाण वर उसळतो. याच्या पुढे प्रत्येक नरकात उसळण्याचे प्रमाण दुप्पट दुप्पट आहे.

**नरकातील माती** - कुत्रे, गाढव इत्यादी जनावरांचे अतिशय सडलेले मांस आणि मळ (विष्ठा) इत्यादी पेक्षा सुद्धा अनंत गुणाने दुर्गन्धि युक्त तेथील माती आहे. ही माती नारकी लोक खातात. सातव्या नरकातील मातीचा एक कण सुद्धा कोठे आला तर त्याच्या प्रभावाने पंचविस कोस परिसरातील जीव मरतात.

**नरकातील दुःख** - हे नारकी जीव परस्परांत चक्र, बाण, शूली, (बरछासारखे प्राचीन शस्त्र), आरी इत्यादि शस्त्रांनी एक दुसऱ्यांना अतिशय दुःख देतात. त्यांची आपसांत १ मिनिट सुद्धा शांती राहात नाही. आरीने चिरणे, भोपळ्यांमध्ये गरम करणे इत्यादि महान दुःखांचा सामना करताना सुद्धा त्यांना मृत्यू येत नाही. जेव्हा त्यांचे आयुष्य पूर्ण होते तेव्हाच ते मरतात.

नारकी लोकांचे आयुष्य -

| नरक | जघन्य आयु | उत्कृष्ट आयु |
|---|---|---|
| १ | १० हजार वर्ष | १ सागर |
| २ | १ सागर | ३ सागर |
| ३ | ३ सागर | ७ सागर |
| ४ | ७ सागर | १० सागर |
| ५ | १० सागर | १७ सागर |
| ६ | १७ सागर | २२ सागर |
| ७ | २२ सागर | २३ सागर |


**नरकात जाणारे जीव** - कर्मभूमिमधील पंचेन्द्रिय तिर्यंच आणि मनुष्यच ह्या नरकामध्ये जातात. असंज्ञी पंचेन्द्रिय तिर्यंच पहिल्या नरकामध्ये, सरीसृप (सापाप्रमाणे चालणारे) दुसऱ्या नरकात, पक्षी तिसऱ्या नरकात, भूजंग चवथ्या नरकापर्यंत, सिंह पाचव्या नरकापर्यंत, स्त्रिया सहाव्या नरकापर्यंत, मत्स्य (मासे) आणि मनुष्य सातव्य नरकापर्यंत जातात.

**नरकामध्ये सम्यकत्वाचे कारण** - तिसऱ्या नरकापर्यंतचे नारकी जीव कोणी जातीस्मरणाने, कोणी अतिशय वेदनांनी, कोणी देवाच्या स्मरणाने अनंत भव नष्ट करण्यास समर्थ असे सम्यग्दर्शन प्राप्त करतात. बाकी उरलेल्या चार नरकात नारकी जातीस्मरण आणि वेदना अनुभवाने सम्यक्त्व प्राप्त करतात.

नोट - (परिशिष्टामध्ये चार्ट नं. ८ पहा.)

# मध्यलोक

मध्य लोक १ राजु रुंदीचा व १ लाख ४० योजन उंच असा आहे. हा गोल बांगडीच्या आकाराचा आहे. ह्या मध्यलोकांत असंख्यात द्वीप आणि असंख्यात समुद्र आहेत. ह्या मध्यलोकाच्या मध्यभागी एक लाख योजन विस्तार असलेला अर्थात ४० करोड मैल विस्तार असलेला जम्बूद्वीप आहे. जम्बूद्वीपाच्या चारी बाजूला २ लाख योजन विस्तार असलेला लवणसमुद्र आहे.




लवणसमुद्राच्या चारही बाजूंना ४ लाख योजन विस्तार असलेला घातकी खंड आहे. घातकी खंडास घेरलेला ८ लाख योजन विस्तार असलेला कालोदधि समुद्र आहे. त्यानंतर १६ लाख योजन विस्तार असलेला पुष्कर द्वीप आहे. अशाप्रकारे पुढे पुढे क्रमाने द्वीप आणि समुद्र यांचे दुप्पट-दुप्पट प्रमाण झाले आहे. अंतीम द्वीपाचे आणि समुद्राचे नांव स्वयंभूरमण द्वीप आणि स्वयंभूरमण समुद्र आहे.


# जम्बूद्वीप

जम्बूद्वीपाच्या मध्यभागी १ लाख योजन उंच व दहा हजार योजन ज्याचा विस्तार आहे असा सुमेरु पर्वत आहे. ह्या जम्बूद्वीपामध्ये सहा कुलाचल आणि सात क्षेत्र आहेत.

**कुलाचलांची नावे** - हिमवान, महाहिमवान, निषध, नील, रुक्मि आणि शिखरी.

**क्षेत्रांची नावे** - भरत, हैमवत, हरि, विदेह, रम्यक्, हैरण्यवत आणि ऐरावत.

**क्षेत्र आणि पर्वताचे प्रमाण** - भरत क्षेत्राचा विस्तार जम्बूद्वीपाच्या विस्ताराच्या १९० वा भाग आहे. अर्थात $\frac{\text{१००००}}{\text{१९०}} = \text{५२६}\frac{\text{६}}{\text{१९}}$ योजन, (२१०५२६३ $\frac{\text{३}}{\text{१९}}$ मैल) आहे. भरतक्षेत्राच्या पुढे हिमवान पर्वताचा विस्तार भरतक्षेत्राच्या दुप्पट आहे. असाच विदेह क्षेत्रापर्यंत दुप्पट, दुप्पट आणि पुढे अर्धा अर्धा होत गेला आहे. पुढे कोष्टकांमध्ये पहावे.




नोट – (परिशिष्ट चार्ट नं. ९ पहावे.)


**विजयार्ध पर्वत** - भरतक्षेत्राच्या मध्यभागी विजयार्ध पर्वत आहे. हा विजयार्ध पर्वत ५० योजन (२०००० मैल) रुंद असून २५ योजन विस्तृत (१००००० मीटर) उंच आहे. याची लांबी दोन्ही बाजूंनी लवणसमुद्राला स्पर्श करीत आहे. या पर्वताच्या दक्षिण आणि उत्तर अशा दोन्ही दिशांना पृथ्वीपासून १० योजन वर तसेच १० योजन खाली आतल्या बाजूला समपृष्ठांवर विद्याधरांची गावे आहेत. ह्या गावांची संख्या दक्षिणेस ५० आणि उत्तरेस ६० आहेत. १० योजन वर आणि आतल्या भागाला आभियोग्य जातींच्या देवांचे भवन आहेत. याच्या वर (अवशिष्ट) ५ योजन गेल्यावर समतळावर ९ कूट आहेत. यांतील १ कूटाचे नाव सिद्धायतन आहे. सिद्धायतन कुटामध्ये जिनमंदीरे आहेत. आणि बाकी कूटांमध्ये देवांचे आवासगृह आहेत.

हा विजयार्ध पर्वत रजतमयी आहे. अशाच प्रकारे विजयार्ध पर्वत ऐरावत क्षेत्रात सुद्धा आहे.

**हिमवान पर्वत** - हा पर्वत १०५२ $\frac{१२}{१९}$ योजन (४२१०५२६ $\frac{६}{१९}$ मीटर) विस्ताराचा आणि १०० योजन उंचीचा आहे. ह्या पर्वतावर 'पद्म' नावाचे सरोवर आहे. हे सरोवर १००० योजन लांब, ५०० योजन रुंद, १० योजन खोली असलेले आहे. याच्या पुढील पर्वतांवर क्रमाने महापद्म, तिगिंच्छ, केशरी, पुण्डरीक, महापुण्डरीक नावाचे सरोवर आहेत.

**कमळ** - पद्म सरोवराच्या मध्यभागी १ योजन असलेला एक कमळ आहे. हे कमळ पृथ्वीकायीक व रत्नत्रयी आहे. या कमळाच्या कर्णिकेवर (मध्यभागी) बनलेल्या भवनामध्ये 'श्री देवी' निवास करते. याच सरोवरामध्ये श्रीदेवीच्या परिवारांसाठी १४०११५ कमळ आहेत. याच्या पुढील सरोवरांमध्ये सुद्धा कमळ आहेत. त्या कमळांवर क्रमाने 'ऱ्हीं' 'धृति' 'कीर्ति' 'बुद्धी' आणि 'लक्ष्मी' देवी राहतात.

नोट - (परिशिष्ट चार्ट १० पहा.)




**गंगा इत्यादी नद्या** - ह्या सहा सरोवरांतून १४ नद्या निघतात. एका एका क्षेत्रांत दोन-दोन नद्या वाहतात. भरतक्षेत्रामध्ये गंगा-सिंधु. हैमवत क्षेत्रामध्ये रोहित-रोहितास्या. पद्म आणि महापुण्डरीक ह्या दोन सरोवरांतून तीन-तीन नद्या वाहतात. मधल्या चार सरोवरांतून दोन-दोन नद्या वाहतात.

**गंगा नदी :** गंगा नदी पद्म सरोवराच्या तोरळ द्वारापासून निघून ५०० योजनपर्यंत पूर्व दिशेला वाहते. गंगानदी गंगाकूटाच्या दोन कोस दक्षिण बाजूला वळून भरतक्षेत्रांत २५ योजन पर्वताला सोडून जिव्हा नालीमध्ये प्रवेश करून पर्वतावरून खाली वाहते.

**गंगाकुण्ड** - जेथे गंगानदी वाहते तेथे ६० योजन विस्तृत आणि १० योजन खोली असलेला एक कुण्ड आहे. या कुण्डामध्ये १० योजन उंच वज्रमय एक पर्वत आहे. ह्या पर्वताच्या कूटावर गंगादेवीचा राजवाडा बनला आहे. राजवाड्याच्या

छतावर कमळासनांवर अकृत्रिम जिनप्रतिमा विराजमान आहे. ही प्रतिमा जटांनी युक्त शोभायमान आहे. गंगानदी आपल्या चंचल तरंगांनी जणू जिनेंद्र देवाचा अभिषेक करीत आहे. अशाप्रकारे त्या जिनप्रतिमेवरून वाहते.

पुनः या कुण्डाच्या दक्षिण तोरण दरवाजापासून जमिनीवर वाकडी-तिकडी वाहता वाहता विजयार्ध पर्वताच्या गुफेमध्ये आठ योजन विस्तृत होऊन प्रवेश करते. शेवटी चौदा हजार नद्या तिला मिळतात. पूर्व दिशेला जाता-जाता लवणसमुद्रांत विलीन होते. ह्या १४ हजार नद्या आर्यखंडांत न वाहता म्लेच्छ खंडांत वाहतात. गंगा नदी प्रमाणे सिंधु नदीचे वर्णन आहे. ही सिंधुनदी पद्मसरोवराच्या तोरण दरवाजापासून निघून भरतक्षेत्रामध्ये येते. पुढच्या युगल-युगल नद्यांचा विस्तार इत्यादी सीता नदी पर्यंत दुप्पट-दुप्पट आणि पुढे अर्धा-अर्धा होत गेला आहे.

**सहा खंड** - भरतक्षेत्र आणि ऐरावत क्षेत्रामध्ये विजयार्ध पर्वत आणि युगल (जोडी) नद्यांच्या निमित्ताने सहा-सहा खंड होतात. समुद्राच्या बाजूने मध्यभागी असलेला आर्यखंड आणि बाकी म्लेच्छ खंड म्हटल्या जातो.

# सुमेरु पर्वत

विदेह क्षेत्राच्या अगदी मध्यभागी सुमेरु पर्वत स्थित आहे. हा एक लाख ४० योजन उंच आहे. याची नीव एक हजार योजन आहे. पृथ्वीच्या भागांवर ह्या पर्वताचा विस्तार १० हजार योजन आहे. सुमेरु पर्वतानंतर पृथ्वीवर एक भद्रसाल वन आहे. भद्रसाल वनाच्या पूर्व-दक्षिण इत्यादि चारी दिशांना चार चैत्यालय आहेत. मेरु पर्वताच्या पुढे ५०० योजन गेल्यानंतर नंदनवन आहे. हे नंदनवन ५०० योजन प्रमाण कटनी रूप आहे. नंदनवनाच्या सुद्धा चारी दिशांनी चैत्यालय आहेत. सौमनस वनाच्या पुढे छत्तीस हजार योजन वर गेल्यानंतर पाण्डुक वन आहे. पाण्डुकवन सुद्धा चारशे चौऱ्यांनउ (४९४) योजन प्रमाण कटनी रूप आहे. याच्या चारी दिशांना चार चैत्यालय आहेत.


पाण्डूक वनाच्या वर मध्यभागी बारा योजन विस्तार असलेली आणि चाळीस योजन उंच अशी एक चूलिका (शिखा) आहे. मेरु पर्वत कमी-कमी होत चूलिकेच्या अग्रभागांवर फक्त ४ योजन मात्र राहतो.

**सुमेरुचा वर्ण** - हा पर्वत खालच्या तळभागाला एक हजार योजनपर्यंत खडकाळ आहे. पृथ्वीच्या तळभागापासून एकसठ हजार योजनपर्यंत उत्तम चित्र-विचित्र रत्नांचा, पुढे अडतीस हजार योजनपर्यंत सुवर्णाचा आणि याचे वरचे शिखर नीलमणी युक्त आहे.

**पाण्डूक शिळा इत्यादी** - पाण्डूकवनाच्या चारी दिशांना चार शिळा आहेत. ह्या शिळा ईशान दिशेपासून क्रमाने पाण्डूक शिळा, पाण्डूक बळा, रक्तशिळा, रक्तकंबळा नावाच्या आहेत. ह्या सर्व अर्धचंद्राकार, सिंहासन,

छत्र, मंगलद्रव्य यांनी सुशोभित आहेत. सौधर्म इंद्र पाण्डूकशिळेवर भरतक्षेत्रांतील तीर्थंकरांचा अभिषेक करतात. अशाप्रकारे 'पाण्डूकंबळा' शिलेवर पश्चिम विदेह क्षेत्रांतील तीर्थंकरांचा, 'रक्तशिले' वर ऐरावत क्षेत्रांतील तीर्थंकरांचा आणि 'रक्तकंबळा' शिलेवर पूर्व विदेह क्षेत्रांतील तीर्थंकरांचा अभिषेक करतात.

जम्बूद्वीपाच्या भरत आणि ऐरावत क्षेत्रामध्ये सहा काळाच्या परिवर्तनाने कर्मभूमि आणि भोगभूमि ह्या दोघांचीही व्यवस्था होत राहते. हैमवत आणि हैरण्यवत क्षेत्रामध्ये जघन्य भोगभूमि, हरि आणि रम्यक क्षेत्रांत मध्यम भोगभूमि तसेच विदेह क्षेत्रामध्ये मेरु पर्वताच्या दक्षिण-उत्तर भागांत क्रमाने देवकुरू आणि उत्तरकुरू नावाच्या उत्तम भोग भूमि आहेत. पूर्व आणि पश्चिम ह्या दोन्ही विदेहांमध्ये आठ-आठ वक्षार व सहा-सहा विभंगा नदींमुळे १६-१६ भाग झाले आहेत. एकूण ३२ विदेह क्षेत्र होतात. ह्यामध्ये शाश्वत कर्मभूमि आहे.



# लवण समुद्र

जम्बूद्वीपास घेरून २ लाख योजन विस्ताराचा लवणसमुद्र आहे. ह्याचे पाणी धान्याच्या ढीगाप्रमाणे आणि शिखरांपर्यंत उंच आहे. ह्या समुद्राची मध्यभागी खोली १००० योजन आहे. समतळापासून अमावस्याच्या दिवशी पाण्याची उंची ११००० योजन राहते. शुक्लपक्ष प्रतिपदापासून वाढत वाढत पौर्णिमेच्या दिवशी १६००० योजन होते. पुन्हा कृष्णपक्ष प्रतिपदेपासून कमी-कमी होत जाऊन अमावस्याच्या दिवशी ११००० योजन होते.

**घातकी खण्ड** - हा द्वीप लवणसमुद्राला घेरून चार लाख योजन विस्ताराचा आहे. या द्वीपामध्ये पूर्व दिशेला अगदी मध्यभागी विजयमेरू आणि पश्चिम दिशेच्या मध्यभागी 'अचल' मेरू स्थिर आहे. दक्षिण आणि उत्तर दिशांना समुद्राला स्पर्श करणारे दोन इष्वाकार पर्वत आहेत. ह्या पर्वतांमुळे ह्या द्वीपाचे पूर्व घातकी खंड व पश्चिम घातकी खंड असे दोन भाग होतात. पूर्व घातकी खंडामध्ये हिमवान इत्यादि सहा पर्वत भरत इत्यादि सात क्षेत्र, गंगा इत्यादि चौदा प्रमुख नद्या वाहतात. वरील प्रमाणेच पश्चिम घातकी खंडामध्ये व्यवस्था आहे. घातकी खंडाला वेळसा घालून कालोदधि समुद्र आहे.

**पुष्करार्ध द्वीप** - कालोदधि समुद्राला वेष्ठित करणारा १६ लाख योजन पुष्कर द्वीप आहे. या द्वीपाच्या मध्यभागी बांगडीच्या आकाराचा मानुषोत्तर पर्वत आहे. ह्या पर्वताच्या अर्ध्या भागात कर्मभूमि सारखी व्यवस्था आहे. ह्या द्वीपात सुद्धा दक्षिण-उत्तर दिशेला इष्वाकार पर्वत आहे. पूर्व पुष्करार्ध द्वीपामध्ये 'मन्दर' मेरु आणि पश्चिम पुष्करार्ध मध्ये विद्युन्माली' मेरु पर्वत आहे. ह्या द्वीपांत सुद्धा दोन्ही बाजूंनी भरत इत्यादि क्षेत्र, हिमवान इत्यादि पर्वत पूर्ववत् आहेत.

**१७० कर्मभूमि** - जम्बूद्वीपाच्या मध्यभागी सुमेरु पर्वत आहे. सुमेरु पर्वताच्या दक्षिण दिशेस निषध आणि उत्तर दिशेला नील पर्वत आहे. हा मेरु पर्वत विदेह क्षेत्राच्या अगदी मध्यभागी आहे. निषध पर्वतांतून सीतोदा आणि नील पर्वतांतून सीता नदी वाहते. सीता नदी पूर्व समुद्रामध्ये आणि सीतोदा पश्चिम समुद्रामध्ये प्रवेश करते. म्हणून ह्या विदेह क्षेत्राचे ४ भाग झाले आहेत. दोन भाग मेरु पर्वताच्या पूर्वदिशेला व दोन भाग मेरु पर्वताच्या पश्चिम दिशेला आहेत. एका एका विदेह क्षेत्रांमध्ये ४-४ वक्षार पर्वत आणि ३-३ विभंगा नद्या असल्यामुळे एका एका विदेह क्षेत्राचे ८-८ भाग झाले आहेत. अशाप्रकारे चार विदेह क्षेत्राचे बत्तीस ३२ भाग झाले आहेत. हे ३२ विदेह एकाच मेरुचे आहेत. अशाप्रकारे अडीच द्वीपामध्ये ५ मेरु संबंधी ३२ □ ५ = १६० विदेह क्षेत्र होतात.

ह्या १६० विदेह क्षेत्रामध्ये १-१ विजयार्धपर्वत आणि गंगा-सिंधु तसेच रक्ता-रक्तोदा नावाच्या दोन-दोन नद्यांमुळे ६-६ खण्ड होतात. ह्या सहा खण्डांमध्ये मधला आर्यखण्ड आणि बाकी पांच म्लेच्छ खण्ड म्हटल्या जातात. अशाप्रकारे पाच मेरु संबंधी ५ भरत, ५ ऐरावत आणि ५ महाविदेहाचे १६० विदेह - ५ + ५ + १६० = १७० क्षेत्र होतात. ह्या १७० कर्मभूमि आहेत.

एक राजु विस्तृत अशा मध्यलोकांमध्ये असंख्यात द्वीपसमुद्र आहेत. त्या असंख्यात द्वीप समुद्रापैकी अडीच द्वीपामधील १७० कर्मभूमीमध्ये मनुष्य आपल्या तपस्येने कर्मांचा नाश करून मोक्ष प्राप्त करू शकतो. म्हणून ह्यांना कर्मभूमि म्हणतात.

**३० भोगभूमि** - हैमवत आणि हैरण्यवत क्षेत्रामध्ये जघन्य, हरि, रम्यक क्षेत्रामध्ये मध्यम आणि देवकुरु व उतरकुरु मध्ये उत्तम अशा सहा भोगभूमि जम्बूद्वीपामध्ये आहेत. घातकी खंडाच्या १२ आणि पुष्करार्धच्या १२ अशा ६+१२+१२=३० भोगभूमि अडीच द्वीपांत आहेत.

**९६ कुभोगभूमि** - ह्या लवणसमुद्राच्या दोन्ही तटांवर २४ अन्तर्द्वीप आहेत. अर्थात ४ दिशांना ४ द्वीप, चार विदिशांना ४ द्वीप, दिशा-विदिशा ह्यातील अंतरांचे ८ द्वीप, हिमवान पर्वत आणि शिखरी पर्वतांच्या दोन्ही तटांवर ४ तसेच भरत व ऐरावताच्या दोन्ही विजयार्ध पर्वतांच्या दोन्ही तटांवर ४, अशाप्रकारे एकूण ४+४+८+४+४=२४ झाले.

हे २४ अन्तर्द्वीप लवणसमुद्राच्या एका तटांवर आहेत. दुसऱ्या तटांवर सुद्धा २४ अन्तर्द्वीप आहेत. कालोदधि समुद्राच्या उभय तटांवर ४८ असे एकूण ९६ अन्तर्द्वीप होतात. ह्या द्वीपांमध्ये राहणाऱ्या मनुष्यांना शिंग, शेपटी इत्यादि राहते. ह्यालाच कुभोगभूमि म्हणतात. कुभोगभूमि लोकांची आयु असंख्यात वर्षांची असते.

**कूमानुष** - पूर्व दिशेला राहणारे मनुष्य एक पाय असणारे असतात. पश्चिम दिशेला राहणारे मनुष्य शेपटी असणारे, दक्षिण दिशेचे आणि उत्तर दिशेचे बहिरे असतात. सर्व कुभोगभूमिमध्ये राहणारे मनुष्य कुत्सित रूपाचे असतात. हे मनुष्य युगल ही जन्म घेतात आणि जोडीनेच मरतात. ह्यांना शरिरासंबंधी कोणतेही कष्ट होत नाही. कोणी कोणी तेथील सुवासिक माती खातात तर बाकी मनुष्य तेथील वृक्षांचे फळ-फुल यांचे भक्षण करतात. यांचे कुरूप होणे कुपात्रदान इत्यादिचे फळ आहे.

**स्वयंभूरमण पर्वत** - अंतीम स्वयंभूरमण द्वीपाच्या अगदी मध्यभागी वर्तुळाकार स्वयंभूरमण नावाचा पर्वत आहे. हा पर्वत मानुषोत्तर द्वीपाचे दोन भाग करतो.

मानुषोत्तर पर्वताच्या पुढे असंख्यात द्वीपामध्ये स्वयंभूरमण पर्वतापर्यंत जघन्य भोगभूमि आहेत. ह्या जघन्य भोगभूमिमध्ये असंख्यात तिर्यंच युगल राहतात.

स्वयंभरूमण पर्वताच्या अर्ध्या द्वीपांमध्ये आणि स्वयंभूरमण समुद्रांमध्ये सुद्धा कर्मभूमिची व्यवस्था आहे. याचा अर्थ असा की येथील तिर्यंच कर्मभूमिचे तिर्यंच आहेत. येथील तिर्यंचांना प्रथम गुणस्थानापासून पाचवे गुणस्थान होऊ शकते. देवांच्या द्वारे उपदेश ऐकून किंवा जातिस्मरणाने असंख्यात तिर्यंच सम्यग्दृष्टि देशव्रती होऊन स्वर्ग प्राप्त करून घेतात.

## जम्बूद्वीपाचे अकृत्रिम चैत्यालय

सुमेरू पर्वतावर १६, सुमेरु पर्वताच्या विदिशाला चार गजदंतावर ४, हिमवान इत्यादि षट कुलाचलांवर ६, विदेह क्षेत्रातील सोळा वक्षार पर्वतांवर १६, विदेह क्षेत्रांतील बत्तीस विजयार्ध पर्वतांवर ३२, भरत, ऐरावत यांच्या विजयार्ध पर्वतांवर २, देवकुरु आणि उत्तरकुरु मध्ये असलेल्या जम्बूवृक्ष आणि शाल्मली वृक्षांच्या शाखांवर २ अशाप्रकारे १६+४+६+१६+३२+२+२=७८ जम्बूद्वीपाचे एकूण ७८ जिन चैत्यालय आहेत.

# मध्यलोकाचे अकृत्रिम जिनालय

जम्बूद्वीपाप्रमाणेच घातकी खंड आणि पुष्करार्ध खंडामध्ये २-२ मेरु असल्यामुळे सर्व रचना दुप्पट-दुप्पट आहे. चैत्यालय सुद्धा दुप्पट दुप्पट आहे. घातकी खंड आणि पुष्करार्धा मध्ये २-२ इष्वाकार पर्वतांवर २-२ चैत्यालय आहेत. मानुषोत्तर पर्वतांवर चारी दिशांनी चार, नंदीश्वर द्वीपाच्या चारी दिशांना १३-१३ चैत्यालय 13□४=५२, अकराव्या कुंडलावर द्वीपाच्या कुंडलावर पर्वताच्या चारी दिशांनी चार, तेराव्या रुचकावर द्वीपाच्या रूचकावर पर्वताच्या चारी दिशांनी चार असे एकूण ७८+१५६+१५६+४+४+५२+४+४=४५८ चैत्यालय होतात. ह्या मध्यलोकांतील ४५८ चैत्यालयांना व चैत्यालयांतील सर्व जिन प्रतिमांना मी मन, वचन, कायेने नमस्कार करतो.

# देवांचे भेद

देवांचे चार भेद आहेत. भवनवासी, व्यंतरवासी, ज्योर्तिवासी आणि कल्पवासी.

## भवनवासी देव

**भवनवासी देवांचे स्थान** - रत्नप्रभा पृथ्वीचे ३ भाग सांगितलेले आहेत. ह्या ३ पैकी खर भागांमध्ये राक्षस जातीचे व्यंतर देव सोडून सात प्रकारच्या व्यंतरवासी देवांचे निवासस्थान आहे. आणि भवनवासी देवांच्या असुरकुमार जातीच्या देवांना सोडून ९ प्रकारच्या भवनवासी देवांचे स्थान खर भागांमध्ये आहे. रत्नप्रभा पृथ्वीच्या पंकभाग नावाच्या द्वितिय भागामध्ये असुरकुमार जातीचे भवनवासी आणि राक्षस जातीचे व्यंतरांचे आवासस्थान आहे.

**भवनवासी देवांचे भेद** - असुरकुमार, नागकुमार, सुपर्णकुमार, द्वीपकुमार, दिक्कुमार, उदधिकुमार, स्तनितकुमार, विद्युत्कुमार, अग्निकुमार आणि वायुकुमार.

**भवनवासी देवांच्या भवनांचे प्रमाण** - असुरकुमारांचे ६४ लाख, नागकुमारांचे ८४ लाख, सुपर्णकुमारांचे ७२ लाख, वायुकुमारांचे ९६ लाख आणि बाकी शेष देवांचे ७६-७६ लाख भवन आहेत. एकूण ७६□६ = ४५६, -६४+८४+७२+९६+७२+९६+४५६=७,७२,००००० (सात करोड बहात्तर लाख) भवन आहे.

**जिनमंदीर** - एका एका भवनांमध्ये एक एक जिनमंदीर आहे. भवनवासी देवांचे ७,७२,००००० प्रमाण जिनमंदीर आहेत. ह्या सर्व जिनमंदीरांमध्ये विराजमान सर्व जिन प्रतिमांना मन, वचन, कायेने नमस्कार असो.

**भवनवासी देवांचे इंद्र** - भवनवासी देवांच्या १० कुळांमध्ये पृथक-पृथक दोन दोन इंद्र असतात. सर्व मिळून सर्वसंपन्न असे २० इंद्र होतात.

**इंद्राचे परिवार देव** - प्रत्येक इंद्राचे परिवार देव दहा प्रकारचे आहेत. प्रतीन्द्र, त्रायस्त्रिंश, सामानिक,

लोकपाल, आत्मरक्षक, तीन परिषद, सात अनीक, प्रकीर्णक, आभियोग्य आणि किल्विषक.

इंद्र राजाप्रमाणे, प्रतीन्द्र युवराजाप्रमाणे, त्रायस्त्रिंश देवपुत्राप्रमाणे, सामानिक देवपत्नीसमान, चार लोकपाळ तंत्रपाळासारखे आणि सर्व तनुरक्षक राजाच्या अंगरक्षकाप्रमाणे असतात. राजाच्या बाह्य, मध्य आणि आभ्यंतर समितीप्रमाणे देवांची सुद्धा तीन प्रकारची परिषद होते. ह्या तीन परिषदांमध्ये बसणाऱ्या देवांना क्रमशः बाह्य पारिषद, मध्यमपारिषद, आणि आभ्यंतरपारिषद म्हटल्या जाते. अनीकदेव सेना समान प्रकीर्णक देव प्रजा सदृश, आभियोग्य जातीचे देव दासाप्रमाणे आणि किल्विषक देव चाण्डाळासारखे होतात. प्रतीन्द्र इंद्राप्रमाणे बरोबर २० होतात. याप्रमाणे भवनवासी देवांचे २० इंद्र आणि २० प्रतीन्द्र मिळून ४० इंद्र होतात.

**भवनवासींच्या निवासस्थानाचे भेद** - ह्या देवांचे निवास स्थानांचे भवन, भवनपुर, आवास असे तीन भाग होतात. रत्नप्रभा पृथ्वीवर राहणाऱ्यांच्या निवासस्थानांना भवन, द्वीप समुद्रांवर स्थित निवासस्थानांना भवनपुर आणि रमणीय तलाव, पर्वत आणि वृक्ष इत्यादिंच्या वर असलेल्या निवासस्थानांना आवास म्हणतात.

या निवासस्थानांमध्ये नागकुमार इत्यादि देवांपैकी कोणाचे भवन, भवनपुर आणि आवास अशा तीनही प्रकारचे निवासस्थान आहेत. परंतु असुरकुमारांचे फक्त भवन हेच निवासस्थान आहे. भवनवासी देवांचे भवन चित्रा पृथ्वीच्या खाली दोन हजारांपासून १ लाख योजनपर्यंत गेल्यावर आहे. हे सर्व भवन समचतुष्कोण, ३०० योजन उंच आणि विस्ताराने संख्यात व असंख्यात योजन प्रमाण असणारे आहेत.

**जिनमंदीर** - प्रत्येक भवनांमध्ये मध्यभागी १०० योजन उंच असा एक एक कूट आहे. ह्या कूटांच्या वर पद्मराग मणिमय कळसांनी सुशोभित असे चार गोपुर, तीन मणीमय प्राकार (राजवाडे) वनध्वजा आणि माळांनी सुशोभित असे जिनगृह आहेत. प्रत्येक जिनगृहांमध्ये १०८-१०८ जिन प्रतिमा विराजमान आहेत. जे देव सम्यग्दर्शनी आहेत, ते कर्मक्षयाच्या निमित्ताने नित्यही जिनदेवांची भक्तीने पूजा करतात. यांच्या अतिरिक्त सम्यग्दृष्टी देवांकडून संबोधित केलेले अन्य मिथ्यादृष्टी देव सुद्धा त्या जिनेंद्र प्रतिमांना कुळदेवता समजून नित्यही अनेक प्रकारांनी पूजा करतात.

**देवप्रासाद** - जिन मंदीरांच्या चारी बाजूंनी अनेक प्रकारचे उत्तम सुवर्ण आणि रत्नांनी निर्मित असे भवनवासी देवांचे महाल आहेत. या देवांचे आयुष्य वगैरेचे वर्णन पुढे दिलेल्या चार्ट प्रमाणे समजले पाहिजे.

नोट – (परिशिष्ट चार्ट नं. ११ पहावा.)

## व्यंतर देव

**व्यंतर देव** - रत्नप्रभा पृथ्वीच्या खर भागांमध्ये व्यंतर देवांचे सात भेद होतात. किन्नर, किंपुरुष, महोरग, गंधर्व, यक्ष, भूत आणि पिशाच्च. पंकभागामध्ये राक्षस जातीच्या व्यंतरदेवांचे भवन आहेत. सर्व व्यंतरवासीयांचे असंख्यात भवन आहेत. यामध्ये तीन भेद आहेत. भवन, भवनपुर आणि आवास. खर आणि पंक भागामध्ये भवन आहेत. असंख्यात द्वीप समुद्राच्या वर भवनपूर आहे आणि सरोवर, पर्वत, नद्या इत्यादिच्यांवर आवास आहेत.

मेरु पर्वताप्रमाणे उंच असलेल्या मध्यलोक, उर्ध्वलोक आणि अधो लोकांमध्ये व्यंतर देवांचा निवास आहे. ह्या व्यंतरांपैकी कोणाचे फक्त भवन आहेत. कोणाचे भवन व भवनपुर हे दोन आणि कोणांचे आवास, भवन आणि भवनपूर असे तीनही स्थान होतात. हे सर्व आवास परकोट्याने वेष्ठित आहेत.

**जिनमंदीर** - अशाप्रकारे व्यंतरवासी देवांचे स्थान असंख्यात आहेत म्हणून जिनमंदीर सुद्धा असंख्यात आहेत. जितके भवन, भवनपुर आणि आवास तितकेच जिनमंदीर आहेत.

**व्यंतरदेवांचे कार्य** - व्यंतरदेव क्रीडाप्रिय असल्यामुळे मध्यलोकांमध्ये यत्र-तत्र शून्य स्थान, झाडांचे बूंधे, स्मशानभूमि इत्यादि ठिकाणी फिरत राहतात. कदाचित् कोणाशी पूर्व जन्माचे वैर असेल तर त्याला कष्ट सुद्धा देतात. कोणांवर प्रसन्न होऊन सहाय्यता सुद्धा करतात. जेव्हा सम्यग्दर्शन होते तेव्हा पापकार्य सोडून धर्मकार्यांमध्ये रुचि घेतात.

**व्यंतर इंद्र** - किन्नर, किंपुरुष इत्यादि आठ प्रकारच्या व्यंतर देवांचे प्रत्येकी दोन दोन इंद्र होतात. किन्नर जातीचे दोन इंद्र किन्नर आणि किंपुरुष, किंपुरुष जातीचे सत्पुरुष आणि महापुरुष, महोरग जातीचे महाकाय आणि अतिकाय, गंधर्व जातीमध्ये – गीतरस, गीतरति. यक्ष जाती मध्ये मणिभद्र व पूर्णभद्र. राक्षस जातीमध्ये भीम व महाभीम. भूत जातीमध्ये – स्वरूप आणि प्रतिरूप. पिशाच्च जातीमध्ये काल व महाकाल अशाप्रकारे व्यंतरदेवांचे १६ इंद्र होतात.

**परिवार देव** - ह्या १६ इंद्रांपैकी प्रत्येकाचे प्रतीन्द्र सामानिक, आत्मरक्ष, तीन पारिषद, सात अनीक, प्रकीर्णक, किल्विषक आणि आभियोग्य अशाप्रकारे देवांचा परिवार होतो. म्हणजे भवनवासी देवांचे इंद्र, सामानिक इत्यादि जे दहा प्रकार सांगितले आहेत त्यामध्ये व्यंतर देवांचे त्रासस्त्रिंश व लोकपाल असे दोन भेद होत नाहीत म्हणून व्यंतरांचे ८ भेद सांगितले आहेत. प्रत्येक इंद्राचा एक एक प्रतीन्द्र होतो. म्हणून १६ इंद्राचे १६ प्रतीन्द्र होतात. असे व्यंतरांचे ३२ इंद्र आहेत.

अशाप्रकारे परिवार देवांसोबत सुखाचा अनुभव घेत व्यंतर देवेन्द्र आपआपल्या नगरींमध्ये अनेक क्रीडा करण्यात मग्न राहतात.

**व्यंतर देवांचा आहार** - किन्नर इत्यादि व्यंतर देव व त्यांच्या देवी अमृतासारखा दिव्य असा मानसिक आहार ग्रहण करतात. ह्या देवांना कवला आहार होत नाही. पल्यप्रमाण ज्यांचे आयुष्य आहे त्या देवांचा आहार ५ दिवसानंतर व दहा हजार आयुष्य असलेल्यांचा आहार २ दिवसानंतर होतो.

**देवांचा उच्छवास** - पल्यप्रमाण आयुष्य ज्यांचे आहे ते ५ मुहूर्तांमध्ये आणि दहा हजार ज्यांचे वय आहे ते सात उच्छवास् काळांमध्ये उच्छ्वास घेतात.

**व्यंतर देवांचे जन्म घेण्याचे कारण** - जे कुमार्गी आहेत. ज्यांचे आचरण दोषपूर्ण आहे. अकाम निर्जरा ज्यांनी केली आहे. असे जीव अग्नीमध्ये जळून मरण पावतात. हे जीव सम्कक्त्वाने रहित व चारित्र विघातक आहेत, पंचाग्नि तप करणारे मंद कषायी आहेत. हे जीव मरून व्यंतर पर्यायामध्ये जन्म घेतात. हे देव येथे कदाचित् सम्यग्दर्शन प्राप्त करतात. सम्यक्त्व रहित देव कोणी कोणी विशेष आर्तध्यान करून मरतात. हे एकेंद्रिय पर्यायमध्ये जन्म घेतात.

**व्यंतर देवांचे अवधिज्ञान, शक्ति आणि विक्रिया** - जघन्य आयुष्य १०००० वर्ष प्रमाण असलेल्या देवांचा अवधिज्ञान विषय ५ कोस आणि उत्कृष्ट अवधिज्ञानाचा विषय ५० कोस आहे. पल्योपत्र प्रमाण आयुष्य असणाऱ्या व्यंतर देवांचा अवधि ज्ञानाचा विषय खाली व वर असा एक लाख योजन प्रमाण आहे. जघन्य आयुष्य ज्यांचे आहे असा प्रत्येक व्यंतरदेव १०० मनुष्यांना मारू शकतो व त्यांना तारण्यास सुद्धा समर्थ आहे. तसेच १५० धनुष्य अशा विस्तृत क्षेत्राला आपल्या शक्ती सामर्थ्याने उखडून दुसऱ्या जागी फेकण्यांस समर्थ आहे. पल्य प्रमाण ज्यांचे आयुष्य आहे असे व्यंतर देव सहा खंडांना उलट-सुलट करू शकतात. जघन्य आयुष्याचे व्यंतर देव उत्कृष्ट रूपाने १०० रूपांची आणि जघन्य रूपाने ७ रुपांची विक्रिया करू शकतात. बाकी देव आपआपल्या अवधिज्ञानाने क्षेत्राला विक्रियाने पूर्ण करू शकतात.

ह्या देवांची अवगाहना १० धनुष्य आहे. देव उपपाद शय्यावर जन्म घेऊन अन्तर्मुहूर्तांमध्ये १६ वर्षाच्या युवकासारखे शरीर व पर्याप्ति पूर्ण करतात.

## ज्योर्तिवासी देव

**ज्योतिष्क देवांचे पाच भेद आहेत** - सूर्य, चंद्र, ग्रह, नक्षत्र आणि तारा. यांचे विमान चमकणारे असते म्हणून यांना ज्योतिष्क देव म्हणतात. ही सर्व विमाने अर्धगोलाकार असतात. हे सर्व देव मेरु पर्वताला ११२१ योजन (४४,८४००० मी.) सोडून नित्य क्रमाने प्रदक्षिणा देत राहतात. चंद्र, सूर्य आणि ग्रह ५१० योजन प्रमाण गमन क्षेत्रांमध्ये क्रमाने पृथक-पृथक गमन करतात. परंतु नक्षत्र आणि तारे आपआपल्या परिधिरूप मार्गानेच गमन करतात.

**ज्योतिष्क देवांची उंची** - पाच प्रकारच्या देवांचे विमान ह्या चित्रा पृथ्वीपासून ७९० योजनापासून प्रारंभ होऊन ९०० योजन उंचीपर्यंत अर्थात ११० योजनामध्ये स्थिर आहे. सर्वात प्रथम तारे जे आहेत त्यांचे विमान आहे. हे विमान सर्वात छोटे कोस (२५० मी.) प्रमाण आहे. ह्या सर्व विमानांची जाडी आपल्या-आपल्या विमानांच्या अर्धी आहे. राहुचे विमान चंद्राच्या खाली आणि केतुचे विमान सूर्याच्या खाली राहते. अर्थात ४ प्रमाण अंगुल (२००० उत्सेधांगुल) प्रमाणाच्या वर चंद्र, सूर्याचे विमान स्थिर होते व गमन करते. राहु, केतु यांचे विमान ६-६ महिने पूर्णिमा व अमावस्येला क्रमाने चंद्र आणि सूर्य यांच्या विमानाला झाकून टाकते. यालाच ग्रहण म्हणतात. या पृथ्वीपासून तारे इत्यादिंच्या विमानांची उंची यांचे प्रमाण चार्टमध्ये पहावे.

(नोट – परिशिष्ट चार्ट नं. १२ मध्ये पहावे.)

**वाहन जातीचे देव** - ह्या सूर्य, चंद्राच्या प्रत्येक विमानाला आभियोग्य जातीचे ४००० देव विमानाच्या पूर्व दिशेला सिंहाच्या आकाराला धारण करतात. दक्षिण दिशेला ४००० देव हत्तीच्या आकाराला, पश्चिम दिशेला ४००० देव बैलाच्या आकारास आणि उत्तर दिशेला ४००० देव घोड्याच्या आकारास धारण करतात. अशाप्रकारे १६००० देव नेहमी चालत राहतात. ग्रहांचे ८०००, नक्षत्रांचे ४००० व तारे यांचे २००० वाहन जातीचे देव होतात.

**ज्योतिष्क देवांची गति** - गमन करण्यांमध्ये चंद्रमा सर्वात मंद आहे. सूर्य चंद्रापेक्षा तीव्र गमन करतो. सूर्यापेक्षा शीघ्रतर ग्रह व ग्रहांपेक्षा शीघ्रतर नक्षत्र व नक्षत्रांपेक्षा जास्ती गती असणारे तारागण आहेत.

**सूर्य इत्यादिंची किरणे** - हे विमान पृथ्वीकायिक चमकणाऱ्या धातूंपासून बनल्यामुळे अकृत्रिम आहे. सूर्याच्या बिंबामध्ये स्थिर असलेले पृथ्वीकायिक जीवांच्या आतप नामकर्माच्या उदयामुळे सूर्याची किरणे उष्ण आहेत. चंद्राच्या बिंबामध्ये स्थिर असलेल्या पृथ्वीकायिक जीवांच्या उद्योत नामकर्माचा उदय असल्यामुळे तो मूळांतच शीतल आहे. त्याची किरणे सुद्धा शीतल आहेत. अशाच प्रकारे तारे वगैरेंचे समजावे.

**विमान आणि जिनमंदिरांचे प्रमाण** - सर्व ज्योर्तिवासी देवांच्या विमानांच्या मध्यभागी एक-एक जिनमंदीर आहे. चारी बाजूंनी देवांचे निवासस्थान आहेत. हे विमान मध्यलोकापर्यंत १ राजु विस्ताराचे आहे. अतः असंख्यात आहेत ह्या कारणाने जिनमंदीर सुद्धा असंख्यात आहेत. ह्या जिनमंदिरांत असलेल्या १०८-१०८ प्रतिमांना माझा नमस्कार असो.

**सूर्याचे गमन क्षेत्र** - सूर्याचे गमनक्षेत्र जंबुद्वीपामध्ये १०८ योजन आणि लवणसमुद्रांमध्ये ३३० $\frac{४६}{८९}$ योजन आहे. अर्थात सर्व गमन क्षेत्र ५१० $\frac{४८}{८९}$ योजन (२०४३१४७ $\frac{१३}{६१}$ मैल) आहे. इतक्या प्रमाणांमध्ये १८४ गल्ल्या आहेत. ह्या गल्ल्यांमध्ये दोन सूर्य क्रमशः एका-एका गल्लीमध्ये संचार करतात.

**दक्षिणायन – उत्तरायण** - जेव्हा सूर्य प्रथम गल्लीमध्ये राहतो तेव्हा श्रावण कृष्ण प्रतिपदेच्या दिवशी दक्षिणायन प्रारंभ होतो. जेव्हा सूर्य शेवटच्या गल्लीमध्ये पोहोचतो तेव्हा उत्तरायणाचा प्रारंभ होतो.

**एका मिनिटांत सूर्याचे गमन** - एका मिनिटांमध्ये सूर्याचे गमन ४४७६२३ $\frac{११}{१९}$ मैल प्रमाण आहे.

**चक्रवर्ती द्वारा सूर्याच्या जिनबिंबाचे दर्शन** - जेव्हा सूर्य पहिल्या गल्लीमध्ये येतो तेव्हा अयोध्यानगरी मध्ये आपल्या भवनाच्या वर सूर्य विमानांमध्ये असलेल्या जिनबिंबाचे दर्शन चक्रवर्ती करतो. चक्रवर्तीच्या दृष्टीचा विषय ४७२६३ $\frac{७}{२०}$ योजन (१८९०५३४००० मैल) प्रमाण आहे.

**चंद्राचे गमन क्षेत्र** - सूर्याच्या ह्याच गमनक्षेत्रामध्ये चंद्राच्या ५ गल्ल्या आहेत. यापैकी प्रतिदिन एका-एका गल्लीमध्ये तो गमन करतो.

**एका मिनिटांमध्ये चंद्राचे गमन** - एका मिनिटांमध्ये चंद्र ४२२७९६ $\frac{३१}{१६४७}$ मैलापर्यंत गमन करतो.

**कृष्णपक्ष–शुक्लपक्ष** - जेव्हा चंद्रमा पूर्ण दिसतो तेव्हा पौर्णिमा असते. राहू विमान चंद्र विमानाच्या खाली गमन करते. राहू प्रत्येक दिवशी चंद्राच्या एका-एका कलेला झाकतो. १५ दिवसापर्यंत १५ कलांना झाकतो. शेवटच्या दिवशी चंद्राच्या १६ कलांपैकी १ कला शिल्लक राहते. त्याचेच नाव अमावस्या आहे. नंतर तो राहू प्रतिपदेपासून १-१ गल्लीमध्ये १-१ कला सोडत सोडत पौर्णिमेला १५ कलांना सोडून देतो. तेव्हा पौर्णिमा होते. अशाप्रकारे कृष्णपक्ष व शुक्लपक्ष विभाग होतात.

**एका चंद्राचा परिवार** - ह्या ज्योतिष्य देवांमध्ये चंद्रमा इंद्र आहे. आणि सूर्य प्रतीन्द्र आहे. एका चंद्रमा इंद्राचे एक सूर्य प्रतीन्द्र, ८८ ग्रह, २८ नक्षत्र, ६६ हजार ९७५ कोडा-कोडी तारे असा सर्व परिवार देव आहे. जम्बूद्वीपांमध्ये दोन चंद्र आणि दोन सूर्य आहेत.

**दिवस–रात्रीचा विभाग** - सूर्याच्या गमनाने दिवस-रात्री असे विभाग होतात. मानुषोत्तर पर्वताच्या आतीलच सूर्य आणि ज्योतीष्य देव गमन करतात. पुढील सर्व ज्योतिष विमान स्थिर आहेत.

# कल्पवासी देव

**१६ स्वर्गाची नावे** - सौधर्म, ईशान, सनत्‌कुमार, माहेन्द्र, ब्रह्म, ब्रह्मोत्तर, लांतव, कापिष्ठ, शुक्र, महाशुक्र, शतार, सहस्त्रार, आनत, प्राणत, आरण आणि अच्युत.

**बारा कल्प** - सौधर्म-ईशान जोडीचे २ इंद्र, शुक्र-महाशुक्र युगलाचा १ इंद्र, ब्रह्म-ब्रह्मोत्तर जोडीचा १ इंद्र, लांतव-कापिष्ठ युगलाचा १ इंद्र, सनत्‌कुमार-माहेन्द्र युगलाचे २ इंद्र, शतार-सहस्त्रार जोडीचा १ इंद्र, आनत-प्राणत युगलाचे २ इंद्र तसेच आरण-अच्युत युगलाचे २ इंद्र असे एकूण १२ इंद्र होतात. ह्यांच्या स्थानांना 'कल्प' संज्ञा आहे म्हणून ह्यांना सुद्धा कल्प म्हणतात.

**कल्पातीत** - बारा कल्पा (१६ स्वर्ग) च्या वर ९ ग्रैवेयक, ९ अनुदिश, आणि ५ अनुत्तर विमान आहेत. यामध्ये इंद्र, सामानिक, त्रासस्त्रिंश इत्यादि भेद नसल्यामुळे यांना कल्पातीत म्हणतात. येथील सर्व देवांना अहमिंद्र म्हणतात.

**नौ ग्रैवेयक** - ३ अधस्तन, ३ मध्यम आणि ३ उपरिम असे नऊ ग्रैवेयक आहेत.

**अनुदिश** - अर्चि, अर्चिमालीनी, वैर, वैरोचन हे चार असल्यामुळे श्रेणीबद्ध, आणि सोम, सोमरुप, अंक आणि स्फटिक हे चार विदिशांना असल्यामुळे प्रकीर्णक तसेच मध्यभागी आदित्य नावाचे विमान आहे. अशाप्रकारे हे ९ अनुदिश झालेत.

**पाच अनुत्तर** - विजय, वैजयन्त, जयंत, अपराजित हे चार विमान चार दिशांनी व 'सर्वार्थसिद्धि' नावाचे विमान मध्यभागी आहे.

**कल्प आणि कल्पातीतांचे स्थान** - मेरुच्या तळभागांपासून $१\frac{१}{२}$ राजुमध्ये सौधर्म युगल, त्याच्यावर $१\frac{१}{२}$ राजूमध्ये सानत्कुमार युगल, पुढे अर्ध्या-अर्ध्या राजुमध्ये ६ युगल आहेत. म्हणून $१\frac{१}{२} + १\frac{१}{२} =$ ३, $(\frac{१}{२} \times ६ = ३)$ असे एकूण ६ राजुमध्ये ८ युगल आहेत. याच्या पुढे १ राजुमध्ये ९ ग्रैवेयक, ९ अनुदिश, ५ अनुत्तर आणि सिद्धशिला आहेत.

**विमानांची संख्या** - सौधर्म स्वर्गामध्ये ३२०००००, ईशान स्वर्गामध्ये २८०००००, सानत्कुमार स्वर्गामध्ये १२०००००, माहेन्दमध्ये ८०००००, ब्रह्म-ब्रह्मोत्तरमध्ये ४०००००, लांतव-कापिष्ठमध्ये ५०००००, शुक्र-महाशुक्रमध्ये ४००००, शतार-सहस्त्रारमध्ये ६०००, आनत-प्राणत आणि आरण-अच्युत ह्या चार कल्पांमध्ये ७०० तीन अधोगैवेयकमध्ये १११, तीन मध्य ग्रैवेयकमध्ये १०७, तीन उर्ध्वग्रैवेयकमध्ये ९१, नऊ अनुदिशमध्ये ९ आणि पाच अनुत्तरमध्ये ५ असे सर्व मिळून ३२०००००+२८०००००+१२०००००+८०००००+४००००० +५००००+४००००+६०००+७००+१११+१०७+९१+९+५ = ८४९७०२३ विमान होतात. आणि एक-

एका विमानांमध्ये १+१ जिनमंदिर असल्यामुळे इतकेच मंदीर होतात. ह्या मंदिरांतील जिनप्रतीमांना माझा मन, वचन, कायेने नमस्कार असो.

**विमानांचे भेद** - विमानांचे इंद्रक, श्रेणीबद्ध आणि प्रकीर्णक असे तीन भेद आहेत. जो मध्यभागी आहे त्याला इंद्रक, दिशांना असेलेले विमान श्रेणीबद्ध आणि अन्तराळ संबंधी विमान प्रकीर्णक म्हटल्या जाते.

**इंद्रकची संख्या** - इंद्रक विमानाला 'प्रतर' सुद्धा म्हणतात. सौधर्म युगलांमध्ये ३१, सनत्‌कुमार जोडीमध्ये ७, ब्रह्मयुगलमध्ये ४, लांतव जोडीमध्ये २, शुक्रजोडीमध्ये १, शतारमध्ये १, आनत इत्यादि ४ कल्पांमध्ये ६, अधस्तन तीन गैवेयकमध्ये ३, मध्यम तीन मध्ये ३, उपरिम तीनमध्ये ३, नव अनुदिशमध्ये १, पांच अनुत्तरमध्ये १, असे एकूण ३१+७+४+२+१+१+४+३+३+३+१+१=६३ इंद्रक विमान आहेत. ऋतु, विमल, चंद्र इत्यादि ह्या इंद्रकाची क्रमाने चांगली चांगली नावे आहेत.

**विमानांचे प्रमाण** - सर्व इंद्रक विमान संख्यात योजन विस्ताराचे आहेत. सर्व श्रेणीबद्ध विमान असंख्यात योजन विस्ताराचे आहेत. प्रकीर्णक विमान काही संख्यात योजन असलेले व काही असंख्यात योजन असलेले आहेत.

**विमानांचा वर्ण (रंग)** - सौधर्म युगलाचे विमान पाच रंगाचे आहेत. सानत्‌कुमार व माहेन्द्र ह्यांच्या विमानाचे कृष्ण वर्ण सोडून बाकी चार रंग आहेत. ब्रह्म, ब्रह्मोत्तर, लांतव, कापिष्ठमध्ये कृष्ण, नील शिवाय बाकी तीन वर्ण आहेत. शुक्र, महाशुक्र, शतार, सहस्त्रारमध्ये कृष्ण, नील, लाल असे तीन वर्ण नाहीत. पीत आणि शुक्ल हे दोन वर्ण आहेत. पुढे आनत पासून अनुत्तरपर्यंत एकाच शुक्ल वर्णाचे विमान आहेत.

**विमानांचे आधार** - सौधर्म युगलाचे विमान जलाचे आधार आहेत. सानत्कुमार जोडीचे विमान पवनचे आधार आहेत. ब्रह्म इत्यादि आठ कल्प स्वर्गाचे विमान जल आणि वायू ह्या दोन्हींचे आधार आहेत. पुढे आनतपासून अनुत्तरपर्यंत विमान आकाशाचे आधार आहेत. म्हणजे पुद्गल, स्कंध, जल इत्यादिंचे आकार परिणत झाले असे समजले पाहिजे.

पृथ्वी आठ प्रकारची मानली आहे. सात नरकसंबंधी व एक 'ईशत्प्राग्भार' नावाची सिद्ध पृथ्वी. म्हणून हे विमान अधरच मानले गेले आहे.

**सौधर्म इत्यादि नावे** - सौधर्म इंद्र जेथे राहतो त्याचे नाव सौधर्म स्वर्ग आहे. बाकी याचप्रमाणे समजले पाहिजे.

**देवांचे प्रासाद** - इन्द्रक, श्रेणीबद्ध आणि प्रकीर्णक विमानांच्या वर समचतुष्कोण आणि दीर्घ असे अनेक प्रकारचे प्रासाद आहेत. हे सर्व प्रासाद सुवर्णमय, स्फटिकमय आणि रत्नांनी निर्मित, उपपादशय्या, आसनशाळा इत्यादिनी परिपूर्ण आणि अनादि निधन आहेत.

**परिवार देव** - सर्व इंद्राचे परिवारदेव दहा प्रकारचे होतात. प्रतीन्द्र, सामानिक, त्रासस्त्रिंशदेव, लोकपाल, आत्मरक्ष, परिषद, अनीक, प्रकीर्णक, आभियोग्य आणि किल्विषक.

एका एका इंद्राचा एक एक प्रतीन्द्र होतो म्हणून १२ इंद्राचे १२ प्रतीन्द्र मिळून एकूण २४ इंद्र मानले गेले आहेत.

**सौधर्म इंद्राचा परिवार** - सौधर्म इंद्राचा १ प्रतीन्द्र, ८४००० सामानिक, ३३ त्रायस्त्रिंश, सोम, यम, वरुण व धनद हे चार लोकपाल, ३३६००० आत्मरक्षक, आभ्यंतर परिषददेव १२०००, मध्यम परिषद १४०००, बाह्य परिषद १६००० आहे. वृषभ, अश्व, रथ, हत्ती, पदाति, गन्धर्व आणि नर्तक अशाप्रकारे सौधर्म इंद्राच्या सात सेना होतात. ह्या सात सेनांपैकी प्रत्येकाचे ७-७ वर्ग होतात. सौधर्म इंद्राचे १०६६८००० वृषभ होतात. घोडे, रथ, हत्ती वगैरे सुद्धा इतकेच होतात. ७४६७६००० अनीक होतात. एका इंद्राचे प्रकीर्णक, आभियोग्य आणि किल्विषक देव असंख्यात सांगितले आहेत.

**ऐरावत हत्ती** - सौधर्म इंद्राच्या आभियोग्य देवांचा स्वामी 'बालक' नावाचा देव होतो. हा देववाहन जातीचा असून आपल्या विक्रियाने १ लाख उत्सेध योजन प्रमाण 'ऐरावत' हत्तीचे शरीर धारण करतो. ह्या ऐरावत हत्तीचे दिव्य रत्नमाळांनी युक्त असे ३२ मुख होतात. एका एका मुखांमध्ये रत्ननिर्मित ४-४ दात असतात. एका-एका दातावर एक-एक सरोवर आणि एका-एका सरोवरामध्ये एक-एक कमळवन असते. एका-एका कमळवनात ३२ विकसित महापद्म होतात. एक-एक महापद्म एक-एक योजनांचा असतो. ह्या प्रत्येक कमळावर एक-एक नाट्यशाळा असते. एका-एका नाट्यशाळेमध्ये ३२,३२ अप्सरा नृत्य करतात. हा ऐरावत हत्ती भगवानाच्या जन्मोत्सवाच्या वेळेस येतो.

**सौधर्म इंद्राच्या देवी** - सौधर्म इंद्राची 'शची' नावाची ज्येष्ठ देवी असते. अशा आठ प्रमुख देवी असतात. ह्या 'शची' देवी वगैरे आपल्या रूपास विक्रियाने १६०००-१६००० करतात. सौधर्म इंद्राची अतिशय प्रिय वल्लभिकादेवी ३२००० आहेत. एका-एका अग्रदेवीच्या १६०००-१६००० परिवार देवी आहेत. ह्या वल्लभिका आणि परिवारदेवी सुद्धा १६०००-१६००० विक्रिया करू शकतात. अर्थात् सौधर्म इंद्राच्या १६००० देवी आणि ८ अग्रदेवी आहेत.

**सौधर्म इंद्राचे राजांगण** - इंद्राची राजांगण भूमी ८४००० योजन प्रमाण आहे. आणि सुवर्णमय वेदींनी वेष्ठीत आहे.

**सुधर्मा-सभा** - सौधर्म इंद्राच्या भवनाच्या ईशान दिशेला ३००० कोस उंच, ४०० कोस लांब व २०० कोस विस्तृत अशी 'सुधर्मा' नावाची सभा आहे. ह्या सुधर्मा सभेमध्ये अनेक परिवारांसहित सौधर्म इंद्र विविध सुखांचा उपभोग घेतो.

**जिनभवन** - ईशान्यदिशेलाच अनुपम आणि रत्नमय जिनभवन आहे.

**शरिराची अवगाहना** - सौधर्म युगल इंद्राच्या शरीराची अवगाहना ७ हात, सानत्कुमार युगलाची ६ हात, ब्रह्मयुगल व लांतव युगलाची ५ हात, शुक्र-महाशुक्र जोडीमध्ये ४ हात, शतार-सहस्त्रार मध्ये ३$\frac{१}{२}$ हात, आनत पासून अच्युत स्वर्गांपर्यंत ३ हात, तीन अधोग्रैवेयक मध्ये २$\frac{१}{२}$ हात, तीन मध्य ग्रैवेयकमध्ये २ हात, उपरिम

ग्रैवेयक मध्ये १$\frac{१}{२}$ हात, नऊ अनुदिश आणि ५ अनुत्तरामध्ये १ हात प्रमाण होते.

**उत्कृष्ट आयु** - सौधर्म युगलांची उत्कृष्ट आयु २ सागर, सानत्कुमार जोडींची ७ सागर, ब्रह्मयुगलांची १० सागर, लांतव युगलांची १४ सागर, शुक्र युगलांची ६, शतार जोडींची १८, आनत युगलांची २०, आरण युगलाची २२ सागर आहे. पुढे नवग्रैवेयकपर्यंत १-१ सागर वाढत जाते. आणि शेवटच्या ग्रैवेयकमध्ये ३१ सागर, नऊ अनुदिशमध्ये ३२ सागर आणि पंचअनुत्तरमध्ये ३३ सागर प्रमाण आहे.

**विक्रिया आणि अवधिज्ञान** - प्रथम स्वर्गातील देव वरती आपल्या विमानाच्या ध्वजदंडापर्यंत आणि खाली पहिल्या पृथ्वीपर्यंत अवधिज्ञानाने समजून घेतात. पुढे पुढे सर्वार्थसिद्धी देव लोकनाडीपर्यंत समजून घेतात. ह्या देवांना जिथपर्यंत अवधिज्ञान आहे तिथपर्यंतच विक्रिया करण्याची शक्ती आहे. सोळाव्या स्वर्गापर्यंतचे देव यत्र-तत्र फिरू शकतात. पुढील देवांना जाण्याची शक्ति असते, परंतु जात नाहीत.

**प्रवीचार सुख** - प्रवीचार म्हणजे कामसेवन. सौधर्म युगल काय प्रवीचार, पुढील दोन स्वर्गात स्पर्श प्रवीचार, यापुढील चार स्वर्गात रूप प्रवीचार, यापुढे चार स्वर्गामध्ये शब्द प्रवीचार, आणि पुढे आनत इत्यादि ४ मध्ये मनःप्रवीचार आहे. ह्या स्वर्गाच्या पुढे नवग्रैवेयक मध्ये देवांगना सुद्धा नाही. त्यांना भोगाची इच्छा सुद्धा होत नाही.

**देवींचे उत्पत्ति स्थान** - सौधर्म-ईशान स्वर्गापर्यंतच देवींची उत्पत्ति होते पुढे होत नाही. पुढील पुढील स्वर्गांतील देव आपआपल्या देवींना अवधिज्ञानाने जाणून आपआपल्या स्थानांवर घेऊन जातात.

**विरह काळ** - सर्व इंद्र, त्यांच्या महादेवी, लोकपाल आणि प्रतीन्द्र यांचा उत्कृष्ट विरहकाळ सहा महिने आहे. अन्य लोकांचा चार्ट मध्ये पहावा.

**देवांचा आहार काळ** - जे देव जितके सागर वर्ष पर्यंत जीवित राहतात. तितकेच हजार वर्षात मानसिक आहार ग्रहण करतात. पल्यप्रमाण ज्यांची आयु आहे असे देव ५ दिवसानंतर आहार ग्रहण करतात. अनुदिश आणि अनुत्तरमध्ये शरीराची उंची १ हात प्रमाण आहे.

**श्वासोच्छ्वास ग्रहण काळ** - सौधर्म जोडींचे आयुष्य दोन सागर आहे. तेथे उच्छ्वासाचे अंतर दोनपक्ष आहे. असेच जितके सागर आयुष्य आहे तितकेच पक्ष संपल्यानंतर श्वासोच्छ्वास ग्रहण करतात.

**लौकांतिक देव** - ब्रह्म स्वर्गाच्या अग्र भागांत यांचे निवासस्थान असल्यामुळे यांना लौकान्तिक म्हणतात. अथवा हे लोक संसाराचा अंत करणारे एक भवावतारी आहेत, म्हणून यांना लौकांतिक म्हणतात. यांचे सारस्वत आदित्य, वन्हि, अरुण, गर्दतोय, तुषित, अव्याबाध आणि अरिष्ट असे मुख्य आठ भेद आहेत. यांच्या शरीराची उंची पाच हात, आयु आठ सागर आणि लेश्या शुक्ल असते. हे भगवंताच्या तप कल्याणकामध्ये वैराग्याची प्रशंसा करण्यासाठी भक्तीने जातात. दुसऱ्या कल्याणकांमध्ये जात नाहीत. हे बाल ब्रह्मचारी, देवर्षि

म्हटल्या जातात.

**एक भवावतारी देव** - सौधर्म इंद्र आणि दक्षिण इंद्र, शची इंद्राणी, दक्षिण इंद्राचे चार लोकपाल, लौकांतिकदेव आणि सर्वार्थसिद्धि देव हे सर्व नियमाने मनुष्याचा एक भव प्राप्त करून तपश्चर्याच्या सहाय्याने कर्मांचा नाश करून मोक्ष प्राप्त करून घेतात.

**देवांचा जन्म** - देवांचा जन्म पुण्याच्या उदयाने उपपाद शय्येवर होतो. जन्म होतांच आनंद व्यक्त करण्यासाठी वाद्ये वाजू लागतात. अंर्तमुहुर्तामध्ये देव आपल्या सहाही पर्याप्ती पूर्ण करून नवयौवन प्राप्त करतात. हे अवधिज्ञानाने सर्व जाणून घेऊ शकतात. सरोवरांत स्नान करून, वस्त्रालंकाराने सुशोभित होऊन जिनमंदिरांत भगवंतांची पूजा करतात. जे देव मिथ्याद्दष्टी आहेत ते अन्य देवांच्या प्रेरणेने जिनदेवांना कुळदेवता समजून पूजा करतात.

सोळा स्वर्गापर्यंतचे देवगण तीर्थंकरांचे कल्याणक इत्यादि महोत्सवामध्ये जातात. पुढील अहमिन्द्र देव तेथेच मस्तक झुकवून नमस्कार करतात.

नोट - (परिशिष्टामध्ये चार्ट नं. १३ पहावे.)

## जीवाचे पाच परिवर्तन

**जीवाचे दोन भेद आहेत** - संसारी आणि मुक्त. 'चर्तुगतौ संसरणं संसारः' चर्तुगतिमध्ये संसरण करणे-परिभ्रमण करणे याचे नाव संसार आहे.

'संसार एशांत सन्ति ते संसारिणः' हा संसार ज्या जीवांना असतो त्यांना संसारी म्हणतात.

**संसाराचे पाच भेद आहेत** - द्रव्य संसार, क्षेत्र संसार, काळ संसार, भव संसार आणि भाव संसार. यालाच परिवर्तन सुद्धा म्हणतात.

**द्रव्य संसाराचे २ भेद आहेत** - कर्मद्रव्य परिवर्तन आणि नोकर्म द्रव्य परिवर्तन.

**कर्मद्रव्य परिवर्तन** - कर्मबंधाचे ५ कारण आहेत. मिथ्यात्व, अविरति, प्रमाद, कषाय आणि योग. यामध्ये मिथ्यात्व आणि कषाय प्रधान आहे. तसेच सर्वात बलशाली सुद्धा आहे. मोहनीय कर्माच्या अभावाने. संसारपरिभ्रमणाचे चक्र थांबते. मिथ्यात्व आणि कषायांनी गुरफटलेला हा संसारी जीव ज्ञानावरण इत्यादि सात कर्मांच्या योग्य अशा पुद्गल स्कंधांना प्रति समय ग्रहण करतो. आणि आबाधा काळ पूर्ण झाल्यानंतर त्यांना भोगून सोडून देतो. कोण्या एका जीवाने ठराविक काळांमध्ये ज्ञानावरण इत्यादि सात कर्मांच्या योग्य अशा पुद्गल स्कंधांना ग्रहण केले. आणि आबाधा काळ पूर्ण झाल्यानंतर त्याला भोगून सोडून दिले. त्यानंतर अनेक वेळा अगृहीत ग्रहण करून, अनेक वेळा मिश्र ग्रहण करून, तसेच अनेकदा गृहीत ग्रहण करून सोडून दिले.

याच्यानंतर जेव्हा हेच पुद्गल तसेच रूप, रस, गंध, स्पर्श इत्यादि भावांना घेऊन त्या जीवाच्या तश्याच परिणामांनी पुनः कर्मरूप परिणत होते, यालाच कर्मद्रव्य परिवर्तन म्हणतात.

अशाप्रकारे एका ठराविक समयामध्ये एका जीवाने औदारिक, वैक्रियिक आणि आहारक ह्या तीन्ही शरीरांना आणि सहा पर्याप्ति यांना योग्य असा नोकर्म पुद्गल स्कंध ग्रहण केला आणि भोगून सोडून दिला. पूर्वी दिलेल्या क्रमानुसार जेव्हा हे नोकर्म पुद्गल तेच रूप, रस, गंध इत्यादि घेऊन त्या जीवांद्वारा पुनः नोकर्म रूप, रस, गंध इत्यादि द्वारा ग्रहण केल्या जाते, त्याला नोकर्म द्रव्य परिवर्तन म्हणतात. म्हटले आहे –

**"सव्वे वि पुग्गला खलु कमसो भुत्तुज्झिया य जीवेण ।**
**असइं अणंतखुत्तो पुग्गलपरियट्ट संसारे ॥ "**

"पुद्गल परिवर्तन रूप ह्या संसारामध्ये जीवाने ह्या सर्व पुद्गलांना क्रमशः अनेकवेळा ग्रहण केले आणि सोडून दिले.

**क्षेत्र परिवर्तन** - लोकाकाशाच्या ३४३ राजुमध्ये सर्व जीव अनेकदा जन्म घेतात व मरतात. क्षेत्र परिवर्तनाचे दोन भेद आहेत – स्वक्षेत्र परिवर्तन, परक्षेत्र परिवर्तन.

**स्वक्षेत्र परिवर्तन** - कोणी सुक्ष्म निगोदि जीव आपल्या जघन्य अवगाहनाला घेऊन उत्पन्न झाला आणि आयु पूर्ण करून मेला. त्यानंतर आपल्या शरीराच्या अवगाहनांमध्ये एक-एक प्रदेश वाढविता-वाढविता महामत्स्याच्या अवगाहनापर्यंत अनेक अवगाहना धारण करतो. अशाप्रकारे छोट्या अवगाहनापासून मोठ्या अवगाहनापर्यंत सर्व अवगाहनांना धारण करण्यासाठी जितका वेळ लागतो त्याला स्वक्षेत्र परिवर्तन म्हणतात.

**परक्षेत्र परिवर्तन** - कोणी जघन्य अवगाहना धारण करणारा सूक्ष्म निगोदी लब्धपर्याप्तक जीव लोकाच्या आठ मध्य प्रदेशांना आपल्या शरीराचे आठ मध्यप्रदेश बनवून उत्पन्न झाला. हा जीव त्याच स्वरूपात त्याच जागी दुसऱ्या व तिसऱ्या वेळेस सुद्धा उत्पन्न झाला. अशाप्रकारे घनांगुलच्या असंख्यात भाग प्रमाण जघन्य अवगाहनाचे जितके प्रदेश आहेत, तितक्या वेळा त्या स्थानी क्रमाने उत्पन्न झाला आणि श्वासाच्या अठरा प्रमाण क्षुद्र आयु भोगून मेला. एक-एक प्रदेश वाढविता वाढविता संपूर्ण लोकांस आपले जन्म क्षेत्र बनविले. यालाच परक्षेत्र परिवर्तन म्हटले आहे. म्हटले आहे –

**"सव्वाही लोयखेत्ते कमसो तं णत्थि जं ण उप्पणं ।**
**ओगाहणाए बहुसो परिभमिदो खेत्तसंसारे ॥ "**

समस्त लोकांमध्ये असे कोणतेही क्षेत्र नाही जेथे हा जीव क्षेत्ररूप संसारामध्ये परिभ्रमण करतांना अनेक अवगाहनांना घेऊन क्रमशः उत्पन्न झाला नाही.

**काळ परिवर्तन** - कोणी जीव उत्सर्पिणी काळाच्या प्रथम समयांमध्ये उत्पन्न झाला आणि आयु पूर्ण करून मरण पावला. नंतर भ्रमण करतांना दुसऱ्या उत्सर्पिणी काळाच्या दुसऱ्या समयात उत्पन्न झाला आणि आयु पूर्ण

करून मरण पावला. अशाप्रकारे भ्रमण करताना तिसऱ्या उत्सर्पिणी काळात तिसऱ्या समयात उत्पन्न झाला आणि आयु पूर्ण करून मेला. हाच क्रम अवसर्पिणी काळात समजावा. ह्या क्रमाने उत्सर्पिणी व अवसर्पिणी काळाच्या वीस कोडा-कोडी सागरामध्ये जितका वेळ आहे त्या सर्व समयांत उत्पन्न झाला आणि क्रमाने मरण पावला. अर्थात उत्सर्पिणी आणि अवसर्पिणीच्या प्रथम समयामध्ये मेला आणि दुसऱ्या उत्सर्पिणी आणि अवसर्पिणी काळाच्या दुसऱ्या समयामध्ये मरण पावला. यालाच काळ परिवर्तन म्हणतात. म्हटले आहे –

**"उस्सप्पिणि अवसप्पिणिसमयावलियासु णिरवसेसासु ।**
**जादो मुदो य बहुसो भमणेण दु कालसंसारे ॥ "**

अनादि काळापासून हा संसारी जीव संसारांत परिभ्रमण करीत असतांना उत्सर्पिणी व अवसर्पिणी काळाच्या सर्व समयांत जन्म घेतो व मरतो.

**भव परिवर्तन** - नरकगतीमध्ये जघन्य आयु १० हजार वर्ष आहे. कोणी जीव ह्या पहिल्या नरकांमध्ये ह्या आयुला घेऊन उत्पन्न झाला आणि आयु पूर्ण करून मरण पावला. पुन्हा त्याच आयुला घेऊन जन्मला आणि मरण पावला. अशाप्रकारे दहा हजार वर्षाचा जितका वेळ आहे तितक्या वेळेस दहा हजार वर्षाची आयु घेऊन प्रथम नरकामध्ये उत्पन्न झाला. मागे एका वेळी अधिक दहा हजार वर्ष आयु घेऊन तेथे उत्पन्न झाला. नंतर दोन समय अधिक दहा हजार वर्ष आयु घेऊन उत्पन्न झाला. अशाप्रकारे एक-एक समय वाढविता वाढविता नरक गतीची उत्कृष्ट आयु तेहतीस सागर पूर्ण करतो.

नंतर तिर्यंचगतिमध्ये अन्तर्मुहूर्ताची जघन्य आयु घेऊन उत्पन्न झाला आणि पहिल्या सारखेच अन्तर्मुहूर्ताचे जेवढे समय असतात तेवढ्या वेळा अन्तर्मुहूर्त आयु घेऊन तेथे उत्पन्न झाला. अशाप्रकारे एक-एक समय वाढविता वाढविता तिर्यंच गतिची उत्कृष्ट आयु तीन पल्य समाप्त करतो. नंतर तिर्यंचगतिप्रमाणे मनुष्यगतिमध्ये सुद्धा अन्तर्मुहूर्ताची जघन्य आयु घेऊन तीन पल्याची उत्कृष्ट आयु समाप्त करतो. नरक गतिच्या आयुप्रमाणे देवगतिची आयुसुद्धा समाप्त करतो. परंतु देवगतिमध्ये एक विशेषता आहे की तेथे ३१ सागर उत्कृष्ट आयु पूर्ण करतो, कारण ग्रैवेयकमध्ये उत्कृष्ट आयु एकतीस सागरच असते. आणि मिथ्यादृष्टी जीवांची उत्पत्ति ग्रैवेयक पर्यंतच असते. अशाप्रकारे चारी गतिंची आयु पूर्ण करण्यास भव परिवर्तन म्हणतात. म्हटले आहे की–

**"णिरयादि जहण्णादिसु जाव दु उवरिल्लया दु गेवज्जा ।**
**मिच्छत्तसंसिदेण दु बहुसो वि भवट्ठिदीभमिदा ॥ "**

नरकाच्या जघन्य आयुपासून तर ग्रैवेयक पर्यंतच्या सर्व भवांमध्ये हा जीव मिथ्यात्वाच्या कारणाने अनेक वेळा भ्रमण करतो.

**भाव परिवर्तन** - योगस्थान, अनुभाग बंधाध्यवसाय स्थान, कषायाध्यवसाय स्थान आणि स्थितिस्थान ह्या चार निमित्त कारणाने भाव परिवर्तन होते. प्रकृतिबंध आणि प्रदेशबंधाचे कारण आत्म्याचे प्रदेश परिस्पन्द रूप योगाच्या तारतम्य रूप स्थानांना योग स्थान म्हणतात. अनुभाग बंधाच्या कारणाने कषायांच्या तारतम्य स्थानाला अनुभागबंध्यवसाय स्थान म्हणतात. स्थिति बंधाचे कारण कषायांच्या तारतम्य स्थानांना कषाय स्थान

किंवा स्थितिबंधाध्यवसाय स्थान म्हणतात. बांधलेल्या कर्मांच्या स्थितिच्या भेदांना स्थितिस्थान म्हणतात. योगस्थान श्रेणीच्या असंख्यात भाग प्रमाण आहे. अनुभागबंधाध्यवसाय स्थान असंख्यात लोकप्रमाण आहे. कषाय बंधाध्यवसाय स्थान सुद्धा असंख्यात लोक प्रमाण आहे.

कोणी मिथ्यादृष्टी, सैनी, पंचेद्रिय पर्याप्तक जीव ज्ञानावरण कर्मांच्या अन्तःकोडा-कोडी सागर प्रमाण जघन्य स्थितीला बांधतो. त्याच जीवाचे त्याच स्थितीमध्ये योग्य जघन्य कषायस्थान, जघन्य अनुभाग स्थान आणि जघन्यच योगस्थान होते. मग तीच स्थिति, तेच कषाय व अनुभाग स्थान प्राप्त असलेल्या जीवाला दुसरे योग स्थान होते. जेव्हा तो जीव सर्व योगस्थानांना समाप्त करतो तेव्हा तीच स्थिती आणि तेच कषायस्थान प्राप्त असलेल्या जीवाचा दुसरा अनुभाग स्थान होतो. त्याचे योगस्थानसुद्धा पूर्वोक्तच समजले पाहिजे. अशाप्रकारे प्रत्येक अनुभाग स्थानाबरोबर सर्व योग स्थान समाप्त करतो. अनुभाग० स्थानांना समाप्त झाल्यावर त्याच स्थितीला प्राप्त जीवाचे दुसरे कषाय० स्थान होते. ह्या कषाय० स्थानाचे अनुभाग० स्थान आणि योगसनि पूर्ववत् समजले पाहिजे. अशाप्रकारे सर्व कषायांच्या स्थानांच्या समाप्तिपर्यंत अनुभाग० स्थान आणि योगस्थानांच्या समाप्तिचा क्रम समजला पाहिजे.

कषाय० स्थान संपल्यानंतर तो जीव त्या कर्मांच्या एक समय अधिक अन्तः कोडा-कोडीसागर प्रमाण स्थितीला बांधतो. त्याचे सुद्धा कषाय० स्थान, अनुभाग० स्थान आणि योगस्थान पूर्ववत् समजले पाहिजे. अशाप्रकारे एक-एक समय वाढविता वाढविता उत्कृष्ट स्थिती तीस कोडाकोडी सागरपर्यंत प्रत्येक स्थितीचे कषाय० स्थान, अनुभाग० स्थान आणि योगस्थान यांचा क्रम समजला पाहिजे. अशाप्रकारे सर्व मूळ प्रकृतिमध्ये आणि उत्तर प्रकृतिमध्ये सुद्धा समजले पाहिजे. अर्थात प्रत्येक मूळ प्रकृति आणि प्रत्येक उत्तर प्रकृतिच्या जघन्य स्थितीपासून उत्कृष्ट स्थितीपर्यंत प्रत्येक स्थितीच्या बरोबर पूर्वी सांगितलेले सर्व कषाय० स्थान, अनुभाग० स्थान आणि योगस्थान लावले पाहिजे. अशाप्रकारे सर्व कर्मांच्या स्थितींना भोगण्यास भाव-परिवर्तन म्हणतात. ह्या परिवर्तनांस पूर्ण करण्यासाठी जितका काळ लागतो तो काळ त्या-त्या परिवर्तनाच्या नावाने ओळखला जातो. म्हटले आहे की –

**"सव्वा पयडिट्ठिदीओ अणुभागदेसबंधठाणाणि ।**
**मिच्छत्त संसिदेण य भमिदा पुण भावसंसारे ॥ "**

ह्या जीवाने मिथ्यात्वाच्या संसर्गाने सर्व प्रकृति, स्थिती, अनुभाग आणि प्रदेशबंधाच्या स्थानांना प्राप्त करून भावसंसारात परिभ्रमण केले आहे.

अशाप्रकारे अनेक दुःखांच्या उत्पत्तिचे कारण असलेल्या ह्या पाच प्रकारच्या संसारांमध्ये हा जीव मिथ्यारूपी दोषामुळे अनादि काळापर्यंत भ्रमण करीत राहतो. जेव्हा या जीवाला सम्यक्त्व प्राप्त होते. तेव्हा पंच परावर्तन समाप्त होते. सम्यग्दृष्टी जीव सम्यकत्व रहीत होऊन जेव्हा अधिकांत अधिक समयापर्यंत संसारांमध्ये भ्रमण करतो तेव्हा तो अर्धपुद्गल परार्वतन काळापर्यंत भ्रमण करतो. अर्धपुद्गल परावर्तन काळ द्रव्य परिवर्तनाच्या अंतर्गत नोकर्म पुद्गल परावर्तन काळाप्रमाणे आहे. हा सुद्धा अनंतकाळाप्रमाणे आहे म्हणून याला अनंत म्हणतात.

## व्यवहारकाळाच्या अंतर्गत काही विशेष व्याख्या

आर्यखंडामध्ये अनेक प्रकारांनी जो संयुक्त काळ होतो त्याच्या स्वरूपाचे वर्णन करतात. काळद्रव्य

अनादिनिधन आहे. वर्तना त्याचे लक्षण मानले आहे. जो द्रव्याच्या पर्यायांना बदलण्यास सहायक असतो. त्याला वर्तना म्हणतात. हा काळ अत्यंत सूक्ष्म परमाणुबरोबर आहे. आणि असंख्यात असल्यामुळे संपूर्ण लोकाकाशाएवढा आहे. अर्थात काळद्रव्याचा एक एक परमाणू लोकाकाशाच्या एक-एक प्रदेशांवर स्थित आहे.

ह्या काळांमध्ये अनंत पदार्थांचे परिणमन करण्याचे सामर्थ्य आहे. तो स्वतःला असंख्यात असून सुद्धा अनंत पदार्थांचे परिणमन करण्यास सहाय्य करतो. ज्याप्रमाणे कुंभाराचे चाक फिरण्यास त्याच्या खाली असलेला खिळा कारणीभूत असतो त्याचप्रमाणे पदार्थांच्या परिणमनास काळद्रव्य सहाय्यक कारण आहे. संसारातील सर्व पदार्थ आपआपल्या गुण पर्यायांद्वारा स्वयं परिणमन करीत राहतात. आणि काळद्रव्य त्यांच्या परिणमनांस सहकार्य करते. जीव, पुद्गल, धर्म, अधर्म आणि आकाश हे पाच द्रव्य अस्तिकाय आहेत. आणि काळद्रव्य बहुप्रदेशी नसल्यामुळे अस्तिरूप आहे, अस्तिकाय नाही.

**काळाचे भेद** - काळद्रव्याचे निश्चय आणि व्यवहार असे दोन प्रकार आहेत. निश्चय काळाच्या आश्रयाने व्यवहार काळाची प्रवृत्ती होते. हा व्यवहारकाळ वर्तना लक्षण रूपाने निश्चय काळाच्या द्रव्याद्वाराच प्रवर्तित होतो. भूत, भविष्य आणि वर्तमान असे रूप घेऊन संसाराचा व्यवहार चालण्यासाठी समर्थ होतो. हा व्यवहार काळ समय, आवलि, उच्छ्वास, नाडी इत्यादि भेदांनी अनेक प्रकारचा होतो. हा व्यवहार काळ ज्योतिष्चक्र फिरल्यानेच प्रगट होतो. पळ, तास, दिवस इत्यादिंना व्यवहार काळ म्हणतात.

**व्यवहार काळ** - एक अविभागी पुद्गलपरमाणू जितक्या काळांमध्ये आकाश प्रदेशाचे उल्लंखन करतो त्या अविभागी काळास 'समय' म्हणतात. असंख्यात समयांची एक आवली आणि संख्यात आवलिंचा एक उच्छ्वास होतो. ह्यालाच 'प्राण' सुद्धा म्हणतात. सात उच्छवासाचा एक स्तोक, सात स्तोकांचा एक लव आणि साडे अठ्ठेचाळीस लवांची एक नाली- घडी-दोन घड्यांचा एक मुहूर्त होतो. एका समयास एक मुहूर्त कमी असल्यास त्याला भिन्न मुहूर्त या अन्तमुहूर्त म्हणतात. तीस मुहूर्ताचा १ दिवस, पंधरा दिवसाचा एक पक्ष, दोन पक्षांचा एक महिना, दोन महिन्यांचा एक ऋतु, तीन ऋतुंचा एक अयन (अर्ध वर्ष), दोन अयनांचा एक वर्ष आणि पाच वर्षांचा एक युग होतो. दोन युगांचे दहा वर्ष होतात. दहा वर्षांना दहा वर्षाने गुणल्याावर १०□१०=१०० एक शतवर्ष होते. शतवर्षाला दहाने गुणल्यावर १००□१०=१००० सहस्त्र वर्ष होतात. सहस्त्र वर्षाला दहाने गुणल्यावर १००० □१०=१०००० दहा सहस्त्र वर्ष. दहा सहस्त्र वर्षास १० ने गुणल्यावर १००००□१०=१००००० एक लक्ष वर्ष होते.

लक्ष वर्षाला ८४ ने गुणल्यावर एक पूर्वांग. ह्या पूर्वांगाला ८४००००० ने गुणल्यावर एक 'पूर्व' होतो. ह्या पूर्वास ८४ ने गुणल्यावर एक 'नियुतांग' होतो. नियुतांगाला ८४ ने गुणल्यावर एक 'नियुत' होतो. नियुताला ८४ ने गुणल्यावर एक 'कुमुदांग' आणि कुमुदांगास ८४००००० ने गुणल्यावर एक 'कुमुद' होतो. ह्या कुमुदाला ८४ ने गुणल्यावर एक पद्मांग आणि पद्मांगाला ८४००००० ने गुणल्यावर एक एक 'पद्म' होतो. ह्या पद्मास ८४ ने गुणल्यावर एक 'नलिनांग' होतो. ह्या नलिनांगाला ८४००००० ने गुणल्यावर एक 'नलीन' होतो. नलीनाला ८४ ने गुणल्यावर एक 'कमलांग' होतो. ह्या कमलांगाला ८४००००० ने गुणल्यावर एक कमळ होतो. कमळास ८४ ने गुणल्यावर एक एक 'त्रुटितांग' होतो. ह्या त्रुटितांगाला ८४००००० ने गुणल्यावर एक 'त्रुटित' होते. त्रुटीताला ८४ ने गुणल्यावर एक 'अट्टांग' होतो. अट्टांगाला ८४००००० ने गुणल्यावर एक

'अट्ट' होतो. अट्टाला ८४ ने गुणल्यावर एक 'अममांग' होतो. अममांगाला ८४००००० ने गुणल्यावर एक 'अमम' होतो. अममला ८४ ने गुणल्यावर एक 'हाहांग' होतो. हाहांगाला ८४०००० ने गुणल्यावर एक 'हाहा' होतो. हाहाला ८४ ने गुणल्यावर एक 'हूहांग' आणि हूहांगाला ८४०००० ने गुणल्यावर एक 'हुहू' नावाच्या काळाचे प्रमाण होते. हुहूला ८४ ने गुणल्यावर एक 'लतांग' होतो व लतांगाला ८४००००० ने गुणल्यावर 'लता' नावाचा काळ प्रमाण होतो. लताला ८४ ने गुणल्यावर 'महालतांग' आणि महालतांगाला ८४००००० ने गुणल्यावर एक 'महालता' प्रमाण काळ होतो. महालताला ८४००००० ने गुणल्यावर एक 'श्रीकल्प' होतो. ह्या श्रीकल्पास ८४००००० ने गुणल्यावर एक 'हस्त प्रहेलित' नावाचा संख्याचा प्रमाण येतो. ह्या हस्त प्रहेलिताला ८४ लाखाने गुणल्यावर एक 'अचलात्म' नावाचा काळ होतो.

एकतीस स्थानांवर पृथक् पृथक् चौऱ्याशी ला ठेवून परस्पर गुणाकार केल्यावर अचलात्म नावाचा प्रमाण काळ प्राप्त होतो. जो ९० शून्यांक रूप आहे. अशाप्रकारे ही असंख्यात काळवर्षांची गणना उत्कृष्ट संख्यात वर्ष जोपर्यंत प्राप्त होत नाही तोपर्यंत करावी. जो वर्षांच्या संख्येने रहित आहे तो असंख्यात काळ मानला जातो. याचे पल्य, सागर, कल्प, अनंत इत्यादि अनेक भेद आहेत.

## पल्य सागराचे स्वरूप

कुळकरांच्या, देव नारकियांच्या अवगाहनाच्या प्रमाणांमध्ये जो 'धनुष्य' शब्द आला आहे. तसेच आयु आणि अंतराळामध्ये 'पल्य' शब्दाचा प्रयोग आला आहे. धनुष्य आणि पल्य यांना समजण्यासाठी प्रक्रिया सांगतात –

**अंगुल, धनुष्य, पल्य इत्यादिंची प्रक्रिया** - पुद्गल एका अविभागी कणांस परमाणु म्हणतात. अनंतानंत परमाणुंचा एक अवसन्नासन्न बनतो अर्थात –

| | | |
|---|---|---|
| **अंगुलचे प्रमाण** - अनंतानंत परमाणु | = | १ अवसन्नासन्न |
| ८ अवसन्नासन्न | = | १ सन्नासन्न |
| ८ सन्नासन्न | = | १ त्रुटिरेणु |
| ८ त्रुटिरेणु | = | १ त्रसरेणु |
| ८ त्रसरेणु | = | १ रथरेणु |
| ८ रथरेणु | = | १ बालाग्र (उत्तमभोगभूमि) |
| ८ बालाग्र | = | १ लीखा |
| ८ लीखा | = | १ न्यूका |
| ८ न्यूका | = | १ जूं |
| ८ जूं | = | १ जव |
| ८ जव | = | १ अंगुल |

**अंगुलाचे तीन भेद** - उत्सेधांगुल, प्रमाणांगुल आणि आत्मांगुल. वर दिलेल्या परिभाषेने सिद्ध झालेल्या अंगुलास उत्सेधांगुल म्हटले आहे. पाचशे उत्सेधांगुल मिळून एक प्रमाणांगुल होतो. ज्या काळात भरत आणि ऐरावत क्षेत्रामध्ये जे जे मनुष्य होतात त्या-त्या काळात त्या मनुष्यांच्या अंगुलाचे नाव आत्मांगुल होते.

**कोणत्या अंगुलाने कशाला मोजले जाते ?** - उत्सेधांगुलाने देव, मनुष्य, तिर्यंच, नारकीयांच्या शरीराच्या उंचीचे प्रमाण आणि चारी प्रकारच्या देवांचे निवासस्थान व नगरांचे प्रमाण जाणल्या जाते.

प्रमाणांगुलाने द्वीप, समुद्र, पर्वत, वेदी, नदी, कुंड व सरोवर, पृथ्वी आणि भरत इत्यादि क्षेत्राचे प्रमाण जाणल्या जाते.

आत्मांगुलाने झारी, कळस, दर्पण, वेणू, भेरी, शय्या, शकट, हल, मूसळ, शक्ति, तोमर, सिंहासन, नालि, अक्ष, चामर, दुंदुभि, पीठ, छत्र, मनुष्याचे निवासस्थान, नगर आणि उद्यान इत्यादिंचे प्रमाण समजले पाहिजे.

**धनुष्याचे प्रमाण** - सहा अंगुल मिळून १ पाय (पाद), २ पायाचा १ वीत, दोन वीतांचा १ हात. दोन हात १ रिक्कु, २ रिक्कुंचा १ दंड (धनुष्य) अर्थात ४ हातांचा १ धनुष्य. आणि २००० धनुष्यांचा १ कोस होतो.

**योजनाचे प्रमाण** - ४ कोसाचा १ योजन होतो. याला लघु योजन म्हणतात. ह्या योजनास ५०० ने गुणल्यावर १ महायोजन बनतो. जसे ४□५००=२०००, ह्या २००० कोसाचा एक महायोजन होतो.

**पल्याचे प्रमाण** - चार कोस योजन विस्ताराच्या गोल खड्याचे गणित शास्त्रानुसार घनफळ काढा. अर्थात १ योजन व्यासाच्या, १ योजन खोल खड्याचे घनफळ.

**एक योजनाच्या गोल क्षेत्राचे घनफळ** - १□१□१०=१०,

$\sqrt{१०} = \frac{१९}{६}$ परिधि $\frac{१९}{६}$ □ $\frac{१}{४}$ = क्षेत्रफळ, $\frac{१९}{६}$ □ १ = $\frac{१९}{२४}$ घनफळ,

उत्तम भोगभूमितील एक दिवसांपासून सात दिवसांपर्यंत उत्पन्न झालेल्या मेंढ्याच्या करोडो केसांचे अविभागी तुकडे करून त्या खंडीत केसांनी त्या एक योजन विस्ताराच्या खड्याला पृथ्वीतलाबरोबर अत्यंत पूर्णपणे व्यवस्थित भरले पाहिजे.

**या खड्यातील केसांची संख्या** -

४१३४५२६३०३०८२०३१७७७४९५१२१९२००००००००००००००००००.

**व्यवहार पल्य** - १००-१०० वर्षात केसाचा १-१ तुकडा काढल्यानंतर जितक्या वेळात तो खड्डा रिकामा होतो. त्या काळास 'व्यवहार पल्य' असे म्हणतात.

**उद्धार पल्य** - व्यवहार पल्याच्या केसराशींमधून प्रत्येक तुकड्याचे असंख्य करोड वर्षाचा जितका काळ होतो तितकेच तुकडे करून त्यांनी दुसऱ्या पल्यास भरून एकाएका वेळेस एक एक तुकडा काढा. अशाप्रकारे

जितक्या वेळात तो दुसरा पल्य खाली होईल. त्या काळास 'उद्धार पल्य' समजावे.

**अद्धा पल्य** - उद्धार पल्याच्या केसराशीच्या प्रत्येक तुकड्याचे असंख्यात वर्षाच्या काळाएवढे तुकडे करून तिसरा खड्डा भरल्यावर पहिल्या प्रमाणेच एका-एका समयात एक-एक केसाचा तुकडा काढून तो खड्डा खाली होण्यास जितका वेळ लागेल तेवढ्या वेळेस 'अद्धा पल्य' म्हणतात.

मध्यक्षेत्राच्या उद्धार पल्याने द्वीप आणि समुद्रांची संख्या मोजली जाते. आणि ह्या अद्धापल्याने नारकी, तिर्यंच, मनुष्य आणि देवांच्या आयुची आणि कर्मांची स्थिती मोजली जाते.

**सागर** - दहा कोडा-कोडी व्यवहार पल्याचा एक व्यवहार सागर. दहा कोडा-कोडी अद्धापल्यांचा एक अद्धासागर होतो. अर्थात एका करोडला एक करोडने गुणल्यावर कोडा-कोडी होते. अशाप्रकारे दहा कोडा-कोडींचा एक सागर होतो.

कुळकरांच्या, देवनारकियांच्या आयुष्यामध्ये जे पल्य आणि सागराचे प्रमाण आले आहे आणि उंचीमध्ये धनुष्याचे प्रमाण आले आहे. त्यांना समजण्यासाठी ह्या व्याख्या लक्षात ठेवल्या पाहिजे.

## तीन लोकांमध्ये सिद्ध जीव कोठे आहे ?

**आठवी भूमी** - तीन लोकाच्या मस्तकावर 'ईषत्प्राग्भार' नावाची आठवी भूमी आहे. ही एक राजु रूंद, ७ राजू लांब आणि ८ योजन जाडीची आहे. अर्थात् लोकाच्या अंतापर्यंत आहे.

**सिद्धशिला** - ह्या आठव्या पृथ्वीच्या मध्यभागी चांदीची शुभ्र पांढरी, छत्राकार, मनुष्य क्षेत्राच्या समान गोल, पंचेचाळीस लाख योजनव्यासाची सिद्धशिला आहे. ह्याची जाडी मध्यभागी ८ योजन आहे. अन्यत्र सर्वत्र किनाऱ्यापर्यंत कमी-अधिक होत असते. याचा वरचा पृष्ठभाग एकसारखा आहे. परंतु खालचा भाग कमी-जास्त होतो असे समजावे. सर्वार्थसिद्धि विमानापासून १२ योजन अंतर सोडून सिद्धक्षेत्र आहे.

**सिद्धांचा निवास** - आठव्या पृथ्वीच्या वर ७०५० धनुष्य अंतरावर सिद्धांचा निवास आहे. ह्या सिद्धांची उत्कृष्ट अवगाहना पाचशे पंचविस धनुष्य आणि जघन्य साडे तीन हात आहे. तनुवात वलयांची जाडी १५७५ धनुष्य आहे. ह्यामध्ये ५०० ने गुणून १५०० ने भाग दिल्याने सिद्धांच्या उत्कृष्ट अवगाहनेचे प्रमाण निघते. कारण अवगाहनेचा धनुष्य ४ हाताचा आहे. आणि त्याच्या ५०० पट अधिक हा धनुष्य आहे. १५७५ □ ५०० ÷ १५०० = ५२५ धनुष्य

५०० ने गुणून ९००००० ने भाग दिल्यास जघन्य अवगाहनाचे प्रमाण येते.

$१५७५ \square ५०० \div ९००००० = \frac{७}{८}$ ध० $= ३\frac{१}{२}$ हात.

एका जीवाच्या अवगाहीत क्षेत्रांमध्ये जघन्य, उत्कृष्ट आणि मध्यम अवगाहना सहित अनंत सिद्ध जीव होतात. मनुष्य लोकाप्रमाणे तनुवात वलयाच्या उपरिम भागामध्ये सर्व सिद्धांचे डोके एकसारखे असतात. अधस्तन भागांमध्ये वेगवेगळ्या प्रकारचे असतात. जेवढा मार्ग जाण्यायोग्य आहे तेवढे लोक शिखरांवर जाऊन सर्वसिद्ध पृथक् पृथक् शरीर रहित होतात. अनुपम स्वरूपाला प्राप्त झालेले, कृतकृत्य, नित्य, निरंजन, निरोग,

निर्मल कर्मांनी युक्त झालेले सिद्ध एकाच वेळी संपूर्ण पदार्थांना सदैव जाणतात.

**सिद्धांचे सुख** - चक्रवर्तीच्या सुखापेक्षा भोगभूमिवासियांचे सुख अनंतपट आहे. भोगभूमीवासियांच्या सुखापेक्षा धरणेंद्राचे सुख अनंतपट आहे. धरणेंद्राच्या सुखापेक्षा देवेंद्राचे सुख अनंतपट आहे. देवेंद्राच्या सुखापेक्षा अहमिद्रांचे सुख अनंतपट आहे. अशाप्रकारे जे अनंतानंत पट सुख आहे त्या सर्वांचे भूत, भविष्य आणि वर्तमानकाळातील सर्व सुखांना एकत्र केले तरी सिद्धांचे क्षणमात्रात उत्पन्न झालेले सुख अनंतपट आहे. हे सांगणे असे आहे की – दुसऱ्यांचे सुख आकुलतासहित आहे. आणि सिद्धांचे सुख निराकुल आहे. म्हणून सिद्धांचे सुख शब्दाने वर्णन होऊ शकत नाही.

इथपर्यंत करणानुयोगात लोकांचा, पंच-परिवर्तनचा, पल्य, सागर इत्यादिंचा आणि सिद्ध लोकाचे संक्षिप्त स्वरूप सांगितले आहे. अधिक जिज्ञासुंनी तिल्लोयपण्णत्ति, त्रिलोकसार, जम्बूद्वीपण्णात्ति इत्यादि ग्रंथांचा स्वाध्याय केला पाहिजे.

## तृतीय खण्ड

# च र णा नु यो ग

गृहमेध्यनगाराणां चारित्रोत्पत्तिवृद्धिरक्षाङ्गम् ।
चरणानुयोगसमयं सम्यज्ञानं विजानाति ॥ ४५ ॥

अर्थ - सम्यग्ज्ञानच गृहस्थ आणि मुनींच्या चारित्र्याची उत्पत्ति, वृद्धि आणि रक्षाच्या अंगभूत विषयांस अर्थात चरणानुयोग शास्त्रास समजते. अर्थात चरणानुयोगामध्ये श्रावक आणि मुनिधर्म यांचे वर्णन केले आहे.

## धर्माचे लक्षण

'जो[१] प्राण्यांना संसारातील दुःखापासून मुक्त करून उत्तम सुख देतो तो धर्म आहे. 'रत्नत्रय'[२] स्वरूपाच्या धर्माचे ईश्वर असे जिनेंद्र भगवान सम्यग्दर्शन, सम्यग्ज्ञान आणि सम्यक्चारित्राला धर्म म्हणतात.

## सम्यग्दर्शन

खऱ्या[३] देव, गुरू, शास्त्रांवर तीन मूढतारहित, आठ गर्वसे रहित आणि आठ अंग सहित श्रद्धान करणे हेच सम्यग्दर्शन आहे. अथवा

"तत्त्वांवर[४]" यथार्थ श्रद्धा ठेवणे सम्यग्दर्शन आहे. किंवा

"ज्याला[५] आठ मद, तीन मूढता, सहा अनायतन, आठ शंकादिदोष, सात व्यसन, सातप्रकारचे भय (भीती) आणि पांच अतिचार असे एकूण चौरेचाळीस दोष नाही तो सम्यक्दृष्टी आहे."

**श्रावकाचे ७० गुण** - "आठ[६] मूलगुण, बारा उत्तर गुणांचे प्रतिपालन, (बाराव्रत - ५ अणुव्रत, ३ गुणव्रत ४ शिक्षाव्रत) सात व्यसन आणि पंचवीस सम्यक्त्वाच्या दोषांचा त्याग, बारा प्रकारच्या वैराग्य भावनांचे चिंतन, सम्यक्दर्शनाच्या पांच अतिचारांचा परित्याग आणि भक्तिभावना अशाप्रकारे सम्यक्दृष्टी श्रावकाचे ७० गुण आहेत."

**खऱ्या देवाचे लक्षण** - जे क्षुधा, तृषादि दोषांनी रहित 'वीतराग' 'सर्वज्ञ' आणि हितोपदेशी आहे तेच खरे देव आहेत.

**अठरा दोष** - क्षुधा, तृषा, रोग, शोक, जन्म, मरण, वृद्धावस्था, भय, गर्व, राग, द्वेष, मोह, चिंता, अरति, निद्रा, विस्मय, घाम आणि खेद असे १८ दोष अरिहंत भगवंतांना, खऱ्या देवांना नसतात.

**खऱ्या शास्त्राचे लक्षण** - खऱ्या देवांनी सांगितलेले प्रत्यक्ष, अनुमान इत्यादि प्रमाणांनी विरोध नसलेले, जीवादि तत्त्वांचे वर्णन करणारे शास्त्र खरे शास्त्र आहे.

## खऱ्या गुरूंचे लक्षण

ज्यांना विषयांची आशा नसते, आरंभ-परिग्रह नसतो. दिगंबर वेषधारी, ज्ञान, ध्यान आणि तप यामध्ये लीन राहतात तेच खरे गुरू आहेत.

**सम्यक्दर्शनाचे आठ अंग** - निःशंकित, निःकांक्षित, निर्विचिकित्सा, अमूढदृष्टी, उपगूहन, स्थितिकरण, वात्सल्य आणि प्रभावना.

---

१. 'संसारदुःखतः सत्त्वान् योधरत्युत्तपे सुखे ।' (रत्नकरंड श्रावकाचार)
२. सद्दृष्टीज्ञान वृत्तानि धर्म धर्मेश्वरा विदुः ।
यदीयप्रत्यनीकानि भवन्ति भवपद्धतिः ॥३॥ (रत्नकरंड श्रावकाचार)
३. श्रद्धानं परमार्थानामाप्तगम तपोमृताम् ।
त्रिमूढापोढ़मष्टांगं सम्यग्दर्शनमस्मयम् ॥४॥ (रत्नकरंड श्रावकाचार)
४. तत्त्वार्थश्रद्धानं सम्यग्दर्शनम् (तत्त्वार्थसूत्र)
५. मयमूढमणायदणं संकाइवसणभयमईयारं ।
जेसिं चउदालोदे णसंति ते होंति सदिट्ठी ॥७॥ (रयणसार)
६. उभयगुणवसणभयमलवेरग्गाइचार भत्तिविग्धं वा ।
एदेसत्तत्तरिया दंसाणसावयगुणा भणिया ॥ (रयणसार)

**निःशंकित** - देव, गुरू व शास्त्र स्वरूप तत्त्व हेच आहे, याच प्रकारचे आहे, दुसरे नाही. दुसऱ्या प्रकारचे नाही अशा प्रकारे दृढ श्रद्धान करणे.

**निःकांक्षित** - कर्मांच्या आधीन असलेले, नष्ट होणारे, दुःख मिश्रित आणि पापाला कारणीभूत अशा विषय सुखांची इच्छा नसणे.

**निर्विचिकित्सा** - स्वभावाने अपवित्र परंतु रत्नत्रयाने युक्त अशा मुनींच्या शरीराची घृणा न करणे, त्यांची सेवा करणे.

**अमूढदृष्टी** - दुःखाला कारणीभूत असलेल्या खोट्या मिथ्यादर्शनांमध्ये विश्वास न ठेवणे आणि मिथ्यादृष्टी जीवांचा मनाने आणि शरीराने आदर न करणे व वाणीने त्यांची प्रशंसा न करणे.

**उपगूहन** - स्वभावाने शुद्ध अशा रत्नत्रयस्वरूप मोक्षमार्गाने चालणाऱ्या अज्ञानी, प्रमादी लोकांकडून काही चुका झाल्यास त्या दूर करणे. किंवा त्या चुका नजरअंदाज करणे उपगूहन आहे.

**स्थितिकरण** - सम्यक्‌दर्शन आणि सम्यक्‌चारित्र यांच्यापासून भटकणाऱ्या लोकांना पुन्हा धर्मांमध्ये स्थिर करणे हे स्थितिकरण आहे.

**वात्सल्य** - जैन बांधवांच्या प्रति मायाचाररहित आणि गोवत्सप्रमाणे धर्मप्रेम ठेवणे.

**प्रभावना** - अज्ञानरूपी अंधकाराला दूर करून यथाशक्ति जिनधर्माचा प्रचार करणे. जिनधर्माचे महत्त्व समजवून सांगणे.

श्री अमृतचंद्रसूरि म्हणतात की -

“[1]रत्नत्रयरूपी तेजाने नेहमीच आत्म्याची प्रभावना केली पाहिजे. दान, तप, देवपूजा विद्या आणि अतिशय चमत्कार इत्यादींच्या द्वारा जिनधर्माची प्रभावना केली पाहिजे. ह्या आठ अंगापैकी एक अंग जरी कमी असले तरी सम्यक्‌दर्शन संसाराची परंपरा नष्ट करण्यास समर्थ होत नाही.

**लोकमूढता** - नदी आणि समुद्रांमध्ये स्नान केल्याने कल्याण होईल असे समजणे, वाळू आणि दगड यांचा ढीग करणे. पहाडावरून पडणे, अग्नीमध्ये जाळून घेणे इत्यादि क्रिया लोकमूढता आहेत.

**देवमूढता** - ऐहिक सुखाच्या इच्छेने आणि वरदानाच्या अभिलाषेने ज्यांना रागद्वेष आहेत अशा देवांची उपासना करणे ही देवमूढता आहे.

**पाखंडी मूढता** - परिग्रह, आरंभ आणि हिंसा ज्यांना आहे अशा पाखंडी साधूंचा आदर-सत्कार करणे ही गुरूमूढता आहे.

**आठ मद (गर्व)** - ज्ञान, पूजा, कुल, जाति, बल, ऋद्धि, तप आणि शरीर ह्या आठांचा आश्रय घेऊन गर्व करणे.

**सहा अनायतन** - कुदेव, कुदेवांचे मंदीर, कुशास्त्र, कुशास्त्र मानणारे, खोटी तपस्या आणि खोटी तपस्या करणारे हे सहा अनायतन आहेत.

**पंचवीस दोष** - वरील अंगाच्या विपरित आठ दोष, आठ मद, तीन मूढता, सहा अनायतन हे पंचवीस दोष सम्यक्त्वाला दूषित करतात. म्हणून यांचा त्याग केला पाहिजे.

**सम्यग्दर्शनाचे भेद** - सम्यग्दर्शनाचे २ भेद आहेत. (१) निसर्गज सम्यग्दर्शन आणि (२) अधिगमज सम्यग्दर्शन. जे सम्यक्त्व गुरूंचा उपदेश इत्यादि बाह्य निमित्ताने होत नाही. आपोआप उत्पन्न होते. हे निसर्गज सम्यग्दर्शन आहे.

---

१. आत्मा प्रभावनीयो रत्नत्रयतेजसा सततमेव ।
दान-तपोजिनपूजा-विद्यातिशयैश्च जिनधर्मः ॥ - (पुरुषार्थसिद्ध्युपाय)

(२) जे सम्यक्त्व गुरूंचा उपदेश, प्रेरणा इत्यादि निमित्यांची अपेक्षा ठेवून होते ते अधिगमज सम्यग्दर्शन होय. ह्या दोन्ही सम्यक्त्वांमध्ये दर्शन मोहनीय कर्माचा क्षय, क्षयोपशम आणि उपशम हे अंतरंग कारण समान आहे.

**सम्यग्दर्शनाचे तीन भेद आहेत** - औपशमिक, क्षायिक आणि क्षायोपशमिक.

**सम्यग्दर्शनाचे [1]दहा भेद मानले आहेत** - आज्ञा, मार्ग, उपदेश, सूत्र, बीज, संक्षेप, विस्तार आणि अर्थ असे आठ आणि अवगाढ व परमावगाढ असे दहा भेद केले आहेत.

**आज्ञा समुद्भव** - दर्शन मोह उपशांत झाल्यावर ग्रंथाचे श्रवण केल्याशिवाय वीतराग भगवानच्या आज्ञेने जे तत्त्वश्रद्धान होते ते आज्ञा सम्यकत्व आहे.

**मार्ग सम्यग्दर्शन** - रत्नत्रयरूप मोक्षमार्ग कल्याणकारी आहे असे समजून त्यावर श्रद्धा ठेवणे.

**उपदेश सम्यग्दर्शन** - त्रेसष्ठ शलाका पुरूषांच्या पुराणातील उपदेशाने जे तत्त्वश्रद्धान उत्पन्न होते ते उपदेश सम्यग्दर्शन आहे.

**सूत्र सम्यक्त्व** - मुनींच्या चारित्र्याचे अनुष्ठान सांगणारे सूत्र ऐकून त्यावर श्रद्धा ठेवणे.

**बीज सम्यक्त्व** - ज्या जीवादि पदार्थांच्या समुहांचे व गणितादि विषयांचे ज्ञान दुर्लभ आहे अशा विषयांचे मुख्य (बीज) पदांच्या सहाय्याने ज्ञान प्राप्त करून श्रद्धा ठेवणे बीज सम्यक्त्व आहे.

**संक्षेप सम्यक्त्व** - पदार्थाच्या स्वरूपाला संक्षेप रूपाने समजून त्यावर श्रद्धा ठेवणे संक्षेप सम्यक्त्व आहे.

**विस्तार सम्यक्त्व** - बारा अंगांना ऐकून त्यावर श्रद्धा ठेवणे.

**अर्थ सम्यक्त्व** - अंग बाह्य शास्त्रांना वाचल्याशिवाय त्यात सांगितलेल्या कोणत्या पदार्थाच्या निमित्ताने त्यातील अर्थावर श्रद्धा ठेवणे.

**अवगाढ सम्यक्त्व** - अंगबाह्य व अंगप्रविष्ट दोन्ही प्रकारच्या शास्त्रांना समजून त्यावर श्रद्धा ठेवणे. हे सम्यक्त्व श्रुतकेवलींना होते.

**परमावगाढ सम्यक्त्व** - केवलज्ञानाने पाहिलेल्या पदार्थांच्या विषयामध्ये जी रुचि होते ते परमावगाढ सम्यक्त्व आहे. अर्थात् केवली भगवान संपूर्ण विश्वाला पाहतात. यालाच परमावगाढ सम्यक्त्व म्हणतात.

**सम्यक्त्वाचे आठ गुण** -

निर्वेद - संसार, शरीर आणि भोगांपासून विरक्ति.

निंदा - आपल्या दोषांबद्दल पश्चात्ताप करणे.

गर्हा - केलेल्या दोषांना गुरूंच्या समोर प्रगट करून आपली निंदा करणे.

उपशम - क्रोधादि विकारांना शांत करणे.

भक्ति - सम्यग्दर्शन इत्यादि विषयांमध्ये रुचि घेणे.

वात्सल्य - धार्मिक लोकांशी प्रेमपूर्ण व्यवहार करणे.

अनुकंपा - सर्व प्राणीमात्रांवर दयाभाव ठेवणे.

**सम्यग्दृष्टीचे ४४ दोष आणि ७० गुण** - हा मोक्ष महल चढण्यासाठी सम्यग्दर्शन ही पहिली पायरी आहे. तिन्ही काळात आणि तिन्ही जगात संसारी प्राण्यांना सम्यग्दर्शनासारखी कल्याणकारी वस्तू नाही. आणि तिन्ही लोकात व तिन्ही काळात मिथ्यात्वासारखी दुःखदाई दुसरी वस्तू नाही. सम्यग्दृष्टी जीव मेल्यानंतर एकेंद्रिय, विकलत्रय, असैनी पंचेंद्रिय जीवांमध्ये नरक, तिर्यंच, मनुष्यगतिमध्ये स्त्रीवेद, नपुंसक वेदांमध्ये, नीच कुळांमध्ये

---

१. आत्मानुशासन श्लोक ११

जन्म घेत नाही. जर पहिले आयु बांधून सम्यक्त्व प्राप्त केले तर तो प्रथम नरकांमध्ये जातो. तिर्यंच आणि मनुष्यांच्या भोगभूमि मध्ये तिर्यंच आणि मनुष्य होतो.

## सम्यग्ज्ञान

संशय, विपर्यय आणि अनध्यवसाय रहित पदार्थांना जाणणे सम्यग्ज्ञान आहे. याचे ११ अंग व १४ पूर्व असे भेद केले आहेत. अथवा प्रथमानुयोग, करणानुयोग, चरणानुयोग आणि द्रव्यानुयोग असे चार भेद केले आहेत. या चार अनुयोगांमध्ये संपूर्ण द्वादशांग वाणीचा सार येऊन जातो.

**प्रथमानुयोग** - कोण्या एका महापुरुषाच्या चारित्र्याचे वर्णन करणारे, त्रेसष्ट शलाका पुरुषाच्या चरित्राचे वर्णन करणारा, पुण्याला कारणीभूत, बोधि-समाधी-सम्यग्ज्ञानास सांगणारा प्रथमानुयोग आहे.

**करणानुयोग** - लोक, अलोक यांच्या विभागाला, दोन्ही काळाच्या परिवर्तनाला आणि चारी गतींना दर्पणाप्रमाणे स्पष्ट सांगणारा करणानुयोग आहे.

**चरणानुयोग** - गृहस्थ आणि मुनि यांच्या चारित्र्याची उत्पत्ति, वृद्धी आणि रक्षा यांना सांगणारा चरणानुयोग आहे.

**द्रव्यानुयोग** - जीव आणि अजीव तत्त्वांचे, पुण्य, पाप, बंध आणि मोक्ष यांचे वर्णन करणारे शास्त्र द्रव्यानुयोग आहे.

श्री गुणभद्रसूरि म्हणतात की -

[१]जो श्रुतस्कंधरूप वृक्ष अनेक धर्मात्मकरूप फूलं आणि फळं यांच्या भाराने अतिशय झुकलेला आहे. वचनरूपी पानांनी व्याप्त आहे. नयरूपी विस्तृत शाखांनी जो युक्त आहे, उन्नत आहे. समीचीन आणि मतिज्ञानरूपी मूळांनी स्थिर आहे. अशा श्रुतस्कंधरूपी वृक्षांवर बुद्धीमान साधूंनी मनरूपी वानराला प्रतिदिन रमविले पाहिजे. अर्थात् चंचल मनाला विषयांतून काढून शास्त्राच्या अभ्यासात लावले पाहिजे. असे केल्याने रागद्वेषाची प्रवृत्ति नष्ट होते आणि संवरपूर्वक कर्माची निर्जरा होऊन मोक्ष सुखाची प्राप्ती होते.

प्रस्तुत ग्रंथामध्ये ह्या चारही अनुयोगांच्या अंशाचे वर्णन आहे.

## सम्यकचारित्र

दर्शन मोहरूपी अंधकाराचा नाश झाल्यानंतर (उपशम, क्षय या क्षयोपशम) सम्यग्दर्शनाची प्राप्ती होते. सम्यग्दर्शन झाल्यानंतर सम्यक्ज्ञान प्रगट होते. हे दोन्ही ज्याला प्राप्त झाले असा भव्य जीव रागद्वेष नष्ट करण्यासाठी चारित्राला धारण करतो. ज्याचे[२] आचरण केले जाते त्याला चारित्र म्हणतात.

पापांच्या नालीप्रमाणे हिंसा, असत्य, चोरी, कुशील आणि परिग्रह यांच्यापासून विरक्त होण्यास सम्यक्चारित्र म्हणतात.

**चारित्र्याचे प्रकार** - सम्यक्चारित्र्याचे[३] सकल चारित्र व विकल चारित्र असे दोन प्रकार आहेत.

सर्व परिग्रहांपासून मुक्त अशा मुनींना सकल चारित्र होते.

---

१. अनेकान्तात्मार्थं प्रसवफलभारातिविनते ।
वचःपर्णाकीर्णे विपुलनयशाखाशतयुते ॥
समुत्तुङ्गे सम्यक् प्रततमतिमूले प्रतिदिनं ।

२. यत् चर्यते तच्चारित्रं ।

३. "सकलं विकलं चरणं" रत्नकरण्डश्रावकाचार ।

परिग्रह सहित गृहस्थांना एकदेश चारित्र होते.

श्री अमृतचन्द्रसूरि म्हणतात की, - "[१]सर्वथा सर्वदेश त्यागामध्ये लवलीन असलेले मुनि समयसार स्वरूप शुद्धोपयोग ज्याचे स्वरूप आहे अशाचे आचरण करणारे असतात. आणि जो एक देश विरक्त झाला अशा श्रावकाला उपासक म्हणतात. उपासकाच्या अकरा प्रतिमा भेदरूप आहेत. अकरा प्रतिमांचे वर्णन पुढे येईल. पंचपापांचा एक देश त्याग करणे विकल चारित्र आहे.

## पांच अणुव्रतांचे वर्णन

**अहिंसाणुव्रत** - मन, वचन, कायेने आणि कृत, कारित अनुमोदनेने संकल्पपूर्वक त्रस जीवांचा घात करीत नाही त्याला अहिंसाणुव्रत म्हणतात.

**सत्याणुव्रत** - जो स्वतः स्थूल असत्य बोलत नाही. धर्माची जेणेकरून हानी होईल किंवा दुसऱ्यांवर संकट येईल असे सत्य सुद्धा बोलत नाही यालाच एकदेश सत्यव्रत म्हणतात.

**अचौर्याणुव्रत** - जो ठेवलेली, विसरलेली किंवा पडलेली दुसऱ्यांची वस्तू, संपत्ती ग्रहण करीत नाही. हे अचौर्य अणुव्रत आहे.

**ब्रह्मचर्याणुव्रत** - जो पापाच्या भीतीने परस्त्रीचा त्याग करतो तो चतुर्थ अणुव्रती आहे.

**परिग्रहपरिमाण अणुव्रत** - धन, धान्य इत्यादि परिग्रहाचे प्रमाण करणे, यापेक्षा अधिकाची इच्छा न ठेवणे हे पांचवे परिग्रह परिमाणव्रत आहे.

हे पाच अणुव्रत नियमाने स्वर्गप्राप्तीचे साधन आहेत. 'अणुव्रत'[२] व महाव्रतांना ग्रहण करणारा जीव देवायुचा बंध करतो. बाकी तीन आयुंचा बंध झाल्यावर ही व्रते होऊ शकत नाहीत.

## तीन गुणव्रत

पाच अणुव्रतांची रक्षा करण्यासाठी किंवा त्यांच्या वृद्धीसाठी तीन गुणव्रत होतात. दिग्व्रत, अनर्थदण्ड व्रत आणि भोगोपभोग परिमाणव्रत.

**दिग्व्रत** - सूक्ष्म पापाच्या निराकरणासाठी मरणपर्यंत दहा दिशांची मर्यादा ठेवून त्याच्या बाहेर न जाण्यास दिग्व्रत म्हणतात.

**अनर्थदण्डव्रत** - दिशांच्या मर्यादेत निष्फळ पापोपदेश इत्यादि क्रियांपासून विरक्त होण्यास अनर्थदण्डव्रत म्हणतात.

याचे पाच प्रकार आहेत - पापोपदेश, हिंसादान, अपध्यान, दुःश्रुति आणि प्रमादचर्या.

**पापोपदेश** - तिर्यंचांना कष्ट देणे, व्यापार करणे, हिंसा आरंभ आणि छळ-कपट संबंधी कथा सांगणे.

**हिंसादान** - कुऱ्हाडी, तलवार, कुदाळी इत्यादी हिंसेच्या कारणांचे दान करणे.

**अपध्यान** - राग, द्वेष इत्यादिंनी दुसऱ्यांचे अशुभ चिंतणे.

**दुःश्रुति** - आरंभ, परिग्रह, मिथ्यात्व इत्यादि वर्धक शास्त्रांना ऐकणे.

**प्रमादचर्या** - निष्प्रयोजन पृथ्वी, जल इत्यादींना नष्ट करणे, वनस्पति तोडणे, फूले तोडणे.

**भोगोपभोग परिमाणव्रत** - भोग आणि उपभोग संबंधी वस्तूंचा त्याग करणे या काही काळासाठी सोडून देणे.

---

१. निरतःकात्स्नर्यनिवृत्तौ भवति यतिः समयसारभूतोऽयम् ।
या त्वकेदेशविरतिर्निरतस्वस्यामुपासको भवति ॥४१॥ - पुरुषार्थसिद्धयुपाय

२. "अणुवदमहव्वदाइं ण लहइ देवाउगं मोत्तुं ।" (गोम्मटसारकर्मकांड)

**यम-नियमाचे स्वरूप** - जीवनपर्यंत त्यागास 'यम' आणि काही काळापर्यंत त्यागास 'नियम' म्हणतात.

## चार शिक्षाव्रत

देशावकाशिक, सामायिक, प्रोषधोपवास आणि अतिथी संविभाग - व्रत.

**देशावकाशिक** - दिग्व्रतामध्ये प्रमाण केलेल्या विशाल प्रदेशांमध्ये ग्राम, गली, मोहल्ला इत्यादिंची सीमा करून प्रतिदिन किंवा पक्ष किंवा महिन्यांमध्ये येण्या-जाण्याचा त्याग करणे.

**सामायिक** - वन, गृह किंवा चैत्यालय इत्यादि ठिकाणी चित्ताची व्याकुळता नष्ट करून एकांत स्थानांमध्ये निर्मळ मनाने श्रावकांस सामायिक केले पाहिजे.

**प्रोषधोपवास व्रत** - नेहमी अष्टमी आणि चतुर्दशीला व्रत करण्याचे इच्छेने अनशन किंवा चार प्रकारच्या आहाराचा त्याग करणे.

**उपवास, प्रोषध आणि प्रोषधोपवास मध्ये भेद** -

चार प्रकारच्या आहाराचा त्याग करणे याला उपवास म्हणतात. दिवसातून एक वेळा भोजन करणे हे प्रोषध होय. उपवास करून पारण्याच्या दिवशी एकाशन करणे ह्याला प्रोषधोपवास म्हणतात.

**अतिथि संविभाग** - गुणनिधि, तपोधन साधूंना विधिपूर्वक योग्य द्रव्यादि द्वारा दान देणे अतिथिसंविभाग व्रत आहे.

श्री समन्तभद्र स्वामीने अतिथी संविभाग व्रतामध्ये भगवंताची पूजा करण्याचा उपदेश केला आहे.

"[१]श्रावकाला नित्यही वांछित वस्तुदायक, कामविनाशक देवाधिदेव अरिहंत देवाची आदराने पूजा केली पाहिजे. ही पूजा संपूर्ण दुःखाचा नाश करणारी आहे."

## सल्लेखनाचे स्वरूप

ज्याचा प्रतिकार करू शकत नाही असा उपसर्ग आल्यावर, दुष्काळ पडल्यावर, म्हातारपण आणि रोग आल्यावर रत्नत्रय धर्माची आराधना करताना शरीराचा त्याग करणे यांस 'सल्लेखना' म्हणतात.

श्रावकाच्या बारा व्रतांच्या शेवटी सल्लेखना करण्याचे विधान आहे.

'[२]मरणाच्या वेळेस होणाऱ्या सल्लेखनेस प्रेमपूर्वक स्विकारले पाहिजे.'

वसुनन्दिश्रावकाचार इत्यादि अनेक ग्रंथांमध्ये शिक्षाव्रताच्या चतुर्थ भेदाच्या रूपाने सल्लेखनाव्रताचा उल्लेख आहे. अशाप्रमाणे -

"केवळ वस्त्रमात्र[३] परिग्रहास ठेवून बाकी उरलेल्या सर्व परिग्रहास सोडून आपल्या घरी किंवा मंदिरामध्ये जो श्रावक गुरूंच्या सान्निध्यात त्रिकरण शुद्धीपूर्वक आपली आलोचना करतो, पिण्यास योग्य पदार्थ ठेवून बाकी तीन प्रकारच्या आहाराचा त्याग करतो. त्यास सल्लेखना शिक्षाव्रत म्हटले आहे."

तात्पर्य हे आहे की - आयुष्याच्या अंतसमयी क्रमाने कषायांना आणि शरीरास कृश करणे 'सल्लेखना' आहे. यामध्ये क्रमा-क्रमाने आहार पाणी यांचा त्याग करणे. णमोकार मंत्राचा जप करीत करीत शरीराचा त्याग

---

१. देवाधिदेवचरणे परिचरणं सर्वदुःखनिर्वहणम् ।
कामदुहि कामदाहिनी परिचिनुयादादृतो नित्यं ॥११९॥

२. मारणान्तिकीं सल्लेखनां जोतिषा ॥तत्त्वार्थ सूत्र ॥

३. वसुनन्दि श्रावकाचार ।

करणे यालाच सल्लेखना मरण म्हणतात. ज्याला सल्लेखना मरण येते तो मनुष्य कमीत कमी एक किंवा दोन भव आणि अधिकांत अधिक सात-आठ भव ग्रहण करतो. नंतर मोक्षास प्राप्त करतो.

तत्वार्थसूत्रांमध्ये श्री. उमास्वामी आचार्यांनी सांगितले आहे की - "व्रती[१]स शल्यरहित असले पाहिजे.

शल्याचे तीन भेद आहेत - माया, मिथ्या आणि निदान.

**माया** - मोहास माया म्हणतात.

**मिथ्या** - मोक्षमार्गांमध्ये जे सात तत्व सांगितले आहेत. त्यावर श्रद्धा न ठेवणे मिथ्यात्व आहे.

**निदान** - विषय भोगांची इच्छा करणे यास निदान म्हणतात.

'जो[२] शल्यरहित होऊन पांच अणुव्रत, रात्री भोजन त्याग आणि सात शीलांना (तीन गुणव्रत, चार शिक्षा व्रत) अतिचार रहित पाळतो त्याला व्रती म्हणतात.

## अतिचार किती आहेत ?

तत्त्वार्थ सूत्राच्या सातव्या अध्यायामध्ये सम्यक्त्वाचे पाच अतिचार, बारा व्रताचे पांच-पांच अतिचार आणि सल्लेखनाचे पांच अतिचार ५+१२□५+५=७० असे एकूण ७० अतिचार होतात. या अतिचारांचे प्रकरण तत्वार्थ सूत्रांत पाहिले पाहिजे.

## श्रावकाच्या अकराप्रतिमा

श्रावकांसाठी अकरा प्रतिमा सांगितल्या आहेत. क्रमानुसार प्रतिमांचे गुणधर्म वाढत वाढत जातात.

**(१) दर्शन प्रतिमा** - अतिचार रहित सम्यक्त्व पाळणारा. संसार, शरीर आणि भोगांपासून विरक्त, पंचपरमेष्ठीच्या चरणी शरण आलेला, व्रतानुसार अष्टमूलगुणांचे अनुसरण करणारा दार्शनिक श्रावक होतो.

अन्यत्र पहिल्या प्रतिमाधारी दार्शनिक श्रावकांस सप्त व्यसनांचा त्याग करण्यासाठी उपदेश दिला आहे. जुगार[३], दारू, मांस, वेश्या, शिकार, चोरी, परस्त्रीसेवन हे सातही व्यसन पाप असून दुर्गतीचे कारण आहेत.

**(२) व्रत प्रतिमा** - जो शल्य आणि अतिचार रहित पाच अणुव्रत आणि सात शीलरूप बारा व्रतांचे पालन करतो त्याला व्रतिक[४] म्हणतात.

**(३) सामायिक प्रतिमा** - चार वेळा तीन तीन आवर्त आणि चार प्रणाम करतो, कायोत्सर्गात स्थित असलेला, बाह्य व आभ्यंतर परिग्रहाने रहित, देववंदनेच्या प्रथम व शेवटी बसून नमस्कार करणारा, मन, वचन, कायेने शुद्ध असून त्रिकाळ वंदना करणारा श्रावक सामायिक प्रतिमाधारी आहे.

पुढे देववंदना विधि ह्या प्रकरणांत ह्या सामायिक विधीला स्पष्ट करू -

**(४) प्रोषधोपवास प्रतिमा** - प्रत्येक महिन्याच्या दोन अष्टमी, दोन चतुर्दशी, अशा चारही पर्वामध्ये आपली शक्ती न लपविता प्रोषधोपवास केला पाहिजे.

**(५) सचित्त त्याग प्रतिमा** - जो व्रती कच्चे मूळ, फळ, भाजी, कोंपल, फूल इत्यादि खात नाही तो सचित्त

---

१. निःशल्यो व्रती ।

२. चारित्रसार पृ. ७ ।

३. 'जुयं मज्जं मंसं वेसा पारद्धि चोर परयारं ।
दुग्गइगमणस्सेदाणि हेउभूदाणि पावणि ॥५९॥ (वसुनन्दिश्रावकाचार)

४. भावसंग्रह ग्रंथामध्ये व्रत प्रतिमाच्या प्रकरणामध्ये सामायिक विधीचे वर्णन करून देवपूजा सांगितली आहे. तसेच अतिथी संविभाग व्रतामध्ये दानाचे विशद वर्णन केले आहे. तेथे पहावे.

त्यागी होय.

**(६) रात्री भुक्ति त्यागी** - जो मनुष्य रात्री चारही प्रकारच्या आहाराचा त्याग करतो तो सहावी प्रतिमाधारी आहे.

**(७) ब्रह्मचर्य प्रतिमा** - काम सेवनापासून विरक्त होऊन स्त्रीचा त्याग करणे ब्रह्मचर्य प्रतिमा आहे.

**(८) आरंभ त्याग प्रतिमा** - नोकरी, शेती, व्यापार इत्यादिमध्ये जी आरंभी हिंसा होते, तिचा त्याग करणे आरंभ त्याग प्रतिमा आहे.

**(९) परिग्रह त्याग प्रतिमा** - दहा प्रकारच्या परिग्रहांतून ममत्व बुद्धी काढून घेणे. परिग्रह सोडून देणे.

**(१०) अनुमति त्याग प्रतिमा** - जो आरंभ, परिग्रह अथवा विवाह इत्यादि लोकसंबंधी कार्यांना आपली अनुमोदना देत नाही तो अनुमति विरत प्रतिमाधारी आहे.

**(११) उद्दिष्ट त्याग प्रतिमा** - जो घराचा त्याग करून वनात जाऊन गुरूंजवळ व्रतांना ग्रहण करतो, तप करतो. भिक्षा वृत्तीने भोजन करतो. कौपीन (छोटी चादर) व खंड वस्त्र धारण करतो. त्याला उद्दिष्ट त्याग प्रतिमाधारी म्हणतात.

ही प्रतिमा धारण करणाऱ्यांचे दोन भेद आहेत.

क्षुल्लक आणि ऐलक.

क्षुल्लक कौपीन आणि खंड वस्त्र (छोटी चादर - ज्याने झोपताना डोक्यापासून पायापर्यंत सर्व शरीर झाकले जात नाही.) एक कमंडलू आणि मोराच्या पिसांची पिंछी ठेवतात.

ऐलक केवळ लंगोटी मात्र ठेवतात. अन्य कोणतेही वस्त्र त्यांच्याजवळ नसते. ऐलक यांना केशलोच व पाणीपात्रांमध्ये भोजन करणे आवश्यक आहे.

'दिवसा'[१] प्रतिमायोग धारण करणे, नग्न राहून दिवसभर कायोत्सर्ग करणे, वीरचर्या - मुनींसारखी गोचरी करणे. त्रिकालयोग - गर्मीमध्ये पर्वतांच्या शिखरांवर, वर्षाऋतूंमध्ये झाडांच्या खाली, थंडीमध्ये नदीच्या काठावर ध्यान करणे. सिद्धांत ग्रंथांचे, केवली, श्रुतकेवली द्वारा सांगितलेले, गणधर, प्रत्येक बुद्ध आणि भिन्न-भिन्न साधुंद्वारा निर्मित ग्रंथांचे अध्ययन आणि रहस्य - प्रायश्चित्त शास्त्रांचे अध्ययन ह्या सर्व कार्यांमध्ये श्रावकांचा अधिकार नाही आहे.

## श्रावकाचे तीन भेद

श्रावकाचे[२] तीन भेद आहेत. पाक्षिक, नैष्ठिक आणि साधक. पक्ष, चर्या आणि साधन द्वारा हे तीन भेद झाले आहेत. अष्टमूलगुण पाळणे, देव, धर्म, गुरू यांच्यावर श्रद्धा ठेवणे हा पक्ष आहे. कृषि इत्यादि आरंभजन्य पापांना दूर करण्यासाठी व पुत्रांवर घराचा भार टाकून प्रतिमा वगैरे व्रतांना धारण करणे चर्या आहे. अकरावी प्रतिमा पाळताना अंतसमयी समाधिमरण साधणे हे साधन आहे.

**पाक्षिक** - ज्यांनी हिंसा, असत्य इत्यादि पंच पापांचा त्याग केला आहे आणि जो श्रावकधर्म पाळतो त्याला पाक्षिक श्रावक किंवा प्रारब्ध देशसंयमी म्हणतात.

**साधक** - ज्याचा देशसंयम पूर्ण झाला आहे. जो आत्मध्यानांमध्ये लीन होऊन समाधिमरण करतो त्याला साधक श्रावक किंवा निष्पन्न देशसंयमी म्हणतात.

---

१. वसुनन्दिश्रावकाचार पृ. ११२ ।

२. पाक्षिकादि भिदा त्रेधा श्रावकस्तत्र पाक्षिकः ।
तद्धर्मगृह्यस्तन्निष्ठो नैष्ठिकः साधकः स्वयुक् ॥२०॥ (सागारधर्मामृत)

## पाक्षिक श्रावकाचे अष्टमूलगुण

गृहस्थ धर्मामध्ये जिनेंद्र भगवानाच्या आज्ञेवर श्रद्धा ठेवून गृहस्थ हिंसा सोडण्यासाठी सर्वात प्रथम मद्य, मांस, मधु, पिंपळ, गूलर, कठूमर, वड, पाकर ह्या आठांचा (तीन मकार आणि पाच औदुंबर फळ) त्याग करतो. जो मनुष्य बिंदूसमान मधुस (शहद) खातो तो सात गावांना जाळून जे पाप होते त्यापेक्षा सुद्धा अधिक पाप बांधतो. मदिरा (दारू) व मांस तर स्पष्टपणेच जीवहत्त्याचे स्थान आणि पापाची खाण आहे. औदुम्बर फळामध्ये नेहमीच त्रस जीव असतात म्हणून त्यांचा त्याग करणे श्रेयस्कर आहे.

**प्रकार अंतराने अष्टमूल गुणांचे वर्णन** - मद्य[१], मांस, मधु त्याग, रात्री भोजन त्याग आणि पंच औदुम्बर फळांचा त्याग हे पाच आणि पंचपरमेष्ठींना नमस्कार अर्थात देवदर्शन, जीवदया (अहिंसा) आणि पाणी गाळून पिणे अशाप्रकारे कोणत्या-कोणत्या शास्त्रात मूलगुण मानले आहेत.

**श्री समन्तभद्र स्वामींनी प्रतिपादन केलेले मूलगुण** - मद्य[२], मांस, मधु यांचा त्याग करून पाच अणुव्रतांना पाळणे हे श्रावकाचे आठ मूलगुण आहेत. असे गणधर इत्यादि मुनींनी सांगितले आहे.

श्री अमृतचंद्रसूरि म्हणतात की - "दुःखदायक आणि पापांचे स्थान असलेले मद्य, मांस, मधु आणि पाच औदुंबर ह्या आठ पदार्थांचा परित्याग करून निर्मळ बुद्धी असणारे पुरूष जिनधर्माचा उपदेश ऐकण्यास पात्र होतात."[३] आचार्यकल्प आशाधरजींनी सुद्धा याला स्पष्ट केले आहे -

"अशाप्रकारे मद्यपान इत्यादि महापापांना आजीवन सोडून विशुद्धि बुद्धी असणारा श्रावक उपनयन संस्कारांनी (यज्ञोपवित) सुसंस्कृत द्विज होऊन जिनधर्म ऐकण्यास योग्य होतो."[४]

सागरधर्मामृतामध्ये पाक्षिक श्रावकाला देवपूजा, दान आणि स्वाध्याय करण्याचा उपदेश दिला आहे.

नैष्ठिक श्रावकाच्या अकरा प्रतिमा - नैष्ठिक श्रावक अप्रत्याख्यानावरण कषायांच्या (तरतमता) कमी जास्तीपणाने दर्शन प्रतिमा इत्यादि अकरा प्रतिमांना धारण करतो व त्याला उत्तम लेश्या प्राप्त होते.[५]

साधक श्रावक केव्हा होतो ? - नैष्ठिक श्रावक अकरा प्रतिमा पाळणारा आणि अकराव्या प्रतिमेचे पालन करताना समाधीमरण प्राप्त करतो. तेव्हा साधक-श्रावक होतो.[६]

## श्रावकाच्या त्रेपन क्रिया

८ मुलगुण, १२ व्रत, १२ तप, १ समता, ११ प्रतिमा, ४ प्रकारचे दान, १ जलगालन, १ रात्री भोजन

---

१. मद्यफलमधुनिशासन पंचफलीविरति पंचकाप्तनुती ।
जीवदया जलगालनमिति च क्वचिदष्टमूलगुणाः ॥१८॥ (सागारधर्मामृत)

२. मद्यमांसमधुत्यागैः सहाणुव्रतपंचकम् ।
अष्टौ मूलगुणनाहुर्गृहिणां श्रमणोत्तमाः ॥ (रत्नकरण्डश्रावकाचार)

३. अष्टावनिष्ट दुस्तर दुरितायतनान्यमूनि परिवर्ज्य ।
जिनधर्मदेशनाया भवन्ति पात्रादि शुद्धधियः ॥ (पुरुषसिद्ध्युपाय)

४. यावज्जीवमिति त्यक्त्वा महापापानि शुद्धधीः ।
जिनधयर्मश्रुतेर्योग्यः स्यात्कृतोपनयो द्विजैः ॥१९॥ (सागारधर्मामृत)

५. सागारधर्मामृत पृ. ४९३.

६. सागारधर्मामृत पृ. ४९३.

त्याग, ३ दर्शन, ज्ञान आणि चारित्र अशाप्रकारे श्रावकाच्या त्रेपन क्रिया आहेत.[१] ८+१२+१२+१+११+४+१+१+३=५३

## चार आश्रम

[२]"ब्रह्मचारी, गृहस्थ, वानप्रस्थ आणि भिक्षुक असे जैनांचे हे चार आश्रम आहेत असे सप्त उपसकाध्ययन अंगामध्ये सांगितले आहे.

## ब्रह्मचर्य आश्रम

**ब्रह्मचारीचे पाच भेद आहेत.** उपनय, अवलंब, अदीक्षा, गुढ आणि नैष्ठिक.

**उपनय ब्रह्मचारी** - जो मौजीबंधन विधीनुसार गणधर सूत्र (यज्ञोपवित) धारण करून उपासकाध्ययन इत्यादि ग्रंथांचा अभ्यास करतो आणि गृहस्थधर्म स्विकार करतो त्याला उपनय ब्रह्मचारी म्हणतात.

**अवलम्ब** - क्षुल्लक अवस्थेत सर्व शास्त्रांचे अध्ययन जे करतात त्यांना अवलम्ब ब्रह्मचारी म्हणतात.

**अदीक्षा** - जे ब्रह्मचारी वेष धारण न करता शास्त्रांचा अभ्यास करतात व नंतर गृहस्थधर्म स्विकारतात त्यांना अदीक्षा ब्रह्मचारी म्हणतात.

**गूढ ब्रह्मचारी** - जे बाल्यावस्थामध्ये गुरूंच्या जवळ राहून शास्त्रांचे अध्ययन करतात. नग्न राहून संयम पाळतात (परंतु दीक्षा घेतली नाही) पुन्हा काही कारणवश गृहस्थाश्रमामध्ये प्रवेश करतात त्यांना गूढ ब्रह्मचारी म्हणतात.

**नैष्ठिक** - जो व्रताचे चिन्ह शिरोलिंग (चोटी) उरोलिंग (जनेउ) कटिलिंग (लंगोटी) धारण करतो. नेहमी भिक्षा मागून भोजन करतो. जो स्नातक किंवा व्रती आहे. नेहमी जिनपूजा करण्यासाठी तत्पर असतो त्याला नैष्ठिक ब्रह्मचारी म्हणतात.

**विशेष** - ह्या चार आश्रमांमध्ये सर्वात प्रथम ब्रह्मचर्याश्रम सांगितला आहे याचा अभिप्राय असा आहे की कोणी कुमार काळामध्ये ब्रह्मचर्य आश्रमात प्रवेश करतो. अर्थात गुरूकुल इत्यादि ठिकाणी राहून यज्ञापवित संस्कारांनी सुसंस्कृत होऊन शास्त्रांचा अभ्यास करतो जर त्याची इच्छा झाली तर मुनि होतो जसे भद्रबाहु श्रुतकेवली आणि जिनसेनाचार्य यांचे उदाहरण आहे. कोणी गृहस्थाश्रमांमध्ये प्रवेश करतो जसे जीवंधरकुमार इत्यादि.

यानंतर दुसऱ्या आश्रमाचे वर्णन आहे.

## गृहस्थ आश्रम

**गृहस्थांचे सहा प्रमुख कर्म होतात** - इज्या, वार्ता, दत्ति, स्वाध्याय, संयम आणि तप.

**इज्या** - अरहंत देवाच्या पूजेला इज्या म्हणतात. **इज्याचे ५ प्रकार आहेत.** नित्यमह, चतुर्मुख, कल्पवृक्ष, आष्टानिक आणि इंद्रध्वज.

**नित्यमह** - प्रतिदिन शक्तिनुसार आपल्या घरून गंध, अक्षत, पुष्प इत्यादि नेऊन अर्हंत देवाची पूजा

---

१. गुणवयतवसमपडिमा, दाणं जलगालणं च अणत्थमियं ।
दंसणणाणचरित्तं किरिया तेवण्ण सावया भणिया ॥१३७॥ (रयणसार गाथा १३७)

२. ब्रह्मचारी, गृहस्थश्च, वानप्रस्थश्च भिक्षुकः ।
इत्याश्रमास्तु जैनानां, सप्तमांगाद्विनिःसृताः ॥ (चारित्रसार पृ. ४१)

करणे, जिनमंदिर, जिनप्रतिमा निर्माण करणे, मुनींची पूजा करणे इत्यादि.

**चतुर्मुख** - मुकुटबद्ध राजांद्वारा जी पूजा केली जाते त्याला चतुर्मुख म्हणतात. यालाच महाभद्र, सर्वतोभद्र सुद्धा म्हणतात.

**कल्पवृक्ष** - सर्व याचकांना इच्छानुसार दान देऊन चक्रवर्ती द्वारा जी पूजा होते त्याला कल्पवृक्ष पूजा म्हणतात.

**आष्टान्हिक** - नन्दीश्वर पर्वामध्ये जी पूजा केली जाते ती आष्टान्हिक पूजा होय.

इंद्रध्वज - इन्द्र, प्रतीन्द्र इत्यादि जी पूजा करतात ती इंद्रध्वज पूजा आहे.

[1]"शास्त्रसारसमुच्चय मध्ये पूजा दहा प्रकारची सांगितली आहे -

देव-इंद्राद्वारा जी पूजा केली जाते ती पूजा **'महाभद्र'** आहे.

इंद्र जी पूजा करतात ती **'इंद्रध्वज'** पूजा मानली जाते.

चार प्रकारच्या देवांकडून जी पूजा केली जाते ती **'सर्वतोभद्र'**.

चक्रवर्ती जी पूजा करतात तिला **'चतुर्मुख'** पूजा म्हणतात.

विद्याधरांद्वारा केली जाणारी पूजा **'रथावर्तन'** आहे.

महामण्डलीक राजे जी पूजा करतात ती **'इंद्रकेतु'** पूजा आहे.

महामण्डलेश्वर **'महापूजा'** करतात.

अर्धमण्डलेश्वर जी पूजा करतात तिला **'महामहिम'** पूजा म्हणतात.

नंदीश्वर द्वीपामध्ये कार्तिक, फाल्गुन, आषाढ, महिन्यांमध्ये इंद्राद्वारा जी पूजा होते तिला **'आष्टान्हिक'** पूजा म्हणतात.

स्नान केल्यानंतर शुद्ध वस्त्र धारण करून अष्टद्रव्यांनी प्रतिदिन मंदिरात जाऊन जिनपूजा करणे **'दैनिक पूजा'** आहे.

मंदीर निर्माण करण्यासाठी, प्रतिष्ठा करण्यासाठी, जीर्णोद्धारासाठी जमीन वगैरेचे दान, पूजाचे उपकरण इत्यादि देणे हे सर्व दैनिक पूजेमध्ये सम्मिलित आहे आणि अजून सुद्धा पूजाचे विशेष भेद आहेत.

**वार्ता** - असि-तलवार इत्यादि शस्त्र, मसि - लिखाणाचे काम, कृषि - शेती, वाणिज्य - व्यापार, विद्या - शिक्षा देऊन अजिविका करणे आणि शिल्प - कला-कौशल्य इत्यादीने आजीविका करणे. यांपैकी कोणत्याही साधनाने धन अर्जित करणे वार्ता आहे.

**दत्ति** - दान देणे याला दत्ति म्हणतात.

**दत्तिचे चार भेद आहेत** - दयादत्ति, पात्रदत्ति, समदत्ति आणि सकलदत्ति.

**दयादत्ति** - दुःखी प्राण्यांना दयापूर्वक अभयदान देणे.

**पात्रदत्ति** - रत्नत्रय धारण करणाऱ्या मुनींना नवधा भक्तिपूर्वक आहार देणे आणि ज्ञान व संयमाचे उपकरण शास्त्र, पिंछी, कमण्डलु इत्यादी देणे. औषधदान, वसतिका (राहण्यासाठी जागा) दान देणे.

**समदत्ति** - आपल्या सारखेच ज्यांचे आचरण आहे अशा गृहस्थांना कन्या, भूमि, सुवर्ण इत्यादि देणे.

**सकलदत्ति** - आपल्या स्वतःची संतान परंपरा कायम ठेवण्यासाठी आपल्या पुत्रास किंवा दत्तक पुत्रास धन व धर्म समर्पण करणे सकलदत्ति आहे. यालाच अन्वयदत्ति सुद्धा म्हणतात.

१. 'तत्रेज्या दशविदधाः' ॥२६॥ शास्त्रसार स० पृ० २१५.

**स्वाध्याय** - तत्त्वज्ञानास वाचणे, शिकविणे आणि त्याचे स्मरण करणे 'स्वाध्याय' आहे.

**संयम** - पाच अणुव्रत पाळण्याची आपली वृत्ति करणे याला संयम म्हणतात.

**तप** - उपवास वगैरे बारा प्रकारची तपश्चर्या करण्यास तप म्हणतात.

ह्या षट्कर्मांचे पालन करणाऱ्यांस गृहस्थ म्हणतात. गृहस्थ दोन प्रकारचे होतात. जाति क्षत्रिय आणि तीर्थ क्षत्रिय.

चार वर्णांपैकी क्षत्रिय वर्णामध्ये जन्म घेणाऱ्यास जाति क्षत्रिय आणि तीर्थंकर, नारायण, चक्रवर्ती इत्यादींना तीर्थ क्षत्रिय म्हणतात.

## वानप्रस्थ आश्रम

जे दिगंबर रूप धारण न करता खंडवस्त्र धारण करतात अर्थात क्षुल्लक, ऐलक अवस्थांमध्ये राहतात. त्यांना वानप्रस्थ म्हणतात.

## भिक्षुक आश्रम

**भिक्षुक** - भगवान् अरिहंत देवाच्या दिगंबर अवस्थेस धारण करणाऱ्यास 'भिक्षु' म्हणतात.

**भिक्षु चार प्रकारचे होतात** - अनगार, यति, मुनि आणि ऋषि.

साधारण साधुंना **'अनगार'** म्हणतात.

जे उपशम श्रेणी आणि क्षपक श्रेणीमध्ये विराजमान आहेत त्यांना **'यति'** म्हणतात.

अवधि, मनःपर्याय आणि केवलज्ञान ज्यांना आहे त्यांना **'मुनि'** म्हणतात.

ज्यांना अनेक ऋद्धियाँ प्राप्त झाल्या आहेत त्यांना **'ऋषि'** म्हणतात.

**ऋषिंचे चार भेद आहेत.** राजर्षि, ब्रह्मर्षि, देवर्षि आणि परमर्षि.

ज्यांना विक्रियाऋद्धि आणि अक्षीण ऋद्धि प्राप्त झाली आहे त्यांना **'राजर्षि'** म्हणतात.

बुद्धी आणि औषधी ऋद्धि ज्यांच्याजवळ आहे त्यांना **'ब्रह्मर्षि'** म्हणतात.

आकाशगामिनी ऋद्धि प्राप्त करणाऱ्यांस **'देवर्षि'** आणि केवलज्ञानी जे आहेत त्यांना **'परमर्षि'** म्हणतात. ह्या चार आश्रमाचे वर्णन चरित्रसार ग्रंथाच्या आधारे घेतले आहे.

## श्रावकाचे चार धर्म

श्रावकधर्म चार प्रकारचा आहे. पूजन, दान, शील व उपवास.[१]

देव, शास्त्र, गुरू यांची विधिवत् अष्टद्रव्याने अर्चना करणे **'पूजन'** आहे.

आपल्या आणि दुसऱ्यांच्या उपकारासाठी आहार आणि पदार्थांचा त्याग केल्या जातो ते **'दान'** आहे. आपण घेतलेल्या व्रतांची रक्षा करणे हे **'शील'** आहे. अष्टमी, चतुर्दशी, पंचमीला पंचेंद्रियांच्या विषय कषायांचा आणि चार प्रकारच्या आहाराचा त्याग करणे याला **उपवास** म्हणतात. फक्त पाणी पिणे याला **'अनुपवास'** आणि एक वेळा भोजन करणे याला **'एकासन'** म्हणतात.

---

१. श्रावकधर्मश्चतुर्विधः ॥२२॥ शास्त्रसार स० पृ० २१४.

## श्रावकाच्या सहा आवश्यक क्रिया

जो[१] देवपूजा, गुरूची उपासना, स्वाध्याय, संयम, तप आणि दान हे सहा षट्कर्म करण्यामध्ये तल्लीन राहतो. ज्याचे कुळ उत्तम आहे तो चूली (चूल पेटविणे) उखली, (कांडणे) चक्की, (दळणे) बुहारी (लिपणे) इत्यादी गृहस्थाच्या सहा आरंभिक क्रियांपासून मुक्त राहतो. अर्थात ह्या क्रियांमुळे होणाऱ्या पापाचा बंध त्याला होत नाही. म्हणून त्याला उत्तम श्रावक म्हणतात.

जो भव्य जीव **बिंबाफळा**समान (कुंदरुफळ) वेदी बनवून त्यात जौ प्रमाण प्रतिमा विराजमान करतो तो निर्वाणाच्या जवळ पोहोचतो.

पूर्व किंवा उत्तर दिशेला तोंड करून कपाळाला तिलक लावून पूजा केली पाहिजे.

शुद्ध[२] जल, इक्षुरस, तूप, दूध, दही, आम्ररस, सर्वोषधि आणि **कलकचूर्ण** इत्यादीने भाव भक्ति-पूर्वक भगवान जिनेंद्राचा अभिषेक केला पाहिजे.

खंडित वस्त्र, जीर्ण झालेले, फाटलेले आणि मळलेले वस्त्र घालून दान, पूजन, जप, होम आणि स्वाध्याय केला नाही पाहिजे. कारण खंडित वस्त्र इत्यादि वस्त्रांना घालून पूजन केल्याने त्याचे फळ मिळत नाही.

**प्रश्न** - पुष्प, धूप, दीप, फल इत्यादि सचित्त द्रव्यांनी भगवंताची पूजा केल्याने पाप संभव आहे कां ?

**उत्तर** - जी जिनपूजा असंख्य भवांचे पाप नष्ट करण्यास समर्थ आहे त्या पूजेच्या निमित्ताने होणारे यत्‌किंचित् पाप नष्ट होणार नाही काय ? अवश्य होईल. प्रत्येक कार्यामध्ये यत्नाचारपूर्वक प्रवृत्ति असली पाहिजे.

'कुटुंब पोषण आणि भोगोपभोगासाठी केलेला आरंभ पाप उत्पन्न करतो परंतु दान, पूजा इत्यादि धर्म कार्यांसाठी केलेला आरंभ पापबंधास कारणीभूत होत नाही.'[३]

जो[४] मनुष्य सांबाराच्या पानाइतके जिनभवन बनवून त्यात सरसोएवढी जिनप्रतिमा स्थापन करतो तो तीर्थंकर पदासाठी योग्य असे पुण्य प्राप्त करतो. जेव्हा कोणी अतिशय सुंदर आणि विशाल जिनमंदीर तोरणद्वारांनी वगैरे सजवून बनवितो त्याचे फळ कोणते आहे याचे वर्णन करण्यास कोण समर्थ आहे ?

पूजा करताना जिनेंद्र भगवंतांच्या समोर जलधारा सोडल्याने पाप क्षणात नष्ट होते.

भगवंतास चंदनाचा लेप केल्याने मनुष्य सुखसंपन्न होतो.

अक्षताने पूजा केल्याने मनुष्य अक्षय नौ निधी आणि चौदा रत्नांचा स्वामी चक्रवर्ती होतो. त्याला अक्षीण लब्धि आणि मोक्षसुख प्राप्त होते.

पुष्पांनी पूजा करणारा मनुष्य कमळासमान सुंदर मुख असणारा, फुलांच्या सुंदर माळांप्रमाणे सुगंधित शरीर असलेला कामदेव होतो.

नैवेद्य चढविल्याने शक्तिमान, कांतीमान आणि तेजस्वी होतो.

दीप लावून - कापूर लावून पूजा केल्याने मनुष्य केवलज्ञानरूपी प्रदीपाच्या तेजाने समस्त जीवादि तत्त्वांचे रहस्य प्रकाशित करणारा केवली होतो.

---

१. देवपूजादिषट्कर्मनिरतःकुलसत्तमः ।
आद्यषट्कर्मनिर्मुक्तः श्रावकः परमो भवेत् ॥९४॥ उमास्वामी श्रावकाचार पृष्ठ ३५

२. शुद्धतोयेक्षुसर्पिभिर्दुग्धदध्याम्रजैः रसैः ।
सर्वोषधिभिरुच्चूर्णैर्भावात् संस्नापयेज्जिनम् ॥१३४॥ उमास्वामी श्रावकाचार पृष्ठ ५३

३. उमास्वामी श्रावकाचार, पृष्ठ ५७

४. वसुनन्द्रिश्रावकाचार, पृष्ठ १४५

धूपाने पूजा करणारा त्रैलोक्यांत यश प्राप्त करतो.

उत्तम उत्तम फळांनी पूजन करणारा मनुष्य परम निर्वाणरूप फळाची प्राप्ती करून घेतो.

जिनमंदिरांमध्ये घंटा वाजविल्याने जे शब्द-ध्वनी निघतात त्या शब्दध्वनींनी व्याप्त अशा श्रेष्ठ सुर-विमानांमध्ये जन्म घेतो.

मंदिरांमध्ये छत्र दान केल्याने पृथ्वीवर एकछत्र राज्य भोगतो.

चंवर दान दिल्याने त्या मनुष्यांवर चँवर घातल्या जातात.

जिनभगवानचा अभिषेक केल्याने मनुष्य सुदर्शन मेरू पर्वतावर क्षीरसागरातील जलाने इंद्रद्वारा अभिषेक करण्यास योग्य होतो.

जिनमंदिरात विजय पताका दान दिल्याने सर्वत्र विजयी षट्खण्डाधिपति चक्रवर्ती होतो.

अधिक काय सांगणार ? जिनपूजनाच्या फळाने संसारातील सारे सुख प्राप्त होतात आणि परंपरानुसार मोक्षप्राप्ती होते.

अशाप्रकारे संक्षेपाने 'देवपूजा' नावाच्या आवश्यक क्रियेचे वर्णन झाले.

## गुरूची उपासना

आपले[१] मनोवांछित पदार्थ प्राप्त करण्यासाठी, ह्या लोकासंबंधी समस्त संशयरूपी अंधकार दूर करण्यासाठी आणि परलोकामध्ये सुख प्राप्त करण्यासाठी गुरूंची सेवा नेहमी केली पाहिजे.

उत्तम, मध्यम, जघन्य कोणत्याही प्रकारचे मनुष्य गुरूंशिवाय मनुष्य होऊ शकत नाही. म्हणून प्रत्येक मनुष्याला सर्वोत्कृष्ट गुरूंची सेवा नेहमी केली पाहिजे.

"गुरू[२] भक्ति रूपी संयमाने घोर संसार समुद्र पार केल्या जातो. अष्टकर्मांचा नाश होतो. पुनरपि जन्म, पुनरपि मरण या दुःखापासून मुक्त होतो.

## स्वाध्याय

स्वाध्याय भव्य जीवांना ज्ञान देणारा आहे. त्याचे ५ भेद आहेत. वाचणे, शिकणे, शिकविणे, पृच्छना प्रश्न करणे, अनुप्रेक्षा - जे वाचले आहे त्याचे नेहमी चिंतन करणे. आम्नाय - शुद्ध पाठ करणे आणि धर्मोपदेश - धर्माचा उपदेश देणे.

## संयम

इंद्रीय आणि मन यांच्यावर नियंत्रण ठेवणे, जीवदया पाळणे यालाच संयम म्हणतात. संयमाचे दोन भेद आहेत. इंद्रीय संयम आणि प्राणि संयम.

पंचेंद्रिय विषयांचा त्याग करणे आणि मनाला स्थिर ठेवणे इंद्रिय संयम आहे. पाच स्थावर आणि त्रसकाय, तसेच षटकाय जीवांवर दया करणे प्राणिसंयम आहे.

---

१. 'गुरुसेवा विधातव्या मनोवांछितसिद्धये ।
संशयध्वांतनाशार्थमिहापुत्र सुखाय च' ॥१८३॥ उमा० श्रा० पृ० ७१।

२. 'गुरुभत्तिसंजमेण य तरंति संसारसायरं घोरं ।
छिण्णंति अट्ठकम्मं जम्मणमरणं ण पावेंति' ॥

## तप

कर्मांची निर्जरा करण्यासाठी तप केले जाते. तपाचे दोन भेद आहेत - बाह्य आणि आभ्यंतर. बाह्य तपाचे सहा प्रकार आहेत. अनशन - उपवास करणे, अवमौदर्य - भुखेपेक्षा कमी खाणे. व्रतपरिसंख्यान - घर, गली किंवा अन्य पदार्थांचा नियम घेऊन आहार ग्रहण करणे. रसपरित्याग - तूप, दूध इत्यादि रसांपैकी एक रस किंवा सर्व रसांचा त्याग करणे.

विविक्त शय्यासन - एकांत स्थानी गुरूंच्या सान्निध्यात शयन-आसन करणे.

कायक्लेश - कुक्कुट आसन, पद्मासन, खड्गासन प्रतिमायोग इत्यादिंनी ध्यान करणे.

आभ्यंतर तपाचे सहा प्रकार आहेत.

प्रायश्चित - व्रत इत्यादींमध्ये दोष लागल्यानंतर गुरूंजवळून त्याचा दंड घेणे.

विनय - रत्नत्रय धारण करणाऱ्यांचा विनय करणे.

वैयावृत्य - आचार्य, उपाध्याय, साधु इत्यादि व्रतीजनांची सेवा करणे.

स्वाध्याय - शास्त्रांचे वाचन, त्यांना पाठ करणे इत्यादि.

व्युत्सर्ग - पापांना कारणीभूत कारणांचा त्याग करणे.

ध्यान - पिण्डस्थ, पदस्थ, रूपस्थ, रूपातीत इत्यादि प्रकारचे ध्यान करणे.

अशा बारा प्रकारच्या तपांचे एक देशरूप शक्तीनुसार श्रावकांनी अनुष्ठान केले पाहिजे. प्रामुख्याने याचे अनुष्ठान मुनीच करतात.

## दान

स्व आणि दुसऱ्यांच्या अनुग्रहासाठी धनाचा त्याग करणे हे दान आहे.

**दानाचे चार भेद आहेत** - आहार दान, ज्ञानदान, औषधिदान, अभयदान.

उत्तम पात्रांना ह्या चारही दानाचे दान देणे उत्तम दान आहे.

अशाप्रकारे जो गृहस्थ श्रावक ह्या सहा आवश्यक क्रिया आदरपूर्वक करतो तो चक्की, उखळ, चूल पेटविणे, बूहारी (लिपणे) आणि पाणी भरणे ह्या गृहस्थाच्या आरंभ पापांपासून आणि धन कमविणे ह्या सहाव्या पापापासून मुक्त होतो.

अशाप्रकारे उमास्वामी श्रावकाचारच्या अनुसार ह्या सहा आवश्यक क्रियांचे वर्णन केले आहे.

श्री कुंदकुंद स्वामी 'रयणसार'[1] मध्ये म्हणतात की, सुपात्रास चार प्रकारचे दान देणे, देव, गुरू, शास्त्र यांची पूजा करणे हे श्रावकधर्मामध्ये श्रावकाचे दोन प्रमुख कर्तव्य आहेत. ह्या दोन कर्तव्यांशिवाय श्रावक होऊ शकत नाही. मुनींच्या कर्तव्यामध्ये ध्यान आणि अध्ययन हे दोन प्रमुख कर्तव्य आहेत. ह्या दोन कार्यांशिवाय मुनि, मुनि होऊ शकत नाही.

पूजेच्या फलाने मनुष्य तीनही लोकांमध्ये पूज्य मानल्या जातो. आणि सुपात्रास दान दिल्याने, जे पुण्य फलप्राप्त होते त्याने तिन्ही लोकांतील उत्तम सुखांना भोगतो.

---

१. दाणं पूजा मुक्खं सावयधम्मे ण सावया तेण विणा ।
झाणाझयणं मुक्खं जइधम्मं ण तं बिना तहा सोवि ॥११॥

भोजन, आहारदान दिल्यानेच श्रावक धन्य होतो. त्याला पंचाश्चर्य प्राप्त होतात. देवतांकडून पूज्य मानल्या जातो.[१] एक जिनलिंग पाहून आहारदान दिले पाहिजे. अशावेळेस पात्र-अपात्रची परीक्षा करण्याचे काहीच प्रयोजन नाही.

"जो भव्य जीव मुनीश्वरांच्या आहारदानानंतर शिल्लक राहिलेल्या अन्नास प्रसाद समजून ग्रहण करतो तो संसारातील सारभूत उत्तम सुख प्राप्त करतो आणि क्रमाने मोक्षास जातो" असे जिनेंद्र देवांनी सांगितले आहे.[२]

"ह्या भरतक्षेत्रामध्ये अवसर्पिणीच्या पंचम काळामध्ये मुनींना प्रमादाशिवाय धर्मध्यान होते असे जिनवचन आहे. हे जो मानत नाही तो मिथ्यादृष्टी आहे."[३]

आजसुद्धा रत्नत्रयाने शुद्ध साधु आत्म्याचे ध्यान करून इंद्रपद प्राप्त करतात. लौकांतिक पद सुद्धा प्राप्त करून घेतात आणि तेथून पुन्हा पद सोडून मोक्षास जातात अर्थात एक भवावतारी होतात.[४]

'श्री देवसेन रचित भावसंग्रहामध्ये पंचम गुणस्थानाच्या प्रकरणामध्ये शिक्षाव्रतांचे वर्णन करताना सामायिक व्रताचे वर्णन केले आहे की -

तिन्ही काळांमध्ये[५] अरिहंत भगवंताची स्तुती करणे, पर्वा-पर्वांमध्ये प्रोषधोपवास करणे, अतिथींना दान देणे आणि सल्लेखना मरण करणे.

श्री वामदेव विरचित भावसंग्रहामध्ये पंचम गुणस्थानाचे वर्णन करताना शिक्षाव्रतामध्ये प्रथम सामायिक विधीचे वर्णन खालीलप्रमाणे केले आहे -

'प्रतिदिन[६] त्रिकाळ जिनपूजापूर्वक श्रावकांस सामायिक केले पाहिजे' कारण 'जिनपूजा'[७] शिवाय सामायिक क्रिया होऊ शकत नाही. याचे संक्षिप्त वर्णन अशाप्रकारे -

प्रातःकाळी उठून शौच, आचमनपूर्वक प्रभातिक सर्व विधि केल्या पाहिजेत. शुद्ध जलाने स्नान करून मंत्रस्नान आणि व्रतस्नान असे तीन स्नान केले पाहिजे. धुतलेले शुद्ध वस्त्र नेसून जिनमंदीरामध्ये निःसही - निःसही मंत्र उच्चारत प्रवेश केला पाहिजे. ईर्यापथ शुद्धी करून जिनेंद्र भगवंताचे स्तवन केले पाहिजे. पुनः बसून सकलीकरण विधि केली पाहिजे.

पूजापात्र, पूजा द्रव्य इत्यादी शुद्ध करून पंचामृत अभिषेक करावा. पुनः अष्टद्रव्याने पूजा करून अर्घ्य द्यावे. नंतर शांतीधारा व पुष्पांजली क्षेपण करावे. पूजन करताना अष्टद्रव्याने पूजा, अर्घ्यानंतर शांतिधारा व पुष्पांजली क्षेपण केले पाहिजे.[८] असे शास्त्रात सांगितले आहे.

---

१. दाणं भोयणमेत्तं दिण्णइ धण्णो हवेइ सायारो ।
पत्तापत्तविसेसं संदसणे किं वियारेण ॥१५॥ रयणसार ।

२. जो मुणिभुत्तवसेसं भुंजइ सो भुंजए जिणुवदिट्ठं ।
संसारसारसोक्खं कमसो णिव्वाणवरसोक्खं ॥२२॥

३. भरहे दुस्समकाले धम्मज्झाणं हवेइ साहुस्स ।
तं अप्पसहावठिदे ण हु मण्णइ सो वि अण्णाणी ॥७६॥

४. अज्जवि तिरयणसुद्धा अप्पा झाएवि लहइ इंदत्तं ।
लोयंत्तिय देवत्तं तत्थ चुदा णिव्वुदिं जंति ।.७७॥ (मोक्षपाहुड़ पृ० २७५)

५. देवे थुवइ वियाले पव्वे सुपोसहोवासं ।
अतिहीणं संविभागे मरणंते कुणइ सल्लिहहणं ॥३५५॥ (भावसंग्रह पृ० ८१)

६. सामायिकं प्रकुर्वीत कालत्रये जिनं प्रति ।
श्रावको हि जिनेन्द्रस्य जिनपूजा पुरःसरम् ॥४६३॥ (भावसंग्रह वामदेवकृत पृ० १९५)

७. 'जिनपूजा बिना सर्वा दूरा सामायिकी क्रिया ?' (भावसंग्रह, वामदेवकृत पृष्ठ १९५)

८. अर्घ्य दिल्यानंतर शांतिधारा आणि पुष्पांजली क्षेपण करण्याची प्रथा दक्षिणमध्ये सर्वत्र आहे. उत्तरमध्ये प्रायः कमी आहे.

पुनः आपल्या रुचिनुसार एक या दोन पूजा करून पंच नमस्कार मंत्राने १०८ फुलांनी किंवा लवंगांनी जाप्य द्यावे. सिद्धचक्र यंत्र इत्यादि यंत्राची पूजा जाप्य इत्यादि करून चैत्यभक्ती आणि पंचगुरूभक्ती म्हणावी. शांतिभक्ती, समाधी भक्ती म्हणून विसर्जन विधी करावी. त्यानंतर अंतर्मुहूर्त पर्यंत किंवा जितका वेळ असेल तेवढ्या काळात शुद्ध चित्ताने आपल्या शुद्ध आत्म्याचे ध्यान करावे.

नंतर श्रुतपूजा, गुरूपूजा करून आर्यिका आणि ऐलक इत्यादींची विधिवत् पूजा करावी.

अशाप्रकारे श्रावकाची सामायिक विधी आहे. विशेष संहिताशास्त्र आणि प्रतिष्ठा शास्त्रामध्ये हीच विधी नित्य पूजनविधीमध्ये सांगितली आहे. मतलब असा आहे की जर श्रावक ह्या विधीनुसार पूजन करतो तर सामायिक विधी त्यातच सम्मिलित आहे. म्हणून त्याची सामायिक विधी सुद्धा त्यालाच म्हणतात. 'सामायिक'[1] नावाच्या पुस्तकांमध्ये 'पूजा मुखविधी' आणि 'पूजा अन्त्यविधि' मध्ये विधी करण्याचे स्पष्टीकरण आहे. श्रावकाच्या पूजाविधीमध्ये सर्वात प्रथम इर्यापथशुद्धि आणि सिद्धभक्ति केली पाहिजे. नंतर विधिवत् पंचामृत अभिषेक आणि अष्टद्रव्यांनी पूजा करून चैत्यभक्ति, पंचगुरुभक्ति आणि शांतिभक्ति केली पाहिजे. हीच विधी श्री पूज्यपाद स्वामीकृत पंचामृताभिषेक पाठामध्ये सांगितली आहे.

## तृतीय अतिथी संविभाग व्रतांमध्ये दानाचे वर्णन -

पात्र, दातार, दानविधी, दातव्य - देण्यास योग्य पदार्थ आणि दानाचे फळ हे पांच अधिकार होतात.

**पात्राचे तीन भेद होतात** - उत्तम, मध्यम आणि जघन्य, रत्नत्रयधारी निर्ग्रंथ दिगंबर साधु उत्तम पात्र आहे. अकरा प्रतिमांपैकी कोणतीही प्रतिमा असलेला श्रावक मध्यम पात्र आहे आणि अविरत सम्यग्दृष्टी जघन्य पात्र आहे.

जप, तप इत्यादीने सहित परंतु सम्यक्त्वाने रहित सर्व कुपात्र आहेत. सम्यक्त्व, शील आणि व्रत यांनी रहित जीव अपात्र आहेत.

**दाताराचे गुण** - श्रद्धा, भक्ति, संतोष, विज्ञान, अलुब्धता, क्षमा आणि शक्ति हे सात गुण आहेत.

**दानविधि** - प्रतिग्रह - पडगाहन करणे, उच्चस्थान देणे, पाद प्रक्षालन करणे, पूजा करणे, नमस्कार करणे, मनःशुद्धि वचन शुद्धि, कायशुद्धि आणि भोजनशुद्धि म्हणणे याला नवधा भक्ति म्हणतात. ही नवधाभक्ति झाल्याशिवाय उत्तम साधु आहार घेत नाहीत.

**दातव्य वस्तु** - आहार, औषधी, शास्त्र आणि अभयदान हे देण्यायोग्य आहेत.

**दानाचे फळ** - 'सम्यग्दृष्टी'[1] द्वारा पात्रांना दिलेले दान स्वर्ग, मोक्ष प्राप्त करून देते. कुपात्रास दिलेले दान फळ देत नाही. एवढेच नाही तर अपात्रांना दिलेले दान अत्यंत दुःख देणारे आहे.

**गृहस्थ धर्म धारण करणाऱ्या पुरुषाचे लक्षण** - "न्यायपूर्वक[2] धन कमविणारा, गुरू-माता-पिता यांचा सन्मान करणारा, गुरूंची आणि मुनींची पूजा करणारा, सत्यवचन बोलणारा, परस्पर विरोध रहित धर्म, अर्थ आणि काम ह्या तीन वर्गांना पाळणारा, तीन पुरुषार्थास योग्य स्त्री, ग्राम आणि घर ज्यांचे आहे असा लज्जाशील, शास्त्रोक्त योग्य असा आहार व विहार करणारा, आर्य पुरुषांची संगती करणारा, बुद्धीमान, दुसऱ्यांद्वारा केलेले उपकार मानणारा, इंद्रीयांना वशीभूत करणारा, धर्मविधी ऐकणारा, दयाळू आणि पापांनी भयभीत होणारा

---

१. वसुनन्दि श्रावकाचार ।

२. "न्यायोपात्तधनो यजन् गुणगुरून् सद्गीस्त्रिवर्ग भजन्
अन्योन्यानुगुणं तदर्हगृहिणी स्थानालयो ह्रीमयः ।
युक्ताहारविहार आर्यसमितिः प्राज्ञः कृतज्ञो वशी
शृण्वन् धर्मविधिं दयालुरघभीः सागारधर्मं चरेत् ॥११॥ सागारधर्मामृत, पृ० २० ।

पुरुषच गृहस्थधर्म धारण करण्यास योग्य आहे.

## सूतक[१] - पातक वर्णन

बालकाचा जन्म झाल्यावर त्याच्या घरांतील लोकांना आणि कुटुंबातील लोकांना काही काळपर्यंत देवपूजा, आहारदान इत्यादि कामे करता येत नाही. यालाच 'सूतक' म्हणतात. आणि अशाच प्रकारे कोणी वारल्यानंतर अशौच होतो त्याला 'पातक' हे नाव दिले आहे. हे सूतक-पातक आर्ष ग्रंथांनी मान्य आहे. व्यवहारात जन्म झाल्यावर जे अशौच त्याला 'विंधी' आणि मरणानंतरच्या अशौचास 'सूतक' म्हणतात.

जाति बांधवांमध्ये प्रत्यासन्न आणि अप्रत्यासन्न असे दोन भेद आहेत. चार पिढीपर्यंतचे बंधुवर्ग प्रत्यासन्न किंवा समीपस्थ म्हटल्या जातात. याच्या पुढचे अप्रत्यासन्न आहेत.

जन्माचे सूतक (विंधी) चार पिढीपर्यंत १० दिवसाचे आहे. पाचव्या पिढीला ६ दिवस, सहाव्या पिढीला ४ दिवस आणि सातव्या पिढीला ३ दिवस असे आहे. सातव्या पिढीच्या पुढे सूतक नाही. असेच मरणाचे सूतक चार पिढीपर्यंत १० दिवसाचे, पाचव्या पिढीला ६ दिवसाचे, सहाव्या पिढीला ४ दिवस आणि सातव्या पिढीला ३ दिवस मानावे.

**जन्माचे सूतक** (विंधी) चालू असतानाच जर मरणाचे सूतक आले तर ते जन्माच्या सूतकाबरोबर समाप्त होते. असेच मरणाचे सूतक चालू असतानाच जन्माचे सूतक आले तर मरणाच्या सुतकांबरोबरच समाप्त होते. तसेच जन्माचे सूतक जर ५-६ दिवसाचे झाले व पुनः परिवारात कोणाचा जन्म झाला तर ते सूतक पहिल्या सूतकांबरोबरच समाप्त होते. जर पहिल्या सूतकाच्या शेवटच्या दिवशी जर पुनः कोणाचा जन्म झाला तर दोन दिवस अजून ते सूतक मानले पाहिजे. सूतक संपल्यानंतर दुसऱ्या दिवशी जर कोणाचा जन्म झाला तर तीन दिवस अजून सूतक मानावे.

तपस्वींना जन्म आणि मरणाचे सूतक लागत नाही आणि तपस्वींना मरण आल्यानंतर त्याचे सूतक त्यांच्या परिवारातील लोकांना लागत नाही. राजाच्या घरी पुत्र झाल्यानंतर शुद्धी केवळ स्नान केल्याने होते. राजांना सूतक लागत नाही.

मंत्री, सेनापती, राजा, दास आणि दुर्भिक्ष इत्यादी आपत्तींनी लोक मेल्यानंतर त्याचे सूतक लागत नाही. विष, शस्त्र, विद्युत्पात इत्यादीने मृत झाल्यावर सुद्धा आणि युद्धांत मरण आल्यानंतर सुद्धा सूतक लागत नाही.

गर्भवती स्त्रीचा तीन महिन्यापूर्वी जर गर्भपात होतो तर त्याचा तिलाच तीन दिवसांचा अशौच आहे. तीन महिन्यानंतर सहा महिन्यापर्यंत जर गर्भपात झाला तर गर्भ जितक्या महिन्याचा असेल तितक्या दिवसाचा तिलाच अशौच आहे. सहा महिन्यानंतर आणि आठ महिन्यापर्यंत जर गर्भपात होतो तर त्या मातेस १० दिवसाचा अशौच आहे. आणि पित्यास फक्त शुद्धीसाठी स्नान करणे जरूरी आहे.

नाभि छेदन होण्याच्या आधी जर बालक मरतो तर त्या मातेस पूर्ण १० दिवसाचे सूतक आहे. पिता आणि बांधवांना ३ दिवसाचे सूतक आहे. १० दिवसापूर्वी जर त्याचा मृत्यू होतो तर सर्वांना १० दिवसाचे सूतक आहे. १० दिवस पूर्ण झाल्यानंतर - अर्थात् सूतक (विंधी) संपल्यानंतर जर ११ व्या दिवशी त्या बालकाचा मृत्यू होतो तर २ दिवसाचे सूतक अजून मानले पाहिजे. १२ व्या दिवशी जर प्रातःकाळी तो बालक मरण पावला तर ३ दिवसाचे अजून सूतक मानले पाहिजे. जन्माचे सूतक संपल्यानंतर १० दिवसांनी जर त्याचा मृत्यू झाला तर माता, पिता व कुटुंबातील लोकांना १० दिवसाचा अशौच आहे. इतर बांधवांना केवळ शुद्धीसाठी स्नान करणे जरूरी आहे. दांत आल्यानंतर जर बालक मरण पावला पिता-भ्राता ह्यांना दहा दिवसाचा

१. हे सूतक-पातक वर्णन श्री गुणभद्राचार्यकृत त्रैवर्णिकाचार आधाराने लिहिले आहे.

अशौच आणि बाकी लोकांना स्नान करणे फक्त आवश्यक आहे. मुंडन केल्यानंतर बालक जर मरण पावला तर पिता आणि बांधवांना १० दिवसाचा, चार पिढीपर्यंतच्या लोकांना ५ दिवसाचा, पुढील पिढीवाल्यांना १ दिवसाचा अशौच पाळला पाहिजे. उपनयन संस्कार झाल्यानंतर जर मरण आले तर चार पिढीपर्यंत १० दिवसाचे सूतक पाळावे लागते.

पुत्रीचे मरण जर मुंडन होण्यापूर्वी झाले तर बांधवांना शुद्धीसाठी केवळ स्नान करणे आवश्यक आहे. व्रतबंध होण्यापूर्वी मृत्यू आला तर १ दिवसाचे सूतक पाळणे आवश्यक आहे. विवाह होण्यापूर्वी मरण आले तर ३ दिवसाचा अशौच आहे. पुत्रीचे विवाहानंतर आपल्या पतिगृही मरण आले तर माता-पिता यांना २ दिवसाचे सूतक सांगितले आहे. बाकी सर्व बांधवांना स्नान केल्याने शुद्धी होईल. पतिपक्षाकडील लोकांना पूर्ण १० दिवसाचे सूतक पाळावे लागेल. जर स्त्री आपल्या माहेरी मरण पावते किंवा प्रसूत होते तेव्हा माता-पिता यांना ३ दिवसाचा अशौच आहे आणि पतीकडील लोकांना १० दिवसाचा अशौच आहे.

दूर देशातील परिवारापैकी कोण्या व्यक्तीचा मृत्यू झाला तर समाचार मिळाल्यानंतर उरलेल्या दिवसांचे सूतक पाळले पाहिजे. जन्म होऊन जर १० दिवस झाल्यानंतर समाचार मिळाला तर तीन दिवसाचे सूतक मानले पाहिजे. १ वर्षानंतर जर मरण समाचार समजला तर फक्त स्नान केले पाहिजे. अशाप्रकारे संक्षिप्त सूतक-पातक विधीचे वर्णन केले आहे.

## रजस्वला स्त्रीचा अशौच

महिना-महिन्याच्या अंतराने जो रजस्त्राव होतो त्यावेळेस ती स्त्री रजस्वला होते. त्या दिवसात तिने कोणत्याही वस्तूस स्पर्श केला नाही पाहिजे. देव आणि गुरू यांचे सुद्धा दर्शन केले नाही पाहिजे. अर्धरात्री नंतर जर स्त्री रजस्वला झाली तर प्रातःकाळापासूनच अशौच मोजावे. रजस्वला स्त्रीने ३ दिवसपर्यंत स्नान-श्रृंगार वगैरे करायला नको. ब्रह्मचर्य पाळले पाहिजे. चतुर्थ दिवशी स्नान केल्यानंतर कामकाज करू शकते. देवपूजा, गुरू उपासना इत्यादी कार्य पाचव्या दिवशी करू शकते.

एक वेळा रजस्वला झाल्यानंतर बारा दिवसाच्या आत जर पुनः रजोदर्शन झाले तर स्नान करून शुद्ध होऊ शकते. अठरा दिवसाच्या पहिले जर रजस्त्राव झाला तर फक्त स्नानाने शुद्ध होऊ शकते. अठराव्या दिवशी रजस्वला झाली तर फक्त २ दिवस अशौच मानले पाहिजे. अठरा दिवसानंतर रजःस्त्राव झाला तर ३ दिवस अशौच मानले पाहिजे. रजस्वला स्त्रीयां आपसात एक दुसरीस स्पर्श करत असेल तर त्यांना चवथ्या दिवशी शुद्ध होऊन गुरूजवळ जाऊन प्रायश्चित्त घेतले पाहिजे असे विधान आहे.

ज्या स्त्रिया रजस्वला दिवसांना पाळत नाही. सगळीकडे लागतात, भोजन तयार करून सर्वांना जेवावयास देतात. त्या स्वास्थ्यहानी बरोबर धार्मिक परंपराची सुद्धा हानी करतात. यामुळे पापसंचय होतो. पुढच्या भवाचे सुद्धा नुकसान होते. अतः महिलांना ह्या तीन दिवसात विवेकपूर्वक अशौच पाळले पाहिजे.

## क्रिया

श्रावकाध्याय संग्रहामध्ये क्रिया तीन प्रकारच्या सांगितल्या आहेत. सम्यग्दृष्टी श्रावकांस ह्या क्रिया अवश्य केल्या पाहिजे कारण ह्या सर्व क्रिया उत्तम फळ देणाऱ्या आहेत.

[१]'गर्भान्वय क्रिया, दीक्षान्वय क्रिया, कर्त्रन्वय क्रिया' अशाप्रकारे विद्वानांनी तीन प्रकारच्या क्रिया मानल्या

१. गर्भान्वयक्रियाश्चैव तथा दीक्षान्वयक्रियाः ।
कर्त्रन्वयक्रियाश्चेति तास्त्रिधैवं बुधैर्मताः ॥ ५१ (आदिपुराण पर्व ३८ पृ० २४४)

आहेत. गर्भान्वय क्रिया (गर्भाधान) त्रेपन आहेत. दीक्षान्वय क्रिया अठ्ठेचाळीस आहेत. कर्त्रन्वय क्रिया सात आहेत. महासागरापेक्षा सुद्धा अपार अशा श्रुतज्ञानाचे बारा अंग आहेत. त्यात उपासकाध्ययन नावाचा सातवा अंग आहे. त्याच्या आधारानुसार -

## त्रेपन गर्भान्वय क्रिया

(१) स्नान[१] करून आलेल्या स्त्रीस प्रामुख्याने गर्भाधानाच्या पहिले अरिहंत देवाची पूजा आणि मंत्रपूर्वक जे संस्कार दिल्या जातात त्याला 'आधान' क्रिया म्हणतात. त्याची विधी - जिन प्रतिमाच्या उजव्या बाजूस, डाव्या बाजूस तीन छत्र आणि तीन प्रकारचा पुण्याग्नि स्थापन करावा. पती, पत्नी दोघांनी अरिहंत भगवंताची पूजा करून, अग्नि कुंडामध्ये होमविधी पूर्ण करावी.

(२) गर्भाधानाच्या तिसऱ्या महिन्यांमध्ये 'प्रीती' नावाची क्रिया होते. ह्या क्रियेमध्ये सुद्धा अरिहंत पूजन केले पाहिजे. दरवाजावर तोरण लावणे व दोन पुर्ण कुंभ स्थापन केले पाहिजे. या दिवसांपासून प्रतिदिन नगारे आणि बाजे वाजविले पाहिजे.

लग्नानंतर प्रथम रजस्वला झालेल्या स्त्रीस ४ थ्या दिवशी स्नान करून शास्त्रोक्त विधीने पतीबरोबर पूजन व होम करावयास सांगितले आहे. नंतर त्या दंपत्तीस विषयानुराग सोडून केवळ संतान उत्पत्तीसाठी समागम करण्यास सांगितले आहे. यालाच गर्भाधान क्रिया म्हणतात.

(३) गर्भाधानाच्या ५ व्या महिन्याधम्ये 'सुप्रिति' क्रिया केली जाते. याची सुद्धा पहिले सांगितल्याप्रमाणे पूजन विधी आहे.

(४) सातव्या महिन्यांमध्ये पूर्वी सांगितलेल्या विधिप्रमाणे 'धृति' क्रिया केली जाते.

(५) गर्भाच्या ९ व्या महिनी 'मोद' नावाची क्रिया केली जाते. या क्रियेमध्ये विद्वान ब्राह्मण गर्भिणीच्या शरीरांवर गात्रिका बंध मंत्रपूर्वक बीजाक्षर लिहितात. कुंकू लावून, ओटी भरून, आभूषण घालून तिच्या रक्षणासाठी कंकणसूत्र बांधतात.

(६) पुत्र उत्पन्न झाल्यावर 'प्रियाद्भव' किंवा जाती कर्म होते.

(७) जन्मानंतर १२ व्या दिवशी शुभ नक्षत्रामध्ये नामकर्मक्रिया केली जाते. ह्या नामकर्म क्रियेमध्ये अरिहंत देवांची साधूंची पूजा केली पाहिजे.

(८) दुसऱ्या किंवा तिसऱ्या महिन्यामध्ये प्रसुतिगृहांतून मंगलवाद्य पूर्वक बालकांस बाहेर काढले पाहिजे. याला 'बर्हियान' क्रिया म्हणतात.

(९) त्या बालकास गादीवर झोपवून 'निषद्याज क्रिया केली जाते.

(१०) जन्माच्या सात-आठ महिन्यानंतर 'देवपूजन' नंतर बालकांस जेवू घालणे 'अन्नप्राशन' क्रिया आहे.

(११) एक वर्ष पूर्ण झाल्यावर वर्षावर्धन किंवा वाढदिवस म्हणतात याला 'व्युष्टि' क्रिया म्हणतात.

(१२) कोणत्याही शुभ दिवशी देवपूजा केल्यानंतर बालकाचे मूळ केस काढणे (मुंडन) ही 'केशवाप' किंवा चौलक्रिया आहे.

(१३) बालकांस पाचव्या वर्षी अक्षरज्ञान करण्यासाठी 'लिपी संख्यान क्रिया' केली जाते.

(१४) गर्भधारण केल्यापासून आठव्या वर्षी बालकाची 'उपनीति क्रिया' (यज्ञोपवित संस्कार) केली जाते.

(१५) समोर कमरेला करधनी, जांघेचे चिन्ह (श्वेत) पांढरे धोतर, उरोलिंग म्हणजे जानवे, शिरोलिंग -

---

१. आधानं नाम गर्भादौ संस्कारों मंत्रपूर्वकः ।
पत्नीं ऋतुमतीं स्नातां पुरसकृत्यार्हदिज्यया ॥७०॥ (आदि पु० पर्व ३८ पृष्ठ संख्या २४५)

चोटी हे सर्व ब्रह्मचर्य व्रताचे चिन्ह धारण करणे ह्यास व्रतचर्या म्हणतात. यामध्ये पलंगावर झोपणे, उबटन लावणे इत्यादींचा त्याग आहे. पाच अणुव्रत इत्यादि व्रत आहेत. विद्याचा अभ्यास चालू असताना ब्रह्मचर्यव्रत पाळणे गुरूंनी सांगितलेले उपासकाचार वाचून अध्यात्मशास्त्र, व्याकरण, न्याय, ज्योतिष, छंद, अलंकार, गणितशास्त्र इत्यादींचा अभ्यास केला पाहिजे.

(१६) विद्याभ्यास समाप्त झाल्यावर यज्ञोपवीत, पाच अणुव्रत, अष्ट मूलगुण इत्यादी व्रतांशिवाय जमिनीवर झोपणे, आभूषण त्याग इत्यादि व्रतांचा १२ वर्ष किंवा १६ वर्ष त्याग करणे याला 'व्रतावतरण' क्रिया म्हणतात. या क्रियेनंतर गुरूंच्या आज्ञेने वस्त्र, आभूषण, माळा इत्यादि ग्रहण केले पाहिजे.

(१७) त्यानंतर गुरूंच्या आज्ञेने सुकुलांमध्ये उत्पन्न झालेल्या कन्येबरोबर विधिवत् विवाह करणे ही विवाह क्रिया होय.

(१८) वडीलांच्या आज्ञेनुसार धन, धान्य, संपत्ती घेऊन अलग राहणे ही 'वर्णलाभ' क्रिया आहे.

(१९) वडीलांच्या संमतीने स्वतंत्र होऊन विशुद्ध रीतीने जीविका करणे आणि देव पूजा इत्यादि षट्कर्म करणे याला 'कुलचर्या' क्रिया म्हणतात.

(२०) कुलचर्या क्रियेनंतर गृहस्थाचार्य बनण्यासाठी योग्य क्रिया करताना 'गृहीशिता क्रिया' प्राप्त केली पाहिजे.

(२१) आपल्या पुत्रांवर सर्व गृहभार टाकून स्वाध्याय व उपवास करता करता अत्यंत शांती प्राप्त करणे ही 'प्रशांति' क्रिया आहे.

(२२) जेव्हा श्रावक गृहत्याग करण्यास प्रवृत्त होतो तेव्हा 'गृहत्याग' क्रिया होते.

(२३) गुरूंजवळ जाऊन क्षुल्लक दीक्षा घेणे 'दीक्षाद्य' क्रिया आहे.

(२४) जैनेश्वरी दीक्षा ग्रहण करण्यास 'जिनरूपता' म्हणतात.

(२५) शास्त्रज्ञान समाप्त होईपर्यंत मौनपूर्वक अध्ययन करणे ही 'मौनाध्ययन वृत्तित्व' क्रिया आहे.

(२६) तीर्थंकरपद प्राप्त होण्यासाठी कारण असलेल्या सोळा कारण भावनांचे चिंतन करणे 'तीर्थकृद् भावना' नावाची क्रिया आहे.

(२७) गुरूचे आचार्यपद प्राप्त करण्यासाठी योग्य होऊन आचार्यपद प्राप्त करणे 'गुरूस्थानाभ्युपगम' क्रिया आहे.

(२८) आपल्या योग्य शिष्याला आचार्यपदाचा भार समर्पण करणे ह्याला 'स्वगुरुस्थानावाप्ति' क्रिया म्हणतात.

(२९) चतुर्विध संघाचे पालन करणे 'गणोपग्रहण' नावाची क्रिया आहे.

(३०) शिष्य, पुस्तक इत्यादि पासून ममत्व सोडून आत्म भावनांमध्ये तन्मय होऊन जाणे 'निःसंगत्वात्म भावना क्रिया' आहे.

(३१) मोक्ष प्राप्त करण्याचे ध्येय ठेवून ध्यान करणे 'योग निर्वाण सम्प्राप्ति' क्रिया आहे.

(३२) चार प्रकारच्या आहाराचा त्याग करून शरीर सोडण्यासाठी तयार राहणे ही 'योगनिर्वाणसाधना' क्रिया आहे.

(३३) मन, वचन, काय ह्या तिन्ही योगाने समाधी लावून प्राणांचा त्याग करणे व इंद्रपद प्राप्त करणे 'इन्द्रोपपाद' क्रिया आहे.

(३४) स्वर्गात जन्म झाल्यावर सर्व देवगण मिळून त्या इंद्राचा अभिषेक करतात. त्याला 'इन्द्राभिषेक' क्रिया म्हणतात.

(३५) नंतर नमस्कार करून देवांना आप-आपल्या पदांवर नियुक्त करणे 'विधिदान' क्रिया आहे.

(३६) सर्व देवांसह इंद्र पुष्कळ वर्ष स्वर्गसुख भोगतो ही 'सुखोदय' नावाची क्रिया आहे.

(३७) इंद्र सर्वांची समजूत घालून आपली आयु अल्प आहे असे समजून इंद्रपदाचा त्याग करतो ह्याला 'इंद्रपदत्याग क्रिया' म्हणतात.

(३८) गर्भात येण्याच्या सहा महिने पूर्व माता सोळा स्वप्न पाहते, रत्नवर्षा होऊ लागते. नंतर मातेच्या गर्भात येणे ही 'इंद्रावतार' क्रिया आहे.

(३९) हिरण्यगर्भ भगवान् हिरण्योत्कृष्ट जन्म धारण करतात. अशाप्रकारे गर्भामध्येच मति, श्रुति, अवधिज्ञान त्यांना प्राप्त होते. ही भगवंतांची 'हिरण्योत्कृष्ट जन्मता' क्रिया आहे.

(४०) भगवंतांचा जन्म झाल्यावर इंद्रगण येऊन त्यांना सुमेरू पर्वतावर नेऊन अभिषेक करतात. ही 'मंदराभिषेक' क्रिया आहे.

(४१) भगवान कोणाचेही शिष्य नाहीत, सर्वांचे गुरू आहेत. इंद्र येऊन जगत्‌गुरूची पूजा करतो ही 'गुरूपूजन' क्रिया आहे.

(४२) कुमार काळ समाप्त झाल्यावर भगवंतांना युवराज पदाचा पट्टा बांधल्या जातो याला 'यौवराज्य' क्रिया म्हणतात.

(४३) सम्राट पदावर अभिषेक होणे ही 'स्वराज्य' क्रिया आहे.

(४४) चक्ररत्नाची प्राप्ती झाल्यावर 'चक्रलाभ' क्रिया होते.

(४५) चक्ररत्न समोर पाठवून आठी दिशांना जिंकणे ह्याला दिशांजय म्हणतात.

(४६) दिग्विजय पूर्ण करून आपल्या नगरांमध्ये प्रवेश करणे ही 'चक्राभिषेक' नावाची क्रिया आहे.

(४७) साम्राज्य पदांवर आरूढ होऊन भगवान् अनेक राजांना योग्य शिक्षा देतात. न्याय, नीती सांगतात. ही 'साम्राज्य' क्रिया आहे.

(४८) राज्यापासून विरक्त झाल्यावर भगवान स्व-पुत्रास राज्य देऊन दीक्षा घेण्यासाठी जातात तेव्हा भगवंतांची लौकांतिक देवांकडून स्तुती केल्या जाते. याला 'निष्कान्ति क्रिया' म्हणतात.

(४९) जेव्हा भगवान बाह्य आणि अंतर परिग्रहांना सोडून ध्यानांमध्ये लीन होतात तेव्हा 'केवलज्ञान' प्रगट होते ही 'योग सम्मह' क्रिया आहे.

(५०) केवलज्ञान प्राप्त झाल्यावर समवशरणाची रचना होती ही 'आर्हत्य' क्रिया आहे.

(५१) धर्मचक्र पुढे पाठवून भगवान विहार करतात ही 'विहार' क्रिया होय.

(५२) विहार समाप्त झाल्यावर, समवशरण विघटित झाल्यावर भगवंतांना योग निरोध होतो. ही 'योग निरोध' क्रिया आहे.

(५३) अघातिया कर्मांचा नाश झाल्यानंतर मोक्षस्थान प्राप्त करणे ही 'अग्रनिर्वृति' क्रिया आहे.

अशाप्रकारे गर्भाधान पासून निर्वाणपर्यंत सर्व मिळून त्रेपन क्रिया होतात. भव्य जीवांना नेहमी त्याचे अनुष्ठान केले पाहिजे.

## अठ्ठेचाळीस दीक्षान्वय क्रिया

वर सांगितलेल्या गर्भान्वयाच्या त्रेपन क्रियांमधून प्रारंभीच्या तेरा क्रिया काढून टाकाव्यात. आणि अवतार इत्यादि आठ क्रियांचा त्यात समावेश करावा म्हणजे अठ्ठेचाळीस क्रिया होतात. ५०-१३=४०+८=४८.

ह्या आठ क्रियांची नांवे - अवतार, वृत्तलाभ, स्थानलाभ, गणग्रह, पूजाराध्य, पुण्ययज्ञ, दृढचर्या आणि

उपयोगिता.

**१. अवतार क्रिया** - मिथ्यात्वाने दोषी असलेला कोणी भव्य पुरूष जेव्हा समीचीन (खरा) मार्ग ग्रहण करण्यासाठी प्रेरीत होतो तेव्हा ही क्रिया केली जाते. तो भव्य जीव गुरूंजवळ जाऊन धर्म ऐकून मिथ्यामार्ग सोडून देतो व समीचीन मार्ग स्विकारतो. अशावेळेस गुरूच त्याचा पिता आहे आणि तत्त्वज्ञान हाच संस्कारित गर्भ आहे. तो भव्यपुरुष धर्मरूप जन्माने त्या तत्त्वज्ञानरूप गर्भामध्ये अवतीर्ण होतो. ही क्रिया गर्भाधान क्रियेसमान मानली जाते. कारण जन्म दोन्ही क्रियांमध्ये होत नाही. अशाप्रकारे ही पहिली 'अवतार' क्रिया आहे.

**२. वृत्तलाभ** - गुरूंना चरणस्पर्श करून विधिपूर्वक व्रतांच्या समूहाला प्राप्त करणे ही त्या भव्य जीवाची 'वृत्तलाभ' नावाची दुसरी क्रिया होते.

**३. स्थानलाभ** - ज्याने उपवास केले आहेत अशा भव्य जीवाची विधिपूर्वक पूजा करणे ही 'स्थानलाभ' नावाची तिसरी क्रिया आहे. ह्या क्रियेमध्ये गुरू विधिपूर्वक शिष्यास जैनधर्माची दीक्षा देतात.[१]

**४. गणग्रह** - स्थानलाभ क्रियेनंतर तो भव्य पुरूष मिथ्या देवतांना घरातून बाहेर काढतो तेव्हा ती 'गणग्रह' क्रिया होते. तो त्यावेळेस त्या देवतांना म्हणतो की - मी अज्ञानाने इतके दिवस आपली पूजा करीत आलो, परंतु आता जैनमतांच्या देवतांची पूजा करेल म्हणून तुम्ही क्रोध करू नका. आप-आपल्या इच्छेनुसार कोण्या अन्य ठिकाणी जा. अशाप्रकारे त्यांना अन्य स्थानी सोडून जैन मतानुसार शांत असलेल्या अर्हंत भगवंतांची पूजा करणे प्रारंभ करतो ही 'गणग्रह क्रिया' झाली.

५. पूजाराध्य - जिनेंद्र देवांची पूजा आणि उपवास इत्यादि करताना द्वादशांगाचा (शास्त्राचा) अर्थ ऐकणे ही 'पूजाराध्य' क्रिया आहे.

६. पुण्ययज्ञ - साधर्मी बांधवांबरोबर चौदा पूर्व विद्यांचा अर्थ ऐकतो. त्या भव्य जीवांस ही पुण्य वाढविणारी 'पुण्ययज्ञ' नावाची क्रिया होते.

(७) दृढचर्या - आपल्या मताचे शास्त्र समाप्त करून अन्य मताचे ग्रंथ किंवा अन्य कोणत्या दुसऱ्या विषयांना ऐकणाऱ्यास 'दृढचर्या' क्रिया होते.

(८) उपयोगिता - पर्वाच्या दिवशी उपवास करून रात्री प्रतिमायोग धारण करणाऱ्यास 'उपयोगिता' क्रिया होते.

याच्या पूर्वी-ज्या गर्भधानापासून निर्वाणापर्यंत त्रेपन क्रिया सांगितल्या आहेत त्यातील गर्भाधानापासून लिपीसंख्यान पर्यंतच्या ह्या तेरा क्रिया काढून टाकाव्यात. उरलेल्या ४० क्रियांमध्ये अवतार, वृत्तलाभ, स्थानलाभ इत्यादि वरील ८ क्रियांचा समावेश करावा. अशाप्रकारे ह्या ४८ क्रियांना 'दीक्षान्वय क्रिया'[२] म्हणतात.

## कर्त्रन्वय क्रियांचे वर्णन

कर्त्रन्वय क्रियांचे सात भेद आहेत. सज्जाति, सद्‌गृहित्व, पारिव्राज्य, सुरेन्द्रता, साम्राज्य. आर्हत्य आणि परिनिर्वाण. ह्या क्रिया अल्पसंसारी भव्य प्राण्यांच्याच होऊ शकतात. सर्वात पहिली जी सज्जाति क्रिया आहे ही भव्य जीवाला मनुष्य जन्माची प्राप्ती झाल्यावरच होऊ शकते.

**१. सज्जाति** - दीक्षा घेण्यासाठी उत्तम अशा वंशामध्ये विशुद्ध जन्म घेतो तेव्हा त्याची सज्जाति क्रिया होते.

---

१. आदिपुराण द्वितीय भाग पर्व ३०, पृष्ठ २७२ वर स्थानलाभ क्रियामध्ये दीक्षाविधि सांगितली आहे.

२. ह्या दीक्षान्वय क्रियांचे विशेष स्पष्टीकरण आदिपुराण पर्व ३९ पृ० २७२ पहा.

वडीलांच्या वंशशुद्धीस कुल आणि आईच्या वंशशुद्धतेस सज्जाति म्हणतात. सज्जाति जर प्राप्त झाली तर जे गुण सहज मिळतात त्या गुणांनी रत्नत्रयाची प्राप्ती सुलभ होते. ही [1]सज्जाति उत्तम शरीरांस जन्मापासूनच सांगितली आहे. कारण पुरुषाच्या सर्व इष्ट पदार्थांच्या सिद्धीचे कारण हीच एक सज्जाति आहे. ज्याप्रमाणे खाणींतून निघालेले रत्न संस्काराच्या योगाने उत्कर्ष प्राप्त करतो त्याचप्रमाणे विशुद्ध कुळांमध्ये जन्मलेला मनुष्य सुसंस्कारांनी द्विज म्हटल्या जातो. सर्वज्ञदेवाची आज्ञा समजून तो मंत्रपूर्वक यज्ञोपवित धारण करतो तीन लड चा यज्ञोपवित द्रव्य सूत्र आहे आणि सम्यग्दर्शन इत्यादि त्या श्रावकाचे भावसूत्र म्हटल्या जातात. संस्कारांनी सुशोभित अशा श्रावकाची 'सज्जाति' नावाची पहिली क्रिया आहे.

२. **सद्‌गृहित्व** - सज्जातिने सहित तो भव्य सद्‌गृहस्थ आर्य पुरुषांना करण्यास योग्य अशा सहा कर्मांचे पालन करतो. गृहस्थ अवस्थामध्ये जे अरिहंत देवांनी विशुद्ध आचरण सांगितले आहे त्याचे पालन करतो तो 'सद्‌गृहि' म्हटल्या जातो.

हा गृहस्थ असि, मसि इत्यादि सहा क्रियांनी उत्पन्न झालेल्या दोषांना पक्ष, साधन आणि चर्याच्या सहाय्याने दूर करतो. त्याची ही क्रिया 'सद्‌गृहीत्व' क्रिया म्हटली जाते.

**(३) पारिव्राज्य** - जो पुरूष घरसंसारापासून विरक्त होऊन दीक्षा ग्रहण करतो, ह्या क्रियेस पारिव्राज्य क्रिया म्हणतात. ह्या पारिव्राज्य क्रियेमध्ये ममत्व भाव सोडून दिगंबर रूप धारण करावे लागते. ज्याचे[2] कुल आणि गोत्र विशुद्ध आहे, चरित्र उत्तम आहे, मुख सुंदर आहे आणि प्रतिभावान आहे असा पुरुषच ही दीक्षा ग्रहण करण्यास योग्य मानला आहे. गुरूंद्वारा जैनेश्वरी दीक्षा ग्रहण करणे ही तिसरी 'पारिव्राज्य' क्रिया आहे.

**(४) सुरेन्द्रता** - पारिव्राज्य क्रियेच्या फळाच्या उदयाने ज्याला सुरेन्द्रपद प्राप्त होते. त्याची ही 'सुरेन्द्रता' नावाची क्रिया आहे.

**(५) साम्राज्य** - चक्ररत्नाच्या बरोबरच अनगिनत संपत्ती, रत्नसंपदा आणि भोगोपभोगरूपी अनेक प्रकारची सामुग्री प्राप्त होते. अशाप्रकारे चक्रवर्तीचे सार्वभौम साम्राज्य प्राप्त करणे 'साम्राज्य' क्रिया आहे.

**(६) आर्हन्त्य** - स्वर्गांतून अवतीर्ण झालेल्या परमेष्ठींना जी पंचकल्याणकरूपी संपदा प्राप्त होते ही 'आर्हन्त्य' क्रिया आहे. ही आर्हन्त्य क्रिया तिन्ही लोकात विस्मयाची लहर उत्पन्न करणारी आहे.

**(७) परिनिर्वाण** - संसाराच्या बंधनातून मुक्त होऊन परमात्म्याची जी अवस्था होते त्याला परिनिवृत्ती म्हणतात. ही सातवी 'परिनिर्वाण' क्रिया आहे.

हा भव्यपुरूष प्रथम योग्य जातीस प्राप्त करून सद्‌गृहस्थ होतो. नंतर गुरूंच्या आज्ञेने उत्कृष्ट पारिव्राज्य प्राप्त करून स्वर्गास जातो. तेथे त्याला इंद्राची लक्ष्मीप्राप्त होते. तेथून आपले पद सोडून उत्कृष्ट महिमावान अर्हन्त होतो त्यानंतर निर्वाणपद प्राप्त करतो.

## बारा अनुप्रेक्षा

जो श्रावक गृहस्थाश्रमांमध्ये पांच अणुव्रत इत्यादि व्रतांना पाळतो, वैराग्य उत्पन्न होण्यासाठी त्याचे चिंतन करतो अशा बारा अनुप्रेक्षा आहेत. वैराग्य उत्पन्न झाल्यानंतर सुद्धा तीर्थंकरांनी ह्या १२ अनुप्रेक्षांचे चिंतन केले आहे. तेव्हा वैराग्यास जन्म देण्यासाठी आणि त्यांची वृद्धी करण्यासाठी ह्या मातेप्रमाणे आहेत.

---

१. शरीरजन्मना सैषा सज्जातिरूपवर्णिता ।
एतन्मूला यतः सर्वाः पुंसामिष्टार्थसिद्धयः ॥ (आदिपुराण पर्व ३९)

२. विशुद्धकुलगोत्रस्य सद्‌वृत्तस्य वपुष्मतः ।
दीक्षायोग्यत्वमाम्नातं सुमुखस्य सुमेधसः ॥१५८॥ (आदिपुराण पर्व ३९ पृष्ठ २८३)

**(१) अनित्य अनुप्रेक्षा** - गांव, नगर, स्थान, चक्रवर्ती, इंद्र, धरणेंद्र, शरीर, आई-वडील, पुत्र, स्त्री इत्यादि सर्व सांसारिक पदार्थ या जीवासाठी अनित्य आहेत. शुद्ध अविनाशी आत्म्याचे चिंतन केले पाहिजे. कारण आत्मा नित्य आहे.

**(२) अशरण अनुप्रेक्षा** - हे जीवात्मा ! ह्या चतुर्गति संसारामध्ये जन्म घेतलेल्या जीवांस नेहमी दुःख भोगतांनी किंवा मरणाच्या वेळेस देव, मंत्र, औषधि, रथ, सेना इत्यादिपैकी कोणीच रक्षक नाही. फक्त पंच परमेष्ठी यांनी सांगितलेला जैनधर्म आणि चैतन्य, चमत्काररूप आपली आत्माच शरण आहे.

**(३) संसार अनुप्रेक्षा** - हा जीव द्रव्य, क्षेत्र, काळ भव आणि भाव ह्या पंचपरावर्तनरूपी संसार वनांमध्ये अनादि काळांपासून मिथ्यात्वाने ग्रस्त होऊन दुःख भोगत आहे. कर्मरूप यंत्राच्या प्रेरणेने कधी स्वर्गात जातो, कधी नरकामध्ये जातो तर कधी निगोद वगैरे अत्यंत दुःखदायी योनीमध्ये जातो. सर्वत्र भ्रमण करीत राहिले तरी संसारामध्ये कुठेच काही सुख नाही असा नेहमी-नेहमी विचार करणे 'संसार' अनुप्रेक्षा आहे.

**(४) एकत्वानुप्रेक्षा** - हा जीव नेहमी एकटा आहे. परमार्थदृष्टीने याचा कोणी मित्र नाही. एकटाच आला आहे आणि एकटाच दुसऱ्या योनीमध्ये जाईल. बंधु-मित्रादि कोणीसुद्धा स्मशानभूमीच्या पुढे त्याच्याबरोबर जाऊ शकत नाही, फक्त धर्मच बरोबर जाऊ शकतो.

**(५) अन्यत्वानुप्रेक्षा** - ह्या शरीराचा आणि जीवाचा अनादि काळांपासून संबंध आहे. परंतु शरीर वेगळे आहे आणि आत्मा वेगळा आहे. शरीर आणि आत्मा सर्वथा एक दुसऱ्यापासून भिन्न आहेत. जर शरीरच आपले नाही तर स्त्री, कुटुंब, शेती, पैसा हे आपले कसे होऊ शकतात ? हे तर प्रत्यक्षच दुसरे आहेत.

**(६) अशुचि अनुप्रेक्षा** - हे शरीर अत्यंत अपवित्र आहे. आई-वडिलांच्या रज आणि वीर्यापासून याची उत्पत्ति होते. ह्याच्या संसर्गाने इतर पवित्र सुगंधित पदार्थ सुद्धा अपवित्र आणि विद्रूप होतात. ह्या अशुचि शरीरानेच रत्नत्रयरूप पवित्र निधि प्राप्त करू शकतो. ह्या रत्नत्रयानेच आत्मा पवित्र आणि पूज्य बनू शकतो.

**(७) आस्रव अनुप्रेक्षा** - मिथ्यात्व, अविरति, कषाय आणि योग्य ह्या चार कारणाने जीवाच्या शुभ आणि अशुभ कर्मांचे आगमन होते. ह्यालाच आस्रव म्हणतात. आस्रवाने बंध होतो. आणि बंधच संसाराचे मूळ कारण आहे. आस्रवाच्या कारणांना विचारात न घेता आत्म्याच्या स्वरूपाचे चिंतन केले पाहिजे.

**(८) संवर अनुप्रेक्षा** - कर्माच्या आस्रवांना रोकणे ह्याला संवर म्हणतात. संवरासाठी पांच महाव्रत, पांच समिती, तीन गुप्ति, दहा धर्म, द्वादशानुप्रेक्षा आणि बावीस परिषह यांचे चिंतन करणे आवश्यक आहे. यालाच 'संवर' अनुप्रेक्षा म्हणतात.

**(९) निर्जरा अनुप्रेक्षा** - पूर्वसंचित कर्म उदयांस येऊन नष्ट होण्यास निर्जरा म्हणतात. निर्जराचे दोन भेद आहेत. (१) सविपाक निर्जरा (२) अविपाक निर्जरा पूर्वसंचित कर्मांची स्थिति पूर्ण झाल्यावर फळ देते. फळ दिल्यानंतर सर्व कर्म नष्ट होतात. ह्याला सविपाक निर्जरा म्हणतात. तपस्या, परिषह इत्यादिंनी कर्मांची स्थिती पूर्ण होण्यापूर्वीच कर्म नष्ट होतात. याला अविपाक निर्जरा म्हणतात. सविपाक निर्जरा संपूर्ण संसारी जीवांना होते व अविपाक निर्जरा सम्यग्दृष्टी आणि व्रतधारी यांनाच फक्त होते.

**(१०) लोक अनुप्रेक्षा** - अनंत अलोकाकाशाच्या मध्यभागी पुरुषाकार लोकाकाश आहे. लोकाकाश अनादि निधन, स्वयंसिद्ध आहे. अशाप्रकारे लोकाकाशामध्ये स्वर्ग, नरक कोठे आहे ? निगोद आणि मोक्षस्थान कोठे आहे ? हा जीव कोठून आला ? व ह्या जीवास कोठे जावयाचे आहे ? लोकाकाशाच्या स्वरूपाचा नेहमी विचार करणे 'लोक अनुप्रेक्षा' आहे.

**(११) बोधिदुर्लभ अनुप्रेक्षा** - ह्या घोर दुःखरूपी संसारात असलेल्या निगोद राशींतून निघून त्रस पर्याय प्राप्त करणे दुर्लभ आहे. त्रस पर्याय मध्ये सुद्धा पंचेंद्रिय होणे अत्यंत कठीण आहे. पंचेद्रियांमध्ये मनुष्य पर्याय

प्राप्त करणे सर्व गुणांमध्ये कृतज्ञतेच्या प्रमाणे अत्यंत दुर्लभ आहे. मनुष्यजन्म प्राप्त झाला पण त्यामध्ये सुद्धा उत्तम कुल, देश, इंद्रीयांची पूर्णता, आरोग्य इत्यादि मिळणे कठीणच आहे. अहिंसामयी धर्म मिळणे, मुनिधर्म धारण करणे आणि समाधिमरण साधणे अतिशय दुर्लभ आहे. ह्या सर्वांना प्राप्त करून प्रमाद न करता आपल्या स्वरूपास प्राप्त करून घेणे हे उत्तम आहे. परवस्तुंची प्राप्ती कर्माधीन आहे परंतु आपले ज्ञान, दर्शन, स्वभाव आपल्या जवळच आहे. तर यांची प्राप्ती दुर्लभ आहे असे कां मानावे ? अर्थात् आपल्या स्वभावाची प्राप्ती आपल्याजवळच असल्यामुळे सुलभ आहे. फक्त पुरुषार्थाची आवश्यकता आहे. अशाप्रकारे नेहमी विचार करून पुरुषार्थ केला पाहिजे.

**(१२) धर्म अनुप्रेक्षा** - हा सर्वज्ञप्रणीत जैनधर्म अहिंसा लक्षणयुक्त आहे. सत्य, शौच, ब्रह्मचर्य इत्यादि याचे अंग आहेत. याची प्राप्ती झाली नाही तर जीव अनादि संसारामध्ये भ्रमण करतो. पापाच्या उदयाने दुःखी होतो परंतु ह्याच्या प्राप्तीने अनेक सांसारिक सुख भोगतो व मुक्ती प्राप्तीने सुखी होतो. अशाप्रकारे चिंतन करणे धर्मानुप्रेक्षा आहे.

कोणत्याही श्रावकाला ह्या बारा अनुप्रेक्षांचे चिंतन करून पूर्णपणे विरक्त[१] होता येते. माता-पिता, कुटुंबीजन यांची आज्ञा घेऊन दिगंबर मुनींच्या संघात जाऊन गुरूजवळून दीक्षा घेतली पाहिजे. जे क्षुल्लक, ऐलक आहेत ते सुद्धा आचार्यांजवळ जाऊन मुनिदीक्षाची याचना करतात. तेव्हा आचार्यप्रवर त्यांच्यामध्ये दीक्षा घेण्याची पात्रता आहे का पाहून विधिवत् जैनेश्वरी दीक्षा प्रदान करतात. दीक्षार्थीला केशलौच करावा लागतो. त्याला सर्व प्रकारचे वस्त्र, आभूषण, परिग्रह इत्यादींचा त्याग करावा लागतो. गुरूदेव त्याला संयमाचे उपकरण मयुरपंखाची पिंच्छि, ज्ञानाचे उपकरण शास्त्र आणि शौचचे उपकरण कमंडलु प्रदान करतात त्या शिष्याला अठ्ठावीस मूलगुणांचे लक्षण समजवून सांगतात. आणि त्याला पंचपरमेष्ठीच्या साक्षीने दीक्षा देतात. त्याच्या मस्तकावर विधिवत् मंत्राची स्थापना करून बीजाक्षरांचे रोपण करतात. गुरू जवळून दीक्षा घेऊन तो शिष्यसुद्धा कृतकृत्य होतो व गुरूस आत्मसमर्पण करतो.

## मुनिधर्म

**"अठ्ठावीस मूलगुण**[२] - मूलगुण आणि उत्तरगुण हे जीवाचे परिणाम आहेत. महाव्रत इत्यादि मूलगुण अठ्ठावीस आहेत. बारा प्रकारचे तप आणि बावीस परीषह यांना उत्तरगुण म्हणतात. उत्तरगुण चौतीस आहेत. ह्या उत्तरगुणांचे वर्णन पुढे करू.

**अठ्ठावीस मूलगुणांची नावे** - पंच महाव्रत. पांच समिती, पांच इंद्रियांना वश करणे, सहा आवश्यक क्रिया, केशलोच, आचेलक्य (छोटे वस्त्र) स्नान त्याग, क्षितिशयन, दंत धावन न करणे, उभे राहून आहार करणे, दिवसांतून एक वेळा आहार करणे अशाप्रकारे २८ मूलगुण आहेत.

**पाच महाव्रत** - मुख्य व्रतांना महाव्रत म्हणतात. मोक्ष प्राप्तीस कारणभूत हिंसादींचा त्याग करणे याला व्रत म्हणतात. ह्या व्रतास तीर्थंकर किंवा महापुरुष ग्रहण करतात. ह्या व्रतांचे पालन केल्याने तो व्यक्ती महान होतो म्हणून ह्यांना महाव्रत म्हणतात. याचे पांच प्रकार आहेत -

**अहिंसा महाव्रत** - कषायांनी युक्त अशा मन, वचन, कायेच्या प्रवृत्तीस प्रमत्त योग म्हणतात. प्रमत्त

---

१. आज्ञा घेऊन दीक्षा घेतली पाहिजे. कुटुंबीजनांची आज्ञा नाही मिळाली तरी दीक्षा घेऊ शकतात. किंवा उत्कृष्ट वैराग्य प्राप्त झाले तर आई-वडिलांच्या अनुमतीशिवाय सुद्धा दीक्षा घेता येते. अशी अनेक उदाहरणे प्रसिद्ध आहेत.

२. ते मूलुत्तरसण्णा मूलगुणा महव्वदादिअडवीसा ।
तवपरीसहादिभेदा चोत्तीसा उत्तरगुणक्खा ॥३॥ (मूलाचार श्री कुंदकुंद कृत)

योगाने दहा प्राण्यांचा वियोग करणे हिंसा आहे अशा हिंसेपासून विरक्त होणे, सर्व प्राणीमात्रांवर दयाभाव ठेवणे हे अहिंसा महाव्रत आहे.

**सत्य महाव्रत** - प्राणीमात्रांना ज्याने दुःख होईल असे भाषण, जे विद्यमान पदार्थांविषयी असो या अविद्यमान पदार्थांविषयी असो त्याचा त्याग करणे.

**अचौर्य महाव्रत** - जी वस्तु दिली नाही अर्थात् अदत्त वस्तुला ग्रहण न करणे.

**ब्रह्मचर्य महाव्रत** - पूर्णतया मैथुनचा त्याग करणे. स्त्रीमात्रचा त्याग करणे.

**परिग्रह त्याग महाव्रत** - बाह्य आणि आभ्यंतर परिग्रहाचा त्याग करणे, मुनींना ज्या अयोग्य वस्तु आहेत त्या सर्वांचा त्याग करणे.

हे पांच महाव्रत सर्व पापांच्या त्यागाचे कारण आहे.

**पाच समिती** - सम्यक् प्रकाराने प्रवृत्ति करणे समिती आहे. समितीचे पांच भेद आहेत.

**ईर्या समिती** - मनाला स्थिर करून, चांगल्याप्रकारे पाहून गमन-आगमन करणे.

**भाषा समिती** - आगमाच्या विरुद्ध, पूर्वापार संबंध न ठेवता निष्ठुरता, कर्कश, मर्मच्छेदक इत्यादि दोष रहित भाषण करणे.

**एषणा समिती** - लोकनिंद्य कुळांना सोडून सूतक-पातक जातिसंकर (आईवडिलांची भिन्न भिन्न जाती हो) इत्यादी दोषांनी रहित घरांमध्ये शेहेचाळीस दोष आणि बत्तीस अंतराय टाकून आहार ग्रहण करावा.

**आदान निक्षेपण समिती** - डोळ्यांनी पाहून आणि पिच्छिने साफ करून सावधानीने वस्तूंना उचलणे आणि ठेवणे.

**प्रतिष्ठापन समिती** - ज्याठिकाणी जीव-जंतू नाही अशा भागात मलमुत्रादि त्याग करणे.

ह्याच पाच समिती आहेत.

**पंच इंद्रिय निरोध** - स्पर्श, रस, घ्राण, चक्षु आणि कर्ण ह्या पांच इंद्रियांच्या विषयांपासून इंद्रियांना नियंत्रित करणे ह्याला इंद्रिय निरोध म्हणतात.

**सहा आवश्यक क्रिया** - ज्यांना करणे अति आवश्यक जरूरी असते त्यांना आवश्यक क्रिया म्हणतात.

**समता** - राग, द्वेष, मोह सोडून देणे किंवा त्रिकाल पंचपरमेष्ठींना नमस्कार करणे.

**स्तव** - ऋषभादि चौवीस तीर्थंकरांची स्तुति करणे.

**वंदना** - एका तीर्थंकराचे दर्शन या वंदन करणे आणि पंचगुरुभक्तीपर्यंत दर्शन, वंदना करणे.

**प्रतिक्रमण** - अशुभ मन, वचन आणि कायेने जी प्रवृत्ति झाली होती त्यापासून परावृत्त होणे किंवा जे दोष घडले आहेत त्यांचा शोध करणे. या प्रतिक्रमणाचे दैवसिक, रात्रिक, ऐर्यापथिक, पाक्षिक, चार्तुमासिक, वार्षिक आणि उत्तमार्थ असे सात प्रकार आहेत.

**प्रत्याख्यान** - अयोग्य द्रव्याचा त्याग करणे किंवा योग्य वस्तूचा सुद्धा त्याग करणे.

**व्युत्सर्ग** - देहावरील ममत्व सोडून जिनगुण चिंतनयुक्त कायोत्सर्ग करणे. असे सहा आवश्यक आहे.

इंद्रिय, कषाय, रागद्वेष इत्यादीच्या वशीभूत जे नाहीत. अवश आहेत यांची क्रिया करणे आवश्यक क्रिया आहेत. ह्या सहा आवश्यक क्रिया मुनींना नेहमीच केल्या पाहिजेत.

**लोच** - आपल्या हातांनी डोके आणि दाढी-मूँछ यांच्या केसांना उखडून फेकणे. उत्कृष्ट केशलोच २ महिन्यांनी, मध्यम तीन आणि जघन्य चार महिन्यांनी होतो.

**आचेलक्य** - वस्त्र, मुनि होण्यास अयोग्य अशा सर्व परिग्रहांचा त्याग करणे.

**अस्नान** - स्नानाचा त्याग करणे.

**क्षितिशयन** - गवत, लाकडांची पाटी, चटई, शिला इत्यादीवर झोपणे.

**अदंत धावन** - दात घासण्यासाठी दंतमंजन, काड्यांचा वगैरे उपयोग न करणे.

**स्थितिभोजन** - उभे राहून दोन्ही पायांमध्ये चार बोटांइतके अंतर ठेवून भोजन करणे.

**एकभक्त** - दिवसांतून एकवेळा आहार घेणे.

अशाप्रकारे ह्या २८ मूलगुणांचे वर्णन आहे.

## पिंडशुद्धि प्रकरण

पिंड म्हणजे आहार. आहाराच्या शुद्धीस पिंडशुद्धी म्हणतात. उद्गम दोष, एवणादोष, संयोजना दोष, प्रमाणदोष, इंगालदोष, धूमदोष आणि कारण दोष असे पिंडशुद्धीचे आठ दोष आहेत. हे दोष नसले तर पिंडशुद्धि होऊ शकते. ह्या दोषांच्या आठ भेदाशिवाय ह्या आठ दोषांचे अजून पोटभेद शेहेचाळीस आहेत. एषणा समिती मध्ये सुद्धा सांगितले आहे की साधू शेहेचाळीस दोष आणि बत्तीस अंतराय यांना टाळून दिवसातून एकवेळा उभे राहून आपल्या हातांच्या ओंजळीत श्रावकाद्वारा दिलेला विधिवत् आहार ग्रहण करतात.

**अधःकर्म दोष** - हा दोष गृहस्थाश्रित आहे. ह्यामध्ये षट्जीव निकाय यांची विराधना होते. हा दोष महादोष म्हटल्या जातो. अर्थात् स्वयं आरंभ इत्यादिने भोजन तयार करणे हा अधःकर्म दोष आहे. हा दोष शेहेचाळीस गुणांच्या अतिरिक्त आहे म्हणून मुनींद्वारा सर्वथा त्याज्य आहे.

**शेहेचाळीस भेद** - उद्गमाचे १६, उत्पादनाचे १६ आणि एषणा दोष १०.

संयोजना, अंगार, प्रमाण, धूम.

**उद्गमदोषांच्या १६ भेदांची नावे** - औद्देशिक, अध्यधि, पूति, मिश्र, स्थापित, बलि, प्रावर्तित, प्राविष्करण, क्रीत. प्रामृष्य, परिवर्त, अभिघट, उद्भिन्न, मालारोहण, आच्छेद आणि अनीशार्थ.

**औद्देशिक दोष** - पाखंडी, श्रमण यांच्यासाठी तयार केलेला आहार घेणे.

**अध्यधि** - अन्न शिजविताना प्रमाण न पाहता अधिक टाकणे.

**पूति** - प्रासुकमध्ये अप्रासुक मिसळणे, प्रासुक परंतु मिश्र जसे नवीन शेगडी, भांडे इत्यादिमध्ये भोजन तयार करून सर्वात प्रथम साधूंना आहार देणे तर हा पूति दोष आहे.

**मिश्र** - अन्न प्रासुक आहे परंतु पाखंडी लोकांबरोबर या गृहस्थांबरोबर मुनींना आहार देणे.

**स्थापित** - शिजविलेल्या भांड्यामधून भोजन काढून स्वगृही या अन्य घरी घेऊन जाणे.

**बलिदोष** - यक्ष, नाग, कुलदेवता यांना नैवेद्य दाखविण्यासाठी केलेला आहार मुनींना देणे.

**प्राभृत** - आहाराच्या वेळेशिवाय दुसऱ्या वेळेस कमी-जास्ती करून केलेले भोजन आहार म्हणून देणे.

**प्रादुष्कार** - आहारासाठी उपयोगात येणाऱ्या भांड्यांना भस्म वगैरे लावून घासणे, भोजन किंवा भांडी एका ठिकाणावरून दुसऱ्या ठिकाणी घेऊन जाणे.

**क्रीततर दोष** - मुनि घरी आल्यानंतर श्रावक आपल्या येथील सचित्त किंवा अचित्त वस्तु अन्य श्रावकांस देऊन तेथून काही पदार्थ आणून मुनींना आहारात देणे हा क्रीत दोष आहे.

**ऋण** - मुनि घरी आल्यानंतर श्रावक कोणाकडून उधार आणून आहार देईल तर त्याला ऋण दोष म्हणतात.

**परावर्त** - दुसऱ्या श्रावकाला आपले तांदूळ वगैरे देऊन मुनींसाठी चांगले तांदूळ वगैरे आणणे.

**अभिघट** - सरळ रेषेत असलेल्या तीन किंवा सात घरांतून आणलेला भात, लाडू इत्यादि साधु ग्रहण करू शकतात. परंतु पंक्तिक्रमाला सोडून आणलेला आहार घेण्यात अभिघट दोष लागतो.

**उद्भिन्न** - झाकण बंद करून ठेवलेल्या डब्यांतून, किंवा लाख किंवा कोरलेल्या भांड्यातून त्याचवेळेस झाकण उघडून देणे. उदा. औषधी, तूप, लाडू वगैरे.

**मालारोहण** - सीढीने चढून दुसऱ्या मजल्यावरील वस्तू आणून त्याचवेळेस देणे.

**अच्छेद्य** - जर मुनींना आहार दिला नाही तर तुमचे धन वगैरे लुटून घेऊन जाऊ अशी भीती दाखवून आहार देण्यास तयार करणे.

**अनीशार्थ** - ज्या अन्नाचे, लाडूंचे प्रधान कारण अर्थ आहे. अशा पदार्थांचा आहार देणे किंवा दानपतिला ज्या वस्तूंचा निषेध आहे असा आहार ग्रहण करणे.

हे सर्व दोष श्रावकाच्या निमित्त्याने साधूंना लागतात म्हणून यांना उद्‌गम असे म्हटले आहे.

**उत्पादन दोषांच्या १६ भेदांची नावे** - धात्री दोष, दूत, निमित्त, आजीव, वनीपक, चिकित्सा, क्रोधी, मानी, मायावी, लोभी, पूर्वस्तुति, पश्चात स्तुति, विद्या, मंत्र, चूर्णयोग आणि मूलकर्म.

**धात्री दोष** - दाईप्रमाणे बालकाचे पोषण, संरक्षण इत्यादि करून आहार घेणे.

**दूत** - दुसऱ्या गावाला वगैरे जाताना कोणाचा संदेश सांगून आहार घेणे.

**निमित्त** - स्वर, व्यंजन इत्यादि निमित्त्याने शुभ-अशुभ फळ सांगून आहार घेणे.

**आजीव** - जाती, कुळ, शिल्प इत्यादि सांगून देणाऱ्यास प्रसन्न करून आहार घेणे.

**वनीपक** - दाताराच्या अनुकूल वचन बोलणे - अर्थात जर देणाऱ्याने विचारले की - ब्राह्मण, भिक्षुक साधू यांना भोजन देणे दान-पुण्य आहे की नाही ? अशावेळेस आपला अभिप्राय 'पुण्य' आहे असा देणे.

**चिकित्सा** - औषधी वगैरे देऊन आहार देणाऱ्यांस खुश करून आहार देणे.

**क्रोधादि कषाय** - क्रोध, मान, माया, लोभ हे चार कषाय करून आहार तयार करणे व देणे. अर्थात ह्या चार कषायांच्या निमित्ताने आहार घेणाऱ्यास चार दोष लागतात.

**पूर्व संस्तुति** - 'तू दानी आहे. तू कीर्तिमान आहे.' अशाप्रकारे देणाऱ्याची प्रशंसा करून आहार घेणे.

**पश्चात स्तुति** - आहार घेतल्यानंतर आहार देणाऱ्याची स्तुति करणे.

**विद्या** - विद्या शिकवेल असे प्रलोभन देऊन आहार ग्रहण करणे.

**मंत्र** - मंत्राचे प्रलोभन देऊन आहार ग्रहण करणे.

**चूर्णदोष** - अंजन, चूर्ण इत्यादि देऊन आहार ग्रहण करणे.

**मूलकर्म दोष** - जे वशीभूत नाही त्यांना वशीभूत करण्यासाठी उपाय सांगून आहार ग्रहण करणे.

हे उत्पादन इत्यादि सोळा दोष साधुंद्वारा केले जातात म्हणून यांना उत्पादन म्हणतात.

**एषणा दोषांचे दहा प्रकार आणि त्यांची नांवे व लक्षण** -

**शंकित** - हे भोजन अधःकर्माने केले आहे की नाही ? अशी शंका करून आहार घेणे.

**म्रक्षित** - तूप, तूल इत्यादीने भरलेल्या हाताने किंवा भरलेल्या चमचाने आहार घेणे.

**निक्षिप्त** - सचित्त पृथ्वी, जल इत्यादींवर ठेवलेल्या अन्नाचा आहार घेणे.

**पिहित** - अप्रासुक किंवा प्रासुक याचा भेद न करिता आहार घेणे.

**संव्यवहरण** - आदराने किंवा भीतीने आहार देण्याच्या वेळेस वस्त्र वगैरे ओढत असेल तरी आहार घेणे.

**दायक** - देणाऱ्याच्या अशुद्ध हाताने, सूतक-पातक दोषांनी दूषित लोकांकडून, दूध पाजणाऱ्या स्त्रीच्या हातांनी व नपुंसक च्या हाताने आहार घेणे.

**उन्मिश्र** - अप्रासुक द्रव्याने मिश्र आहार घेणे.

अपरिणत - अग्नीने परिपूर्ण न शिजलेला आहार व लवंग वगैरेनी प्रासुक न केलेल्या जलाने केलेला आहार

घेणे.

**लिप्त** - गेरू वगैरे ज्याला लावला आहे अशा भांड्यातील किंवा गेरूने लिप्त असलेल्या हाताने आहार घेणे, अप्रासुक पाण्याने ओल्या भांड्याने किंवा हाताने आहार घेणे.

**छोटित** - हाताने खूप दूध सांडले असेल किंवा पदार्थ खाली सांडत आहे अशा हाताने आहार घेणे.

हे अशनाचे दहा दोष आहेत. हे हात आणि भोजन यांच्याशी संबंधित आहेत म्हणून ह्यांना अशन दोष म्हणतात.

**संयोजना दोष** - आहार आणि दानाचे पदार्थ मिश्रित करून देणे. तसेच थंड आहारात गरम पाणी वगैरे टाकून देणे.

**अतिमात्र (अप्रमाण) दोष** - उदरातील दोन भाग खाद्य पदार्थाने आणि एक भाग पेय पदार्थांनी पूर्ण केला पाहिजे व एक भाग रिकामा ठेवला पाहिजे. तेव्हाच आळसाशिवाय स्वाध्याय, सामायिक इत्यादि क्रिया निर्विघ्नपणे पार पडू शकतात. याचे उल्लंघन करून अतिमात्राने भोजन करणे हा दोष आहे.

**अंगार दोष** - अति लंपटताने भोजन करणे अंगार दोष आहे.

**धूम दोष** - आपणास खाण्यास योग्य नाही अशा पदार्थांची मनात निंदा करताना आहार ग्रहण करणे धूमदोष आहे.

अशाप्रकारे १६ उद्गमाचे, १६ उत्पादनाचे, १० एषणाचे आणि संयोजना, अप्रमाण, अंगार आणि धूम असे ४६ दोष पिंडशुद्धीचे मानल्या जातात. साधूंनी ह्या दोषांना टाळून आहार ग्रहण केला पाहिजे.

**अंतरायचे ३२ भेद** -

(१) **काक नामक अंतराय** - मुनि आहारासाठी निघाले, किंवा आहार घेण्यासाठी उभे राहिले अशावेळेस जर कावळा, कबूतर, चिमणी इत्यादि पक्षी जर शरीरावर मलमूत्र करतील तर हा काक अंतराय होतो.

(२) **अमेध्य** - अपवित्र अशा विष्ठेने पाय वगैरे खराब होणे.

(३) **छर्दि** - आहारासाठी उभे असलेल्या मुनिमहाराजांना उलटी वगैरे होणे.

(४) **रोधन** - आहारासाठी तुम्ही जाऊ शकत नाही असे म्हणणे.

(५) **रुधिर** - आहाराच्या वेळेस आपले किंवा दुसऱ्यांचे चार अंगुलीप्रमाण रक्त वाहताना पाहणे.

(६) **अश्रुपात** - दुःखाने आपल्या किंवा अन्य लोकांच्या डोळ्यांतून अश्रु वाहताना पाहणे.

(७) **जान्वधः परामर्श** - घुटन्याच्या (टोंगळा) खाली हाताचा स्पर्श होणे.

(८) **जानूपरिव्यतिक्रम** - टोंगळ्याच्या वरच्या भागास उल्लंघन करून जाणे.

(९) **नाभ्यधोनिर्गमन** - नाभीच्या खाली मस्तक करून जेथे आहारासाठी जावयाचे आहे तेथे जाणे.

(१०) **प्रत्याख्यात सेवना** - त्याग केलेल्या वस्तूंचा आहार ग्रहण करणे.

(११) **जन्तुवध** - आपल्या समोर मांजराच्या द्वारा उंदीर वगैरेचा वध होणे.

(१२) **काकादि पिंडहरण** - कावळा या कोणत्याही पक्षाने मुनींच्या हातातील ग्रास घेऊन जाणे.

(१३) **ग्रास पतन** - भोजन करताना मुनींच्या हातातून घास वगैरे खाली पडणे.

(१४) **पाणिजन्तुवध** - करपात्रामध्ये मुंगी, मुंगळा वगैरे प्राणी येऊन तो मेला तर.

(१५) **मांसादिदर्शन** - मांस, मद्य आणि मेलेल्या पंचेंद्रियाचे शरीर दिसणे.

(१६) **पादान्तर प्राणिनिर्गमन** - आहार घेताना दोन्ही पायांच्या मधून पंचेंद्रिय जीव उंदिर वगैरे निघून जाणे.

(१७) **देवाद्युपसर्ग** - देव, तिर्यंच इत्यादिकडून उपसर्ग होणे.

(१८) **भाजनसम्पात** - आहार देणाऱ्याच्या हातातून भांडे वगैरे पडणे.
(१९) **उच्चार** - आहार घेताना उलटी वगैरे होणे.
(२०) **प्रस्त्रवण** - आहार घेताना लघवी वगैरे होणे.
(२१) **भोज्यगृहप्रवेश** - आहारासाठी निघाल्यावर दुष्ट लोकांच्या घरी प्रवेश होणे किंवा ज्यांना सूतक-पातक आहे अशा श्रावकाच्या घरी आहारासाठी जाणे.
(२२) **पतन** - भ्रम, मूर्च्छा, थकवा इत्यादींनी चक्कर येऊन पडणे.
(२३) **उपवेशन** - आहार घेताना मुनि जर खाली बसले तर
(२४) **सदंश** - कुत्रा, मांजर वगैरे चावणे.
(२५) **भूमिस्पर्श** - सिद्ध भक्ती झाल्यानंतर जमीनीला हातांनी स्पर्श झाला तर.
(२६) **निष्ठीवन** - कफ, थुंक इत्यादि जर मुनि जमीनीवर करतील तर.
(२७) **करेणकिंचित् ग्रहण** - आहार करताना जर मुनि जमीनीवरील काही वस्तू उचलतील तर
(२८) **उदरकृमिनिर्गमन** - पोटांतून किडे निघणे.
(२९) **अदत्तग्रहण** - न दिलेली वस्तू ग्रहण करणे.
(३०) **प्रहार** - आपल्यावर या दुसऱ्यावर प्रहार करणे.
(३१) **ग्रामदाह** - आहार घेण्याच्या वेळेस जर गावांमध्ये आग लागली असेल तर त्यावेळेस तो अंतराय आहे.
(३२) **पादेन किंचित् ग्रहण** - भूमिवरील वस्तू पायाने उचलून घेणे.

हे ३२ अंतराय सांगितले आहेत. याच्या व्यतिरिक्त चांडाळाचा स्पर्श, कलह, इष्टमरण, साधर्मिक संन्यास, पतन, प्रधान मरण ह्या अंतरायांना सुद्धा पाळले पाहिजे.

ह्या अंतरायाबरोबरच १४ मलदोष सुद्धा मानले आहेत त्याचे स्पष्टीकरण -

नख, रोम, जंतु (विकलत्रयाचे मृत शरीर) कण (जौं, गहू यांचा अवयव) कुण्डक (शालि इत्यादीच्या मधील अवयव) पू, रक्त, चर्म, मांस, बीज, फल, कंद, मूल असे चौदा मल मानले आहेत. यामध्ये काही महामल तर काही अल्पमल आहेत. रक्त, मांस, अस्थि, चर्म आणि पस (पूं) हे महादोष आहेत. आहार घेताना यांचे दर्शन झाले तर आहार त्याग करून प्रायश्चित घेतले पाहिजे. द्वीन्द्रिय आणि विकलत्रयाचे शरीर आणि नख जर दिसले तर आहार त्याग करून अल्प प्रायश्चित्त केले पाहिजे. अन्नांमध्ये केस दिसला तर आहार त्याग केला पाहिजे. अंकुर आलेले धान्य, कण, कुण्ड, बीज, कंद, फल आणि मूल यांना अन्नापासून अलग करून आहार घेतला पाहिजे.

मुनिजन सहा हेतुंसाठी आहार ग्रहण करतात.

वेदना - क्षुधा वेदना मिटविण्यासाठी वैयावृत्य - आपली, दुसऱ्याची वैयावृत्ति करण्यासाठी क्रियार्थ - सामायिक इत्यादि आवश्यक क्रिया निर्विघ्न पाळण्यासाठी. संयमार्थ - तेरा प्रकारचा संयम पाळण्यासाठी. प्राणचिंता - प्राणाची रक्षा आहाराशिवाय संभव नाही. आणि प्राणाशिवाय - आयुशिवाय रत्नत्रय सिद्धी प्राप्त होऊ शकत नाही. धर्मचिंता - आहाराशिवाय दशधर्म पाळणे कठीण आहे. ह्या वरील सहा कारणांसाठी मुनि आहार ग्रहण करतात.

आहार त्यागाचे कारण - आकस्मिक व्याधी या पीडा झाल्यावर, उपसर्ग आला तर आहार त्याग करतात. ब्रह्मचर्य धर्माची रक्षा करण्यासाठी, प्राणी दयासाठी, अनशन तपस्येसाठी आणि संन्यास काळामध्ये मुनि निःस्पृह होऊन आहारत्याग करतात.

वास्तविक बळ आणि आयुसाठी मुनि आहार घेत नाही. परंतु स्वाध्याय, संयम, ध्यान यांच्या सिद्धीसाठी

साधु आहार ग्रहण करतात. नवकोटिने विशुद्ध श्रावकांच्या द्वारा नवधा भक्तीने दिलेला आहार अंतराय वगैरे टाळून मुनि घेतात.

## समाचाराचे वर्णन

**समाचार शब्दाचे चार अर्थ आहेत** - रागद्वेषाने मुक्त अशा प्रवृत्तीला समाचार म्हणतात किंवा अतिचाराने रहित मुलगुणांचे पालन करणे ह्याला समाचार म्हणतात. किंवा प्रमत्त संयत मुनींचे आचरण समाचार आहे किंवा सर्व क्षेत्रांमध्ये कायोत्सर्ग इत्यादि आचारांचे पालन करणे समाचार आहे.

**समाचाराचे दोन भेद आहेत** - औघिक, पदविभागिक, सामान्य आचरणास औघिक म्हणतात. ह्याचे दहा प्रकार आहेत. सूर्योदयापासून प्रारंभ होऊन रात्रीपर्यंत मुनींचे जे आचरण आहे त्याला पदविभागिक म्हणतात.

**औधिकचे दहा प्रकार** - इच्छाकार, मिथ्याकार, तथाकार, आसिका, निषेधिका, आपृच्छा, प्रतिपृच्छा, छंदन, सनिमंत्रण व उपसंपत्.

(१) **इच्छाकार** - सम्यग्दर्शन इत्यादि इष्ट प्रवृत्तीला हर्षाने स्वीकार करणे यामध्ये स्वेच्छाने प्रवृत्ति करावयाची असते.

(२) **मिथ्याकार** - अतिचार झाल्यानंतर 'हा अपराध मिथ्या हो' असे नाही करणार असे म्हणावयाचे असते.

(३) **तथाकार** - गुरू वगैरे कडून सूत्राचा अर्थ ऐकून हे सत्य आहे असे म्हणणे.

(४) **आसिका** - राहण्याचे स्थान, मंदिर, गुफा इत्यादि मधून निघताना तेथील व्यंतर देवांना विचारून जाणे.

(५) **निषेधिका** - जिनमंदिर, निवासस्थानांमध्ये प्रवेश करताना निःसही निःसही म्हणत तेथील व्यंतर वगैरे देवांना विचारून प्रवेश करणे.

(६) **आपृच्छा** - गुरू वगैरेंना वंदन करून प्रश्न विचारणे आहारास वगैरे निघताना काही प्रश्न विचारणे.

(७) **प्रतिपृच्छा** - एखादे कोणतेही मोठे कार्य करताना गुरूंचा वारंवार सल्ला घेणे.

(८) **छन्दन** - उपकरण वगैरे ग्रहण करताना, वंदना वगैरे करताना आचार्यांसारखी प्रवृत्ति ठेवणे.

(९) **सनिमंत्रण** - गुरू वगैरेंना विनयपूर्वक पुस्तक वगैरे मागणे.

(१०) **उपसंपत्** - गुरुजनांसाठी 'मी आपलाच आहे' असे आत्मसमर्पण करणे.

## पदविभागिक समाचार

कोणी धैर्य, वीर्य, उत्साह इत्यादि गुणांनी योग्य असे मुनि आपल्या गुरूंजवळून सर्व शास्त्र शिकल्यानंतर जर दुसऱ्या आचार्यांजवळ शिकण्यासाठी जाऊ इच्छित असेल तर ते मुनि आपल्या गुरूंजवळ विनम्र भावाने जाण्यासाठी आज्ञा मागतात. अवसर पाहून शिष्य तीन, पाच अथवा सहा वेळा शिक्षागुरूंना प्रश्न करू शकतो. दीक्षागुरू शिक्षागुरूंची आज्ञा घेऊन आपल्या बरोबर एक, दोन, तीन मुनींना घेऊन जाऊ शकतो. कारण एकाकी विहाराचा आचार्यांनी निषेध केला आहे.[१]

येथे मुनींच्या आचरणाचे थोडक्यात वर्णन केले आहे.

## आर्यिकांचा समाचार

१. स्वच्छंद गदागदी सयण णिसयणादाणभिक्ख वोसरणे ।
सच्छंदजपरोचि य मा भू मे सत्तू वि एगागी ॥२९॥ (मूलाचार श्री कुंदकुंद कृत)

आर्यिका आपसात इर्ष्या वगैरेपासून दूर राहिल्या पाहिजेत. वर सांगितलेल्या मूलगुणांचे आणि दहा प्रकारच्या समाचार गुणांचे त्यांनी पालन केले पाहिजे. आर्यिकांसाठी वृक्षमूल आतापन योग चा निषेध आहे. बाकी सर्व क्रिया मुनिंसारखीच आहे. आर्यिका गावापासून जास्त दूरही नाही व जास्त जवळही नाही अशा वसतिगृहामध्ये राहू शकतात. मुनींच्या स्थानांपासून दूर राहतात. गणिनी प्रमुखाची आज्ञा घेऊन आहारासाठी वगैरे जातात. गुरूंच्या दर्शनासाठी किंवा प्रायश्चित्त घेण्यासाठी जावयाचे असेल तर गणिनी प्रमुखाला बरोबरच घेऊन जावे. साधुपदास अयोग्य असे रडणे, झोपणे इत्यादि आरंभ रूप कोणतीही क्रिया करू नये.

**विशेष** - आर्यिका दोन साडी ठेवतात. बसून करपात्रांमध्ये आहार घेतात इतकाच मुनि आणि आर्यिकांमध्ये अंतर आहे. यांचे पंचमहाव्रत उपचाराने सांगितले आहेत म्हणून यांना संयम नावाचा सहावा गुणस्थान होत नाही. तरीसुद्धा ऐलकाच्या अपेक्षेने आर्यिका श्रेष्ठ आहेत. एक लंगोटधारी ऐलक[1]सुद्धा त्यांना 'वंदामी' करतो.

सांगितले आहे की - अकरावी प्रतिमाधारी ऐलक लंगोटीमध्ये ममत्व ठेवतो म्हणून उपचार महाव्रताच्या योग्य नाही. परंतु आर्यिका एक साडी मात्र धारण करते परंतु त्यामध्ये त्यांची ममत्वबुद्धि नसते. म्हणून आर्यिका उपचार महाव्रतासाठी योग्य आहेत.

**संघाचे पाच आधार**[2] - ज्या संघामध्ये आचार्य, उपाध्याय, प्रवर्तक, स्थविर आणि गणधर हे पाच आधार राहतात त्या संघामध्ये विद्याध्ययन सुचारू रूपाने चालते.

**आचार्य** - शिष्यांवर अनुग्रह ठेवण्यामध्ये कुशल, पंचाचार स्वयं पाळतात आणि शिष्यांकडून त्याचे पालन करवून घेतात. प्रायश्चित्त देतात त्यांना आचार्य म्हणतात.

**उपाध्याय** - जे शिष्यांना शास्त्र शिकवितात.

**संघप्रवर्तक** - जे चार प्रकारच्या मुनींना चर्या वगैरेमध्ये प्रवृत्त करतात.

**स्थविर** - (मर्यादोपदेशक) जे बाल, वृद्ध मुनींना उपदेश देऊन सन्मार्गामध्ये स्थिर ठेवतात.

**गणधर** - (गणपरिरक्षक) अनेक प्रकारच्या उपायांचे शिक्षण देऊन सर्व संघाला घेऊन चालतात.

आजच्या ह्या पंचमकाळांमध्ये मिथ्यादृष्टींची संख्या वाढल्यामुळे तसेच हीन संहनन झाल्यामुळे मुनींना संघामध्येच राहिले पाहिजे. एकल विहारी झाले नाही पाहिजे.

आचार्य, उपाध्याय आणि साधुपरमेष्ठीचे लक्षण

**आचार्य** - जे दर्शनाचार, ज्ञानाचार, चारित्राचार, तपाचार आणि वीर्याचार ह्या पाच आचरणाचे पालन करतात व दुसऱ्यांकडून करवून घेतात. आणि जे छत्तीस गुणांनी युक्त आहेत. ह्यांना आचार्य परमेष्ठी म्हणतात.

**छत्तीस गुणांची नांवे** - बारा प्रकारचे तप, दहा धर्म, पांच आचार, सहा आवश्यक क्रिया, मनोगुप्ति, वचनगुप्ति आणि काय गुप्ति. असे हे छत्तीस आचार्य परमेष्ठीचे गुण आहेत. हे आचार्य संघाचे नायक असतात आणि शिष्यांना शिक्षा, दीक्षा आणि प्रायश्चित्त देतात.

**उपाध्याय** - हे चौदा पूर्वचे व्याख्याता आहेत. किंवा [3]तत्कालीन परमागमचे व्याख्यान करणारे आहेत. शिष्यांना शिकवितात परंतु संग्रह करणे, दीक्षा देणे इत्यादि कार्य करीत नाहीत. यांचे पंचवीस गुण सांगितले आहेत. आचारांग, सूत्रकृतांग, स्थानांग, समवायांग, व्याख्यानप्रज्ञाप्ति, ज्ञातृकथांग, उपासकाध्ययनांग, अन्तकृद्‌दशांग, अनुत्तरोपपादिकदशांग, प्रश्नव्याकरणांग, आणि विपाक सूत्रांग असे अकरा अंग आहेत.

---

१. कौपीनेऽपि समूर्च्छत्वान्नार्हत्यार्यो महाव्रतम् ।
अपि भक्तममूर्च्छत्वात् साटिकेऽप्यार्यिकार्हति ॥३६॥ (सागर धर्मामृत पृष्ठ ५१८)

२. तत्थ ण कप्पइ वासो जत्थ इमे णत्थि पंच आधारा ।
आइरिय-उवज्झाया, पवत्तथेरा गणधरा य ॥३४॥ (मूलाचार)

३. तत्कालिक प्रवचन व्याख्यातारो वा । (धवला प्र० पु० पृ० ५१)

उत्पादपूर्व, अग्रायणीय, वीर्यानुवाद, अस्तिनास्तिप्रवाद, विद्यानुवाद, कल्याणवाद, ज्ञानप्रवाद, कर्मप्रवाद, सत्यवाद, आत्मप्रवाद, प्रत्याख्यान प्रवाद, प्राणानुवाद क्रियाविशाल आणि लोकबिंदुसार हे चौदा पूर्व आहेत हे उपाध्याय परमेष्ठी ह्या ११ अंगाचे आणि १४ पूर्वीचे पठन-पाठन करतात म्हणून त्यांचे २५ गुण मानले आहेत. तत्कालीन संपूर्ण शास्त्रांचे ज्ञाता आहेत. आणि हे शिकवितात म्हणून ह्यांना उपाध्याय म्हणतात.

**साधु** - जे अठ्ठाविस मूलगुणांना पाळतात. तेरा प्रकारचे चारित्र्य आणि तेरा प्रकारच्या क्रियांमध्ये कुशल आहेत. प्रमादरहित आवश्यक क्रिया करतात. छत्तीस प्रकारच्या उत्तरगुणांना पाळतात. शीलाचे जे अठरा हजार प्रकार आहेत त्यांना धारण करणारे, चौऱ्यांशी लाख उत्तर गुणांना पाळणारे असे साधु परमेष्ठी असतात.

आचार्य, उपाध्याय आणि साधु ह्या तिघांनाही अठ्ठावीस मूलगुण असणे आवश्यक आहेत. ज्याप्रमाणे मूळांशिवाय वृक्ष होऊ शकत नाही त्याचप्रमाणे मूळगुणांशिवाय मुनी होऊ शकत नाही.

**मुनीचे चार भेद आहेत** - यति, मुनि, अनगार आणि ऋषि. उपशम श्रेणी आणि क्षपक श्रेणी चढणाऱ्यांना यति म्हणतात. अवधिज्ञानी, मनःपर्ययज्ञानि आणि केवलज्ञानी यांना मुनि म्हणतात. ज्यांना ऋद्धि, सिद्धी प्राप्त झाल्या आहेत त्यांना ऋषि म्हणतात. अठ्ठावीस मूलगुणांना पाळणारे गृहत्यागी, वन, मठ, मंदिरामध्ये राहणाऱ्यांना अनगार मुनि म्हणतात. आजच्या युगाचे सर्व साधू अनगार आहेत.

**मुनींच्या छत्तीस उत्तर गुणांचे वर्णन** - बारा प्रकारचे तप आणि बावीस परिषह यांना उत्तरगुण म्हणतात. ह्याचे संक्षिप्त वर्णन अशाप्रकारे आहे की -

**बारा तप** - अनशन, अवमौदर्य, वृत्तिसंख्यान, रसपरित्याग, विविक्तशय्यासन, कायक्लेश हे सहा बाह्य तप आहे. प्रायश्चित, विनय, वैयावृत्य, स्वाध्याय, व्युत्सर्ग आणि ध्यान हे सहा आभ्यंतर तप आहे.

**अनशन** - चार प्रकारच्या आहाराचा त्याग करणे.

**अवमौदर्य** - भुकेपेक्षा कमी खाणे.

**वृत्तपरिसंख्यान** - आहाराला निघताना अटपटी प्रतिज्ञा घेणे.

**रसपरित्याग** - मधुर, गोड इत्यादि रसांचा त्याग करणे.

**विविक्तशय्यासन** - एकांत स्थानी बसणे व झोपणे.

**कायक्लेश** - शरीराने कष्ट सहन करणे.

**प्रायश्चित्त** - व्रतामध्ये दोष वगैरे लागल्यानंतर गुरूंजवळून त्यासाठी प्रायश्चित्त घेणे.

**विनय** - दर्शन-ज्ञान ज्यांना आहे त्यांचा आदर करणे.

**वैयावृत्ति** - आचार्य, उपाध्याय इत्यादिंची सेवासुश्रुषा करणे.

**स्वाध्याय** - वाचणे, विचारणे इत्यादि पाच प्रकारचा स्वाध्याय करणे.

**व्युत्सर्ग** - अंतरंग आणि बहिरंग उपाधींचा त्याग करणे.

**ध्यान** - सर्व चिंता सोडून धर्मांमध्ये किंवा आत्मचिंतनामध्ये एकाग्र होणे.

**बावीस परिषहांची नांवे** - क्षुधा, तृषा, शीत, उष्ण, दंशमशक, नग्नता, अरति, स्त्री, चर्या, निषद्या, शय्या, आक्रोश, वध, याचना, अलाभ, रोग, तृणस्पर्श, मल, सत्कार, पुरस्कार, प्रज्ञा, अज्ञान आणि अदर्शन. मोक्षमार्गावर चालणारा पुरूष, स्त्री ह्या बावीस परिषहांना शांतपणे सहन करतात. ह्यांना आहार मिळाला नाही म्हणून खेद न करणे. ह्याला क्षुधा परिषहजय म्हणतात.

तहान लागली असताना ती तहान समाधिरूपी जलाने शांत करतात. यालाच तृषापरिषहजय म्हणतात.

वस्त्ररहित मोकळ्या स्थानांवर बर्फ वगैरेच्या थंडीस सहन करणे शीत परिषहजय आहे.

ग्रीष्मकाळात सूर्यापासून तापलेल्या पृथ्वीवर उष्णता सहन करणे उष्ण परिषहजय आहे.

दंश, मशक, विंचू, सर्प इत्यादि चावल्यानंतर जी पीडा होते त्याला सहन करणे दंशमशक परिषहजय आहे.

नुकत्याच जन्मलेल्या बालकाप्रमाणे निर्विकार राहणे हा नग्न परिषहजय आहे.

एकांतस्थानी, गुफा वगैरेमध्ये अरुचि न दाखविता ध्यान अध्ययन करणे अरतिपरिषहजय आहे.

स्त्रीच्या चंचलभावांनी मन विचलित न होऊ देणे, मन स्थिर ठेवणे स्त्री परिषहजय आहे.

छोटे-छोटे दगड निघालेल्या सडकेवरून चालताना मनास खेद-खिन्न न होऊ देणे चर्या परिषहजय आहे.

ठराविक काळापर्यंत बसावयाचे आहे, परंतु त्या कालावधीपर्यंत शरीरकष्ट होत असेल तर त्याला शांतभावाने सहन करणे हे निषद्या परिषहजय आहे.

स्वाध्याय वगैरे केल्यानंतर एक करवट झोपताना जमीन रूतत असेल तर त्या कष्टास सहन करणे त्याला शय्या परिषहजय म्हणतात.

अज्ञानी लोकांकडून कठोर, असभ्य, निंद्या वचन ऐकून सुद्धा क्रोध न येऊ देणे, शांत राहणे याला आक्रोश परिषहजय म्हणतात.

अज्ञानी जनांकडून तीक्ष्ण शस्त्रांनी प्रहार केल्यानंतर सुद्धा दुःख न करणे हा वध परिषहजय आहे.

शरीर शुष्क झाल्यानंतर सुद्धा आहार, औषधी वगैरे न मागणे याला याचना परिषहजय म्हणतात.

पुष्कळ काळापर्यंत आहार नाही मिळाला तरी "लाभोद लाभो वरं मे" लाभापेक्षा अलाभच चांगला आहे असे मानणे हा अलाभ परिषहजय आहे.

अनेक रोग झाल्यानंतर औषधि, उपचार इत्यादिंची अपेक्षा न करणे हा रोग परिषहजय आहे.

तृण, कंकर, कांटे इत्यादिंची बाधा सहन करणे व दुसऱ्या प्राण्यांची पीडा दूर करण्याची भावना ठेवणे याला तृणस्पर्श परिषहजय म्हणतात.

स्नान त्याग व्रत असल्याने शरीर मलाने लिप्त आहे. त्यामुळे खाज, उवा इत्यादीने होणाऱ्या पीडेची उपेक्षा करणे. मलीन शरीरांविषयी मनात ग्लानी उत्पन्न न होऊ देणे याला मलपरिषहजय म्हणतात.

महातपस्वी, सिद्धांतवेत्ता, कुशल साधु झाल्यानंतर सुद्धा सत्कार, पुरस्कार प्राप्त झाले नाहीत म्हणून मनात खेद न करणे हा सत्कार पुरस्कार परिषहजय आहे.

मी खूप ज्ञानी आहे अशाप्रकारे विद्याबुद्धीचा अभिमान न करणे हा प्रज्ञा परिषहजय आहे.

'हा मूर्ख आहे' असा दुसऱ्याने अपमान केला तरी दुःखी न होता मी घोर तपश्चर्या केली परंतु मला ज्ञान प्राप्त झाले नाही असे समजून खिन्न न होणे ह्याला अज्ञान परिषहजय म्हणतात.

माझे शुद्ध परिणाम आहेत, दीक्षा घेतलेली आहे. परंतु देव इत्यादि माझी पूजा करीत नाही. उपवास वगैरे केल्यानंतर देव अतिशय करीत होते हे सर्व असत्य आहे अशाप्रकारे मनात विचार येऊ न देणे अदर्शन परिषहजय आहे.

साधु संवर आणि निर्जरा यांच्या उत्तरगुणांना पाळतात जर या उत्तरगुणांचे मुनिंकडून पालन झाले नाही तर ते मुनि नाहीत अशी गोष्ट नाही.

**चारित्र्याचे तेरा प्रकार** - पाच महाव्रत, पाच समिति आणि तीन गुप्ती अशाप्रकारे चारित्र्याचे तेरा भेद आहेत. ह्याला चरण सुद्धा म्हणतात.

**करणचे तेरा प्रकार** - षट् आवश्यक क्रिया, पंचपरमेष्ठींना नमस्कार, अःसही आणि निःसही अशा तेरा प्रकारच्या क्रिया आहेत. यांनाच कारण म्हणतात. षट्आवश्यक क्रियांचे वर्णन अठ्ठाविस मूलगुणांमध्ये येऊन गेले आहे.

**पंचपरमेष्ठी** - अरिहंत, सिद्ध, आचार्य, उपाध्याय आणि साधु ह्या पांच परमेष्ठींना नमस्कार करणे. कोणत्याही मंदीर किंवा निवास स्थानांतून निघताना अःसही आणि प्रवेश करताना निःसही म्हणावे.

**प्रतिक्रमण** - व्रतांमध्ये लागलेल्या दोषांचे निराकरण करणे प्रतिक्रमण आहे. प्रतिक्रमणाचे सात भेद आहेत. ईर्यापथिक, रात्रिक, दैवासिक, पाक्षिक, चार्तुमासिक, वार्षिक व उत्तमार्थ.

मंदिरात वगैरे चालत गेल्यानंतर ईर्यापथ शुद्धिपाठ करणे हे ईर्यापथ प्रतिक्रमण आहे. रात्रीच्या शेवटी रात्रिक, दिवसाच्या शेवटी सायंकाळी दैवसिक, पंधरा दिवसांनी चर्तुदशी किंवा अमावस्येला किंवा पौर्णिमेला केले जाणारे प्रतिक्रमण पाक्षिक, कार्तिक आणि फाल्गुनच्या अष्टान्हिकाच्या शेवटी होणारे प्रतिक्रमण चार्तुमासिक, वर्षाच्या शेवटी अर्थात् आषाढ[1] शुद्ध चर्तुदशी किंवा पौर्णिमेला केले जाणारे प्रतिक्रमण वार्षिक आणि मरणकाळाच्या वेळेसे सर्व दोषांचे होणारे प्रतिक्रमण उत्तमार्थ प्रतिक्रमण म्हटल्या जाते.

**कायोत्सर्गाचे भेद** - शरीरांवरील ममत्व-मोह कमी करणे - णमोकारमंत्राचे स्मरण करणे कायोत्सर्ग आहे. कायोत्सर्गाचा लघुकाळ अर्न्तमुहुर्त आणि उत्कृष्ट काळ एक वर्ष पर्यंत आहे. णमोकार मंत्राचे उच्चारण तीन श्वासोश्वासामध्ये झाले पाहिजे. नऊवेळा णमोकार मंत्र जपण्यासाठी सत्तावीस श्वासोच्छवास लागतात. मल, मूत्र विसर्जनानंतर, ईर्यापथ शुद्धीमध्ये, साधुंची निषद्याक्षेत्राच्या वंदनेमध्ये आणि आहारानंतर पंचवीस श्वासोच्छ्वासांमध्ये नऊ वेळा णमोकार मंत्र म्हटला पाहिजे. स्वाध्याय, देववंदना इत्यादि कायोत्सर्गाच्या क्रियेत सत्तावीस श्वासोच्छ्वास आले पाहिजे. दैवसिक प्रतिक्रमणमध्ये १०८ श्वासोच्छ्वास आले पाहिजे. रात्रिक प्रतिक्रमणमध्ये ५६, पाक्षिकमध्ये ३००, चार्तुमासिक प्रतिक्रमणमध्ये ४०० वार्षिकमध्ये ५०० श्वासोच्छ्वासांमध्ये कायोत्सर्ग होतो.

**साधुंचे अहर्निश २८ कायोत्सर्ग** - त्रिकाळ देववंदनामध्ये चैत्यभक्ति आणि पंचगुरुभक्ति संबंधी २ □ ३ = ६ दोन - दोन, दैवसिक, रात्रिक प्रतिक्रमणमध्ये सिद्ध, प्रतिक्रमण वीर आणि चतुर्विंशति भक्ति संबंधी चार-चार ४ □ २ = ८, पूर्वान्ह, अपरान्ह, पूर्व रात्रिक, अपररात्रिक अशा चार काळाच्या स्वाध्यायामध्ये - स्वाध्यायाच्या प्रारंभी श्रुतभक्ति, आचार्य भक्ति, आणि समाप्तीच्या वेळेस शास्त्रभक्ति अशा तीन तीन भक्तिसंबंधी ४ □ ३ = १२, रात्रियोग प्रतिष्ठापनांमध्ये योगभक्तिसंबंधी एक आणि निष्ठापन संबंधी एक असे दोन. एकूण सर्व मिळून ६+८+१२+२=२८ कायोत्सर्ग साधुंना नित्यच करण्यास योग्य आहे.

**विशेष** - संध्याकाळी प्रतिक्रमणानंतर 'मी आज रात्री या वसतिकामध्ये निवास करीन' अशी प्रतिज्ञा करणे ह्याला रात्रियोग प्रतिष्ठापन म्हणतात. या अनुष्ठानांमध्ये योगभक्ति केली जाते. असेच प्रातः प्रतिक्रमणानंतर त्या रात्रियोगाचे निष्ठापन योग भक्तिपूर्वक केल्या जाते. दैवसिक, रात्रिक प्रतिक्रमणामध्ये प्रतिक्रमणाची विधी स्पष्ट आहे. हीच विधी क्रियाकलाप, धर्मध्यान दीपक इत्यादी पुस्तकांमध्ये मुद्रित आहे. सूर्य उदयकाळ, सूर्यास्त काळ, मध्यान्ह आणि मध्यरात्रिक ह्या चारी काळांमध्ये चार-चार घडी काळ सोडून बाकी काळ स्वाध्यायाचा काळ आहे.

**देववंदना (सामायिक)** - सामायिक - देववंदना करण्यासाठी इच्छुक मुनि जिनचैत्यालयमध्ये जाऊन मंदीराच्या तीन प्रदक्षिणा[2] देतात.

सामायिक करण्याची विधि सिद्धांतसारमध्ये सांगितली आहे -

"आदाहीणं[3], पदाहीणं, तिखुत्तं, तिऊणदं चदुस्सिरं वारसा वत्तं चेदि' ।

स्वाधिनता, परीति - तीन प्रदक्षिणा, त्रयी निषद्या - तीन वेळा बसून आलोचना करणे, त्रिवार कायोत्सर्ग

१. 'आषाढान्तसांवत्सरी', - अनगार धर्मामृत पृ० ५७९.

२. आचारसार पृ० २३४ । चारित्रसार । अनगार पृ० ६८.

३. धवला पु०......... पृ० ९ ।

करणे, बारा आवर्त व चार शिरोनति अशाप्रकारे सहा कृतिकर्म देववंदनेमध्ये सांगितले आहे.

**स्वाधीनता** - देव वंदना करताना मुनीला स्वाधीन, मुक्त होऊन देववंदना केली पाहिजे. मंदिराच्या तीन प्रदक्षिणा केल्या पाहिजे. बसून तीन वेळा आलोचना केली पाहिजे. तीन वेळा कृत्य विज्ञापना (प्रतिक्रमण) करावी. एका कायोत्सर्गामध्ये बारा आवर्त आणि चार शिरोनति नमस्कार करावेत. अर्थात् सर्वप्रथम जिनमंदिरात पोहोचल्यावर पाय धुवून मंदिराच्या तीन प्रदक्षिणा कराव्यात. जिनेंद्र भगवंतांच्या मुख कमलाचे दर्शन करण्यापूर्वी "पडिक्कमामि भंते इदियावहिया" इत्यादि ईर्यापथ शुद्धिपाठ म्हणून नऊ वेळा णमोकार जपावा. खाली चटईवर बसून 'इच्छामि भंते आलोचेउं' इत्यादि ईर्यापथ आलोचना वाचली पाहिजे. नंतर 'भगवन् ! देववंदना करिष्यामि' इत्यादि प्रतिज्ञा करून "सिद्धं संपूर्ण भव्यार्थ" पासून "समता सर्वभूतेषु" इत्यादि पर्यंत पाठ वाचावा. पुनः "पौर्वान्हिक देव वंदनायां पूर्वा.... चैत्यभक्ति कायोत्सर्ग करोम्यहं" अशी प्रतिज्ञा करून पंचांग नमस्कार करावा. 'णमो अरिहंताणं' इत्यादि चत्तारि दंडक आणि सामायिक दंडक वाचावे. पुनः नऊ वेळा जाप्य देऊन "थोस्सामी" इत्यादि चतुर्विशाति स्तवन वाचावे. सामायिक दंडक आणि थोस्समिच्या पहिले आणि नंतर तीन-तीन आवर्त केले पाहिजे. तसेच एका कायोत्सर्गासाठी चार वेळा तीन-तीन आवर्त केल्याने बारा आवर्त होतात. पुनः वंदना करून 'जयति भगवान' म्हणून चैत्यभक्ति वाचावी. नंतर बसून "इच्छामि भंते चेश्यभत्ति" इत्यादि आलोचना करावी. असाच पंचगुरुभक्तीचा क्रम आहे व शेवटी समाधी भक्ती मध्ये सुद्धा हाच क्रम आहे.[१] सर्व क्रियांच्या शेवटी समाधी भक्ति सर्व दोषांच्या शुद्धिसाठी केली जाते. असेच त्रिकाळ[२] देववंदनामध्ये चैत्यभक्ति आणि पंचगुरु भक्ति संबंधी दोन-दोन कायोत्सर्ग प्रमुख होतात.

## साधुची दिनचर्या

संयमी साधु शुद्ध स्वातोपलब्धि प्राप्त करण्यासाठी प्रमुख कारण असलेल्या समाधीच्या सिद्धीसाठी अहर्निश स्वाध्याय इत्यादि क्रिया (परिकर्म)[३] विधिवत् करतो.

[४]अर्धरात्रिनंतर दोन घडी व्यतित झाल्यावर साधूस निद्रेचा त्याग करून अपररात्रिक स्वाध्याय केला पाहिजे. त्याची विधी - 'अथ अपररात्रिक स्वाध्याय प्रतिष्ठापन क्रियायां पूर्वा - श्रुतभक्ति कायोत्सर्ग करोम्यहं' नऊ वेळा णमोकार मंत्राचा जप करून 'अर्हद्वक्त्रप्रसूतं' इत्यादि लघु श्रुतभक्ति वाचावी.

"अथ अपररात्रिक स्वाध्याय प्रतिष्ठापन क्रियांया..... आचार्यभक्ति कायोत्सर्ग करोम्यहं"

अशाप्रकारे प्रतिज्ञा करून कायोत्सर्ग करावा. लघु श्रुतभक्ति करावी. अशा प्रकारे अपरात्रिक स्वाध्यायाच्या प्रारंभी आणि समाप्तीच्या वेळेस तीन कायोत्सर्ग होतात.

त्यानंतर 'रात्रिक प्रतिक्रमण' करून रात्रिसंबंधी दोषांचे विशोधन करावे. ह्या प्रतिक्रमणांमध्ये सिद्ध, प्रतिक्रमण, वीर आणि चतुर्विशति तीर्थंकर भक्ति अशा चार भक्ति प्रामुख्याने येतात.[५]

प्रतिक्रमणानंतर रात्रियोगनिष्ठापना केली पाहिजे अर्थात् सायंकाळच्या प्रतिक्रमणानंतर जो रात्री योग ग्रहण केल्या जातो त्याचा त्याग केला पाहिजे. त्याची विधी -

---

१. पूर्णतया सामायिक विधि समजण्यासाठी क्रियाकलाप, सामायिक भाष्य किंवा 'सामायिक' नावाचे पुस्तक पहा.

२. त्रिकाल देववंदना आणि त्रिकाल सामायिक एकच आहे. अतः आगमामध्ये सांगितल्याप्रमाणे सामायिक केले पाहिजे.

३. शुद्धस्वात्मोपलम्भाग्र साधनाय समाधये ।
परिकर्म मुनिःकुर्यात् स्वाध्यायादिकमन्वहम् ॥ (अनगारधर्मामृत पृ० ६२९)

४. साधुच्या दिनचर्याचे प्रकरण अनगार धर्मामृताच्या आधारे घेतले आहे.

५. क्रियाकलाप, धर्मध्यान दीपक आदि मध्ये प्रतिक्रमण दिले आहे.

"अथरात्रियोग निष्ठापन क्रियायां...... योगिभक्ति कायोत्सर्ग करोम्यहं" अशी प्रतिज्ञा करून नऊवेळा जाप्य दिले पाहिजे. "प्रावृट्काले" इत्यादि लघुयोगिभक्तिचा पाठ करावा. याचा अर्थ असा आहे की - मी जो रात्री याच वसतिमध्ये निवास करण्याचा नियम केला होता त्याला समाप्त करतो. पुनः लघु आचार्य भक्तिद्वारा आचार्यांची वंदना करावी. (स्तुती करावी.)

त्यानतर सुर्योदयापासून दोन घडी पर्यंत विधिवत् देववंदना करावी. प्रथम ईर्यापथ शुद्धी करून सामायिक करावे. सामायिकानंतर बृहत् चैत्यभक्ति आणि पंचमहागुरुभक्ति करण्याचे विधान आहे व सर्वात शेवटी समाधिभक्ति केली जाते. यानंतर उरलेल्या वेळात यथायोग्य आत्मध्यान केले पाहिजे. अशाप्रकारे ही सामायिक विधी आहे पुनः लघुसिद्धभक्ति आणि लघुआचार्य भक्तिपूर्वक सकाळची (पौर्वान्हिक) आचार्य वंदना करावी.

सूर्योदयानंतर दोन घटका व्यतित झाल्यानंतर पौर्वान्हिक स्वाध्यायची प्रतिष्ठापना करून विधिवत् स्वाध्याय करून मध्यान्ह काळाच्या दोन घडी पूर्व स्वाध्याय समाप्त करावा.

मध्यान्हच्या दोन घडी पूर्व 'माध्यान्हिक' देववंदना विधिपूर्वक करावी. लघुश्रुत भक्तीने व आचार्यभक्तीने आचार्यांची वंदना करावी. त्यानंतर जर उपवास असेल तर ध्यान, आराधना, जाप्य इत्यादींमध्ये दोन घडी घालविल्या पाहिजे. आणि जर आहारासाठी जावयाचे असेल तर गुरुवंदना करून गोचरी वृत्तीने आहारासाठी जावे.[१] तेथे पड्गाहन झाल्यानंतर नवधा भक्तीनंतर 'अथ प्रत्याख्यान प्रतिष्ठापना क्रियायां सिद्धभक्ति कायोत्सर्ग करोम्यहं' अशी प्रतिज्ञा करून ९ वेळा जाप द्यावे. लघुसिद्धभक्ति म्हणून पहिल्या दिवशीच्या आहारानंतर ग्रहण केलेल्या प्रत्याख्यानाची समाप्ती करून आहार आरंभ करावा. आहारानंतर 'अथ प्रत्याख्यान प्रतिष्ठापन क्रियायां सिद्धभक्ति कायोत्सर्ग करोम्यहं' अशी प्रतिज्ञा करून ९ वेळा जाप द्यावा. लघुसिद्धभक्ति म्हणून तत्काल प्रत्याख्यान ग्रहण करावे. अर्थात् दुसऱ्या दिवशी आहार ग्रहण करेपर्यंत आहाराचा त्याग करावा. पुनः गुरूजवळ जाऊन लघुसिद्धभक्ति म्हणून गुरूंजवळून प्रत्याख्यान ग्रहण करावे. लघुआचार्य भक्तिद्वारा आचार्यांची वंदना करावी आणि आहारासंबंधीच्या दोषांचे प्रतिक्रमण करावे.

पुनः विधिवत् 'अपरान्हिक' स्वाध्याय प्रतिष्ठापन करून सूर्यास्ताच्या दोन घडी पूर्व स्वाध्याय विसर्जन करावे.

नंतर 'दैवसिक प्रतिक्रमण'द्वारा दिवससंबंधी दोषांचे निराकरण करून रात्रीयोग धारण करावा. अर्थात् 'अथ रात्रियोग प्रतिष्ठापन क्रियायां योगिभक्तिकायोत्सर्ग करोम्यहं" अशी प्रतिज्ञा करून लघुयोगिभक्ति म्हणावी. "मी आज रात्री याच वसतिकामध्ये राहीन" असा नियम ग्रहण करावा. पुनः लघुश्रुत आचार्य भक्तीने अपरान्हिक आचार्य वंदना करून विधिवत् 'अपरान्हिक' देववंदना करावी.

पुनः सूर्यास्तानंतर दोन घडी काळ संपल्यानंतर पूर्वरात्रिक स्वाध्यायास विधिवत् प्रारंभ करावा. अर्धरात्रीच्या दोन घडी पूर्व पर्यंत स्वाध्याय करावा. यानंतर श्रम परिहार करण्यासाठी चार[२] घडी पर्यंत शयन करावे. साधुंची ही अहर्निशचर्या संक्षेपाने सांगितली आहे. अनगार धर्मामृत, मूलाचार, आचार्यसार इत्यादि ग्रंथामध्ये विस्ताराने विवेचन केले आहे.

अशाप्रकारे ह्या साधूंच्या दैनिक चर्यामध्ये चार वेळा स्वाध्यायाचे असे १२, तीन वेळा देववंदनाचे ६, दोन

१. आचारग्रंथामध्ये मध्यान्ह सामायिकानंतर साधुंना आहारासाठी जाण्याचे विधान आहे. परंतु सध्या वर्तमानकाळात मध्यान्ह सामायिकापूर्वी ९, १०, ११ वाजेपर्यंतचा काळ आहाराची वेळ आहे. संभवतः श्रावकाच्या आहाराच्या वेळेसच साधूंनी आहारासाठी जाणे उचित आहे. शास्त्रामध्ये असे विधान आहे की श्रावकांच्या घरी त्यांच्या भोजनाच्या वेळेसच साधूनी चर्यासाठी जावे. म्हणून वर्तमानकाळात सामायिकपूर्व ही चर्यासाठी जाणे योग्य आहे.

२. हा चारघडीमात्र का शयन उत्कृष्ट मार्ग आहे. जर एवढ्या झोपेने शरीर स्वस्थ राहात नसेल तर शरीराकडे लक्ष देऊन क्रिया करावी. स्वास्थ्याच्या हानीने ध्यानसिद्धिसुद्धा होऊ शकणार नाही.

वेळा प्रतिक्रमणचे ८ आणि दोन वेळा योगभक्तिचे २ असे एकूण २८ कायोत्सर्ग होतात.

## नैमित्तिक क्रिया

चतुर्दशीच्या दिवशी देववंदनामध्ये सिद्ध, चैत्य, श्रुत, पंचगुरू आणि शांती अशा पाच भक्त्या केल्या पाहिजेत. अथवा चैत्य आणि पंचगुरूभक्तीच्या मध्ये श्रुतभक्ति करावी. अशाप्रकारे तीन भक्ती केल्या पाहिजेत. अष्टमीच्या दिवशी सिद्धभक्ति, श्रुतभक्ति, आलोचना सहित चारित्र्य भक्ती करून 'इच्छामि भंते अट्ठमियाम्हि' असे म्हणून आलोचना करावी. नंतर शांतीभक्ति व समाधी भक्ति करावी.

आष्टान्हिक पर्वामध्ये पौर्वान्हिक स्वाध्यायानंतर सर्व साधुगण मिळून सिद्ध, नंदीश्वर, पंचगुरू आणि शांतिभक्तीचा पाठ करावा. अशाच प्रकारे श्रुतपंचमी इत्यादि क्रियांना ग्रंथातून पाहिले पाहिजे.

**वर्षायोग** - आषाढ शुक्ल त्रयोदशीला 'मंगल गोचार मध्यान्ह वंदना' करून आहारानंतर बृहत् सिद्धभक्ति, योग भक्तिपूर्वक उपवास ग्रहण करून बृहत् आचार्य भक्ति व बृहत् शांतिभक्ति करावी. नंतर आषाढशुक्ल चतुर्दशीच्या पूर्व रात्रीला 'वर्षायोग प्रतिष्ठापना' या आशयाने सिद्धभक्ति, योगभक्ति, चैत्यभक्ति इत्यादी क्रिया करून वर्षायोग धारण करावा.

नंतर उपवास करून कार्तिक कृष्ण चतुर्दशीच्या पश्चिम रात्रीला भक्तिपाठपूर्वक 'वर्षायोग निष्ठापना' करून रात्रिक प्रतिक्रमण करावे. पुनः वीर निर्वाण क्रिया करावी. वीर निर्वाण क्रियेमध्ये सिद्धभक्ति, निर्वाण भक्ति, पंचगुरुभक्ति आणि शांतिभक्ति केली जाते. नंतर देववंदना करावी.

तीर्थंकरांच्या कल्याणक स्थानांची वंदना करताना मुनि, आचार्य यांची निषद्या वंदना मध्ये सुद्धा शास्त्रोक्त भक्तीचा पाठ करून कृतिकर्मपूर्वक वंदना केली जाते. अशाप्रकारे संक्षेपाने मुनींच्या नित्य-नैमित्तिक क्रिया सांगितल्या आहेत.

अशाप्रकारे साधु आपल्या नित्य-नैमित्तिक क्रिया करताना शक्तीनुसार कर्मदहन, चारित्र्यशुद्धी, सिंहनिष्क्रीडित इत्यादि व्रतांचे सुद्धा अनुष्ठान करतात. या व्रतांच्या सहाय्याने कर्मांची निर्जरा करतात. सातिशय पुण्यबंध प्राप्त करून दोन, चार भवांमध्ये मोक्ष प्राप्त करतात.

हे मुनि दहा धर्मांचे पालन करतात. सोळा कारण भावनांचे चिंतन करून तीर्थंकर प्रकृतीचा बंध पाडून घेतात. तीन लोकातील भव्य जीवांवर अनुग्रह करण्यासाठी समर्थ होतात.

## मुनींचे दहा धर्म

समितीमध्ये तत्पर मुनि प्रमादाला नष्ट करण्यासाठी दहा धर्मांना पाळतात. दहा धर्मांची नावे -

**(१) उत्तम क्षमा** - शरीराच्या स्थितीच्या कारणाने आहारास जाताना मुनीला जर दुष्ट लोकांनी शिविगाळी केली, उपहास केला, तिरस्कार केला किंवा मारले-पिटले तरी मुनींच्या मनात दुष्टभाव येत नाही. यालाच उत्तम क्षमा म्हणतात.

**(२) उत्तम मार्दव** - जाति, कुल, गोत्र इत्यादिंचा अभिमान न करणे.

**(३) उत्तम आर्जव** - मन, वचन, कायेने कुटिलता न करणे.

**(४) उत्तम शौच** - लोभाचा त्याग करणे.

**(५) उत्तम सत्य** - साधु पुरुषांशी सत्य वचन बोलणे.

**(६) उत्तम संयम** - प्राण्यांची हिंसा व इंद्रियांच्या विषयांचा त्याग करणे.

**(७) उत्तम तप** - कर्मक्षयासाठी बारा प्रकारचे तप करणे.

**(८) उत्तम त्याग** - संयमासाठी योग्य अशा ज्ञान वगैरेंचे दान करणे.

(९) **उत्तम आकिंचन्य** - जे शरीर वगैरे आहे, त्यामध्ये सुद्धा 'हे माझे आहे' अशा अभिप्रायाचा त्याग करणे.

(१०) **उत्तम ब्रह्मचर्य** - स्त्रीचा त्याग करणे, अथवा स्वतंत्र वृत्तीचा त्याग करण्यासाठी गुरुकुलामध्ये निवास करणे हे दहा धर्म संवराचे कारण मानले गेले आहेत.

## सोळा कारण भावना

(१) **दर्शन विशुद्धि** - पंचवीस मलदोषांनि रहित विशुद्ध सम्यग्दर्शन धारण करणे.

(२) **विनय संपन्नता** - देव, शास्त्र, गुरू आणि रत्नत्रयाचा विनय करणे.

(३) **शीलव्रतामध्ये अनतिचार** - शीलव्रतांमध्ये अतिचार नसावा.

(४) **अभीक्ष्णज्ञानोपयोग** - नेहमी ज्ञानाच्या अभ्यासांमध्ये प्रयत्नशील असावे.

(५) **संवेग** - धर्मामध्ये अनुराग असावा.

(६) **शक्तितस्त्याग** - आपल्या शक्तिनुसार आहार, औषधी, अभय आणि शास्त्रदान करणे.

(७) **शक्तितस्तप** - आपली शक्ती न लपविता अंतरंग व बहिरंग तप करणे.

(८) **साधुसमाधि** - साधुंचा असर्ग इत्यादि दूर करण्यासाठी समाधि मरण करणे.

(९) **वैयावृत्यकरण** - व्रती, त्यागी, साधर्मी बांधवांची सेवा करणे, वैयावृत्ति करणे.

(१०) **अर्हन्तभक्ति** - अरिहंत भगवंतांची भक्ती करणे.

(११) **आचार्यभक्ति** - आचार्यांची भक्ती करणे.

(१२) **बहुश्रुतभक्ति** - उपाध्याय परमेष्ठींची भक्ती करणे.

(१३) **प्रवचनभक्ति** - जिनवाणीची भक्ती करणे.

(१४) **आवश्यक अपरिहाणि** - सहा आवश्यक क्रियांचे सावधानीपूर्वक पालन करणे.

(१५) **मार्ग प्रभावना** - जैन धर्माचा प्रसार, प्रभाव सर्वत्र करणे.

(१६) **प्रवचन वत्सलत्व** - साधर्मी बांधवांशी प्रेम करणे. ह्या सोळा भावनांमध्ये दर्शनविशुद्धि होणे आवश्यक आहे. परंतु दर्शन विशुद्धि बरोबर दुसऱ्या कितीही भावना असल्या तरी तीर्थंकर प्रकृतीचा बंध होऊ शकतो.

## ऋद्धिंचे वर्णन

तपश्चर्या करणाऱ्या मुनींना अनेक प्रकारच्या ऋद्धि प्राप्त होतात.

ऋद्धिचे आठ भेद आहेत. बुद्धिऋद्धि, विक्रियाऋद्धि, क्रियाऋद्धि, तपऋद्धि, बलऋद्धि, औषधिऋद्धि, रसऋद्धि आणि क्षेत्रऋद्धि.

बुद्धिऋद्धिचे १८, विक्रियाऋद्धिचे ११, क्रियाचे २, तपऋद्धिचे ७, बलऋद्धिचे ३, औषधिऋद्धिचे ८, रसऋद्धिचे ६ आणि क्षेत्रऋद्धिचे २ असे अवांतर भेद होतात.

**बुद्धिऋद्धिचे १८ भेद** - अवधिज्ञान, मनःपर्ययज्ञान, केवलज्ञान, बीजबुद्धि, कोष्ठबुद्धि, पदानुसारिबुद्धि, संभिन्नश्रोतृत्व, दूरास्वादनत्व, दूरस्पर्श, दूरघ्राण, दूरश्रवण, दूरदर्शन, दशपूर्वित्व, चौदापूर्वित्व, निमित्तऋद्धि, प्रज्ञाश्रमण, प्रत्येक बुद्धित्व आणि वादित्व.

(१) **अवधिज्ञान** - हे प्रत्यक्षज्ञान अंतिम स्कंधापर्यंत परमाणु वगैरे मूर्त पदार्थांना समजून घेते.

(२) **मनःपर्ययज्ञान** - हे ज्ञान चिंतित, अचिंतित आणि अर्ध चिंतित अशा अनेक विषयांचे पदार्थांना जाणते.

(३) **केवलज्ञान** - हे ज्ञान संपूर्ण पदार्थांना लोक, अलोकांतील विषयांना जाणते. हे ज्ञान इंद्रीयादिच्या सहायताशिवाय पूर्ण अखंड असते.

(४) **बीजबुद्धि** - नोइंद्रिया वरण, श्रुतज्ञानावरण आणि वीर्यान्तराय ह्या प्रकृतीच्या उत्कृष्ट क्षयोपशमाने विशुद्ध झालेल्या कोण्या महर्षिची बुद्धी, संख्यात स्वरूप शब्दांच्या मध्ये लिंग सहीत एकही बीजभूत पदाला पराच्या उपदेशाने प्राप्त करून त्या पदाच्या आश्रयाने संपूर्ण शास्त्रास विचार करून ग्रहण करते. ही बीजबुद्धि आहे.

(५) **कोष्ठबुद्धि** - उत्कृष्ट धारणावाले कोणी मुनि अनेक ग्रंथाच्या शब्दरूप बीजांना बुद्धिने ग्रहण करून मिश्रण रहित बुद्धिरूपी कोठ्यांमध्ये धारण करतो.

(६) **पदानुसारी** - ही बुद्धि आदि, मध्य वा शेवटी गुरूंच्या उपदेशाने एक पदास ग्रहण करून संपूर्ण ग्रंथास ग्रहण करते. या बुद्धिचे अनुसारिणी, प्रतिसारिणी आणि उभयसारिणी असे तीन प्रकार आहेत.

(७) **संभिन्नश्रोतृत्व** - हा ऋद्धिधारी मुनि श्रोत्रेन्द्रियाच्या उत्कृष्ट विषय क्षेत्राच्या बाहेर दशोदिशांना संख्यात योजन प्रमाण क्षेत्रांमध्ये स्थित मनुष्य-तिर्यंचाच्या अक्षरानक्षरात्मक पुष्कळ प्रकारच्या होणाऱ्या शब्दांना ऐकून प्रत्युत्तर देतो.

(८) **दूरास्वादित्व** - जिव्हाइंद्रियांच्या उत्कृष्ट विषय क्षेत्राच्या बाहेर संख्यात योजन प्रमाण क्षेत्रांमध्ये स्थित विविध स्वाद घेतो.

(९) **दूरस्पर्शत्व** - स्पर्शनेन्द्रियाच्या उत्कृष्ट विषय क्षेत्राच्या बाहेर संख्यात योजन प्रमाणे क्षेत्रांमध्ये स्थित आठ प्रकारच्या स्पर्शांना जाणणे.

(१०) **दूरघ्राणत्व** - घ्राण इंद्रियांच्या उत्कृष्ट विषय क्षेत्राच्या बाहेर संख्यात योजनापर्यंत पुष्कळ प्रकारच्या गंधांना ग्रहण करणे.

(११) **दूरश्रवणत्व** - श्रोतेन्द्रियाच्या उत्कृष्ट विषय क्षेत्राच्या बाहेर संख्यात योजनांपर्यंत स्थित अनेक प्रकारच्या मनुष्य आणि तिर्यंचाच्या अक्षरानक्षरात्मक शब्दांना ऐकणे.

(१२) **दूरदर्शित्व** - चक्षु इंद्रियांच्या उत्कृष्ट विषय क्षेत्राच्या बाहेर संख्यात योजनांमध्ये स्थित अनेक प्रकारच्या द्रव्यांना पाहणे हे दूरदर्शित्व आहे.

(१३) **दशपूर्वित्व** - मुनींचे दहा पूर्व वाचल्यास पाचशे महाविद्या आणि सातशे लघु विद्यांचे देवता येऊन मुनींची आज्ञा मागतात. ह्यावेळेस जे महर्षि जितेंद्रिय असल्याने त्या विद्यांची इच्छा करीत नाही ते दशपूर्वी आहे.

(१४) **चौदहपूर्वित्व** - जे ऋषीमुनि संपूर्ण शास्त्र पारंगत होतात, ते श्रुतकेवली होतात. ते चौदा पूर्वी आहेत.

(१५) **अष्टांग महानिमित्त** - ही ऋद्धि नभ, भौम, अंग, स्वर, व्यंजन, लक्षण, चिन्ह आणि स्वप्न ह्या आठ भेदांनी युक्त अशा निमित्त ज्ञानांमध्ये कुशल आहे.

(१६) **प्रज्ञाश्रमणत्व** - ही ऋद्धि प्राप्त असलेले महामुनि अध्ययन केल्याशिवाय १४ पूर्वांमधील अति सूक्ष्म विषय सुद्धा सांगण्यास कुशल असतात. याचे औत्पत्तिकी, पारिणामिकी, वैनयिकी आणि कर्मजा असे चार प्रकार होतात.

(१७) **प्रत्येक बुद्धि** - गुरूंच्या उपदेशाशिवाय कर्माच्या उपशमाने सम्यग्ज्ञान आणि तपांच्या विषयांमध्ये प्रगती होते ती प्रत्येकबुद्धि ऋद्धि आहे.

(१८) **वादित्व** - या ऋद्धिच्या सहाय्याने शक्रादि पक्षाला सुद्धा पुष्कळवाद करून निरुत्तर केल्या जाते.

**विक्रिया ऋद्धिचे अकरा प्रकार** - अणिमा, महिमा, लघिमा, गरिमा, प्राप्ति, प्राकाम्य, ईशत्व, वशित्व,

अप्रतिघात, अर्न्तध्यान आणि कामरूप.

**(१) अणिमा** - अणुएवढे शरीर करणे. या ऋद्धिच्या सहाय्याने महर्षि अणुप्रमाण छिद्रामध्ये प्रविष्ट होऊन चक्रवर्तीचे कटक आणि निवेश यांची रचना करतात.

**(२) महिमा** - मेरु पर्वताएवढे शरीर करणे.

**(३) लघिमा** - वायुपेक्षा सुद्धा लहान शरीर करणे.

**(४) गरिमा** - वज्रापेक्षा सुद्धा अधिक गुरुत्व ज्याचे आहे असे शरीर करणे.

**(५) प्राप्ति** - जमिनीवर राहून अंगुलिच्या अग्रभागाने सूर्य, चंद्र, मेरुशिखर इत्यादींना प्राप्त करणे. अर्थात यांना स्पर्श करणे.

**(६) प्राकाम्य** - या ऋद्धिने पाण्याप्रमाणे पृथ्वीवर सुद्धा चालणे-फिरणे-आणि पृथ्वीवर सुद्धा ज्याप्रमाणे चालतो फिरतो तसेच जलामध्ये सुद्धा चालणे-फिरणे.

**(७) ईशित्व** - सर्व जगावर स्वामित्व असणे.

**(८) वशित्व** - सर्व जीवसमुहाला वश करून घेणे.

**(९) अप्रतिघात** - ह्या ऋद्धिच्या बळाने शैल, शिला आणि वृक्ष ह्यांच्या मध्यातून आकाशाप्रमाणे विहार करणे.

**(१०) अंतर्धान** - ज्याने अदृश्यता प्राप्त होते, ती अंतर्धान नामक ऋद्धि आहे.

**(११) कामरुपित्व** - ज्याने युगपत् अनेक रूपांची रचना होते, ती कामरूप सिद्धी आहे.

**क्रियाऋद्धिचे भेद** - आकाशगामित्व आणि चारणत्व हे दोन भेद आहेत.

**(१) आकाश गामित्व** - ज्या ऋद्धिद्वारा कायोत्सर्ग आसन अथवा अन्य प्रकाराने, उभे राहून किंवा बसून केल्या जाते. त्याला आकाशगमित्व ऋद्धि म्हणतात.

**(२) चारण ऋद्धि** - या ऋद्धिचे जलचारण, जंघाचारण, फलचारण, पुष्पचारण, पत्रचारण, अग्निशिखाचारण, धूम्रचारण, मेघचारण, धाराचारण, मर्कटतंतुचारण, ज्योतिश्चारण आणि मरुच्चारण असे अनेक प्रकार आहेत.

चार अंगुलीप्रमाण पृथ्वीला सोडून आकाशामध्ये घूटने मोडल्याशिवाय जे पुष्कळ योजनांपर्यंत गमन करतात ते जंघाचारण ऋद्धिधारी आहे असे समजावे. असेच सर्वांचे लक्षण समजावे.

**तप ऋद्धिचे भेद** - उग्रतप, दीप्ततप, तप्ततप, महातप, घोरतप, घोर पराक्रम, अघोर ब्रह्मचरित्व अशाप्रकारे तप ऋद्धिचे सात भेद आहेत.

**(१) उग्रतप ऋद्धिचे दोन भेद आहेत** - उग्रोग्रतप, अवस्थित उग्रतप, दीक्षोपवास वगैरे करून आमरणपर्यंत एक एक अधिक उपवास करणे हे उग्रोग्रतप आहे.

दीक्षार्थी अनेक उपवास करून पारणं करेल आणि पुनः एक-एक दिवसाचे अंतर ठेवून उपवास करेल् पुन्हा काही निमित्ताने बेला, तेला इत्यादि क्रमाने उत्तरोत्तर आमरणपर्यंत उपवास वाढवीत जाणे ह्याला अवस्थित उग्रतप ऋद्धि म्हणतात.

**(२) दीप्त तप** - ज्याच्या प्रभावाने मन, वचन, कायेने बलिष्ठ असलेल्या ऋषींची अनेक उपवासाने शरिरकांती सूर्याप्रमाणे दैदिप्यमान होते ते दीप्त तप होय.

**(३) तप्त तप** - ज्याप्रमाणे गरम कढईमध्ये पडलेला कण जळून जातो, त्याप्रमाणे खाल्लेले अन्न धातुंसहित क्षीण होईल. मलमूत्र वगैरे ज्याचे बनत नाही. त्याला तप्त तप म्हणतात.

**(४) महातप** - चार प्रकारच्या सम्यक्ज्ञानाच्या बळाने मुनि मंदरपंक्ति प्रमुख सर्व महान उपवासांना करतात. हे महातप आहे.

**(५) घोर तप** - ज्या बळाच्या सहाय्याने मुनि ज्वर, शूळ (वेदना) इत्यादिंनी ग्रस्त असलेल्या शरीराने सुद्धा दुर्धर तपश्चरण करू शकतात. याला घोर तप म्हणतात.

**(६) घोर पराक्रम** - ज्याच्या प्रभावाने तिन्ही लोकांचा संहार करण्याची शक्ति येते व ह्या शक्तीने अनेक अद्‌भूत कार्य घडतात.

**(७) अघोर ब्रह्मचारित्व** - ज्याच्या प्रभावाने मुनींच्या क्षेत्रात चोरी, कालमहामारी, महायुद्ध इत्यादि उपसर्ग येत नाहीत.

**(८) बलऋद्धिचे भेद** - मन, वचन-कायेच्या भेदाने ह्या ऋद्धिचे तीन भेद आहेत.

**(१) मनबल ऋद्धि** - ह्या ऋद्धिच्या सहाय्याने मुनि अंतर्मुहूर्त मात्र काळांमध्ये संपूर्ण शास्त्राचे चिंतन करतात.

**(२) वचनबल ऋद्धि** - ही ऋद्धि प्राप्त झाल्यावर मुनि श्रमरहित आणि अहिनकंठ असूनसुद्धा एक मुहूर्त मात्र काळात संपूर्ण द्वादशांग शास्त्रांचे उच्चारण करू शकतात.

**(३) कायबलऋद्धि** - या ऋद्धिने मुनि महिना, चार महिनेपर्यंत सुद्धा कायोत्सर्ग करताना श्रमरहित राहतात. तसेच तिन्ही लोकांना करंगळीने उचलून दुसऱ्या ठिकाणी स्थापन करू शकतात.

**औषधि ऋद्धिचे आठ प्रकार** - आमर्षोषधि, क्ष्वेलौषधि, जललौषधि, मल्लौषधि, विपुषौषधि, सर्वोषधि, मुखनिर्विष आणि दृष्टिनिर्विष.

**(१) आमषौषधि** - ज्याच्या प्रभावाने जीव केवळ ऋषिंच्या हात, पाय यांच्या स्पर्शानेच निरोगी होतो.

**(२) क्ष्वेलौषधि** - या ऋद्धिने मुनिंच्या लाळेने, कफाने जीवांचे रोग नष्ट होतात.

**(३) जल्लौषधि** - मुनिंच्या शरीरातील घाम सर्व रोगांना नष्ट करतो.

**(४) विप्रुषौषधिद** - मुनिंचे मूत्र, विष्ठा सुद्धा भयानक रोगांना दूर करते.

**(५) मलौषधि** - मुनिंचे दात, नाक, कान इत्यादिंमधील मळसुद्धा रोगांना नष्ट करतो.

**(६) सवौषधि** - अत्यंत दुष्कर असे तप केलेल्या मुनिंच्या स्पर्शाने पवित्र झालेल्या जलाने, वायुने संपूर्ण व्याधिंचा नाश होतो.

**(७) वचननिर्विष** - (मुखनिर्विष) ह्या ऋद्धिने विषाने युक्त असे अन्न सुद्धा मुनिंच्या वचनाने विषमुक्त होते. तसेच कडूरस सुद्धा गोड होतो.

**(८) दृष्टिनिर्विष** - रोग व विषाने युक्त जीव दृष्टिनिर्विष ऋद्धि ज्यांना प्राप्त आहे अशा मुनिंच्या केवळ पहाण्याने निरोगता प्राप्त करतात.

**रस ऋद्धिचे सहा प्रकार आहेत** - आशीविष, दृष्टिविष, क्षीरस्त्रवी, मधुस्त्रवी, अमृतस्त्रवी आणि सर्पिस्त्रवि.

**(१) आशीविष** - कठीण तप केलेल्या मुनिंद्वारा केवळ 'मरून जा' असे म्हटल्यावर सुद्धा सहसा जीव मरून जातो.

**(२) दृष्टिविष** - ही ऋद्धि ज्यांना प्राप्त आहे त्यांनी केवळ क्रोधाने पाहिल्याने सुद्धा जीव सहसा मरून जातो.[१]

**(३) क्षीरस्त्रवी** - मुनिंच्या हातावर आहारासाठी दिलेले रुक्ष भोजन – दुग्ध परिणाम प्राप्त करतात.

**(४) मधुस्त्रवी** - मुनिंच्या हातातील आहार मधुरस युक्त होतो आणि त्यांचे वचन (उपदेश) मनुष्य आणि

---

१. अशाप्रकारे मुनि ह्या ऋद्धियांच्या प्रयोगाने कोणाचा घात करीत नाही. असे केले नाही तर मुनि राहणार नाही. येथे ऋद्धिच्या शक्तिचा प्रभाव सांगितला आहे.

तिर्यंच यांचे दुःख नष्ट करण्यास सहाय्यक होते.

**(५) अमृतस्त्रवी** - मुनिंच्या हातातील रुक्ष आहार अमृताप्रमाणे गोड होतो. आणि त्यांचा उपदेश अमृताप्रमाणे तुष्टीप्रद होतो.

**(६) सर्पिस्त्रवी** - मुनिंच्या हातातील रुक्ष आहार क्षणात घृत रूपात बदलतो. त्यांचे बोलणे दुःख वगैरे शांत करतात.

**क्षेत्रऋद्धिचे दोन भेद आहेत** - अक्षीणमहानसिक आणि अक्षीणमहालय.

**अक्षीण महानसिक** - ज्या ऋद्धिंच्या प्रभावाने मुनिंच्या आहारातील बाकी उरलेले अन्न जो कोणी खाईल तो लेशमात्र सुद्धा क्षीण होत नाही.

**अक्षीण महालय** - ज्या ऋद्धिंच्या प्रभावाने समचतुष्कोण चार धनुष्य प्रमाण क्षेत्रांमध्ये असंख्यात मनुष्य आणि तिर्यंच यांचा समावेश होतो. ही अक्षीण महालय सिद्धि आहे.

घोराघोर तपश्चरण करणाऱ्या मुनिंना ह्या ऋद्धि प्राप्त होतात. गणधर देवांना ह्या ऋद्धि क्षणातच प्राप्त होतात. ह्या ऋद्धि भावलिंगी मुनिंनाच प्रगट होतात. इतरांना होत नाहीत.

## सल्लेखना

मनुष्य इत्यादि भवांच्या पर्यायांचे नाश होणे याला 'मरण' म्हणतात.

**ह्या मरणाचे पाच भेद आहेत** - [1]पण्डित-पण्डित मरण, पण्डित मरण, बाल पण्डित मरण, बाल मरण, बाल-बाल मरण.

**पण्डित-पण्डित मरण** - क्षीणकषाय केवली भगवंतांना पण्डित-पण्डित मरण येते. अर्थात् केवली मरणाचे पण्डित-पण्डित मरण नाव आहे.

**पण्डित मरण** - सहाव्या गुणस्थानापासून अकराव्या गुणस्थानापर्यंत होणारे मरण पण्डित मरण आहे.

**बाल पण्डित मरण** - विरता विरत देशसंयमाच्या मरणाला बाळ पण्डित मरण म्हणतात.

**बाल मरण** - मिथ्यादृष्टि जीवांचे मरणे, अपघाताने मरणे हे सर्व बाल-बाल मरण आहे. कारण हे जीव वारंवार जन्म-मरण करीत राहतात.

## पण्डित मरण

पण्डित मरणाचे तीन भेद आहेत. वादोपगमन, भक्तप्रतिज्ञा आणि इंगिनीमरण.

**पादोपगमन** - आपल्या पायाने संघातून निघून योग्य प्रदेशात जाऊन जे मरण होते त्याला पादोपगमन मरण म्हणतात. यामध्ये मुनिराज आपल्या शरीराची वैयावृत्ति स्वयं करीत नाहीत. आणि दुसऱ्या मुनिद्वारा सुद्धा करवून घेत नाहीत. विशिष्ट संहनन ज्यांना आहे असेच मुनि या मरणास स्वीकार करतात.

**भक्त प्रतिज्ञा मरण** - आहाराचा त्याग करणे भक्तप्रतिज्ञा मरण आहे. ह्या मरणांत स्वतः आणि दुसऱ्यांकडून वैयावृत्ति करून घेता येते.

**इंगिनी मरण** - स्वाभिप्रायास इंगिनी म्हणतात. स्वतःच स्वतःची सेवा-शुश्रुषा करतांना जे मरण येते त्याला इंगिनी मरण म्हणतात. यामध्ये मुनि दुसऱ्या मुनिंकडून सुश्रुषा करवून घेत नाहीत.

या काळांमध्ये पादोगमन आणि इंगिनी मरण करण्यास योग्य अशा संहननाचा अभाव आहे. म्हणून भक्तप्रतिज्ञा मरणाचे येथे स्पष्टीकरण केल्या जाते.

---

१. मूलाराधना गाथा २६ पृ० १०४

**भक्त प्रत्याख्यान मरणाचे दोन भेद आहेत** - सविचार भक्त प्रत्याख्यान आणि अविचार भक्त प्रत्याख्यान.

जो गृहस्थ अथवा मुनि उत्साही आणि बलयुक्त आहे. ज्याचे काही काळानंतर मरण होईल त्यांचे सविचार भक्त प्रत्याख्यान मरण होते. याच्या विपरीत अकस्मात मरण आल्यावर पराक्रम रहित साधुंचे मरण अविचार भक्तप्रत्याख्यान आहे.

भक्त प्रत्याख्यानाचा जघन्य काळ अन्तर्मुहूर्त आहे. आणि उत्कृष्ट काळ द्वादशवर्ष प्रमाण आहे. अर्थात कोणतेही मुनि निमित्त ज्ञानाने[1] आपले आयुष्य बारा वर्षाच्या आत ठरवून घेतात ते मुनि उत्कृष्ट सल्लेखना प्राप्त करतात.

[2]ह्या मुनिंनी बारा वर्ष कशाप्रकारे रहावे याचे वर्णन करतात – या बारा वर्षातील चार वर्ष अनेक प्रकारचे अनशन, अवमौदर्य, सर्वतोभद्र, एकावली, द्विकावली, रत्नावली, सिंहावलोकन इत्यादि तपांचे अनुष्ठान करिता-करिता पूर्ण करावे. यापुढील चार वर्ष रसपरित्याग नावाच्या तपाने पूर्ण करावे. पुनः पुढील दोन वर्षापर्यंत अल्प भोजन, नीरस भोजन करावे. पुन्हा पुढील एक वर्षापर्यंत अल्प आहार करावा. पुढील सहा महिने अनुत्कृष्ट तप करावे. पुन्हा सहा महिन्यांपर्यंत सर्वोत्कृष्ट तप करावे व सल्लेखना घ्यावी. अशाप्रकारे भक्तप्रत्याख्यान सल्लेखना कषायांना मंद करतांना शरीरास सुद्धा कृश करता-करता मरणास प्राप्त करावे. याचेच नाव 'सल्लेखना' आहे.

आचार्य योग्य शिष्यास आपले आचार्य पद देऊन सल्लेखना करण्यासाठी स्वयं संघाचा त्याग करून दुसऱ्या संघात जाऊन सल्लेखना ग्रहण करतात. किंवा आपल्या संघांतच सल्लेखना घेतात. जे सल्लेखना ग्रहण करतात त्यांना क्षपक म्हणतात. आणि जे आचार्य त्यांना सल्लेखना देतात त्यांना निर्यापकाचार्य म्हणतात.

आचार्यांनी एका मुनिंच्या सल्लेखनाच्या वेळेस अठ्ठेचाळीस मुनिंची आवश्यकता सांगितली आहे. योग्य वस्तीमध्ये क्षपकाला सल्लेखना देऊन अठ्ठेचाळीस मुनि काय-काय करतात ते सांगितले आहे –

चार मुनि क्षपकाला उठवितात, बसवितात, सेवेचे काम करतात. अशाप्रकारे संयमात बाधा येऊ नये याकडे लक्ष देतात.

चार मुनि क्षपकाला धर्म श्रवण करवितात.

चार मुनि आचारांगाच्य अनुकुल आहार देतात.

चार मुनि पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करतात.

चार मुनि क्षपकाची रक्षा करतात.

चार मुनि क्षपकाच्या शरीराच्या मळास दूर करतात.

चार मुनि क्षपकाच्या वसतिगृहाचे द्वारपाल होतात.

चार मुनि दर्शनार्थिंना संबोधन करतात.

चार मुनि रात्री जागरण करून क्षपकाची देखभाल करतात.

चार मुनि देश प्रवृत्ति पाहतात.

चार मुनि येणाऱ्यांना कथा वगैरे ऐकवितात.

चार मुनि वाद-विवाद करून अन्य मताचे निराकरण करतात.

असे हे अठ्ठेचाळीस निर्यापक मुनि प्रयत्नपूर्वक क्षपकाला समाधिमरण देऊन संसार समुद्रास पार करवितात. अर्थात समाधिच्या वेळेस इतक्या मुनिंचा संयोग नाही मिळाला तर जितके असतील तितक्यांतच वरील व्यवस्था करून घ्यावी लागते. कमीत कमी दोन मुनि क्षपकाजवळ असणे अत्यंत आवश्यक आहे.

---

१. आचारसार पृ० २५७.

२. भगवती आराधना पृ० १३५.

अशाप्रकारे सल्लेखना मरण प्राप्त करणारे भव्य जीव जास्तीत जास्त आठ भव आणि कमीत-कमी दोन तीन भव जन्म-मरण ग्रहण करतात नंतर मोक्ष सुख प्राप्त करतात.

## पाच प्रकारचे मुनि

पुलाक, बकुश, कुशील, निर्ग्रंथ आणि स्नातक हे पाच भेद निर्ग्रन्थ मुनींचे होतात.

**पुलाक**[1] - जे उत्तरगुणांच्या भावनांनी रहित असतात. कुठेही त्यांच्या व्रतांची परिपूर्णता होत नाही अशा साधूंना पुलाक मुनि म्हणतात. हे भावसंयमी असतात. द्रव्यलिंगी नाही.

**बकुश** - हे मुनी निर्ग्रन्थ होतात. व्रतांना अखंड रूपाने पाळतात. शरीर व उपकरण यांची शोभा वाढविण्यासाठी प्रयत्न करतात. शिष्य यांना नेहमी घेरून ठेवतात व अनेक प्रकारच्या मोहांनी युक्त असतात.

**कुशीलाचे दोन भेद आहेत** - प्रतिसेवना कुशील आणि कषाय कुशील.

जे परिग्रहाने युक्त आहे. जे मुळ व उत्तर गुणांनी परिपूर्ण आहेत. परंतु कधी कधी उत्तरगुणांची आराधना करतात ते प्रतिसेवना कुशील मुनी आहेत.

ज्यांनी अन्य कषायांच्या उदयास जिंकले आहे. जे केवळ संज्वलन कषायांच्या आधीन आहेत. त्यांना कषाय कुशील मुनी म्हणतात.

**निर्ग्रन्थ** - ज्याप्रमाणे पाण्यामध्ये काडीने रेखा ओढली तरी ती प्रगट होत नाही. त्याचप्रमाणे ज्यांच्या कर्मांचा उदय अप्रगट आहे. ज्यांना अन्तर्मुहूर्तानंतर होणारे केवलज्ञान-केवलदर्शन प्राप्त होते. त्यांना निर्ग्रन्थ म्हणतात.

**स्नातक** - ज्यांनी घातीया कर्मांचा नाश केला आहे. असे दोन्ही प्रकारचे केवली स्नातक म्हटल्या जातात. ह्या पाचही प्रकारच्या मुनींना निर्ग्रन्थ म्हणतात. यांच्यामध्ये चारित्र परिणामांची कमी-अधिकता असली तरी नैगम, संग्रह इत्यादि नयाच्या अपेक्षेने सर्व निर्ग्रन्थ आहेत, अर्थात भावलिंगी मुनी आहेत.

**संयमीयांची संख्या** - प्रमत्त गुणस्थान असलेले मुनी ५३९८२०६, अप्रमत्त मुनी २९६९९१०३, उपशम श्रेणीचे मुनि चारगुणस्थावर्ति ११९६, क्षपक श्रेणीचे ४ गुणस्थानवर्ती २३९३, सयोगीजिन ८९८५०२, अयोगीजिन ५९८ अशाप्रकारे सर्व संयमींची संख्या मिळून ८९९९९९७ आहे. अर्थात सहाव्या गुणस्थानापासून चौदाव्या गुणस्थानापर्यंत सर्व संयमीचे प्रमाण नऊ करोडास तीन कमी असे आहे. या सर्वांना मी हात जोडून, मस्तक झुकवून नमस्कार करतो.

### ध्यान

बारा प्रकारच्या तपांमध्ये आभ्यंतर तपाच्या सहा भेदापैकी अंतीम तप ध्यान तप आहे. ह्या ध्यानतपाच्या सहाय्याने मुनी कर्मांचा नाश करतात.

'सर्व[2] सारामध्ये सारभूत वस्तु कोणती आहे ? तर ते ध्यानच आहे असे सर्व-दर्शियींनी म्हटले आहे.

**ध्यानाचे लक्षण** - एका[3] विषयात चित्तवृत्तींना रोकणे याला ध्यान म्हणतात. उत्तम संहनन ज्याचे आहे त्यांना ध्यानअन्तर्मुहूर्तामध्ये होऊ शकते.

---

१. पुलाक – सर्वार्थसिद्धि पृ० ३५३

२. सर्व सारामध्ये सारभूतवस्तु ध्यान आहे.
जो सारो सव्वसारेसु सो सारो एस गोयम ।
सारं झाणंति णामेण सव्वं बुद्धेहिं देसिदं ॥ – (पाक्षिक प्रतिक्रमण)

३. ध्यानाचे लक्षण –
'उत्तम संहननस्यैकाग्रचिंतानिरोधो ध्यानमांतर्मुहूर्तात्' ॥२७॥ – (तत्त्वार्थसूत्र नववा अध्याय)

**ध्यानाचे चार भेद आहेत** - आर्त, रौद्र, धर्म आणि शुक्ल. यापैकी आर्त, रौद्र ध्यान संसारास कारणीभूत आहे. आणि धर्म व शुक्ल ध्यानाने मोक्ष प्राप्त होऊ शकतो.

## आर्तध्यान

पीडा किंवा कष्टाने उत्पन्न झालेल्या ध्यानास आर्तध्यान म्हणतात.

**याचे चार भेद आहेत.**

विष, कंटक, शत्रु इत्यादि अप्रिय पदार्थांचा संयोग झाल्यावर 'ते कसे दूर होतील' अशाप्रकारे चिंता करणे अनिष्ट–संयोगज आर्तध्यान आहे.

आपले इष्ट पुत्र, स्त्री आणि धन वगैरेंचा वियोग झाल्यावर त्यांच्या प्राप्तीसाठी निरंतर चिंता करणे द्वितीय इष्ट वियोगज आर्तध्यान आहे.

वेदना झाल्यानंतर ती दूर करण्यासाठी सतत चिंता करणे तिसरे वेदनाजन्य आर्तध्यान आहे.

भविष्यकाळातील विषयांच्या प्राप्तीसाठी निरंतर चिंता करणे चौथे निदानज आर्तध्यान आहे. हे आर्त ध्यान सहाव्या गुणस्थानापर्यंत होऊ शकते. सहाव्या गुणस्थानात निदान नावाचे आर्तध्यान होऊ शकत नाही.

## रौद्रध्यान

क्रूर परिणामांनी उत्पन्न झालेल्या ध्यानास रौद्र ध्यान म्हणतात. त्याचे चार भेद आहेत.

हिंसा करण्यात आनंद मानणे. हिंसानन्द रौद्रध्यान आहे. खोटे बोलण्यात आनंद मानणे मृषानन्द रौद्रध्यान आहे. चोरीमध्ये आनंद मानणे चौर्यानन्द रौद्रध्यान आहे. विषयांच्या संरक्षणांत आनंद मानणे परिग्रहानन्द रौद्रध्यान आहे.

रौद्रध्यान पाचव्या गुणस्थानापर्यंत होऊ शकते. परंतु देशविरत व्रत ज्यांना आहे त्यांना रौद्रध्यान नरक आणि दुर्गतिचे कारण होऊ शकत नाही.

## धर्मध्यान

संसार, शरीर आणि विषय भोगापासून विरक्त होण्यासाठी झालेल्या भावांच्या स्थिरतेसाठी जे ध्यान केले जाते त्याला धर्मध्यान म्हणतात.

धर्मध्यानाचे चार प्रकार आहेत. आज्ञा, अपाय, विपाक आणि संस्थान. यांच्या अभ्यासासाठी मनास एकाग्र करणे याला धर्मध्यान म्हणतात.

सर्वज्ञ प्रणित आगमास प्रमाण मानून 'हे अशाच प्रकारे आहे' कारण जिनेंद्र भगवान अन्यथावादी नाहीत. सूक्ष्म पदार्थांचे अशाप्रकारे श्रद्धान करणे आज्ञाविचय धर्मध्यान आहे.

मिथ्यादृष्टीप्राणी वाईट मार्गापासून कसे दूर जातील ? अशाप्रकारे निरंतर चिंतन करणे अपाय विचय धर्मध्यान आहे.

ज्ञानावरणादि कर्मांचे, द्रव्य, क्षेत्र, काळ, भव आणि भाव यांच्या निमित्ताने मिळणाऱ्या फळाचा उपयोग करणे विपाक विचय धर्मध्यान आहे.

लोकाचा आकार व स्वभाव याविषयी निरंतर चिंतन करणे संस्थानविचय धर्मध्यान आहे.

दुसऱ्या ठिकाणी धर्मध्यानाचे[१] दहा भेद मानले आहेत. ते अशाप्रकारे – (१) अपायविचय, (२) उपायविचय, (३) विपाक विचय, (४) विराग विचय, (५) लोक विजय, (६) भवविचय, (७) जीव विचय,

१. धर्मध्यानाचे दहा भेद मानले आहेत. प्रतिक्रमण ग्रन्थत्रयी.

(८) आज्ञा विचय, (९) संस्थान विचय आणि (१०) संसार विचय. असे धर्मध्यानाचे दहा भेद आहेत.

पुढे संस्थान विचय धर्मध्यानाचे विशेष रूपाने वर्णन केले आहे.

मुख्य रूपाने संस्थान विचय आणि धर्मध्यानाचे स्वामी[१] मुनीच आहेत. परंतु गौणरूपाने असंयत सम्यग्दृष्टी आणि देशविरत श्रावक सुद्धा होऊ शकतात. अर्थात यथाशक्ति श्रावकांनी सुद्धा ध्यानाचा अभ्यास केला पाहिजे.

## संस्थान विचय धर्मध्यान

संस्थान विचय[२] धर्मध्यानाचे चार भेद आहेत. पिंडस्थ, पदस्थ, रूपस्थ आणि रूपातीत.

**पिंडस्थ ध्यान** - पिंडस्थ ध्यानामध्ये श्री वर्धमान स्वामीने पाच धारणा सांगितल्या आहेत. या ध्यानाच्या प्रभावाने संयमी मुनि ज्ञानी होऊन संसाररूपी बंधनाला तोडू शकतो.

धारणांची नावे – पार्थिवी, आग्नेयी, श्वसना, वारुणी आणि तत्त्वरूपवती.

**पार्थिवी धारणा** - सर्वप्रथम योगीने मध्य लोकामध्ये स्वयंभू रमण समुद्रापर्यंत जो तिर्यक्लोक आहे त्याचे व कल्लोलरहित क्षीर समुद्राचे ध्यान केले पाहिजे. या समुद्राच्या मध्यभागी सुंदर, सुवर्ण प्रभा असलेले आणि जंबूद्वीपसदृश एक लाख योजन विस्तृत सहस्त्रदल कमळ आहे त्या कमळाचे चिंतन केले पाहिजे. त्या कमळाच्या मध्यभागी मेरु सदृश आणि पीत रंगाची कर्णिका आहे. या कर्णिकेवर श्वेत वर्णाचे सिंहासन आहे. या सिंहासनावर योगीने शांतपणे आत्म्याच्या स्वरूपाचे चिंतन करावे.

पुन्हा त्या सिंहासनावर बसून 'माझा आत्मा कर्मांचा नाश करण्यासाठी प्रयत्नशील आहे.' असे चिंतन केले पाहिजे.

**आग्नेयी धारणा** - त्यानंतर योगी ध्यान करतो की – 'आपल्या नाभिमंडळामध्ये सोळा उंच उंच पानांचे एक कमळ आहे. त्या पानांवर क्रमाने अ, आ, इ, ई, उ, ऊ, ऋ, ॠ, ऌ, ॡ, ए, ऐ, ओ, औ, अं, अः हे सोळा अक्षर लिहिले आहेत. कमळाच्या कर्णिकेवर 'र्हं' महामंत्र विराजमान आहे. पुन्हा विचार करा की, – हृदयांमध्ये स्थित असलेले एक कमळ अधोमुख आहे, त्याला आठ पाकळ्या आहेत. त्याच्या आठ पानांवर क्रमाने आठ कर्म विराजमान आहेत. नाभी कमळाच्या 'र्हं' पासून अग्नीज्योत निघून वर वाढता वाढता अष्टकर्मदल कमळास भस्म करीत आहे. कमळास ज्वालेने भस्म करून अग्नी बाहेर येऊन त्रिकोण अग्नी बनतो. अर्थात् ज्वाला समुह जळतांना वडवानलाच्या प्रमाणे दिसतो. बाह्य त्रिकोण अग्नी बीजाक्षर 'र' पासून तयार होऊन शेवटी स्वस्तिकाप्रमाणे चिन्ह तयार होते. उर्ध्व वायुमंडळापासून उत्पन्न झालेला, कांचनसारखी प्रभा ज्याची आहे असा बाह्य त्रिकोण अग्नी आहे. हा अग्नीसमूह नाभीस्थ कमळ आणि शरीरास भस्म करून हळुहळू स्वतः शांत होतो.

**श्वसना धारणा** - पुन्हा तो ध्यानी विचार करतो की – आकाशामध्ये विचरण करणारा महावेगवान वायुमंडळ आहे. अर्थात पर्वतांना कंपीत करणारा तेज गतिने वायु चालत आहे. आणि शरीरातील जे भस्म वगैरे आहे त्यांना या वायुने नाश केले व एकदम शांत झाले आहे.

**वारुणी धारणा** - पुन्हा वीज, इंद्रधनुष्य इत्यादिसहित मेघमंडळ चारी दिशांनी मुसळाधार वर्षा करीत आहे. ह्या वर्षेने शरीर जळल्याने उत्पन्न झालेल्या सर्व भस्मांचे प्रक्षालन होते.

---

१. संस्थान विचय धर्मध्यानाचे स्वामी मुनीच आहेत.
किं च कैश्चिद्य धर्मस्य चत्वारः स्वामिनः स्मृताः ।
सदृष्ट्याद्यप्रमात्तान्ता यथायोग्येन हेतुना ॥ – ज्ञानार्णव पृ० २८२.

२. संस्थान विचय धर्मध्यान आणि शुक्लध्यानयाचे वर्णन ज्ञानार्णवाच्या आधारे केले आहे.

**तत्त्वरूपवती धारणा** - तपश्चात 'मी सर्व धातुंनी रहित पूर्णचंद्राप्रमाणे निर्मल, सर्वज्ञ, सदृश झालो आहे. सिंहासनावर आरूढ असून देव–असुर इत्यादिकडून पूजेस प्राप्त झालो आहोत.' असे योगीने चिंतन केले पाहिजे. आठही कर्मांनी रहित अशा पुरुषाकाराचे चिंतन केले पाहिजे.

अशाप्रकारे पिंडस्थ स्थानांमध्ये निश्चल अभ्यास करतांना ध्यानी मुनी मोक्षसुख शीघ्र प्राप्त करतो.

## पदस्थ ध्यान

अनेक पवित्र मंत्राचे अक्षर-स्वरूप पदांचे अवलंबन करून योगी त्याचे ध्यान-चिंतन करतो. याला पदस्थ ध्यान म्हणतात.

**वर्णमातृकेचे ध्यान** - अनादि सिद्धांतामध्ये प्रसिद्ध असलेल्या वर्ण मातृकांचे ध्यान केले पाहिजे. त्याची विधि अशाप्रकारे –ध्यानी मनुष्यास नाभीमध्ये स्थित असलेल्या सोळा पाकळ्यांच्या कमळाच्या पानांवर क्रमाने 'अ, आ, इ,. ई, उ, ऊ, ऋ, ॠ, ऌ, ॡ, ए, ऐ, ओ, औ, अं, अः' असलेल्या अक्षरांचे चिंतन केले पाहिजे. पुन्हा हृदयात अक्षरांचे ध्यान केले पाहिजे. अर्थात कर्णिकेवर 'क' पासून क्रमाने प्रत्येक पाकळीवर क, ख, ग, घ, ङ, च, छ, ज, झ, ञ, ट, ठ, ड, ढ, ण, त, थ, द, ध, न, प, फ, ब, भ, म हे पंचविस अक्षर आहेत. त्यानंतर आठ पानांनी विभूषित अशा मुख कमळाच्या प्रत्येक पाकळीवर य, र, ल, व, श, ष, स, ह ह्या आठ वर्णांचे ध्यान केले पाहिजे. अशाप्रकारे वर्णमातृकाचे ध्यान करणारा मनुष्य समस्त श्रुत पारंगत-श्रुत केवली होतो. याच्या जपाने क्षयरोग, अरुचि, अग्निमंदता, कुष्ठ, उदररोग, श्वास-कास इत्यादि रोग होत नाही व त्याला वचनसिद्धि सुद्धा प्राप्त होते.

अशाच प्रकारे हृदय-कमळ, ललाट इत्यादि मध्ये 'ॐ' 'ह्री' इत्यादि मंत्राचे ध्यान केले पाहिजे.

हृदयामध्ये आठ पाकळ्यांचे कमळ स्थापित करून त्याच्या कर्णिकेवर 'णमो अरिहंतांण' त्या कर्णिकेच्या बाहेरील आठ पानांपैकी चार दिशांच्या चार पानांवर क्रमाने 'णमो सिद्धाणं, णमो आइरियाणं, णमो उवज्झायाणं, णमो लोए सव्वसाहूणं' ह्या मंत्राचे ध्यान करावे. चार विदिशाच्या चार पानांवर 'सम्यग्दर्शनाय नमः, सम्यग्ज्ञानाय नमः, सम्यक्चारित्राय नमः, सम्यक्तपसे नमः' ह्या चार मंत्रांचे चिंतन करावे.

अशाच अनेक मंत्रांचे ध्यान केले पाहिजे. जेणेकरून चंचल मन स्थिर झाले पाहिजे. सातिशय पुण्याचा बंध होऊन तमाम पाप कर्माची निर्जरा होते.

## रूपस्थ आणि रूपातीत ध्यान

ह्या रूपस्थ ध्यानामध्ये समवशरणामध्ये स्थित असलेल्या अर्हंत परमेष्ठीचे ध्यान केले जाते.

शास्त्रांतून समवशरणाचे विस्तृत वर्णन समजून घेऊन त्याचे ध्यान करावे.

रूपातीत ध्यानामध्ये अमूर्त, अजन्मा, इंद्रिये ज्यांनी जिंकली आहेत असे परमात्मा, सिद्ध परमेष्ठीचे ध्यान केले जाते. जो ध्यानी आपल्या आत्म्यास शुद्ध, बुद्ध निरंजन, निर्विकार, परमात्मस्वरूप समजून चिंतन करतो. 'मीच सर्वज्ञ आहे. सर्वव्यापक आहे, सिद्ध आहे' इत्यादि अनेक रूपाने ध्यानी आपल्या शुद्ध आत्म्याचे ध्यान करतो.

अशाप्रकारे ध्यानी रूपातीत ध्यानामध्ये सिद्ध परमेष्ठीच्या ध्यानाचा अभ्यास करून शक्तीच्या अपेक्षेने स्वतःस त्यांच्या सारखेच समजतो. आपणास त्यांच्यासारखेच बनविण्यासाठी आपल्या आत्म्यात लीन होऊन

जातो. त्याच्या ह्या ध्यानाने त्याच्या कर्मांचा नाश होऊन तो सिद्ध परमेष्ठी होतो.

## शुक्ल ध्यान

ज्याप्रमाणे अचल दीपक सघन अंधकारास नष्ट करतो अशाच प्रकारे मुनींचे सुनिश्चल धर्मध्यान सर्व कर्मकलंक समूहास शीघ्र नष्ट करण्यास सहाय्यक होते.

ज्यांना उत्तम संहनन प्राप्त आहे, ज्यांना वैराग्य प्राप्त झाले आहे असेच पुरुष आपल्या चित्तास शुक्लध्यान करण्यासाठी निश्चल करण्यास समर्थ होतात. अर्थात उत्तम संहननधारी मुनि शरीरास छेदणे, भेदणे, मारणे आणि जाळणे अशा क्रिया केल्या तरी ध्यानापासून चलायमान होत नाही. जो आपला आत्मा शरीरापासून भिन्न समजतो. चित्राप्रमाणे मूर्तिवत् निश्चल राहतो. तोच शुक्लध्यानास प्राप्त करू शकतो.

ज्याला प्रथम वज्रवृषभनाराचसंहनन आहे, जो अकरा अंग आणि चौदा पूर्व यांना समजतो, शुद्ध चारित्रवान् आहे असेच मुनी चारी प्रकारच्या शुक्लध्यानास धारण करण्यास योग्य होतात.

**शुक्लध्यानाचे लक्षण** - जो निष्क्रिय आहे, इंद्रियातीत आहे 'मी याचे ध्यान करू' अशा प्रकारच्या विकल्पाने रहित आहे. ज्यामध्ये चित्त आपल्या स्वरूपाच्या समोर आहे अशा आत्म्याच्या शुचिगुण संबंधाने हे शुक्लध्यान म्हटले जाते.

**शुक्लज्ञानाचे चार भेद आहेत** - पृथक्त्व वितर्क, एकत्ववितर्क, सूक्ष्मक्रिया प्रतिपाति आणि व्युपरत क्रियानिवृत्ति. या चारपैकी पहिले दोन ध्यान छद्मस्थ योगी – बारावे गुणस्थानापर्यंत श्रुतकेवलिंना होते व शेवटचे दोन ध्यान केवलज्ञानींनाच फक्त होतात.

**पृथक्त्व वितर्क** - ज्यामध्ये पृथक-पृथक रूपाने श्रुतज्ञान बदलत राहते. अर्थव्यंजन आणि योग यांचे संक्रमण होत राहते व हेच प्रथम शुक्लध्यान आहे.

**एकत्व वितर्क** - ज्यामध्ये अर्थ, व्यंजन इत्यादिंचे संक्रमण होत नाही. जो एकाच रूपाने स्थित आहे त्याला एकत्व वितर्क म्हणतात.

प्रथम शुक्लध्यानाने मोहनीय कर्माचा उपशम व क्षय होतो. आणि द्वितीय शुक्लध्यानाने बाराव्या गुणस्थानामध्ये उरलेल्या तीन घातिया कर्माचा नाश होत जातो.

हे योगी द्वितीय शुक्लध्यानाने घातिया कर्माचा नाश करून लोकालोक प्रकाशी केवलज्ञानास प्राप्त करून घेतात. आणि नवकेवललब्धिचे स्वामी, परमात्मा होतात. समवशरणामध्ये विराजमान झालेले भगवान अनेक वर्ष भव्य जीवांना धर्मोपदेश देतात आणि शेवटी योग निरोध करतात.

ज्या जिनदेवाची उत्कृष्ट आयु सहा महिने बाकी राहिली असताना जे केवली होतात त्यांना अवश्यही समुद्रघात होतो आणि सहा महिन्यापेक्षा अधिक आयु बाकी राहिली असतांना केवली झाले तर समुद्रघात होतो किंवा होत सुद्धा नाही.

जेव्हा केवली भगवंतांची आयु अन्तर्मुहूर्तमात्र बाकी राहते तेव्हा त्यांचे बादर मनोवचन योग सूक्ष्म होऊन बादरकाययोग सुद्धा सूक्ष्म-सूक्ष्म होतो. सूक्ष्म वचन मनोयोगाचा निग्रह करून सूक्ष्म एक काय योगामध्ये स्थिर होऊन जातो. त्यांच्या ह्या ध्यानास सूक्ष्मक्रियाप्रतिपाति म्हणतात. नंतर सूक्ष्म काय योगाने रहित होऊन केवली चौदाव्या गुणस्थानांमध्ये अयोगी होतात. त्यांच्या शेवटच्या समयापूर्वी चौथा व्युपरत क्रिया निवृत्ति नावाचे शुक्लध्यान प्रगट होते. ह्या ध्यानाने बहात्तर प्रकृतिंचा नाश होऊन अंतीम समयी बाकी तेरा प्रकृतिंचा विलय

होतो. ह्या चौदाव्या गुणस्थानाचा काळ लघु ह्स्वाकार 'अ इ उ ऋ ऌ' यांचा उच्चारण काळ प्रमाण आहे. यानंतर हे अयोगी भगवान कर्मांच्या बंधनातून मुक्त होऊन एक समयामध्ये उर्ध्वगमन स्वभावी असल्यामुळे लोकाकाशाच्या अग्रभागी विराजमान होतात. लोकाकाशाच्या पुढे धर्मास्तिकायचा अभाव असल्यामुळे पुढे जाऊ शकत नाही. म्हणून नेहमीसाठी तेथेच विराजमान होतात.

योगीश्वरांचे पति श्री सिद्धभगवानांच्या ज्ञान रूपी सूर्यामध्ये भूत, भविष्य आणि वर्तमानासंबंधी सर्व द्रव्य पर्यायांनी व्याप्त असे जे जग आहे ते एका समयात स्पष्टपणे प्रतिभाषित होते. असे सिद्ध भगवान आम्हा सर्व लोकांना सिद्धी प्रदान करोत !

या अनुयोगामध्ये श्रावकधर्म आणि मुनिधर्म यांचे वर्णन केले आहे. विशेष जिज्ञासा ज्यांना आहे त्यांना रत्नकरंडश्रावकाचार, पुरुषार्थसिद्ध्युपाय, सागारधर्मामृत, मूलाचार, भगवती आराधना, चारित्रसार, आचारसार, अनगारधर्मामृत इत्यादि ग्रंथांचा स्वाध्याय केला पाहिजे.

# चतुर्थ खण्ड

# द्र व्या नु यो ग

जीवाजीवसुतत्वे पुण्यापुण्ये च बन्धमोक्षौ च ।
द्रव्यानुयोगदीपः श्रुतविद्यालोकमातनुते ॥ ४६ ॥

अर्थ - द्रव्यानुयोगात जीव-अजीव अशा सुतत्वांचे, पुण्य-पाप, बंध आणि मोक्ष इत्यादीचे विस्तृत वर्णन केले आहे. अर्थात ज्यामध्ये पुण्य-पाप आणि बंध-मोक्ष ह्या सहा द्रव्यांचे विस्तृत वर्णन राहते तो द्रव्यानुयोग आहे.

# सहा द्रव्यांचे वर्णन

**द्रव्याचे लक्षण** - द्रव्याचे[१] लक्षण सत् आहे. अथवा गुण[२] आणि पर्यायाच्या समुहाला द्रव्य म्हणतात.

**द्रव्य सहा आहेत** - जीव, पुद्गल, धर्म, अधर्म, आकाश आणि काल.

## जीवाचे लक्षण

जीवाचे[३] लक्षण उपयोग आहे.

**जीव द्रव्याला विशेष समजण्यासाठी नऊ अधिकार सांगितले आहेत.** - जीवत्व[४], उपयोगमयत्व, अमूर्तिकत्व, कर्तृत्व, स्वदेहपरिमाणत्व, भोक्तृत्व, संसारित्व, सिद्धत्व आणि स्वभावाने उर्ध्वगमनत्व - हे जीवाचे नऊ अधिकार आहेत.

**जीवत्व** - व्यवहारनयाने ज्यांना तिन्ही काळात इंद्रिय, बल, आयु आणि श्वासोच्छवास हे चार प्राण असतात आणि निश्चयनयाने ज्यांना चेतना असते त्याला जीव म्हणतात.

**उपयोगमयत्व** - उपयोग दोन प्रकारचा आहे. दर्शनोपयोग आणि ज्ञानोपयोग. दर्शनोपयोगाचे चक्षुदर्शन, अचक्षुदर्शन, अवधिदर्शन आणि केवलदर्शन असे चार भेद आहेत. आणि ज्ञानोपयोगाचे मतिअज्ञान, श्रुतअज्ञान, कुअवधिज्ञान, मतिज्ञान, श्रुतज्ञान, अवधिज्ञान, मनःपर्यय ज्ञान व केवलज्ञान असे आठ भेद आहेत. व्यवहारनयाने उपयोगाचे बारा प्रकार साधारणतः जीवाचे लक्षण आहे. शुद्ध निश्चयनयाने शुद्ध दर्शन, ज्ञान हेच जीवाचे लक्षण आहे.

**अमूर्तिकत्व** - निश्चयनयाने जीवामध्ये पाच वर्ण, पाच रस, दोन गंध आणि आठ स्पर्श राहत नाही. ह्या कारणाने जीव अमूर्तिक आहे. व्यवहारनयाने कर्मबंधांनी युक्त असल्यामुळे मूर्तिक आहे.

**कर्तृत्व** - व्यवहारनयाने जीव ज्ञानावरण इत्यादि पुद्गल कर्मांचा, अशुद्ध निश्चयनयाने रागादि भावकर्माचा आणि शुद्ध निश्चय नयाने शुद्धज्ञान इत्यादि चेतन भावांचा कर्ता आहे.

**भोक्तृत्व** - हा जीव व्यवहारनयाने पुद्गलमयकर्मांचे फळ सुख व दुःख भोगतो. आणि निश्चयनयाने आत्म्याच्या शुद्ध दर्शन आणि शुद्ध ज्ञानरूपी भावांना भोगतो.

**स्वदेहपरिमाणत्व** - जीव व्यवहारनयाने समुद्रघात अवस्थेशिवाय अन्य अवस्थांमध्ये शरीर नाम कर्माच्या

१) सद्द्रव्य लक्षणं । तत्वार्थसूत्र
२) गुणपर्ययवद्द्रव्यं । तत्वार्थसूत्र
३) उपयोगो लक्षणं । तत्वार्थसूत्र
४) द्रव्यसंग्रह गाथा२ ।

उदयाने घडणाऱ्या आकुंचन-विस्तार गुणाच्या कारणाने भांड्यात असलेल्या दिव्याप्रमाणे आपल्या लहान-मोठ्या शरीराच्या बरोबर आहे. निश्चयनयाने असंख्यात प्रदेश असणाऱ्या लोकाकाशाच्या बरोबर आहे.

**संसारित्व** - संसारी जीवाचे मुख्य दोन भेद आहेत. त्रस व स्थावर. पृथ्वीकायिक, जलकायिक, अग्निकायिक, वायुकायिक आणि वनस्पतिकायिक हे पाच एकेन्द्रिय 'स्थावर' जीव आहेत. शंख इत्यादि द्वीद्रिंय, मुंगी वगैरे त्रीन्द्रीय. भूंगा वगैरे चतुरिंद्रिय आणि मनुष्य इत्यादि पंचेन्द्रिय असे चार त्रस जीव आहेत. ह्या सर्वांना संसारी जीव म्हणतात.

**सिद्धत्व** - ज्यांना ज्ञानावरण इत्यादि आठ कर्म नाहीत. जे सम्यक्त्व इत्यादि आठ गुणांनी युक्त आहेत. सोडलेल्या अंतीम शरीरापेक्षा किंचित् लहान आत्मप्रदेश ज्यांचे आहेत त्यांना 'सिद्ध' म्हटले आहे.

**उर्ध्वगमत्व** - सिद्ध आपल्या उर्ध्वगमन स्वभावामुळे लोकाच्या अग्रभागी तनुवातवलयामध्ये सिद्ध शिलेवर विराजमान आहेत. धर्मास्तिकाय नसल्यामुळे पुढे अलोकाकाशांत गमन करीत नाही. उत्पाद, व्यय आणि ध्रौव्य सहित असतात. कर्मबंधनातून मुक्त झाल्यावर सर्व जीव उर्ध्वगमनच करतात.

अशाप्रकारे ह्या नऊ अधिकारामध्ये निश्चयनय व व्यवहारनय ह्या दोन्ही नयांच्या आधाराने जीव द्रव्याचे संक्षिप्त वर्णन केले आहे. विशेष रीतीने गुणस्थान, जीव समास आणि मार्गणा ह्यांच्या आधारे सुद्धा जीवास समजले पाहिजे.

"[१]गुणस्थान, जीवसमास, पर्याप्ति, प्राण, संज्ञा, चौदा मार्गणा आणि उपयोग ह्यांचे क्रमाने जिनागमामध्ये वर्णन केले आहे.

ह्या वीसामध्ये चौदा मार्गणा आहेत. ह्या मार्गणांमध्ये जीव समास, पर्याप्ति इत्यादिंचा समावेश केल्यावर गुणस्थान व मार्गणा हेच दोन मुख्य प्रकार राहतात.

## गुणस्थान

मोह (राग-द्वेषाने होणारे परिणाम) आणि योग (मन, वचन, काय यांची प्रवृत्ति) यांच्या निमित्ताने होणाऱ्या जीवाच्या परिणामाला गुणस्थान म्हणतात. गुणस्थान १४ प्रकारचे आहेत.

**चौदा गुणस्थानांची नावे** - मिथ्यात्व, सासादन, मिश्र, असंयत, देशविरत, प्रमत्तविरत, अप्रमत्त, अपूर्वकरण, अनिवृत्तिकरण, सूक्ष्मसांपराय, उपशांत कषाय, क्षीणकषाय, संयोगकेवली आणि अयोगकेवली.

**(१) मिथ्यात्व** - (मिथ्यात्व - विपरीत मान्यता) मिथ्यात्व प्रकृतिच्या उदयाने उत्पन्न झालेल्या मिथ्या परिणामांना अनुभव करणारा जीव विपरित श्रद्धा ठेवणारा बनतो. ज्याप्रमाणे पित्त ज्वराने पीडीत व्यक्तिला गोड रस सुद्धा चांगला लागत नाही त्याचप्रमाणे मिथ्यात्वप्रकृती असणाऱ्यास यथार्थ धर्म सुद्धा रूचकर वाटत नाही.

---

१) गुणजीवा पज्जत्ती पाणा सण्णा य मग्गणाओ य ।
उवयोगो वि य कमसो वीसं तु परुवणा भणिदा ॥२॥
- गोम्मटसार जीवकाण्ड ।

(२) **सासादन** - (स + आसादन = विराधना) हे गुणस्थान वर चढतांना होत नाही. चवथ्या गुणस्थानांतून खाली उतरतांना होते. उपशम सम्यग्दृष्टी जीवास जेव्हा अनंतानुबंधी कषायांचा उदय होतो तेव्हा तो सम्यक्त्वापासून भ्रष्ट होतो. परंतु जोपर्यंत मिथ्यात्वाचा उदय होत नाही तोपर्यंत मधल्या अवस्थेत अव्यक्त परिणाम होत राहतात त्याला सासादन गुणस्थान म्हणतात. ह्या गुणस्थानाचा काळ कमीत कमी १ समय व जास्तीत जास्त ६ आवली प्रमाण असतो. ह्या गुणस्थानातून नियमाने तो मिथ्यात्व गुणस्थानातच जातो.

(३) **मिश्र** - सम्यक्त्व मिथ्यात्व नावाच्या प्रकृतिच्या उदयाने जीवाचे मिश्र परिणाम होतात. (उदा० दही आणि गुळ एकमेकांत मिसळल्यावर जसा स्वाद होतो.) याला मिश्र गुणस्थान म्हणतात.

(४) **अविरत सम्यक्त्व (असंयत्)** - अनंतानुबंधीच्या चार आणि दर्शन मोहनीयाच्या तीन प्रकृति (मिथ्यात्व, सम्यक्मिथ्यात्व – सम्यक्प्रकृति) अशाप्रकारे सात[1] प्रकृतिंचा उपशम, क्षय किंवा क्षयोपशम झाला असताना जीवाचे अप्रत्याख्यान कषायाच्या उदयाने जे व्रतरहित भाव होतात त्याला असंयत् (अविरत) गुणस्थान म्हणतात. देशघाति सम्यक्त्व प्रकृतिच्या उदयाने जे सम्यक्त्व प्राप्त होते त्यास वेदक सम्यक्त्व म्हणतात. ह्या वेदक सम्यक्त्वामध्ये चल, मलिन आणि अगाढ हे दोष सुद्धा लागतात. हा सम्यग्दृष्टी जीव इंद्रिय आसक्ति आणि त्रसस्थावर हिंसेपासून विरक्त राहत नाही. परंतु अनर्गल प्रवृत्ति न करता जिनेंद्र भगवानच्या वचनांवर श्रद्धान करतो म्हणून याला असंयत सम्यग्दृष्टी म्हणतात.

(५) **देशविरत** - जो एकाचवेळी त्रस हिंसेपासून विरक्त असतो. परंतु स्थावर हिंसेपासून विरक्त नसतो. तो स्मयग्दृष्टी श्रावकांच्या अकरा प्रतिमांचे पालन करणारा देशविरत म्हटल्या जातो.

(६) **प्रमत्तविरत** - जेव्हा संज्वलन कषाय आणि नोकषाय यांचा उदय असतो. आत्मस्वरूपांत लीन या सावधान होऊ शकत नाही म्हणून यास प्रमत्तविरत म्हणतात.

(७) **अप्रमत्तविरत** - जेव्हा संज्वलन व ९ नोकषाय यांचा मंद उदय असतो. तेव्हा हा जीव प्रमादरहित होऊन आपल्या ध्रुवस्वभावात स्थिर होतो. ह्या गुणस्थानामध्ये असलेल्या मुनींना अप्रमत्तविरत म्हणतात.

(८) **अपूर्वकरण**[2] - ह्या गुणस्थानामध्ये जीवाचे परिणाम कधीही इतके शुद्ध झाले नव्हते असे अपूर्व विशुद्ध होतात व हा जीव भिन्न समयवर्ती जीवांच्या परिणामासारखा राहत नाही.

(९) **अनिवृत्तीकरण** - ह्या गुणस्थानात एक समयवर्ती अनेक जीवांच्या परिणामांच्या विशुद्धीमध्ये भेद नसतो. सर्वांचे समान विशुद्ध परिणाम असतात म्हणून याला अनिवृत्तिकरण म्हणतात.

(१०) **सूक्ष्मसांपराय** - ज्या जीवास केवळ सूक्ष्म लोभ कषाय असतो. त्याच्या विशुद्ध परिणामाला

---

१) सर्वात प्रथम अनादि मिथ्यादृष्टीच्या अनंतानुबंधी चार आणि मिथ्यात्व अशा पाच प्रकृतिंचा उपशम होतो. नंतर उपशमसम्यक्त्वाच्या बळाने मिथ्यात्वाने तीन तुकडे होतात. सादि मिथ्यादृष्टीस ह्या सात प्रकृतिंचा उपशम होतो.

(२) अपूर्वकरण – कोणी मुनीराज उपशम श्रेणीमध्ये चढून जातात. त्याचे अपूर्वकरण, अनिवृत्तिकरण, सूक्ष्म-सांपयश आणि क्षीणकषाय हे चार गुणस्थान होतात. अर्थात् उपशान्तकषाय गुणस्थान क्षपक श्रेणीवाल्यांना होत नाही. उपशमश्रेणी असणारे नियमाने खाली उतरतात.

सूक्ष्मसांपराय नावाचे दहावे गुणस्थान मानतात.

**(११) उपशांतकषाय** - संपूर्ण मोहनीय कर्माच्या उपशमाने उत्पन्न झालेल्या जीवाच्या निर्मल (राग-द्वेष रहित, वीतराग भाव) परिणामांना उपशांत कषाय गुणस्थान म्हटले आहे.

**(१२) क्षीणकषाय** - ज्या निर्ग्रंथाचा चारित्र मोहनीय कर्माचा संपूर्णपणे क्षय झाला आहे व त्याच्या परिणामाने जीवाचे राग द्वेष रहीत निर्मल शुद्ध वीतराग भाव झाले आहेत त्याला क्षीणकषाय म्हणतात.

**(१३) सयोगकेवली** - जो बाराव्या गुणस्थानाच्या शेवटी तीन घाती कर्मांचा व काही अघातीं कर्माचा पूर्णपणे नाश करतो. केवलज्ञान प्राप्त करून नऊ केवललब्धि प्राप्त करतो ते सयोगकेवली आहेत.

**(१४) अयोगकेवली** - जे अठराहजार शील भेदाचे स्वामी आहेत. नवीन कर्माच्या आश्रव-बंधापासून जे मुक्त आहेत. संवर व निर्जराच्या अंतिमजागी आहेत, मुक्त अवस्थेच्या अगदी निकट आहेत ते काययोगाने रहित अयोगकेवली आहेत.

**सिद्ध** - ह्या चौदा गुणस्थानानंतर गुणस्थानबद्ध सिद्ध होतात. सिद्ध अष्टकर्मांनीरहित, शांत, निरंजन, सम्यक्त्व इत्यादि आठ गुणांनी सहित कृतकृत्य झालेले, लोकांच्या अग्रभागी निवास करणारे असतात.

## जीव समास (जीवांचे वर्गीकरण)

ज्यांच्या द्वारा अनेक जीवांचे किंवा अनेक जातींचा संग्रह केल्या जाऊ शकतो त्यास जीव समास म्हणतात.

**जीव समासाचे चौदा प्रकार आहेत** - एकेंद्रियाचे दोन प्रकार आहेत. बादर आणि सूक्ष्म. द्वीन्द्रिय, त्रीन्द्रिय आणि चतुरिन्द्रय. पंचेद्रियाचे संज्ञी आणि असंज्ञी. अशाप्रकारे सातही प्रकारचे जीव पर्याप्त आणि अपर्याप्त दोन्ही प्रकारचे होऊ शकतात म्हणून समासचे चौदा भेद होतात.

## पर्याप्ति

गृहित आहार, शरीर प्रवृत्तिमध्ये परिणमन करणाऱ्या ज्या शक्ति आहेत त्या शक्ती पूर्ण होण्यास पर्याप्ति म्हणतात.

**पर्याप्तिचे सहा भेद आहेत** - (१) आहार, (२) शरीर, (३) इंद्रिय, (४) श्वासोच्छवास्, (५) भाषा आणि मन ह्या सहा पर्याप्ति आहेत. एकेन्द्रिय जीवास पहिल्या चार पर्याप्ति असतात. विकलत्रय व असंज्ञी पंचेद्रियास मन सोडून पाच पर्याप्ति आणि संज्ञी पंचेद्रियास मन सहित सहा पर्याप्ति असतात.

## प्राण

ज्याच्या उपस्थितीने जीवामध्ये जीवंतपणाचा आणि नसल्यामुळे मृत या मरणपणाचा बोध होतो. त्यास

प्राण म्हणतात.

**प्राणाचे दहा भेद** - पाच इंद्रिय, तीन बल-मनोबल, वचन-बल आणि कायबल, श्वासोच्छवास आणि आयु हे दहा प्राण आहेत.

यापैकी एकेन्द्रियाचे स्पर्शनेंद्रिय, कायबल, आयु आणि श्वासोच्छवास हे चार प्राण आहेत. द्वीन्द्रियाचे रसनाइंद्रिय आणि वचन, बल हे सहा प्राण, त्रीन्द्रियाचे घ्राणेन्द्रिय सहित सात प्राण, चतुरिन्द्रियाचे चक्षु इंद्रिय मिळून आठ प्राण, असंज्ञी पंचेंद्रियाचे कर्णेंद्रिय मिळून नऊ प्राण आणि संज्ञी पंचेंद्रियाचे मन सहित दहा प्राण होतात.

## संज्ञा

इच्छेला संज्ञा म्हणतात. ज्याच्या निमित्ताने दोन्ही भवात अतिशय दुःख प्राप्त होते त्या इच्छेला संज्ञा म्हणतात.

**संज्ञा चार आहेत** - आहार संज्ञा, भय संज्ञा, मैथुन संज्ञा आणि परिग्रह संज्ञा. ह्या चारही संज्ञा प्रत्येक प्राण्यामध्ये उपस्थित असतात.

## मार्गणा

**मार्गणा शब्दाचा अर्थ** - अन्वेषण, शोध, मीमांसा असा आहे. ज्या भावांच्या सहाय्याने किंवा ज्या पर्यायामध्ये जीवाचा शोध केल्या जातो त्यास मार्गणा म्हणतात.

**मार्गणाचे चौदा भेद** - गति[१], इंद्रिय, काय, योग, वेद, कषाय, ज्ञान, संयम, दर्शन, लेश्या, भव्यत्व, सम्यक्त्व, संज्ञा आणि आहार ह्या चौदा मार्गणा आहेत.

**गति** - गति नाम कर्माच्या उदयाने जीव ज्या ज्या अवस्था धारण करतो त्यास गति म्हणतात. गति चार प्रकारच्या आहेत – नरकगति, तिर्यंचगति, मनुष्यगति आणि देवगति.

**इंद्रिय** - इंद्रचा अर्थ आत्मा आहे व त्याच्या चिन्हाला इंद्रिय म्हणतात. जे आपआपल्या विषयात अहमिंद्राप्रमाणे स्वतंत्र असतात त्यास इंद्रिय म्हटले आहे. इंद्रियांचे पाच भेद आहेत – स्पर्श, रस, घ्राण, चक्षु आणि कर्ण. ह्या इंद्रियांच्या भेदावरून एकेंद्रिय, द्वीन्द्रिय, त्रीन्द्रिय, चतुरिन्द्रय आणि पंचेन्द्रिय जीव होतात.

**काय** - जाति नाम कर्माच्या अविनाभावी त्रस आणि स्थावर नाम कर्माच्या उदयाने होणाऱ्या आत्म्याच्या पर्यायास जिनमतामध्ये काय म्हटले आहे.

---

१) गति - गइइंदियेसु काये जोगे वेदे कसायणाणे य ।
संजमदंसण लेस्सा भवियासम्मत्तसण्णि आहारे ॥
– गोमटसार जीवकांड

**याचे सहा भेद आहेत** - पृथ्वी, जल, अग्नि, वायु, वनस्पति आणि त्रस. पृथ्वीकायिक नामकर्माच्या उदयाने ज्यांचे शरीर पृथ्वीसमान आहे त्यांना पृथ्वीकायिक जीव म्हणतात. असेच अन्य सर्वत्र समजावे. पाच स्थावरांमध्ये बादर आणि सूक्ष्म असे दोन भेद आहेत. त्रस जीव बादरच होतात.

**बादरचे लक्षण** - बादर नामकर्माच्या उदयाने जे शरीर दुसऱ्यास रोकून ठेवते व स्वतः दुसऱ्याकडून रोकले जाते त्याला बादर-स्थूल म्हणतात.

**स्थूल कायचे लक्षण** - सूक्ष्म नामकर्माच्या उदयाने जे शरीर दुसऱ्याला अडवित नाही. व दुसऱ्याकडून अडविल्या जात नाही त्याला सूक्ष्म शरीर म्हणतात. स्थूल शरीरी जीव कोणाच्या तरी आधाराने राहतात. सूक्ष्मकाय जीव निराधार सर्वत्र लोकांत अनंतानंत भरले आहेत.

**वनस्पतिचे दोन भेद आहेत** - प्रत्येक आणि साधारण प्रत्येक वनस्पतिचे २ भेद आहेत – सप्रतिष्ठित आणि अप्रतिष्ठित. ज्याच्या आश्रयाने अनेक निगोदिया जीव राहतात त्यांना सप्रतिष्ठित म्हणतात. (ह्यांच्या भक्षणाने अनंत जीवाचा घात होतो म्हणून ही वनस्पति अभक्ष्य आहे.) ज्यांच्या आधारावर अन्य जीव आश्रित नसतात त्यांना अप्रतिष्ठित म्हणतात.

**साधारण वनस्पतिचे दोन भेद आहेत** - नित्य निगोद आणि इतर निगोद. ज्यांनी आतापर्यंत निगोद पर्याय सोडली नाही ते नित्य निगोद. जे निगोद पर्यायातून निघून स्थावर काय व त्रस काय पर्यायामध्ये येऊन पुनः निगोद अवस्थेत जातात त्यांना इतर निगोद म्हणतात.

**साधारणचे लक्षण** - ह्या साधारण जीवांचा आहार एकसारखाच असतो. श्वासोच्छवास सुद्धा एकावेळी घेतात. जेव्हा एका जीवास मरण येते तेव्हा तेथे अनंतजीवांचे मरण होते. ज्या ठिकाणी एक जीव उत्पन्न होतो त्याठिकाणी अनंत जीव उत्पन्न होतात. यांची आयुसुद्धा अन्तर्मुहूर्त मात्र असते.

“द्रव्याच्या[१] अपेक्षेने संपूर्ण सिद्ध राशीला व संपूर्ण अतित काळाच्या समय राशीला अनंताने गुणिले असता जी अनंतानंत राशी येईल त्याच्या अनंतगुणे जीव एका निगोद शरीरामध्ये राहतात.

**स्थावर** - पृथ्वी, जल, अग्नि, वायु आणि वनस्पति हे पाच स्थावर आहेत.

**त्रस** - द्वीन्द्रिय, त्रीन्द्रिय, चतुरिन्द्रिय आणि पंचेन्द्रिय जीव त्रस आहेत.

**योग मार्गणा** - पुद्गल विपाकी शरीर नामकर्माच्या उदयाने मन, वचन कायेच्या अवलंबनाने कर्माला ग्रहण करण्याची जी जीवाची शक्ति तिला योग म्हणतात. योगाचे १५ भेद आहेत. ४ मनोयोग, ४ वचनयोग आणि ७ काययोग.

**मनोयोग** - सत्य मनोयोग, असत्य मनोयोग, उभय मनोयोग आणि अनुभय मनोयोग.

---

१) एकणिगोदसरीरे जीवा दव्वप्पमाणदो दिट्ठा ।
सिद्धेहिं अनंतगुणा सव्वेण वितीतकालेण ॥११६॥
- गोम्मटसार जीवकाण्ड ।

**वचन योग** - सत्य वचनयोग, असत्य वचनयोग, उभय वचनयोग आणि अनुभय वचनयोग.

**काययोग** - औदारिक, औदारिक मिश्र, वैक्रियक, वैक्रियक मिश्र, आहारक, आहारक मिश्र आणि कार्माण.

**वेद मार्गणा** - मोहनीय कर्माच्या अंतर्गत वेदनिय कर्माच्या उदयाने जीवामध्ये भाववेद होतो. आणि निर्माण नाम कर्माच्या सहाय्याने अंगोपांग नामकर्म उदयाने द्रव्यवेद होतो. देवगति आणि नरकगति मध्ये जो द्रव्यवेद होतो तोच भाववेद होतो. मनुष्य आणि तिर्यंच गतिमध्ये कधी कधी विषमता देखील असते. द्रव्यवेद पुरुषाचा असतो. भाववेदामध्ये स्त्री असो, पुरुष असो किंवा नपुंसक असो – या तिघांनाही मुक्ती अवश्य मिळते.

**वेदाचे तीन भेद आहेत** - स्त्रीवेद, पुरुषवेद आणि नपुंसक वेद.

**कषाय मार्गणा** - विकार इत्यादि उत्पन्न होण्यासाठी कर्मरूपी क्षेत्र तयार करणे ह्याला कषाय म्हणतात. जे सम्यक्त्व, देशचारित्र, सकलचारित्र इत्यादिंच्या परिणामांचा घात करतात. त्या परिणामांना कषाय असे म्हणतात. आत्म्याचे कर्षण करणाऱ्यास कषाय म्हणतात.

**कषायांचे २५ भेद आहेत** - अनंतानुबंधी क्रोध, मान, माया, लोभ. अप्रत्याख्यानावरण क्रोध, मान, माया, लोभ. प्रत्याख्यानावरण क्रोध, मान, माया, लोभ आणि संज्वलन क्रोध, मान, माया, लोभ. एकूण हे सोळा कषाय आहेत. नऊ नोकषाय – हास्य, रति, अरति, शोक, भय, जुगुप्सा, स्त्रीवेद, पुरुषवेद आणि नपुंसकवेद. अशाप्रकारे सर्व मिळून २५ कषाय होतात.

**ज्ञान मार्गणा** - जे तिन्ही लोकातील पदार्थांना भूत, भविष्यत आणि वर्तमान अशा त्रिकाल वर्ती सर्व द्रव्य, त्यांचे गुण आणि त्यांची अनेक पर्याय यांना प्रत्यक्ष व परोक्ष जाणते त्यास ज्ञान असे म्हणतात.

**ज्ञानाचे पाच भेद आहेत** - मतिज्ञान, श्रुतज्ञान, अवधिज्ञान, मनः पर्ययज्ञान आणि केवलज्ञान. सुरूवातीचे तीन मतिश्रुति, अवधिज्ञान हे मिथ्याज्ञानसुद्धा असू शकते. मिथ्यात्व व अनंतानुबंधी कषायांचा उदय असतांना जेव्हा हे तीन ज्ञान उदयास येतात तेव्हा त्यांना मिथ्या ज्ञान म्हणतात. मिथ्याज्ञानाचे मुख्य कारण मिथ्यात्व व अनंतानुबंधी कषायांचा उदय हे आहे.

**कुमतिज्ञान** - दुसऱ्यांच्या उपदेशाशिवाय विष, यंत्र, शस्त्र, अस्त्र तसेच बंध इत्यादिच्या बाबत अणुबम हिंसक अस्त्रांच्या विषयाबद्दल जी बुद्धी प्रवृत्त होते त्यास कुमतिज्ञान म्हणतात.

**कुश्रुतज्ञान** - चौर्यशास्त्र, हिंसाशास्त्र, महाभारत, रामायण इत्यादि परमार्थ शून्य उपदेशाला मिथ्या श्रुतज्ञान म्हणतात.

**विभंगज्ञान** - विपरित अवधिज्ञानास विभंगज्ञान म्हणतात.

**मतिज्ञान** - इंद्रीय आणि मन ह्यांच्या सहाय्याने होणाऱ्या ज्ञानाला मतिज्ञान म्हणतात. याचे अवग्रह, ईहा, अवाय आणि धारणा असे चार भेद आहेत.

**श्रुतज्ञान** - मतिज्ञानाने जाणलेल्या पदार्थाविषयी जे विशेष ज्ञान होते त्यास श्रुतज्ञान म्हणतात. हे ज्ञान नियमाने मतिज्ञानपूर्वक असते. ह्याचे अक्षरात्मक आणि अनक्षरात्मक असे दोन भेद किंवा शब्दजन्य आणि लिंगजन्य असे दोन भेद होतात.

**अवधिज्ञान** - द्रव्य, क्षेत्र, काल, भावाच्या अपेक्षेने ज्याचा विषय सीमित असतो त्याला अवधिज्ञान म्हणतात. त्याचे दोन भेद आहेत – भवद्रव्यय आणि गुणप्रत्यय. किंवा देशावधि, परमावधि आणि सर्वावधि असे तीन प्रकार आहेत.

**मनःपर्ययज्ञान** - जे ज्ञान इंद्रियांच्या सहाय्याशिवाय आत्मिक शक्तीने दुसऱ्याच्या मनातील विचारांना जाणते ते मनःपर्यय ज्ञान आहे. हे ज्ञान मनुष्यांनाच उत्पन्न होते. याचे दोन भेद आहेत. (१) ऋजुमति (सरळ विचारांना जाणणे) व (२) विपुलमति (सर्व प्रकारच्या वक्र विचारांना जाणणे) मनःपर्ययज्ञान ऋद्धिधारी वर्धमानचारित्र असणाऱ्या मुनिंनाच होऊ शकते. सर्वांना होत नाही.

**केवलज्ञान** - ज्ञानावरण कर्माचा संपूर्ण क्षय झाल्यावर जे ज्ञान संपूर्ण, समग्र, केवळ प्रतिपक्ष रहित लोक-अलोकातील सर्व पदार्थांना स्वाभाविक स्वरूपात प्रगट करते त्यास केवलज्ञान म्हणतात. हे जीवाचे स्वाभाविक ज्ञान आहे. हेच स्वभावदर्शन-सम्यग्दर्शन आहे. ह्याशिवाय मोक्षमार्गाचा प्रारंभच होत नाही.

**संयम मार्गणा** - अहिंसा, सत्य, अचौर्य, ब्रह्मचर्य आणि अपरिग्रह ह्या पाच व्रतांना धारण करणे, ईर्षा, भाषा, एषणा, आदान-निक्षेपण, उत्सर्ग ह्या पाच समितीचे पालन करणे – क्रोध इत्यादि चार कषायाचा निग्रह करणे, मन, वचन कायेने अनर्थदंडाचा त्याग करणे. पाच इंद्रियांवर जय मिळविणे याला संयम म्हणतात.

**संयमाचे पाच भेद आहेत** - (१) सामायिक, (२) छेदोपस्थापना, (३) परिहारविशुद्धि, सूक्ष्मसांपराय आणि यथाख्यातचारित्र. देशसंयम आणि असंयम मिळून ह्या मार्गणाचे सात भेद होतात.

**दर्शन मार्गणा** - पदार्थाला जाणताना सर्वप्रथम पदार्थाच्या विशेष अंगाचे ग्रहण न होता सामान्य अंशाचे निर्विकल्प रूपाने ग्रहण होते त्याला दर्शन म्हणतात. दर्शनाचे चार भेद आहेत – चक्षुदर्शन, अचक्षुदर्शन, अवधि दर्शन आणि केवलदर्शन.

**लेश्या मार्गणा** - कषायांच्या उदयाने आत्म्याचे जे भाव होतात त्याला लेश्या म्हणतात. लेश्याचे दोन भेद आहेत. (१) द्रव्य लेश्या आणि (२) भाव लेश्या.

**द्रव्य लेश्या** - शरीराच्या अंगास द्रव्य लेश्या म्हणतात.

**भावलेश्या** - संसारी जीवाच्या अंतरंग परिणामास भावलेश्या म्हणतात. भावलेश्याचे सहा प्रकार आहेत – कृष्णलेश्या, नीललेश्या, कापोतलेश्या, पीतलेश्या, पद्मलेश्या आणि शुक्ललेश्या.

(१) **कृष्णलेश्या** - आर्त्त, रौद्र ध्यान करणे, वैर करणे, धर्म आणि दयाभाव सोडून देणे, दुष्टपणा करणे हे सर्व कृष्णलेश्याचे चिन्ह आहेत. हे सर्व भाव नारकी जीवांचे होतात. असे ज्यांचे भाव असतात ते नरक-निगोदामध्ये जन्म घेतात.

(२) **नीललेश्या** - आळशी, मंदबुद्धी असणारे, स्वच्छंदी, इंद्रिय विषयामध्ये आसक्त असणारे, अति झोपणारे, धनप्रिय असे नीललेश्या ज्यांची आहे त्यांचे परिणाम होतात. असे परिणाम व्यंतर आणि भवनवासी देवामध्ये व नारकी लोकांमध्ये सुद्धा असतात.

(३) **कापोत लेश्या** - क्रोधी, परनिंदा करणारा, आत्मप्रशंसक, कलहप्रिय-द्वेषीबुद्धी असे परिणाम असणाऱ्या जीवाची कापोत लेश्या असते.

(४) **पीतलेश्या** - आपल्या कार्याचा विचार करणारा, भक्ष्य-अभक्ष्य यांचा विचार करणारा, सर्वांवर समानदृष्टी ठेवणारा, दान देण्यासाठी तत्पर असणारा, मन-वचन कायेने मृदू परिणाम ठेवणारा. हे सर्व पीत लेश्येचे चिन्ह आहेत.

(५) **पद्मलेश्या** - दान देणारा, त्यागी, उत्तम कार्य करण्याची प्रवृत्ति असणारा, कष्ट देणारे आणि अनिष्ट अशा उपसर्गांना सहन करणारा, देव-गुरू-शास्त्र यांची भक्तिपूर्वक पूजा करणारा हे सर्व पद्मलेश्या असणाऱ्याचे लक्षण आहेत.

(६) **शुक्ललेश्या** - पक्षपात न करणे, निदान न करणे, भावी भोगसुखाची इच्छा न करणे, समताभाव ठेवणे, प्रियजनांचा मोह व वैरी यांचा द्वेष न करणे, स्त्री, पुत्र, मित्र यांच्या मध्ये मोह न ठेवणे. हे सर्व शुक्ललेश्याचे लक्षण आहेत.

**भव्य मार्गणा** - ज्यांना अनंत चतुष्टयरूप सिद्धि प्राप्त झाली आहे त्यांना भव्य जीव म्हणतात. याच्या विपरीत ज्यांना सिद्धि प्राप्त करण्याची योग्यता नसते त्यांना अभव्य म्हणतात. कितीतरी भव्यजीवांना मुक्ती प्राप्तीची योग्यता आहे परंतु ते कधीच मुक्त होणार नाहीत. जसे विधवा स्त्रीमध्ये पुत्रात्पत्तीची योग्यता असते परंतु तिला कधी पुत्रसुख मिळू शकत नाही. याशिवाय काही भव्यजीव असे आहेत की जे नियमाने मुक्त होतील. अशाप्रकारे स्वभावाने भव्य जीवांचे दोन प्रकार होतात. ह्या दोन्ही स्वभावाने विपरित स्वभाव असणाऱ्या जीवास अभव्य म्हणतात. जसे वांझ स्त्रीला निमित्त मिळाल्यानंतर सुद्धा पुत्र होत नाही. या भव्यत्व मार्गणाचे भव्य आणि अभव्य असे दोन भेद होतात.

**सम्यक्त्व मार्गणा** - सहा द्रव्य, पाच अस्तिकाय, नऊ पदार्थ यांचे जसे स्वरूप जिनेंद्रदेवाने सांगितले आहे त्यावर यथार्थ श्रद्धान करणे याला सम्यक्त्व म्हणतात. सम्यक्त्व दोन प्रकाराने होते. (१) केवल आज्ञाने व (२) अधिगमाने.

**सम्यक्त्व मार्गणेचे ६ भेद आहे** - (१) उपशम सम्यक्त्व, (२) क्षायिक सम्यक्त्व, (३) वेदक सम्यक्त्व, (४) मिश्र, (५) सासादन आणि (६) मिथ्यात्व.

**संज्ञी मार्गणा** - नोइंद्रियावरण कर्माच्या क्षयोपशाने उदय झालेल्या ज्ञानास संज्ञा म्हणतात. ज्यांना ही लब्धि प्राप्त होते त्यांना मन वचन ज्ञान शक्ति मिळते. अर्थात सारासार विचार करण्याची बुद्धि प्राप्त होते त्यांना संज्ञी म्हणतात. ज्यांना हे मन नसते त्यांना असंज्ञी म्हणतात. असंज्ञी जीवांना मन ज्ञान नसते. म्हणून संज्ञी मार्गणाचे संज्ञी आणि असंज्ञी असे दोन भेद आहेत.

**आहार मार्गणा** - शरीर नावाच्या नामकर्माच्या उदयाने औदारिक, वैक्रियिक, आहारक यापैकी कोणत्याही शरीराला आणि वचन व द्रव्य मन रूप बनण्यासाठी योग्य अशा नोकर्म आहार वर्गणा पुद्गल परमाणूंना ग्रहण करणे यास आहार म्हणतात.

**जीव दोन प्रकारचे आहेत** - आहारक, अनाहारक. विग्रहगतिला प्राप्त झालेले चारही गतिचे जीव, प्रतर आणि लोकपूरण समुद्रघात करणारे सयोगकेवली, अयोगकेवली, समस्त सिद्ध हे सर्व लोक अनाहारक असतात व त्यांना सोडून बाकी सर्व जीव आहारक असतात.

**समुद्घात** - मूळ शरीराला न सोडता तैजस-कार्माणरूपधारी आत्मप्रदेशांच्या बरोबर जीवाचे प्रदेश शरीराच्या बाहेर पडणे याला समुद्घात म्हणतात.

समुद्घात सात प्रकारचा आहे. (१) वेदना, (२) कषाय, (३) वैक्रियक, (४) मारणांतिक, (५) तैजस, (६) आहारक व (७) केवली समुद्घात.

अशाप्रकारे संक्षेपाने चौदा मार्गणांचे वर्णन केले आहे.

## उपयोग

जीवाचा जो भाव ज्ञानवस्तुला ग्रहण करण्यासाठी प्रवृत्त हातो त्यास उपयोग म्हणतात. उपयोगाचे दोन भेद आहेत. साकार आणि निराकार. पाच प्रकारचे सम्यग्ज्ञान आणि तीन प्रकारचे कुज्ञान असे आठ प्रकारचे ज्ञान साकारोपयोग आहे. चार प्रकारचे दर्शन निराकारोपयोग आहे. अशाप्रकारे उपयोगाचे बारा भेद होतात.

गुणस्थान, जीवसमास, पर्याप्ति, प्राण, संज्ञा, चौदा मार्गणा आणि उपयोग असे मिळून वीस प्ररूपणा होतात. ह्यांचे विशेष वर्णन गोम्मटसार जीवकांडामध्ये वाचावयास पाहिजे. द्रव्यसंग्रहात म्हटले आहे की –

चौदा मार्गणा, चौदा जीवसमास आणि चौदा गुणस्थान हे सर्व अशुद्ध नयाने होतात परंतु शुद्ध नयाने सर्व जीव शुद्धच असतात.

अशाप्रकारे जीवद्रव्याचे वर्णन झाले – पुढे अजीवद्रव्याचे संक्षिप्त वर्णन आहे.

**अजीवद्रव्य** - पुद्गल, धर्म, अधर्म, आकाश आणि काल हे पाच द्रव्य अजीव आहेत. ह्या पाच द्रव्यापैकी पुद्गल द्रव्य मूर्तिक आणि बाकी चार द्रव्य अमूर्तिक आहेत.

**पुद्गल** - ज्याचा पूरण-गलन रूप स्वभाव असतो त्याला पुद्गल म्हणतात.

**पुद्गलाचे दोन भेद आहेत** - अणु आणि स्कंध. एका अविभागी पुद्गल तुकड्याचे पुन्हा दुसऱ्या तुकड्यामध्ये विभाजन न होण्याच्या स्थितीला त्या पुद्गलाचा अणु-परमाणु म्हणतात. दोन अणु, तीन अणु इत्यादिच्या

संयोगाने संख्यात, असंख्यात आणि अनंत परमाणुंच्या एकत्र संयोगाने स्कंध बनतो.आपणा सर्वांना जे काही दिसते ते सर्व स्कंधच आहे.

**पुद्गलाचे वीस गुणधर्म** - पाच रस - गोड, आंबट-कडू-तुरट-तिखट.
पाच वर्ण – काळा-निळा-पिवळा-लाल-पांढरा.
दोन गंध – सुगंध आणि दुर्गंध.
आठ स्पर्श – थंड, गरम, कोमल, कठोर, हलका, जड, स्निग्ध आणि रुक्ष.

**पुद्गल द्रव्याची पर्याये** - शब्द, बंध, सूक्ष्म, स्थूल, संस्थान (आकार), खण्ड (भेद), अधंकार (तम), छाया, उद्दोत (प्रकाश) आणि आताप (तेज) ही सर्व पुद्गल द्रव्याची पर्याये आहेत.

**धर्मद्रव्याचे लक्षण** - जीव आणि पुद्गल द्रव्य गमनशील आहे. बाकी द्रव्य गमनशील नाहीत. ज्याप्रमाणे मासोळ्यांना गमन करण्यास पाणी सहाय्यक होते त्याचप्रमाणे धर्मद्रव्य जीव आणि पुद्गल यांना गमन करण्यास सहाय्य करते. परंतु स्वतः कारणीभूत होत नाही.

**अधर्मद्रव्याचे लक्षण** - चालत असलेल्या प्रवाशांना ज्याप्रमाणे झाडाची सावली थांबण्यास सहकार्य करते परंतु थांबण्यासाठी कारणीभूत होत नाही. त्याचप्रमाणे जे द्रव्य जीव आणि पुद्गलांना थांबण्यासाठी सहाय्यक होते परंतु कारण बनत नाही त्यास अधर्मद्रव्य म्हणतात. धर्म आणि अधर्म द्रव्य म्हणजे पुण्य व पाप नाहीत.

**आकाश द्रव्य** - जीव इत्यादि सहा द्रव्यांना स्थान देण्यास जे द्रव्य समर्थ असते त्याला आकाश द्रव्य म्हणतात. आकाश द्रव्याचे लोकाकाश आणि अलोकाकाश असे दोन भेद आहेत.

जेवढ्या भागांत जीव, पुद्गल, धर्म, अधर्म आणि कालद्रव्य मिळतात त्या संपूर्ण भागास लोकाकाश म्हणतात. लोकाकाशाच्या चारी बाजूंनी अनंतानंत अलोकाकाश पसरले आहे.

**कालद्रव्य** - सर्व द्रव्यांमध्ये परिणमन-परिवर्तन होण्यास जे द्रव्य सहाय्य करते ते कालद्रव्य होय. कालद्रव्याचे (१) निश्चयकाळ व (२) व्यवहारकाळ असे दोन भेद होतात. निश्चयकाळाचे वर्तनालक्षण आहे.

**वर्तना** - आपल्या आपल्या कर्माच्या बंधनाने जे स्वयं परिणमनशील आहे अशा द्रव्यांना परिणमन क्रियेत (ज्याप्रमाणे कुंभाराच्या फिरणाऱ्या चाकाला चाकाखाली असणारा खिळा फिरण्यासाठी सहाय्यक होतो –) सहाय्य करणाऱ्यांना वर्तना म्हणतात. ह्या वर्तनाकाळासच निश्चयकाळ म्हणतात. अर्थात् निश्चयकाळाचे लक्षण वर्तना आहे. आणि व्यवहारकाळाचे लक्षण मिनिट, तास, दिवस, महिना इत्यादि आहेत.

ज्याप्रमाणे रत्नांच्या राशीमध्ये प्रत्येक रत्न वेगवेगळे असते त्याचप्रमाणे लोकाकाशाच्या एका एका प्रदेशावर एक एक कालाणु वेगवेगळे स्थान व्यापून आहेत. लोकाकाशाचे प्रदेश असंख्यात असल्यामुळे कालद्रव्याचे अणूसुद्धा असंख्यात आहेत.

**पाच अस्तिकाय** - जीव, पुद्गल, धर्म, अधर्म आणि आकाश हे पाच अस्तिकाय आहेत. कालद्रव्य अस्ति आहे अर्थात विद्यमान आहे परंतु बहुप्रदेशी नसल्यामुळे अस्तिकाय नाही.

**सहा द्रव्यांचे प्रदेश** - एक जीव द्रव्य, धर्म, अधर्म द्रव्य आणि लोकाकाश यांचे प्रत्येकाचे असंख्यात प्रदेश आहेत. अलोकाकाशाचे सुद्धा अनंत प्रदेश आहेत. पुद्गल द्रव्याचे एकापासून संख्यात, असंख्यात आणि अनंतप्रदेश होतात. परंतु कालद्रव्य मात्र एक प्रदेशी आहे.

# प्रमाणाचे वर्णन

प्रमाणनयैरधिगमः ॥[१]

प्रमाण आणि नय ह्यांच्या द्वारा जीव इत्यादि पदार्थांचा बोध होतो.

सम्यग्ज्ञानाला प्रमाण म्हणतात. न्याय ग्रंथामध्ये[२] स्वतःच्या आणि विशेष अर्थाला निश्चित करणाऱ्या ज्ञानाला प्रमाण म्हटले आहे.

**प्रमाणाचे दोन भेद आहेत** - परोक्ष आणि प्रत्यक्ष.

**परोक्षप्रमाण** - इंद्रिय आणि मन ह्यांच्या सहाय्याने होणारे ज्ञान परोक्ष आहे. परोक्ष ज्ञानाचे दोन प्रकार आहेत – मतिज्ञान आणि श्रुतज्ञान.

**मतिज्ञानाचे चार भेद आहेत** - अवग्रह, ईहा, अवाय आणि धारणा.

**अवग्रह** - इंद्रिय व पदार्थ ह्यांच्या योग्य संबंधाने सामान्य दर्शन होते. दर्शन झाल्यानंतर पदार्थाचे अधिग्रहण केल्या जाते. त्या अधिग्रहणास 'अवग्रह' म्हणतात. जसे चक्षुइंद्रियाद्वारा हा पदार्थ पांढरा आहे असे सामान्य ज्ञान होते.

**ईहा** - अवग्रहाने जाणलेल्या पदार्थाविषयी विशेष जाणण्याची इच्छा होणे तिला ईहा म्हणतात. जसे जो पांढरा पदार्थ पाहिला होता तो 'बगळा आहे की ध्वज ?'

**अवाय** - ईहा ज्ञानाने जाणलेल्या पदार्थाविषयी निश्चयात्मक यथार्थ ज्ञानाला अवाय म्हणतात. जसे – पंख फडफडण्याच्या आवाजाने हा बगळाच आहे असे जाणणे.

**धारणा** - अवाय ज्ञानाने जाणलेल्या पदार्थाच्या ज्ञानाचे काही काळाने विस्मरण न होणे ह्या ज्ञानाला धारणा म्हणतात. ह्या धारणा ज्ञानानेच स्मृति होते.

ह्या अवग्रह इत्यादि ज्ञानाचे विषय बारा प्रकारचे आहेत – बहु, बहुविध, क्षिप्र, अनिःसृत, अनुक्त, ध्रुव, अल्प, अल्पविध, अक्षिप्र, निःसृत, उक्त आणि अध्रुव.

अनेक वस्तुंच्या संग्रहित ज्ञानाला बहुज्ञान म्हणतात. जसे सेना किंवा वन ह्यांना एक समुहरूपात ग्रहण केल्याने बहुज्ञान होते.

हत्ती, घोडे, आंबे इत्यादि अनेक प्रकारांना जाणणे हे बहुविध ज्ञान आहे.

---

१) तत्वार्थसूत्र.

२) स्वापूर्वार्थव्यवसायात्मकं ज्ञानं प्रमाणं ।– परीक्षामुख

वस्तुच्या एका अंगाला अथवा एक प्रदेशाला पाहून त्याच्या सर्वांगाला जाणणे हे अनिःसृत ज्ञान आहे. जसे – तलावात डुबलेल्या हत्तीच्या सोंडेला पाहून हा हत्ती आहे असे ओळखणे.

**अति जलद** - शीघ्र जाणाऱ्या वस्तुंना जाणणे ह्यास क्षिप्रज्ञान म्हणतात – जसे तेज धावणाऱ्या आगगाडीस जाणणे. न बोलता केवळ हाव-भावावरून वस्तुचे ज्ञान होते ह्यास अनुक्त ज्ञान म्हणतात.

बऱ्याच काळापर्यंत ज्ञानाचे जसेच्या तसेच स्मरण राहणे हे ध्रुव ज्ञान होय. अशाच प्रकारे अल्प व अल्पविध ज्ञान आहे.

अवग्रह, ईहा, अवाय, धारणा ह्या प्रत्येकाचे बारा-बारा भेद होतात. सर्व मिळून ४८ भेद होतात. ह्यापैकी प्रत्येक ज्ञान पाच इंद्रिय आणि मन ह्यांच्याद्वारा होते. म्हणून ४८x६=२८८ मतिज्ञानाचे भेद होतात.

हे २८८ भेद अर्थावग्रहाच्या अपेक्षेने आहे.

**अर्थात अवग्रहाचे दोन भेद आहेत** - अर्थावग्रह व व्यंजनावग्रह.

पदार्थाला असे स्पष्ट जाणल्यानंतर ज्याचे ईहा, अवाय आणि धारणा होते तो अर्थावग्रह आहे.

जो अवग्रह अस्पष्ट आहे. ज्याचे ईहा, अवाय, धारणा होत नाही. तो व्यंजनावग्रह आहे.

व्यंजनावग्रह चक्षुइंद्रिय आणि मनाच्या द्वारा होत नाही. बाकी चार इंद्रियांनी बारा प्रकारच्या ज्ञानाला जाणू शकते म्हणून व्यंजनावग्रहाचे १२x४=४८ भेद होतात. ह्यापैकी प्रत्येक ज्ञान पाच इंद्रियापैकी प्रत्येक इंद्रियाद्वारा पृथक व मनद्वारा पृथक होत असल्यामुळे ४८x६ केल्याने मतिज्ञानाचे २८८ भेद होतात.

अशाप्रकारे अर्थावग्रहाच्या अपेक्षेने २८८ व व्यंजनावग्रहाच्या अपेक्षेने ४८ असे एकूण २८८+४८=३३६ भेद मतिज्ञानाचे होतात.

जेव्हा व्यंजनावग्रह वारंवार होतो तेव्हा तो अर्थावग्रह होऊन जातो. त्यानंतर ईहा, अवाय आणि धारणा ज्ञान होते. ज्याप्रमाणे मातीच्या कोऱ्या भांड्यावर पाण्याचे १-२ थेंब पडले तर तत्काल सुकून जातात. आणि पाण्याच्या सतत प्रवाहाने ते ओले होऊन जाईल. हा अर्थावग्रहाचा दृष्टांत आहे.

श्रुतज्ञान हे मतिज्ञानपूर्वक होते. मतिज्ञानाशिवाय श्रुतज्ञान होत नाही. श्रुतज्ञानाचे २ भेद आहेत. (१) अक्षरात्मक, (२) अनक्षरात्मक. ह्या दोन्ही मिळून श्रुतज्ञानाचे वीस भेद होतात – पर्याय, पर्यायसमास, अक्षर, अक्षरसमास, पद, पदसमास, संघात, संघातसमास, प्रतिपत्तिक, प्रतिपत्तिकसमास, अनुयोग, अनुयोगसमास, प्राभृत-प्राभृत, प्राभृत्तप्राभृत समास, प्राभृत, प्राभृत समास, वस्तु, वस्तु समास, पूर्व, पूर्वसमास. यापैकी पर्याय आणि पर्यायसमास हे दोन अनक्षरात्मक आहे आणि बाकी १८ अक्षरात्मक आहेत.

**सूक्ष्म लब्धि**–अपर्याप्तक निगोदिया जीव उत्पन्न झाल्यावर सुरूवातीच्या काळात स्पर्शन इंद्रिय द्वारा जे मतिज्ञान होते. ते पर्याय नावाचे श्रुतज्ञान होय. ह्याशिवाय कमी श्रुतज्ञान कोणत्याही जीवास होत नाही. हे 'पर्याय' श्रुतज्ञान नित्य उद्घाटित (सदा निरावरण) आहे. जर ह्या स्थानीसुद्धा कर्माचे आवरण असते तर तो निगोदिया जीव ज्ञानशून्य–जड झाला असता.

ह्या जघन्य श्रुतज्ञानाच्या वर अनंत, संख्यात, असंख्यात भागाने वृद्धी व संख्यात, असंख्यात आणि अनंत गुणवृद्धी अशाप्रकारच्या सहा वृद्धी असंख्यात वेळा (असंख्यात लोकप्रमाण) झाल्यावर अक्षर श्रुतज्ञान होते.

पर्याय श्रुतज्ञानापेक्षा अधिक आणि अक्षर श्रुतज्ञानापेक्षा कमी अशा मधल्या श्रुतज्ञानाचे जे असंख्यात भेद आहेत त्या सर्वांना 'पर्याय समास' म्हणतात. अशाप्रकारे पर्याय आणि पर्यायसमास हे दोन श्रुतज्ञान अनक्षरात्मक आहे. बाकी सर्व वरचे श्रुतज्ञान अक्षरात्मक आहे. पर्यायज्ञान अक्षरज्ञानाच्या अनंताव्या भागाप्रमाणे आहे.

अक्षर श्रुतज्ञान संपूर्ण अक्षरात्मक श्रुतज्ञानाचे मूळ आहे. अक्षरज्ञानाच्या वर एका-एका अक्षरज्ञानाची वृद्धी होत जाते. जेव्हा संख्यात अक्षरवृद्धि होते तेव्हा 'पद' नावाचे श्रुतज्ञान होते. अक्षरज्ञानाच्या वर आणि पदज्ञानापेक्षा कमी अशा संख्यात भेदाला 'अक्षरसमास' नावाचे श्रुतज्ञान म्हणतात.

**पदाचे तीन अर्थ आहेत** - अर्थपद, प्रमाणपद आणि मध्यमपद. 'पुस्तकवाचा' इत्यादि अनियत अक्षरांचा समूह कोणतातरी अभिप्राय विशेष दाखवितो म्हणून त्याला अर्थपद म्हणतात. क्रियारूप 'तिडन्त' आणि संज्ञारूप 'सुबंत' अक्षर समूह पदसुद्धा ह्या अर्थपदाचे द्योतक आहे. विभिन्न छंदाच्या आठ नियत अक्षरसमुह रूपास प्रमाणवद म्हणतात. जसे 'नमः श्री वर्धमानाय'.

तसेच १६,३४,८३,०७,८८८, सोळा अरब, चौतीस करोड, त्र्याऐंशी लाख, सात हजार आठशे अठ्याऐंशी अक्षरांचा एक मध्यम पद होतो. श्रुतज्ञानात ह्याच मध्यमपदाला घेतले आहे.

एकाएका पदावर एकाएका अक्षराची वृद्धि होत होत जेव्हा संख्यात हजार पदांची वृद्धि होते तेव्हा 'संघात' नावाचे श्रुतज्ञान होते. संघात श्रुतज्ञानापेक्षा कमी व पदज्ञानापेक्षा अधिक जेवढे श्रुतज्ञान आहे त्यांना 'पद समास' म्हणतात. संघात श्रुतज्ञान चारही गतिमधल्या कोणत्या तरी एका गतिचे वर्णन करणारे अपुनरूक्त मध्यमपदांचा समूह असतो.

संघात श्रुतज्ञानाच्या वर एका एका अक्षराची वृद्धि होता होता जेव्हा संख्यात हजार संघाताची वृद्धि होते तेव्हा चारही गतिंचे विस्ताराने वर्णन करणारे 'प्रतिपत्ति' नावाचे श्रुतज्ञान होते. संघात आणि प्रतिपत्ति ज्ञानाच्या मधल्या भेदाला 'संघातसमास' म्हणतात.

प्रतिपत्ति श्रुतज्ञानाच्या वर अक्षरांची वृद्धि होता-होता जेव्हा संख्यात हजार प्रतिपत्तिची वृद्धि होते तेव्हा चौदा मार्गणांचे विस्तृत विवेचन करणारे 'अनुयोग' नावाचे श्रुतज्ञान होते. प्रतिपत्ति आणि अनुयोग ह्यांच्या मध्ये जेवढे भेद आहेत त्यांना 'प्रतिपत्ति समास' म्हणतात.

अनुयोग ज्ञानाच्या वर पूर्वी सांगितलेल्या वृद्धिनुसार वृद्धि होत होत जेव्हा संख्यात हजार अनुयोगांची वृद्धि होते तेव्हा 'प्राभृत–प्राभृतक' नावाचे श्रुतज्ञान होते. अनुयोग आणि प्राभृत–प्राभृतक ज्ञानाच्या मधल्या भेदास 'अनुयोग समास' म्हणतात.

अशाप्रकारे अक्षरा-अक्षरांची वृद्धि होता होता जेव्हा चौवीस प्राभृत–प्राभृतकाची वृद्धि होते तेव्हा त्यास 'प्राभृत ज्ञान' म्हणतात. दोघांच्या मधल्या भेदांना 'प्राभृत–प्राभृतक समास' म्हटले आहे.

वीस प्राभृतप्रमाण ज्ञान झाले की 'वस्तु' नावाचे श्रुतज्ञान होते. प्राभृत आणि वस्तु यांच्या मधल्या भेदांना 'प्राभृत समास' म्हणतात.

वस्तुज्ञानात पूर्वी सांगितल्याप्रमाणे वृद्धि होता होता दहा इत्यादि एकशे पंच्यानऊ वस्तुरूपाची वृद्धि झाल्यास तेव्हा पूर्व नावाचे श्रुतज्ञान होते. वस्तु आणि पूर्वच्या मधल्या भेदास 'वस्तु समास' श्रुतज्ञान म्हणतात.

पूर्वज्ञानात वृद्धि होता होता पूर्ण श्रुतज्ञानाच्या मध्यवर्ती भेदास 'पूर्व समास' म्हणतात. अशाप्रकारे अक्षरात्मक श्रुतज्ञानाचे १८ भेद आहेत. यांना भावश्रुत सुद्धा म्हणतात. अक्षरात्मक श्रुतज्ञान द्वादश अंगरूप आहे. यामध्ये सर्व पद एक अरब, बारा करोड, त्र्याऐंशी लाख, अठ्ठावन हजार पाच (१,१२,८३,५८,००५).

ज्याचे विशेष स्पष्टीकरण खालीलप्रमाणे आहे –

(१) आचारांगामध्ये १८००० पद आहेत. यामध्ये मुनिचर्याचे वर्णन आहे.

(२) सूत्रकृतांगामध्ये ३६००० पद आहेत. यामध्ये सूत्ररूप व्यवहाराचे वर्णन आहे. स्वसमय इत्यादिचे विवेचन आहे.

(३) स्थानांगामध्ये ४२००० पद आहेत. यामध्ये सर्व द्रव्यांचे आणि सर्व संभव विकल्पांचे वर्णन आहे.
(४) समवायांगामध्ये १६४००० पद आहेत. यामध्ये सर्व द्रव्यांचे परस्परिक सादृश्याचे विवरण आहे.
(५) व्याख्याप्रज्ञाप्तिमध्ये २२८००० पद आहेत. यामध्ये ६०००० प्रश्नांची उत्तरे आहेत.
(६) ज्ञातृकथांमध्ये ५५६०० पद आहेत. यामध्ये गणधर इत्यादिंच्या कथा आणि तीर्थंकरांचे महत्त्व सांगितले आहे.
(७) उपासकाध्ययनमध्ये ११७०००० पद आहेत. ह्यामध्ये श्रावकाचाराचे वर्णन केले आहे.
(८) अनतःकृतदशांगमध्ये २३२८००० पद आहेत. ह्यामध्ये प्रत्येक तीर्थंकरांच्या समयातील दहा-दहा मुनिंच्या तीव्र उपसर्ग सहन करून मुक्त होण्याच्या कथा आहेत.
(९) अनुत्तरौपपादिक दशांग यामध्ये ९२४४००० पद आहेत. यामध्ये प्रत्येक तीर्थंकराच्या समयातील १०-१० तीव्र उपसर्ग सहन करून विजय मिळविण्याच्या आणि अनुत्तर विमानात देव उत्पन्न होण्याच्या कथा आहेत.
(१०) प्रश्न व्याकरणामध्ये ९३१६००० पद आहेत. यामध्ये नष्ट, मुष्टि, चिंता इत्यादि प्रश्नांना अनुसरूण हानी–लाभ इत्यादि दाखविणारे विवरण आहे.
(११) विपाक सूत्रामध्ये १८४००००० पद आहेत. यामध्ये कर्माचे फळ कसे मिळते याचे वर्णन आहे.
(१२) दृष्टीवादामध्ये १०८६८५६००५ पद आहेत. यामध्ये ३६३ मिथ्यामतांचे वर्णन व त्यांच्या निराकरणाचे वर्णन आहे. याचे पाच भेद आहेत – परिकर्म, सूत्र, प्रथमानुयोग, पूर्वगत आणि चूलिका.

परिकर्मामध्ये गणिताचे करणसूत्र आहे. याचे पाच भेद आहेत – चंद्रप्रज्ञप्ति, सूर्यप्रज्ञप्ति, जंबूद्वीप प्रज्ञप्ति, द्वीपसागर प्रज्ञप्ति आणि व्याख्या प्रज्ञप्ति.

चंद्रासंबंधी सर्व माहिती चंद्रप्रज्ञप्तिमध्ये आहे याचे ३६०५००० पद आहेत. सूर्यासंबंधी सर्व विवरण सूर्यप्रज्ञप्तिमध्ये, याचे ५०३००० पद आहेत. जम्बूद्वीप प्रज्ञप्तिमध्ये जम्बूद्वीपासंबंधी सर्व वर्णन आहे. याचे ३२५००० पद आहेत. द्वीपसागर प्रज्ञप्ति मध्ये अन्यद्वीप आणि सागरांचे वर्णन आहे. याचे ५२३६००० पद आहेत. व्याख्याप्रज्ञप्तिमध्ये भव्य–अभव्य, अनंतरसिद्ध, परंपरासिद्ध यांचे कथन आहे. यात ८४३६००० पद आहेत.

दृष्टीवादाच्या दुसऱ्या भेद सूत्रामध्ये ३६३ मिथ्यामतांचे पक्ष–प्रतिपक्षरूपाने वर्णन आहे. याचे ८८००००० पद आहेत. प्रथमानुयोगामध्ये ६३ शलाका पुरुषांचे वर्णन आहे. याचे ५००० पद आहेत.

पूर्वाचे १४ भेद आहेत. पूर्वामध्ये एकूण ९५५००००००५ पद आहेत. ज्याचे विवरण खालीलप्रमाणे आहे – चौदा पूर्वांचे नावे –

(१) उत्पादपूर्वामध्ये एक करोड पद आहेत. उत्पादपूर्वामध्ये प्रत्येक द्रव्याचे उत्पाद, व्यय आणि ध्रौव्य यांचे वर्णन आहे.
(२) अग्रायणीय पूर्वामध्ये ७०० नय आणि दुर्नय, पंचास्तिकाय यांचे वर्णन आहे. यामध्ये ९६ लाख पद आहेत.
(३) वीर्यप्रवादामध्ये ७० लाख पद आहेत. यामध्ये आत्मवीर्य, परवीर्य, गुणवीर्य इत्यादिंचे विवेचन आहे.
(४) अस्तिनास्ति प्रवादामध्ये सप्तभंगीचे कथन आहे. याचे ६० लाख पद आहेत.
(५) ज्ञानप्रवादामध्ये एका करोडास एक कमी एवढे पद आहेत. यामध्ये सर्व ज्ञानाचे विवरण आहे.

(६) सत्यप्रवादामध्ये सर्व प्रथम शब्द उच्चारण, दहा प्रकारचे सत्यवचन, असत्यवचन, भाषा इत्यादिंचे वर्णन आहे. याचे एक करोड सहा पद आहेत.

(७) आत्मप्रवादामध्ये २६ करोड पद आहेत. यामध्ये आत्म्याचे संपूर्ण वर्णन आहे.

(८) कर्मप्रवादामध्ये एक करोड ८० लाख पद आहेत. यामध्ये कर्माशी संबंधित संपूर्ण वर्णन आहे.

(९) प्रत्याख्यान पूर्वामध्ये द्रव्य, क्षेत्र, काल, संहनन इत्यादिंच्या अपेक्षा त्याग, समिति, गुप्ति यांचे विवेचन आहे. यामध्ये चौऱ्यांशी लाख पद आहेत.

(१०) विद्यानुवाद पूर्वामध्ये एक करोड दहा लाख पद आहेत. यामध्ये अंगुष्ठसेना इत्यादि ७०० अल्पविद्या आणि रोहिणी इत्यादि ५०० महाविद्या, मंत्र-तंत्र इत्यादिंचे वर्णन आहे.

(११) कल्याणवाद पूर्वामध्ये तीर्थंकरांच्या पाच कल्याणकांचे, सोळा भावना इत्यादिंचे वर्णन आहे. यामध्ये सव्वीस करोड पद आहेत.

(१२) प्राणावाय पूर्वामध्ये तेरा करोड पद आहेत. यामध्ये आठ प्रकारच्या आयुर्वेदाचे वर्णन आहे.

(१३) क्रियाविशाल पूर्वामध्ये संगीत, छंद पुरुषांच्या ७२ कला, स्त्रियांचे ६४ गुण इत्यादिंचे वर्णन आहे. यामध्ये ९ करोड पद आहेत.

(१४) त्रिलोकबिंदुसारमध्ये बारा करोड सत्तावन लाख पद आहेत. यामध्ये लोकाचे स्वरूप, मोक्षाचे स्वरूप, छत्तीस परिकर्म इत्यादिंचे वर्णन आहे.

चौदा पूर्वांमध्ये क्रमानुसार १०, १४, ८, १८, १२, १६, २०, ३०, १५, १०, १०, १०, १०, १२ वस्तु अधिकार अर्थात सर्व मिळून १९५ वस्तु होतात. एका-एका वस्तुचे २०-२० प्राभृत होतात. म्हणून चौदा पूर्वाचे सर्व प्राभृत ३९०० होतात.

दृष्टीवादाचा पाचवा भेद 'चूलिका' आहे. याचे ५ भेद आहेत. जलगता, स्थलगता, मायागता, आकाशगता आणि रूपगता.

जलगतामध्ये पाण्यामध्ये गमन करणे, जलस्तम्भनाचे मंत्र-तंत्र इत्यादिंचे वर्णन आहे.

स्थलगतामध्ये मेरू, कुलाचल इत्यादिमध्ये प्रवेश करणे, शीघ्र गमन इत्यादिसंबंधी मंत्र-तंत्र इत्यादिचे वर्णन आहे. मायागतामध्ये इंद्रजालविषयी मंत्र-तंत्र यांचे वर्णन ओ. आकाशगतामध्ये आकाश गमन इत्यादिचे मंत्र-तंत्र यांचे कथन आहे. रूपगतामध्ये सिंह वगैरेंचे अनेक रूप धारण करण्याचे वर्णन आहे. ह्या पाचही चूलिकामध्ये १०४९४६००० पद आहेत.

अशाप्रकारे अंगाच्या १२ प्रकारांचे वर्धन केले आहे. आणि अंगबाह्य १४ भेदांचे पुढे वर्णन केले आहे –

अंगबाह्य १४ भेद – सामायिक, चतुर्विंशतिस्तव, वंदना, प्रतिक्रमण, वैनयिक, कृतिकर्म, दशवैकालिक, उत्तराध्ययन, कल्पव्यवहार, कल्पाकल्प, महाकल्प, पुण्डरीक, महापुण्डरीक आणि निबिद्धिका.

(१) साधुंच्या समताभावरूप सामायिकाचे कथन करणारा 'सामायिक' प्रकीर्णक आहे.

(२) चौवीस तीर्थंकरांच्या स्तुतीची विधि सांगणारा प्रकीर्णक चतुर्विंशतिस्तव आहे.

(३) पंच परमेष्ठीची वंदना करणारे शास्त्र 'वन्दना' प्रकीर्णक आहे.

(४) दैवासिक, पाक्षिक, मासिक इत्यादि प्रतिक्रमणाचे विधान करणारा 'प्रतिक्रमण' प्रकीर्णक आहे.

(५) दर्शन, ज्ञान, चारित्र आणि उपचारविनय यांचे विस्ताराने विवेचन करणारा 'वैनयिक' प्रकीर्णक आहे.

(६) जिनदेव, सिद्ध, आचार्य आणि उपाध्याय यांची वंदना करताना जी क्रिया केली जाते त्या क्रियेस 'कृतिकर्म' म्हणतात.

(७) द्रव, पुष्प इत्यादि दहा अधिकारांनी मुनींच्या भोज्य पदार्थांचे वर्णन ज्यात केले जाते ते 'दशवैकालिक' आहे.
(८) उपसर्ग आणि परिषह सहन करण्याचे विधान 'उत्तराध्ययन' मध्ये आहे.
(९) ज्यामध्ये दोषांच्या प्रायश्चिताचे संपूर्ण वर्णन आहे. ते 'कल्पव्यवहार' आहे.
(१०) ज्यामध्ये सागार (श्रावक) – अनागार यांच्या योग्य-अयोग्य आचारांचे विवेचन आहे तो 'कल्पाकल्प' प्रकीर्णक आहे.
(११) ज्यामध्ये दीक्षा, शिक्षा, गणपोषण, सल्लेखना इत्यादिंच्या काळाचे वर्णन केले आहे त्याला महाकल्प म्हणतात.
(१२) ज्यामध्ये भवनवासी वगैरे देव होण्यासाठी योग्य तपस्या कोणती ? इत्यादिचे वर्णन आहे ते 'पुण्डरीक ' आहे.
(१३) ज्यामध्ये भवनवासी देवी वगैरे होण्यासाठी कोणती तपश्चर्या केली पाहिजे ? याची माहिती आहे ते 'महापुण्डरीक' आहे.
(१४) ज्यामध्ये स्थूल-सूक्ष्म दोषांचे प्रायश्चित घेण्याचे संहनन. शरीरबल यांच्या अनुसार विधान आहे. ते 'निषिद्धिका' प्रकीर्णक आहे.

अशाप्रकारे अंग आणि अंगबाह्य याचे संक्षिप्त वर्णन केले आहे.

## प्रत्यक्ष प्रमाण

विशद ज्ञानाला प्रत्यक्ष प्रमाण म्हणतात. याचे दोन भेद आहेत. देशप्रत्यक्ष आणि सकल प्रत्यक्ष. देशप्रत्यक्षाचे अवधिज्ञान आणि मनःपर्यय ज्ञान असे दोन भेद आहेत. सकल प्रत्यक्षामध्ये फक्त केवलज्ञान एकटेच आहे.

**अवधिज्ञान** - द्रव्य, क्षेत्र, काल, भाव यांच्या मर्यादेने पदार्थाच्या रूपांना स्पष्ट जाणणे 'अवधिज्ञान' आहे. याचे तीन भेद आहेत – देशावधि, परमावधि, आणि सर्वावधि.

देशावधिज्ञान देवांना होते. नारकीयांना जे ज्ञान होते ते भवप्रत्यय ज्ञान आहे. क्षयोपशमाच्या निमित्ताने होणारे अवधिज्ञान मनुष्य आणि तिर्यंच यांच्यामध्ये मिळू शकते याला गुणप्रत्यय म्हणतात. हे ज्ञान असंयमी सम्यग्दृष्टी आणि देशविरत मनुष्यांना सुद्धा होऊ शकते.

परमावधि आणि सर्वावधिज्ञान तद्‌भव मोक्षगामी चरम शरिरी मुनींनाच होते.

**मनःपर्ययज्ञान** - मनःपर्यय ज्ञानावरण आणि वीर्यान्तराय कर्माच्या क्षयोपशमाने उत्पन्न होणारे ज्ञान मनःपर्यय ज्ञान आहे. हे ज्ञान मानुषोत्तर पर्वतावरील दुसऱ्या लोकांच्या मनात असणाऱ्या पदार्थांना स्पष्टपणे जाणून घेते. याचे दोन भेद आहेत – ऋजुमति आणि विपुलमति.

**ऋजु** - सरळ मन, वचन, कायेने जे ज्ञान होते ते ऋजु मतिज्ञान आहे आणि कुटिल मन, वचन, कायेने जे ज्ञान होते ते विपुलमति ज्ञान आहे. ऋजुमति ज्ञान होऊन ते नाहिसे सुद्धा होऊ शकते. आणि विपुलमति ज्ञान नष्ट होऊ शकत नाही. हे ज्ञान चरमशरिरी यांनाच होते.

मनःपर्ययज्ञान वृद्धिगत चारित्रधारी, एखादी ऋद्धि प्राप्त आहे. अशा संयमी मुनींनाच होते. सर्वांना होऊ

शकत नाही.

**केवलज्ञान** - जगत्त्रय, कालत्रयवर्ती, सर्व पदार्थांना युगपत् जाणणारे केवलज्ञान आहे. ह्या केवलज्ञानरूपी दर्पणामध्ये लोकाकाश व अलोकाकाश एकाच वेळी दिसतो.

## प्रकाराच्या अंतराने प्रमाणाचे भेद–प्रभेद

न्यायशास्त्रामध्ये प्रमाणाच्या भेदामध्ये काही अंतर आहे ते खालीलप्रमाणे –
**प्रमाणाचे दोन भेद आहेत.** प्रत्यक्ष आणि परोक्ष.

**प्रत्यक्ष प्रमाणाचे दोन प्रकार आहेत** - सांव्यावहारिक आणि पारमार्थिक.

इंद्रिय आणि मनाच्या सहाय्याने उत्पन्न होणारे मतिज्ञान सांव्यावहारिक प्रत्यक्ष आहे. कारण 'मी डोळ्यांनी स्पष्ट पाहिले, कानांनी स्पष्ट ऐकले' इत्यादिमध्ये प्रत्यक्ष व्यवहार दिसतो. म्हणूनच इंद्रिय प्रत्यक्षाला सांव्यावहारिक प्रत्यक्ष म्हणतात. वास्तविक सैद्धान्तिक भाषेमध्ये हे ज्ञान परोक्षच आहे. कारण हे ज्ञान इंद्रिय आणि मनाची अपेक्षा ठेवते. अतः पराधीन असल्यामुळे परोक्ष आहे.

मतिज्ञानाचे ३३६ भेद आहेत.

पारमार्थिक प्रत्यक्षाचे विकल आणि सकलच्या अपेक्षेने दोन प्रकार आहेत. अवधि, मनःपर्यय विकल प्रत्यक्ष आणि केवलज्ञान सकल प्रत्यक्ष आहे.

**परोक्ष प्रमाणाचे पाच भेद आहेत** - स्मृति, प्रत्याभिज्ञान, तर्क, अनुमान आणि आगम.

**स्मृति** - तत् 'त्या' आकार असणाऱ्या ज्ञानास स्मृति म्हणतात. जसे तो देवदत्त आहे.

**प्रत्याभिज्ञान** - वर्तमानाचे प्रत्यक्ष आणि पूर्वीचे स्मरण ह्या दोन्ही मिळून जे ज्ञान होते त्या ज्ञानास प्रत्याभिज्ञान म्हणतात. जसे 'हे तेच आहे' असे म्हणणे. प्रत्याभिज्ञानाचे एकत्व, सदृश, विलक्षण आणि प्रतियोगी असे चार प्रकार आहेत.

**तर्क** - व्याप्तिच्या ज्ञानास तर्क म्हणतात. साधन साध्य झाल्यावरच होते. साध्याची प्राप्ती नाही झाली तर होत नाही. यालाच व्याप्ति म्हणतात. जसे जेथे अग्नि आहे तेथे धूर असलाच पाहिजे. आणि अग्नि नाही तर धूर नाही.

**अनुमान**[१] - साधनाने जे साध्याचे ज्ञान होते त्याला अनुमान म्हणतात. ज्याचा साध्याच्या बरोबर अविनाभाव निश्चित आहे त्याला साधन म्हणतात. इष्ट, अबाधित आणि असिद्ध अशा तीन विशेषणांनी सहित असलेल्या वस्तुला साध्य म्हणतात.

धर्म आणि धार्मिक लोकांच्या समुदायांचे वर्णन करणे याला 'पक्ष' म्हणतात.

जैन आचार्यांनी अनुमानाचे[१] मुख्यरूपाने पक्ष आणि हेतु हे दोनच अवयव मानले आहे. कदाचित्

---

१) अनुमान – यांचे विशेषवर्णन परिक्षामुखमध्ये पहा.

बालशिष्यांना समजावून सांगण्यासाठी अनुमानाचे पाच प्रकार मानले आहेत – प्रतिज्ञा (पक्ष), हेतु, उदाहरण, उपनय आणि निगमन.

**आगम** - आप्त वचन आणि अंगुली संज्ञाने जे अर्थज्ञान होते त्याला आगम म्हणतात. जसे मेरु पर्वत इत्यादि आहे. सिद्धांतग्रंथामध्ये श्रुतज्ञानास परोक्षप्रमाण मानले आहे. न्यायग्रंथात सुद्धा श्रुतज्ञानास आगमप्रमाण म्हणून परोक्ष म्हटले आहे.

अशाप्रकारे सिद्धांत आणि न्याय यांच्या अनुसार प्रमाणाचे वर्णन केले आहे.

# नयाचे वर्णन

प्रमाणांनी जाणलेल्या पदार्थाच्या एक देश ग्रहण करणाऱ्या ज्ञानाच्या अभिप्रायास 'नय'[१] म्हणतात.

**नयाचे नऊ[२] भेद आहेत** - द्रव्यार्थिक, पर्यायार्थिक, नैगम, संग्रह, व्यवहार, ऋजुसूत्र, शब्द, समभिरूढ आणि एवंभूत.

१. द्रव्याच्या विषयाचे वर्णन करणारा द्रव्यार्थिक नय आहे. याचे दहा प्रकार आहेत – कर्माच्या उपाधिपासून निरपेक्ष शुद्ध द्रव्यार्थिक नय आहे. जसे संसारी जीव सिद्धाप्रमाणे शुद्ध आहेत.

सत्ता ग्राहक शुद्ध द्रव्यार्थिक नय जसे जीव नित्य आहे.

भेद कल्पना निरपेक्ष शुद्ध द्रव्यार्थिक नय, जसे द्रव्य गुण पर्याय स्वरूप असल्याने अभिन्न आहे.

कर्मोपाधि सापेक्ष अशुद्ध द्रव्यार्थिक नय, जसे आत्मा कर्मोदयाने क्रोधादि भाव रूप आहे.

उत्पाद, व्यय सापेक्ष अशुद्ध द्रव्यार्थिक नय, जसे एकाच वेळेस द्रव्य, उत्पाद, व्यय आणि ध्रौव्य स्वरूप आहे.

भेद कल्पना सापेक्ष अशुद्ध द्रव्यार्थिक नय, जसे आत्म्याचे ज्ञान, दर्शन इत्यादि गुण आहेत.

अन्वय द्रव्यार्थिक नयाने गुण-पर्याय स्वभाव असणारा द्रव्य होतो.

स्वचतुष्टय ग्राहक द्रव्यार्थिक – जसे द्रव्य क्षेत्र, काल भावाच्या अपेक्षेने अस्तिरूप आहे.

परभाव ग्राहक द्रव्यार्थिक – जसे आत्मा ज्ञान-स्वरूप आहे. परचतुष्टयग्राहक द्रव्यार्थिक जसे द्रव्य क्षेत्र, काल भावाच्या अपेक्षेने द्रव्य नास्तीरूप आहे.

२. पर्यायांना ग्रहण करणारा पर्यायार्थिक नय आहे त्याचे ६ भेद आहेत.

(१) अनादि नित्य पर्याथार्थिक – जसे सुमेरु पर्वत इत्यादि पुद्गल पर्याय नित्य आहेत.

(२) सादि नित्य पर्यायार्थिक नय – जसे सिद्ध पर्याय नित्य आहे.

(३) उत्पाद व्यय ग्राहक पर्यायार्थिक नय – जसे पर्याय क्षणाक्षणात नष्ट होतात.

(४) सत्ता सापेक्ष पर्यायार्थिक नय – जसे पर्याय एकाच समयात उत्पाद, व्यय ध्रौव्यरूप आहे.

(५) पर उपाधि निरपेक्ष शुद्ध पर्यायार्थिक नय – जसे संसारी जीवांची पर्याय सिद्ध भगवानाप्रमाणे शुद्ध आहे.

(६) कर्मोपाधि सापेक्ष अशुद्ध पर्यायार्थिक नय – जसे संसारी जीवांना जन्म आणि मरण होते.

३. संकल्प मात्र निमित्ताने पदार्थास जाणणारा नैगम नय आहे. याचे तीन भेद आहेत – भूत, भविष्य

१) न्यायदीपिका

२) आलाप पद्धति.

आणि वर्तमान.

जेथे भूतकाळानंतर वर्तमानकाळाचा आरोप केल्या जातो त्याला भूत नैगम नय म्हणतात. जसे आज दीपमालिकेच्या (दिवाळी) दिवशी वर्धमान स्वामी मोक्षास गेले.

भविष्यकाळाचा वर्तमानकाळामध्ये आरोपण करणे. जसे – अरिहंत भगवान यांना सिद्ध म्हणणे.

प्रारंभ केलेल्या कार्यास पूर्ण झाले असे म्हणणे – जसे स्वयंपाकघरामध्ये गॅस पेटविताना म्हणणे की मी भात करीत आहे.

४. पदार्थांना संग्रहीत रूपाने जाणणारा संग्रह नय आहे. याचे दोन भेद आहेत –

सामान्य संग्रह – जसे सर्व पदार्थ द्रव्यत्वाच्या अपेक्षेने समान आहेत. परस्पर अविरोधी आहेत.

विशेष संग्रह – जसे सर्व जीव जीवत्वाच्या अपेक्षेने समान आहेत व परस्पर अविराधी आहेत.

५. संग्रहनयाच्या द्वारा समजल्या जाणाऱ्या पदार्थास विधिपूर्वक भेद करून जाणणारा व्यवहार नय आहे. याचे सुद्धा दोन भेद आहेत.

सामान्य व्यवहार – सामान्य संग्रहाने गृहीत वस्तुंमध्ये भेद करणे – जसे द्रव्याचे दोन भेद आहेत. जीव आणि अजीव.

विशेष व्यवहार – विशेष संग्रहाच्या गृहीत वस्तुंमध्ये भेद करणे – जसे जीवाचे दोन भेद आहेत. संसारी आणि मुक्त.

६. वर्तमानकाळास ग्रहण करणारा ऋजुसूत्र नय आहे. याचे दोन भेद आहेत.

सूक्ष्म ऋजुसूत्र – एक समयवर्ती पर्यायास ग्रहण करणारा सूक्ष्म ऋजुसूत्र आहे.

स्थूल ऋजुसूत्र – मनुष्य इत्यादि पर्यायांना आयुपर्यंत कालप्रमाण मानणे स्थूल ऋजुसूत्र आहे.

७. संख्या, लिंग इत्यादिंचा व्यभिचार दूर करून शब्दाच्या सहाय्याने पदार्थास ग्रहण करणे शब्द नय आहे. जसे विभिन्न लिंगवाची दारा (पु.) भार्या (स्त्रीलिंग), कलत्र (नपुंसक) या शब्दांद्वारा स्त्री या शब्दास ग्रहण करणे.

८. एका शब्दाचे अनेक अर्थ झाल्यावर कोणत्याही एका प्रसिद्ध रूढ अर्थास शब्दाद्वारे सांगणे याला समभिरूढ नय म्हणतात. जसे गो शब्दाचे (संस्कृत भाषेत) पृथ्वी, वाणी, किरण इत्यादि अनेक अर्थ आहेत. परंतु तरीसुद्धा गो शब्दाने गाय हाच अर्थ समजणे.

९. शब्दाच्या व्यत्पुत्तिनुसार त्याच क्रियेमध्ये परिणत पदार्थाला त्याच शब्दाद्वारे ग्रहण करणे एवंभूतनय आहे. जसे 'गच्छति इति गौः' व्युपत्तिनुसार गाय या शब्दास 'गो' शब्दाद्वारे जाणणे.

अशाप्रकारे नयामध्ये द्रव्यार्थिक नयाचे १०+पर्यायार्थिकाचे ६+ नैगम नयाचे ३+ संग्रहनयाचे २+ व्यवहार नयाचे २+ ऋजुसूत्र नयाचे २+ शब्द नयाचा १+ समभिरूढ नयाचा १ आणि एवंभूत नयाचा १ असे सर्व मिळून २८ भेद होतात.

अशाप्रकारे संक्षेपाने नयाचे स्वरूप सांगितले आहे. नयाच्या शाखेस उपनय म्हणतात. अथवा जे नयाच्या जवळ आहेत, नयासारखे दिसतात ते उपनय आहेत. उपनयाचे तीन भेद आहेत – सद्‌भूत व्यवहार नय, असद्‌भूत व्यवहार नय आणि उपचरित असद्‌भूत व्यवहार नय.

(१) सद्‌भूत व्यवहारनयाचे दोन भेद आहेत – शुद्ध सद्‌भूत व्यवहार – जो शुद्ध गुण आणि गुणी आणि शुद्ध पर्याय आणि पर्यायी यांच्यामध्ये असलेल्या भेदांचे वर्णन करतो. जसे सिद्धांचे केवलज्ञान, दर्शन इत्यादि गुण आहेत आणि सिद्धत्व इत्यादि पर्याय आहे.

अशुद्धसद्‌भूत व्यवहार – जो अशुद्ध गुण–गुणी व अशुद्ध पर्याय व पर्यायीमध्ये असलेल्या भेदांचे वर्णन

करतो. जसे – संसारी जीवाचे मतिज्ञानादि गुण आणि मनुष्य इत्यादि पर्याय आहेत.

(२) असद्भूत व्यवहारनयाचे तीन भेद आहेत –

स्वजाति असद्भूत व्यवहार – जसे परमाणु बहुप्रदेशी आहे.

विजाती असद्भूत व्यवहार – जसे मतिज्ञान मूर्तिक आहे कारण मतिज्ञान मूर्तिक ज्ञानावरणाच्या क्षयोपशाने उत्पन्न झाले आहे. जसे देश, राज्य इत्यादी माझे आहेत.

स्वजाति विजाति असद्भूत व्यवहार – जसे ज्ञेयस्वरूप जीव आणि नेयस्वरूप अजीव दोघांमध्येही ज्ञान आहे. कारण सर्व ज्ञेय ज्ञानाचे विषय आहेत.

(३) उपचरित व्यवहार नयाचे तीन भेद आहेत.

(१) स्वजाति उपचरित असद्भूत व्यवहार - जसे पुत्र, स्त्री माझे आहे.

(२) विजातिय उपचरित असद्भूत व्यवहार - जसे घर, वस्त्र इत्यादि पदार्थ माझे आहेत.

(३) स्वजाति विजाति असद्भूत व्यवहार - जसे देश, राज्य, किल्ला इत्यादि माझे आहेत.

[अशाप्रकारे सद्भूताचे २, असद्भूताचे ३ आणि उपचरित असद्भूताचे ३ असे एकूण ८ उपनय मानले आहेत.]

## अध्यात्म्याच्या अपेक्षेने नयाचे वर्णन

अध्यात्म भाषेमध्ये नयाचे दोन मुख्य प्रकार आहेत – निश्चय नय आणि व्यवहार नय

**निश्चय नय** पदार्थाचे भेद न करता पदार्थास समजून घेतो. आणि अभेदास विषय करतो.

निश्चयनयाचे दोन भेद आहेत – (१) शुद्ध निश्चयनय व (२) अशुद्ध निश्चय नय.

कर्माच्या उपाधिपासून वेगळे होऊन गुण आणि गुणीमध्ये अभेदास विषय करणारा शुद्ध निश्चयनय आहे. जसे केवलज्ञान इत्यादि गुणच जीव आहे.

कर्माच्या उपाधिस विषय करणारा अशुद्ध निश्चयनय आहे. जसे मतिज्ञान इत्यादि रूप जीव आहे.

**व्यवहार नय** पदार्थाचे भेद करून पदार्थास जाणतो. अर्थात भेदास विषय करतो.

व्यवहार नयाचे दोन भेद आहेत. (१) सद्भूत व्यवहारनय आणि (२) असद्भूत व्यवहारनय

(क) एकाच वस्तुला अनेक प्रकारांनी ग्रहण करणे. हा सद्भूत व्यवहारनय आहे. याचे दोन प्रकार आहेत–(१) उपचरित सद्भूत व्यवहार आणि अनुपचरित सद्भूत व्यवहार.

**उपचरित सद्भूत** - जो उपाधिसहित गुण व गुणी यांना भेद करून ग्रहण करतो. जसे मतिज्ञान इत्यादि गुण जीवाचे आहेत.

**अनुपचरित सद्भूत व्यहवार** - जो उपाधि सोडून गुण व गुणी मध्ये भेद करतो - केवलज्ञान इत्यादि गुण जीवाचे आहेत.

(ख) जो भिन्न वस्तुंना सबंध रूपाने ग्रहण करतो तो असद्भूत व्यवहार आहे. याचे दोन प्रकार आहेत– उपचरित असद्भूत आणि अनुपचरित असद्भूत.

**उपचरित असद्भूत व्यवहार** - संबंध नसलेल्या वस्तुंना सबंध रूपाने ग्रहण करणे जसे – देवदत्ताचे धन.

**अनुपचरित असद्भूत व्यवहार** - संबंध असलेल्या वस्तुंना सबंधरूपाने ग्रहण करणे जसे – जीवाचे शरीर आहे.

प्रकाराच्या अंतराने[१] निश्चय आणि व्यवहारनयाचे वर्णन पाहिल्या जाते.

---

१) शास्त्रसार समुच्चय, पृ० ३५१.
सर्व पूर्वोक्त नय आलापपद्धतीचे आहेत.

(१) जो पदार्थाच्या शुद्ध अंशाचे प्रतिपादन करतो तो निश्चयनय आहे. जसे – जीव आपल्या चेतना प्राणाने त्रिकाळात जीवित राहतो.

(२) जो पदार्थाच्या मिश्रित रूपाचे प्रतिपादन करतो तो व्यवहारनय आहे. जसे – जीव इन्द्रिय, बल, आयु आणि श्वासोच्छवास इत्यादि दहा प्राणांनी जीवंत राहतो.

हे सर्व नय आंशिक ज्ञानरूप आहेत. हे अन्य नयाची जेव्हा अपेक्षा ठेवतात तेव्हा त्यांना सत्य समजल्या जाते. तेव्हा ते अन्य नयाची अपेक्षा ठेवीत नाही तेव्हा त्यांना मिथ्या म्हटल्या जाते. सांगितलेले सुद्धा आहे की –

"जे[1] नय परस्पर निरपेक्ष आहेत ते मिथ्या आहेत. जर ते नय परस्परांची अपेक्षा करतात तर त्यांना सम्यक्-सुनय म्हणतात. आणि यांच्या द्वारा पदार्थाचे वास्तविक ज्ञान होते. ज्याप्रमाणे द्रव्यार्थिक नय जीवास नित्य म्हणतो आणि पर्यायार्थिक नय जीवास अनित्य म्हणतो. जर ह्या दोन्ही नयांनी एक दुसऱ्याची अपेक्षा ठेवली नाही तर चुकीचे होईल. वास्तविक द्रव्यदृष्टीने जीव नित्यच आहे. कारण द्रव्याचा कधीही नाश होत नाही. पर्यायदृष्टीने तोच जीव अनित्य आहे. कारण मनुष्य इत्यादि पर्यायांचा विनाश होतो. व देव इत्यादि पर्यायांचा उत्पाद होतो. म्हणून जीव कथंचित् नित्य आहे आणि कथंचित् अनित्य आहे. हे सिद्ध झाले आहे.

# स्याद्वादसिद्धि

## सप्तभंगी

'स्यात'[2] हा शब्द निपात आहे. आणि सर्वथा एकांताचा त्यागी असल्याने 'कथंचित्' 'कथंचन' इत्यादि शब्दांच्या अर्थाचा बोधक आहे. जसे – जीव कथंचित् नित्य आहे, कथंचित् अनित्य आहे इत्यादि. यामध्ये स्याद्वाद सप्तभंग व नयाची अपेक्षा ठेवतो असे सांगितले आहे. तसेच स्याद्वाद हेय आणि उपादेय यांना सांगणारा आहे.

**सप्तभंगीचे स्पष्टीकरण** - 'प्रश्नवशादेकस्मिन् वस्तुन्यविरोधेन विधिप्रतिषेधविकल्पना सप्तभंगी ।' प्रश्नाच्या निमित्ताने एकाच वस्तुमध्ये प्रत्यक्ष इत्यादि प्रमाणांनी अविरूद्ध विधि आणि प्रतिषेधाची कल्पना सप्तभंगी आहे. जसे – स्यादस्ति जीवः । स्यान्नस्ति जीवः । स्यादस्ति नास्ति जीवः । स्यादवक्तव्यो जीवः । स्यादस्ति अवक्तव्यो जीवः । स्यान्नास्ति अवक्तव्यो जीवः । स्यादस्ति नास्ति अवक्तव्यो जीवः ।'

स्वद्रव्य, क्षेत्र, काल, भाव यांच्या अपेक्षेने जीव 'अस्तिरूपच' आहे. परद्रव्यादि 'चतुष्ट्याच्या' अपेक्षेने जीव नास्तिरूप आहे. क्रमाने स्वपर चतुष्ट्याच्य अपेक्षेने जीव अस्तिनास्तिरूप आहे. युगपत् स्वपरचतुष्ट्याच्या अपेक्षेने जीव अवक्तव्य रूप आहे. स्वचतुष्ट्याची विवक्षा करण्याने आणि युगपत दोन्ही धर्मांना सांगू शकत नसल्यामुळे जीव नस्ति अवक्तव्य आहे. स्वपरचतुष्ट्याची विवक्षा केल्याने आणि युगपत दोन्ही धर्मांना सांगू शकत नसल्याने जीव अस्ति नास्ति अवक्तव्य आहे.

येथे प्रथम भंगामध्ये अस्तित्व प्रधान आहे आणि बाकी सहा भंग गौण आहेत. द्वितिय भंगामध्ये नास्तित्व प्रधान आहे. आणि सहा भंग गौण आहेत असे सर्वत्र समजावे.

**प्रश्न** - वस्तुमध्ये सातच भंग का असतात ?

---

१) निरपेक्षा नया मिथ्याः सापेक्षा वस्तु तेर्थकृत् – श्रीसमन्तभद्र स्वामी । – आप्तमीमांसा ।

२) स्याद्वाद सर्वथैकांतत्यागात् किंवृत्तचिद्विधिः ।
सप्तभंगनयापेक्षो हेयादेयविशेषकः ॥१०४॥ – आप्तमीमांसा ।

**उत्तर** - शिष्य सातच प्रश्न विचारतात.

**प्रश्न** - शिष्य सातच प्रश्न का विचारतात ?

**उत्तर** - कारण सूत्रामध्ये 'प्रश्नवशादेव' असे पद आहे.

**प्रश्न** - सातच प्रश्न का होतात ?

**उत्तर** - सात प्रकारचीच जिज्ञासा होते.

**प्रश्न** - सात प्रकारचीच जिज्ञासा का होते ?

**उत्तर** - त्या संशयाच्या विषयानुसार वस्तुधर्म फक्त सात प्रकारचेच आहेत.

हा सात प्रकारचा व्यवहार निर्विषयक नाही. कारण ह्या सात प्रकारांनीच वस्तुचे यथार्थ ज्ञान, त्यामध्ये प्रवृत्ति आणि त्यांच्या प्राप्तीचा निश्चय पाहिल्या जातो. श्री भट्टाकलंक देवाने सप्तभंगीलाच 'स्याद्वादामृतगर्भिणी' म्हटले आहे.

**शंका** - एकाच वस्तुमध्ये शीत-उष्ण असे दोन धर्म संभव नाही. जी वस्तु नित्य आहे ती अनित्य नाही. अन्यथा अनर्थ होईल.

**समाधान** - असे नाही आहे. कारण ज्यावेळेस जीव द्रव्यदृष्टीने नित्य आहे त्याच वेळेस तो जीव पर्यायाच्या दृष्टीने अनित्य आहे. जर जीव नित्य नाही झाला तर पुनर्जन्मामध्ये तोच जीव जाणार नाही. आणि अनित्य नाही झाला तर मनुष्य पर्यायाचा नाश आणि देव पर्यायाचा उत्पाद होऊ शकत नाही. परंतु सर्व आस्तिकवादी लोक जीवाचा पुनर्जन्म, उत्पाद-विनाश मानतात. असे अनेक विरोधी धर्म अपेक्षेच्या शैलीने एकाच वस्तुमध्ये राहून जातात. त्यांना बाध येत नाही. अथवा जसे – कोण्या एका मनुष्यामध्ये शत्रु आणि मित्र असे दोन्ही विरोधी धर्म बरोबर राहतात. तो कोणाचा शत्रु आहे तर अन्य कोणाचा मित्र सुद्धा त्याचवेळेस आहे.

**प्रश्न** - जर अनेकान्तामध्ये अनेकान्त लावला तर तो द्वितीय भंग एकान्त बनेल. तर अनेकान्तामध्ये अनेकान्त लावला तर अनवस्था येईल काय ?

**उत्तर** - अनेकान्त मध्ये सुद्धा प्रमाण आणि नयाच्या दृष्टीने अनेकान्त आणि एकान्त रूपाने अनेक प्रकारच्या कल्पना होतात.

एकान्त[१] आणि अनेकान्त दोन्ही सम्यक् आणि मिथ्यात्वाच्या प्रकाराने दोन-दोन प्रकारचे होतात. सम्यक् एकान्त, मिथ्या एकान्त, सम्यक् अनेकान्त आणि मिथ्या अनेकान्त.

**सम्यक् एकान्त** - प्रमाणाच्या सहाय्याने सांगितलेल्या वस्तुच्या एका अंशास नयाच्या अपेक्षेने ग्रहण करणारा सम्यक् एकान्त आहे. जसे – जीव निश्चयनयाने शुद्ध आहे. अथवा व्यवहारनयाने अशुद्ध आहे. यालाच सम्यक्नय म्हणतात.

**मिथ्या एकान्त** - वस्तुच्या एका धर्मास पूर्णपणे धारण करून अन्य धर्माचे निराकरण करण्यास मिथ्या एकान्त म्हणतात. जसे वस्तु क्षणिक आहे आणि सर्वथा नित्य सुद्धा आहे हा दुर्नय आहे.

**सम्यक् अनेकान्त** - एका वस्तुमध्ये युक्ति आणि आगमाच्या अविरूद्ध अनेक विरोधी धर्मांना ग्रहण करणारा सम्यक् अनेकान्त आहे. जसे जीव अनंत धर्मात्मक आहे.

---

१) राजवार्तिक ।

**मिथ्या अनेकान्त** - वस्तुला अस्ति-नास्ति इत्यादि स्वभावाने शून्य समजून त्यामध्ये अनेक धर्माची मिथ्या कल्पना करणे – अर्थशून्य वचन विलास मिथ्या अनेकान्त आहे.

ह्या चारांमध्ये सम्यक एकान्त 'नय' आणि सम्यक् अनेकान्त 'प्रमाण' म्हटल्या जातो.

जर अनेकान्तासच अनेकान्त समजले आणि एकान्ताचा लोप केला तर सम्यक् एकान्ताच्या अभावाने तत्समुदाय रूपाने अनेकान्ताचा अभाव होईल. जसे – शाखांचा अभाव असला तर वृक्षाचा सुद्धा अभाव होतो. जर एकान्त मानले तर अविनाभावी इतर धर्मांचा लोप होऊन प्रकृत बाकी धर्मांचा सुद्धा लोप होऊन जाईल.

**[१]अनेकांतोऽप्यनेकांतः प्रमाणनयसाधनः ।**
**अनेकांतः प्रमाणात्ते तदेकांतोर्पितान्नयात् ॥**

अशाप्रकारे अनेकांत सुद्धा अनेकांतरूप आहे हे प्रमाण आणि नयाने सिद्ध झाले आहे. प्रमाणाच्या अपेक्षेने अनेकांत अनेकांतरूप आहे. तसेच अर्पित-विवक्षित नयाच्या अपेक्षेने एकांतरूप आहे. अशाप्रकारे अनेकांतामध्ये सुद्धा सप्तभंगी होते.

अर्हन्त भगवानाच्या शासनामध्ये तीन वस्तु परस्पर अविरोधी आहेत –

**नयसत्वर्तवः[२] सर्वे गव्यन्ये चाप्यसङ्गताः ।**
**श्रियस्ते त्वयुवन् सर्वे दिव्यर्द्धया चावसंभृता ॥**

अर्थ – हे भगवान आपल्या शासनामध्ये नय, प्राणी आणि ऋतु परस्पर विरोधी होऊन सुद्धा अविरोधी आहेत. हे सर्व आपल्या प्रभावाने एकत्र आले आहेत. आणि किती तरी अन्य कार्य देवांच्या ऋद्धिने संपन्न झाले आहेत.

अर्थात निश्चय-व्यवहार, द्रव्यार्थिक-पर्यायार्थिक इत्यादि नय परस्परविरोधी आहेत. तरीसुद्धा कथंचित् या नीतीने एक दुसऱ्याची अपेक्षा केल्याने अविरोधी होतात. हे आपल्या शासनानेच महत्त्व आहे असे अन्यत्र कोठेही नाही. परस्परविरोधी नकुल-सर्प, सिंह-हरिण इत्यादि प्राणी सुद्धा आपल्या आश्रयास आल्यावर (समवशरणामध्ये) जन्मजात वैर सोडून, एकमेकांचा विरोध करणे सोडून प्रेमभाव धारण करतात. त्याचप्रमाणे सहा ऋतुसुद्धा परस्परविरोधी आहेत. एकाच वेळेस सर्व ऋतु फळ देत नाही. तरी सुद्धा जेथे भगवान ध्यान करतात अथवा जेथे समवशरण होते तेथे एकाच वेळेस सहा ऋतुची फळ-फुल सुद्धा पहावयांस मिळतात. असा जैन शासन सर्व काळ जयवंत राहो.

# निक्षेप

जीवादि सात पदार्थांना सम्यक् प्रकाराने समजण्यासाठी निक्षेप मानले गेले आहेत. याचे चार प्रकार आहेत. नाम, स्थापना, द्रव्य आणि भाव.

जातीच्या निमित्ताने निरपेक्ष कोणत्याही वस्तुची संज्ञा (व्याख्या) करणे नाम निक्षेप आहे. जसे – कोणाचे नाव महावीर ठेवणे.

काष्ठ, पाषाण इत्यादिमध्ये हे अमुक आहे अशाप्रकारे स्थापित करणे स्थापना आहे. याचे पूज्य-अपूज्य या अपेक्षेने भेद होतात. जसे पाषाणाच्या प्रतिमेमध्ये चंद्रप्रभ भगवंताची स्थापना करणे पूज्य तदाकार स्थापना आहे.

---

१) अनेकांतोऽप्यनेकांतः – स्वयंभूस्तोत्र.
२) नयसत्वर्तवः – स्वामी श्री समंतभद्र

ज्याने गुण प्राप्त केले तो या गुणांना प्राप्त करेल हा द्रव्यनिक्षेप आहे. वर्तमान पर्याय ज्याचे आहे अशा वस्तुंना धारण करणे हा भाव निक्षेप आहे.

## जीवाचे स्वतत्त्व

जीवाचे असाधारण भाव (जीवाशिवाय अन्य कोणत्याही द्रव्यात नसतात.) पाच आहेत. यालाच जीवाचे स्वतत्त्व म्हणतात. औपशमिक, क्षायिक, क्षायोपशमिक, औदायिक आणि पारिणामिक.

**(१) औपशमिक** - कर्माच्या उपशमाने होणाऱ्या भावास औपशमिक म्हणतात. याचे दोन प्रकार आहेत– (१) औपशमिक सम्यक्त्व आणि (२) औपशमिक चारित्र.

**उपशमस्मक्त्व** - अनादि मिथ्यादृष्टीच्या अपेक्षेने मिथ्यात्व आणि अनंतानुबंधी क्रोध, मान, माया, लोभ ह्या पाच प्रकृतिंचा उपशम झाल्याने सादिमिथ्यादृष्टीचे मिथ्यात्व, सम्यक्त्व मिथ्यात्व, सम्यक्त्व आणि चार अनंतानुबंधी ह्या सात कर्मांचा उपशम झाल्याने उपशम सम्यक्त्व होते.

**उपशमचारित्र** - अनंतानुबंधीच्या शिवाय चारित्र मोहनीय कर्माच्या २१ प्रकृतिंचा उपशम झाल्याने उपशम चारित्र (अकराव्या गुणस्थानामध्ये) होते.

**(२) क्षायिक भाव** - कर्माच्या सर्वथा क्षय होण्याने जे आत्म्याचे पूर्णशुद्ध भाव होतात त्याला क्षायिक भाव म्हणतात. याचे ९ भेद आहेत. क्षायिकज्ञान, क्षायिक दर्शन, क्षायिक दान, लाभ, भोग, उपभोग, वीर्य, क्षायिक सम्यक्त्व आणि क्षायिक चारित्र. ज्ञानावरण, दर्शनावरणाच्या क्षयाने ज्ञान-दर्शन होते. अन्तरायाच्या पाच भेदांच्या क्षयाने क्रमाने पाच भाव होतात. दर्शन मोहनीयाच्या क्षयाने सम्यक्त्व आणि चारित्र मोहनीयाच्या क्षयाने चारित्र होते.

**(३) क्षायोपशमिक** - कर्माच्या सर्वघाती स्पर्धकांच्या उदयाभावरूप क्षय, अन्य सर्वघाती स्पर्धकांचा सद्वस्थारूप उपशम तसेच देशघाती स्पर्धकांचा उदय झाल्यावर जे भाव होतात ते क्षायोपशमिक भाव आहेत. त्याचे १८ भेद आहेत. मतिज्ञान, श्रुतज्ञान, अवधिज्ञान, मनःपर्ययज्ञान, कुमति, कुश्रुत, कुअवधि, चक्षुदर्शन, अचक्षुदर्शन, अवधिदर्शन, क्षायोपशमिक दान, लाभ, भोग, उपभोग, वीर्य, सम्यक्त्व, चारित्र आणि संयमासंयम.

यामध्ये पहिले सात भेद ज्ञानावरण कर्माच्या क्षयोपशमाने, त्यानंतरचे तीन भेद दर्शनावरणाच्या क्षयोपशमाने आणि नंतरचे पाच भाव अन्तरायाच्या क्षयोपशमाने आणि शेवटचे तीन भेद क्रमशः दर्शनमोहनीय आणि चारित्रमोहनीयच्या (प्रत्याख्यानावरण, अप्रत्याख्यानावरण) क्षयोपशमाने होतात.

**(४) औदायिक** - जे भावकर्मांच्या उदयाने होतात. ते औदायिक भाव आहेत. त्याचे २१ प्रकार आहेत– मनुष्यगति, देवगति, तिर्यञ्चगति, नरकगति, क्रोध, मान, माया, लोभ, पुरुषवेद, स्त्रीवेद, नपुसंकवेद, मिथ्यात्व, अज्ञान, असंयम, असिद्ध, कृष्ण, नील, कापोत, पीत, पद्म, शुक्ल. ह्या सर्व भावांपैकी काही भाव नामकर्माच्या उदयाने, काही मोहनीय कर्माच्या उदयाने, काही ज्ञानावरण कर्माच्या उदयाने आणि काही सर्वसामान्य कर्माच्या उदयाने होतात.

**पारिणामिक** - आत्म्याचे जे भाव स्वाधीन, स्वाभाविक (कर्मनिरपेक्ष) होतात ते पारिणामिक आहेत. त्याचे तीन भेद आहेत – जीवत्व, भव्यत्व आणि अभव्यत्व.

**जीवत्व** - जीवाचा चेतनामय भाव जीवत्व आहे.

## भव्यत्व - मुक्त होण्याची पात्रता भव्यत्व आहे.

**अभव्यत्व** - मुक्त न होण्याची योग्यता अभव्यत्व आहे.

**जीवाचे लक्षण** - जीवाचे लक्षण उपयोग आहे. अर्थात जीवत्व, भव्यत्व आणि अभव्यत्व हे भाव ज्यांच्यामध्ये असतात त्या जीवाचे लक्षण उपयोग आहे. याचे १२ भेद आहेत – पाच ज्ञान, तीन कुज्ञान आणि चार दर्शन.

## दर्शन समीक्षा

ज्याच्या द्वारा वस्तुतत्वाचा निर्णय केल्या जातो ते दर्शनशास्त्र आहे. सांगितले सुद्धा आहे की – 'दृश्यते निर्णीयते वस्तुतत्त्वमनेनेति दर्शनम्' । या लक्षणाने दर्शनशास्त्र तर्कवितर्क मंथनाने परिक्षास्वरूप आहे. तत्वांच्या निर्णयामध्ये प्रयोजक आहे. जसे – संसार नित्य आहे की अनित्य ? संसाराची सृष्टी करणारा कोणी आहे की नाही ? आत्म्याचे स्वरूप काय आहे ? आत्म्याचा पुनर्जन्म होतो की नाही ? ईश्वराची सत्ता आहे की नाही ? इत्यादि प्रश्नांचे उचित उत्तर देणे दर्शनशास्त्राचे काम आहे.

**दर्शन याला दोन भागामध्ये विभक्त केले आहे** - भारतीय दर्शन आणि पाश्चात्य दर्शन. भारतीय दर्शनाचे वैदिक दर्शन आणि अवैदिक दर्शन असे दोन भेद होतात.

वैदिक दर्शनामध्ये मुख्यतः सांख्य, वेदान्त, मीमांसा, योग, न्याय तथा वैशेषिक दर्शन यांचा समावेश होतो. हे सर्व दर्शन वेदास मानणारे आहेत.

अवैदिक दर्शनामध्ये जैन, बौद्ध, चार्वाक येतात. हे वेद परंपरेस मानणारे नाहीत.

न्याय, वैशेषिक, सांख्य, योग, मीमांसा आणि वेदान्त हे दर्शन आस्तिक आणि जैन, बौद्ध व चार्वाक हे दर्शन नास्तिक आहेत असे लोक म्हणतात परंतु असे म्हणणे ठीक नाही. वास्तविक आत्मा, ईश्वर आणि परलोक यांच्या अस्तित्वास मानणारे जैन नास्तिक नाहीत, आस्तिकच आहेत. जर कोणी असे म्हणेल की जैन ईश्वरास सृष्टीचा कर्ता मानीत नाही म्हणून जैन नास्तिक आहेत. परंतु हे ठीक होणार नाही. जैन ईश्वरास सृष्टिचा कर्ता मानत नाही परंतु अनंत ईश्वरांची सत्ता स्वीकार करतात. म्हणून जैन आस्तिकच आहेत.

येथे भारतीय दर्शनास संक्षिप्त मान्यता देऊन त्याच्यावर विचार करावयाचा आहे.

**चार्वाक दर्शन** - चार्वाक पृथ्वी, जल, अग्नि आणि वायु ह्या चार तत्त्वांना भूतचतुष्ट्य म्हणतात. चार्वाकांचे म्हणणे आहे की हे चार तत्व मिळून चैतन्याची उत्पत्ती होते. जसे शेणा वगैरे पासून विंचू उत्पन्न होतात. चार्वाक दर्शन शरीरासच आत्मा मानतात. जन्माच्या पूर्वी व मरणानंतर आत्मा नावाची कोणतीही वस्तु नाही.

परलोक, ईश्वर, स्वर्ग, नरक इत्यादि काहीसुद्धा नाही. जे प्रत्यक्षात दिसते त्याच्याशिवाय दुसरे काहीच नाही. म्हणून प्रत्यक्षच एक प्रमाण आहे. हे सर्वज्ञ इत्यादिंच्या अस्तित्वास सुद्धा मानत नाही म्हणून चार्वाकदर्शन नास्तिकवादी आहे.

जैन आचार्यांचे असे म्हणणे आहे की – पृथ्वी, जल, अग्नि आणि वायू हे सर्वथा अचेतन आहेत. शेणामध्ये वगैरे तिर्यंच गति, त्रीन्द्रिय जाती इत्यादि नामकर्माच्या उदयाने अनादि चैतन्य सत्तेवाला जीव येऊन जन्म घेतो. जाति स्मरण इत्यादि निमित्ताने ह्या जीवाच्या परलोकाचे अस्तित्व आणि जीवाचे अस्तित्व सिद्ध होते. अशाप्रकारे आत्म्याचे अस्तित्व सिद्ध झाल्याने सर्वज्ञ इत्यादिंची सिद्धि सुद्धा होते.

**बौद्धदर्शन** - 'सर्वं क्षणिकं सत्त्वात्' सर्व पदार्थ क्षणिक आहेत कारण सर्व सत्रूप आहेत. हा बौद्ध दर्शनाचा मौलीक सिद्धांत आहे.

बौद्धाचे भगवान बुद्ध आहेत. यांच्या येथे आत्म्याचे स्वतंत्र अस्तित्व नाही. परंतु रूप, वेदना, संज्ञा, संस्कार आणि विज्ञान ह्या पाच स्कंधाच्या समुदायास आत्मा म्हटले आहे.

बौद्धांचे चार भेद आहेत – माध्यमिक – बाह्य व अभ्यन्तर समान वस्तुंना शून्य रूपाने मानतात. योगाचार – बाह्य वस्तुचा अभाव मानणारे. सौत्रांतिक – बाह्य वस्तुला अनुमान ज्ञानाचा विषय मानणारे. वैभाषिक – बाह्य वस्तुला प्रत्यक्ष मानणारे.

हे चारही बौद्ध वस्तुला सर्वथा क्षणिक मानतात. एक समय मात्र अवस्थित मानतात.

जैनाचार्यांनी सूक्ष्म ऋजुसूत्र नयाने वस्तुच्या अर्थपर्यायास एक क्षण अवस्थित मानले आहे. याचा एकान्त घेऊन बौद्धांनी द्रव्यासच क्षणिक मानले आहे. हे सर्वथा चुकीचे आहे.

**सांख्य दर्शन** - काही सांख्य ईश्वरास मानत नाही. केवल अध्यात्म वादी आहेत. काही सांख्य ईश्वरासच देवता मानतात. हे दोन्ही सांख्य साधारणपणे पंचविस तत्त्वांना स्वीकार करतात.

सत्व, रज, तम ह्या तीन गुणांची साम्यावस्थाच प्रकृति आहे. येथे आत्मा अमूर्त, चेतन, भोक्ता, नित्य, सर्वगत, निष्क्रिय, अकर्ता, निर्गुण आणि सूक्ष्म आहे.

प्रकृति आणि आत्म्याच्या संयोगानेच ह्या सृष्टीची उत्पत्ति आहे असे मानतात. काही ईश्वरास सुद्धा सृष्टीचा कर्ता मानतात.

**पंचविस तत्त्व** - प्रकृतिपासून महान् (बुद्धी), बुद्धीने अहंकार, अहंकाराने सोळा गुण (स्पर्शन इत्यादि पाच इंद्रिय, वायू, उपस्थ, वाणी, हस्त, पाद व मन, रूप, रस, गंध, स्पर्श आणि शब्द) उत्पन्न होतात. ह्यापैकी पाच तन्मात्रांनी पाच भूतांची उत्पत्ति होते. अशाप्रकारे सांख्य मतामध्ये प्रकृति इत्यादि चौवीस तत्व परिणत असलेला प्रधान तत्व एक आहे.

सांख्य मतामध्ये प्रकृतिच्या वियोगाचे नाव मोक्ष आहे. मोक्ष प्रकृति व पुरुष यांच्या विज्ञानरूप तत्वज्ञानाने होतो. याच्यावर जैन आचार्य म्हणतात की – जर पुरुष सर्वथा अकर्ता, निर्गुण, निष्क्रिय आहे तर त्याचा प्रकृति बरोबर संयोग होऊ शकत नाही. कूटस्थ नित्य सिद्धान्तामध्ये परिणमन याचा अभाव असतो. म्हणून पुरुषांद्वारा संसार व मोक्षाची व्यवस्था होऊ शकत नाही. यामध्ये अनेक दोष येतात. हे सांख्य प्रत्येक वस्तूस नित्यच मानतात. हा द्रव्यार्थिक नयाचा विषय आहे. सांख्यमताचे लोक एकान्त, दुराग्रही आहेत म्हणून यांचा सिद्धांत सुद्धा दुषित आहे.

**नैयायिक दर्शन** - यांच्या मताप्रमाणे सोळा तत्व आहेत. प्रमाण, प्रमेय, संशय, प्रयोजन, दृष्टान्त, सिद्धान्त, अवयव, तर्क, निर्णय, वाद, जल्प, वितण्डा, हेत्वाभास, छल, जाति आणि निग्रहस्थान.

जगाची सृष्टी आणि संहार करणारा, व्यापक, नित्य, एक, सर्वज्ञ, ज्ञानशाली, महेश्वर सदाशिव आहे असे नैयायिक लोक म्हणतात. अर्थात हे ईश्वरास सृष्टीचा कर्ता मानतात.

जैन आचार्यांचे म्हणणे आहे की जर कोणी ईश्वर सृष्टीचा कर्ता आहे तर ईश्वराने दुःखी जीव का बनविले ? जर असे समजले की त्यांनी पाप केले तर ईश्वराने पापाची सृष्टी सुद्धा का निर्माण केली ? कारण ईश्वर करूणा (दया) करणारा असतो. ईश्वरास पाप आणि पापी लोकांची सृष्टी निर्माण करावयास नको. सर्व जीव अनादिकाळापासून कर्मांनी बांधलेले आहेत. ते पुरुषार्थ करून कर्माचा नाश करून मुक्त होतात. पुन्हा कृतकृत्य झाल्यावर ते सृष्टी निर्माण इत्यादि झंझटामध्ये पडत नाही.

**वैशेषिक दर्शन** - हे लोक द्रव्य, गुण, कर्म, सामान्य, विशेष, समवाय आणि अभाव अशा सात पदार्थांना मानतात.

ज्या द्रव्यामध्ये समवाय याने ज्ञान राहते तोच आत्मा आहे. कारण आत्म्यामध्ये ज्ञान समवायाने राहते.

आत्म्याचे दोन भेद आहेत – जीवात्मा आणि परमात्मा. परमात्मा ईश्वर एक आहे. जीवात्मा प्रत्येक शरीरामध्ये भिन्न-भिन्न आहे. व्यापक आहे. नित्य आहे.

वैशेषिक दर्शन द्रव्य, गुण इत्यादि परस्पर भिन्न-भिन्न आहेत असे मानतात. समवाय संबंधाने राहतात.

नैयायिक प्रमाणे हे सुद्धा ईश्वरास सृष्टीचा कर्ता मानतात. काही विषयामध्येच नैयायिक आणि वैशेषिक यांचे मतभेद आहेत. प्रायः सर्व सिद्धांतसारखेच आहेत.

नैयायिक आणि वैशेषिक ह्या दोन दर्शनांचे नाव 'योग' आहे.

ह्या वैशेषिकाने बुद्धी, सुख, दुःख, इच्छा, द्वेष, प्रयत्न, धर्म, अधर्म आणि संस्कार ह्या नऊ गुणांच्या अत्यंत विनाशाला मोक्ष मानले आहे.

जैन आचार्यांनी यांच्या सर्व मान्यतांचे निराकरण केले आहे. वास्तविक ज्ञान आणि सुख यांचा सुद्धा मोक्षामध्ये विनाश मानणे सर्वथा अनुचित आहे. ज्ञान आणि सुखासाठीच लोक मुक्तिच्या हेतुसाठी अनुष्ठान करतात. म्हणून यांचे सुद्धा मत दुषित आहे.

**मीमांसा दर्शन** - मीमांसा – यथार्थ विवेचन.

मीमांसा दर्शनाचे दोन भेद आहेत – कर्ममीमांसा आणि ज्ञानमीमांसा. यज्ञविधि, कर्मकाण्ड, अनुष्ठान इत्यादि कर्ममीमांसाचा विषय आहे. जीव, जगत्, ईश्वर यांचे स्वरूप इत्यादिचे निरूपण करणे ज्ञान मीमांसाचा विषय आहे.

आजकाल ज्ञानमीमांसेला 'वेदान्त' म्हणतात. मीमांसा दर्शनाचे सूत्रकार जैमिनी आहे. कुमारिल भट्टाचे शिष्य भाट्ट आणि प्रभाकरचे शिष्य प्राभाकर म्हटल्या जातात.

मीमांसक म्हणतात की – कोणी सुद्धा सर्वज्ञ, सर्वदर्शी नाही आहे. अतीन्द्रिय पदार्थांचे दर्शन वेदवाक्यांनी होते. हे लोक वेदास अपुरुष समजून प्रमाण मानतात. परंतु जैन आचार्यांनी 'सर्वज्ञ' याचे अस्तित्व सिद्ध करून अपौरुषेय वेदाचे निराकरण केले आहे. मीमांसा दर्शनांत वेदास पुरुषकृत न मानता प्रमाण मानल्यामुळे चोरी, व्याभिचार इत्यादिंचा उपदेश कोणत्याही पुरुषाद्वारा दिल्या गेला नाही. म्हणून तो सुद्धा प्रमाण होईल. वेदामध्ये हिंसा इत्यादिंना प्रोत्साहन देणारे वाक्य असल्यामुळे वेद अप्रमाणच आहे.

**वेदान्त दर्शन -**

"सर्वं वै खल्विदं ब्रह्म नेह नानास्ति किंचन ।
आरामं तस्य पश्यंति न तं पश्यति कश्चन ॥ "

हे सर्व जग एक ब्रह्म स्वरूपच आहे. येथे दुसरे काही सुद्धा नाही. सर्व याच्या प्रभावासच पाहतात. त्याला कोणी पाहू शकत नाही. ग्राम, नगर इत्यादि चेतन, अचेतन पदार्थ ब्रह्मापासून उत्पन्न झालेले आहेत. ब्रह्माचीच पर्याय आहेत. वेदान्त दर्शनामध्ये सांगितले आहे की 'अरे भक्ता ! तू आत्म्यास पहा. त्याला ऐक, मान आणि त्याचे ध्यान कर. एकच ब्रह्म सर्व प्राणीमात्रांमध्ये दिसतो. तो एकरूप आहे परंतु अवस्थित आहे. हे ब्रह्मद्वैतवादी लोक एका ब्रह्माच्या अतिरिक्त संपूर्ण जगास अविद्या–माया समजतात.

परंतु वास्तविक त्यांचा हा सिद्धांत स्वयं अविद्या, माया आहे. चेतन स्वरूप ब्रह्मापासून सर्व चेतन, अचेतन रूप जगाची उत्पत्ती मानणे सर्वथा चुकीचे आहे. एकाचे सुख-दुःख दुसऱ्याचे होऊ शकत नाही. हे स्पष्ट आहे. तसेच सर्वांमध्ये एक आत्म्याचे अस्तित्व मानणे ठीक नाही. प्रत्येक आत्म्यामध्ये ब्रह्मस्वरूप परमात्मा बनण्याची शक्ति विद्यमान असल्यामुळे प्रत्येक आत्म्यास शुद्ध नयाने ब्रह्मस्वरूप म्हणणे योग्य आहे. म्हटले सुद्धा आहे की – [1]'सव्वे सुद्धा हु सुद्धणया' सर्व जीव शुद्ध नयाने शुद्धच आहेत. जर याचे एकान्त घेतले तर मिथ्यात्व होईल.

**जैनदर्शन** - हा जैनधर्म अनादि निधन आहे. याची स्थापना कोणीही केली नाही. जैनधर्मामध्ये सात तत्व, नऊ पदार्थ, सहा द्रव्य आणि पाच अस्तिकाय मानले आहेत. स्याद्वाद, अहिंसा, अपरिग्रह याचे इत्यादि मौलीक सिद्धांत आहेत.

[2]"सम्यग्दर्शनज्ञानचारित्राणि मोक्षमार्ग." या सूत्राने सम्यग्दर्शन, सम्यग्ज्ञान, सम्यक्‌चारित्र यांची एकता मोक्षप्राप्तीचा उपाय आहे. सर्व कर्मांचा आत्म्यापासून वेगळे होणे हाच मोक्ष आहे. प्रत्येक आत्मा अनादि काळापासून कर्मांनी बांधलेला आहे. पुरुषार्थाच्या बळावर तोच आत्मा परमात्मा होतो. असे अनंत परमात्मा आहेत आणि संसारी जीवराशी सुद्धा अनंतानंत आहे.

जैन आचार्यांच्या मत-मतान्तरांचे निराकरण करून सर्वज्ञ सिद्धि मानली आहे.

**सर्वज्ञसिद्धि** - जे सर्वज्ञ आहेत. कर्मपर्वतांना नष्ट करणारे आहेत. मोक्षमार्गाचे प्रणेता आहेत तेच अर्हन्त आहेत. म्हणून ते मुनीश्वरांना वंदनीय आहेत. सर्वज्ञाचे अस्तित्व सिद्ध करण्यासाठी अबाधित आणि सुनिश्चित प्रमाण सापडतात. ईश्वर सर्वज्ञ नाही आहे. म्हणून सूक्ष्म, अंतरित आणि दूरवर्ती पदार्थ अर्हन्ताचेच परमार्थ प्रत्यक्ष आहेत. कारण ते प्रमेय आहेत.

**प्रश्न** - अर्हन्त भगवान सूक्ष्म इत्यादि पदार्थांना इंद्रियज्ञानाने जाणतात या अतीन्द्रिय ज्ञानाने ?

**उत्तर** - इंद्रिय ज्ञानाने भूत-भविष्यत् आणि वर्तमान ह्या तीन काळातील संपूर्ण लोकालोक यांना जाणणे असंभव आहे. सर्वज्ञ भगवान अतीन्द्रिय ज्ञानानेच संपूर्ण चराचर जगास एकाच वेळेस एकत्र जाणतात.

**प्रश्न** - असे ज्ञान कसे प्रगट होते ?

**उत्तर** - आत्मा ज्ञानस्वभाव आहे. त्याच्यावर ज्ञानावरण कर्माचे आवरण आहे. ह्या ज्ञानावरण कर्माचा नाश झाल्यावर पूर्ण ज्ञान अर्थात सम्यग्ज्ञान प्रगट होते.

---

१) 'सव्वे सुद्धा हु सुद्धणया' – द्रव्यसंग्रह.
२) 'सम्यग्दर्शनज्ञानचारित्राणि मोक्षमार्ग.' – तत्त्वार्थसूत्र

**प्रश्न** - ज्ञानावरण इत्यादि कर्मांचा नाश कसा होतो ?

**उत्तर** - मोहनीय, ज्ञानावरण, दर्शनावरण आणि अंतराय ह्या कर्माचे प्रतिपक्ष कारण सापडल्यानंतर यांचा नाश होतो.

**प्रश्न** - ह्या कर्माच्या बंधाचे कारण व प्रतिपक्ष कारण कोणते कोणते आहे ?

**उत्तर** - मिथ्यादर्शन, मिथ्याज्ञान आणि मिथ्याचारित्र हे तिन्ही मोह इत्यादि चार कर्मांच्या बंधाचे कारण आहेत. याउलट सम्यग्दर्शन, सम्यग्ज्ञान आणि सम्यक्‌चारित्र हे प्रतिपक्ष कारण आहेत. हे कारण मिथ्यात्व, अविरति इत्यादि बंध कारणाचा विनाश करतो तेव्हा आत्मा पूर्ण स्वभावरूपाने प्रगट होतो. आगामी कर्मांचा विपक्ष संवर आहे आणि संचित कर्मांचा विपक्ष तपाने होणारी निर्जरा आहे.

आश्रवास रोकणे यालाच संवर म्हणतात. संवर गुप्ति, समिति, धर्म, अनुप्रेक्षा, परिषहजय इत्यादिंनी होतो. आणि तप इत्यादि केल्याने निर्जरा होते. जेव्हा घातिया कर्म आत्म्यापासून वेगळे होतात तेव्हा आत्मा सर्वज्ञ, हितोपदेशी आणि वीतरागी होतो. जेव्हा संपूर्ण कर्म आत्म्यापासून पृथक (वेगळे) होते तेव्हा आत्मा पूर्ण शुद्ध-सिद्ध होतो.

## आत्म्याचे तीन भेद

प्रभाकर भट्ट [1]"पंचपरमेष्ठिना भावपूर्वक नमस्कार करून आपल्या परिणामांना निर्मळ करण्यासाठी योगीन्द्र देवांना शुद्धात्म तत्व समजण्यासाठी विनंती करतात.

हे स्वामिन । या संसारांत भ्रमण करता करता अनंत काळ व्यतित झाला परंतु मला काही सुद्धा सुख मिळाले नाही. महान दुःखच मिळाले आहे. चतुर्गति दुःखापासून संतप्त प्राण्यांना मुक्त करण्यासाठी परमात्म्याच्या स्वरूपाचे वर्णन करा.

अशाप्रकारे प्रभाकरभट्टाच्या प्रार्थनेस मान-सन्मान देऊन योगीन्द्र देव म्हणतात की – हे प्रभाकर भट्ट ! आत्म्याचे तीन भेद आहेत. बहिरात्मा, अन्तरात्मा आणि परमात्मा.

**बहिरात्मा** - शरीर इत्यादि पर्यायांमध्ये असलेला अज्ञानी जीव मिथ्यात्व परिणामांनी अनेक प्रकारच्या कर्मांना बांधतो व संसारामध्ये परिभ्रमण करीत राहतो. अर्थात शरीरासच आत्मा मानतो. परमात्म्यावर श्रद्धा न ठेवता आठ मल, आठ मद, सहा अनायतन, तीन मूढता ह्या पंचविस दोषांनी सहित राहतो. नरनारकादि विभाव पर्यायांमध्ये लीन, शुद्धात्म्याच्या अनुभवापासून पराङ्मुख, द्रव्य, क्षेत्र, काल, भव, भावरूप अशा पाच प्रकारच्या संसारामध्ये भटकत राहतो.

**अन्तरात्मा** - पंचविस मल दोषांनी रहित सम्यग्दृष्टी अन्तरात्मा आहे. ज्याप्रमाणे निर्मल ज्ञानी परमात्मा सिद्धालयांमध्ये राहतो त्याप्रमाणे आत्मा देहामध्ये निवास करतो असे अन्तरात्मा समजतो. आत्म्याचे वर्ण, रस, गंध, स्पर्श इत्यादि होत नाहीत कारण ते सर्व पुद्गलाचे गुण आहेत. आत्म्यामध्ये राग, द्वेष, अज्ञान इत्यादि विभाव परिणाम नाहीत कारण हे सर्व कर्माच्या उदयाने होतात. वास्तविक आत्मा शुद्ध नयाच्या अपेक्षेने शुद्ध, बुद्ध, निरंजन, निर्विकार आहे.

---

१) पंचपरमेष्ठी – भाविं पणविवि पंचगुरु सिरि जो इंदु जिणाउ ।
भट्ट पहायरि विण्णविउं विमलु करेविणु भाउ ॥ – परमात्मप्रकाश

**परमात्मा** - जो निर्मळ, केवल, शुद्ध आणि अव्यय आहे तोच परमात्मा आहे. ज्याचे अनन्त दर्शन, ज्ञान, सुख, वीर्य इत्यादि अनंत गुण प्रगट झाले आहेत तोच परमात्मा म्हटल्या जातो.

**गुणस्थानाच्या अपेक्षेने ह्या आत्म्याचे वर्णन** - [1]प्रथम तीन गुणस्थान असणारे जीव बहिरात्मा, चवथे गुणस्थान असणारे जीव जघन्य अन्तरात्मा, पाचव्या गुणस्थानापासून अकराव्या गुणस्थानापर्यंत तरतमभावाने मध्यम अन्तरात्मा, बाराव्या गुणस्थानामध्ये उत्तम अन्तरात्मा तसेच तेराव्या आणि चौदाव्या गुणस्थानामध्ये असणाऱ्या जीवांना परमात्मा म्हणतात.

[2]**सम्यक्त्वाचरण आणि संयमाचरण** - जो सम्यग्दृष्टी जीव पंचविस मल दोषांनी रहित सम्यक्त्वाचे पालन करतो त्याचे ते आचरण सम्यक्त्वाचरण किंवा दर्शनाचार चारित्र आहे. जे निर्दोष चारित्रास धारण करतात त्यांच्या चारित्रास संयमाचरण म्हणतात.

जघन्य अन्तरात्मा सम्यग्दृष्टी आपल्या शक्तिनुसार व्रत इत्यादि ग्रहण करून मध्यम अन्तरात्मा होतो. तो देश चारित्र ग्रहण करतो. तो श्रावक मोक्षप्राप्तीसाठी मुनिव्रतास धारण करतो. याला भेद रत्नत्रय धारण करणारा सराग चारित्र असणारा मध्यम अन्तरात्मा म्हणतात. पुढे तो हळूहळू अभेद रत्नत्रयास प्राप्त करण्यासाठी पुरुषार्थ करतो कारण भेद रत्नत्रयच अभेद रत्नत्रयाचे साधन आहे. सहाव्या-सातव्या गुणस्थानाशिवाय भेद रत्नत्रय होत नाही. व अभेद रत्नत्रय झाल्याशिवाय पुढचे गुणस्थान होऊ शकत नाही.

## मोक्षमार्ग

**व्यवहार-निश्चय मोक्षमार्ग** - सम्यग्दर्शन, सम्यग्ज्ञान आणि सम्यक्‌चारित्र या तिन्हींची एकता व्यवहार नयाने मोक्षाचे कारण आहे. सम्यग्दर्शन–ज्ञान–चारित्रमयी आत्मा निश्चयरूपाने मोक्षाचे कारण[3] आहे. आत्मा सोडून अन्य द्रव्यामध्ये रत्नत्रय राहत नाही. म्हणून रत्नत्रयमयी आत्माच निश्चयनयाने मोक्षाचे कारण आहे.

**व्यवहार रत्नत्रय** - जीवादि पदार्थांचे श्रद्धान करणे सम्यक्त्व आहे. हे सम्यक्त्व आत्म्याचे स्वरूप आहे. सम्यक्त्व झाल्यानंतर संशय, विपर्यय, अनध्यवसाय रहित सम्यग्ज्ञान होते. नंतर स्वशुद्धात्मानुभूतिरूप शुद्धोपयोग लक्षण ज्याचे आहे असे वीतराग चारित्र आहे त्याचे परंपरानुसार साधक सराग चारित्र होते.

जो[4] अशुभ कार्यापासून निवृत्त आहे व शुभ कार्यामध्ये ज्याची प्रवृत्ति आहे ते व्यवहार चारित्र आहे. श्री जिनेन्द्रदेवाने त्या चारित्रास व्यवहारनयाने ५ व्रत, ५ समिति आणि तीन गुप्ति असे म्हटले आहे. ह्या चारित्रास अपहृत संयम आणि सराग चारित्र सुद्धा म्हणतात.

ह्याच्यानंतर निश्चय रत्नत्रय प्रगट होते. ह्यालाच 'राग इत्यादि विकल्प रहित, चमत्कार भावनेने उत्पन्न झालेले परम शांत आस्वादरूप सुखाचा मी धारक आहे' अशाप्रकारे निश्चयरूपी सम्यग्दर्शन आहे. हे सुख

---

१) मिस्सोत्ति बाहिरप्पा तरतमया तुरिय अन्नप्पजहण्णा ।
सत्तोति मज्झिमंतर खीणुत्तर परमजिणसिद्धा ॥१२९॥ – रयणसार ।

२) षट्प्राभृत पृ० ४५ ।

३) द्रव्य संग्रह गा० ३९, ४०

४) असुहादो विणिवित्ती सुहे पवित्ती य जाण चारित्तं ।
वदसमिदिगुत्तिरूवं ववहारणया दु जिणभणियं ॥४५॥ – द्रव्यसंग्रह

स्वसंवेदन ज्ञानाने राग इत्यादि विभाव परिणामांनी भिन्न आहे असे समजणे सम्यग्ज्ञान आहे. अशाप्रकारे पाहिलेले, ऐकलेले व अनुभव घेतलेले भोग संकल्प-विकल्पाच्या त्यागाने त्या सुखामध्ये मग्न होणे, तृप्त होणे आणि मनाला एकाग्रतेने त्यामध्ये पुन्हा पुन्हा स्थिर करणे निश्चय चारित्र आहे हे निश्चय रत्नत्रयच अभेद रत्नत्रय किंवा वीतराग चारित्र आहे. कारण यावेळेस तीघं एकरूप होऊन जातात.

[१]संसाराच्या कारणांना नष्ट करण्यासाठी ज्ञानी जीवाच्या बाह्य व अंतरंग क्रियांचा निरोध करतो यालाच जिनेंद्रदेव उत्कृष्ट चारित्र म्हणतात.

[२]ध्यानाच्या बळाने मुनि नियमाने व्यवहार-निश्चयरूप मोक्षमार्ग प्राप्त करतात. म्हणून तुम्हीसुद्धा त्या ध्यानाचा अभ्यास करा. जर तुम्हास विचित्र ध्यानाच्या सिद्धीसाठी मनांस स्थिर करावयाचे असेल तर इष्ट, अनिष्ट पदार्थांचा मोह करू नका. राग-प्रेम करू नका आणि द्वेष करू नका.

सहज शुद्ध परम चैतन्यशाली आणि आनंदरूप भगवान आपल्या आत्म्यामध्ये उपादेय बुद्धीने 'मी अनंत ज्ञानवान आहे, मी अनंत सुखरूप आहे इत्यादि रूपाने ध्यान करतो आणि बहिरंगामध्ये पंचपरमेष्टीचे पिण्डस्थ, पदस्थ इत्यादि ध्यानाचा अभ्यास करा.

सम्यग्दृष्टी जीव निश्चय आणि व्यवहार ह्या दोन्ही नयांच्या सहाय्याने आत्मतत्त्वास समजतो.

जे शुद्धनयाने[३] पूर्णज्ञानी आणि चारित्रवान झाले ते आत्म्यास शुद्ध, नित्य एक, ज्ञायक मात्र आत्मा आहे असे समजतात. आणि जो जीव अपरमभाव अर्थात श्रद्धा, ज्ञान आणि चारित्र यांच्या पूर्णभावापर्यंत पोहोचला नाही व साधक अवस्थेमध्येच थांबला आहे तो व्यवहाराने उपदेश करण्यास योग्य आहे.

आपल्या आपल्या समयामध्ये दोनही नय कार्यकारी आहेत. तीर्थ[४] आणि तीर्थाचे फळ यांची अशीच व्यवथा आहे. ज्याने तारल्या जाते ते तीर्थ हा व्यवहारधर्म आहे. आणि तारल्या जाणे हे तीर्थाचे फळ आहे. अथवा आपल्या स्वरूपास प्राप्त करणे हे तीर्थाचे फळ आहे असे सुद्धा म्हटले आहे.

'जर'[५] तुम्हास जैनधर्माचे प्रवर्तन पाहिजे असेल तर व्यवहार आणि निश्चय ह्या दोन्ही नयाच्या मतांना सोडू नका. कारण एका व्यवहारनयाच्या शिवाय तीर्थाचा (व्यवहारमार्ग) नाश होईल आणि दुसरे निश्चयनयाच्या शिवाय तत्त्व (वस्तु) याचा नाश होईल.

आचार्य[६] म्हणतात की - भूतार्थ - निश्चयनय, निर्विकल्प समाधिमध्ये लीन मुनींना प्रयोजनभूत आहे. परंतु निर्विकल्प समाधिरहित जीवांना सोळा तावाच्या सुवर्णाच्या अभावामध्ये थोड्या-थोड्या तावाच्या सुवर्ण लाभाप्रमाणे प्राथमिक शिष्यांना सविकल्प अवस्थांमध्ये मिथ्यात्व, विषय, कषाय दुर्ध्यान यांच्यासाठी व्यवहारनयच प्रयोजनभूत आहे. सोळा तावाच्या सुवर्णाच्या लाभाप्रमाणे अभेद रत्नत्रय स्वरूप समाधि-ध्यानाच्या वेळेस निश्चयनयच प्रयोजनभूत आहे. अर्थात जो 'अपरम'भाव अशुद्ध भावामध्ये स्थित आहे तो असंयमी सम्यग्दृष्टीच्या अपेक्षेने किंवा देशव्रती श्रावकाच्या अपेक्षेने सराग सम्यग्दृष्टी आहे. शुभोपयोगी आहे. जो सहाव्या गुणस्थानवर्ती अथवा

---

१. बहिरंभंतरकिरियारोहो भवकारणपणासट्ठं ।
णाणिस्स जं जिणुत्तं तं परमं सम्मचारित्तं ॥४६॥ (द्रव्यसंग्रह)

२. द्रव्य संग्रह गाथा ४७ ।

३. सुद्धो सुद्धादेसो णायव्वो परमभावदरिसीहिं ।
ववहारदेसिदा पुण जे दु अपरमे ठिदा भावे ॥१२॥ (समयसार)

४. तीर्थतीर्थफलयोरित्थमेव व्यवस्थितत्वात् ।

५. जइ जिणमपं पवज्रह ता मा ववहारणिच्छए मुयह ।
एक्केण विणा छिज्रइ तित्थं अण्णेण उण तच्चं ॥

६. जयसेनाचार्य तात्पर्यवृत्ति टीका ।

सातव्या गुणस्थानवर्ती आहे व भेदरत्नत्रयांमध्ये स्थित आहे त्यांच्यासाठी व्यवहारनय प्रयोजनभूत आहे. याच्यापुढे ध्यानावस्थामध्ये व्यवहारनय स्वतःच सुटून जातो. नयाचे अवलंबन राहात नाही.

भेदविज्ञानाने बंधाचा अभाव होतो. जेव्हा[1] हा जीव समजून घेतो की आत्मा आणि शरीर इत्यादि परद्रव्य भिन्न-भिन्न आहेत तेव्हाच तो ज्ञानी होतो. आश्रव अशुचि, जड आणि दुःखाचे कारण आहे. आत्मा पवित्र, ज्ञाता आणि सुख-स्वरूप आहे. अशाप्रकारे दोघांच्या लक्षण-भेदांना भिन्न-भिन्न समजून आत्मा आश्रवापासून निवृत्त होतो त्याला कर्माचा बंध होत नाही.

**प्रश्न** - जर ज्ञानाने कर्माचा निरोध होतो तेव्हा सांख्य मत होईल ?

**उत्तर** - जे आत्मा आणि आश्रवासंबंधी भेदज्ञान आहे ते राग इत्यादि आश्रवापासून निवृत्त आहे किंवा नाही ? जर राग इत्यादि आश्रवापासून रहित आहे तर त्या भेद विज्ञानामध्ये अभेदनयाने वीतराग चारित्र आणि वीतराग सम्यक्त्व आहेच. अशादृष्टीने सम्यग्ज्ञानाने बंधाचा अभाव सांगणे ठीक आहे. जर भेदविज्ञान रागादि दोषांनी मुक्त नाही तर ते सम्यक् भेदविज्ञान नाही असा अभिप्राय होतो. अर्थात् क्रोध इत्यादि कषाय भावांनी रहित जीवास बंध होत नाही. असंयमी सम्यग्दृष्टीलाच ४१ प्रकृतीचा बंध होत नाही. पुढच्या पुढच्या गुणस्थानामध्ये ज्या ज्या प्रकृतीचा बंध होत नाही त्या-त्या प्रकृतीच्या अपेक्षेने बंधाचा निरोध होतो.

सम्यग्दृष्टी जीव कर्ता आहे किंवा नाही ? यद्यपि[2] जीव शुद्ध निश्चय नयाने आपल्या स्वरूपास सोडत नाही, दुसरे रूप धारण करीत नाही तरीसुद्धा व्यवहारनयाने कर्माच्या उदयाने राग इत्यादि परिणामास ग्रहण करतो म्हणून हा जीव कथंचित् परिणामी आहे.

जेव्हा हा जीव बहिरात्मा, अज्ञानी होतो तेव्हा विषय-कषायरूप अशुभोपयोगाचा कर्ता आहे. कदाचित् पुन्हा भोगाकांक्षा निदानरूप शुभोपयोगाचा कर्ता आहे. तेव्हा हा द्रव्यभाव पुण्य, पाप, आश्रव, बंध पदार्थाचा कर्ता होतो.

जेव्हा सम्यग्दृष्टी अंतरात्मा होतो तेव्हा मुख्य रूपाने निश्चयरत्नत्रयलक्षण शुद्धोपयोगाच्या सहाय्याने निश्चय चारित्राचा अविनाभावी, वीतराग सम्यग्दृष्टी होतो. निर्विकल्प समाधीरूप परिणामाचा कर्ता होतो तेव्हा परिणामांनी द्रव्यभावरूप संवर, निर्जरा आणि मोक्ष पदार्थांचा कर्ता होतो.

कदाचित् पुन्हा निर्विकल्प समाधीरूप परिणामांच्या अभावाने विषय कषायांना दूर करण्यासाठी किंवा शुद्धात्मभावना सिद्ध करण्यासाठी बाहेर ख्याति पूजा लाभ, भोगाकांक्षा ने रहित भावनेने करतो. शुद्धात्मस्वरूप अर्हंत, सिद्ध, आचार्य, उपाध्याय, साधु ह्या पाच परमेष्ठींच्या गुणांचे स्मरण वगैरे शुभोपयोग परिणाम करतो. अशाप्रकारे सम्यग्दृष्टी जीव व्यवहारनयाच्या अपेक्षेने संवर, निर्जरा इत्यादि पदार्थांचा कर्ता मानल्या जातो. जर सर्वथा अकर्ता मानल्या गेला तर मोक्ष व्यवस्था होणार नाही.

## रागद्वेषादि परिणाम जीवाचे आहेत की पुद्गलाचे ?

हे रागादि विकारभाव जीव आणि पुद्गल यांच्या संयोगाने उत्पन्न झालेले आहेत. हे अशुद्ध निश्चयनयाच्या अपेक्षेने अशुद्ध उपादान रूपाने चेतन आहेत. कारण हे जीवाशी संबंधित आहे. शुद्ध निश्चयनयाच्या अपेक्षेने शुद्ध उपादान रूपाने अचेतन आहेत कारण पौद्गलिक आहे. वास्तविक एकांतरूपाने हे जीवाचेही नाहीत आणि पुद्गलाचे सुद्धा नाहीत. हे व्यवहारनयाने दोघांचेही आहेत. वस्तुभूत सूक्ष्म शुद्धनयाने मिथ्यात्व इत्यादि रागादि भाव आहेच नाहीत कारण हे अज्ञानाने उत्पन्न झालेले असतात.

---

१. समयसार गाथा ७२ टीका ।

२. समयसार टीका जयसेनाचार्यकृत - पृ. १२२ ।

**प्रश्न** - सूक्ष्म शुद्ध निश्चयनयाने हे कोणाचे आहेत ?

**उत्तर** - सूक्ष्म शुद्ध नयाने यांचे अस्तित्वच नाही.

**सम्यग्दृष्टीला आश्रव होत नाही** - राग[१], द्वेष आणि मोह हे सम्यग्दृष्टीस होत नाही. म्हणून आश्रव भावाशिवाय द्रव्यप्रत्यय कर्मबंधाचे कारण नाही आहे. मिथ्यात्व इत्यादि चार प्रकार आठ प्रकारच्या कर्मबंधासाठी सांगितले आहेत. मिथ्यात्व इत्यादि चार प्रकारांना जीवाच्या रागद्वेषाचे सुद्धा कारण मानले आहे. सम्यग्दृष्टीस त्या राग द्वेषादि भावांचा अभाव असतो म्हणून त्याला कर्मबंध होत नाही.

**टीके[२]चा भावार्थ** - सम्यग्दृष्टीस राग, द्वेष, मोह इत्यादि भाव होत नाहीत. जर सम्यग्दृष्टीस हे भाव झाले तर तो सम्यग्दृष्टी बनू शकत नाही. 'सम्यग्दृष्टी जीवाचे अनंतानुबंधी क्रोध, मान, माया, लोभ आणि मिथ्यात्वाच्या उदयाने होणारे राग, द्वेष, मोहभाव नसतात. केवलज्ञान इत्यादि अनंतगुण असणाऱ्या परमात्म्यामध्ये उपादेयता स्विकार करून वीतराग आणि सर्वज्ञ यांनी सांगितलेले सहा द्रव्य, पंचास्तिकाय, सप्ततत्व आणि जड पदार्थ यांच्यामध्ये रुचि असल्याने तीन मूढता आणि पंचवीस दोष रहित व संवेग, निर्वेद, निंदा, गर्हा, उपशम, भक्ति, वात्सल्य आणि अनुकंपा ह्या आठ गुणांनी चतुर्थ गुणस्थानसंबंधी सम्यक्त्व होत नाही. अथवा अनंतानुबंधी आणि अप्रत्याख्यानावरण संबंधी रागद्वेष मोह नसल्यामुळे पंचम गुणस्थानाच्या योग्य अप्रत्याख्यानावरण, प्रत्याख्यानावरण कषायसंबंधी सम्यग्दृष्टीचे राग द्वेष मोह होत नाही. अन्यथा सहाव्या गुणस्थान योग्य सरागचारित्राच्या बरोबर होणारे सराग सम्यक्त्व होत नाही.

अशाक्रमाने सम्यग्दृष्टीस राग, द्वेष, मोह इत्यादि भाव होत नाहीत. राग, द्वेष, मोह होत नसल्यामुळे सत्तामध्ये असणारे या उदयामध्ये असणारे मिथ्यात्व इत्यादि द्रव्यप्रत्यय कर्मबंधाचे कारण होत नाही. मिथ्यात्व, अविरति, कषाय आणि योग हे चार कारण ज्ञानावरणादि आठ प्रकारच्या नवीन बंधाचे कारण आहे. वीतरागरूप उत्कृष्ट अशा सामायिक भावनेमध्ये परिणत राहणारे अभेद रत्नत्रयरूप भेदज्ञान झाल्यावर हा जीव नवीन कर्म बांधत नाही असा निष्कर्ष निघतो.

दुसऱ्या[३] ठिकाणी याच भावास अजून स्पष्ट केले आहे -

सराग आणि वीतराग ह्या प्रकाराने सम्यग्दृष्टीचे दोन भेद होतात. वीतराग सम्यग्दृष्टी जीव नवीन कर्मबंध सहसा बांधत नाही. या सम्यग्दृष्टीस अबंधी म्हटले आहे. परंतु सराग सम्यग्दृष्टी जीव आपल्या आपल्या गुणस्थानानुक्रमाने बंधास छेदणारा असतो. याला बंध[४] त्रिभंगीमध्ये सांगितल्याप्रमाणे बंध-विच्छेदाच्या क्रमाने पाहिल्यास चतुर्थ गुणस्थानवर्ती अविरत सम्यग्दृष्टी जीव मिथ्यात्व इत्यादि गुणस्थानामध्ये अविरत सम्यग्दृष्टी जीव मिथ्यात्व इत्यादि गुणस्थानामध्ये उत्पन्न झालेल्या ४३ प्रकृतिंचा बंध करणारा होत नाही. परंतु ७७ प्रकृतींचा अल्पस्थिति अनुभागाच्या रूपाने बंधक होतो. तो संसाराच्या स्थितीस छेदणारा होतो. म्हणून तो अबंधक (ईषत्बन्धक) होतो. अशाप्रकारे अविरत नावाच्या चतुर्थ गुणस्थानावरील गुणस्थानांमध्ये सराग सम्यग्दर्शन राहते. खालच्या गुणस्थानापेक्षा वरच्या गुणस्थानामध्ये तो अबंधक असतो. "वय सम्यग्दृष्टयः

---

१. रागो दोसो मोहो य आसवा णत्थि सम्मदिट्ठिस्स ।
तम्हा आसवभावेण विणा हेदू ण पच्चया होंति ॥१७७॥
हेदू चदुवियप्पो अट्ठवियप्पस्स कारणं भणिदं ।
तेसिं पि य रागादि तेसिमभावे ण बज्झंति ॥१७८॥ (समयसार)

२. श्रीजयसेनाचार्यकृत ।

३. गाथा १६६ आस्रवाधिकार टीका जयसेनाचार्यकृत ।

४. सोलसपणवीसणभं दसचउ छक्केक्कबंधवोछिण्णा ।
दुगतीसचतुरपुव्वे पण सोलसजोगिणो एक्को ॥ (गोम्मटसार कर्मकाण्ड)

सर्वथा बंधो नास्तीति न वक्तव्यं". आम्ही (मी) सम्यग्दृष्टी आहे आणि सम्यग्दृष्टीस बंध होत नाही म्हणून आम्हास सुद्धा बंध होत नाही असे समजू नये.

समयसारमध्ये जयसेनाचार्यने सहाव्या गुणस्थानापर्यंत सराग सम्यक्त्व मानले आहे. सातव्या गुणस्थानापासून अकराव्या गुणस्थानापर्यंत वीतराग सम्यक्त्व मानले आहे. बाराव्या गुणस्थानामध्ये पूर्णतया वीतराग सम्यक्त्व होते. त्या गुणस्थानामध्ये पूर्णपणे बंधाचा अभाव होतो. ज्या-ज्या प्रकृतिंचा बंधविच्छेद होतो त्या त्या प्रकृतिंचा संवर होतो म्हणून त्याला अबंधक म्हटल्या जाते.

**संसार विच्छेदाचे चार कारण मानले आहेत** -

"द्वादशांगावगमस्ततीव्र भक्तिरनिवृत्ति परिणामः ।
केवलिसमुद्घातश्चेति संसारस्थितिघात कारणानि भवन्ति ॥ "

सिद्धांत ग्रंथामध्ये सांगितले आहे की - परिपूर्ण द्वादशांग ज्ञान प्राप्त होणे, अरिहंत इत्यादींची भक्ति, अनिवृत्ति परिणाम आणि केवलिसमुद्घात हे चार संसार स्थितीचे कारण मानले आहेत.

**द्वादशांगज्ञान** - व्यवहाराने द्वादशांगाचे पूर्ण ज्ञान होणे, संपूर्ण बाह्य विषयांचे ज्ञान होणे आणि निश्चयनयाने वीतराग स्व-संवेदन ज्ञान होणे.

**तत्तीव्र भक्ती** - भक्तीस येथे सम्यक्त्व म्हटले आहे. भक्ती व्यवहाराने येथे सराग सम्यग्दृष्टीच्या पंचपरमेष्ठीच्या आराधनाचे रूप आहे आणि निश्चयाने वीतराग सम्यग्दृष्टीच्या शुद्धात्मतत्त्वाची भावना आहे.

**अनिवृत्तिपरिणाम** - न निवृत्तिस अनिवृत्ति म्हणतात. शुद्धात्मस्वरूपाने विचलित न होणे, एकाग्र परिणतिरूप अवस्थाचे होणे.

अशाप्रकारे 'द्वादशांगावगा[1]ने' निश्चय व्यवहारज्ञान होते. भक्तीने निश्चय व्यवहार सम्यक्त्व झाले आणि अनिवृत्ति परिणामाने सराग चारित्रानंतर वीतरागचारित्र होते. अशाप्रकारे सम्यग्दर्शन, ज्ञान, चारित्र हे तिन्ही भेद-अभेद रत्नत्रयरूपाने संसाराच्या विनाशाचे कारण आहेत. हे कोणाचे होतात ? छद्मस्थजीवाचे होतात. आणि केवली भगवंताचे तर दण्ड, कवाट, प्रतर, लोकपूरण रूप केवली समुद्रघात संसाराच्या विनाशास कारण होतो. असा भावार्थ झाला.

**व्यवहारनयाची उपयोगिता** - हे[2] सर्व अध्यवसानादिभाव आहेत असा जिनेंद्र देवांनी उपदेश दिला आहे. असे व्यवहारनयाचे मत आहे.

**टीका[3] भाव** - हे सर्व अध्यवसानादि भाव 'जीव' आहेत असे सर्वज्ञ देवाने म्हटले आहे. हे अभूतार्थ - असत्यार्थ व्यवहारनयाचे मत आहे. कारण तो व्यवहारी जीवांना परमार्थ सांगणारा आहे. ज्याप्रमाणे म्लेच्छभाषेमध्ये म्लेच्छ लोकांना समजविल्या जाते तशाप्रकारे अपरमार्थ असूनसुद्धा धर्म-तीर्थाच्या प्रवृत्तीसाठी व्यवहारनयाचे वर्णन करणे ठीकच आहे. जर त्याला व्यवहारनय म्हटले नाही आणि परमार्थ नयाने जीवास शरीरापासून भिन्न समजले तर - त्रस स्थावर जीवांचा घात निःशंकरूपाने करणे असे होईल जसे भस्म काढणे यात हिंसा नाही अशाप्रकारे त्यांना मारण्यात सुद्धा हिंसा राहणार नाही. हिंसेचा अभाव राहील तेव्हा त्यांचा विनाश करण्याने सुद्धा बंध पडणार नाही. अशाप्रकारे "रागी, द्वेषी, मोही जीव कर्म बांधतो व हे कर्म सोडण्यास योग्य आहे असे

---

१. जयसेनाचार्यकृत तात्पर्यवृत्ति समयसार गाथा १७३ से १७६ पर्यंत आस्रवाधिकार ।

२. ववहारस्स दरीसणमुवएसो वण्णिदो जिणवरेहिं ।
जीवा एदे सव्वे अज्झवसाणादयो भावा ॥४६॥ (समयसार)

३. अमृतचन्द्रसूरिकृत, पृष्ठ ८४ ।

म्हटले आहे. परमार्थाने राग, द्वेष, मोह हे जीवापासून भिन्न दाखविल्यास मोक्षाच्या उपायाचा उपदेश व्यर्थ जाईल. तेव्हा मोक्षाचा सुद्धा अभाव होईल म्हणून व्यवहारनय प्रयोजनभूत आहे.

जर पुन्हा व्यवहारनय झाला नाही तर शुद्ध निश्चयनयाने त्रस स्थावर जीव होणार नाहीत असे समजून लोक निःशंक होऊन हिंसा करतील. पुण्यधर्माचा अभाव होईल. अशाप्रकारे शुद्ध निश्चयनयाने राग, द्वेष, मोह ज्यांना नाहीत असे जीव पहिलेपासूनच मुक्त आहेत असे समजून मोक्षासाठी कोणीसुद्धा प्रयत्न करणार नाहीत. मोक्षाचा अभाव होईल हा दुसरा दोष लागेल. म्हणून व्यवहारनयाचे व्याख्यान योग्य आहे.

**शंका** - दुसऱ्यांना दुखविणे - मारणे असे करण्याने व्यवहारनयाने हिंसा होते. निश्चयनयाने हिंसा होत नाही ?

**समाधान** - व्यवहार नयानेच हिंसा होते. पापबंध सुद्धा व्यवहारनयानेच होतो. तसे नरकइत्यादिचे दुःख सुद्धा व्यवहारनयानेच होते. ही गोष्ट योग्यच आहे.

जर नरकादि दुःख तुम्हास योग्य वाटत असेल तर खूप हिंसा करा. जर त्या दुःखांना घाबरत असाल तर सोडून द्या. हे निश्चित आहे की जीवच कर्मांचा कर्ता आहे.

व्यवहारनयाने जीव[१] व कर्म आपसात बांधले आहेत. निश्चयनयाने नाहीत. हे दोन्ही विकल्प नय पक्ष आहेत. जो ह्या नय पक्षाच्या विकल्पाच्या पुढे जातो तेव्हाच एक निर्विकल्प विज्ञान घन स्वभाव सोडून साक्षात् समयसार होतो.

[२]जे महामुनि नयाचा पक्षपात सोडून आपल्या स्वरूपात गुप्त होऊन निरंतर स्थिर राहतात तेच पुरूष विकल्पापासून मुक्त होऊन शांतचित्ताने साक्षात् अमृत पितात.

वीतराग निर्विकल्प समाधिरूप ध्यानाच्या सहाय्याने एका अन्तमुहूर्तामध्ये संपूर्ण कर्मजाल नष्ट होते.

जर [३]अर्धनिमिषमात्र काळ सुद्धा कोणी महामुनि परमात्म्याबरोबर प्रेम करत असेल तर - ज्याप्रमाणे अग्नीची एक छोटीशी काडी सुद्धा लाकडाच्या पर्वतास भस्म करते - त्याचप्रमाणे अशेष सुद्धा पाप समुहास समाप्त करतो. अर्थात् जो सर्व विकल्पभावापासून - रागद्वेष इत्यादिपासून रहित होऊन निर्विकल्प ध्यानामध्ये स्थिर होऊन परमात्म्याचे ध्यान करतो तो शीघ्र कर्मसमुहांना नष्ट करतो.

## निर्जराचे स्थान[४]

काललब्धि इत्यादीच्या सहाय्याने परिणामांच्या विशुद्धिने प्राप्त झालेला कोणी भव्य, पंचेंद्रिय, संज्ञी पर्याप्तक जीव क्रमाने अधःकरण[५] इत्यादि सोपान पंक्तीवर चढताना कर्मांची निर्जरा करणारा होतो.

(१) सर्वप्रथम तोच जीव प्रथम सम्यक्त्व प्राप्त झाल्यावर सम्यग्दृष्टी होऊन असंख्यात गुणी कर्मांची निर्जरा करतो. हीच निर्जरा पूर्वी झालेले सम्यक्त्व प्राप्त करण्यासाठी आणि करणलब्धि प्राप्त करणाऱ्या जीवांच्या अपेक्षेने असंख्यात गुणी मानली गेली आहे.

---

१. कम्मं बद्धमबद्धं जीवे एवं तू जाण णयपकरणं ।
प करवातिक्कं तो पुण भण्णदि जो सो समयसारो ॥ (समयसार)

२. य एव मुक्त्वा नयपक्षपातं, स्वरूपगुप्ता निवसंति नित्यं ।
विकल्पजालच्युत शांतचित्तास्त एवं साक्षादमृतं पिवन्ति ॥ (समयकलश)

३. जर णि वसद्ध वि कुवि करइ परमप्पइ अणुराउ ।
अग्गि कणी गिम कट्ठगिरी उहइ असेसु वि पाउ ॥ (परमात्मप्रकाश)

४. हे देशस्थान सर्वार्थसिद्धीची अपेक्षा आहे. अन्यत्र गोमटसारमध्ये ११ स्थान मानले आहेत.

५. सम्यक्त्वासाठी जे करण होते. ते येथे विवक्षित आहे.

(२) पुन्हा तोच जीव चारित्र मोहनीयाच्या अप्रत्याख्यानावरणच्या क्षयोपशमाने एक देशव्रती श्रावक होऊन असंख्येय गुणी निर्जरा करणारा होतो.

(३) पुन्हा तोच जीव प्रत्याख्यानावरणाच्या क्षयोपशमाने प्राप्त झालेला व्रती म्हटल्या जातो तो व्रती असंख्यात गुणी अधिक निर्जरा करतो.

(४) पुन्हा तोच जीव जेव्हा अनंतानुबंधी क्रोध, मान, माया, लोभ यांचा नाश करतो तेव्हा तोच श्रावक असंख्यात गुणी अधिक निर्जरा करतो.

(५) पुन्हा तोच जीव दर्शनमोहनीय त्रिकरूपी तृण समुहास भस्मसात करतो. दर्शन मोह क्षपक संज्ञा धारण करून असंख्यात गुणश्रेणी निर्जरा करणारा होतो.

(६) पुन्हा तोच क्षायिक सम्यग्दृष्टी उपशम श्रेणी चढतो तेव्हा तो असंख्यात गुणी अधिक निर्जरा करतो.

(७) पुन्हा तो उपशांत कषायी होतो व असंख्यात गुणी निर्जरा करतो.

(८) पुन्हा तोच चारित्र मोहनीयच्या क्षपणामध्ये उद्युक्त झालेला क्षपक म्हटल्या जातो. तो असंख्यात गुणी अधिक निर्जरा करतो.

(९) क्षीण कषाय गुणस्थानामध्ये पोहोचल्यावर असंख्यात गुणी निर्जरा करतो.

(१०) पुन्हा तोच जीव घाति कर्मांचा नाश करून 'जिन' ही पदवी प्राप्त करतो. पहिले जी निर्जरा केली त्यापेक्षा असंख्यात गुणी निर्जरा करतो.

अर्थात सम्यक्त्वास प्राप्त करण्यासाठी सातिशय मिथ्यादृष्टीच्या अपेक्षेने सम्यग्दृष्टी जीवाची निर्जरा असंख्यात गुणश्रेणी अधिक राहते. पुढे-पुढे असंख्यात गुणश्रेणी निर्जरा अधिक-अधिक होत जाते.

**केवलज्ञाना[1]ची उत्पत्ती** - असंयमी सम्यग्दृष्टी संयमा संयम, प्रमत्तसंयम, अप्रमत्तसंयम अशा चार गुणस्थानापैकी कोण्या एका गुणस्थानामध्ये मोहनीय कर्मांच्या सात प्रकृतिंचा क्षय करून क्षायिक सम्यग्दृष्टी क्षपक श्रेणी चढण्यासाठी तयार होतो. अप्रमत्तसंयम गुणस्थानामध्ये अधःप्रवृत्तीकरण प्राप्त करतो. अपूर्वकरण गुणस्थानामध्ये नवीन परिणामांच्या विशुद्धीने पाप प्रकृतींची स्थिती आणि अनुभागबंध कमी करून शुभकर्मांच्या अनुभागाची वृद्धि करून अनिवृत्तिकरणाची प्राप्ती करून घेतो. अनिवृत्तिकरण प्राप्तीद्वारा आठ कषायांचा नाश करून नपुसंकवेद आणि स्त्रीवेद यांचा क्रमाने नाश करतो. सहा नोकषायांचा पुरूषवेदामध्ये संक्रमण द्वारा नाश करतो. तसेच पुरुषवेदाचा संज्वलन क्रोधामध्ये, क्रोधाचा संज्वलन मानमध्ये, मान चा संज्वलन मायामध्ये आणि मायाचा संज्वलन लोभामध्ये क्रमाने बादर कृष्टि विभागाद्वारा संक्रमण लोभ संज्वलन कृश करून 'सूक्ष्म सांपराय' गुणस्थानामध्ये पोहोचतो. सर्व मोहनीय कर्माचा निर्मूल नाश करून क्षीण कषाय गुणस्थानामध्ये पोहोचल्यावर त्याच्या उपान्त्य समयामध्ये निद्रा आणि प्रचलाचा नाश करतो. तथा अंतिम समयामध्ये पाच ज्ञानावरण, चार दर्शनावरण आणि पाच अंतराय कर्माचा नाश करून आपल्या आत्मस्वभावरूप केवलज्ञानास प्राप्त करतो.

अर्थात वीतराग निर्विकल्प त्रिगुप्ति समाधिरूप ध्यानाने मोहनीय कर्माचा नाश होतो. पहिल्या दहा गुणस्थानामध्ये मोहनीय कर्माचा नाश होतो. नंतर हा जीव अकराव्या व बाराव्या गुणस्थानामध्ये जातो. बाराव्या गुणस्थानामध्ये गेल्यावर संपूर्ण मोहरहित, पूर्ण वीतरागी होतो. अंतसमयी ज्ञानावरण, दर्शनावरण आणि अंतराय ह्या चार घाति कर्मांचा नाश करतो आणि केवली होतो.

**नवकेवललब्धि** - ज्ञानावरणाच्या अभावाने क्षायिकज्ञान अनंतज्ञान प्रगट होते. या ज्ञानाने एका समयात संपूर्ण लोकालोक, त्रिकालवर्ती समस्त पर्यायांनी प्रतिबिंबित होतो.

---

१. सर्वार्थसिद्धि पृष्ठ ३५७ ।

दर्शनावरणाच्या नाशाने क्षायिक - अनंत दर्शन प्रगट होते व या दर्शनाने त्यांना सर्वदर्शी म्हणतात.

दानान्तरायच्या सर्वथा अभावाने अनंत प्राण्यांवर उपकार करणारे क्षायिक अभयदान होते.

संपूर्ण लाभान्तरायच्या क्षयाने कवलाहार केवलींना क्षायिक लाभ होतो. याने त्यांच्या शरीरात बळ प्राप्त होते. मनुष्यांना असाधारण - कधी प्राप्त न होणारे परम शुभ आणि सूक्ष्म असे अनंत परमाणू प्रत्येक क्षणाला प्राप्त होतात.

संपूर्ण भोगान्तरायच्या नाशाने अतिशय असलेले क्षायिक अनंत भोग उदयास येतात. ज्याने कुसुमवृष्टी व आश्चर्य विशेष होतात.

संपूर्ण उपभोगान्तरायच्या क्षयाने अनंत क्षायिक उपभोग होतो. ज्याने सिंहासन, चामर आणि तीन छत्र इत्यादि विभूति प्राप्त होतात.

वीर्यान्तरायच्या नाशाने क्षायिक अनंतवीर्य प्रगट होते.

अनंतानुबंधी इत्यादि सात प्रकृतीच्या क्षयाने क्षायिक सम्यक्त्व प्रगट होते.

चारित्र मोहनीयाच्या एकवीस प्रकृतींच्या विनाशाने क्षायिक चारित्र प्रगट होते.

अभयदान इत्यादि कार्य शरिरनामकर्म आणि तीर्थंकर नामकर्माची अपेक्षा ठेवतात. अतः सिद्धा[१]मध्ये हे नसते. केवलज्ञान आणि अनंतवीर्य ज्यांना प्राप्त आहे अशांनाच याचा सद्‌भाव राहतो.

केवली भगवान ह्या नउकेवल लब्धिंचे स्वामी होतात. इंद्र यांच्यासाठी समवशरणाची रचना करतात. हे अधिकाधिक पूर्व वर्षाला काही कोटी कमी पर्यंत पृथ्वीवर विहार करतात. केवलज्ञान झाल्याबरोबर भगवान् पृथ्वीतळांपासून ५००० हजार धनुष्य वर जातात. तेथे सिंहासनावर चार अंगुल अधर विराजमान होतात. विहाराच्या वेळेस सर्व देवगण भगवानच्या चरणकमलाच्या खाली सुवर्णमय कमळाची रचना करतात. असे अनेक महान वैभव प्राप्त होते.

नंतर भगवान योग निरोध करून ध्यानांमध्ये लीन होतात. यावेळेस समवशरण विघटित होते.

**मोक्षाची प्राप्ती** - बंधा[२]च्या कारणांचा अभाव होणे आणि निर्जराने सर्व कर्मांचा क्षय होणे याला मोक्ष म्हणतात. मिथ्यादर्शनाच्या बंधास कारण होणाऱ्या कर्मांचा अभाव झाल्याने नवीन कर्म बांधल्या जात नाही आणि निर्जरासाठी प्रयत्न केल्याने अर्जित कर्मांचा नाश होतो. सर्व कर्मांचा आत्यन्तिक वियोग होणे याला मोक्ष म्हणतात.

अयोग केवली गुणस्थानाच्या उपान्त्य समयांमध्ये हा जीव ७२ प्रकृतींचा विनाश करून राहिलेल्या १३ प्रकृतींचा[३] अंतसमयी नाश करतो.

मोक्षामध्ये जीवत्व, सम्यक्त्व, केवलज्ञान, केवलदर्शन व सिद्धत्व हे पाच भाव असतात. बाकी भावांचा अभाव असतो.

# कर्म सिद्धांत

ज्यांच्याद्वारा आत्मा परतंत्र होतो त्याला कर्म म्हणतात. जीव व कर्माचा अनादिकाळापासून संबंध आहे. जीव व कर्म यांचे अस्तित्व स्वतः सिद्ध झाले आहे.

जीव कर्मास कसे ग्रहण करतो ? हा जीव शरीर नावाच्या नामकर्माने संपन्न होऊन कर्म आणि नोकर्म

१. तत्त्वार्थवार्तिक पृष्ठ १०६

२. बंधहेत्वभावनिर्जराभ्यां कृत्स्नकर्मविप्रमोक्षो मोक्षः । (तत्त्वार्थ सूत्र)

३. ज्यांना तीर्थंकर प्रकृतिचा बंध नाही अशा १२ प्रकृति येथे नष्ट होतात.

वर्गणांना प्रतिसमय संपूर्ण आणि चारी बाजूंनी ग्रहण करतो. ज्याप्रमाणे अग्नीने गरम झालेला लोखंडाचा गोळा चारी बाजूंनी पाणी आपल्याकडे ओढून घेतो व नंतर थंड होतो.

**एका समयामध्ये किती पुद्‌गल परमाणु कर्मरूप होतात ?** - हा जीव एका समयामध्ये सिद्ध राशीच्या अनंताव्या भागास आणि अभव्य राशीच्या अनंतपट असे अनंतप्रमाण पुद्‌गल परमाणूंना ग्रहण करतो. एका समयामध्ये ग्रहण करण्यास 'समय प्रबद्ध' म्हणतात. योगाने काही विसदृश्यता होते.

**एका समयामध्ये किती कर्म कमी होतात** - एक एका समयामध्ये एक एक परमाणू समयप्रबद्ध फल देऊन कमी होतात. कदाचित काही तपस्या केल्याने अनेक समय प्रबद्ध एकाच वेळेस फळ देऊन निघून जातात. तरीसुद्धा दीडपटास काही कमी असे हानीकारक समयप्रबद्ध कर्म सत्तेमध्ये अवस्थित राहतात.

**कर्म किती आहेत ?** - सामान्यतः कर्म एक आहे. यामध्ये भेद नाही. द्रव्यभावाच्या भेदांनी कर्माचे दोन भेद होतात. ज्ञानावरण इत्यादि पुद्‌गल द्रव्याचा पिंड द्रव्यकर्म आहे. आणि ह्या द्रव्यपिंडामध्ये फळ देण्याची जी शक्ति आहे त्याला भावकर्म म्हणतात. कार्यामध्ये कारणाचा व्यवहार होतो म्हणून त्या शक्तीने उत्पन्न झालेले जे अज्ञान क्रोध इत्यादि परिणाम आहेत त्याला भावकर्म म्हणतात.

कर्माचे सामान्यपणे आठ भेद आहेत. किंवा एकशे अठ्ठेचाळीस किंवा असंख्यात लोकप्रमाण सुद्धा त्याचे भेद होऊ शकतात.

या आठ कर्माचे घातिया आणि अघातिया असे दोन प्रकार आहेत.

**आठ कर्मांची नावे** - ज्ञानावरण, दर्शनावरण, वेदनीय, आयु, नाम, गोत्र आणि अंतराय, अघाति कर्म - वेदनीय आयु, नाम आणि गोत्र. घातिकर्म - ज्ञानावरण, दर्शनावरण, मोहनीय आणि अंतराय.

**घातियाकर्माचे लक्षण** - जो जीव केवलज्ञान इत्यादि क्षायिक भाव आणि क्षायोपशमिक भावांचा घात करतो.

**अघातिकर्माचे लक्षण** - जो जीवांच्या गुणांचा पूर्णपणे घात करीत नाही.

## आठ कर्मांचा स्वभाव

**ज्ञानावरण** - जो आत्म्याच्या ज्ञान गुणांना झाकून टाकतो. प्रगट होऊ देत नाही. जसे देवतांच्या तोंडावर टाकलेले वस्त्र.

**दर्शनावरण** - जो आत्म्याचे दर्शन होऊ देत नाही. जसे राजाचा रखवालदार.

**वेदनीय** - जो जीवांस सुखदुःखाचा अनुभव करावयास लावतो. जसे तलवारीच्या धारेस शहद लावलेले असते.

**मोहनीय** - जो आत्म्यास मोहीत करतो, अचेतन करतो. जसे मदिरापान.

**आयु** - जो जीवास त्या-त्या जागी त्या-त्या पर्यायामध्ये रोकून ठेवतो. जसे सांखळ.

**नामकर्म** - जो अनेक प्रकारच्या शरीराची रचना करतो. जसे चित्रकार.

**गोत्रकर्म** - जो उच्च कुळांत - किंवा नीच कुळांत जन्म घेतो.

**अंतराय** - जो दाता व पात्र या दोघांमध्ये व्यवधान (अडचण) उत्पन्न करतो. जसे भंडार सांभाळणारा दान देताना राजास रोकून ठेवतो.

**आठ कर्माचे उत्तर भेद** - ज्ञानावरणाचे ५, दर्शनावरणाचे ९, वेदनीय २, मोहनीय २८, आयु कर्माचे ४, नामकर्माचे ९३, गोत्र कर्माचे २ आणि अंतराय कर्माचे ५ असे एकूण ५+९+२+२८+४+९३+२+५=१४८ भेद होतात.

# ज्ञानावरणाचे पाच भेद

**मतिज्ञानावरण** - जो जीवाच्या मतिज्ञानास झाकून टाकतो.
**श्रुतज्ञानावरण** - जो श्रुतज्ञानास प्रगट होऊ देत नाही.
**अवधिज्ञानावरण** - जो अवधिज्ञानास झाकून टाकतो. प्रगट होऊ देत नाही.
**मनःपर्यय ज्ञानावरण** - जो मनःपर्ययज्ञानास प्रगट होऊ देत नाही.
**केवलज्ञानावरण** - जो जीवाच्या पूर्ण ज्ञानास प्रगट होऊ देत नाही.

# दर्शनावरणाचे नऊ भेद

**चक्षुदर्शनावरण** - ज्याचे चक्षुने दर्शन होत नाही.
**अक्षुदर्शनावरण** - ज्याचे चक्षुशिवाय बाकी चार इंद्रियांनी सामान्य अवलोकन होत नाही.
**अवधिदर्शनावरण** - ज्याचे अवधिद्वारा दर्शन होत नाही.
**केवलदर्शनावरण** - ज्याने त्रिकाळात राहणाऱ्या सर्व पदार्थांचे दर्शन होत नाही.
**स्त्यानगृद्धि** - ज्याच्या उदयाने हा जीव झोपेतच उठून काही पराक्रमाचे काम करतो. परंतु जागृत झाल्यावर त्याला काय केले याची आठवण राहात नाही, यालाच स्त्यानगृद्धि निद्रा म्हणतात.
**निद्रा-निद्रा** - ज्याच्या उदयाने गाढ झोप येते - डोळ्याच्या पापण्यासुद्धा उघडत नाही.
**प्रचला प्रचला** - ज्याच्या उदयाने तोंडातून लाळ वाहते. हात-पाय वगैरे अंग काम करीत राहतात.
**निद्रादर्शनावरण** - ज्याच्या उदयाने मद, खेद इत्यादि दूर करण्यासाठी झोप येते.
**प्रचला दर्शनावरण** - ज्याच्या उदयाने शरीराच्या क्रिया आत्म्यास मदत करतात. झोपेत काही काम केल्यावर त्याची आठवण राहत नाही.

# वेदनीयाचे दोन भेद

**साता वेदनीय** - ज्याच्या उदयाने देव इत्यादि गतिमध्ये - जीवास शारीरिक आणि मानसिक सुखाची प्राप्ती होते. साता वेदनीय कर्मांचा अनुभव करण्यास मदत मिळते.
**असाता वेदनीय** - ज्याच्या उदयाने अनेक प्रकारच्या, नरक इत्यादि गतिमध्ये होणाऱ्या दुःखांचा अनुभव होतो.

# मोहनीय कर्माचे अठ्ठावीस भेद

मोहनीय कर्माचे प्रामुख्याने दोन प्रकार आहेत - दर्शन मोहनीय आणि चारित्र मोहनीय.
दर्शन मोहनीयाचे तीन भेद आहेत - मिथ्यात्व, सम्यक्‌मिथ्यात्व आणि सम्यक्‌प्रकृति.
**मिथ्यात्वकर्म** - ज्याच्या उदयाने मिथ्यात्व येते. सर्वज्ञ देवांनी सांगितलेल्या वस्तूच्या यथार्थ स्वरूपात संशय करणे हे मिथ्यात्व आहे.
**सम्यक्‌मिथ्यात्व** - ज्याच्या उदयाने परिणामांमध्ये वस्तूचे यथार्थ श्रद्धान आणि अयथार्थ श्रद्धान दोन्हीही असतात.

**सम्यक्प्रकृति** - ज्याच्या उदयाने जीवाच्या सम्यक्त्व गुणाचा घात न होता परिणामांमध्ये चल, मिथ्या दोष येतो. त्याला सम्यक्प्रकृति म्हणतात. ही प्रकृति मिथ्यात्व प्रकृतिचा काहीप्रमाणात धुतलेला भाग आहे.

**चारित्र मोहनीयाचे दोन भेद आहेत** - कषाय वेदनीय, नोकषाय वेदनीय.

**कषायांचे सोळा भेद आहेत** - अनंतानुबंधी, अप्रत्याख्यानावरण, प्रत्याख्यानावरण आणि संज्वलन यांचे क्रोध, मान, माया, लोभ असे चार-चार भेद केल्याने १६ भेद होऊन जातात.

**अनंतानुबंधी क्रोध** - संसाराचे नांव अनंत आहे आणि ह्या संसाराचे कारण अनंतानुबंधी आहे. ज्याच्या उदयाने अनंत संसारास कारणभूत क्रोध उत्पन्न होतो. तो अनंतानुबंधी क्रोध आहे.

**अनंतानुबंधी मान** - ज्याच्या उदयाने अनंत संसारास कारण असा मान कषाय उत्पन्न होतो.

**अनंतानुबंधी माया** - ज्याच्या उदयाने विशेष मायाचार प्रवृत्ति होते.

**अनंतानुबंधी लोभ** - ज्याच्या उदयाने तीव्र लोभ राहतो. हा लोभ अनंतानुबंधी कषाय सम्यक्त्व गुणाचा घात करतो.

**अप्रत्याख्यानावरण** - जो 'अ' अर्थात् 'ईषत्' थोडा सुद्धा प्रत्याख्यान त्याग होऊ देत नाही. एक देशव्रतास सुद्धा होऊ देत नाही. हा कषाय जीवाच्या अणुव्रतास होऊ देत नाही. याचे क्रोध, मान इत्यादि चारी भेदांना कमी केले पाहिजे.

**प्रत्याख्यानावरण** - ज्याच्या उदयाने प्रत्याख्यान पूर्ण त्याग होत नाही. महाव्रत होत नाही. याचे सुद्धा क्रोध इत्यादि चार प्रकार आहेत.

**संज्वलन** - ज्याच्या उदयाने 'सं' एकरूप होऊन 'ज्वलति' प्रकाश करतो. ज्याच्या उदयाने कषायाचा अंश असलेला संयम राहतो. कषाय रहित निर्मल यथाख्यात संयम होऊ शकत नाही. याचे सुद्धा क्रोध इत्यादि चार प्रकार होतात. अशाप्रकारे वेदनीयाचे १६ भेद होतात.

**नव नोकषाय** - जो 'नो' ईषत् थोडा होतो, प्रबल होत नाही याला नोकषाय म्हणतात.

**हास्य** - ज्याच्या उदयाने हास्य प्रगट होते.

**रति** - ज्याच्या उदयाने देश, धन, धान्य पुत्रादि मध्ये प्रीती उत्पन्न होते.

**अरति** - ज्याच्या उदयाने देश, धन, धान्य इत्यादिमध्ये मोह उत्पन्न होत नाही.

**शोक** - ज्याच्या उदयाने प्रिय लोकांचा वियोग होतो. दुःख होते.

**भय** - ज्याच्या उदयाने भीती निर्माण होते.

**जुगुप्सा** - ज्याच्या उदयाने ग्लानी होते. आपले दोष झाकतो व दुसऱ्यांचे दोष प्रगट करतो.

**स्त्रीवेद** - ज्याच्या उदयाने स्त्रीविषयी प्रेम, मायाचार, नेत्र कटाक्ष इत्यादिने पुरुषाच्या बरोबर रमण करण्याची इच्छा होते.

**नपुंसकवेद** - ज्याच्या उदयाने स्त्री-पुरुष दोघांचा सहवास घेण्याची इच्छा होते अर्थात मिश्रित भाव होतात.

अशाप्रकारे नव नोकषाय आणि सोळा कषाय मिळून चारित्र मोहनीयाचे पंचवीस भेद होतात. मोहनीयाचे तीन दर्शन असे एकूण २८ भेद होतात.

## आयुचे चार भेद

**नरकायु** - जो आत्म्यास नरकामध्ये रोकून ठेवतो.

**तिर्यज्यायु** - जो आत्म्यास तिर्यंज्य पर्यायामध्ये थांबवून ठेवतो.

**मनुष्यायु** - जो आत्म्यास मनुष्य शरीरामध्ये रोकून ठेवतो.

**देवायु** - जो आत्म्यास देव शरीरामध्ये थांबवून ठेवतो.

# नाम कर्माचे ९३ भेद

**गतिनामकर्म** - ज्याच्या उदयाने हा जीव एक पर्याय सोडून दुसरी पर्याय धारण करतो याला गति नामकर्म म्हणतात. याचे चार भेद आहेत. ज्याच्या उदयाने जीव नारकीयांचे आकार, तिर्यज्यांचे शरीर, मनुष्याचे शरीर धारण करतो. याला क्रमाने नरकगति, तिर्यज्वगति, मनुष्यगति व देवगति म्हणतात.

**जाति नामकर्म** - जो ह्या गतिमध्ये अव्यभिचारी जीवांना एकत्र करतो. एकेन्द्री, दोनइन्द्री इत्यादि जीव समानरूपाने आपसात एक-दुसऱ्याशी भेटत नाही हा झाला अव्यभिचारीपणा. एकेन्द्रियपणा सर्व एकेन्द्रियांमध्ये सारखा असतो. यालाच सदृशपनासुद्धा म्हणतात. हा अव्यभिचारी धर्म एकेन्द्रियांमध्ये राहतो म्हणून एकेन्द्रिय असे जाति शब्दाने म्हटले जाते.

**जातिकर्माचे पाच भेद आहेत** - ज्याच्या उदयाने हा आत्मा एकेन्द्रीय, दोनइंद्रीय, तीन इंद्रीय, चार इंद्रिय अथवा पंचेंद्रिय म्हटल्या जातो. त्याला क्रमाने एकेन्द्रिय जाती, दोन इंद्रिय जाती, तीन इंद्रिय जाती, चार इंद्रिय जाती व पाच इंद्रिय जाती नामकर्म म्हणतात.

**शरीर नामकर्म** - ज्याच्या उदयाने शरीर बनते. शरीराचे पाच भेद आहेत. ज्याच्या उदयाने औदारिक, वैक्रियिक शरीर, आहारक शरीर, तैजस शरीर आणि कार्माण शरीर तयार होते.

**बंधन नामकर्म** - शरीर नामकर्माच्या उदयाने जो आहारवर्गणा रूप पुद्गलस्कंध हा जीव ग्रहण करतो त्या पुद्गल स्कंधाच्या प्रदेशांचा ज्या कर्माच्या उदयाने आपसात संबंध होतो त्याला बंधन म्हणतात. बंधनाचे औदारिक, वैक्रियिक, आहारक, तैजस व कार्माण असे पाच प्रकार आहेत.

**संघात नामकर्म** - ज्याच्या उदयाने औदारिक शरीरांचे परमाणू एकमेकात मिसळून छिद्ररहित बंधन प्राप्त करून एकरूप होऊन जातात यालाच संघात नामकर्म म्हणतात. याचे सुद्धा औदारिक संघात, वैक्रियिक संघात, आहारक संघात, तैजस संघात, कार्माण संघात असे पाच प्रकार आहेत.

**संस्थान नामकर्म** - संस्थान नाम कर्माने शरीराचा आकार बनतो. याचे सहा भेद आहेत -

**समचतुरस्त्र संस्थान** - ज्याच्या उदयाने अंगोपांगाची लांबी, जाडी सामुद्रिक शास्त्रानुसार ठीक ठीक तयार झाली आहे.

**न्यग्रोधपरिमंडल संस्थान** - ज्याच्या उदयाने शरीराचा आकार न्यग्रोधासारखा (वट वृक्षासारखा) नाभीच्या वर जाडा व नाभीच्या खाली बारीक होतो.

**स्वातिसंस्थान** - ज्याच्या उदयाने स्वाति नक्षत्राप्रमाणे किंवा सर्पाच्या बांबीप्रमाणे वर बारिक व खाली जाडा होतो.

**कुब्जक संस्थान** - ज्याच्या उदयाने कुबडे शरीर होते.

**वामन संस्थान** - ज्याच्या उदयाने ठेंगणे शरीर प्राप्त होते.

**हुंडक संस्थान** - ज्या कर्माच्या उदयाने शरीराचे अंगोपांग खास स्वरूपाचे राहत नाही.

**अंगोपांग** - ज्याच्या उदयाने अंग-उपांगाचा भेद होतो. त्याचे तीन प्रकार आहेत - औदारिक अंगोपांग, वैक्रियिक अंगोपांग, आहारक अंगोपांग.

**संहनन नामकर्म** - संहनन नामकर्माच्या उदयाने हाडांच्या बांधणीत विशेषता राहते. संहननाचे सहा भेद

आहेत.

**वज्रवृषभनाराच संहनन** - ज्या कर्माच्या उदयाने वृषभनाराच संहनन अर्थात हाडे वज्राप्रमाणे कठीण होतात. ह्या हाडांचे कशाने सुद्धा छेदन-भेदन होत नाही.

**वज्रनाराच संहनन** - ज्याच्या उदयाने वज्रासारखी हाडे होतात. परंतु त्याच्यावरील कवच वज्रासारखे नसते.

**नाराच संहनन** - ज्याच्या उदयाने शरीराच्या हाडांचे वज्रासारखे वेष्टन नसते परंतु हाडे मजबूत असतात. खिळा त्यात जाऊ शकत नाही.

**अर्धनाराच संहनन** - ज्याच्या उदयाने हाडांची संधी अर्धकीलीत असते.

**कीलित संहनन** - ज्याच्या उदयाने हाड परस्पर कीलीत (एकमेकात) होतात.

**असंप्राप्त स्पृपाटिका संहनन** - ज्याच्या उदयाने अलग अलग हाडं नसांनी बांधलेली असतात. परस्परात गुंतलेले नसतात.

**वर्ण नामकर्म** - ज्याच्या उदयाने शरीरामध्ये वर्ण होतो. वर्णाचे पाच भेद आहेत. कृष्ण, नील, रक्त, पीत व श्वेत.

**गंध नामकर्म** - ज्याच्या उदयाने शरीरामध्ये गंध येतो. गंधाचे दोन प्रकार आहेत. (१) सुरभिगंध (२) असुरभिगंध.

**रस नामकर्म** - ज्याच्या उदयाने शरीरामध्ये रस उत्पन्न होतो. रसाचे पाच भेद आहेत - तिक्तरस, कटुरस, कषायरस, आम्लरस आणि मधुरस.

**स्पर्श नामकर्म** - ज्याच्या उदयाने शरीरामध्ये स्पर्श येतो. स्पर्शाचे आठ भेद आहेत - कर्कश स्पर्श, मृदु, गुरू, लघु, शीत, उष्ण, स्निग्ध आणि रूक्ष.

**आनुपूर्व्य नामकर्म** - ज्याच्या उदयाने विग्रहगतीमध्ये मरण होण्यापूर्वी शरीराच्या आकाराचे आत्म्याचे प्रदेश बनतात. अर्थात् शरीराच्या आकाराचा नाश होत नाही. याचे चार भेद आहेत -

**नरकगति प्रायोग्यानुपूर्व्य** - ज्याच्या उदयाने नरकगति प्राप्त होण्यापूर्वी जीवाच्या शरीराचा आकार विग्रह गतिमध्ये पूर्व शरीर जसे असेल तसाच राहतो. अशाप्रकारे तिर्यञ्चगति, प्रायोग्यानुपूर्व्य, मनुष्यगति प्रायोग्यानुपूर्व्य, देवगति प्रायोग्यानुपूर्व्य मध्ये सुद्धा समजले पाहिजे.

**अगुरुलघु नामकर्म** - ज्याच्या उदयाने असे शरीर मिळते की जे लोखंडाच्या गोळ्याप्रमाणे भारी नसते व आकड्याच्या रुईप्रमाणे हलके नसते.

**उपघात** - ज्याच्या उदयाने मोठ-मोठे शिंग किंवा मोठे पोट असे घातक अंग होतात.

**परघात** - ज्याच्या उदयाने तीक्ष्ण शिंग, नख, सर्प इत्यादि प्राण्यांची दाढ वगैरे दुसऱ्यांचा घात करणारे शरीराचे अवयव होतात.

**उच्छ्वास** - ज्या कर्माच्या उदयाने श्वासोच्छ्वास होतो.

**आतप** - ह्या कर्माच्या उदयाने दुसऱ्यांना आताप करणारे शरीर होते. ह्या आतप कर्माचा उदय सूर्यबिंबाच्या विमानातील पृथ्वीकायिक बादर जीवांना राहतो. याच्या फक्त किरणांमध्येच उष्णता राहते. सूर्यात उष्णता राहत नाही.

**उद्योत** - ज्या कर्माच्या उदयाने प्रकाशवान - तेजःपुंज शरीर होते. हे उद्योतकर्म चंद्रबिंबाप्रमाणे असलेल्या विमानातील एकेन्द्रिय बादर पृथ्वीकायिक जीवांनाच होते. जुगनू इत्यादिना सुद्धा ह्या कर्माचा उदय राहतो.

**विहायोगति** - ज्याच्या उदयाने आकाशामध्ये गमन होते. याचे दोन प्रकार आहेत - प्रशस्त विहायोगति,

अप्रशस्तविहायोगति.

**त्रसनामकर्म** - ज्याच्या उदयाने दोन इंद्रिय असलेल्या जीवांच्या जातीमध्ये जन्म होतो.

**बादर** - ज्याच्या उदयाने असे शरीर होते की जे दुसऱ्या जीवांना रोकून ठेवते व दुसऱ्याच्या द्वारा ते स्वतः थांबते.

**पर्याप्ति** - ज्याच्या उदयाने जीव योग्य आहार, शरीर, इंद्रिय, श्वासोच्छ्वास, भाषा व मन ह्या सर्व पर्याप्तींना पूर्ण करतो.

**प्रत्येक** - ज्याच्या उदयाने एका शरीराचा स्वामी एकच जीव होतो.

**स्थिर** - ज्याच्या उदयाने शरीरातील रस इत्यादि धातु आणि वात, पित्त, कफ इत्यादि धातु, उपधातु आपआपल्या ठिकाणांवर स्थिर राहतात. याने शरीरातील रोग शांत राहतो.

**शुभ नामकर्म** - ज्याच्या उदयाने मस्तक वगैरे शरीराचे अवयव आणि शरीर सुंदर होते.

**सुभग** - ज्याच्या उदयाने दुसऱ्या जीवांना आवडणारे शरीर होते.

**सुस्वर** - ज्याच्या उदयाने चांगला स्वर होतो.

**आदेय** - ज्याच्या उदयाने कांतीमान शरीर होते.

**यशस्कीर्ती** - ज्याच्या उदयाने आपले पुण्यगुण जगांमध्ये प्रगट होतात.

**निर्माण** - ज्याच्या उदयाने शरीराच्या अंगोपांगाची रचना ठीकठाक होते.

**तीर्थंकर** - जो श्रीमत् अर्हंत पदाचे कारण आहे. ह्या तीर्थंकर प्रकृतीच्या बंधाने जीव तिन्ही लोकांमध्ये आश्चर्य आणि क्षोभ उत्पन्न करणारा महान देव म्हटल्या जातो.

**स्थावर** - ज्याच्या उदयाने एकेंद्रिय (पृथ्वी, जल, अग्नि, वायु, वनस्पति) जीव होतो.

**सूक्ष्म** - ज्याच्या उदयाने असे सूक्ष्म शरीर होते की जे कोणाकडून रोकल्या जात नाही व कोणास रोकू शकत नाही.

**अपर्याप्त** - ज्याच्या उदयाने सहापैकी कोणतीही पर्याप्ती पूर्ण झाली नाही अर्थात लब्ध पर्याप्त अवस्था आहे.

**साधारण** - ज्या कर्माच्या उदयाने एका शरीराचे अनेक जीव स्वामी होतात.

**अस्थिर** - ज्याच्या उदयाने धातू आणि उपधातू आपल्या आपल्या जागेवर राहत नाही. याने शरीर आजारी राहते.

**अशुभ** - अशुभ कर्माने शरीराचे मस्तक इत्यादि अवयव सुंदर नसतात.

**दुर्भग** - ज्याच्या उदयाने रूप इत्यादि गुण असूनसुद्धा दुसऱ्यांना प्रिय होत नाही.

**दुःस्वर** - ज्याच्या उदयाने स्वर चांगला राहात नाही.

**अनादेय** - ज्याच्या उदयाने शरीर कांतिमान राहत नाही.

**अपयशः कीर्ती** - याच्या उदयाने संसारातील जीवांची प्रशंसा होत नाही.

अशाप्रकारे नामकर्माचे ९३ भेद झालेत.

**गोत्र कर्माचे दोन भेद आहेत** -

(१) **उच्च गोत्र** - ज्याच्या उदयाने लोक पूजित उच्च कुळामध्ये जन्म होतो.

(२) **नीच गोत्र** - ज्याच्या उदयाने निंदनीय कुळामध्ये जन्म होतो.

अंतराय कर्माचे पाच भेद आहेत -

**(१) दानांतराय** - ज्याच्या उदयाने दान देण्याची इच्छा असूनसुद्धा दान देऊ शकत नाही.

**(२) लाभान्तराय** - ज्याच्या उदयाने लाभ होऊ शकत नाही.

**(३) भोगान्तराय** - ज्याच्या उदयाने पुष्प, फळ, अन्न इत्यादि वस्तूंना भोगण्याची इच्छा असूनसुद्धा त्याचा भोग घेऊ शकत नाही.

**(४) उपभोगान्तराय** - ज्याच्या उदयाने स्त्री इत्यादि उपभोग्य वस्तूचा उपभोग घेऊ शकत नाही.

**(५) वीर्यान्तराय** - ज्याच्या उदयाने आपली शक्ती प्रगट करण्याची इच्छा असूनसुद्धा प्रगट करू शकत नाही. निरुत्साहित होतो. हे वीर्यान्तराय कर्म आहे.

अशाप्रकारे आठ कर्माचे १४८ भेद होतात.

**पुण्य-पाप प्रकृति** - ह्या कर्मांमध्ये प्रशस्त व अप्रशस्त असे दोन भेद होतात. ज्या प्रकृति सांसारिक सुख देतात त्या पुण्य प्रकृति आहेत आणि ज्या अशुभ फळ देतात त्या पाप प्रकृति आहेत.

**पुण्य प्रकृति** - १ साता वेदनीय, ३ तिर्यंच, मनुष्य, देवायु, १ उच्चगोत्र, २ मनुष्य जाति, मनुष्यगत्यानुपूर्वी २ देव गति - देवगत्था नुपूर्वी १ पंचेन्द्रीजाति, ५ शरिर, ५ बंधन, ५ संघात, ३ अंगोपांग, २० शुभवर्ण, गंध, रस, स्पर्श, १ समचतुरस्त्रसंस्थान, १ वज्र वृषभनाराच संहनन, उपघाताच्या शिवाय अगुरुलघु इत्यादि ६, १ प्रशस्त विहायोगति आणि त्रस इत्यादि १२ अशाप्रकारे ६८ पुण्यप्रकृति आहेत.

**पाप प्रकृति** - चार घाति कर्मांच्या प्रकृति ४७, १ नीच गोत्र, १ असाता वेदनीय, १ नरकायु, २ नरकगति, नरकगत्यानुपूर्वी, २ तिर्यंचगति, तिर्यंचायु ४ एकेंद्रिय जाति, समचतुरस्त्र सोडून ५ संस्थान, प्रथम संहनन सोडून ५ संहनन, अशुभवर्ण, रस, गंध, स्पर्श हे २०, १ उपघात, १ अप्रशस्त विहायोगति, स्थावर इत्यादि १० अप्रकारे १०० पाप प्रकृति आहेत. ६८+१००=१६८ प्रकार झालेत. पूर्वी सांगितलेल्या १४८ प्रकृति आहेत. स्पर्श, रस, गंध आणि वर्ण ह्या वीस प्रकृति पुण्य आणि पाप ह्या दोन्हीमध्ये येतात.

**कषायांचा वासनाकाळ** - संज्वलन कषायांचा वासनाकाळ अन्तमुहूर्त, प्रत्याख्यानाचा पंधरा दिवस, अप्रत्याख्यानाचा सहा महिने आणि अनंतानुबंधीचा संख्यात, असंख्यात आणि अनंतभव समजला पाहिजे.

**वासनाचे लक्षण** - कोणी क्रोध केला. नंतर जेथे क्रोध नाही अशा दुसऱ्या कामामध्ये लागला. परंतु ज्या पुरूषावर क्रोध केला त्याला क्षमासुद्धा केली नाही. अशाप्रकारे क्रोधाचा संस्कार मनामध्ये आहे त्यालाच येथे वासनेचा काळ म्हटले आहे.

### कर्माचे करण -

**करण** - प्रत्येक प्रकृतीचे दहा करण (अवस्था) आहेत. त्यांची नांवे - बंध, उत्कर्षण, संक्रमण, उदीरणा, सत्व, उदय, उपशम, निधत्ति आणि निकाचना.

**बंध** - कर्माचा आत्म्याशी संबंध होणे अर्थात मिथ्यात्व इत्यादि परिणामांनी जे पुद्गल द्रव्याचे ज्ञानावरणादि रूप होऊन परिणमन होते त्याला बंध म्हणतात.

**उत्कर्षण** - कर्मांची स्थिति आणि अनुभाग वाढणे याला उत्कर्षण म्हणतात.

**संक्रमण** - बंधरूप प्रकृतीचा दुसऱ्या प्रकृतिमध्ये परिणमन होणे याला संक्रमण म्हणतात.

**अपकर्षण** - स्थिति आणि अनुभाग यांची कमी होणे.

**उदीरणा** - उदय काळाच्या बाहेर स्थित असलेले, अर्थात ज्याच्या उदयाचा अजून समय आला नाही असे जे कर्मद्रव्य त्याच्या अपकर्षणाच्या सहाय्याने उदयावली काळांमध्येच प्राप्त करणे याला उदीरणा म्हणतात.

**सत्व** - पुद्गलाचे कर्मरूप राहणे याला सत्व म्हणतात.

**उदय** - कर्म आपल्या स्थितिमध्ये पूर्ववत् राहणे. अर्थात फळ देण्याचा समय प्राप्त होणे हा उदय आहे.

**उपशान्त** - जे कर्म उदयावलीने प्राप्त होत नाही आणि उदीरणा अवस्थाने सुद्धा प्राप्त होत नाही त्याला उपशांतकरण म्हणतात.

**निधत्ति** - जे कर्म उदयावलीनी प्राप्त होत नाही आणि संक्रमण अवस्थासुद्धा प्राप्त करीत नाही त्याला निधत्तिकरण म्हणतात.

**निकाचितकरण** - ज्या कर्माची उदीरणा, संक्रमण, उत्कर्षण आणि अपकर्षण अशा चारही अवस्था होऊ शकत नाही त्याला निकाचितकरण म्हणतात.

हे निकाचित कर्म प्रायः फल देऊन सुटून जाते. देव, शात्र, गुरू यांची भक्ति केल्याने अशा जातीचा कर्मबंध होतो.

ह्या आठ कर्मांचा बंध, उदय आणि सत्व अवस्था अधिक प्रसिद्ध आहेत.

**बंधयोग्य प्रकृति** - ५ बंधन, ५ संघात हे ५ शरीराबरोबर असतातच म्हणून यांचा शरीरामध्ये समावेश करून द्यावा. १५-१०=५च शिल्लक राहतात. दहा कमी झाले. ५ वर्ण, ५ रस, २ गंध आणि ८ स्पर्श ह्या २० चा ८ मध्येच समावेश करावा. दर्शन मोहनीयाचे ३ भेदामध्ये मिथ्यात्वाचाच बंध होतो. सम्यक्‌मिथ्यात्व आणि सम्यक्त्व प्रकृतिचा बंध होत नाही. अर्थात ह्या दोन कमी झाल्यात. म्हणजे १०+१६+२=२८, १४८-२८ कमी झाल्याने १२० प्रकृति बंधास योग्य आहेत.

**उदय योग्य प्रकृति** - बंधास योग्य अशा १२० प्रकृतींमध्ये सम्यक्‌मिथ्यात्व आणि सम्यक्‌प्रकृति यांचा समावेश केल्याने १२२ प्रकृति उदय योग्य होतात.

**सत्व प्रकृति** - वर सांगितलेल्या १४८ प्रकृति सत्तेमध्ये राहण्यास योग्य आहेत.

गुणस्थान, मार्गणा यांच्यापेक्षा ह्या प्रकृतींचा बंध, उदय सत्व विशेषरूपाने गोमटसार कर्मकांड आणि पंचसंग्रह इत्यादि ग्रंथांमध्ये सांगितलेला आहे.

## आठ कर्मांचा आश्रव

**ज्ञानावरण, दर्शनावरण कर्मांचा आश्रव** - ज्ञान आणि दर्शनामध्ये केलेले प्रदोष, निन्हव, मात्सर्य, अन्तराय, आसादन आणि उपघात हे ज्ञानावरण व दर्शनावरण कर्माचे आश्रव आहेत.

**प्रदोष** - धर्मात्म्याने सांगितलेल्या तत्वज्ञानाची प्रशंसा न आवडणे याला प्रदोष म्हणतात.

**निन्हव** - कोणत्याही कारणाने ज्ञानास लपविणे हे निन्हव आहे.

**मात्सर्य** - वस्तूच्या स्वरूपास समजून सुद्धा पंडीत होईल असा विचार करून कोणास सुद्धा न शिकविणे याला मात्सर्य म्हणतात.

**अंतराय** - कोणाच्या ज्ञानाभ्यासात विघ्न टाकणे अंतरायकर्म आहे.

**आसादन** - दुसऱ्यांच्या द्वारा प्रकाशित होणाऱ्या ज्ञानास रोकणे याला आसादन म्हणतात.

**उपघात** - खऱ्या ज्ञानांमध्ये दोष लावणे उपघात आहे.

**वेदनीयाचे आश्रव** - स्वतःचे आणि दुसऱ्यांचे असे दोघांचेही दुःख, शोक, ताप, क्रंदन, वध आणि परिवेदन हे असता वेदनीयाचे आश्रव आहेत.

**दुःख** - पीडा ज्या परिणामांनी होते त्यास दुःख म्हणतात.

**शोक** - आपल्यावर उपकार करणाऱ्या पदार्थांचा वियोग झाल्याने व्याकुळ होणे हा शोक आहे.

**ताप** - संसारामध्ये (जगामध्ये) आपली निंदा वगैरे झाल्यावर पश्चात्ताप करणे 'ताप' आहे.

**आक्रन्दन** - पश्चात्तापाने अश्रु गाळणे आक्रन्दन आहे.

**वध** - प्राण्यांचा वियोग करणे वध आहे.

**परिवेदन** - संक्लेश परिणामांचे अवलंबन घेऊन असे रडणे की ऐकणाऱ्यांच्या हृदयांत दया उत्पन्न होईल याला परिवेदन म्हणतात. शोक वगैरे दुःखाचेच प्रकार आहेत. परंतु दुःखाच्या जाती सांगण्यासाठी ह्या सर्वांचे ग्रहण केले आहे.

**साता वेदनीयाचे आश्रव** - भूतव्रत्यनुकंपा, दान, सराग, संयम, योग, क्षान्ति, शौच इत्यादि आणि अर्हभक्ति हे साता वेदनीयाचे आश्रव आहेत.

**भूतव्रत्यनुकंपा** - संसारातील सर्व प्राण्यांवर दया करणे - भूतानुकंपा आणि व्रती अणुव्रती ह्या महाव्रती जीवांवर दया करणे व्रत्यनुकंपा आहे.

**दान** - जेणेकरून दुसऱ्यांवर उपकार होईल अशी योग्यवस्तु देण्यास दान म्हणतात.

**सराग संयमादि** - पाच इंद्रिय आणि मन यांच्या विषयापासून विरक्त होणे तसेच षट्काय जीवांची हिंसा न करणे याला संयम म्हणतात. आणि ज्या संयमात राग आहे त्याला सराग संयम म्हणतात.

येथे संयमासंयम (श्रावकाचे व्रत) अकाम निर्जरा (बंदीखान्यामध्ये संक्लेशरहित भोगोपभोगाचा त्याग करणे) आणि बालतप (मिथ्यादर्शन सहित तपस्या करणे) याचे सुद्धा ग्रहण होते.

**योग** - ह्या सर्वांना चांगल्या रितीने धारण करणे यास योग म्हणतात.

**क्षान्ति** - क्रोध वगैरे कषाय नसणे याला क्षान्ति म्हणतात.

**शौच** - लोभाचा त्याग करणे शौच आहे.

**दर्शन मोहनीयाचा आश्रव** - केवली, श्रुत, संघ, धर्म आणि देव यांचा अवर्णवाद करणे दर्शन मोहनीय कर्माचा आश्रव आहे.

**अवर्णवाद** - गुणी लोकांवर खोटे आरोप करणे याला अवर्णवाद म्हणतात.

**केवलीचा अवर्णवाद** - केवली ग्रास आहार घेऊन जीवंत राहतात. असे म्हणणे केवलीचा अवर्णवाद आहे.

**संघाचा अवर्णवाद** - हे साधु शूद्र आहेत, मलीन आहेत. निंद्य आहेत, नग्न आहेत इत्यादी म्हणणे संघाचा अवर्णवाद आहे.

**श्रुताचा अवर्णवाद** - शास्त्रामध्ये मांस भक्षण करणे इत्यादि लिहिले आहे असे म्हणणे श्रुताचा अवर्णवाद आहे.

**देव-अवर्णवाद** - देव मदिरा (दारू) पितात. मांस खातात. प्राणीमात्राचा बळी दिल्यास देव प्रसन्न होतो असे म्हणणे देव अवर्णवाद आहे.

**धर्म अवर्णवाद** - जिनेंद्र भगवंतांनी सांगितलेल्या धर्मामध्ये काहीच गुण नाहीत, त्याचे आचरण केल्याने असुर होतील असे म्हणणे धर्म अवर्णवाद आहे.

**चारित्र मोहनीयाचे आश्रव** - कषायांच्या उदयाने होणारे तीव्र परिणाम चारित्र मोहनीयाचे आश्रव आहेत.

**नरक आयुचे आश्रव** - पुष्कळ आरंभ आणि पुष्कळ परिग्रह करणे नरक आयुचा आश्रव आहे.

**तिर्यंच आयुचा आश्रव** - माया, छळ-कपट करणे तिर्यंच आयुचा आश्रव आहे.

**मनुष्य आयुचा आश्रव** - थोडा आरंभ व थोडा परिग्रह करणे मनुष्य आयुचा आश्रव आहे. स्वभावाने सरळ होणे मनुष्य आयुचा आश्रव आहे.

**सर्व आयुंचा आश्रव** - दिग्व्रत इत्यादि ७ शील आणि अहिंसा इत्यादि पाच व्रतांचा अभाव सर्व आयुंचा

आश्रव आहे. शील आणि व्रत यांचा अभाव असताना कषायांमध्ये अत्यंत तीव्रता, तीव्रता, मंदता आणि अत्यंत मंदता येते तेव्हाच ते क्रमाने चार आयुंच्या आश्रवाचे कारण होतात.

**देव आयुचा आश्रव** - सराग संयम, संयमासंमय, अकाम निर्जरा आणि बालतप हे देव आयुचे आश्रव आहेत. सम्यग्दर्शनाने सुद्धा देव आयुचा आश्रव होतो.

सम्यग्दर्शनाने वैमानिक देवांचा आश्रव होतो. अन्य देवांचा नाही. यद्यपी सम्यग्दर्शन कोणत्याही आश्रवरूपाने नाही तरीसुद्धा त्याच्याशी जो रागाचा संबंध आहे त्याने बंध होतो.

**अशुभ नामकर्माचा आश्रव** - योगवक्रता आणि विसंवाद याने अशुभ नामकर्माचा आश्रव होतो.

**शुभ नामकर्माचा आश्रव** - योगवक्रता आणि विसंवादाच्या विपरीत अर्थात् योगाची सरलता आणि बाकी प्रवृत्तींचा अभाव हे शुभ नामकर्माचे आश्रव आहेत.

# तीर्थंकर प्रकृतीचा आस्रव

(१) **दर्शनविशुद्धि** - पंचवीस दोषांनी रहित निर्मळ सम्यग्दर्शन.

(२) **विनयसंपन्नता** - रत्नत्रय आणि त्यांना धारण करणाऱ्यांचा विनय.

(३) **शीलव्रतेष्वनतिचार** - अहिंसा इत्यादि व्रत आणि त्यांचे रक्षक क्रोधत्याग, शीलामध्ये विशेष प्रवृत्ति.

(४) **अभीक्ष्ण ज्ञानोपयोग** - निरंतर ज्ञानाचा उपयोग करणे.

(५) **संवेग** - संसाराला भिणे.

(६) **शक्तितस्त्याग** - यथाशक्ती दान देणे.

(७) **शक्तितस्तप** - उपवास वगैरे शक्तिनुसार करणे.

(८) **साधु समाधि** - साधूंचा उपसर्ग दूर करणे आणि समाधिमरण साधणे.

(९) **वैयावृत्यकरण** - रोगी, बालक-वृद्ध मुनींची सेवा करणे.

(१०) **अर्हद्भक्ति** - अर्हंत भगवानची भक्ती करणे.

(११) **आचार्यभक्ती** - आचार्यांची भक्ती करणे.

(१२) **बहुश्रुतभक्ती** - उपाध्यायांची भक्ती करणे.

(१३) **प्रवचनभक्ती** - शास्त्राची भक्ती करणे.

(१४) **आवश्यका परिहाणि** - सामायिक इत्यादि सहा आवश्यक क्रियांची हानी न होऊ देणे.

(१५) **मार्ग प्रभावना** - जैनधर्माची प्रभावना करणे. जैनधर्माचा प्रचार-प्रसार करणे.

(१६) **प्रवचन वात्सल्य** - साधर्मी बांधवांशी गोवत्स प्रमाणे प्रेम करणे. ह्या १६ भावना तीर्थंकर प्रकृती नावाच्या नामकर्माचे आस्रव आहेत. ह्या १६ भावनांमध्ये दर्शनविशुद्धि नावाची प्रथम भावना मुख्य आहे. ह्या दर्शनविशुद्धि भावनाबरोबर बाकी १५ भावना असल्या तरी ठीक या १५ पेक्षा कमी असल्यातरी तीर्थंकर नामकर्माचा आस्रव होतो.

**नीच गोत्र कर्माचा आस्रव** - दुसऱ्यांची निंदा आणि आपली प्रशंसा करणे, दुसऱ्यांमध्ये असलेल्या गुणांना प्रगट न होऊ देणे, आपल्या खोट्या गुणांना प्रगट करणे. हे सर्व नीच गोत्राचे आस्रव आहेत.

**उच्च गोत्राचे आस्रव** - नीच गोत्राच्या आस्रवाच्या विपरित अर्थात दुसऱ्यांची प्रशंसा करणे. आत्मनिंदा, नम्रवृत्ति आणि गर्व नसणे हे उच्चगोत्राचे आस्रव आहेत.

**अंतराय कर्माचा आस्रव** - दुसऱ्यांच्या दान, लाभ, भोग, उपभोग आणि वीर्य यामध्ये विघ्न आणणे अंतराय कर्माचे आस्रव आहेत.

# कर्मबंधाचे कारण

**कर्मबंधाची पाच कारणे सांगितली आहेत** - 'मिथ्यादर्शनाविरतिप्रमादकषाययोगा[1] बन्धहेतवः' ॥१॥

**मिथ्यात्व, अविरति, प्रमाद, कषाय आणि योग.**

**१. मिथ्यात्वाचे गृहित आणि अगृहित असे दोन भेद होतात.**

**गृहीत** - दुसऱ्यांच्या उपदेशाने विपरीत बुद्धी होणे. कुदेव, कुशास्त्र, कुगुरू यांच्यावर श्रद्धा ठेवणे.

**अगृहीत मिथ्यात्व** - उपदेशाशिवाय अनादिकालीन संस्काराने दुसऱ्यांची वस्तू आपली समजणे. कोणत्याही प्रकारची एकांत बुद्धी ठेवणे. मिथ्यात्वाचे गृहीत, अगृहीत आणि सांशयिक असे तीन भेद होतात. तसेच एकांत, विपरीत, विनय, संशय आणि विज्ञान असे पाच भेद सुद्धा होतात.

**एकांत** - अनेक धार्मिक पदार्थांना कोणत्याही एका धर्माचे मानणे याला एकांत मिथ्यात्व म्हणतात. जसे वस्तुसर्वथा क्षणिक आहे. तसेच ती वस्तू नित्य सुद्धा आहे. वक्तव्य आहे तसेच अवक्तव्य सुद्धा आहे इत्यादि.

**विपरीत** - धर्माच्या स्वरूपाला विपर्यय रूप समजणे. जसे हिंसा केल्याने स्वर्ग मिळतो.

**विनय** - सम्यग्दृष्टी आणि मिथ्यादृष्टी देव, गुरू शास्त्र यांच्यामध्ये समान बुद्धी ठेवणे. सम्यग्दृष्टी लोकांप्रमाणे मिथ्यादृष्टी लोकांचा सुद्धा आदर-सत्कार करणे.

**संशय** - खरे व खोटे दोन्ही प्रकारच्या पदार्थांमध्ये कोणत्या एका पक्षाचा निश्चय न करणे. जसे सग्रन्थ लिंग मोक्षाचे साधन आहे या निर्ग्रन्थ लिंग.

**अज्ञान** - जीवादि पदार्थ हेच आहेत, अशाप्रकारचे आहेत. पदार्थाचे विशेषरूप न समजणे अज्ञान मिथ्यात्व आहे.

विस्ताराने मिथ्यात्वाचे ३६३ भेद मानले आहेत. तसेच जीवाच्या परिणामांच्या अपेक्षेने आणखी अधिक विस्तार केला तर असंख्यात लोक प्रमाण पर्यंत भेद होऊ शकतात.

**तीनशे त्रेसष्ट पाखंडी मत** - ज्यामध्ये सर्वथा एका नयालाच ग्रहण केल्या जाते असे जे एकांत मत आहे त्याचे ३६३ प्रकार सांगितले आहेत.

क्रियावादींचे १८०, अक्रिया वादींचे ८४, अज्ञानवादीचे ६७ आणि वैनयिकवादीचे ३२ भेद आहेत.

**क्रियावादीचे १८० भेद** - प्रथम अस्ति असे लिहिणे. त्याच्यावर आपणांस, दुसऱ्यांना, नित्यपणाने, अनित्यपणाने असे ४ पद लिहिणे. याच्यावर जीवादि ९ पदार्थ लिहिणे. याच्यावर 'काल' 'ईश्वर' 'आत्मा' नियति आणि स्वभाव असे पाच ५ पद लिहिणे. अशाप्रकारे १ □ ४ □ ९ □ ५ = १८० भेद होतात.

अस्ति, आपणांस, दुसऱ्यांना, नित्यपणे, अनित्यपणे ह्या पांचहिचा अर्थ सुगम आहे. तसेच जीव, अजीव, आस्रव, बंध, संवर, निर्जरा, मोक्ष, पुण्य आणि पाप यांना पदार्थ म्हणतात.

**कालवाद** - काळच सर्वांना उत्पन्न करतो आणि काळच सर्वांचा नाश करतो. झोपलेल्या प्राण्यांमध्ये सुद्धा काळच जागृत राहतो. अशा काळाला फसविण्यासाठी कोण समर्थ होऊ शकतो ? अशाप्रकारे काळानेच सर्व काही घडते असे मानणे काळवादाचा अर्थ आहे.

**ईश्वरवाद** - आत्मा ज्ञानरहित आहे, अनाथ आहे. काही करू शकत नाही. या आत्म्याचे सुख-दुःख, स्वर्ग व नरकांमध्ये गमन इत्यादि सर्व ईश्वराचीच क्रिया आहे. सर्वकाही ईश्वराचेच आहे असे मानणे ईश्वरवाद आहे.

**आत्मवाद** - संसारामध्ये एकच महान आत्मा आहे. तोच पुरुष आहे. तोच देव आहे. तो सर्व व्यापक आहे. सर्वांगपणे अगम्य आहे. चेतनासहित आहे. निर्गुण आहे आणि उत्कृष्ट आहे. अशाप्रकारे आत्मस्वरूपच

---

१. तत्त्वार्थसूत्र ।

सर्वांना मानणे आत्मवाद आहे.

**नियतिवाद** - ज्याचे ज्या समयांत ज्याच्याकडून जसे नियमाने होते ते त्याच संयमात त्याच्याकडून तसेच होते. अशा नियमाने सर्व वस्तूंना मानणे ह्याला नियतिवाद म्हणतात.

**स्वभाववाद** - कांटा, इत्यादि ज्या रुतणाऱ्या तीक्ष्ण वस्तू आहेत त्यांचा तीक्ष्णपणा कोण करतो ? हरीण आणि पक्षी इत्यादीमध्ये अनेक रूपं पाहिल्या जातात. त्याला कोण करतो ? असा प्रश्न आल्यावर सहज उत्तर मिळते की तो त्यांचा स्वभावच आहे. सर्वांना कारणाशिवाय तो त्यांचा स्वभावच आहे असे मानणे स्वभाववाद आहे. अशाप्रकारे काळाच्या अपेक्षेने एकांत पक्षास ग्रहण केले तर क्रियावादाचे १८० भेद होतात.

**अक्रियावादीचे चौऱ्यांशी (८४) भेद** - सर्वात प्रथम नास्ति पद लिहिणे. त्याच्यावर आपणाकडून, दुसऱ्याकडून असे दोन पद लिहिणे. याच्यावर पुण्य-पाप सोडून सात पद लिहिणे. याच्यावर काळ इत्यादि घेऊन ५ पद लिहिणे. अशाप्रकारे यांचा गुणाकार केल्यास १×२×७×५=७० भेद होतात. पुनः समोर नास्तिपद लिहिणे, त्याच्यावर पदार्थ लिहिणे, सात पदार्थ लिहिल्यानंतर त्याच्यावर 'नियति' काळ असे दोन पद लिहिणे अशाप्रकारे यांचा गुणाकार केल्यास १×७×२=१४ भेद होतात. पहिले सांगितलेले ७०+१४=८४ भेद झालेत.

**अज्ञानी लोकांचे सदुसष्ट (६७) भेद** - जीव इत्यादि नऊ पदार्थापैकी एक-एकास सप्तभंगाने न जाणणे जसे जीव अस्ति स्वरूप आहे असे कोण मानतो ? किंवा नास्ति, या अस्ति-नास्ति दोन्ही, या अवक्तव्य किंवा तीन भंग असलेले - अशाप्रकारे सात भंगाने जीवास कोण समजून घेतो ? अशाप्रकारे नऊ पदार्थांना ७ नयाने गुणा केल्यास ९×७=६३ भेद होतात. सर्वप्रथम 'शुद्ध पदार्थ' असे लिहिणे. याच्यावर अस्ति, नास्ति, अस्ति-नास्ति आणि 'अवक्तव्य' असे लिहिणे. ह्यांच्यापासून चारभंग उत्पन्न होतात. जसे शुद्ध पदार्थाचे अस्ति इत्यादिरूप असे कोण समजतो ? अशाप्रकारे पहिले झालेले ६३ व हे ४ चार = ६७ अज्ञानवादाचे भेद होतात.

**वैनयिक वादाचे बत्तीस भेद** - देव, राजा, ज्ञानी, यति, वृद्ध, बालक, माता, पिता ह्या आठ लोकांचा मन, वचन, काय आणि दान ह्या चारांनी विनय करणे. अशाप्रकारे वैनयिक वादाचे ८×४=३२ भेद होतात. हे विनयवादी गुण अवगुणाची परीक्षा केल्याशिवाय विनयानेच सिद्धी प्राप्त करतात.

अशाप्रकारे स्वच्छन्द - आपल्या मनाने श्रद्धान करणाऱ्या पुरुषांनी ३६३ भेद असल्याची कल्पना केली आहे जी अज्ञानी जीवांना पसंत येते.

पुढे दुसरे सुद्धा एकान्तवादाचे वर्णन करतात -

**पौरुषवाद** - जो आळशी आहे, काम करण्यास ज्याला उत्साह नसतो. तो कोणतेही फळ भोगू शकत नाही. जसे स्तनामध्ये दूध पुरुषार्थाशिवाय बनू शकत नाही. अशाप्रकारे पुरुषार्थाने सर्व कार्यांची सिद्धी होते असे मानणे एकान्त पुरुषार्थवाद आहे.

**दैववाद** - मी फक्त भाग्यासच (दैव) उत्तम मानतो. अशा निरर्थक पुरुषार्थाचा धिक्कार असो. किल्ल्याप्रमाणे उंच असा कर्ण नावाचा राजा युद्धात मारल्या गेला असा दैववाद आहे. यानेच सर्वसिद्धी प्राप्त होतात.

**संयोगवाद** - यथार्थ ज्ञानी संयोगानेच कार्यसिद्धी होते असे मानतात. जसे एका चाकाने रथ चालू शकत नाही. एक आंधळा व एक लंगडा दोघं वनात फिरत असताना वनात आग लागली असता आंधळ्याच्या खांद्यावर लंगडा चढतो व दोघेही वनातून बाहेर निघून शहरात पोहोचले. अशाप्रकारे एकान्त मान्यता संयोगवाद आहे.

**लोकवाद** - एका वेळी मिळालेली लोक प्रसिद्धी सर्व देव मिळून दूर करण्याचा प्रयत्न केला तरी दूर होऊ शकत नाही. अन्य लोकांची तर गोष्टच निराळी. ज्याप्रमाणे द्रौपदीने अर्जुनाच्या गळ्यात माळ टाकली. परंतु द्रौपदी पांच पांडवांची पत्नी झाली अशी प्रसिद्धी झाली. अशाप्रकारे लोकवादी लोकप्रवृत्तिसच सर्वस्व मानतात.

आचार्य म्हणतात की - जितके बोलण्याचे मार्ग आहेत तितकेच नयवाद आणि जितके नयवाद आहेत तितकेच समय आहेत. अर्थात कोणत्यातरी अपेक्षेनेच काही बोलले जाते. ह्याठिकाणी जी अपेक्षा असते तोच नय आहे. आणि अपेक्षा नसताना बोलणे, अथवा एका अपेक्षेने अनंतधर्म असलेली वस्तू सिद्ध करणे हेच दुसऱ्या मतांमध्ये मिथ्यात्व आहे. दुसऱ्या मतांचे वचन 'सर्वथा' सांगितल्याने नियमाने असत्य होतात. आणि जैन मतानुसार वचन 'कथंचित' (कोणत्याही प्रकाराने) बोलले तरी सत्य आहे.

**२ अविरतिचे बारा भेद आहेत** - षटकाय जीवांची दया न करणे तसेच पंचेंद्रिय व मन ह्या सहाला वश न करणे.

**३ प्रमाद** - कुशल कार्यामध्ये अनादर करणे. प्रमादाचे १५ प्रकार आहेत. ४ विकथा, ४ कषाय, ५ इंद्रिय विषय, १ निद्रा आणि १ स्नेह.

**४ विकथा** - स्त्रीकथा, भक्तकथा, राष्ट्रकथा आणि अवनिपाल कथा.

**४ कषाय** - क्रोध, मान, माया, लोभ

**५ इन्द्रिय** - स्पर्शन, रसना, घ्राण, चक्षु आणि क्षोत्र

**४ कषाय पंचवीस आहेत** - अनंतानुबंधी क्रोध, मान, माया, लोभ. अप्रत्याख्यानावरण क्रोधादि ४, प्रत्याख्यानावरण क्रोधादि ४, संज्वलन क्रोधादि ४ आणि हास्यादि नौ नोकषाय.

**योग १५ आहेत** - ४ मनोयोग, ४ वचनयोग आणि ७ काययोग. अशाप्रकारे मिथ्यात्व, अविरति, प्रमाद, कषाय आणि योग हे कर्मबंधाचे कारण सांगितलेले आहेत.

# मुक्ति चे कारण

"सम्यग्दर्शनज्ञानचारित्राणि मोक्षमार्गः ।"[१]

सम्यग्दर्शन, सम्यग्ज्ञान आणि सम्यक्चारित्र ह्या तिन्हींचा संगम मोक्षाच्या प्राप्तीचे कारण आहे. अर्थात् मिथ्यात्व इत्यादिच्या विरुद्ध असलेले सम्यक्त्व वगैरे कारण जीवास कर्मबंधातून मुक्त करून मोक्ष प्राप्त करून देणारे आहे.

**सम्यक्त्वलब्धि** - लब्धिसार ग्रंथामध्ये सम्यक्त्वलब्धि आणि चारित्रलब्धि यांचे विस्तृत विवेचन केलेले आहे. अनादि मिथ्यादृष्टी जीव सर्वांत प्रथम उपशम सम्यक्त्वास ग्रहण करतो. अतः प्रथम उपशम सम्यक्त्वाची विधी सांगतात - चार गति असणारा अनादि या सादि मिथ्यादृष्टी संज्ञी, पर्याप्त, गर्भज, मंदकषायी असल्याने त्याचे विशुद्ध परिणाम असतात. तो गुण दोषांचा विचार करणारा, साकार ज्ञानोपयोग ज्याला आहे तोच जीव पाचव्या लब्धिचा अंत समयात सम्यक्त्वास ग्रहण करतो. सम्यक्त्व होण्यापूर्वी मिथ्यादृष्टी गुणस्थानामध्ये त्याला पाच लब्धि प्राप्त होतात. त्यांची नांवे -

**पाच लब्धि** - क्षयोपशम, विशुद्धि, देशना, प्रायोग्य आणि करण, ह्या पाचपैकी पहिल्या चार साधारण आहेत. ह्या भव्य-अभव्य दोन्ही जीवांना होऊ शकते. परंतु पाचवी करणलब्धि सम्यक्त्व व चारित्र यांना धारण करणाऱ्या भव्य जीवांनाच होते.

**क्षयोपशम लब्धि** - अशुभ ज्ञानावरण इत्यादि कर्मांचा अनुभाग ज्या काळामध्ये समया-समयाने अनंत गुणाने कमी कमी होत उदयास येतो त्या काळामध्ये क्षयोपशम लब्धि होते.

**विशुद्धी** - क्षयोपशम लब्धि प्राप्त असणाऱ्या जीवाचे साता इत्यादि प्रकृतिसाठी बंधनास जो विशुद्ध

---

१. तत्त्वार्थसूत्र ।

परिणाम कारणीभूत होतो त्याला विशुद्धि लब्धि म्हणतात.

**देशनालब्धि** - खऱ्या तत्त्वांचा उपदेश देणाऱ्या आचार्यांचा सहवास किंवा त्यांच्या उपदेशाचा लाभ होणे यास देशनालब्धि म्हणतात. जेथे उपदेश देणारा कोणी नाही अशा नरकादि गतिमध्ये पूर्वभवामध्ये श्रवण केलेल्या उपदेशाच्या संस्काराच्या बळाने देशनालब्धि प्राप्त होऊन सम्यक्त्व होते.

**प्रायोग्यलब्धि** - क्षयोपशम, विशुद्धि आणि देशनालब्धि ह्या तीन लब्धि प्राप्त असणारा जीव प्रत्येक समयात विशुद्धीच्या वाढत्या वेगाने आयुशिवाय सात कर्मांची फळ देण्याची शक्ती कमी करतो. कर्माच्या फळ देण्याच्या शक्तीस कमजोर करून शेवटी फक्त कोडा-कोडी मात्र ठेवतो. असे कार्य करण्याची योग्यता प्राप्त होण्यास 'प्रायोग्यलब्धि' म्हणतात. ही सामान्यपणे भव्य-अभव्य दोन्ही जीवांना होते. यामध्ये क्रमाने प्रकृतिबंधाचे चौतीस स्थान होतात. जसे पहिला नरकायुचा व्युच्छित्तिस्थान आहे. अर्थात नरकायुपासून उपशम सम्यक्त्वापर्यंत नरकायुचा बंध होत नाही. दुसरे तिर्यंच आयुचे स्थान आहे. अशाप्रकारे चौतीस स्थानांमध्ये शेहेचाळीस प्रकृतींची व्युच्छित्ति होते.

**करणलब्धि**[१] - अभव्य लोकांच्यासुद्धा योग्य अशा चार लब्धिरूप परिणामांना समाप्त करून भव्य जीव अधःप्रवृत्त, अपूर्व आणि अनिवृत्तिकरण ह्या तीन परिणामांना (करण) करतो. हे तिन्हीकरण अंतर्मुहूर्त मध्ये होतात, हे तिन्ही काळ सुद्धा पृथक् पृथक् अंतर्मुहूर्त आहेत.

## तिन्ही करणांचे स्वरूप

**अधःप्रवृत्तकरण** - जेथे खाली समयवर्ती असलेल्या जीवाचे परिणाम वरती समयवर्ती असलेल्या जीवाच्या परिणामासारखे होतात तेव्हा त्या परिणामांचे नाव अधःप्रवृत्तिकरण आहे.

**अपूर्वकरण** - समया समयांमध्ये जीवांचे भाव वेगवेगळे होतात म्हणून ह्या परिणामांना अपूर्वकरण म्हणतात.

**अनिवृत्तीकरण** - जेथे प्रत्येक समयात एकच परिणाम होतो तो अनिवृत्तिकरण आहे.

**उपशम सम्यक्त्व** - अनंतानुबंधी आणि दर्शन मोहनीयाचा उपशम करून हा जीव अनिवृत्तिकरणाच्या अंतसमयात उपशम सम्यक्त्व प्राप्त करतो. तेव्हा प्रथमोशम सम्यक्त्व रूपी यंत्राने मिथ्यात्वाचे तीन खंड करतो. त्या खंडाची नांवे - मिथ्यात्व, सम्यक्त्वमिथ्यात्व आणि सम्यक्त्वप्रकृति.

**क्षयोपशम सम्यक्त्व** - उपशम सम्यक्त्वाचा अन्तर्मुहूर्त काळ पूर्ण झाल्यानंतर जर सम्यक्त्व प्रकृतीचा उदय होतो तेव्हा हा जीव वेदक सम्यग्दृष्टी होतो. यामध्ये चल, मलिन अगाढ दोष राहतात.

**पतनाचे गुणस्थान** - जेव्हा मिश्र प्रकृतिचा उदय होतो तेव्हा सम्यग्मिथ्यात्व नावाचे तृतीय गुणस्थान होते. जर उपशम सम्यक्त्वाच्या काळात अधिकात अधिक सहा आवली काळ बाकी राहीपर्यंत जर अनंतानुबंधीमधून कोण्या एकाचा उदय झाला तर सासादन गुणस्थान होते. आणि जर मिथ्यात्वाचा उदय आला तर हा जीव प्रथम गुणस्थानामध्ये येतो. उपशम सम्यक्त्वानेच हा जीव खाली जातो वर जात नाही असा नियम आहे.

**क्षायिक सम्यक्त्व** - जो मनुष्य कर्मभूमिमध्ये उत्पन्न झाला आहे तो तीर्थंकर किंवा अन्य केवली अथवा श्रुतकेवलीच्या चरणकमलामध्ये सात प्रकृतींचा नाश करून क्षायिक सम्यक्त्व ग्रहण करतो. पहिले तीन करण विधानाने अनंतानुबंधी क्रोध इत्यादि चार कषायांचा नाश करतो. अनिवृत्तिकरणाच्या अंतीम काळात बारा कषाय व नव नोकषाय यांचे विसंयोजन करतो. नंतर अन्तमुहूर्त काळापर्यंत विश्राम करून तीन करणांना करून

---

१. लब्धिसार पहावे.

अनिवृत्तिकाळात मिथ्यात्व, मिश्र, आणि सम्यक्त्व मोहनीयाचा क्रमाने नाश करतो.

क्षायिक सम्यक्त्व झाल्यावर हा जीव त्याच भवामध्ये, तिसऱ्या, चवथ्या भवामध्ये मोक्ष प्राप्त करून घेतो. चतुर्थ भवाचे उल्लंघन करीत नाही.

**चारित्र लब्धिचे स्वरूप** - चारित्रलब्धि अर्थात चारित्राची प्राप्ती हीच चारित्रलब्धि आहे. चारित्रलब्धि एकदेश आणि सकलदेश अशा भेदाने दोन प्रकारची आहे. मिथ्याद्दष्टी आणि असंयमी सम्यग्द्दष्टी देशचारित्रास प्राप्त करू शकतात. मिथ्याद्दष्टी, असंयमी सम्यग्द्दष्टी व देशसंयमी मनुष्य सकलचारित्रास प्राप्त करू शकतात.

**देशचारित्र** - अनादि मिथ्याद्दष्टी आणि सादि मिथ्याद्दष्टी जीव उपशम सम्यक्त्वाने देशचारित्रास ग्रहण करतो. सम्यक्त्व उत्पत्ति ज्याप्रमाणे सांगितली आहे त्याप्रमाणे तीन करणांच्या शेवटी तो देशचारित्रास ग्रहण करतो.

जर सादि मिथ्याद्दष्टी जीव वेदक सम्यक्त्वाने देश चारित्रास ग्रहण करतो तो त्याचे अधःकरण आणि अपूर्वकरण असे दोनच करण होतात.

**सकल चारित्र** - सकल चारित्र्याचे तीन भेद आहेत. - क्षायोपशमिक, औपशमिक आणि क्षायिक.

**क्षायोपशमिक चारित्र** - जो मिथ्याद्दष्टी जीव उपशम सम्यक्त्वाने क्षायोपशमिक चारित्राला ग्रहण करतो तेव्हा हा जीव पूर्वी सांगितलेल्या तीन करणांस करतो. क्षायोपशमिक चारित्र धारण करण्यापूर्वी जीव पहिल्या अप्रमत्त गुणस्थानामध्ये जातो. वेदक सम्यक्त्वी जीवास असंयमी आणि देशसंयमी सकल चारित्रासाठी दोनच करण करावे लागतात.

**उपशम चारित्र** - उपशम चारित्रास प्राप्त करण्यासाठी प्रयत्नशील असणारा जीव अप्रमत्त गुणस्थानामध्ये अंतर्मुहूर्त विश्राम करून नंतर तिन्ही करणास करून चारित्रमोहाचा उपशम करतो.

**क्षायिक चारित्र** - चारित्र मोहनीयाचा क्षय करण्यासाठी क्षपक श्रेणी चढणारा जीव ह्या तिन्ही करणांच्या सहाय्याने चारित्रमोहाचा निर्मूळ नाश करतो. बाराव्या गुणस्थानामध्ये यथाख्यात चारित्रास प्राप्त करून क्षीणमोही होतो.

करण नांव परिणामांचे आहे. जसे सम्यक्त्व प्राप्त करणाऱ्यासाठी अधःप्रवृत्त, अधःकरण आणि अपूर्वकरण असे तीन करण होतात. तसेच देशचारित्र व सकल-चारित्रासाठी सुद्धा ह्या तिन्ही करणांची आवश्यकता आहे. उपशमश्रेणी व क्षपकश्रेणी चढण्यासाठी सुद्धा जीवांना करण करावे लागते. हे करण बुद्धीपूर्वक होत नाही. अबुद्धीपूर्वक होते. परिणामांच्या निर्मलतेनेच असे कार्य होतात असे समजले पाहिजे.

**सम्यक्त्व आणि चारित्रासाठी योग्यता** - चारही आयुमधून कोणत्याही आयुचा बंध झाल्यावर सम्यक्त्व होते. परंतु देवायुचा बंध झाल्याशिवाय हा जीव अन्य तीन आयुचा बंध झाला तरी अणुव्रत आणि महाव्रत यांना ग्रहण करू शकत नाही. कारण तेथे व्रतास कारणीभूत असे विशुद्ध परिणाम नसतात.

**कर्माच्या नाशाचा क्रम** - कर्मांचा नाश करण्यासाठी महाव्रती मुनि क्षपक श्रेणी चढतो. क्षपक श्रेणीमध्ये त्याला क्षायिक सम्यक्त्व प्राप्त होते. ह्या क्षायिक सम्यक्त्वाने अनंतानुबंधी सात प्रकृतींचा नाश होतो. आणि मनुष्य आयुशिवाय तीन आयुंचा सुद्धा बंध राहात नाही म्हणून १४८-१०=१३८ प्रकृती राहतात. नवव्या गुणस्थानामध्ये ३६ प्रकृतींचा क्षय होतो. त्यांची नावे याप्रमाणे - नरकगति, नरकगत्यानुपूर्वी, तिर्यंचगति, तिर्यंचगत्यानुपूर्वी, द्वींद्रिय, चतुरिन्द्रिय जाति, स्त्यानगृद्धि, निद्रा-निद्रा, प्रचला-प्रचला, उद्योत, आतप, एकेन्द्रिय, साधारण, सूक्ष्म, स्थावर, ४ प्रत्याख्यानावरण, ४ अप्रत्याख्यानावरण, नपुंसकवेद, स्त्रीवेद, हास्य, रति, अरति, शोक, भय, जुगुप्सा, पुरुषवेद संज्वलन, क्रोध, मान, माया आणि लोभ. अशा छत्तीस प्रकृति आहेत. दहाव्या

गुणस्थानामध्ये संज्वलन लोभाचा नाश होतो व हा जीव क्षीणमोही होतो. पुनः बाराव्या गुणस्थानामध्ये ५५ ज्ञानावरण, ४ दर्शनावरण, ५ अन्तराय, १ निद्रा, १ प्रचला अशा १६ प्रकृतींचा नाश करून तेराव्या गुणस्थानामध्ये हा जीव गेल्यावर केवली होतो. प्रथम सांगितलेल्या ७+३+३६+१+१६=६३ अशा एकूण ६३ प्रकृतींचा नाश करून महामुनि अर्हंत होतो.

चार घाति कर्मांचा नाश झाल्याने अनंतज्ञान इत्यादि अनंतचतुष्टय प्रगट होतात. अर्थात ज्ञानावरण व दर्शनावरणाच्या नाशाने अनंतज्ञान आणि अनंतदर्शन प्रगट होते. बीर्यान्तरायच्या क्षयाने अनंतवीर्य आणि नव नोकषाय तसेच दान इत्यादि चार अंतरायाचे क्षयाने अनंत सुख प्राप्त होते व केवलींना नऊ केवललब्धि प्राप्त होतात -

ज्ञानावरणाच्या क्षयाने अनंतज्ञान, दर्शनावरणाच्या क्षयाने अनंतदर्शन, दर्शन मोहनीयाच्या क्षयाने क्षायिक सम्यक्त्व, चारित्र मोहनीयाच्या क्षयाने क्षायिक चारित्र, दान इत्यादि पाच अन्तरायाच्या क्षयाने क्रमशः क्षायिक दान, लाभ, भोग, उपभोग आणि वीर्य ह्या नऊ क्षायिक लब्धि प्राप्त होतात.

## केवलीच्या कवलाहाराचे निराकरण

**प्रश्न** - केवलीच्या असाता वेदनीयाच्या उदयाने क्षुधा, तृषा इत्यादि परीषह संभव आहेत अतः आहार क्रिया झाली पाहिजे काय ?

**उत्तर** - केवलींना मोहनीय कर्माचा अभाव असतो. म्हणून त्यांना रागद्वेष नसतात. त्यांना ज्ञानावरण कर्माचा अभाव असल्याने इंद्रियांचे ज्ञान सुद्धा नसते. साता व असाता वेदनीयाच्या उदयाने होणारे इंद्रियज्ञान सुख-दुःख नसते. म्हणून केवलींना क्षुधा, तृषा इत्यादि परिषहसुद्धा नसतात असे म्हणणे उपचारमात्र आहे. केवली भगवंताचा असाता वेदनीयाचा उदय सातारूप परिणमन करतो असे आगमात लिहिले आहे. अर्थात् क्षुधादि परीषह केवलींना नाहीत व त्यांना दूर करण्यासाठी आहार इत्यादि संभव नाही.

**प्रश्न** - केवलींना आहाराशिवाय आहार मार्गणा कशी संभव आहे ?

**उत्तर** - केवलींच्या औदारिक शरीरास आवश्यक असे उत्तम कर्म परमाणु प्रतिसमय येत राहतात. नोकर्म वर्गणा ग्रहण करण्याचेच नाव आहार मार्गणा आहे. याचा सद्‌भाव केवलीमध्ये आहे कारण आहाराचे सहा प्रकार आहेत - ओज, लेप्य, मानस, केवल, कर्म आणि नोकर्म. या सहा आहारांपैकी केवलींचे कर्म-नोकर्म हे दोन आहार होतात. कवलाहार होत नाही. साता वेदनीयाच्या समय प्रबद्धास ग्रहण करणे कर्माहार आहे. आणि औदारिक शरीराचे योग्य परमाणु ग्रहण करणे हा नोकर्माहार आहे.

केवली भगवान जास्तीत जास्त 'काही कमी एक पूर्व कोटी' पर्यंत विहार करून अयोग केवली होतात. तेथे द्विचरम समयात बहात्तर प्रकृतींचा आणि अंतसमयी १३ प्रकृतींचा नाश करून कर्मरहित - मुक्त होतात.

**७२ प्रकृतीची नांवे** - ५ शरीर, ५ बंधन, ५ संघात, ६ संस्थान, ३ अंगोपांग, ६ संहनन, ५ वर्ण, २ गंध, ५ रस, ८ स्पर्श, स्थिर, अस्थिर, शुभ, अशुभ, सुस्वर, दुःस्वर, देवगति, देवगत्यानुपूर्वी, प्रशस्त विहायोगति. अप्रशस्त विहायोगति, दुर्भग, निर्माण, अयशस्कीर्ति, अनादेय, प्रत्येक अपर्याप्त, अगुरूलघु, उपघात, परघात, उच्छ्वास वेदनीयापैकी एक वेदनीय, नीचगोत्र अशा ७२ प्रकृति आहेत.

**१३ प्रकृतीची नांवे** - साता असाता वेदनीयामधून एक वेदनीय, मनुष्यगति, मनुष्यगत्यानुपूर्वी, पंचेंद्रिय जाति, सुभग, त्रस, बादर, पर्याप्त, आदेय, यशस्कीर्ति, तीर्थंकर मनुष्य आयु आणि उच्चगोत्र. ह्या ८५ प्रकृतिंचा नाश करून मुक्त जीव एका समयामध्ये उर्ध्वलोकाच्या अग्रभागी विराजमान होतात.

# मुक्त जीव अलोकाकाशाच्या बाहेर कां जात नाहीत ?

मुक्तजीव उर्ध्वगति स्वभावाचे असल्याने लोकाकाशाच्या अंतापर्यंतच जातात. पुढे अलोकाकाशांत धर्मास्तिकाय द्रव्याचा अभाव असतो म्हणून अलोकाकाशापर्यंत जात नाही. धर्मद्रव्य जीवद्रव्यास गमन करण्यास सहकार्य करते. जसे "धर्म्मास्तिकायाभावात्" लोकाकाशाच्या पुढे धर्मद्रव्याचा अभाव असतो म्हणून मुक्त जीव तेथेच थांबतो.

जीवाचा 'फिरणाऱ्या चक्राप्रमाणे, अग्निच्या पेटलेल्या वातीप्रमाणे गमन करण्याचा स्वभाव असल्याने मुक्त जीव उर्ध्वगमन करतो. अलोककाशांत धर्मास्तिकायाचा अभाव असल्याने मुक्त जीव पुढे न जाता लोकाकाशाच्या अग्रभागी विराजमान होतो.

**सिद्धांची अवगाहना** - सिद्ध होणाऱ्या मुनींची उत्कृष्ट अवगाहना ५२५ धनुष्य आहे. जघन्य अवगाहना साडे तीन अरत्निप्रमाण आहे. ह्या दोन्ही अवगाहनामध्ये पुष्कळ भेद आहेत. अशाप्रकारे आपल्या अंतिम शरीराने काही कमी अवगाहना होते.

**सिद्ध होण्याची संख्या** - जर निरंतर सिद्ध होत राहिले तर कमीतकमी दोन समयापर्यंत आणि अधिकांत अधिक आठ समयापर्यंत निरंतर सिद्ध होत राहतात. जर अंतर पडले तर कमीतकमी एका समयाचे व जास्तीत जास्त सहा महिन्याचे अंतर पडू शकते.

**संख्या** - कमीतकमी एका समयामध्ये एक जीव सिद्ध होऊ शकतो. जास्तीत जास्त एका समयात १०८ जीव सिद्ध होतात. मध्यवर्ती संख्याचे अनेक विकल्प आहेत.

# सिद्ध परमेष्ठीचे आठ गुण

**'सम्मत्तणाणदंसण वीरिय सुहूमं तहेव अवगहणं ।**
**अगुरुलघुमव्वावाहं अट्ठागुणा होंति सिद्धाणं ॥**

सिद्धाच्या आठ कर्मांचा क्षय झाल्यावर आठ गुण प्रगट होतात. मोहनीय कर्मांच्या क्षयाने सम्यक्त्व, ज्ञानावरण कर्माच्या क्षयाने केवलज्ञान, दर्शनावरण कर्माच्या क्षयाने केवल दर्शन. अंतराय कर्माच्या क्षयाने अनंतवीर्य, नामकर्माच्या अभावाने सूक्ष्मत्व, आयुकर्माच्या अभावाने अवगाहनत्व, गोत्र कर्माच्या नाशाने अगुरुलघु तसेच वेदनीय कर्माच्या नाशाने अव्याबाध सुख असे सिद्धांचे आठ गुण प्रगट होतात.

वास्तविक मुख्यरूपाने आठ गुण मानले गेले आहेत. सिद्ध भगवान स्वयं अनंतगुणांनी परिपूर्ण आहेत. सिद्धांच्या ह्या अनंतगुणांना तराजूच्या एका पारड्यात ठेवले व दुसऱ्या पारड्यात ज्ञानगुण ठेवला तर ज्ञानगुणाचे पारडे भारी होईल. कारण ज्ञानगुणाशिवाय त्या गुणांचा अनुभव करणारा किंवा मुल्यांकन करणारा कोणी नाही.

अशाप्रकारे आमचा आत्मा अनन्त गुणांचा पिंड (समूह) आहे. त्या शक्तिरूप गुणांना व्यक्त करण्यासाठी परमज्ञानस्वरूप आणि परमानन्दस्वरूप सिद्ध परमेष्ठींना मन, वचन, कायेने आमचा नमस्कार होवो ।

❋❋❋

# प्रशस्ति

सिद्धार्थनंदनं वंदे, सर्वसिद्धिप्रदायिनम् ।
श्री जैनभारतीं भक्त्या, गणेशांश्च मुदा स्तुवे ॥ १ ॥
मूलसंघे सुविख्याते, कुन्दकुन्दान्वयो महान् ।
सरस्वतीसुगच्छेऽस्मिन्, बलात्कारगणोऽस्ति यः ॥ २ ॥
तत्प्रवाहे गणी जातः श्री शांतिसागरो महान् ।
चारित्रचक्रवर्ती यस्तं वंदे शिरसा मुदा ॥ ३ ॥
शांतिसागरपट्टस्थं सूरिं श्री वीरसागरम् ।
आर्यिकाव्रतदातारं गुरुवर्यं स्तुवेऽनिशम् ॥ ४ ॥
वीराब्दे शून्ययुग्मांके पंचद्विगणनायुते ।
महामहोत्सवे काले सर्वत्र प्रसरे सति ॥ ५ ॥
माघमासि सिते पक्षे पंचम्यां रविवासरे ।
हस्तिनागपुरे तीर्थे श्रीमत्शांतिजिनालये ॥ ६ ॥
ज्ञानमत्या कृता जीयात्, कृतिः श्री जैनभारती ।
आचंद्रतारकं स्थेयात्, सर्वस्मै ज्ञानदा भवेत् ॥ ७ ॥

ॐ ॐ ॐ

### चार्ट नं० १

# चौदा कुळकर

| क्र० सं० | नाव | देवी | उत्सेध | वय (तिलायपण्णत्तिच्या आधारावरून) | वय (महापुराणाच्या आधारावरून) |
|---|---|---|---|---|---|
| १. | प्रतिश्रुति | स्वयंप्रभा | १८०० ध० | $\frac{१}{१०}$ पल्य | $\frac{१}{१०}$ पल्य |
| २. | सन्मति | यशस्वती | १३०० ध० | $\frac{१}{१००}$ पल्य | अमम |
| ३. | क्षेमंकर | सुनन्दा | ८०० ध० | $\frac{१}{१०००}$ पल्य | अटट |
| ४. | क्षेमंधर | विमला | ७७५ ध० | $\frac{१}{१००००}$ पल्य | तुटिक |
| ५. | सीमंकर | मनोहरी | ७५० ध० | $\frac{१}{१०००००}$ पल्य | कमल |
| ६. | सीमंधर | यशोधरा | ७२५ ध० | $\frac{१}{१००००००}$ पल्य | नलिन |
| ७. | विमलवाहन | सुमती | ७०० ध० | $\frac{१}{१०००००००}$ पल्य | पद्म |
| ८. | चक्षुष्मान् | धारिणी | ६७५ ध० | $\frac{१}{१००००००००}$ पल्य | पद्मांग |
| ९. | यशस्वी | कान्तमाला | ६५० ध० | $\frac{१}{१०००००००००}$ पल्य | कुमुद |
| १०. | अभिचन्द्र | श्रीमती | ६२५ ध० | $\frac{१}{१००००००००००}$ पल्य | कुमुदांग |
| ११. | चन्द्राभ | प्रभावती | ६०० ध० | $\frac{१}{१०००००००००००}$ पल्य | नयुत |
| १२. | मरुदेव | सत्या | ५७५ ध० | $\frac{१}{१००००००००००००}$ पल्य | नयुतांग |
| १३. | प्रसेनजित् | अमितमती | ५५० ध० | $\frac{१}{१०००००००००००००}$ पल्य | १ पर्व |
| १४. | नाभिराज | मरुदेवी | ५२५ ध० | १ पूर्वकोटि | १ कोटिपूर्व |

| अन्तराल (तिलोयपण्णत्तिवरून) | अन्तराल महापुराणावरून | शिक्षण विषय |
|---|---|---|
| १/८ | पल्य १ पल्य | चन्द्र सूर्योदयाची भिती घालविणे |
| १/८० | ” असंख्यात करोड वर्ष | अंधार व तारांगणाची भिती घालविणे |
| १/८०० | ” ” | वाघ वगैरे हिंस्र प्राण्यांचा संगति त्याग |
| १/८००० | ” ” | सिंहापासून रक्षणाचे उपाय |
| १/८०००० | ” ” | कल्पवृक्ष-सीमा |
| १/८००००० | ” ” | तरु गुच्छादि चिन्हित सीमा |
| १/८०००००० | ” ” | हत्ती वगैरे प्राण्यांच्या सवारीचा उपदेश |
| १/८००००००० | ” ” | बालक-मुखदर्शन |
| १/८०००००००० | ” करोडो वर्ष | बालक-नामकरण |
| १/८००००००००० | ” करोडो वर्ष | बाळाला रडू नये म्हणून चंद्र दाखविणे |
| १/८०००००००००० | ” करोडो वर्ष | शैत्यादि रक्षणोपाय |
| १/८००००००००००० | ” आपल्या योग्य अंतर | नावेद्वारे जाणे |
| १/८०००००००००००० | ” □ | जटायु पटलापहरण |
| १/८००००००००००००० | ” □ | नाभिनालकर्तन |

## चार्ट नं० २

# चौवीस[1] तीर्थंकर

| नाव | १ कोठून गर्भात आले | २ गर्भ कल्याण तिथि | ३ गर्भनक्षत्र | ४ जन्म-नगरी | ५ पिता | ६ माता |
|---|---|---|---|---|---|---|
| १. वृषभ | सर्वार्थसिद्धि | आषाढ कृ० २ | रोहिणी | अयोध्या | नाभिराय | मरुदेवी |
| २. अजित | विजय | ज्येष्ठ कृ० अमा० | रोहिणी | अयोध्या | जितशत्रु | विजया |
| ३. संभव | अधोग्रैवेयक | फाल्गुन शु० ८ | मृगशिरा | श्रावस्ती | जितारि | सुसेना |
| ४. अभिनन्दन | विजय | वैशाख शु० ६ | पुनर्वसु | अयोध्या | संवर | सिद्धार्था |
| ५. सुमति | जयन्त | श्रावण शु० २ | मघा | अयोध्या | मेघप्रभ | मंगला |
| ६. पद्म | उपरिम ग्रैवेयक | माघ कृ० ६ | चित्रा | कौशाम्बी | धरण | सुसीमा |
| ७. सुपार्श्व | मध्य ग्रैवेयक | भाद्रपद शु० ६ | विशाखा | वाराणसी | सुप्रतिष्ठ | पृथिवी |
| ८. चन्द्रप्रभ | वैयजन्त | चैत्र कृ० ५ | ? | चंद्रपूर | महासेन | लक्ष्मीमती |
| ९. पुष्पदन्त | आरण | फाल्गुन कृ० ९ | मूल | काकंदी | सुग्रीव | रामा |
| १०. शीतल | अच्युत | चैत्र कृ० ८ | पूर्वाषाढा | भद्रिल | दृढरथ | नन्दा |
| ११. श्रेयान् | पुष्पोत्तर | ज्येष्ठ कृ० ६ | श्रवण | सिंहपुर | विष्णु | वेणुदेवी |
| १२. वासुपूज्य | महाशुक्र | आषाढ कृ० ६ | शतभिषा | चंपापूर | वसुपूज्य | विजया |
| १३. विमल | शतार | ज्येष्ठ कृ० १० | उ० भाद्रपदा | कंपिलापुरी | कृतवर्मा | जयश्यामा |
| १४. अनंत | पुष्पोत्तर | कार्तिक कृ० १ | रेवती | अयोध्या | सिंहसेन | सर्वयशा |
| १५. धर्म | सर्वार्थसिद्धि | वैशाख शु० १३ | रेवती | रत्नपूरी | भानु | सुव्रता |
| १६. शान्ति | " | भाद्रपद कृ० ७ | भरणी | हस्तिनापूर | विश्वसेन | ऐरा |
| १७. कुन्थु | " | श्रावण कृ० १० | कृत्तिका | हस्तिनापूर | शूरसेन | श्रीमती |
| १८. अर | अपराजित | फाल्गुन शु० ३ | रेवती | हस्तिनापूर | सुदर्शन | मित्रा |
| १९. मल्लि | " | चैत्र शु० १ | अश्विनी | मिथिला | कुम्भ | प्रभावती |
| २०. मुनिसुव्रत | आनत | श्रावण कृ० २ | श्रवण | राजगृह | सुमित्र | पद्मा |
| २१. नमि | अपराजित | आश्विन कृ० २ | अश्विनी | मिथिलापुरी | विजय | वप्रिला |
| २२. नेमि | अपराजित | कार्तिक शु० ६ | उत्तराषाढा | शौरीपूर | समुद्र विजय | शिवादेवी |
| २३. पार्श्व | प्राणत | वैशाख कृ० २ | विशाखा | वाराणसी | अश्वसेन | वर्मिला |
| २४. वर्धमान | पुष्पोत्तर | आषाढ शु० ६ | उत्तराषाढा | कुंडलपूर | सिद्धार्थ | प्रियकारिणी |

१. या चार्टमध्ये पंच कल्याणक तिथि उत्तरपुराणाच्या आधारावर आहे. बाकी प्रकरणे तिलोयपण्णत्ति मध्ये दिल्या गेलेल्या चार्टनुसार आहेत.

| | ७ | ८ | ९ | १० | ११ |
|---|---|---|---|---|---|
| तीर्थ० | जन्म तिथि | जन्म नक्षत्र | वंश | वय | कुमार काल |
| १. | चैत्र कृ० ९ | उत्तराषाढा | इक्ष्वाकु | ८४ लाख पूर्व | २० लाख वर्ष पूर्व |
| २. | माघ शु० १० | रोहिणी | ” | ७२ ” | १८ ” |
| ३. | कार्तिक शु० १५ | ज्येष्ठा | ” | ६० ” | १५ ” |
| ४. | माघ शु० १२ | पुनर्वसु | ” | ५० ” | १२ १/२ ” |
| ५. | चैत्र शु० ११ | मघा | ” | ४० ” | १० ” |
| ६. | कार्तिक कृ० १३ | चित्रा | ” | ३० ” | ७ १/२ ” |
| ७. | ज्येष्ठ शु० १२ | विशाखा | ” | २० ” | ५ ” |
| ८. | पौष कृ० ११ | अनुराधा | ” | १० ” | २ १/२ ” |
| ९. | मार्गशिर्ष शु० १ | मूल | ” | २ ” | १/२ ” |
| १०. | माघ कृ० १२ | पूर्वाषाढा | ” | १ ” | १/४ ” |
| ११. | फाल्गुन कृ० ११ | श्रवण | ” | ८४ लाख वर्ष | २१ लाख वर्ष |
| १२. | फाल्गुन कृ० १४ | विशाखा | ” | ७२ ” | १८ ” |
| १३. | माघ शु० ४ | पूर्व भाद्रपदा | ” | ६० ” | १५ ” |
| १४. | ज्येष्ठ कृ० १२ | रेवती | ” | ३० ” | ७५०००० वर्ष |
| १५. | माघ शु० १३ | पुष्य | कुरु | १० ” | २५०००० वर्ष |
| १६. | ज्येष्ठ कृ० १४ | भरणी | इक्ष्वाकु | १ ” | २५००० वर्ष |
| १७. | वैशाख शु० १ | कृत्तिका | कुरु | ९५००० वर्ष | २३७५० वर्ष |
| १८. | मार्गशिर्ष शु० १४ | रोहिणी | ” | ८४००० वर्ष | २१००० वर्ष |
| १९. | मार्गशिर्ष शु० ११ | अश्विनी | इक्ष्वाकु | ५५००० वर्ष | १०० वर्ष |
| २०. | वैशाख कृ० १२ | श्रवण | यादव | ३०००० वर्ष | ७५०० वर्ष |
| २१. | आषाढ कृ० १० | अश्विनी | इक्ष्वाकु | १०००० वर्ष | २५०० वर्ष |
| २२. | श्रावण शु० ६ | चित्रा | यादव | १००० वर्ष | ३०० वर्ष |
| २३. | पौष कृ० ११ | विशाखा | उग्र | १०० वर्ष | ३० वर्ष |
| २४. | चैत्र शु० १३ | उ० फाल्गुनी | नाथ | ७२ वर्ष | ३० वर्ष |

| | १२ | १३ | १४ | १५ | १६ |
|---|---|---|---|---|---|
| तीर्थ० | उत्सेध | शरीर वर्ण | राज्यकाळ | चिन्ह | वैराग्यकारण |
| १. | ५०० धनुष | सुवर्ण | ६३ लाख पूर्व | वृषभ | नीलांजना मरण |
| २. | ४५० " | " | ५३ " १ पूर्वांग | गज | उल्कापात |
| ३. | ४०० " | " | ४४ " ४ " | अश्व | मेघ विनाश |
| ४. | ३५० " | " | ३६ १/२ " ८ " | माकड | गंधर्व नगर नाश |
| ५. | ३०० " | " | २९ " १२ " | चकवा | जातिस्मरण |
| ६. | २५० " | विद्रुम वर्ण | २१ १/२ " १६ " | पद्म | " |
| ७. | २०० " | हरित | १४ " २० " | नन्द्यावर्त | वसंत-वन-लक्ष्मीनाश |
| ८. | १५० " | शुक्ल | ६ १/२ " २४ " | अर्धचंद्र | अध्रुवादि भावना |
| ९. | १०० " | " | १/२ " २८ " | मगर | उल्कापात |
| १०. | ९० " | सुवर्ण | १/२ " | कल्पवृक्ष[१] | हिमनाश |
| ११. | ८० " | " | ४२ लाख वर्ष | गेंडा | वसंतवन लक्ष्मीनाश |
| १२. | ७० " | विद्रुम | राज्य केले नाही | म्हैस | जातिस्मरण |
| १३. | ६० " | सुवर्ण | ३०००००० वर्ष | शूकर | मेघनाश |
| १४. | ५० " | " | १५००००० " | सेही | उल्कापात |
| १५. | ४५ " | " | ५००००० " | वज्र | " |
| १६. | ४० " | " | ५०००० " | हरिण | जातिस्मरण |
| १७. | ३५ " | " | ४७५०० " | छाग | " |
| १८. | ३० " | " | ४२००० " | मासा[२] | मेघ-विनाश |
| १९. | २५ " | " | राज्य केले नाही | कलश | अध्रुवादि भावना |
| २०. | २० " | नील | १५००० " | कासव | जातिस्मरण |
| २१. | १५ " | सुवर्ण | ५००० वर्ष | नील कमळ | " |
| २२. | १० " | नील | राज्य केले नाही | शंख | " |
| २३. | ९ हात | हरित | राज्य केले नाही | साप | " |
| २४. | ७ हात | सुवर्ण | " | सिंह | " |

१-२ वर्तमान प्रचलनात हे पाहिल्या जाते आणि निर्वाणभक्तित सुद्धा हेच चिन्ह आहेत.

| | १७ | १८ | १९ | २० | २१ |
|---|---|---|---|---|---|
| तीर्थ० | दीक्षा तिथि | दीक्षा नक्षत्र | दीक्षावन | दीक्षोपवास | दीक्षाकाल |
| १. | चैत्र कृ० ९ | उत्तराषाढा | सिद्धार्थ | षष्ठोपवास | अपरान्ह |
| २. | माघ शु० ९ | रोहिणी | सहेतुक | अष्टम भक्त | " |
| ३. | मार्गशिर्ष शु० १५ | ज्येष्ठा | " | तृ० उपवास | " |
| ४. | माघ शु० १२ | पुनर्वसु | उग्र | " | पूर्वान्ह |
| ५. | वैशाख शु० ९ | मघा | सहेतुक | " | " |
| ६. | कार्तिक कृ० १३ | चित्रा | मनोहर | तृ० भक्त | अपरान्ह |
| ७. | ज्येष्ठ शु० १२ | विशाखा | सहेतुक | " | पूर्वान्ह |
| ८. | पौष कृ० ११ | अनुराधा | सर्वार्थ | तृ० उपवास | अपरान्ह |
| ९. | मार्गशिर्ष शु० १ | " | पुष्प | तृ० भक्त | " |
| १०. | माघ कृ० १२ | मूल | सहेतुक | तृ० उपवास | " |
| ११. | फाल्गुन कृ० ११ | श्रवण | मनोहर | तृ० भक्त | पूर्वान्ह |
| १२. | फाल्गुन कृ० १४ | विशाखा | मनोहर | एक उपवास | अपरान्ह |
| १३. | माघ शु० ४ | उ० भाद्रपदा | सहेतुक | तृ० उपवास | " |
| १४. | ज्येष्ठ कृ० १२ | रेवती | " | तृ० भक्त | " |
| १५. | माघ शु० १३ | पुष्य | शालि | " | " |
| १६. | ज्येष्ठ कृ० १४ | भरणी | आम्र | तृ० उपवास | " |
| १७. | वैशाख शु० १ | कृत्तिका | सहेतुक | तृ० भक्त | " |
| १८. | मार्गशिर्ष शु० १० | रेवती | " | " | " |
| १९. | मार्गशिर्ष शु० ११ | अश्विनी | शालि | षष्ठ भक्त | पूर्वान्ह |
| २०. | वैशाख कृ० १० | श्रवण | नील | तृ० उपवास | अपरान्ह |
| २१. | आषाढ कृ० १० | अश्विनी | चैत्र | तृ० भक्त | " |
| २२. | श्रावण कृ० ६ | चित्रा | सहकार | " | " |
| २३. | पौष कृ० ११ | विशाखा | अश्वत्थ | षष्ठ भक्त | पूर्वान्ह |
| २४. | मार्गशिर्ष कृ० १० | उत्तरा | नाथ | तृ० भक्त | अपरान्ह |

| तीर्थ० | २२<br>सहदीक्षित | २३<br>छद्मस्थकाल | २४<br>केवलतिथि | २५<br>केवलोत्पत्तिकाल | २६<br>केवल स्थान | २७<br>केवल नक्षत्र |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | ४००० | १००० वर्ष | फाल्गुन कृ० ११ | पूर्वान्ह | पुरिमताल नगर | उत्तराषाढा |
| २. | १००० | १२ ” | पौष शु० ११ | अपरान्ह | सहेतुक वन | रोहिणी |
| ३. | ” | १४ ” | कार्तिक कृ० ४ | ” | ” | ज्येष्ठा |
| ४. | ” | १८ ” | पौष शु० १४ | ” | उग्रवन | पुनर्वसु |
| ५. | ” | २० ” | चैत्र शु० ११ | ” | सहेतुक | हस्त |
| ६. | ” | ६ महिने | चैत्र शु० १५ | ” | मनोहर | चित्रा |
| ७. | ” | ९ वर्ष | फाल्गुन कृ० ६ | ” | सहेतुक | विशाखा |
| ८. | ” | ३ महिने | फाल्गुन कृ० ७ | ” | सर्वार्थ | अनुराधा |
| ९. | ” | ४ वर्ष | कार्तिक शु० २ | ” | पुष्पवन | मूल |
| १०. | ” | ३ वर्ष | पौष कृ० १४ | ” | सहेतुक | पूर्वाषाढा |
| ११. | ” | २ ” | माघ कृ० अमावस्या | ” | मनोहर | श्रवण |
| १२. | ६७६ | १ ” | माघ शु० २ | ” | मनोहर | विशाखा |
| १३. | १००० | ३ ” | माघ शु० ६ | ” | सहेतुक | उत्तराषाढा |
| १४. | ” | २ ” | चैत्र कृ० अमावस्या | ” | ” | रेवती |
| १५. | ” | १ ” | पौष शु० पौर्णिमा | ” | ” | पुष्य |
| १६. | ” | १६ ” | पौष शु० १० | ” | आम्रवन | भरणी |
| १७. | ” | ” | चैत्र शु० ३ | ” | सहेतुक | कृत्तिका |
| १८. | ” | ” | कार्तिक शु० १२ | ” | ” | रेवती |
| १९. | ३०० | ६ दिवस | पौष कृ० २ | ” | मनोहर | अश्विनी |
| २०. | १००० | ११ महिने | वैशाख कृ० ९ | पूर्वान्ह | नीलवन | श्रवण |
| २१. | १००० | ९ महिने | मार्गशिर्ष शु० ११ | अपरान्ह | चैत्रवन | अश्विनी |
| २२. | १००० | ५६ महिने | आश्विन शु० १ | पूर्वान्ह | ऊर्जयन्त | चित्रा |
| २३. | ३०० | ४ महिने | चैत्र कृ० १४ | ” | शक्रपुर | विशाखा |
| २४. | एकाकी | १२ वर्ष | वैशाख शु० १० | ” | ऋजुकूलातीर | मघा |

| | २८ | २९ | ३० | ३१ | ३२ |
|---|---|---|---|---|---|
| तीर्थ० | समवशरण भूमि | अशोक वृक्ष (केवल वृक्ष) | यक्ष | यक्षिणी | केवली काल |
| १. | १२ योजन | न्यग्रोध | गोवदन | चक्रेश्वरी | १ लाख पूर्व–१००० वर्ष |
| २. | ११ १/२ " | सप्तपर्ण | महायक्ष | रोहिणी | १ लाख पूर्व–(१ पूर्वाङ्ग १२ वर्ष) |
| ३. | ११ " | शाल | त्रिमुख | प्रज्ञप्ति | १ लाख पूर्व–(४ पूर्वाङ्ग १४ वर्ष) |
| ४. | १० १/२ " | सरल | यज्ञेश्वर | वज्रशृङ्खला | १ लाख पूर्व–(८ पूर्वाङ्ग १८ वर्ष) |
| ५. | १० " | प्रियंगु | तुम्बुरु | वज्रांकुशा | १ लाख पूर्व–(१२ पूर्वाङ्ग २० वर्ष) |
| ६. | ९ १/२ " | " | मातंग | अप्रति चक्रेशरी | १ लाख पूर्व–(१६ पूर्वाङ्ग ६ महिने) |
| ७. | ९ " | शिरीष | विजय | पुरुषदत्ता | १ लाख पूर्व–(२० पूर्वाङ्ग ९ वर्ष) |
| ८. | ८ १/२ " | नाग | अजित | मनोवेगा | १ लाख पूर्व–(२४ पूर्वाङ्ग ३ महिने) |
| ९. | ८ " | बहेडा | ब्रह्म | काली | १ लाख पूर्व–(१८ पूर्वाङ्ग ४ वर्ष) |
| १०. | ७ १/२ " | धूली पलाश | ब्रह्मेश्वर | ज्वालामालिनी | २५००० पूर्व– ३ वर्ष |
| ११. | ७ " | तेंदू | कुमार | महाकाली | २०९९९९८ वर्ष |
| १२. | ६ १/२ " | पाटल | षण्मुख | गौरी | ५३९९९९९ वर्ष |
| १३. | ६ " | जम्बू | पाताल | गांधारी | १४९९९९७ वर्ष |
| १४. | ५ १/२ " | पिंपळ | किन्नर | वैरोटी | ७४९९९८ वर्ष |
| १५. | ५ " | दधिपर्ण | किम्पुरुष | अनन्तमती | २४९९९९ वर्ष |
| १६. | ४ १/२ " | नंदी | गरुड | मानसी | २४९८४ वर्ष |
| १७. | ४ " | तिलक | गंधर्व | महामानसी | २३७३४ वर्ष |
| १८. | ३ १/२ " | आम्र | कुबेर | जया | २०९८४ वर्ष |
| १९. | ३ " | अशोक | वरुण | विजया | ५४८९९ वर्ष ११ महिने २४ दिवस |
| २०. | २ १/२ " | चंपक | भृकुटी | अपराजिता | ७४९९ वर्ष १ महिना |
| २१. | २ " | बकुल | गोमेध | बहुरूपिणी | २४९१ वर्ष |
| २२. | १ १/२ " | मेघ शृङ्ग | पार्श्व | कुष्मांडी | ६९९ वर्ष १० महिने ४ दिवस |
| २३. | १ १/४ " | धव | मातंग | पद्मावती | ६९ वर्ष ८ महिने |
| २४. | १ " | शाल | गुह्यक | सिद्धायनी | ३० वर्ष |

| तीर्थ० | ३३ गणधर संख्या | ३४ मुख्य गणधर | ३५ ऋषि संख्या | ३६ पूर्वधर | ३७ शिक्षक | ३८ अवधिज्ञानी |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | ८४ | वृषभसेन | ८४००० | ४७५० | ४१५० | ९००० |
| २. | ९० | सिंहसेन | १००००० | ३७५० | २१६०० | ९४०० |
| ३. | १०५ | चारुदत्त | २००००० | २१५० | १२९३०० | ९६०० |
| ४. | १०३ | वज्रचमर | ३००००० | २५०० | २३००५० | ९८०० |
| ५. | ११६ | वज्र | ३२०००० | २४०० | २५४३५० | ११००० |
| ६. | १११ | चमर | ३३०००० | २३०० | २६९००० | १०००० |
| ७. | ९५ | बलदत्त | ३००००० | २०३० | २४४९२० | ९००० |
| ८. | ९३ | वैदर्भ | २५०००० | ४००० | २१०४०० | २००० |
| ९. | ८८ | नाग | २००००० | १५०० | १५५५०० | ८४०० |
| १०. | ८७ | कुन्थु | १००००० | १४०० | ५९२०० | ७२०० |
| ११. | ७७ | धर्म | ८४००० | १३०० | ४८२०० | ६००० |
| १२. | ६६ | मंदिर | ७२००० | १२०० | ३९२०० | ५४०० |
| १३. | ५५ | जय | ६८००० | ११०० | ३८५०० | ४८०० |
| १४. | ५० | अरिष्ट | ६६००० | १००० | ३९५०० | ४३०० |
| १५. | ४३ | सेन | ६४००० | ९०० | ४०७०० | ३६०० |
| १६. | ३६ | चक्रायुध | ६२००० | ८०० | ४१८०० | ३००० |
| १७. | ३५ | स्वयंभु | ६०००० | ७०० | ४३१५० | २५०० |
| १८. | ३० | कुंभ | ५०००० | ६१० | ३५८३५ | २८०० |
| १९. | २८ | विशाख | ४०००० | ५५० | २९००० | २२०० |
| २०. | १८ | मल्लि | ३०००० | ५०० | २१००० | १८०० |
| २१. | १७ | सुप्रभ | २०००० | ४५० | १२६०० | १६०० |
| २२. | ११ | वरदत्त | १८००० | ४०० | ११८०० | १५०० |
| २३. | १० | स्वयंभु | १६००० | ३५० | १०९०० | १४०० |
| २४. | ११ | इन्द्रभूति | १४००० | ३०० | ९९०० | १३०० |

| तीर्थ० | ३९ केवली | ४० विक्रियाधारी | ४१ विपुलमति | ४२ वादी | ४३ आर्यिका |
|---|---|---|---|---|---|
| १. | २०००० | २०६०० | १२७५० | १२७५० | ३५०००० |
| २. | २०००० | २०४०० | १२४५० | १२४०० | ३२०००० |
| ३. | १५००० | १९८०० | १२१५० | १२००० | ३३०००० |
| ४. | १६००० | १९००० | २१६५० | १००० | ३३०६०० |
| ५. | १३००० | १८४०० | १०४०० | १०४५० | ३३०००० |
| ६. | १२००० | १६८०० | १०३०० | ९६०० | ४२०००० |
| ७. | ११००० | १५३०० | ९१५० | ८६०० | ३३०००० |
| ८. | १८००० | ६०० | ८००० | ७००० | ३८०००० |
| ९. | ७५०० | १३००० | ७५०० | ६६०० | ३८०००० |
| १०. | ७००० | १२००० | ७५०० | ५७०० | ३८०००० |
| ११. | ६५०० | ११००० | ६००० | ५००० | १३०००० |
| १२. | ६००० | १०००० | ६००० | ४२०० | १०६००० |
| १३. | ५५००० | ९००० | ५५०० | ३६०० | १०३००० |
| १४. | ५००० | ८००० | ५००० | ३२०० | १०८००० |
| १५. | ४५०० | ७००० | ४५०० | २८०० | ६२४०० |
| १६. | ४००० | ६००० | ४००० | २४०० | ६०३०० |
| १७. | ३२०० | ५१०० | ३३५० | २००० | ६०३५० |
| १८. | २८०० | ४३०० | २०५५ | १६०० | ६०००० |
| १९. | २२०० | २९०० | १७५० | १४०० | ५५००० |
| २०. | १८०० | २२०० | १५०० | १२०० | ५०००० |
| २१. | १६०० | १५०० | १२५० | १००० | ४५००० |
| २२. | १५०० | ११०० | ९०० | ८०० | ४०००० |
| २३. | १००० | १००० | ७५० | ६०० | ३८००० |
| २४. | ७०० | ९०० | ५०० | ४०० | ३६००० |

| तीर्थ० | ४४<br>मुख्य आर्यिका | ४५<br>श्रावक | ४६<br>श्राविका | ४७<br>मोक्षतिथि |
|---|---|---|---|---|
| १. | ब्राह्मी | ३०००००० | ५०००००० | माघ कृ० १४ |
| २. | प्रकुब्जा | ” | ” | चैत्र शु० ५ |
| ३. | धर्मश्री | ” | ” | चैत्र शु० ६ |
| ४. | मेरुषेणा | ” | ” | वैशाख शु० ६ |
| ५. | अनन्ता | ” | ” | चैत्र शु० ११ |
| ६. | रतिषेणा | ” | ” | फाल्गुन कृ० ४ |
| ७. | मीना | ” | ” | फाल्गुन कृ० ७ |
| ८. | वरुणा | ” | ” | फाल्गुन शु० ७ |
| ९. | घोषा | २०००००० | ४०००००० | भाद्रपद शु० ८ |
| १०. | धरणा | ” | ” | आश्विन शु० ८ |
| ११. | चारणा | ” | ” | श्रावण शु० १५ |
| १२. | वरसेना | ” | ” | भाद्रपद शु० १४ |
| १३. | पद्मा | ” | ” | आषाढ कृ० ८ |
| १४. | सर्वश्री | ” | ” | चैत्र कृ० अमावस्या |
| १५. | सुव्रता | ” | ” | ज्येष्ठ शु० ४ |
| १६. | हरिषेणा | ” | ” | ज्येष्ठ कृ० १४ |
| १७. | भाविता | १०००००० | ३०००००० | वैशाख शु० १ |
| १८. | कुंथुसेना | ” | ” | चैत्र कृ० अमावस्या |
| १९. | मधुसेना | ” | ” | फाल्गुन शु० ५ |
| २०. | पूर्वदत्ता | ” | ” | फाल्गुन कृ० १२ |
| २१. | मार्गिणी | ” | ” | वैशाख कृ० १४ |
| २२. | यक्षी | ” | ” | आषाढ शु० ७ |
| २३. | सुलोका | ” | ” | श्रावण शु० ७ |
| २४. | चन्दना | ” | ” | कार्तिक कृ० अमावस्या |

| | ४८ | ४९ | ५० | ५१ | ५२ |
|---|---|---|---|---|---|
| तीर्थ० | मोक्षकाळ | मोक्षनक्षत्र | मोक्षस्थान | सहमुक्त | भोगनिवृत्ति |
| १. | पूर्वान्ह | उत्तराषाढा | कैलाश | १०००० | १४ दिवस पूर्व |
| २. | ” | भरणी | सम्मेद शिखर | १००० | १ महिना पूर्व |
| ३. | अपरान्ह | ज्येष्ठा | ” | ” | ” |
| ४. | पूर्वान्ह | पुनर्वसु | ” | ” | ” |
| ५. | ” | मघा | ” | ” | ” |
| ६. | अपरान्ह | चित्रा | ” | ३२४ | ” |
| ७. | पूर्वान्ह | अनुराधा | ” | ५०० | ” |
| ८. | पूर्वान्ह | ज्येष्ठा | ” | १००० | ” |
| ९. | अपरान्ह | मूल | ” | ” | ” |
| १०. | पूर्वान्ह | पूर्वाषाढा | ” | ” | ” |
| ११. | ” | धनिष्ठा | ” | ” | ” |
| १२. | अपरान्ह | अश्विनी | चम्पापूर | ६०१ | ” |
| १३. | प्रदोष | पूर्व भाद्रपदा | सम्मेदशिखर | ६०० | ” |
| १४. | प्रदोष | रेवती | ” | ७००० | ” |
| १५. | प्रत्यूष | पुष्य | ” | ८०१ | ” |
| १६. | प्रदोष | भरणी | ” | ९०० | ” |
| १७. | प्रदोष | कृत्तिका | ” | १००० | ” |
| १८. | प्रत्यूष | रोहिणी | ” | ” | ” |
| १९. | प्रदोष | भरणी | ” | ५०० | ” |
| २०. | ” | श्रवण | ” | १००० | ” |
| २१. | प्रत्यूष | अश्विनी | ” | ” | ” |
| २२. | प्रदोष | चित्रा | ऊर्जयन्त | ५३६ | ” |
| २३. | प्रदोष | विशाखा | सम्मेदशिखर | ३६ | ” |
| २४. | प्रत्यूष | स्वाति | पावानगरी | एकाकी | २ दिवस पूर्व |

### चार्ट नं. ३

# बारा चक्रवर्ती

| | नाव | उत्सेध | आयु | कुमारकाळ | मंडलीक काळ |
|---|---|---|---|---|---|
| १. | भरत | ५०० धनुष | ८४ लाख पूर्व | ७७०००००० पूर्व | १००० वर्ष |
| २. | सगर | ४५० धनुष | ७२ लाख पूर्व | ५०००० वर्ष | ५०००० वर्ष |
| ३. | मघवा | ४२ $\frac{१}{२}$ धनुष | ५००००० वर्ष | २५००० वर्ष | २५००० वर्ष |
| ४. | सनत्कुमार | ४२ धनुष | ३००००० वर्ष | ५०००० वर्ष | ५०००० वर्ष |
| ५. | शान्ति | ४० धनुष | १००००० वर्ष | २५००० वर्ष | २५००० वर्ष |
| ६. | कुंथु | ३५ धनुष | ९५००० वर्ष | २३७५० वर्ष | २३७५० वर्ष |
| ७. | अर | ३० धनुष | ८४००० वर्ष | २१००० वर्ष | २१००० वर्ष |
| ८. | सुभौम | २८ धनुष | ६०००० वर्ष | ५००० वर्ष | ५००० वर्ष |
| ९. | पद्म | २२ धनुष | ३०००० वर्ष | ५०० वर्ष | ५०० वर्ष |
| १०. | हरिषेण | २० धनुष | १०००० वर्ष | ३२५ वर्ष | ३२५ वर्ष |
| ११. | जयसेन | १५ धनुष | ३००० वर्ष | ३०० वर्ष | ३०० वर्ष |
| १२. | ब्रह्मदत्त | ७ धनुष | ७०० वर्ष | २८ वर्ष | ५६ वर्ष |

| चक्र० | विजय काळ | राज्यकाळ | संयमकाळ | प्राप्त गति |
|---|---|---|---|---|
| १. | ६०००० वर्ष | ६ लाख पूर्व ६१००० वर्ष | १ लाख पूर्व | मुक्ति प्राप्त |
| २. | ३०००० वर्ष | ७० लाख पूर्व ३०००० वर्ष | १ लाख पूर्व | मुक्ति प्राप्त |
| ३. | १०००० वर्ष | ३९०००० वर्ष | ५०००० वर्ष | सनत्कुमार कल्प |
| ४. | १०००० वर्ष | ९०००० वर्ष | १००००० वर्ष | ” |
| ५. | ८०० वर्ष | २४२०० वर्ष | २५००० वर्ष | मुक्ति प्राप्त |
| ६. | ६०० वर्ष | २३१५० वर्ष | २३७५० वर्ष | ” |
| ७. | ४०० वर्ष | २०६०० वर्ष | २१००० वर्ष | ” |
| ८. | ५०० वर्ष | ४९५०० वर्ष | ० वर्ष | सप्तम नरक |
| ९. | ३०० वर्ष | १८७०० वर्ष | १०००० वर्ष | मुक्ति प्राप्त |
| १०. | १५० वर्ष | ८८५० वर्ष | ३५० वर्ष | ” |
| ११. | १०० वर्ष | १९०० वर्ष | ४०० वर्ष | ” |
| १२. | १६ वर्ष | ६०० वर्ष | ० वर्ष | सप्तम नरक |

## चार्ट नं॰ ४

# नऊ बलदेव

| | नाव | उत्सेध | आयु | प्राप्त गति |
|---|---|---|---|---|
| १. | विजय | ८० धनुष | ८७००००० वर्ष | मोक्ष |
| २. | अचल | ७० धनुष | ७७००००० वर्ष | मोक्ष |
| ३. | धर्म | ६० धनुष | ६७००००० वर्ष | मोक्ष |
| ४. | सुप्रभ | ५० धनुष | ३७००००० वर्ष | मोक्ष |
| ५. | सुदर्शन | ४५ धनुष | १७००००० वर्ष | मोक्ष |
| ६. | नंदी | २९ धनुष | ६७००० वर्ष | मोक्ष |
| ७. | नंदिमित्र | २२ धनुष | ३७००० वर्ष | मोक्ष |
| ८. | राम | १६ धनुष | १७००० वर्ष | मोक्ष |
| ९. | पद्म | १० धनुष | १२०० वर्ष | ब्रह्म कल्प |

## चार्ट नं॰ ५

# नऊ नारायण

| | नाव | उत्सेध | आयु | कुमार काल |
|---|---|---|---|---|
| १. | त्रिपृष्ठ | ८० धनुष | ८४००००० वर्ष | २५००० वर्ष |
| २. | द्विपृष्ठ | ७० धनुष | ७२००००० वर्ष | ” |
| ३. | स्वयंभु | ६० धनुष | ६०००००० वर्ष | १२५०० वर्ष |
| ४. | पुरुषोत्तम | ५० धनुष | ३०००००० वर्ष | ७०० वर्ष |
| ५. | पुरुषसिंह | ४५ धनुष | १०००००० वर्ष | ३०० वर्ष |
| ६. | पुरुष पुण्डरीक | २६ धनुष | ६५००० वर्ष | २५० वर्ष |
| ७. | दत्त | २२ धनुष | ३२००० वर्ष | २०० वर्ष |
| ८. | नारायण | १६ धनुष | १२००० वर्ष | १०० वर्ष |
| ९. | कृष्ण | १० धनुष | १००० वर्ष | १६ वर्ष |

| नारायण | मण्डलीक काळ | विजयकाळ | राज्यकाळ | प्राप्त गति |
|---|---|---|---|---|
| १. | २५००० वर्ष | १००० वर्ष | ८३४९००० वर्ष | सप्तम नरक |
| २. | ” | १०० वर्ष | ७१४९९०० वर्ष | षष्ठ नरक |
| ३. | १२५०० वर्ष | ९० वर्ष | ५९७४९१० वर्ष | ” |
| ४. | १३०० वर्ष | ८० वर्ष | २९९७९२० वर्ष | ” |
| ५. | १२५० वर्ष | ७० वर्ष | ९९८३८० वर्ष | ” |
| ६. | २५० वर्ष | ६० वर्ष | ६४४४० वर्ष | ” |
| ७. | ५० वर्ष | ५० वर्ष | ३१७०० वर्ष | पंचम नरक |
| ८. | ३०० वर्ष | ४० वर्ष | ११५६० वर्ष | चतुर्थ नरक |
| ९. | ५६ वर्ष | ८ वर्ष | ९२० वर्ष | तृतीय नरक |

### चार्ट नं० ६

## नऊ प्रतिशत्रु

| | नाव | उत्सेध | आयु | प्राप्त गति |
|---|---|---|---|---|
| १. | अश्वग्रीव | ८० धनुष | ८४००००० वर्ष | सप्तम नरक |
| २. | तारक | ७० धनुष | ७२००००० वर्ष | षष्ठ नरक |
| ३. | मेरक | ६० धनुष | ६०००००० वर्ष | षष्ठ नरक |
| ४. | मधुकैटभ | ५० धनुष | ३०००००० वर्ष | षष्ठ नरक |
| ५. | निशुम्भ | ४५ धनुष | १०००००० वर्ष | षष्ठ नरक |
| ६. | बलि | २९ धनुष | ६५००० वर्ष | षष्ठ नरक |
| ७. | प्रहरण | २२ धनुष | ३२००० वर्ष | पंचम नरक |
| ८. | रावण | १६ धनुष | १२००० वर्ष | चतुर्थ नरक |
| ९. | जरासंध | १० धनुष | १००० वर्ष | तृतीय नरक |

### चार्ट नं० ७

## एकादश रुद्र

| | नाव | उत्सेध | आयु | कुमारकाल | संयमकाल | भंग तपकाल | प्राप्त गति |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | भीमावलि | ५०० धनुष | ८३ लाख पूर्व | २७६६६६६ पूर्व | २७६६६६८ पूर्व | २७६६६६६ पूर्व | सप्तमनरक |
| २. | जितशत्रु | ४५० " | ७१ " | २३६६६६६ " | २३६६६६८ " | २३६६६६६६ " | " |
| ३. | रुद्र | १०० " | २ " | ६६६६६ " | ६६६६८ " | ६६६६६६ " | षष्ठनरक |
| ४. | वैश्वानर | ९० " | १ " | ३३३३३ " | ३३३३४ " | ३३३३३ " | " |
| ५. | सुप्रतिष्ठ | ८० " | ८४ लाख वर्ष | २८००००० वर्ष | २८००००० वर्ष | २८००००० पूर्व | " |
| ६. | अचल | ७० " | ६० " | २०००००० " | २०००००० " | २०००००० " | " |
| ७. | पुंडरीक | ६० " | ५० " | १६६६६६६ " | १६६६६६८ " | १६६६६६६ " | " |
| ८. | अजितधर | ५० " | ४० " | १३३३३३३ " | १३३३३३४ " | १३३३३३३ " | पंचमनरक |
| ९. | अजितनाभि | २८ " | २० " | ६६६६६६ " | ६६६६६८ " | ६६६६६६ " | चतुर्थनरक |
| १०. | पीठ (पीढाल) | २४ " | १० " | ३३३३३३ " | ३३३३३४ " | ३३३३३३ " | " |
| ११. | सत्यकिपुत्र | ७ हात | ६८ धनुष | ७ " | ३४ " | २८ " | तृतीयनरक |

## चार्ट नं० ८

# नारक जीव

| | पृथ्वी | जाडी | बिल संख्या | इन्द्रक | उत्कृष्ट नरकायु | उत्सेध |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | रत्नप्रभा | १८०००० यो० | ३००००००० | १३ | १ सा० | ३१ हात |
| २. | शर्कराप्रभा | ३२००० यो० | २५००००० | ११ | ३ सा० | ६२ हात |
| ३. | बालुकाप्रभा | २८००० यो० | १५००००० | ९ | ७ सा० | १२५ हात |
| ४. | पंकप्रभा | २४००० यो० | १०००००० | ७ | १० सा० | २५० हात |
| ५. | धूमप्रभा | २०००० यो० | ३००००० | ५ | १७ सा० | १२५ धनुष |
| ६. | तमःप्रभा | १६८०० यो० | ९९९९५ | ३ | २२ सा० | २५० धनुष |
| ७. | महातमःप्रभा | ८००० यो० | ५ | १ | ३३ सा० | ५०० धनुष |

| | | अवधिक्षेत्र | उत्पाद्यमान जीव | उत्पत्ति-मरण | अग्रिमभवामध्ये | उछलन |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | रत्न० | १ योजन | असंज्ञी | २४ मुहूर्त | तीर्थङ्कर | ७ १३/१६ यो० |
| २. | शर्करा० | ३ १/२ कोस | सरीसृप | ७ दिवस | ” | १५ १०/१६ ” |
| ३. | बालु० | ३ कोस | पक्षी | १५ दिवस | ” | ३१ ४/१६ ” |
| ४. | पंक० | २ १/२ कोस | सर्पादि | १ महिना | चरमशरीरी | ६२ ८/१६ ” |
| ५. | धूम० | २ कोस | सिंह | २ महिने | संयत | १२५ ” |
| ६. | तमः० | १ १/२ कोस | स्त्री | ४ महिने | देशव्रती | २५० ” |
| ७. | महा० | १ कोस | मत्स्य | ६ महिने | सम्यक्त्वधर | ५०० ” |

## चार्ट नं० ९

| क्षेत्र तसेच कुलाचलांची | विस्तार | | पर्वतांची उंची | | पर्वतांचे |
|---|---|---|---|---|---|
| नावे | योजनाने | मीलाने | योजनाने | मीलाने | वर्ण |
| भरतक्षेत्र | ५२६ ६/१९ | २,१०,५६३ १/१९ | × | × | × |
| हिमवन पर्वत | १,०५२ १२/१९ | ४२,१०,५२६ ६/१९ | १०० | ४,००,००० | स्वर्णमय |
| हैमवत क्षेत्र | २,१०५ ५/१९ | ८४,२१,०५२ १२/१९ | × | × | |
| महामहिमवन पर्वत | ४,२१० १०/१९ | १,६८,४२,१०५ ५/१९ | २०० | ८,००,००० | रजतमय |
| हरि क्षेत्र | ८,४२१ १/१९ | ३,३६,८४,२१० १०/१९ | × | × | |
| निषध पर्वत | १६,८४२ २/१९ | ६,७३,६८,४२१ १/१९ | ४०० | १६,००,००० | तपनीयस्वर्ण |
| विदेह क्षेत्र | ३३,६८४ ४/१९ | १३,४७,३६,८४२ ४/१९ | × | × | |
| नील पर्वत | १६,८४२ २/१९ | ६,७३,६८,४२१ १/१९ | ४०० | १६,००,००० | वैडूर्यमणि |
| रम्यक् पर्वत | ८,४२१ १/१९ | ३,३६,८४,२१० १०/१९ | × | × | |
| रुक्मि पर्वत | ४,२१० १०/१९ | १,६८,४२,१०५ ५/१९ | २०० | ८,००,००० | रजतमय |
| हैरण्यवत पर्वत | २,१०५ ५/१९ | ८४,२१,०५२ १२/१९ | × | × | |
| शिखरी पर्वत | १,०५२ १२/१९ | ४२,१०,५३६ ६/१९ | १०० | ४,००,००० | स्वर्णमय |
| ऐरावत पर्वत | ५२६ ५/१९ | २,१०,५६३ ३/१९ | × | × | |

## चार्ट नं० १०

| सरोवरांची नावे | सरोवरांची लांबी योजनाने | सरोवरांची लांबी मीलाने | रुंदी योजन | रुंदी मील | खोलपणा योजन | खोलपणा मील | प्रमुख देवी | परिवार कमल |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पद्म | १००० | ४०००००० | ५०० | २०००००० | १० | ४०००० | श्रीदेवी | १४०११५ |
| महापद्म | २००० | ८०००००० | १००० | ४०००००० | २० | ८०००० | ही देवी | २८०२३० |
| तिगिंच्छ | ४००० | १६०००००० | २००० | ८०००००० | ४० | १६०००० | धृतिदेवी | ५६०४६० |
| केशरी | ४००० | १६०००००० | २००० | ८०००००० | ४० | १६०००० | कीर्ति दे० | ५६०४६० |
| पुंडरीक | २००० | ८०००००० | १००० | ४०००००० | २० | ८०००० | बुद्धिदेवी | २८०२३० |
| महापुंडरीक | १००० | ४०००००० | ५०० | २०००००० | १० | ४०००० | लक्ष्मी दे० | १४०११५ |

## चार्ट नं० ११

# भवनवासी देव

| क्र० सं० | नाव | मुकुट चिन्ह | भवन | इन्द्र | उत्कृष्ठ वय |
|---|---|---|---|---|---|
| १. | असुरकुमार | चूडामणि | ६४ लाख | २ | १ सा० |
| २. | नागकुमार | सर्प | ८४ लाख | २ | ३ प० |
| ३. | सुपर्णकुमार | गरुड | ७२ लाख | २ | २ १/२ प० |
| ४. | द्वीपकुमार | हत्ती | ७६ लाख | २ | २ ” |
| ५. | उदधिकुमार | मगर | ७६ लाख | २ | १ १/२ ” |
| ६. | स्तनितकुमार | स्वस्तिक | ७६ लाख | २ | १ १/२ ” |
| ७. | विद्युत्कुमार | वज्र | ७६ लाख | २ | १ १/३ ” |
| ८. | दिक्कुमार | सिंह | ७६ लाख | २ | १ १/२ ” |
| ९. | अग्निकुमार | कलश | ७६ लाख | २ | १ १/३ ” |
| १०. | वायुकुमार | तुरग | ९६ लाख | २ | १ १/२ ” |

उ० अवधि

| | | उत्सेध | क्षेत्र | काल |
|---|---|---|---|---|
| १. | असुर० | २५ ध० | असं० कोटि यो० | असंख्यात वर्ष |
| २. | नाग० | १० ध० | असं.० हजार यो० | असुरांना सं० गुणाहीन |
| ३. | सुपर्ण० | ” | ” | ” |
| ४. | द्वीप० | ” | ” | ” |
| ५. | उदधि० | ” | ” | ” |
| ६. | स्तनित० | ” | ” | ” |
| ७. | विद्युत० | ” | ” | ” |
| ८. | दिक्० | ” | ” | ” |
| ९. | अग्नि० | ” | ” | ” |
| १०. | वायु० | ” | ” | ” |

# चार्ट नं॰ १२

| विमानांची नावे | चित्रा पृथ्वीपासूनची उंची योजनाने | मैलाने | विमानाचे प्रमाण योजनाने | मैलाने | किरणे |
|---|---|---|---|---|---|
| या पृथ्वीपासून तारे | ७९० यो॰ पासून | ३१६०००० | $\frac{१}{४}$ कोस | २५० मी॰ | मंद किरणे |
| ” सूर्य | ८०० ” | ३२००००० | $\frac{४८}{६१}$ योजन | ३१४७$\frac{३३}{६१}$ | १२००० |
| ” चंद्र | ८८० ” | ३५२०००० | $\frac{५६}{६१}$ योजन | ३६७२$\frac{८}{६१}$ | १२००० |
| ” नक्षत्र | ८८४ ” | ३५३६००० | × | × | × |
| ” बुध | ८८८ ” | ३५५२००० | काही कमी$\frac{१}{२}$कोस | काही कमी ५००मी॰ | मंद किरणे |
| ” शुक्र | ८९१ ” | ३५६४००० | १ कोस | १००० मी॰ | २५०० |
| ” गुरु | ८९४ ” | ३५७६००० | काही कमी १ कोस | काही कमी १०००मी॰ | मंद किरणे |
| ” मंगळ | ८९७ ” | ३५८८००० | काही कमी$\frac{१}{२}$कोस | काही कमी ५००मी॰ | ” |
| ” शनि | ९०० ” | ३६००००० | ” | ” | ” |
| ” राहु | × ” | × | काही कमी १योजन | काही कमी ४०००मी॰ | ” |
| ” केतु | × ” | × | ” | काही कमी ४०००मी॰ | ” |

## चाट न० १३

# बारा कल्प

| नाव | इन्द्रक | श्रणोबद्ध | प्रकोणक | वि० तल-बा० | विमानवण | विमानाधार | प्रवोचार | वद्धायष्क | उत्कष्ट वय घातायष्क | विरहकाल | उत्कष्ट अवधि क्षत्र |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. साधम | ३१ | ४३७१ | ३१९५५९८ | ११२१ या० | पाचहो वण | घन-उदक | काय प्रवोचार | २ सागर | २$\frac{१}{२}$सागर | ७ दिवस | प्र० पथिवो |
| २. इशान | .... | १४४७ | २७९८५४३ | ,, | ,, | ,, | ,, | ,, | ,, | ,, | ,, |
| ३. सनत्कमार | ७ | ५८८ | ११९९४०५ | १०२२ या० | क० न रहित | ४ वात | स्पश प्रविचार | ७ सागर | ७$\frac{१}{२}$सागर | १ पक्ष | द्वो०पथिवो |
| ४. माहन्द्र | .... | १९६ | ७९९८०४ | ,, | ,, | ,, | ,, | ,, | ,, | ,, | ,, |
| ५. बह्म | ४ | ३६० | ३९९६३६ | ९२३ या० | क० नो० रहित | ३ जल वात | रूप प्रवोचार | १० सागर | १०$\frac{१}{२}$सागर | १ महिना | त० पथिवो |
| ६. लातव | २ | १५६ | ४९८४२ | ८२४ या० | ,, | ,, | ,, | १४ सागर | १४$\frac{१}{२}$सागर | १ महिना | ,, |
| ७. महाशक | १ | ७२ | ३९९२७ | ७२५ या० | पोत शक्ल | ,, | शब्द प्रवोचार | १६ सागर | १६$\frac{१}{२}$सागर | २ महिन | च० पथिवो |
| ८. सहस्रार | १ | ६८ | ५९३१ | ६२६ या० | ,, | ,, | ,, | १८ सागर | १८$\frac{१}{२}$सागर | २ महिन | च० पथिवो |
| ९. आनत | | | | | | शद्ध आकाश | मनः प्रवोचार | २० सागर | .... | ४ महिन | प० पथिवो |
| १०. प्राणत | | | | | | ,, | ,, | ,, | .... | ,, | ,, |
| ११. आरण | ६ | ३२४ | ३७० | ५२७ या० | शक्ल | ,, | ,, | २२ सागर | .... | ,, | ,, |
| १२. अच्यत | | | | | | ,, | ,, | ,, | .... | ,, | ,, |